# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

इतिहास : ऐच्छिक पेपर ४ सत्र ३

# भारताचा इतिहास

**(History of India) (1757-1857)**

इतिहास : ऐच्छिक पेपर ६ सत्र ४

# स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास

**(History of Freedom Struggle)**
**(1858-1947)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**बी. ए. भाग-२**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
बी. ए. (भारताचा इतिहास / स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास) भाग-२ इतिहास पेपर ४ व ६ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-76-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. एन. काशिद** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत जून २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांची गरज ओळखून दूरशिक्षण योजने अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीचा उपक्रम विद्यापीठाने हाती घेतला असून, याअंतर्गत अभ्यासक्रमावर आधारीत दर्जेदार पुस्तके विद्यापीठाच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात येतात. सन २०१९-२०२० पासून बी. ए. भाग-२ इतिहास विषयाचा अभ्यासक्रम बदललेला आहे. सदरच्या योजनेअंतर्गत बी.ए.भाग-२ इतिहास पेपर क्र. ४ सत्र ३ साठी भारताचा इतिहास (१७५७ ते १८५७) व पेपर क्र. ६ सत्र ४ साठी स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास (१८५८ ते १९४७) या पेपरच्या अभ्यासक्रमावर आधारीत हे स्वयं अध्ययनासाठी पुस्तक लिहिले आहे. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या घटकांचे स्पष्टीकरण सुलभ भाषेतून केल्यामुळे विद्यार्थ्यांना विषयाची माहिती होण्यास अडचण राहणार नाही असे वाटते. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, सारांश व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

या पुस्तकामध्ये भारताचा इतिहास व स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास या पेपरच्या अभ्यासक्रमावर आधारीत स्वयं अध्ययन साहित्य लिहिलेले आहे. सत्र तीन व चार साठी प्रत्येकी चार घटकांचा समावेश केलेला आहे. यामध्ये सत्र तीन साठी भारतातील कंपनीच्या राजवटीची स्थापना, ईस्ट इंडिया कंपनीचे वसाहतवादी धोरण, वसाहतकालीन अर्थव्यवस्था, कंपनी सरकारविरुद्ध उठाव तसेच सत्र चार साठी राष्ट्रवादाचा उदय, गांधी युग, स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाह, जमातवाद आणि फाळणी इत्यादींचा समावेश केलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी व विविध स्पर्धा परीक्षांच्यासाठी महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

सदर पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ मनापासून आभारी आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

**डॉ. अभय पाटील**
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड, जि. सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३ घटक क्रमांक | सत्र–४ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. व्ही. आर. माने**<br>क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल | १ | – |
| **डॉ. संदिप महाजन**<br>एस. जी. एम. कॉलेज, कराड | २ | – |
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ३ | – |
| **डॉ. अजितकुमार दादासो जाधव**<br>आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, जि. सातारा | ४ | – |
| **श्री. संदिप बी. जाधव**<br>विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे | – | १ |
| **डॉ. विकास सुदाम येलमार**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | – | २ |
| **डॉ. संतोष जेठीथोर**<br>डी. आर. माने महाविद्यालय, कागल | – | ३ |
| **श्री. मुफीद मुजावर**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

**डॉ. अभय पाटील**
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सेमिस्टर–३ : पेपर–४ | |
| १. | भारतातील कंपनीच्या राजवटीची स्थापना | १ |
| २. | ईस्ट इंडिया कंपनीचे वसाहतवादी धोरण | ३७ |
| ३. | वसाहतकालीन अर्थव्यवस्था | ७१ |
| ४. | कंपनी सरकारविरुद्ध उठाव | १०५ |
| | सेमिस्टर–४ : पेपर–६ | |
| १. | राष्ट्रवादाचा उदय | १३७ |
| २. | गांधी युग | १८४ |
| ३. | स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाह | २२२ |
| ४. | जमातवाद आणि फाळणी | २५४ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१९-२० पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र-३ : घटक-१

# भारतातील कंपनीच्या राजवटीची स्थापना

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ कंपनी राजवटीच्या स्थापनेची कारणे

१.२.२ एत्तद्देशीय सत्तांशी संघर्ष (बंगाल व म्हैसूर)

१.२.३ मराठी सत्तेशी संघर्ष

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

१. १८ व्या शतकाच्या मध्याची राजकीय परिस्थिती स्पष्ट करता येईल.

२. कंपनी राजवटीच्या स्थापनेच्या विविध कारणांची माहिती होईल.

३. कंपनीचा बंगाल व म्हैसूर या सत्तांशी झालेला संघर्ष स्पष्ट करता येईल.

४. कंपनी व मराठे यांच्यातील संघर्षाची माहिती सांगता येईल.

## १.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून भारत सधन व संपन्न राष्ट्र म्हणून ओळखले जात होते. भारताचा युरोपियन राष्ट्रांशी जमीन व समुद्रामार्गे व्यापार चालत होता. इ.स.च्या सातव्या शतकात या व्यापारी मार्गावर येणारे

आशिया व उत्तर आफ्रिकेतील बहुतेक देश अरबांनी जिंकले. प्राचीन काळापासून चालणाऱ्या या व्यापारात त्यामुळे अडथळा होवू लागला. १४५३ मध्ये तुर्कांनी पूर्व रोमन साम्राज्याची राजधानी कॉन्स्टॅन्टिनोपल जिंकून घेतल्याने खुष्कीच्या मार्गाने होणारा व्यापार बंद पडला. भारताशी यामार्गे होणारा व्यापार युरोपियन देशांना अतिशय फायदेशीर होता. पोर्तुगाल, स्पेन इत्यादी देश भारताकडे जाणाऱ्या सागरी मार्गाचा शोध घेऊ लागले. या प्रयत्नातून पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा १४९८ मध्ये 'केप ऑफ गुड होप'ला वळसा घालून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत येथे पोहोचला.

वास्को-द-गामाच्या या शोधामुळे भारत-युरोप संबंधाच्या इतिहासात एका नव्या युगाला प्रारंभ झाला. हा मार्ग खुला होताच प्रथम व्यापारी म्हणून व नंतर वसाहतकार म्हणून युरोपीय भारतात आले. पोर्तुगीजांनी भारतात येवून वखारी स्थापन केल्या. १६०२ मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना होवून त्यांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर वसाहती स्थापन केल्या. पूर्वेकडे पोर्तुगीज व डच यांचा चाललेला व्यापार पाहून सन १६०० मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. सन १६६४ मध्ये फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. या व्यापारी कंपन्यामध्ये सत्तास्पर्धा होऊन त्यात इंग्रज विजयी झाले. ब्रिटिशांनी या संधीचा फायदा घेत संपूर्ण भारत जिंकून त्यावर आपले प्रभुत्व निर्माण केले.

## ❑ ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी :-

पूर्वेकडील देशांशी पोतुर्गीज व डच यांच्यात चाललेल्या व्यापारावर इंग्रज व्यापाऱ्यांची नजर होती. सन १५९९ मध्ये साहसी व्यापारी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्यापाऱ्यांच्या एका गटाने ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. ३१ डिसेंबर १६०० रोजी एलिझाबेथ राणीने कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याची व व्यापारी वखारी स्थापन करण्याची सनद दिली. या सनदेनुसार कंपनीला पूर्वेकडील व्यापाराचा एकाधिकार, युद्ध पुकारणे, शांतता प्रस्थापित करणे, कायदे करणे असे अधिकार प्राप्त झाले.

सन १६०८ मध्ये कंपनीने भारतात पहिली वखार पश्चिम किनाऱ्यावरील सुरत येथे स्थापन केली. सन १६१३ मध्ये मुघल बादशहाकडून विशेष सवलती मिळवण्यासाठी कॅप्टन हॉकिन्स याला मुघल बादशहा जहाँगीरच्या दरबारी पाठविण्यात आले. यावेळी वखारी स्थापन करण्याची परवानगी देणारी एक शाही सनद मुघल दरबाराकडून कंपनीला देण्यात आली. सन १६१५ मध्ये कंपनीने सर थॉमस रो याला मुघल दरबारी पाठविले. त्याने मुघल बादशहा भेट घेऊन मुघल साम्राज्याच्या भागामध्ये वखारी उघडण्याची प्राप्त केली. ब्रिटीशांनी पुढील काळात सुरत, भडोच, आग्रा, अलाहाबाद, कलकत्ता, मच्छलीपट्टणम, मद्रास, राजापूर, मुंबई इ. ठिकाणी आपल्या वखारी उघडल्या. या वखारीपैकी मुंबई, मद्रास व कलकत्ता ही शहरे ब्रिटिशांच्या प्रसाराची मुख्य केंद्रे म्हणून विकसित झाली.

सन १६६४ मध्ये फ्रान्सच्या राजाच्या आशिर्वादाने फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. थोड्याच काळात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीशी स्पर्धा करू शकेल इतकी ती प्रबळ झाली. फ्रेंचांनी सुरत, मच्छलीपट्टम, चंद्रनगर, पाँडेचरी येथे वखारी स्थापन केल्या. भारतात व्यापार व वसाहती या कारणावरून इंग्रज व फ्रेंच यांच्यात तीव्र स्पर्धा निर्माण झाली. मुघल साम्राज्याच्या विघटनाच्या काळात दोहोंच्या आकांक्षा उफाळून आल्यामुळे त्यांच्या शत्रुत्वाला धार निर्माण झाली. त्यांचे उद्दीष्ट एकच होते, प्रतिस्पर्धी कंपनीला भारतातून हाकलून लावून तेथे एकाधिकार व राजकीय प्रभाव प्रस्थापित करणे. सन १७४४ ते १७६३ या कालखंडात त्यांच्यात तीन कर्नाटक युध्दे झाली. सन १७६० मधील तिसऱ्या कर्नाटक युध्दात (वांदिवॉशच्या) युद्धात इंग्रजांनी फ्रेंचांचा पराभव केला. या युद्धाने भारतातून राजकीयदृष्ट्या फ्रेंचांचे उच्चाटन केले. डच सत्ता निष्प्रभ ठरली तर पोर्तुगीज गोवा, दिव, दमण या प्रांतापूरती मर्यादित होती. इंग्रजांनी भारतातील सत्ताधिशांचा पराभव करून त्यांच्या प्रदेशावर कंपनीचे वर्चस्व निर्माण करण्यास सुरूवात केली.

# १.२ विषय विवेचन

## १.२.१ कंपनी राजवटीच्या स्थापनेची कारणे

### १) मुघल साम्राज्याचा ऱ्हास व विघटन :-

सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत मुघल साम्राज्य आशियातील सर्वात वैभवशाली व सामर्थ्यसंपन्न असल्याचे मानले जात होते. सम्राट अकबराने धर्मसहिष्णूतेचे धोरण राबवून मुघल साम्राज्य दृढ केले. त्याच्यानंतर जहाँगीर व शहाजहॉन या उत्तराधिकाऱ्यांनी याच धोरणाचा अवलंब केला. मात्र औरंगजेब बादशहाच्या काळात या सहिष्णू धोरणाला तिलांजली मिळाली. औरंगजेबाचे हिंदूविरोधी धोरण, त्यांच्यावर लादलेला जिझिया कर, त्यांच्यावर घातलेले मानहाणीकारक निर्बंध, हिंदूंची पवित्र मंदिरे फोडण्याचे झालेले प्रकार इत्यादी अनेक कारणामुळे मुघल सत्तेविरुध्द उठाव होण्यास सुरुवात झाली. औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात भारताच्या निरनिराळ्या भागात बंड होवू लागले. उत्तरेत शीख, सतनामी, जाट, बुंदेले व रजपूत मुघल सत्तेविरुध्द उठले. दक्षिणेत तर मराठ्यांनी मुघलांना जबरदस्त आव्हान दिले. हा संघर्ष औरंगजेबाच्या मृत्यूनेच संपला. औरंगजेबाने त्याच्या जीवनाची अखेरची पंचवीस वर्षे त्याच्या चिवट शत्रूशी म्हणजेच मराठ्यांशी झुंजण्यात घालवली. उत्तरेतील त्याच्या अनुपस्थितीमुळे शासकीय यंत्रणा विस्कळीत व दुबळी झाली. मराठ्यांविरुध्द युद्धात खर्ची पडलेले मनुष्यबळ व झालेली अपरिमित वित्तहानी, सततच्या युद्धामुळे माजलेले अराजक, कृषि, उद्योग व व्यापार यावर झालेला विघातक परिणाम यामुळे अर्थव्यवस्था कोलमडली. राजकीय परिस्थिती अस्थिर झाली.

औरंगजेबाच्या उत्तराधिकाऱ्यात राज्यकर्त्याला आवश्यक असलेला खंबीरपणा, कर्तबगारी किंवा राजकीय दूरदृष्टी यांचा अभाव होता. प्रारंभी मराठे व नंतर इंग्रज यांचे मुघल सत्तेला धक्के बसत मुघल साम्राज्य कोसळले.

## २) भारतातील प्रांतीय सत्ताधिश व परस्परातील संघर्ष :-

औरंगजेबाच्या मृत्युमुळे निर्माण झालेली राजकीय पोकळी भारतातील कोणत्याही राजकीय सत्तेला भरून काढता आली नाही. औरंगजेबाच्या मृत्युनंतर झालेल्या वारसायुध्दात प्रांतीय सत्ताधिशांनी भाग घेतला व परस्परांत संघर्ष केला. निजाम, मराठे, टिपू आणि शीख या सत्तांच्या संघर्षात निर्माण झालेली राजकीय पोकळी इंग्रजांनी भरून काढली. भारतीय सत्ताधिशांतील अंतर्गत संघर्ष ब्रिटीश सत्ता स्थापन होण्यास कारणीभूत ठरले.

### अ) हैद्राबाद व कर्नाटक संघर्ष :-

निजाम-उल-मुल्क आसफजहाँ हा औरंगजेबाच्या मृत्युनंतर मुघल दरबारातील एक प्रमुख उमराव होता. मुघल दरबारातील सय्यद बंधूंचे प्रस्थ मोडून काढण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याचे बक्षीस म्हणून त्याची दक्षिणेच्या सुभ्यावर सुभेदार म्हणून नेमणूक केली. दिल्ली दरबारचे वजीरपदही त्याच्याकडेच होते. परंतु तेथील दरबारी राजकारणाला कंटाळून तो दक्षिणेस आला. हैद्राबाद या ठिकाणी त्याने स्वतंत्र निजामशाहीची सन १७२४ मध्ये स्थापना केली. मुघल सम्राटाचे सार्वभौमत्व त्याने कधीच अमान्य केले नाही, मात्र व्यावहारिकदृष्ट्या तो हैद्राबादचा स्वतंत्र शासक बनला. १७४८ मध्ये निजाम-उल-मुल्कचे निधन झाले आणि तेथे अराजकाला सुरुवात झाली. हैद्राबद राज्य नामधारी का होईना दिल्ली सरकारच्या सार्वभौमत्वाखाली होते, त्याप्रमाणे कर्नाटकचा नवाब निजामाच्या नियंत्रणाखाली होता. कर्नाटकचा नवाब सादुल्लाखान याने आपला पुतण्या दोस्त अली याला आपला वारस घोषीत केले. हे करत असताना त्याने निजामाला विचारले नाही. कर्नाटकाच्या राजकारणात वारसा हक्काच्या कारणावरून अराजकाला प्रारंभ झाला. ही परिस्थिती भारतात सत्ता स्थापण्यास प्रयत्नशील असलेल्या इंग्रज व फ्रेंच या परकीय सत्तांना पूरक ठरली.

### ब) म्हैसूर :-

हैद्राबादच्या खालोखाल दक्षिणेतील म्हैसूर हे एक महत्त्वाचे राज्य होते. विजयनगर साम्राज्याच्या पतनानंतर म्हैसूरचे स्वतंत्र राज्य उदयाला आले होते. १८ व्या शतकाच्या प्रारंभी राजा चिक्क कृष्णराज सत्तेवर होता. राज्याचा कारभार नंदराज हा मंत्री पाहत होता. हैदरअली हा म्हैसूरच्या लष्करात एक साधा अधिकारी होता. त्याने पाश्चात्य धर्तीचे लष्करी प्रशिक्षण आपल्या हाताखालील सैनिकांना देऊन

स्वत:च्या नेतृत्वाखाली चांगले सामर्थ्यशाली लष्कर उभारले. दिंदिंगल येथे शस्त्राचा कारखाना काढून आपल्या सैन्याला शस्त्रसज्ज केले. १७६१ मध्ये हैदर अलीने राजा चिक्क कृष्णराज याला बाजूला सारून सत्ता ताब्यात घेतली. त्याने म्हैसूरच्या आजूबाजूचे बिदनूर, कॅनरा, मलबार हे प्रदेश जिंकून राज्यविस्तार केला. भारतीय सत्ताधीशांचा खरा शत्रू इंग्रज आहे हे ओळखून त्याने ब्रिटिशांविरुध्द सतत संघर्ष केला. १७६९ मध्ये तर त्याने तीनवेळा ब्रिटिश फौजांचा पराभव करून त्यांच्या ताब्यातील मद्रासपर्यंत धडक मारली. हैदरच्या मृत्युनंतर १७८२ मध्ये त्याचा पुत्र टिपू सुलतान म्हैसूरच्या गादीवर आला. त्याने सातत्याने इंग्रजांना विरोध केला. त्यामुळे इंग्रजांनी त्याला आपला शत्रू मानले. लाच देऊन त्याचे काही अधिकारी इंग्रजांनी फितवले. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज इंग्रज लष्करापुढे टिपूचा निभाव लागला नाही. टिपूचा पराभव झाल्याने ब्रिटिशांनी दक्षिणेत आपला जम बसविला.

### क) अवध :-

सन १७२२ मध्ये मुघल बादशहाने दिल्ली दरबारचा एक नामवंत उमराव सादतखान याची अवधचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. तोच अवध राज्याचा संस्थापक होय. बंडखोर जमीनदारांना वठणीवर आणून त्याने सर्व अराजक मोडून काढले. त्याच्या काळात अवधची उल्लेखनीय अशी आर्थिक व सांस्कृतिक प्रगती झाली. सन १७३९ मध्ये सादतखानाच्या मृत्युनंतर त्याचा पुतण्या सफदरजंग अवधचा शासक बनला. सन १७४८ साली दिल्ली दरबारचा वजीर म्हणून त्याची बादशहाने नेमणूक केली. अफगाण सम्राट अहमदशहा अब्दालीच्या आक्रमणाविरुध्द मराठ्यांनी मुघल साम्राज्याचे रक्षण करण्याबाबत त्याने पेशव्याशी करार केला. सादतखानापासून वाजिदअली शहापर्यंत अनेक शासक अवध येथे झाले. त्यापैकी शुजाउद्दौलाच्या काळात इंग्रजांचा अवधच्या राजकारणात प्रवेश झाला. १८५६ मध्ये लॉर्ड डलहौसीने गैरव्यवस्थापनाची सबब सांगून अवध राज्य खालसा केले.

### ड) बंगाल :-

मुघल बादशहाने सन १७१७ मध्ये मुर्शीदकुली खान याची बंगालचा सुभेदार म्हणून नेमणूक केली, त्याने बंगाल दिल्लीच्या नियंत्रणापासून स्वतंत्र केले. सन १७३९ मध्ये अलीवर्दी खान बंगालच्या नवाबपदावर आला. उद्योग व व्यापार यांची चांगली भरभराट होवून बंगाल प्रांताचा आर्थिक विकास करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका होती. बंगालमध्ये या काळात ईस्ट इंडिया कंपनी दिवसेंदिवस अधिक आक्रमक बनत गेली. परंतु नवाबाचे याकडे दुर्लक्ष झाले. कंपनी विस्तारवादी व वसाहतवादी राष्ट्राची प्रतिनिधी आहे हे बाह्य जगाच्या राजकारणाच्या त्याच्या अज्ञानामुळे त्याला उमगले नाही. तसेच त्याने बलशाली लष्कर उभारण्याकडे दुर्लक्ष केले. या चुकांची जबर किंमत पुढील नवाबाला चुकवावी लागली. सन १७५७ मध्ये नवाब सिराज उद्दौलाविरुद्ध युद्ध पुकारून कंपनीने प्लासीच्या लढाईत त्याचा पराभव केला. इंग्रजांनी बंगालमध्येच आपल्या सत्तेचा पाया घातला.

## इ) रजपूत राज्ये :-

दिल्लीपासून नजीकच असलेली रजपूत राज्येही दिल्लीची सत्ता कमकुवत होताच स्वतंत्र झाली. मात्र फुटीर वृत्ती व गटागटाने राहणे यामुळे त्यांच्यात ऐक्य कधीच निर्माण झाले नाही. अंतर्गत यादवी, विश्वासघात, परस्परांविरुध्द कटकारस्थाने यामुळे बरीच रजपूत राज्ये आतून पोखरली होती. अठराव्या शतकातील एक प्रमुख राज्य अंबर हे होते. त्याचा राजा सवाई जयसिंग हा अत्यंत मुत्सद्दी, कुशल व सुधारणावादी शासक होता. त्याने जयपूर हे शहर वसविले. मात्र शेवटी अनेक रजपूत राजांनी इंग्रजी वर्चस्व मान्य करण्याचे ठरविले. लॉर्ड हेस्टिंग्जच्या काळात (१८१७-१८२३) कोटा, जोधपूर, उदयपूर, बुंदी, किशनगड, बिकानेर, जयपूर, प्रतापगड, बासवाडा, जैसलमेर इत्यादी राज्यांनी इंग्रजांचे वर्चस्व मान्य केले. रजपुतांचे स्वतंत्र अस्तित्व संपले.

## ई) शीख :-

अठराव्या शतकात एक राजकीय सत्ता म्हणून शिखांचा उदय झाला. मुघल काळात मुघल राज्यकर्ते व शीख यांच्यात उघड शत्रुत्व निर्माण झाले. औरंगजेबाच्या धर्मवेढ्या जुलुमी धोरणाला तोंड देण्याकरिता शीखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंग यांनी खालसा लष्कराची उभारणी केली. नादिरशहा व अहमदशहा अब्दालीच्या स्वाऱ्यांमुळे पंजाबातील मुघल सत्ता कोलमडून पडली. पंजाबातील राजकीय पोकळी भरून काढण्यास शीख पुढे सरसावले. शीखांचा राजा रणजितसिंग या कर्तृत्ववान नेत्याचा उदय झाला. त्याने मोठे शिस्तबध्द, प्रशिक्षित व शक्तिशाली लष्कर उभारले. रणजितसिंगाच्या सामर्थ्याची कल्पना असल्यामुळे त्याच्या हयातीत ईस्ट इंडिया कंपनीने पंजाबकडे आपली वक्र दृष्टी वळवली नाही. पण रणजितसिंगाच्या मृत्युनंतर पंजाब राज्यात अराजक निर्माण झाले. त्याच्या उत्तराधिकाऱ्यात त्याचे कर्तृत्व नव्हते. शिवाय इंग्रजांनी अनेक शीख सरदारांना लालूच दाखवून फितवले. त्यामुळे अल्पावधीतच पंजाब इंग्रजांच्या ताब्यात आला.

## फ) मराठे :-

ईस्ट इंडिया कंपनीला सर्वात चिवट व प्रखर आव्हान मराठ्यांनी दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले राज्य त्यांच्या मृत्युनंतर छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई यांनी राखले. औरंगजेबाशी त्यांनी प्रखर संघर्ष केला. छत्रपती शाहूंच्या कारकिर्दीत पेशवे प्रबळ झाले. पहिला बाजीराव व नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठी सत्ता अटकेपार पोहोचली. मुघल सत्तेच्या संरक्षणाची जबाबदारी मराठ्यांनी घेतली. पंजाबातून अब्दालीच्या प्रतिनिधीला मराठ्यांनी हाकलून लावल्यामुळे अब्दालीशी त्यांचा संघर्ष उद्‌भवला. यातूनच झालेल्या तिसऱ्या पानिपत युद्धात मराठ्यांचा पराभव

झाला. मराठ्यांचे राजकीय महत्त्व कमी झाले. ब्रिटीशांनी मराठा सरदारांतील संघर्ष, मतभेद, हेवेदावे यांचा फायदा घेतला. पेशवा माधवरावाच्या अकाली निधनानंतर मराठा राजकारणात स्वार्थ आणि दुही वाढली. पेशवेपदावरील व्यक्ती आपल्या गटाचा असावा यासाठी कटकारस्थाने सुरू झाली. नागपूरकर भोसले व पेशवे, शिंदे व होळकर, पेशवे व आंग्रे, पेशवे व दाभाडे इत्यादीमधील संघर्ष आणि पेशवे पद प्राप्त करण्याच्या लालसेने दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांशी वसईचा तह केला. मराठे सरदारांनी एकत्र येऊन इंग्रजाविरुध्द लढा दिला असता तर ते कदाचित विजयी झाले असते. मात्र त्यांच्यातील यादवीमुळे आधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज अशा इंग्रज सैन्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. मराठी सत्तेचा अस्त होऊन इंग्रजी सत्तेचा उदय झाला.

## ३) भारतातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती :–

अठराव्या शतकातील समाज एकसंघ नव्हता. धर्म, जात, भाषा व प्रदेश अशा अनेक कारणांनी तो दुभंगलेला होता. जातीव्यवस्था हे हिंदू समाजाचे विघटन होण्याचे एक प्रमुख कारण होते. जातीची बंधने कडक होती. लोकांचे व्यवसाय जातीवरून ठरत. निरनिराळ्या जातीच्या गटात रोटीबेटी व्यवहार होत नसत. मुस्लिम समाजही जात, वंश, प्रतिष्ठा इत्यादी कारणांनी फुटलेला होता. त्यांच्यात शिया व सुन्नी हे भेद तर होतेच शिवाय इराणी, अफगाणी, तुराणी व हिंदुस्थानी मुसलमान एकमेकांत मिसळत नसत. धर्मांतर करून मुस्लिम बनलेल्यांना कमी लेखले जात असे.

स्त्रीयांची परिस्थिती अतिशय दयनीय होती. घरात व समाजात त्यांना मानाचे स्थान नव्हते. पिता, पती व पुत्र यांच्या आज्ञेप्रमाणे तिने राहावे अशी अपेक्षा असे. भारतात शिक्षणाकडे दुर्लक्ष होत होते. शिक्षण सर्वस्वी मागास अवस्थेत राहिले होते. पाश्चात्य जगात शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने घडून येत असलेल्या प्रगतीचा मागमूसही कोठे दिसत नव्हता. पंधराव्या शतकापासून युरोपात लागलेल्या शोधाबाबत भारतीय पूर्णपणे अनभिज्ञ राहिले. परंपरागत शिक्षणाच्या चौकटीत जखडलेली भारतीय मते पाश्चात्य विज्ञान व त्यांचे नवनवे शोध यांना तोंड देऊ शकली नाहीत.

मध्ययुगात आर्थिक क्षेत्रात संपूर्ण जगात एक संपन्न राष्ट्र म्हणून भारताची गणना होत होती. देशांतर्गत गरजा पुरवित व परदेशात मोठ्या प्रमाणात माल निर्यात करणे हे अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट होते. भारतातून उत्कृष्ट सुती व रेशमी कापड, मसाले, तीळ, साखर, औषधे, मौल्यवान खडे व इतर वस्तूंची मोठी निर्यात होत असे. कृषिक्षेत्रात मात्र फारशी प्रगती झाली नव्हती. शेती परंपरागत पध्दतीनेच केली जात होती. रूढी व जुन्या कल्पना यामुळे कृषिउत्पादनाच्या तंत्रात सुधारणा झाली नाही. वारंवार होणाऱ्या युद्धांचाही शेती उत्पादनावर परिणाम होत होता. भारतातील ही सामाजिक व आर्थिक परिस्थिती सत्ता स्थापन करण्यास इंग्रजांना पोषक ठरली.

## ❑ कंपनी काळातील गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांची कामगिरी :-

भारतात इंग्रजांनी सत्ता स्थापन केली. याला कंपनीचे गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांचे कार्यही कारणीभूत ठरले आहे. सन १७५७ ते १८५७ या शंभर वर्षाच्या काळात रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड कॉर्नवॉलिस, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज, लॉर्ड बेंटिक, लॉर्ड हार्डिंग व लॉर्ड डलहौसी असे गव्हर्नर व गव्हर्नर जनरल झाले.

रॉबर्ट क्लाईव्ह याने कर्नाटकात फ्रेंचांचा पराभव करण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केली. बंगालचा नवाब सिराजउद्दौला याचा पराभव करण्यासाठी त्याचा सेनापती मीर जाफरशी कटकारस्थाने केली. यातूनच झालेल्या प्लासीच्या युद्धात सिराज मारला जाऊन इंग्रजांचा विजय झाला. बंगालमध्ये इंग्रजी सत्तेचा पाया घातला गेला. तसेच बक्सारच्या युद्धानंतर अलाहाबाद तहाने त्याने बंगालमधील निजामतीचे व दिवाणीचे अधिकार मिळवले. बंगालमध्ये दुहेरी राज्यव्यवस्था निर्माण करून कंपनीला प्रचंड फायदा मिळवून दिला. त्याने केलेल्या प्रयत्नामुळेच ईस्ट इंडिया कंपनी या एका व्यापारी कंपनीचे एका राजकीय सत्तेत रूपांतर झाले.

वॉरन हेस्टिंग्जने कंपनीच्या राज्य विस्तारासाठी प्रयत्न केले. न्याय-अन्याय याचा फारसा विचार न करता त्याने अनेक प्रकरणांमधून कंपनीला आर्थिक फायदा मिळवून दिला. सन १७७३ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने रेग्युलेटिंग ॲक्ट पास केला. या कायद्याने बंगालचा गव्हर्नर हा ब्रिटिश अंमलाखालील भारताचा गव्हर्नर बनला. त्याने बंगालची राजधानी मुर्शिदाबादहून कलकत्ता येथे आणली. सनदी सेवा विकसित करण्याचा मान वॉरन होस्टिंग्जला दिला जातो. त्याने कलेक्टर पदाची निर्मिती केली. प्रत्येक जिल्ह्यात एक मुलकी व फौजदारी न्यायालय स्थापन केले. महसूल वसुलीच्या काळात त्याने सुसूत्रता आणली.

लॉर्ड कॉर्नवालीसने टिपू सुलतानचा पराभव करून त्याचे राज्य नियंत्रणात आणले. जमीन महसूलासाठी त्याने सुरू केलेली कायमधारा पद्धत प्रसिद्ध आहे. या पद्धतीमुळे इंग्रज सरकारला निश्चित महसूल मिळू लागला. त्याने प्रशासनात होणारा भ्रष्टाचार कमी करून कार्यक्षमता आणण्यासाठी प्रयत्न केले.

कंपनीची राजवट दृढ होण्यास लॉर्ड वेलस्लीची कारकीर्द महत्त्वपूर्ण ठरली. त्याने सुरू केलेल्या तैनाती फौज पद्धतीमुळे कंपनी सरकारचा विस्तार झाला. भारतातील अनेक सत्ताधिशांना त्याने तैनाती फौज स्विकारण्यास भाग पाडले. यामुळे भारतीय सत्ताधिकाराचे इंग्रज सरकारवरील अवलंबित्व वाढले.

लॉर्ड हेस्टिंग्जच्या काळात नेपाळमधील गुरख्यांचा पराभव करून तेथे विस्तार करण्यात आला. माळवा, वऱ्हाड या प्रदेशात धुमाकूळ घालणाऱ्या पेंढाऱ्यांचा बंदोबस्त त्याने केला. त्याच्या काळात तिसरे इंग्रज-मराठा युद्ध होऊन पेशवाईचा शेवट झाला.

लॉर्ड डलहौसीच्या काळात कंपनी सरकारचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. डलहौसीने साम्राज्य विस्तारासाठी युद्ध, पदव्या व पेन्शन समाप्ती, अव्यवस्था व अराजक, दत्तक वारस नामंजूर या मार्गांचा वापर केला. या धोरणाचा वापर करून त्याने भारतातील बरीच राज्ये खालसा केली. त्याच्या काळात रेल्वे, पोस्ट व तारायंत्र ही आधुनिक दळणवळणाची साधने सुरू झाली. त्याने साम, दाम, दंड व भेद या नीतीचा वापर करून साम्राज्यविस्तार केला. म्हणून त्याला ब्रिटिश साम्राज्याचा शिल्पकार असे म्हटले जाते.

## ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ❊

### ❑ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१. ३१ डिसेंबर १६०० रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याची सनद कोणी दिली?

२. इंग्रजांनी आपली पहिली वखार कोठे स्थापन केली?

३. १७४६ ते १७६३ या कालखंडात तीन कर्नाटक युद्धे कोणाकोणात झाली?

४. प्लासीच्या युद्धात इंग्रजांना विजय कोणी मिळवून दिला?

५. आधुनिक भारताचा निर्माता असे कोणत्या गव्हर्नर जनरलला म्हणतात?

### ❑ ब) खाली दिलेल्या पर्यायातून अचूक पर्याय निवडा व विधाने पूर्ण करा.

१. पोर्तुगीज प्रवासी वास्को-द-गामा हा सन १४९८ मध्ये भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील .............. या बंदरात उतरला.

*अ) सुरत* *ब) कालिकत* *क) कलकत्ता* *ड) मद्रास.*

२. तैनाती फौज ................ यांनी प्रथम स्विकारली.

*अ) निजाम* *ब) हैदर* *क) मीर कासीम* *ड) अलीवर्दीखान.*

३. पंजाब मध्ये ..................... राजाच्या मृत्यूनंतर पंजाब इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतला.

*अ) राजा जयसिंग* *ब) राजा उदयसिंग* *क) गोविंद सिंग* *ड) राजा रणजितसिंग.*

४. ............... साली ब्रिटिश पार्लमेंटने रेग्युलेटिंग ॲक्ट पास केला.

*अ) १७७३* *ब) १७७५* *क) १८७३* *ड) १७८०.*

५. लॉर्ड कॉर्नवॉलिस याने ............ याचा पराभव करून त्याचे राज्य नियंत्रणात आणले.

*अ) मीर कासीम   ब) हैदर   क) टिपू सुलतान   ड) निजाम.*

## १.२.२ एत्तद्देशीय सत्तांशी संघर्ष (बंगाल व म्हैसूर)

### अ) बंगाल प्रांत :-

मुघल काळात बंगाल प्रांतात सध्याच्या पश्चिम बंगाल, पूर्व बंगाल (सध्याचा बांग्लादेश) व बिहार या प्रांतांचा समावेश होत असे. त्यावेळी बंगाल प्रांताची राजधानी ढाका होती. बंगालचा महसूल खूप मोठा होता. राजकीय घडामोडीच्या दृष्टीने बंगाल प्रांत मुघल साम्राज्यातील अत्यंत श्रीमंत पण नियंत्रणासाठी कठीण असा होता. एखाद्या अधिकाऱ्याला शासन करावयाचे असल्यास त्याला बंगालच्या सुभ्यावर पाठवित असत.

सन १७०० ते १७२७ या काळात मुर्शिद कुलीखान हा बंगालचा सुभेदार होता. त्याच्या काळात बंगाल प्रांत भरभराटीस आला. त्याच्यानंतर महम्मद खान (मुर्शिद कुलीखानाचा जावई) व सरफराज खान बंगालचे सुभेदार बनले. सन १७४० मध्ये सरफराज खानाला युद्धात ठार करून बिहारचा सुभेदार अलीवर्दीखान याने सत्ता बळकावली.

### ❑ इंग्रजांचे बंगालवर वर्चस्व :-

बंगालचा नवाब सिराजउद्दौला व इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी यात २३ जून १७५७ रोजी बंगालमध्ये प्लासी येथे झालेल्या लढाईत विजय मिळवून ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या साम्राज्याचा पाया घातला. कंपनीची त्यापूर्वीची युद्धे फ्रेंचासारख्या प्रतिस्पर्ध्यांचे भारतातून उच्चाटन करण्याकरिता झाली होती. त्यानंतरची युद्धे भारतात साम्राज्य स्थापनेकरिता झाली.

बंगाल, बिहार व ओरिसा हा संपूर्ण प्रदेश त्यावेळी बंगाल प्रांत होता. सन १७४० मध्ये बंगालचा सुभेदार सरफराज खानला युद्धात ठार करून बिहारचा वाचक अलिवर्दी खानाने सत्ता बळकावली. आपले पद सुरक्षित करण्यासाठी त्याने मुघल बादशहाला भरपूर लाच दिली. अलिवर्दी खान हा उत्कृष्ट प्रशासक होता. त्याच्या काळात बंगालची भरभराट झाली. त्याने इंग्रजांशी मित्रत्वाचे संबंध ठेवले होते. एप्रिल १७५६ मध्ये अलिवर्दीखानाचे निधन झाले. त्यानंतर त्याच्या मुलीचा मुलगा सिराजउद्दौला हा बंगालचा नवाब बनला.

### ❑ बंगालचा नवाब सिराजउद्दौला :-

सिराजउद्दौला हा अलिवर्दी खानाची सर्वात लहान मुलगी अमिना बेगम हिचा मुलगा होता.

बंगालच्या नवाबपदी विराजमान झाला, तेव्हा सिराजचे वय २४ वर्षाचे होते. राजकारण आणि प्रशासन यांचा त्याला फारसा अनुभव नव्हता. मिळालेल्या संधीचा फायदा न घेता अनेक चुका केल्या. बंगालवर भविष्यात त्याचे दूरगामी परिणाम झाले. बंगालमध्ये इंग्रज, फ्रेंच व डच यांच्या वखारी होत्या. पण यातील सर्वात समृध्द वखारी इंग्रजांच्या होत्या. ईस्ट इंडिया कंपनीचा तेथील व्यापार अत्यंत किफायतशीर असल्यामुळे त्यांचे आर्थिक हितसंबंध बंगालशी पक्केपणाने निगडीत झाले होते.

### ❑ प्लासी युद्धाची कारणे :-

### १. वखारीच्या तटबंदीला सिराजचा विरोध :-

इंग्रज व फ्रेंच यांनी सिराजच्या परवानगी शिवाय आपल्या वखारीला तटबंदी बांधण्यास सुरूवात केली. सिराजने अशा प्रकारे तटबंदी घालण्यास विरोध केला. त्याच्या मते, बंगालमधील जनतेचे संरक्षण करण्याची जबाबदारी नवाबाची आहे. नवाबाच्या आदेशानंतर फ्रेंचांनी तटबंदीचे बांधकाम थांबविले. परंतु इंग्रजांनी नवाबाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून तटबंदीचे बांधकाम सुरूच ठेवले.

### २. ब्रिटीशांचा खाजगी व्यापार :-

सन १७१७ मध्ये दिल्लीचा बादशहा फर्रूखसियरने बंगालसाठी ईस्ट इंडिया कंपनीला सालीना ३००० रु.च्या मोबदल्यात मुक्त व्यापाराची परवानगी दिली होती. ही परवानगी फक्त कंपनीला होती. कंपनीच्या नोकरांच्या खाजगी व्यापाराला नव्हती. कंपनीच्या मालाकरिता जकातमुक्तीचे परवाने देण्याचा कंपनीला देण्यात आलेल्या अधिकाराचा कंपनीचे अधिकारी गैरवापर करू लागले. कंपनी आपल्या नोकरांच्या खाजगी व्यापाराकरिताही हे परवाने देऊ लागली. एवढेच नव्हे तर भारतीय व्यापाऱ्यांना जकातमुक्तीचे परवाने कंपनी विकत असे. यामुळे बंगालच्या नवाबाचे उत्पन्न बुडू लागले. त्यामुळे नवाब व इंग्रज संबंध बिघडले.

### ३. नवाबाच्या शत्रूंना ब्रिटिशांचा आश्रय :-

सिराजच्या विरोधकांना ब्रिटीश आपल्या वखारीत आश्रय देवू लागले. उदा. नवाबाच्या सेवेत असलेल्या कृष्णदासने फार मोठ्या पैशाची अफरातफर केली व कारवाईच्या धाकाने गैरमार्गाने गोळा केलेली सर्व संपत्ती घेवून कृष्णदास कंपनीच्या आश्रयाला कलकत्त्याला पळून गेला. नवाझीशखान या अधिकाऱ्यावरही भ्रष्टाचाराचा आरोप होता. त्यानेही पळून जाऊन कंपनीचा आश्रय घेतला. या अधिकाऱ्यांना ताब्यात देण्याचा आदेश सिराजने दिला. परंतु कंपनीने तिकडे दुर्लक्ष केले.

### ४. कलकत्ता अंधारकोठडी घटना :-

इंग्रजांनी कलकत्ता व इतर ठिकाणच्या वखारीस बांधत असलेली तटबंदी पाडून टाकावी अशी

आज्ञा सिराजने केली. इंग्रजांनी ती आज्ञा न पाळल्यामुळे सिराजने सैन्यासह इंग्रजांवर चाल केली. नवाबाने इंग्रजांची कासीमबजार येथील वखार ताब्यात घेतली व कलकत्त्यावर हल्ला केला. नवाबाच्या अधिकाऱ्यांनी काही इंग्रजांना युद्धकैदी म्हणून पकडले. पकडलेल्या १४६ युद्धकैद्यांना १८ फूट लांब व १४.१० फूट रुंद खोलीत डांबण्यात आले. परिणामी, जून महिन्याच्या गरमीमुळे व प्राणवायूचा पुरवठा कमी पडल्याने त्यापैकी १२३ कैदी मृत्युमुखी पडले. या शोकांतिकेचा फायदा इंग्रजांनी उठविला व सिराजविरुध्द लढाईची तयारी केली.

## ५. नवाबाविरुध्द इंग्रजांची कारस्थाने :-

इंग्रजांविरुध्द सहजपणे मिळालेल्या विजयाने नवाब बेसावध राहिला. इंग्रजांच्या सामर्थ्याचा त्याला अंदाज आला नाही. सिराजच्या कारवाईला घाबरून फुल्टा बेटावर थांबून इंग्रज मद्रासहून कुमक घेण्याची वाट पाहू लागले. त्याचवेळी त्यांनी नवाबाविरुध्द विश्वासघाताचे जाळे विणण्यास सुरवात केली. कलकत्ता पडल्याची बातमी मद्रासला पोहोचताच तेथील अधिकाऱ्यांनी एका सैन्याची तुकडी रॉबर्ट क्लाईव्हच्या नेतृत्वाखाली समुद्रामार्गे रवाना केली. जानेवारी १७५७ मध्ये क्लाईव्हने सिराजउद्दौलाचा अधिकारी माणिकचंद यास लाच देऊन कलकत्ता परत मिळवले. कलकत्ता जिंकून घेतल्यावर शांत न राहता क्लाईव्हने नवाब सिराजला पदच्युत करण्यासाठी कायद्याने सुरू केली. नवाबाशी काहीतरी कुरापत काढण्याच्या उद्देशाने इंग्रजांनी हुगळी लुटली. त्याबरोबर सिराज त्यांच्याविरुध्द चालून आला. दोघातील लढाई अनिर्णित राहिली. शेवटी तह होऊन नवाबाने कलकत्त्याच्या तटबंदीला मान्यता द्यावी असे ठरले. नवाबाशी तह झाल्यानंतर क्लाईव्हने फ्रेंचांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. फ्रेंच व नवाब यांच्या युतीची शक्यताच मुळात खुडून टाकण्याकरिता फ्रेंचाच्या चंद्रनगरवर हल्ला करून त्यांचे ठाणे मार्च १७५७ मध्ये काबीज केले. नवाबाने बंगालच्या संरक्षणासाठी काहीही केले नाही. बंगालामधून फ्रेंचांचे उच्चाटन होऊ देणे ही सिराजउद्दौलाच्या दृष्टीने एक घोडचूक ठरली.

क्लाईव्हचे एवढ्याने समाधान झाले नाही. सिराजऐवजी आपल्याला अनुकूल नवाब बंगालमध्ये असावा अशी त्याची इच्छा होती. स्वार्थाकरिता स्वकीयांशी द्रोह करण्याची तयारी असणाऱ्यांची त्याकाळी कमतरता नव्हती. नवाबाचा प्रमुख सेनापती मीर जाफर याने नवाबाचे पद मिळवण्याच्या प्रलोभनाला बळी पडून त्याने सिराजउद्दौलाविरुध्द इंग्रजांशी हातमिळवणी केली. मीर जाफर याला इंग्रजांनी नवाबाच्या गादीवर बसवावे, त्या मोबदल्यात मीर जाफरने इंग्रजांशी आक्रमणात्मक व संरक्षणात्मक करार करावा. कंपनीला १ कोटी रु. द्यावेत. युरोपियनांची झालेली नुकसानभरपाई म्हणून ५० लाख रु. द्यावेत. हिंदूची झालेली नुकसानभरपाई म्हणून २० लाख रु. द्यावेत. कलकत्त्याच्या दक्षिणेचा सर्व प्रदेश कंपनीला द्यावा. नवाबाच्या संरक्षणाकरिता म्हणून जेव्हा कंपनीच्या फौजा जातील, तेव्हा त्यांचा सर्व खर्च नवाबाने

करावा. अशा तरतुदी करारात होत्या. सिराजच्या दरबारातील रायदुर्लभ हा सेनाधिकारी व जगतशेठ सावकार यांना क्लाईव्हने हाताशी धरले. मीरजाफर व कंपनी यांच्यात झालेल्या कारस्थानाची माहीती अमीनचंद या व्यापाऱ्याला झाली. तेव्हा त्याला क्लाईव्हने पैशाचे आमिष दाखवून फितूर केले. अशा प्रकारे रॉबर्ट क्लाईव्हने नवाबाविरुध्द कारस्थान रचून प्लासीच्या युद्धाकडे वाटचाल केली.

## ❑ प्लासीची लढाई :-

सिराजविरुध्दचे कारस्थान पूर्णत्त्वाला जाताच क्लाईव्हने त्याच्यावर इंग्रजांशी झालेल्या कराराचा भंग केला आहे, असा खोटा आरोप लावला. सिराजच्या उत्तराची वाटही न पाहता क्लाईव्ह ३००० फौजेसह चालून गेला. मुर्शिदाबाद या आपल्या राजधानीतून सिराज आपल्या प्रचंड सैन्यासह निघाला. या प्रचंड सैन्यापुढे इंग्रजांचा निभाव लागणे कठीण होते. परंतु हे सैन्य फंदफितुरीने पोखरले होते. २३ जून १७५७ रोजी प्लासी येथे हे दोन्ही सैन्य एकमेकांसमोर आले. युद्धाला सुरवात होताच मीरजाफर व रायदुर्लभ यांनी युद्धातून अंग काढून घेतले. नवाबाचे बहुतांशी सैन्य या दोघांच्या नेतृत्वाखाली होते. मीरजाफर तटस्थ राहिल्याने नवाब सिराजउद्दौलाने त्याला सल्ला विचारला. तेव्हा मीरजाफरने नवाबाला सल्ला दिला की, त्याने युद्धकार्य नवाबाकडे सोपवावे व स्वत: युद्धभूमी सोडून निघून जावे. त्याप्रमाणे नवाब मुर्शिदाबादला निघून गेला आणि प्लासीची लढाई संपली. सिराजउद्दौलाला पकडून ठार मारण्यात आले. क्लाईव्हने मीरजाफरला बंगालचा नवाब म्हणून घोषीत केले. इंग्रजांच्या मदतीबद्दल मीरजाफरने कंपनीला २४ परगणे जिल्ह्याचा प्रदेश दिला. क्लाईव्हला २,३४,००० पौंड भेट देण्यात आली. इतर अधिकाऱ्यांना ५० लक्ष रु. बक्षीस देण्यात आले. भविष्यात इंग्रज अधिकाऱ्यांना व व्यापाऱ्यांना खाजगी व्यापारावर कोणताही कर लागणार नाही, असेही ठरविण्यात आले.

## ❑ 'प्लासीच्या लढाई' युद्धाचे महत्त्व व परिणाम :-

प्लासीच्या युद्धाला लष्करीदृष्ट्या फारसे महत्त्व नसले तरी राजकीयदृष्ट्या या युद्धाला महत्त्वाचे स्थान आहे. मीरजाफरसारखा स्वार्थी अधिकारी इंग्रजांच्या ताब्यात आल्याने त्यांना यश मिळाले. के. एम. पण्णीकर म्हणतात त्याप्रमाणे हा एक सौदा होता आणि त्यात मीरजाफर आणि बंगालच्या धनिकांनी नवाबाला इंग्रजांच्या हाती विकले. या प्लासीच्या युद्धाचे महत्त्व व परिणाम पुढीलप्रमाणे :-

१. बंगाल इंग्रजांच्या नियंत्रणाखाली आला आणि कधीही स्वतंत्र होऊ शकला नाही. मीरजाफर जरी गादीवर बसला तरी राजकारणाची सर्व सूत्रे इंग्रजांच्याच हातात होती. इंग्रजांनी बंगालमध्ये अनेक सवलती मिळवल्या. बंगालच्या अंतर्गत भागात कंपनीला वखारी सुरू करण्यास परवानगी मिळाली. इंग्रजांचा तेथे आर्थिक साम्राज्यवाद सुरू झाला.

२. बंगालमधून पैसा उघडपणे देशाबाहेर जाऊ लागला. कंपनीला बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतात करमुक्त व्यापाराची परवानगी मिळाली. कलकत्त्यावर हल्ल्यात झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून कंपनी व शहरातील व्यापारी यांना १७,७००,००० रुपयांची रोख रक्कम दिली. लाइव्हच्या मतानुसार कंपनी व तिचे कर्मचाऱ्यांनी या नवाबापासून ३० ते ३५ लक्ष रुपये उकळले. कंपनीची टाकसाळ कलकत्त्यात सुरू झाली.

३. प्लासीची लढाई लुटूपुटूची झाली असली तरी ती भारताचे भवितव्य ठरविणारी ठरली. बंगालच्या स्वामित्वाबरोबर थोड्याच वर्षात संपूर्ण भारताचे सार्वभौमत्व इंग्रजांकडे गेले. एका व्यापारी कंपनीचे रुपांतर राजकीय सत्तेत झाले. पुढील काळात दिवाणीचे हक्क मिळाल्याने फारसा व्यापार न करता कंपनीला वार्षिक फायद्याची तरतूद झाली. शिवाय कंपनीच्या व्यापारावर कोणतीच बंधने राहिली नाहीत, त्यामुळे त्यांच्या व्यापारात मोठी वाढ झाली.

४. मीरजाफर स्वामी द्रोह करून इंग्रजांच्या खांद्यावर बसून नवाब बनल्यामुळे दरबारी मंडळीत त्याच्याविषयी तुच्छताच होती. त्यामुळे नवाब व त्यांचे सहकारी यांच्या कटकटी सुरू झाल्या. बंगालचा नवाब इंग्रजांच्या हातचे बाहुले बनला. इथून पुढे बंगालच्या नावाला इंग्रजांच्या नियंत्रणाखाली कारभार करावा लागला.

५. प्लासीच्या लढाईत पूर्वी क्लाईव्ह एक मद्रास गव्हर्नरचा नोकर म्हणून बंगालला रवाना झाला होता, परंतु प्लासीच्या विजयामुळे बंगालचा गव्हर्नर म्हणून कंपनीने त्याची नियुक्ती केली.

## ❑ प्लासीच्या युद्धानंतरच्या घटना :-

### ☼ बंगालच्या नवाबपदी मीर कासीम :-

प्लासीच्या लढाईपासून कंपनीचे व्यापारी स्वरूप बदलून ती लष्करी कंपनी बनली. क्लाईव्ह व त्याच्या सहकाऱ्यांच्या मागण्यांनी पूर्ती करता-करता मीरजाफरची तिजोरी रिकामी झाली. फेब्रुवारी १७६० मध्ये क्लाईव्ह इंग्लंडला परत गेला तेव्हा बंगाल प्रांत अराजकाच्या, दारिद्र्याच्या व हालअपेष्टांच्या भोवऱ्यात सापडला. क्लाईव्हनंतर बंगालमध्ये आलेले अधिकारी त्याच्याहीपेक्षा लालची होते. कंपनीच्या अपेक्षांची पूर्तता नवाबाकडून होत नाही हे दिसताच मीरजाफर ऐवजी दुसरे एखादे बाहुले नवाबपदी बसवावे असे कंपनीने ठरविले.

अशा परिस्थितीत मीरजाफरचा जावई मीर कासीम हा बंगालचा नवाब बनण्यास इच्छूक होता. इंग्रजांनी मीर जाफरला नवाबपदावरून काढून त्याजागी मीर कासीमची नेमणूक करण्याचा गुप्त कट केला.

नवाबपदी बसविण्याच्या मोबदल्यात मीर कासीमने कंपनीला बरद्वान, मिदनापूर व चित्तंगाव हे प्रदेश देण्याचे ठरले. त्याने कंपनीच्या अधिकाऱ्यांना २५ लक्ष रुपयांच्या भेटी देण्याचे कबूल केले. मीर कासीमशी झालेल्या करारानंतर ऑक्टोबर १७६० मध्ये इंग्रजांनी मीर जाफरला पदच्यूत करून मीर कासीमला नवाबाच्या गादीवर बसविले.

मीर कासीम कंपनीच्या हातातील बाहुले बनून राहील अशी इंग्रजांची अपेक्षा होती. परंतु ती लवकरच फोल ठरली. पूर्वीचा व रंगपूरचा शासक म्हणून काम केलेला मीर कासीम हा अतिशय कर्तृत्ववान, कुशल प्रशासक व खंबीर व्यक्तिमत्त्वाचा माणूस होता. शासकीय व्यवहारात कठारे काटकसर, भ्रष्टाचाराला आळा, काटेकोरपणे करवसुली, शेती व व्यापार यांना उत्तेजन अशा अनेक मार्गांनी थोड्याच काळात त्याने आपली आर्थिक स्थिती चांगली सुधारली. इंग्रजांचे सानिध्य टाळावे या हेतूने त्याने आपली राजधानी मोंगीर येथे हलविली. शस्त्रास्त्राकरिता परकियांवर विसंबून राहू लागू नये यादृष्टीने स्वत:चे तोफा ओतण्याचे व बंदुका तयार करण्याचे कारखाने त्याने उभारले.

इंग्रजांना हे सर्व रूचणे शक्य नव्हते. त्यामुळे कंपनीत त्याच्याविरुध्द हालचाली सुरू झाल्या. मीर कासीमचाही इंग्रजांचा प्रभाव व हस्तक्षेप झुगारण्याचा प्रयत्न होता. व्यापाराच्या क्षेत्रात कंपनी करीत असलेल्या गैरव्यवहारांवर त्याचा विशेष रोख होता. कंपनीचे कर्मचारी जकात परवान्याचा दुरुपयोग करून जकात चुकवीत. एवढेच नव्हे तर जकातमुक्तीचे परवाने ते अन्य व्यापारांनाही विकत. बंगाल प्रांताच्या व्यापारावर या सर्व गोष्टींचा अतिशय अनिष्ट परिणाम होत होता. मीर कासीमने इंग्रजांच्या वर्चस्वाला आळा घालण्यासाठी व व्यापारात सुधारणा करण्यासाठी सर्वांनाच जकातमाफीचे धोरण ठेवले. त्यामुळे इंग्रजांच्या व भारतीय व्यापाऱ्यांचा व्यापार एका पातळीवर आला.

मीर कासीमच्या या कार्यवाहीमुळे इंग्रज संतप्त झाले. भारतीय व्यापाऱ्यांवरील जकात पुन्हा सुरू न केली तर युद्धाला तोंड द्यावे लागेल अशी धमकी त्यांनी त्याला दिली. परंतु मीर कासीम दबला नाही. पाटणा शहर इंग्रजांनी ताब्यात घेतले. नवाबाच्या सैन्याने लागलीच हल्ला करून ते परत मिळवले. यावरून नवाब व इंग्रज यांच्यात युद्ध भडकले. सन १७६४ मध्ये युद्ध होऊन मीरकासीमचा पराभव झाला व तो अवधला पळून गेला.

### ☼ बक्सारचे युद्ध :-

इंग्रजांनी मीर कासीम पळून जाताच मीर जाफरला पुन्हा नवाबाच्या गादीवर बसवले. त्याबदल्यात त्याच्याकडून भरपूर द्रव्य उकळले. भारतीय व्यापाऱ्यांवरील रद्द केलेली जकात त्याच्याकडून पुन्हा सुरू करवून घेतली. अवधला जाताच मीर कासीमने तेथील नवाब शुजाउद्दौला याला इंग्रजांच्या रूपाने उभ्या ठाकलेल्या धोक्याची कल्पना दिली. दिल्ली दरबारातील अराजकामुळे परागंदा झालेला मुघल

बादशहा शहाआलम हा त्यावेळी अवध येथेच आश्रयाला होता. तो शुजाउद्दौला व मीरकासीम असे तिघेही इंग्रजांविरुध्द एकत्र आले व त्याचे सैन्य बिहारच्या दिशेने चालून गेले. त्यांची व इंग्रज सैन्याची गाठ २२ ऑक्टोबर १७६४ रोजी बक्सारच्या रणक्षेत्रावर पडली. संयुक्त फौज ५१,००० होती तर मेजर मन्रोच्या नेतृत्वाखाली इंग्रज फौज ७००० होती. घनघोर युद्ध होऊन इंग्रज विजयी झाले. मुघल बादशाहा, शुजाउद्दौला व मीरकासीम या तीनही भारतीय शासकांचा निर्णायक पराभव झाला. शुजाउद्दौलाने शरण येऊन इंग्रजांशी तह केला, मोघल बादशहाने शरणागती स्विकारली तर मीर कासीम परागंदा झाला.

बंगालमधील परिस्थिती सावरण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने सन १७६५ साली रॉबर्ट क्लाईव्हला परत भारतात पाठवले. बक्सार येथे मिळालेल्या विजयाचा फायदा घेऊन बंगालची संपूर्ण सत्ता नवाबाकडून कंपनीच्या हाती येईल अशी व्यवस्था करण्यास क्लाईव्ह पुढे सरसावला. पुढील काळात त्याने द्विदल राज्यपद्धती निर्माण करून कोणत्याही प्रकारच्या जबाबदारी शिवाय बंगाल प्रांताची सर्व सत्ता कंपनीच्या हाती केंद्रित केली.

## ब) म्हैसूर :-

१४ व्या शतकात विजयनगर साम्राज्य उदयास आले. म्हैसूरचा प्रदेश त्यात समाविष्ट होता. सन १५६५ मध्ये तालिकोट लढाईत पराभूत झाल्याने विजयनगर स्राम्राज्य नष्ट झाले. अठराव्या शतकातील भारतातील अस्थिर राजकीय परिस्थितीने अनेक साहसी वीरांना आपले भविष्य घडविण्याची संधी मिळवून दिली. ह्यावेळी म्हैसूरमध्ये ओडियार घराण्याची सत्ता होती. पण तेथील राजाची कृष्णराज विलासी असल्याने राज्याची सत्ता मुख्य सेनापती देवराज व प्रधान नंदराज या दोन भावांच्या हाती केंद्रित होती.

## ❑ ब्रिटिशांचे म्हैसूरवर वर्चस्व :-

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात दक्षिणेत हैदरअलीच्या रूपाने एक राजकीय सत्ता म्हणून म्हैसूर राज्य उदयाला आले. विजयनगर साम्राज्याच्या पतनानंतर ओडियार राजघराण्याच्या नेतृत्वाखाली म्हैसूर हे स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आले. त्या राज्यात हैदर हा एक साधा फौजदार होता. पण अंगच्या कर्तबगारीच्या जोरावर तो लवकरच वरच्या पदापर्यंत पोहोचला. राजा चिक्क कृष्णराज याला बाजूला सारून तो सर्वाधिकारी बनला. फ्रेंच लष्कराची शिस्त, प्रशिक्षण व युद्धपध्दती यांचे चांगले अध्ययन करून त्याने आपले लष्कर मजबूत केले. फ्रेंच तज्ज्ञांच्या देखरेखीखाली त्या लष्कराला प्रशिक्षण देऊन डिंडिगल येथे शस्त्रागार प्रस्थापित केले. लष्करी सामर्थ्यांच्या बळावर त्याने म्हैसूरच्या आसपासचे बेदनूर, सुंदा, खेरा, कॅनडा, गुट्टी हे प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडले. दक्षिणेतील पाळेगारांना आपल्या नियंत्रणात ठेवले.

## ❑ इंग्रज–म्हैसूर पहिले युद्ध (१७६७ ते १७६९) :-

हैदरअलीच्या प्रादेशिक विस्तारामुळे मराठे व निजाम यांच्याशी त्याचा संघर्ष उद्‌भवला. हैदर एक शक्तिशाली प्रतिस्पर्धी बनल्याचे इंग्रजांनाही जाणवू लागले. दक्षिण भारतात आपले वर्चस्व स्थापन करण्यास मराठे, निजाम, हैदर व इंग्रज या चार सत्ता प्रयत्नशील होत्या. निजाम व हैदर यांचे एकाच प्रदेशावर लक्ष होते. त्यामुळे त्यांच्यात सख्य होणे कठीण होते. इंग्रजांनी निजामाला हैदरविरुध्द मदत करावी आणि त्या मोबदल्यात निजामाने इंग्रजांना उत्तर सरकारचा प्रदेश द्यावा असा करार दोघात झाला, त्यामुळे हैदर संतप्त झाला.

हैदर व इंग्रज यांच्यातील मतभेद वाढत गेले. हैदरने मोठ्या मुत्सद्देगिरीने पैसा देऊन मराठ्यांना प्रदेशाचे आमिष दाखवून आपल्याकडे वळवून घेतले. त्यानंतर त्याने कर्नाटकवर हल्ला केल्याने इंग्रज हैदर संघर्ष सुरू झाला. सप्टेंबर १७६७ मध्ये त्याच्या फौजांनी इंग्रज सेनापती कर्नल स्मिथ याच्यावर हल्ला केला. परंतु स्मिथने विरोध करून संघर्ष चालू ठेवला. दरम्यान निजाम इंग्रजांना मिळाला. हैदरने इंग्रजाविरुध्द जिद्दीने व शौर्याने लढा दिला. त्याने इंग्रजांचा पराभव करून मंगलोर परत मिळवले. मार्च १७६९ मध्ये अत्यंत जलदगतीने व अनपेक्षितपणे मद्रासपर्यंत धडक मारली. यामुळे भयभीत होऊन इंग्रजांनी हैदरशी तह केला. ह्या तहाप्रमाणे परस्परांचे जिंकलेले प्रदेश परत करण्यात आले. तसेच संकटसमयी एकमेकांना मदतीचे आश्वासन देण्यात आले.

## ❑ इंग्रज–म्हैसूर दुसरे युध्द (१७८०–१७८४) :-

वॉरन हेस्टिंग्ज भारतात आला त्यावेळी इंग्रजांचे हैदरअलीशी संबंध उघडउघड शत्रुत्वाचे होते. सन १७७१ मध्ये मराठे व हैदर यांच्यात युद्ध सुरू झाले. त्यावेळी पूर्वीच्या तहाप्रमाणे हैदरने इंग्रजांकडे मदत मागितली पण इंग्रजांनी त्याला मदत केली नाही. हैदरला पराभव पत्करावा लागल्याने तो इंग्रजांवर संतप्त झाला. तोफा, बंदुका व दारूगोळा इ. साधनसामग्री हैदरला फ्रेंचांच्या ताब्यातील माले बंदरातून मिळत होती. परंतु इंग्रजांनी माहे बंदर जिंकून घेतले व हैदरला आव्हान दिले. निजामाच्या राज्यातील गुंटूरचे ठाणे जबरीने काबीज करण्याकरिता हैदरच्या राज्यातून फौजा पाठविल्या.

दरम्यान मराठे–इंग्रज संबंध बिघडून इंग्रज–मराठा युध्दाला सुरुवात झाली होती. त्या युद्धात इंग्रजाविरुध्द हैदरचे सहकार्य मिळवून घेण्याचा मराठ्यांनी प्रयत्न केला. मद्रासच्या क्षेत्रात हैदरने इंग्रजांविरुध्द जोरदारपणे संघर्ष चालू ठेवावा व त्या मोबदल्यात मोठा प्रदेश तयाला मराठ्यांकडून मिळावा असा करार दोघात घडून आला. याचवेळी गुंटूरचा प्रदेश इंग्रजांनी जिंकल्यामुळे निजामही त्यांच्यावर चिडून होता. तोही हैदरला सामील झाला. अशा प्रकारे इंग्रजांवर चिडलेल्या शकती एकत्र येऊन त्यांनी संयुक्त संघटन तयार केले. सर्वांना कामगिरी वाटून देण्यात आली. हैदरने मद्रास आघाडी सांभाळावी अशी व्यवस्था केली.

जुलै १७८० मध्ये हैदरने कर्नाटकात फौजा पाठवून मोठी धामधूम माजवली. त्यामुळे इंग्रज हबकून गेले व त्यांनी मद्रासपर्यंत माघार घेतली. कांजीवरम येथे हैदरचा पुत्र टिपू याने कर्नल वेलीच्या नेतृत्वाखालील इंग्रज फौज कापून काढली. हैदरने अर्काट काबीज करून कर्नाटकात आपले वर्चस्व सिद्ध केले. याचवेळी युद्धाची सुत्रे गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जने स्वत:कडे घेऊन संयुक्त संघटन कमकुवत करण्यावर भर दिला. त्याने गुंटूरचा प्रदेश निजामाला परत करून तसेच नागपूरच्या भोसल्यांना भरपूर लाच देऊन निष्क्रिय बनविले. सर आयरकूटच्या नेतृत्वाखाली कलकत्त्याहून मोठी फौज मद्रासकडे रवाना केली. त्याने ऑगस्ट १७८१ मध्ये शोलिंगपूरच्या लढाईत हैदरविरुध्द विजय मिळवला. याचवेळी टिपूने तंजावरजवळील युद्धात इंग्रजांचा दणदणीत पराभव केला.

मराठे व इंग्रज यांच्यात सालबाईचा तह होऊन इंग्रजांनी मराठ्यांबरोबरचे युद्ध संपुष्टात आणले. हा तह करताना हैदरला विश्वासात न घेतल्यामुळे तो मराठ्यांवर चिडला. त्याने इंग्रजांशी सुरू असलेले युद्ध सुरूच ठेवले. विजयाचे माप हैदरच्या पदरी पडत असतानाच त्याचे डिसेंबर १७८२ मध्ये निधन झाले. हैदरचा पुत्र टिपू सुलतान याने युद्ध सुरूच ठेवले. त्याने मुंबईहून पाठविलेल्या ब्रिगेडियर मॅथ्यूजचा पराभव केला. परंतु सततच्या युद्धाने दोन्ही पक्ष आर्थिक व लष्करीदृष्ट्या मेटाकुटीला आले. शेवटी मार्च १७८४ मध्ये इंग्रज व टिपू यांच्यात मंगलोर येथे तह होऊन युद्ध थांबले. या तहानुसार एकमेकांचे प्रदेश व युद्धकैदी परत करण्यात आले.

## ❑ इंग्रज–म्हैसूर तिसरे युध्द (१७९०–१७९२) :–

तिसरे इंग्रज–म्हैसूर युद्ध लॉर्ड कॉर्नवालीस याच्या काळात झाले. मंगलोरच्या तहाने युद्ध थांबले असले तरी टिपू इंग्रज द्वेषाने जळफळत होता. इंग्रज आपला नि:पात करतील या शक्यतेने तो लष्करी सामर्थ्य वाढविण्याच्या प्रयत्नात होता. मराठे व निजाम हे टिपूविरोधी आहेत ही संधी साधून लॉर्ड कॉर्नवॉलिसने १७९० मध्ये टिपूविरुध्द इंग्रज, मराठे व निजाम असा संघ तयार केला. इंग्रजांना भारतातून हाकलून लावण्याकरिता फ्रेंच मदत मिळवून घेण्याचा प्रयत्न टिपूने केला. त्याकरिता आपले एक शिष्टमंडळ त्याने फ्रान्सला पाठविले. पण फ्रान्समधील अंतर्गत गोंधळामुळे फ्रेंच सरकारचा सकारात्मक प्रतिसाद टिपूला मिळाला नाही. त्याने तुर्कस्तानबरोबर सलोखा करून मदतीसाठी आपले वकील पाठविले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. लॉर्ड कॉर्नवॉलिसने गव्हर्नर जनरल पदाची सुत्रे हाती घेताच इंग्रजांचा कट्टर शत्रू म्हणून टिपूविरुध्द युद्धाचा निर्णय घेतला. मराठे व निजाम या दोन सत्ताधिशांना टिपूबरोबर सलोखा करून द्यायचा नाही. या दोन सत्ता टिपूला मिळाल्या तर युद्ध जिंकणे अवघड होणार होते. टिपूच्या धाकाने निजाम इंग्रजाकडे वळला. नाना फडणवीसही टिपूचा द्वेष करत होता. त्यानेही इंग्रजांशी युतीची तयारी दर्शवली. अशाप्रकारे टिपूविरुध्द इंग्रज, मराठे व निजाम या त्रिवर्गाचा करार घडून आला.

टिपू व त्रावणकोरचा राजा यांच्यातील संबंध तणावपूर्ण बनले होते. टिपूच्या राज्यातील बंडखोर त्रावणकोरच्या राज्यात आश्रय घेत होते. त्यांची टिपूने केलेली मागणी त्रावणकोरच्या राजाने धुडकावली. टिपूने त्रावणकोरवर हल्ला केला. त्रावणकोरचे राज्य हे इंग्रज संरक्षणाखाली येत असल्यामुळे लॉर्ड कॉर्नपॉलिसने टिपूबरोबर युद्धाची घोषणा केली. टिपूने मोठ्या धैर्याने व चिकाटीने दोन वर्षे इंग्रजांचा प्रतिकार केला. पहिल्या वर्षात जनरल मेदोजच्या नेतृत्वाखाली इंग्रजांची मोहीम फारशी यशस्वी ठरली नाही. म्हैसूर राज्यातील अतिशय मजबूत किल्ला अशी ओळख असलेला बंगलोर किल्ला मोठ्या शर्थीने त्याने जिंकून घेतला. याचवेळी निजामाचे १०,००० चे घोडदळ व परशुराम भाऊच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे १०,००० पायदळ व १०,००० घोडदळ युद्धात सामील झाले. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत टिपूची शक्ती कमी पडू लागली. टिपूची राजधानी श्रीरंगपट्टणभोवती इंग्रजांचा वेढा आवळला जात होता. शेवटी श्रीरंगपट्टणमचा तह होऊन हे युद्ध संपले.

या तहानुसार टिपू सुलतानला म्हैसूर राज्याच्या अर्ध्या प्रदेशावर पाणी सोडावे लागले. टिपूकडून मिळालेल्या प्रदेशाचे तीन भाग करण्यात आले. मराठ्यांना तुंगभद्रेच्या उत्तरेकडील प्रदेश आणि निजामाला कृष्णा व पेतार नद्यांमधील प्रदेश मिळाला. इंग्रजांना मलबाद, दिंडिगल व बारा महाल हे जिल्हे मिळाले. युद्धदंड म्हणून टिपूने ३ कोटी ३० लक्ष रुपये द्यावेत. इंग्रजांच्या पकडलेल्या युद्धकैद्यांची सुटका करावी लागली. तहाची योग्य अंमलबजावणी व्हावी म्हणून टिपूला आपली दोन मुले इंग्रजाकडे ओलीस ठेवावी लागली. या युद्धात टिपूचा पूर्ण बिमोड करणे शक्य असतानाही लॉर्ड कॉनवॉलिसने तसे केले नाही. याबाबत तो म्हणतो, ''आपल्या मित्र सत्तांना शक्तिशाली बनू न देता शत्रूला पांगळे करण्यात आपण यशस्वी झालो.''

## ❑ इंग्रज-म्हैसूर चौथे युध्द (१७९९) :-

कॉर्नवॉलिसच्या काळातील इंग्रजाविरुध्दच्या युद्धात पराभव व त्याबरोबर प्रादेशिक हानी व अपमान झाल्याने टिपू संतापाने जळफळत होता. त्यांच्याविरुध्द फ्रेंचांची मदत मिळवण्याचा तो प्रयत्न करत होता. तिसऱ्या इंग्रज म्हैसूर युद्धाने टिपू दुबळा झाला होता. पण पराभवाने खचून जाणारा तो नव्हता. युद्धात झालेली आर्थिक व लष्करी हाती त्याने अल्पावधीतच भरून काढली. अद्ययावत तोफखाना उभा करून किल्ल्यांच्या तटबंदी मजबूत केल्या. इंग्रजांविरुध्द मदत मिळवण्यासाठी त्याने आपले दूत इराण, अरेबिया, मॉरिशस, टर्की या राष्ट्राकडे पाठवले. मॉरिशसच्या फ्रेंच गव्हर्नरने त्याला इंग्रजाविरुध्द उत्तेजन दिले. काही फ्रेंच अधिकारी टिपूच्या लष्करात सामील झाले.

लॉर्ड वेलस्लीला टिपूच्या वरील सर्व हालचाली धोकादायक वाटू लागला. याच सुमारास युरोपात इंग्लंड व फ्रान्स यांच्यात युद्धाचा भडका उडाला होता. नेपोलियन इजिप्तमार्गे भारतात येण्याची शक्यता इंग्रजांना वाटत होती. असे झाले तर फ्रेंचांना भारतात पाय ठेवायला जागा नसावी असे वेलस्लीला वाटत

होते. इंग्लंडमधील कंपनीच्या अधिकाऱ्यांनीही विनाविलंब टिपूवर हल्ला करावा अशी सूचना वेलस्लीला केली. वेलस्लीने मराठ्यांना टिपूविरुध्दच्या युद्धात सामील करून घेण्याचा प्रयत्न केला, परंतु मराठ्यांनी दाद दिली नाही. निजामाने तैनाती फौजेचा स्विकार केला असल्याने तो इंग्रजासोबत राहिला. टिपूच्या मांडलिक राजांनाही टिपूपासून फोडण्याचे हरप्रकारे प्रयत्न वेलस्लीने केले.

चौथ्या इंग्रज-म्हैसूर युद्धास फेब्रुवारी १७९९ मध्ये प्रारंभ झाला. इंग्रज फौजांचे नेतृत्व ऑर्थर वेलस्ली (ग.ज.लॉर्ड वेलस्ली याचा धाकटा बंधू) व जनरल हॅरीस यांच्याकडे होते. स्वत: वेलस्ली मद्रासहून मोहिमांचे संचालन करत होता. यावेळी टिपूकडे सुमारे ४६,००० हजार फौज होती, तर मुंबई, मद्रास, कलकत्ता येथील इंग्रज फौज मिळून तेवढीच फौज टिपूविरुध्द रणक्षेत्रात इंग्रजांनी उतरवली. टिपूवर पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूंनी हल्ले करून इंग्रजांनी त्याला कात्रीत पकडले. पश्चिमेकडून हल्ला करून जनरल स्टुअर्टने सेदासीद येथे मार्च १७९९ मध्ये टिपूचा पराभव केला. मलवल्ली येथे जनरल हॅरीसकडून टिपू सुलतानचा पराभव झाला. मलवल्लीहून टिपू आपली राजधानी श्रीरंगपट्टणम येथे आश्रयास आला. इंग्रजांनी त्या किल्ल्याला वेढा घातला. अखेर पराक्रमाची शर्थ करीत ४ मे १७९९ रोजी टिपू धारातीर्थी पडला. किल्ला इंग्रजांच्या ताब्यात आला आणि म्हैसूरचे स्वातंत्र्य समाप्त झाले.

टिपूशी झालेल्या युद्धात वेलस्लीला प्रचंड यश मिळाले. टिपूचा मुलगा इंग्रजांना शरण आला. टिपूच्या कुटुंबियांना वेल्लोरच्या किल्ल्यात बंदिस्त करण्यात आले. इंग्रज सैनिकांनी समृध्दीकरिता प्रसिद्ध असलेल्या श्रीरंगपट्टणमची यथेच्छ लूट केली. त्यांच्या लूटीतून शहरातील एकही घर सुटले नाही. लुटलेले किंमती अलंकार हिरे, अन्य रत्ने, सोन्याच्या वस्तू इत्यादी इंग्रज सैनिक छावणीच्या बाजारात विकताना दिसत होते. एकूण एक व्यक्तीची संपत्ती व मौल्यवान वस्तू नाहीशा झाल्या होत्या, असे ऑर्थर वेलस्ली म्हणतो. युद्धानंतर इंग्रजांनी म्हैसूरच्या गादीवर हिंदू ओडीयार घराण्यातील अल्पवयीन मुलास गादीवर बसविले त्याच्या साहाय्यासाठी टिपूचा दिवाण पूर्णय्या यास आपला प्रतिनिधी म्हणून नेमले. नव्या राजास तैनाती फौज स्विकारावयास लावली. युद्धात मदत केल्याने निजामास गुट्टी व गुरकोंडा हे दोन जिल्हे देण्यात आले. तैनाती फौज स्विकारण्याच्या अटीवर मराठ्यांना काही भाग देण्याची तयारी दाखवली. परंतु मराठ्यांनी नकार दिला. अशाप्रकारे १८०० मध्ये संपूर्ण म्हैसूर इंग्रज अंमलाखाली आले.

### ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ✻

### ❑ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१. सन १७४० मध्ये बंगालचा सुभेदार सर्फराजखानाला युद्धात ठार करून कोणी बंगालची सत्ता बळकावली?

२. १७१७ साली कोणत्या मोगल बादशहाने ईस्ट इंडिया कंपनीला मुक्त व्यापाराचा परवाना दिला होता?

३. सिराजउद्दौला नंतर बंगालचा नवाब पदावर कोण स्थानापन्न झाले?

४. पहिल्या इंग्रज-म्हैसूर युद्ध हैदरअलीने कोणत्या प्रदेशापर्यंत धडक मारली?

५. चौथ्या इंग्रज-म्हैसूर युद्धात कंपनीचा गव्हर्नर जनरल कोण होता?

**❑ ब) खाली दिलेल्या पर्यायातून अचूक पर्याय निवडा व विधाने पूर्ण करा.**

१. ............ यावर्षी झाली प्लासीची लढाई.

*अ) १७५७ ब) १८५६ क) १७५६ ड) १७७०.*

२. मीरजाफर नंतर बंगालचा नवाब ............. हा बनला.

*अ) मीरकासीम ब) शुजाउद्दौला क) अलीवर्दीखान ड) सर्फराजखान.*

३. ओडियार घराण्यातील राजास बाजूला सारून म्हैसूरची सत्ता ................ याने बळकावली.

*अ) मीरकासीम ब) शुजाउद्दौला क) टिपू सुलतान ड) हैदरअली.*

४. दुसरे इंग्रज-म्हैसूर युद्ध कोणत्या कालावधीत झाले?

*अ) १७१७ ते १७२० ब) १७८० ते १७८४*

*क) १७६० ते १७६४ ड) १७८५ ते १७८८.*

५. तिसरे इंग्रज-म्हैसूर युद्ध ............. तहाने संपले.

*अ) मंगलौर ब) बक्सार क) श्रीरंगपट्टणम् ड) यापैकी नाही.*

## १.२.३ मराठी सत्तेशी संघर्ष

मुघल साम्राज्याच्या अवशेषावर मराठ्यांनी आपले साम्राज्य निर्माण केले. भारतीय सत्ताधिशांमध्ये मराठे सर्वात प्रबळ होते. युरोपियन सत्तांमध्ये इंग्रज सर्वात प्रबळ होते. त्यांची आक्रमक नीती, पश्चिम भारतात प्रादेशिक विस्तार करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा, मराठ्यांच्या कारभारात इंग्रज करत असलेली लुडबूड यातून पहिले इंग्रज-मराठा युद्ध उद्‌भवले.

**❑ प्रथम इंग्रज-मराठा युध्द (१७७५-१७८२) :-**

सन १७६१ मधील पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठ्यांचा इतका जबरदस्त पराभव झाला की,

मराठे त्यातून आपली स्थिती कितपत सुधारू शकतील ह्याबद्दल सर्वत्र साशंकता होती. पण सुदैवाने मराठ्यांना पहिला माधवरावसारख्या कर्तबगार पेशव्याचे नेतृत्व मिळाले. माधवरावांनी आपल्या अल्प कारकिर्दीत हैदरअली व निजाम या दक्षिणेतील शत्रूंना शांत बसविले. प्रशासनव्यवस्था, अर्थव्यवस्था नीट करून राज्याची घडी बसविली. तसेच आपले सरदार दिल्ली मोहीमेवर पाठवून पानिपतपूर्व परिस्थिती निर्माण केली. पण माधवरावांच्या अकाली निधनाने मराठा राज्यातील स्थिती वेगाने बदलू लागली. माधवरावाला अपत्य नसल्याने त्याचा लहान भाऊ नारायणराव पेशवा बनला, पण तो अल्पकालीन ठरला. पेशवा बनण्याची आकांक्षा असलेल्या रघुनाथरावाने नारायणरावाचा खूण केला व तो स्वत: पेशवा बनला. पण अनेक मराठा सरदारांना ही गोष्ट पसंत पडली नाही. मराठा दरबारातील नाना फडणीस, सखारामबापू, महादजी शिंदे व इतर १२ सरदारांनी (बारभाई) राघोबाच्या विरोधात राजकारण केले. त्यांनी राघोबाला पदच्यूत करून नारायणरावांच्या नुकत्याच झालेल्या मुलास सवाई माधवराव असे नाव देऊन त्याला पेशवा बनविले. या बारभाई मंडळींनी सवाई माधवरावाच्या नावे राज्यकारभार सुरू केला.

अशा प्रकारे पुणे सरकार व राघोबा यांच्यात संघर्षाला सुरवात होऊन राज्यात यादवी माजली. याचवेळी गव्हर्नर जनरल म्हणून महत्त्वाकांक्षी असलेला वॉरन हेस्टिंग्ज भारतात आला. बारभाईशी झालेल्या संघर्षात पराभूत झालेला राघोबा मुंबईकर इंग्रजांच्या आश्रयाला गेला. पश्चिम भारतात प्रादेशिक विस्तार करता यावा याकरिता मुंबईकर इंग्रज योग्य संधीची वाट पाहत होते. राघोबा व मुंबईकर इंग्रज यांच्यात ६ मार्च १७७५ रोजी सुरतेचा तह घडून आला.

## ❑ सुरतेचा तह (१६ मार्च, १७७५) :-

१) इंग्रजांनी २५०० सैन्य देवून रघुनाथरावास पेशवेपद द्यावे.

२) रघुनाथरावाने इंग्रजांना सैन्याच्या खर्चासाठी प्रत्येक महिन्यास दीड लाख रुपये आगवू द्यावे.

३) अनामत रक्कम म्हणून राघुयनाथरावाने सहा लाख रुपये किंमतीचे जडजवाहीर ठेवावे.

४) ठाणे, वसई, साष्टी इत्यादी बेटे धरून मुंबईच्या आसपासची सर्व बेटे आणि सुरतजवळील ओलपड आणि जांबूसर तालुके इंग्रजांना कायमचे देऊन टाकावे.

तहानुसार इंग्रज फौज राघोबाला घेऊन पुण्याच्या रोखाने निघाली. तहाचे गांभीर्य ओळखून हरिपंत फडके यांनी सैन्याची जमवाजमव केली व इंग्रज सैन्यावर हल्ला चढवला. गुजरातमधील आदास येथे युद्धसंघर्ष झाला. त्यात इंग्रजांना मराठ्यांविरुध्द यश मिळाले नाही. याचवेळी रेग्युलेटिंग ॲक्ट पास होऊन बंगालचा गव्हर्नर वॉरन हेस्टिंग्ज हा मुंबई, मद्रास व बंगाल या तिन्ही प्रांताचा गव्हर्नर जनरल झाला. मराठ्यांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्यास अनुकूल परिस्थिती नाही हे ओळखून त्याने मराठ्यांशी मैत्री करण्याचा आदेश मुंबईच्या गव्हर्नरला दिला. वॉरन हेस्टिंग्जने पुणे दरबाराशी तह करण्यासाठी कॅप्टन

अॅप्टन यास पाठविले. दोहोतील वाटाघाटीतून प्रारंभी काही फलनिष्पत्ती होण कठीण झाले. परंतु याचवेळी सदाशिवरावभाऊच्या तोतयाचे प्रकरण उद्‌भवल्यामुळे पुणे दरबाराने इंग्रजांशी समझोता केला. त्यानुसार मराठे व इंग्रज यांच्यामध्ये पुरंदरचा तह घडून आला.

## ❑ पुरंदरचा तह (१ मार्च १७७६) :-

१) साष्टी बेट व ठाणे यांचा ताबा इंग्रजांकडे राहील.

२) राघुनाथरावसाठी इंग्रजांचा जो खर्च झाला, त्याबद्दल मराठ्यांनी इंग्रजांना १२ लाख रुपये द्यावेत.

३) राघुनाथराव राजकारणातून पूर्णपणे निवृत्त होईल, त्यांना मराठा सरकार ३ लाख १५ हजार रुपये वार्षिक पेन्शन देईल.

४) इंग्रजांनी गुजरातमधील मराठ्यांचा जो प्रदेश जिंकला तो त्यांच्याकडे राहू द्यावा.

५) गोविंदराव गायकवाड यांस मदत न करता फत्तेसिंग गायकवाड यांना करावी.

पुरंदरचा तह कोणालाच खऱ्या अर्थाने पसंत पडला नाही. मुंबईचा गव्हर्नर सर हॉर्नबी याने या तहाविरुध्द कंपनीच्या संचालक मंडळाकडे तक्रार केली. संचालक मंडळाने त्याची बाजू योग्य मानून मराठ्यांविरुध्द युद्ध सुरू करण्याचे आदेश ग.ज. वॉरन हेस्टिंग्ज याने दिले. मुंबईच्या गव्हर्नरने कर्नल इगर्टन यास फौजेसह पुण्याच्या दिशेने रवाना केले. वॉरन हेस्टिंग्लजनेही राघोबाला पेशवापदी बसवण्यास संमती दिली. त्यामुळे इंग्रज मराठा युध्दास पुन्हा सुरुवात झाली. जानेवारी १७७९ मध्ये तळेगाव येथे मराठा सैन्याने इंग्रजांना चारही बाजूंनी कोंडीत पकडले व त्यांची रसद तोडून त्यांचा दणदणीत पराभव केला. नाक मुठीत धरून इंग्रजांना मराठ्यांपुढे शरणागती पत्करून वडगांवचा तह केला.

## ❑ वडगांवचा तह (१६ जानेवारी १७७९) :-

१) राघुनाथरावास इंग्रजांनी मराठ्यांच्या स्वाधीन करावे.

२) साष्टी, ठाणे व गुजरातमधील सर्व मुलूख इंग्रजांनी मराठ्यांना द्यावा.

३) राघुनाथराव व इंग्रज यांच्यामधील सर्व करार रद्द समजावेत.

४) बंगालमधून पाठविलेले इंग्रज सैन्य वॉरन हेस्टिंग्जने परत बोलवावे.

५) तहाच्या प्रामाणिक अंमलबजावणीसाठी दोन इंग्रज अधिकारी मराठ्यांकडे ओलीस ठेवावेत.

हा तह इंग्रजांच्या दृष्टीने अतिशय अपमानास्पद होता. ग.ज. वॉरन हेस्टिंग्जने इंग्रज अधिकाऱ्यांना अशा प्रकारचा तह करण्याचा अधिकार नाही असे सांगून हा तह फेटाळून लावला. त्याने युद्धाची सिध्दता

करून जनरल गोडार्डच्या नेतृत्वाखाली मोठी इंग्रज फौज पुण्याच्या दिशेने रवाना केली. कॅप्टन पोफॅम याला शिंध्याविरुध्द ग्वाल्हेरवर चालून जाण्याचे आदेश दिले. याचवेळी वडगावच्या तहानुसार नाईलाजाने मराठ्यांच्या स्वाधीन झालेला राघोबा संधी साधून नजरकैदेत पळाला व सुरत येथे गोडार्डला जाऊन मिळाला.

## ❑ इंग्रजाविरुध्द चतु:संघाची स्थापना :-

वडगावचा तह नाकारून इंग्रजांनी मराठ्यांविरुध्द आक्रमक पवित्रा घेतला. पुण्याची सत्तासुत्रे हलविणाऱ्या नाना फडणवीसाने नागपूरचे भोसले, हैद्राबादचा निजाम व म्हैसूरचा हैदरअली या शासकांशी बोलणी करून पुणे, नागपूर, हैद्राबाद व म्हैसूर अशा चार भारतीय सत्ताधिशांचा चतु:संघ निर्माण केला. भोसल्यांनी इंग्रजांविरुध्द बंगालच्या दिशेने मोहीम रेटावी. हैदरअलीने मद्रासवर हल्ला करावा, निजामाने पूर्ण किनाऱ्यावर हल्ला करावा तर पुणे विभागाने गुजरात, पुणे व कोकण विभागात इंग्रजांना जेरीस आणावे अशी योजना होती. ती फलद्रुप झाली असती तर भारतातील इंग्रजांच्या घोडदौडीला लगाम बसला असता. मात्र तसे घडू शकले नाही. नाना फडणवीसाच्या चतु:संघाची सुरवातीला ग.ज.वॉरन हेस्टिंग्जला कल्पना नव्हती. चतु:संघाच्या बातमीने तो चांगलाच अस्वस्थ झाला. पण त्याची राजकारणी धुर्तता व भारतीय सत्ताधिशांशी स्वार्थी वृत्ती यामुळे चतु:संघाची योजना पूर्णत्वास गेली नाही. हेस्टिंग्जने निजामाला गुंटूरचा प्रांत देऊन व नागपूरकर भोसल्यांना ५० लाखाची लाच देऊन चतु:संघातून फोडले. त्यामुळे केवळ पेशवे व हैदरअलीच इंग्रजांशी लढले.

## ❑ पहिल्या इंग्रज-मराठा युद्धास पुन्हा सुरवात :-

पूर्वेकडून सेनापती गोडार्ड १७८० मध्ये गुजराथला पोहोचला. त्याने अहमदाबादवर जोराचा हल्ला केला. त्यानंतर तो पुण्याच्या दिशेने निघाला. फेब्रुवारी १७८१ मध्ये बोरघाट चढून तो खंडाळ्यापर्यंत आला. पण तेथे मराठ्यांच्या खंबीर प्रतिकारामुळे त्याला पुढे जाता येईना. तीन महिने त्याच्यात व मराठ्यांच्यात लढाया झाल्या. यामध्ये इंग्रजांचे १९ लष्करी अधिकारी व शेकडो सैनिक मरण पावले. दक्षिणेत हैदरअलीने मोठी धामधूम माजवली. त्याने मद्रासनजीकच्या इंग्रजांच्या प्रदेशावर जोरदार हल्ले केले. त्याच्या झंझावती माऱ्यासमोर इंग्रजांची मात्रा चालेना. दरम्यान मुसंडी मारून इंग्रज सेनापती पोकॅमने महादजी शिंदे विरुध्द विजय मिळवला. ग्वाल्हेरचा किल्ला इंग्रजांनी जिंकल्यामुळे महादजी अस्वस्थ झाला. दक्षिणेतील आघाडी सोडून तो आपल्या कार्यक्षेत्राच्या रक्षणासाठी गेला. परंतु फेब्रुवारी १७८१ मध्ये सिप्री येथे झालेल्या युध्दात त्याचा पराभव झाला. त्यामुळे इंग्रजांशी तडजोड करणे महादजीला आवश्यक वाटू लागले. इंग्रजांनाही उत्तरेत यश मिळत असले तरी मध्य भारतात व दक्षिणेत अपयश येत होते. वॉरन हेस्टिंग्जने महादजी मार्फत तहाची बोलणी सुरू केली. महादजीच्या आग्रहाने पुणे दरबार व इंग्रज यांच्यात बऱ्याच वाटाघाटी होऊन सालबाईचा तह झाला.

## ❑ सालबाईचा तह (१७ मे, १७८२) :-

या तहाच्या अटी खालीलप्रमाणे होती.

१) इंग्रजांनी राघोबाला आश्रय व मदत देऊ नये.

२) इंग्रजांनी पुरंदरच्या तहानंतर घेतलेला प्रदेश मराठ्यांना परत करावा.

३) गुजरातमध्ये जिंकलेला प्रदेश इंग्रजांनी मराठे व गायकवाडांना परत द्यावा.

४) राघुनाथराव पेशव्यांचा पेन्शनर म्हणून राहिल, त्यास रु. २५,००० दरमहा देण्यात यावेत.

५) फत्तेसिंग गायकवाड गुजरातचा मराठा सरदार राहिल.

६) हैदरअलीने जिंकलेला सर्व प्रदेश परत करण्याची जबाबदारी मराठ्यांची राहिल.

७) इंग्रजांचे शत्रू व मित्र तेच मराठ्यांचे शत्रू व मित्र राहतील.

८) वसई मराठ्यांकडे तर साष्टी, मुंबईच्या आसपासची लहानसहान बेटे, भडोच शहर इंग्रजांकडे राहिल.

९) इंग्रजांशिवाय अन्य कोणत्याही युरोपियन सत्तेशी पेशव्यांनी संबंध ठेवू नयेत.

१०) इंग्रजांना व्यापारी सवलती पूर्वीप्रमाणे राहतील.

११) दोन्ही पक्ष तह पाळतील याची हमी महादजी शिंदेकडे सोपविण्यात आली.

## ☼ सालबाईच्या तहाचे परिणाम :-

१) मराठ्यांच्या तीव्र प्रतिकारामुळे पुढे २० वर्षे इंग्रजांनी मराठ्यांना डिवचण्याचा प्रयत्न केला नाही.

२) ठाणे व साष्टी दोन्ही ठाणी मराठ्यांच्या हातून कायमची निसटली.

३) महादजी शिंदे यांची प्रतिष्ठा वाढली. उत्तर हिंदुस्थानच्या त्यांच्या कर्तृत्वाचा मार्ग मोकळा झाला. इंग्रज-महादजी मैत्री प्रस्थापित झाली.

४) राजकारणाचे केंद्र दक्षिणेकडून उत्तरेकडे सरकले.

५) तहामध्ये हैदरचा विचार न घेतल्याने हैदर व मराठे यांच्यात वैर निर्माण झाले.

६) राघुनाथराव स्वतः मराठ्यांच्या स्वाधीन झाला.

सालबाईचा तह म्हणजे हेस्टिंगचा एक राजनैतिक विजय होता असे म्हटले जाते. भारतात इंग्रजांची स्थिती अत्यंत चिंताजनक होती. आर्थिकदृष्ट्या तर ते अतिशय डबघाईला आले होते. दक्षिणेत पुणे तदरबार व हैदर यांच्याशी संघर्षात त्यांना माघार घ्यावी लागत होती. अशा परिस्थितीत महादजी शिंदेचा उपयोग करून इंग्रजांची अधिक हानी होऊ न देता युद्धबंदी करण्यात हेस्टिंग्ज यशस्वी ठरला.

## ❑ दुसरे इंग्रज–मराठा युद्ध (१८०२–१८०४) :-

१८ व्या शतकाच्या अखेरी मराठा राज्यात माजलेला गोंधळ, यादवी व अराजक ही परिस्थिती वेलस्लीच्या साम्राज्यवादी धोरणाला जणू आमंत्रण देणारी ठरली. पहिल्या इंग्रज-मराठा युद्धाच्या अखेरीलाच इंग्रज मराठयांपेक्षा शक्तीसामर्थ्यात फारसे कमी नाहीत हे उघड झाले होते. त्यानंतरच्या वीस वर्षाच्या काळात तर मराठे व इंग्रज यांच्या स्थितीत चांगलाच बदल घडून आला. इंग्रजांनी मराठे सोडून इतर सत्ताधिशांना आपल्या अंकीत करून आपली राजकीय स्थिती बळकट केली होती. याउलट मराठी राजकारणाचे चित्र चिंताजनक होते. मराठा संघराज्याला तडा जाऊन शिंदे-होळकरांसारख्या सरदारांना नाना फडणवीसची सत्ता खुपू लागली. मराठा सरदारातील मतभेद दूर करण्यात नानाला अपयश आले. अशा स्थितीतच सवाई माधवरावांचे निधन होऊन वारसा हक्काच्या कारणावरून मराठा सरदारातील यादवी विकोपाला गेली. शेवटी अनेक घडामोडी घडून दुसरा बाजीराव पेशवा झाला.

लॉर्ड वेलस्लीने दुसऱ्या बाजीरावाला तैनातीफौजेच्या जाळ्यात अडकविण्याचे प्रयत्न चालविले. मराठा राज्यातील अराजक कळसास पोहोचले. शिंदे-होळकर यांच्या शत्रुत्वाचे पर्यवसान उघड युध्दात झाले. ऑक्टोबर १८०२ मध्ये यशवंतराव होळकर मोठी फौज घेऊन पुण्यात आला. हडपसर येथे झालेल्या लढाईत त्याने पेशवे व शिंदे यांच्या फौजेचा सपशेल पराभव केला. पेशवा दुसरा बाजीराव याने पळून जाऊन वसई येथे इंग्रजांचा आश्रय घेतला. इंग्रजांनी या संधीचा फायदा घेऊन त्याच्यावर वसईचा तह लादला.

## ❑ वसईचा तह (३१ डिसेंबर १८०२) :-

या तहातील तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या.

१) पेशव्यांनी आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी कमीतकमी ६००० पायदळाची इंग्रजी फौज ठेवावी.

२) तैनाती फौजेच्या खर्चासाठी २६ लाख रुपये उत्पन्नाचा प्रदेश पेशव्याने इंग्रजांना द्यावा.

३) इंग्रजांच्या व्यतिरिक्त कोणत्याही युरोपियनांना पेशव्याने सेवेत ठेवू नये.

४) इंग्रजांच्या संमतीशिवाय कोणत्याही राज्याशी पेशव्याने संबंध ठेवू नयेत.

५) पेशव्यांच्या दरबारात एक ब्रिटिश वकील कायमस्वरूपी राहिल.

६) एकाचे शत्रू व मित्र हे दुसऱ्याचे शत्रू व मित्र मानले जातील.

७) निजाम व बाजीराव यांच्या भांडणात इंग्रज देतील तो निर्णय मराठ्यांनी मान्य करावा. हा तह तैनाती फौजेच्या पध्दतीचा तह म्हणून ओळखला जातो.

पेशव्याने इंग्रजांशी करार केल्याने तो करार मराठा संघराज्याच्या सर्व घटक प्रमुखांसाठी बंधनकारक ठरतो असे इंग्रज म्हणू लागले. पण मराठ्यांचे स्वातंत्र्य संपुष्टात आणणारा करार मराठा सरदार सहजासहजी मान्य करणे शक्य नव्हते. शिंदे व भोसले हे दोन सरदार आपल्यातील मतभेद विसरून फौजेसह दक्षिणेत आले. त्यांनी होळकरांनाही इंग्रजांविरुध्दच्या युध्दात सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केला. पण इंग्रजांनी यात बेबनाव केला, त्यामुळे होळकरांनी तटस्थ राहणे पसंत केले.

## ❑ दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धातील घटना :-

मराठ्यांचे स्वातंत्र्य नष्ट करणारा वसईचा तह असल्याने शिंदे व भोसले या मराठा सरदारांनी इंग्रजांविरुध्द लढणे पसंत केले. या मोहिमेसाठी लॉर्ड वेलस्लीने जय्यत तयारी केली होती. दक्षिणेत इंग्रज फौजांचे नेतृत्व ऑर्थर वेलस्लीकडे तर उत्तरेत जनरल लेककडे होते. गुजरात, बुंदेलखंड व कटक या भागातही इंग्रज फौजांच्या मोहिमा आखण्यात आल्या होत्या. इंग्रजांनी शिंदेंच्या ताब्यातील अहमदनगर किल्ल्यावर हल्ला करून तो जिंकून घेतला. सप्टेंबर १८०३ मध्ये त्यांनी शिंदे व भोसले यांच्या संयुक्त फौजांचा पराभव केला. नोव्हेंबरमध्ये भोसल्यांना स्वतंत्रपणे गाठून त्यांचा पराभव करून त्यांचा गाविलगडच्या किल्ला काबीज केला. देवगाव येथे इंग्रज व भोसले यांच्यात तह होऊन भोसलेंनी युद्धातून माघार घेतली.

## ❑ देवगावचा तह (२५ डिसेंबर १८०३) :-

१) वऱ्हाड आणि कटकचा प्रदेश भोसल्यांनी इंग्रजांना द्यावा.

२) निजामावरील आपले हक्क नागपूरकरांनी सोडून द्यावेत.

३) मराठा राज्यसंघाचे भोसल्यांनी विसर्जन करावे.

४) भोसले इंग्रजांच्या कोणत्याही शत्रूला नोकरीस ठेवणार नाहीत.

५) वर्धा नदी, पश्चिमेकडील वऱ्हाडचा प्रदेश निजामाला देण्यात येईल.

६) इतर संस्थानिकांशी भोसल्यांचा संघर्ष झाल्यास इंग्रज देतील तो निकाल भोसल्यांनी मान्य करावा.

७) इंग्रजांनी इतर राज्यांशी किंवा संस्थानिकांशी जे तह केले असतील ते भोसल्यांकरिता बंधनकारक असतील.

उत्तरेतील मोहिमांसाठी इंग्रजांना भरघोस यश मिळाले. ऑगस्ट १८०३ मध्ये जनरल लेकने अलीगढ काबीज केले. दिल्ली जिंकून बादशहा शहाआलम यास ताब्यात घेतले. इंग्रज व शिंदे यांच्यात अखेरची लढाई लासवाडी येथे झाली. या लढाईत शिंद्यांची फौज अत्यंत शौर्याने लढली परंतु विजय इंग्रजांचा झाला. या पराभवामुळे शिंद्यानी शरणागती पत्करली. डिसेंबर १८०३ मध्ये सुर्जी-अंजनगाव येथे तह होवून युद्ध संपले.

## ❑ सुर्जी-अंजनगावचा तह (३० डिसेंबर १८०३) :-

इंग्रजांनी दौलतराव शिंदे यांच्याबरोबर हा तह केला.

१) फ्रेंच अमेरिकन व्यक्तीला किंवा इंग्रजांच्या कोणत्याही शत्रूला शिंद्यांनी आपल्या नोकरीत ठेवू नये.

२) पेशवा, निजाम आणि गायकवाड यांना स्वतंत्र सत्ता म्हणून मान्यता द्यावी.

३) शिंद्यांनी मुघल बादशाहीवरील आपले नियंत्रण संपुष्टात आणावे.

४) शिंद्यांनी गंगा-यमुना दुआबातील आपल्या ताब्यातील प्रदेश, दिल्ली, आग्रा यामधील प्रदेश, बुंदेलखंडातील काही भाग, भडोच, गुजरातमधील काही जिल्हे, अहमदनगरचा किल्ला आणि अजिंठ्यापासून गोदावरीपर्यंतचा प्रदेश यांचा ताबा इंग्रजांना द्यावा. हे दोन्ही तह मराठ्यांच्या दृष्टीने अत्यंत घातक होते.

## ❑ इंग्रज व यशवंतराव होळकर :-

शिंदे व भोसले या मराठा सरदारांशी युध्द सुरू असताना यशवंतराव होळकर तटस्थ राहिला. युद्धकाळात इंग्रजांनी त्याच्याशी सलोख्याचा देखावा केला. शिंदे-भोसले यांचा बिमोड होताच ते होळकराकडे वळले. जयपूरच्या राज्यात होळकर लुटालूट करीत असल्याचा आरोप त्यांनी होळकरावर लावला व एप्रिल १८०४ मध्ये त्याच्यावर हल्ला केला. उत्तर भारतातून जनरल लेक, दक्षिणेकडून ऑर्थर वेलस्ली व गुजरातकडून कर्नल मॉन्सन अशा अधिकाऱ्यांनी होळकरला घेरले.

होळकर हा शूर व कुशल सेनानायक होता. मुकुंदरा खिंडीनजीक त्याने मॉन्सनवर इतक्या त्वेषाने हल्ला केला की, मॉन्सनला आग्राकडे पळ काढावा लागला. मथुरा जिंकून यशवंतरावाने दिल्लीला वेढा घातला. या घटनामुळे शिंदे व भोसले या सरदारांच्या आशा पल्लवीत झाल्या. सगळीकडे उत्साहाची लाट

निर्माण झाली. परंतु नोव्हेंबर १८०४ मध्ये त्याचा फरूकाबाद येथे इंग्रजांकडून पराभव झाला. युद्धामुळे कंपनीवर कर्जाचा बोजा वाढला. याला ग. ज. वेलस्लीला जबाबदार ठरवून माघारी बोलावण्यात आले. त्याच्याऐवजी लॉर्ड कॉर्नवॉलिसला ग.ज. म्हणून पाठविण्यात आले. इंग्रज व होळकर यांच्यात राजघाटचा तह होऊन युद्ध संपले.

## ❑ राजघाटचा तह (२४ डिसेंबर १८०५) :-

१) चंबळ नदीच्या उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील प्रदेशावरचा आपला हक्क होळकराने सोडून द्यावा.

२) चंबळच्या दक्षिणेकडील व पूर्वेकडील प्रदेशावर यशवंतरावांचा हक्क मान्य करणेत आला.

या तहानुसार चंबल नदीच्या उत्तरेकडील प्रदेशांवर, पुणे व बुंदेलखंड या क्षेत्रांवरच्या हक्कावर होळकरांना पाणी सोडावे लागले. चंबळ नदीच्या दक्षिणेकडील व पूर्वेकडील प्रदेशावर त्याचा हक्क मान्य करणेत आला. तहानंतर यशवंतराव इंग्रजांचा पराभव करण्याच्या विचाराने पछाडला. इंग्रजाविरुध्द झालेल्या पराभवाचे शल्य त्याला जाचत राहीले. सैन्याचा पगार थकल्यामुळे अनेक सैन्य त्याला सोडून गेले. प्रभावी तोफखाना नसल्यामुळे आपला पराभव झाला म्हणून त्याने कानपुडा येथे तोफांचा कारखाना सुरू केला. त्या ठिकाणी तो स्वत: काम करू लागला. दरम्यान त्याचा पुतण्या खंडेराव याचा आकस्मिक मृत्यु झाला. या सर्वाचा परिणाम होऊन त्याला वेडाचे झटके येऊ लागले. त्यातच त्याचा मृत्यु झाला. दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धामुळे मराठ्यांचे साम्राज्य लयाला गेले. इंग्रजांना अनेक प्रदेश प्राप्त झाले. इंग्रजी सत्तेला प्रचंड फायदा झाला. भारतीय सत्ताधीश प्रादेशिकदृष्ट्या परस्परांपासून दुरावले व त्यांची भविष्यात कधी इंग्रजांविरुध्द एकजूट होईल अशी शक्यता उरली नाही.

## ❑ तिसरे इंग्रज-मराठा युद्ध (१८१७-१८१८) :-

दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात मराठ्यांचा प्रमुख पेशवा याला तैनाती फौज स्विकारायला इंग्रजांनी भाग पाडले होते. भारतात सार्वभौम सत्तास्थापन करावयाची असेल तर पेशव्याचा पूर्णपणे नि:पात होणे गरजेचे होते. ग.ज. म्हणून भारतात आलेल्या लॉर्ड हेस्टिंग्जला मराठ्यांचे राहिलेले राज्य जिंकून घ्यावे अशी आवश्यकता वाटू लागली.

दुसऱ्या बाजीरावाने पेशवा बनल्यापासून अनेक चुका केल्या. त्याने प्रजेच्या कल्याणाकरता लक्ष न देता तृतीय दर्जाची कतृत्वशून्य माणसे आपल्या भोवती जमा केली. मराठ्यांच्यातील परस्पर भांडणाचा फायदा इंग्रज करून घेत होते. फेब्रुवारी १८११ मध्ये पुण्याच्या रेसिडेंटपदी आलेल्या माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन व पेशवा दुसरा बाजीराव यांच्यात सारखे खटके उडू चांगले. पेशव्याने काही मराठा

सरदारांच्या जहागिरी कमी केल्या. त्या सरदारांनी पेशव्याविरुध्द एल्फिनस्टनकडे दाद मागितली. हे निमित्त करून एल्फिन्स्टनने पेशव्यावर 'पंढरपूरचा तह' लादला.

## ❑ पंढरपूरचा तह :-

१) इंग्रजांच्या संमतीशिवाय बाजीरावाने कोणत्याही सरदाराची जहागिरी जप्त करू नये.

२) पेशवा व मराठा सरदार यांच्यात मतभेद निर्माण झाल्यास इंग्रजांनी निर्णय द्यावा.

३) पेशव्यांनी आपल्या जहागीरदाराकडून अवास्तव मागण्या करू नयेत.

४) जहागीरदार व त्यांचे नातेवाईक यांचे संरक्षण इंग्रज करतील.

५) जहागीरदाराशी स्वतंत्र तह करणेचा अधिकार इंग्रजांना राहील.

६) कायदेशीर अधिकार नसलेल्या जमिनी पेशव्यास जहागीरदारांनी परत कराव्यात.

७) पेशव्यांनी आपल्या हाताखालील जहागीरदारांना सन्मानाची वागणूक द्यावी.

या तहाने इंग्रजांच्या संमतीशिवाय पेशव्याने कोणत्याही सरदारानी जहागिरी जप्त करू नये. पेशव्याने जहागीरदारांकडून अवास्तव मागण्या करू नयेत. त्यांना सन्मानाची वागणूक द्यावी, असे पेशव्यास मान्य करावे लागले. या तहाने पेशव्याचे सरदारावरील नियंत्रण संपुष्टात आले.

मराठा सरदार व अन्य भारतीय सत्ताधीश यांनी इंग्रजाविरोधी एकत्र यावे व लढा द्यावा असा प्रयत्न पेशवा दुसरा बाजीराव करू लागला. पेशव्याच्या या हालचालीची जाणीव इंग्रजांना झाली. त्यांनी पेशव्याच्या अधिकाऱ्यांना फितूर करण्याचे प्रयत्न प्रारंभापासून सुरू ठेवले होते. पेशव्याचे मांडलिक बडोद्याचे गायकवाड यांचेकडून पेशव्याला कोट्यावधी रुपयांचे येणे होते, ते इंग्रजांनी अडवून धरले. याबाबत चर्चा करण्यासाठी गायकवाडांनी आपला वकील म्हणून गंगाधर शास्त्री याला पेशव्याकडे पाठवून दिले. परंतु तडजोडी चालू असताना गंगाधर शास्त्रीचा पंढरपूर येथे खून झाला. तो खून पेशव्याचा सरदार त्रिबकजी डेंगळे याने केला असा आरोप करून इंग्रजांनी त्रिंबकजीचा ताब्यात घेतले. ठाण्याच्या किल्ल्यात कैदेत असताना सप्टेंबर १८१६ मध्ये त्रिंबकजी तेथून निसटला व त्याने पेशव्याकरिता सैन्यभरती सुरू केली. त्यामुळे अस्वस्थ होऊन इंग्रजांनी पेशव्यावर पुण्याचा तह लादला.

## ❑ पुण्याचा तह (१३ जून १८१७) :-

१) मराठा साम्राज्याचे प्रमुखपद पेशव्यांनी सोडावे.

२) अहमदनगरचा किल्ला व नर्मदेचा उत्तरेकडील प्रदेशावरील हक्क सोडून ते इंग्रजांना द्यावेत.

३) पेशव्याने माळवा-बुंदेल खंडावरील हक्क सोडून ब्रिटिशांना द्यावेत.

४) त्रिंबकजीला स्वाधीन करेपर्यंत त्याचे कुटुंब ओलीस म्हणून इंग्रजांकडे ठेवावे.

५) बाजीरावाने इंग्रजांच्या परवानगीशिवाय परराज्याशी संबंध ठेवू नयेत.

६) तैनाती फौजेची संख्या वाढवावी.

७) गायकवाडांच्या थकबाकीचा निकाल पेशव्यांविरुध्द गेल्याने ती थकबाकी माफ करावी.

## ❑ तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धघटना :-

पुणे तहाच्या अटी पेशव्याला मान्य कराव्या लागल्या. इंग्रजांच्या वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी त्याने धडपड सुरू केली. त्यासाठी त्याने प्रमुख मराठा सरदार शिंदे, भोसले व होळकर यांच्याशी गुप्त पत्रव्यवहार केला व युद्धाची तयारी केली. त्याला नागपूरचे आप्पासाहेब भोसले व इंदूरचे मल्हारराव होळकर यांनी साथ दिली. पण तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात पेशवा, भोसले आणि होळकर ह्यांना एकत्र येऊ न देता त्यांना इंग्रजांनी वेगवेगळे ठेवले व पराभूत केले. सीताबर्डीच्या लढाईत भोसल्यांचा व महित्पूरच्या लढाईत होळकरांचा पराभव केला. पुण्यात पेशव्याच्या वाढलेल्या हालचाली पाहून इंग्रजांनी जादा सैन्य बोलावले.

पेशव्याने सुमारे सात महिने इंग्रजांविरुध्द झुंज दिली. पेशव्याचा सेनापती बापू गोखले याने खडकीच्या इंग्रज छावणीवर हल्ला केला. परंतु झालेल्या युद्धात मराठ्याचा पराभव झाला. त्यामुळे पेशव्याने पलायन सुरू केले. नोव्हेंबर १८१७ मध्ये पुणे इंग्रजांनी ताब्यात घेतले व शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकविला. फेब्रुवारी १८१८ मध्ये पंढरपूरजवळ गोपाळ अष्टी येथे इंग्रज व पेशवे यांच्यात निर्णायक लढाई झाली. त्यात पेशव्याचा सेनापती बापू गोखले ठार झाला.

दुसरा बाजीराव पेशव्याने पलायन चालू ठेवले. कोणाचीही मदत न मिळाल्याने शेवटी तो इंग्रजांना शरण आला. त्याने स्वत:तर्फे व वंशजातर्फे पेशवेपदावरील हक्कावर पाणी सोडले. त्याचे राज्य खालसा करून वार्षिक ८ लाख रु. पेन्शन देण्यात आली. कानपूरजवळील विठूर येथे तो राहू लागला. अशाप्रकारे सन १८१८ मध्ये पेशवाई बुडाली व मराठ्यांचे राज्य संपुष्टात आले.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ❊

## ❑ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१. प्रथम इंग्रज-मराठा युद्ध कोणत्या गव्हर्नर जनरलच्या कालावधीत झाले?

२. राघोबा व मुंबईकर इंग्रज यांच्यात ६ मार्च १७७५ रोजी कोणता करार घडून आला?

३. इंग्रजांविरुद्ध चतु संघाच्या स्थापनेची कल्पना कोणाची होती?

४. दुसरे इंग्रज-मराठा युद्ध कोणत्या कालावधीत लढले गेले?

५. तिसरे इंग्रज-मराठा युद्ध यावेळी पेशवा कोण होता?

## ❑ ब) खाली दिलेल्या पर्यायातून अचूक पर्याय निवडा व विधाने पूर्ण करा.

१. बडोद्याच्या गायकवाडांचा वकील गंगाधर शास्त्री याचा ................ येथे खून झाला.

*अ) पंढरपूर* *ब) सोलापूर* *क) आष्टी* *ड) पुणे.*

२. पहिले इंग्रज-मराठा युद्ध .............. तहाने संपले.

*अ) सूरतच्या* *ब) वसईच्या* *क) सालबाईच्या* *ड) खडकीच्या.*

३. द्वितीय इंग्रज-मराठा युद्धात इंग्रजांनी शिंदे यांचा पराभव करून त्यांच्यावर ................ हा तह लादला.

*अ) पुणे* *ब) सोलापूर* *क) वसई* *ड) सुरजी-अंजनगाव.*

४. ऑक्टोबर १८०२ मध्ये यशवंतराव होळकरने पुण्यावर स्वारी केल्याने पेशवा दुसरा बाजीराव याने इंग्रजांचा आश्रय घेऊन ................. हा तह केला.

*अ) पुणे* *ब) वसई* *क) सालबाई* *ड) खडकी.*

५. फेब्रुवारी १८१८ मध्ये पंढरपूरजवळ गोपाळ आष्टी येथे इंग्रज व पेशवे यांच्यात झालेल्या युद्धात पेशव्यांचा सेनापती ............. हा ठार झाला.

*अ) हरिपंत फडके* *ब) यशवंतराव होळकर*

*क) बापू गोखले* *ड) महादजी शिंदे.*

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **वखार** : युरोपियन सत्तांचे व्यापारी माल ठेवण्याचे ठिकाण.

२. **दुहेरी राज्यव्यवस्था** : शासनव्यवस्थेचे अंतर्गत प्रशासन सांभाळणे व महसूल गोळा करणे असे दोन भाग करून शासन चालविणे.

३. **दिवाणी** : प्रांताचा महसूल गोळा करण्याचा अधिकार.

४. **निजायत** : प्रांताचे अंतगृत प्रशासन चालविणे.

५. **चर्तु:संघ** : नाना फडणवीसाने इंग्रजांविरुध्द पेशवा, नागपूरकर भोसले, हैद्राबादचा निजाम व म्हैसूरचा हैदरअली यांची केलेली आघाडी.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** *१. राणी एलिझाबेथ.*

*२. सूरत.*

*३. इंग्रज व फ्रेंच.*

*४. रॉबर्ट क्लाइव्ह.*

*५. लॉर्ड डलहौसी.*

**ब)** *१. ब) कालिकत.*

*२. अ) निजाम.*

*३. ड) राजा रणजितसिंग.*

*४. अ) १७७३.*

*५. क) टिपू सुलतान.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

**अ)** *१. अलीवर्दीखान.*

*२. फरूखशियर*

*३. मीरजाफर.*

*४. मद्रास.*

*५. लॉर्ड वेलस्ली.*

**ब)** *१. अ) १७५७.*

*२. अ) मीरकासीम.*

*३. ड) हैदरअली.*

४. ब) १७८० ते १७८४.

५. क) श्रीरंगपट्टणम्.

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

**अ)** १. वॉरन हेस्टिंग्ज.

२. सूरतचा तह.

३. नाना फडणवीस.

४. १८०२-१८०४.

५. दुसरा बाजीराव.

**ब)** १. अ) पंढरपूर.

२. क) सालबाईच्या.

३. ड) सुरजी-अंजनगाव.

४. ब) वसई.

५. क) बापू गोखले.

## १.५ सारांश

भारताशी युरोपियन देशांचा होणारा व्यापार त्यांना अतिशय फायदेशीर होता. त्यामुळे सुष्कीच्या मार्गात अडथळे निर्माण झाल्यावर जलमार्गाचा शोध लावण्यास प्रोत्साहन देण्यात आले. भारताशी व्यापार करण्यासाठी पोर्तुगीज, डच, इंगज व फ्रेंच भारतात आले. व्यापारावरील मक्तेदारीवरून त्यांच्यात संघर्ष झाला. त्यात इतर स्पर्धकांचा पराभव करून इंग्रज विजयी झाले. औरंगजेबाच्या मृत्युनंतर निर्माण झालेली राजकीय पोकळी भारतातील कोणत्याही राजकीय सत्तेला करून काढता आली नाही. मराठे, निजाम, टिपू आणि शीख या सत्तांच्या संघर्षात इंग्रज विजयी झाले व त्यांनी आपली सत्ता स्थापन करण्यात यश मिळवले. अठराव्या शतकातील समाज एकसंघ नव्हता. धर्म, जात, भाषा व प्रदेश अशा अनेक कारणांनी तो दुभंगलेला होता. स्त्रीयांची परिस्थिती अतिशय दयनीय होती. घरात व समाजात त्यांना मानाचे स्थान नव्हते. जगात शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने घडून येत असलेल्या प्रगतीचा मागमूसही भारतात नव्हता. युरोपियन देशांनी विज्ञानात प्रगती केली तर भारतीय परंपरागत व्यवस्थेतच राहिले.

भारतात इंग्रजी सत्ता स्थापन होण्यास ईस्ट इंडिया कंपनीचे गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांचे

महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड कॉर्नवॉलिस, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज व लॉर्ड डलहौसी यांच्या कर्तबगारीमुळेच इंग्रजांना भारतात सत्ता स्थापन करता आली. भारतातील इंग्रज सत्तेची स्थापना बंगालमधील प्लासीच्या लढाईत झाली. या लढाईत विजय मिळवून कंपनीने आपल्या साम्राज्याचा पाया घातला. बक्सारच्या युद्धात विजय मिळवून कंपनीने आपला पाया पक्का केला. या युद्धामुळे कंपनीची सत्ता दृढ झाली. या दोन लढाया भारताचे भवितव्य घडविणाऱ्या ठरल्या. रॉबर्ट क्लाईव्हने बंगालमध्ये द्विदल राज्यपद्धती निर्माण करून कोणत्याही प्रकारच्या जबाबदारीशिवाय बंगाल प्रांताची सर्व सत्ता कंपनीच्या हाती केंद्रीत केली.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात हैदरअलीच्या रूपाने एक राजकीय सत्ता म्हणून म्हैसूर राज्य उदयास आले. इंग्रजांचा भारताला असणारा धोका त्याने ओळखला होता. हैदरअली व टिपू सुलतान यांनी इंग्रजांना प्रथम क्रमांकाचे शत्रू मानले व त्यांना भारतात घालवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. परंतु इंग्रजांनी भारतातील सत्ता वाढतच गेली. इंग्रज व म्हैसूर राज्य यांच्यात चार युद्धे होवून म्हैसूरवर इंग्रजांनी ताबा मिळवला. मुघल साम्राज्याच्या अवशेषांवर मराठ्यांनी आपले साम्राज्य निर्माण केले. भारतीय सत्ताधिशांमध्ये मराठे सर्वात प्रबळ होते. तिसऱ्या पानिपत युद्धामुळे मराठ्यांची शक्ती कमी झाली. माधवराव पेशव्यांच्या अकाली निधनाने मराठेशाहीचे मोठे नुकसान झाले. पेशवेपदावरून कटकारस्थाने सुरू झाली. यामुळे इंग्रजांना मराठा राज्यात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली. यातूनच मराठे व इंग्रज यांच्यात संघर्ष सुरू झाला. पहिल्या इंग्रज-मराठा युद्धात मराठ्यांसमोर इंग्रजांना माघार घ्यावी लागली. सालबाईचा तह करून त्यांनी मराठ्यांच्या राज्यात हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्विकारले. या कालावधीत त्यांनी आपल्या सत्तास्थापनेच्या मार्गातील इतर सत्ताधिशांचे अडसर दूर केले. दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धात इंग्रजांनी प्रमुख मराठा सरदार शिंदे, भोसले व होळकर यांच्याशी लढा दिला. या युद्धात त्यांनी या सत्ताधिशांचा पराभव करून त्यांची शक्ती कमी केली. तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात इंग्रजांनी मराठा संघराज्याचा प्रमुख पेशवा यांचा पराभव केला व मराठेशाही नष्ट केली. अशाप्रकारे भारतीय सत्ताधिशांचा पराभव करून भारत आपल्या वर्चस्वाखाली आणण्यात इंग्रज यशस्वी झाले.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

### ❑ अ) खालील लघुत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. इंग्रजांचे भारतात आगमन व फ्रेंचाशी संघर्ष याचे थोडक्यात वर्णन करा.

२. इंग्रज व निजाम संघर्ष स्पष्ट करा.

३. प्लासी युद्धाचे वर्णन करून त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

४. पहिल्या इंग्रज-म्हैसूर युद्धाचे वर्णन करा.

५. यशवंतराव होळकरांचे कार्य थोडक्यात स्पष्ट करा.

- **खालील दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. बंगालमध्ये कंपनीने आपल्या सत्तेची स्थापना कशी केली ते स्पष्ट करा.

२. प्लासीच्या युध्दाचे परिणाम विशद करा.

२. तिसऱ्या व चौथ्या इंग्रज-म्हैसूर युद्धाचे वर्णन करा.

३. ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेची विविध कारणे सांगा.

४. पहिल्या इंग्रज-मराठा युद्धाची चर्चा करा.

५. तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाची चर्चा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **ग्रोव्हर बी. एल., वेल्हेकर एन. के.** : एस चाँद आणि कंपनी लि; नवी दिल्ली, २०१०.

२. **वैद्य सुमन, कोठेकर शांता**, *आधुनिक भारताचा इतिहास*, खंड क्र. १, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९८.

३. **कोलारकर शं. गो.**, *आधुनिक भारत*, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९६.

४. **दीक्षित ना. सी.**, *आधुनिक भारत*, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २००४.

५. **कदम य. ना.**, *आधुनिक भारत*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१२.

६. **आठल्ये विभा**, *'धुनिक भारताचा इतिहास*, अंशुल पब्लिकेशन, नागपुर, २००६.

७. **सरदेसाई बी. एन., नलावडे व्ही. एन.**, *आधुनिक भारताचा इतिहास*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४.


❑❑❑

सत्र-३ : घटक-२

# ईस्ट इंडिया कंपनीचे वसाहतवादी धोरण

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ दुहेरी शासन व्यवस्था- लॉर्ड रॉबर्ट क्लाईव्ह

२.२.२ तैनाती फौज पद्धती- लॉर्ड रिचर्ड वेलस्ली

२.२.३ विलीनीकरण धोरण- लॉर्ड जेम्स ब्राऊन डलहौसी

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भग्रंथ सूची


## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील गोष्टींचे आकलन होण्यास मदत होईल.

१. ईस्ट इंडिया कंपनीच्या वसाहतवादी धोरणातील नीती निर्धारणामागे काय कारणे होती ते स्पष्ट होईल.

२. वसाहतवादी धोरणांच्या अंमलबजावणीच्या कार्यपद्धतीची माहिती होईल.

३. कंपनीच्या वसाहतवादी धोरणाचे मूल्यांकन करता येईल.

४. कंपनीचे वसाहतवादी धोरण कंपनीच्या हिताच्या दृष्टीने कसे बनवले याची ओळख होईल.

## २.१ प्रास्ताविक

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने बंगालमध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर प्राप्त केलेल्या प्रदेशाच्या

सुरक्षिततेसाठी आणि कंपनीच्या भारतातील मुख्य शत्रूंपासून कंपनीचा प्रदेश सुरक्षित ठेवण्यासाठी काही धोरणे आखली होती. सुरुवातीला कंपनीने प्रत्यक्षात आपल्या हातात सत्ता न ठेवता जिंकलेल्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्याचे धोरण स्विकारले. अशा नियंत्रित प्रदेशाची आघात प्रतिबंधक मध्यवर्ती राज्य (Buffer State) म्हणून निर्मिती केली, ही कंपनीची पहिली अवस्था होती. या अवस्थेत लॉर्ड रॉबर्ट क्लाईव्ह याने 'जबाबदारीशिवाय शासन व शासनाशिवाय जबाबदारी' म्हणजेच दुहेरी शासनव्यवस्थेची मुहूर्तमेढ रोवली. कंपनीच्या सत्तेचा पाया रचला गेला. कंपनीच्या या धोरणाला 'सुरक्षा घेऱ्याचे धोरण' म्हणूनही ओळखले जाते. दुसरी अवस्था देशी राज्यांना अधिन बनवण्याचे धोरण होते. कंपनीच्या सत्तेचा विस्तार करण्यासाठी देशी राज्यांना आपल्या वर्चस्वाखाली आणून ब्रिटिशांचे सार्वभौमत्व स्थापन करणे अशी या धोरणाची व्याख्या केली जाते. या धोरणाची सुरुवात लॉर्ड हेस्टींगच्या कार्यकाळात झाली असली तरी या धोरणाला पूर्णत्वास नेण्याचे काम लॉर्ड वेलस्लीच्या तैनाती फौजेमुळे झाले. लॉर्ड वेलस्लीने कंपनीच्या नियंत्रणात असलेल्या राज्यांच्या अंतर्गत कारभारात न गुंतता अशा राज्यांना आपल्या प्रभावाखाली आणण्यासाठी तैनाती फौजेची नीती अवलंबली. तिसरी अवस्था ही देशी राज्यांचे कंपनीच्या प्रदेशात विलीनीकरणाचे धोरण होते. लॉर्ड डलहौसीने आपल्या कार्यकाळात देशी राज्यांचे विविध मार्गाने ब्रिटिश साम्राज्यात विलीनीकरण केले. देशी राज्यांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट करून कंपनीची सत्ता भारतात स्थापन केली. ब्रिटिशांच्या वरील वसाहतवादी धोरणातचे विश्लेषण केले असता ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे वसाहतवादाकडून साम्राज्यवादी धोरणाकडे व व्यापारी कंपनीकडून लष्करी कंपनी म्हणून साम्राज्य निर्मिती कंपनीमध्ये रूपांतरण पहावयास मिळते. ही धोरणे खालीलप्रमाणे सविस्तरपणे स्पष्ट करता येतील.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ लॉर्ड रॉबर्ट क्लाईव्ह (१७६५–१७७२)

भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेची स्थापना करण्याचे श्रेय लॉर्ड रॉबर्ट क्लाईव्ह याला दिले जाते. बंगालमध्ये दुहेरी शासन पद्धती लागू करणारा रॉबर्ट क्लाईव्ह होता. एका सामान्य कुटुंबात २९ सप्टेंबर १७२५ रोजी इंग्लंडमधील स्टाईलचे येथे रिचर्ड व रेबेका यांच्या पोटी त्याचा जन्म झाला. लहानपणी त्याचे मन अभ्यासात रमत नव्हते तो खेळण्यात पुढे असे. इ.स. १७४२ मध्ये त्याच्या वडिलांनी वयाच्या अठराव्या वर्षी ईस्ट इंडिया कंपनीत कारकून म्हणून नौकरीस लावले. कंपनीने त्यास मद्रास येथे पाठवले. १७५१ मधील द्वितीय कर्नाटक युद्धात दाखवलेल्या साहसामुळे तो प्रसिद्ध झाला आणि कंपनीने त्यास सैन्यात कॅप्टन म्हणून बढती दिली. रॉबर्ट क्लाईव्ह याचे लग्न मार्गारेट मास्कलीन हिच्यासोबत झाले, त्यांना नऊ मुले होती.

रॉबर्ट क्लाईव्हचा कारकुन ते बंगालचा गव्हर्नर बनण्याचा प्रवास रोमांचकारी आहे. त्याने अर्काट

येथे मिळवलेल्या यशाबद्दल इंग्लंडचे पंतप्रधान पीटर थोरले यांनी 'Haven Born General' असे उद्गार काढले होते. कंपनीने रॉबर्ट क्लाईव्हला १७५६ मध्ये मद्रास प्रांताचा गव्हर्नर बनविले. ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा पाया घालणारी सन १७५७ मधील प्लासीची लढाई त्याच्या कारकिर्दीला वळण देणारी होती. भारतातील आपला प्रथम गव्हर्नर पदाचा कार्यकाळ पूर्ण करून तो सन १७६० मध्ये इंग्लंडला परत गेला.

ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी बंगालमध्ये निर्माण झालेली अस्थिरता सुधारण्यासाठी अनुभवी म्हणून क्लाईव्हला पुन्हा मे १७६५ मध्ये बंगालचा गव्हर्नर म्हणून नियुक्त केले. मात्र १७६७ मध्ये प्रकृती अस्वास्थ्यामुळे क्लाईव्ह इंग्लंडला परत गेला. कंपनीने तिथे क्लाईव्हचा 'फेलो ऑफ रॉयल सोसायटी' हा किताब देऊन सन्मान केला. इंग्लंडमध्ये त्याच्यावर बंगालमधील भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. या आरोपातून ब्रिटीश संसदेने त्याची निर्दोष मुक्तता केली. परंतु स्वत:वर लावलेल्या आरोपांमुळे त्याने दुखी अवस्थेत २२ नोव्हेंबर १७७४ रोजी वयाच्या ४९ व्या वर्षी आत्महत्या केली. रॉबर्ट क्लाईव्हच्या कार्याबद्दल बर्क म्हणतो की 'कंपनीची छोट्या छोट्या गोष्टीतून पायाभरणी करणारा कर्तुत्ववान', पर्सिवर पीअर्स त्यास 'भविष्याचा अग्रदूत' असे संबोधतो.

## अ) रॉबर्ट क्लाईव्हने सैनिक व्यवस्थित केलेले बदल -

लॉर्ड क्लाईव्हने आपल्या दुसऱ्या शासन कार्यकाळात बंगालमध्ये बोकाळलेल्या भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी व ईस्ट इंडिया कंपनीचे सैन्य व अधिकाऱ्यांवर वचक निर्माण करण्यासाठी काही बदल केले ते बदल पुढील प्रमाणे :-

### १. सैन्य व्यवस्थेत सुधारणा-

प्लासीच्या लढाईनंतर कंपनीच्या सैन्य संखेत वाढ व्हायला सुरुवात झाली होती. या सैनिकामध्ये भारतातील पराभूत झालेल्या राज्यातील सैनिकांचा भरणा होता. बक्सारच्या लढाईने नवाब मीर कासीम, अवध नवाब व दिल्लीचा बादशहा शाहआलम यांचे सैन्य कंपनीकडे वर्ग व्हायला सुरुवात झाली होती. या सैनिकात शिस्तबद्धता आणण्यासाठी क्लाईव्हने कंपनीच्या सैन्याला तीन भागात विभाजित केले. पहिल्या भागाला मुंगेर, दुसऱ्या भागाला बिकापूर आणि तिसऱ्या भागाला अलाहबाद येथे ठेवले. क्लाईव्हने सैनिकांना मिळणाऱ्या दुहेरी भत्याची समाप्ती केली. यातून कंपनीला आर्थिक फायदा झाला. सन १७६६ मध्ये या धोरणाविरुद्ध गोऱ्या सैनिकांनी विद्रोह केला. यास **'श्वेत विद्रोह'** म्हणून ओळखले जाते. क्लाईव्हने युद्धात शारीरिक विकलांग होणाऱ्या सैनिकांच्या साहयतेसाठी मिर जाफरकडून मिळालेल्या पैशातून **'क्लाईव्ह कोश'** निर्माण केला.

### २. क्लाईव्हचे प्रतिज्ञापत्र-

कंपनीचे बंगालवर नियंत्रण प्रस्थापित झाल्याने याचा फायदा कंपनीचे अधिकारी व नोकरांनी

मोठ्याा प्रमाणात घेण्यास सुरूवात केली. परिणामी बंगालमध्ये भ्रष्टाचाराला सुरुवात झाली. कंपनीला यामुळे तोटा सहन करावा लागत होता. या परिस्थितीवर मात करण्यासाठी क्लाईव्हने एक कायदा केला. ज्यामुळे कंपनीच्या संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना एक प्रतिज्ञापत्र देण्याची सक्ती करण्यात आली. या प्रतिज्ञापत्रात त्यांना असे प्रतिपादित करावे लागत असे की, भारतात काम करीत असताना भारतीयांकडून कोणत्याही प्रकारचे उपहार, देणगी किंवा भेटवस्तू स्वीकारणार नाही.

### ३. कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिगत व्यापारावर निर्बंध–

क्लाईव्हने कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या वाढत्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिगत व्यापारावर बंदी आणली. यासाठी क्लाईव्हने कोणताही कंपनीचा कर्मचारी खासगी व्यापार करणार नाही असा निर्बंध घातला. या निर्बंधामुळे कंपनीच्या कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती बिघडू लागली. कंपनीचे कर्मचारी कंपनी सोडून जावू नये यासाठी क्लाईव्हने या कर्मचाऱ्यांच्या पगारात भरगोस वाढ केली.

## ब) लॉर्ड क्लाईव्हचे बंगाल प्रांतात दुहेरी शासन व्यवस्था लागू करण्यामागील उद्दिष्टे :–

१. प्राप्त केलेल्या सत्तेचे दृढीकरण करणे.

२. कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराला आळा घालणे.

३. कंपनीच्या व्यापाराला चालना देणे.

४. बंगालच्या नवाबांकडे बंगालची नामधारी सत्ता देऊन बंगालच्या सत्तेवर नियंत्रण ठेवणे.

५. भारतीयांच्या माध्यमातून दिवाणी व निजामतीचे कार्य करून घेणे.

## क) दुहेरी शासन व्यवस्था :–

### ❑ 'जबाबदारी शिवाय सत्ता व सत्तेशिवाय जबाबदारी'–

लॉर्ड क्लाईव्ह १७६० मध्ये इंग्लंडला परत गेला. क्लाईव्हनंतर बंगालमध्ये कंपनीचा अधिकारी वर्ग व नोकरांचा खाजगी व्यापार मोठ्या प्रमाणात वाढू लागला. कंपनीच्या व्यापारावर याचा विपरीत परिणाम होवू लागला होता. कंपनीचे व्यापारी करमुक्त व्यापाराने समाधानी नव्हते. तर ते बाजारात स्वस्त कच्चामाल मिळावा यासाठी सामान्य जनतेवर अत्याचार करीत होते. कंपनीची आर्थिक स्थिती डबघाईस आली होती. सततच्या युद्धांमुळे कंपनीच्या खर्चात वाढ झालेली होती. कंपनीवर ६० लाख पौंड कर्ज झाले होते. ही स्थिती अशीच राहिली तर बंगाल प्रांतासारखी हक्काची वसाहत कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या

खाजगी व्यापारामुळे व त्यांच्या जनतेवरील अत्याचारामुळे गमवावी लागू शकत होती. कंपनीला कोणत्याही परिस्थितीत बंगाल प्रांत गमवायचा नव्हता. अशातच बंगालचा नवाब मीर कासीमच्या बंडखोरीमुळे कंपनीला १७६४ मध्ये बक्सारच्या लढाईला सामोरे जावे लागले. परंतु ही लढाई कंपनीसाठी लाभदायक व भविष्यकाळासाठी महत्त्वपूर्ण ठेरली. बक्सारच्या लढाईत मीर कासिमने दिल्लीचा बादशहा शहाआलम द्वितीय व अवधचा नवाब शुजाउद्दौला यांच्याशी युती करून कंपनीला बंगालमध्ये आव्हान उभे केले होते. परंतु बक्सारच्या लढाईत कंपनीने या त्रयींचा पराभव केला. दिल्लीचा बादशहा आपण होऊन कंपनीचा शरणार्थी बनला.

सर्व परस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी व कंपनीची सत्ता मजबूत करण्यासाठी मे १७६५ मध्ये बंगालचा गव्हर्नर व्हिन्सी स्टार्टच्या जागेवर कंपनीने दुसऱ्यांदा बंगालचा गव्हर्नर म्हणून लॉर्ड रॉबर्ट क्लाईव्हची नेमणूक केली. लॉर्ड क्लाईव्ह बंगालमध्ये आला तेव्हा बक्सारची लढाई झाली होती. क्लाईव्हला बक्सारच्या लढाईत पराभूत शासकांशी कोणता व्यवहार करावा व कशा प्रकारचे संबंध ठेवावे हे ठरवायचे होते. लॉर्ड क्लाईव्हने १७६५ मध्ये मुघल बादशहा शहाआलम द्वितीय व अवधचा नवाब शुजाउद्दौला यांच्यासोबत अलाहबादचा तह केला. हा तह म्हणजे कंपनीच्या वसाहतवादी धोरणाचा पहिला टप्पा होता. सर विल्यम ली वार्नर या धोरणाला सुरक्षा घेऱ्याचे धोरण (Ring Fence Policy) म्हणून संबोधतो. या धोरणाच्या अंतर्गत कंपनीला प्राप्त झालेला प्रदेश तत्कालीन भारतातील कंपनीचे मुख्य शत्रू उदा. मराठे-शिंदे, भोसले, होळकर यांच्या आक्रमणापासून वाचवण्यासाठी कंपनीच्या अंतर्गत आलेल्या प्रदेशावर सत्ता प्रस्थापित न करता शेजारील प्रदेशांना आपल्या वर्चस्वाखाली ठेवून त्यांना आघात प्रतिबंधक मध्यवर्ती राज्य (Buffer State) म्हणून निर्मिती केली.

कंपनीने पराभूत राज्यासोबत मैत्री तह केला. त्यांना त्यांच्या शत्रूविरुद्ध मदतीचे आश्वासन दिले. या मोबदल्यात कंपनीला अशा अधिनस्त राज्यांकडून संपत्ती आणि व्यापारी सवलती प्राप्त झाल्या. अशा प्रकारे कंपनीने आपल्या मित्र राज्यांवर राजकीय नियंत्रण प्रस्थापित करून त्यांच्या सार्वभौमत्वावर नियंत्रण प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला. कंपनीच्या वसाहतवादी धोरणाची पुढचा भाग म्हणजे क्लाईव्हने मुगल बादशहा शहाआलम दुसरा यांच्यासोबत केलेला अलाहबादचा तह होय. या तहाने कंपनीच्या सत्तेला बळकटी देण्याचे काम केले. अलाहबादचा तह बंगालच्या इतिहासातील एक युगांतकारी घटना होती. कारण या तहाने अनेक प्रशासकीय व राजकीय परिवर्तनाला जन्म दिले. याच बदलांनी भारतात ब्रिटिश साम्राज्य विस्ताराची आधारभूमी तयार केली. या सुरक्षा घेऱ्याच्या धोरणात लॉर्ड क्लाईव्हच्या दुहेरी शासन व्यवस्थेच्या धोरणाची मुळे दिसून येतात.

## ड) बंगाल प्रांतात दुहेरी शासन व्यवस्था लागू करण्याची कारणे-

१. जेम्स मिल बंगालमधील तत्कालीन परिस्थितीबद्दल म्हणतो की १७५७ ते १७६४ या काळात

कंपनीच्या अधिकाऱ्यांनी बंगालमधून फक्त उपहार स्वरूपात लाखो स्टर्लिंग पौंड प्राप्त केले होते. व्यापार वेगळाच राहिला. कंपनीचे कर्मचारी बंगालमधील भ्रष्टाचाराने गर्भश्रीमंत बनले होते. त्यांना इंग्लंडमध्ये 'हिंदी नवाब' या नावाने ओळखले जात. भारतातून ब्रिटनमध्ये गेल्यानंतर आपल्या संपत्तीने ब्रिटीश संसदेवर प्रभाव टाकून प्रशासनात हस्तक्षेप करत असत. त्यामुळे ब्रिटिश समाजात यांच्याबद्दल ईर्ष्या उत्पन्न व्हायला लागली होती. त्यामुळे ब्रिटीश राजाने कंपनीचे अधिग्रहण करावे अशी मागणी जोर धरू लागली होती.

२. कंपनीच्या भारतातील सततच्या युद्धांमुळे कंपनीच्या खर्चात वाढ झाली होती. कंपनीवर जवळपास ६० लाख पौंडचे कर्ज झाले होते. कंपनीच्या संचालकांना दरवर्षी त्यांच्या गुंतवणूकीवर ६ टक्के ते १२ टक्के लाभांश द्यावा लागत होता. कंपनीच्या अधिकारी वर्गाने कंपनीला मिळालेल्या करमुक्त व्यापारी परवान्याचा (दस्तक) उपयोग व्यक्तिगत व्यापारासाठी केल्याने कंपनीच्या व्यापारी महसूलात घट निर्माण झाली होती. वरील कारणांमुळे कंपनीची आर्थिक परिस्थिती ढासळायला लागली होती.

३. फ्रेंच अधिकारी डुप्लेने भारतीय राज्यात हस्तक्षेप करण्यास सुरवात केली होती. भारतीय राजांना आपल्या प्रभावाखाली आणायचे व त्या प्रभावाचा उपयोग आपल्या आर्थिक वृद्धीसाठी करायचा असे धोरण डूप्लेनी आखले होते. याच धोरणाचा उपयोग पुढे चालून ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय राज्यांसोबत केला.

४. बक्सारच्या विजयाने कंपनी बंगाल प्रांताची वास्तविक शासक बनली. पण प्रत्यक्षात कंपनीकडे प्रशासन चालविणारे व महसूल गोळा करण्यासाठी लागणारे प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी नव्हते. त्यामुळे कंपनीने अत्यंत सोयीस्कर व लाभदायक ठरेल अशी दुहेरी शासन पद्धती बंगाल प्रांतात लागू केली.

५. बंगाल प्रांत हा कंपनीच्या नियंत्रणाखाली आला असला तरी या प्रांतावर प्रत्यक्षपणे कंपनीचे राज्य आणणे समकालिन परिस्थितीत शक्य नव्हते. कारण जर बंगालच्या नवाबाची सत्ता घालवून ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित केली तर भारतातील देशी सत्ता व अन्य युरोपियन कंपन्या ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध एकत्र आल्या असत्या. या सर्वांनी एकत्र येवून कंपनीची सत्ता बंगालमधून उखडून टाकली असती. म्हणूनच क्लाईव्हने बंगालमध्ये निजामउद्दौला यास कटपुतली नवाब म्हणून प्रशासन पाहण्याचे काम दिले. कंपनीने सर्व सत्ता आपल्या हाती ठेवली. अशी दुहेरी राज्यव्यवस्था बंगालमध्ये अंमलात आणली.

वरील कारणांमुळे व तत्कालीन परस्थितीमुळे लॉर्ड क्लाईव्हने बंगाल प्रांतात दुहेरी शासन व्यवस्था लागू केली.

## इ) बंगालच्या नवाबाशी तह (२० फेब्रुवारी १७६५)

बंगालचा नवाब मीर जाफर फेब्रुवारी १७६४ मध्ये मरण पावला. ग. ज. विन्सी स्टार्ट याने नवाबाचा अल्पवयीन वारस निजमुद्दौला याला गादीवर बसवले. कंपनीने नवाब अल्पवयीन असल्याचा फायदा घेऊन नवाबाच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारली. आता बंगालची संपूर्ण सत्ता प्राप्तीची संधी कंपनीला चालून आली होती. परंतु या संधीला आवर घालून कंपनीने २० फेब्रुवारी १७६५ मध्ये निजमुद्दौला सोबत एक तह केला त्यातील तरतुदी खालीलप्रमाणे होत्या –

१. कंपनीने निजमुद्दौला नवाब बनविल्याबद्दल १५ लाख रुपये द्यावेत.

२. नवाबाने आपल्या अंतर्गत सुरक्षिततेसाठी आवश्यक असणारे सैन्य ठेवावे.

३. नवाबाने आपले अतिरिक्त सैन्य विसर्जित करावे.

४. बंगाल प्रांताचे प्रशासन कंपनीने नेमून दिलेल्या नायब दिवाणामार्फत चालवावे.

५. कंपनीच्या पूर्व परवानगीशिवाय नायब दिवाणांना त्यांना पदावरून काढून टाकता येणार नाही.

६. बंगाल प्रांताच्या संरक्षणाची जबाबदारी कंपनीची राहील.

### ❑ तहाचे महत्व :-

कंपनी या तहाने बंगालची वास्तविक प्रशासक बनली. बंगालच्या नवाबाच्या कामात हातभार लावण्यासाठी कंपनीनें नायब दिवानाची नियुक्ती केली. न्यायिक व पोलीस अधिकार कंपनीच्या हाती आले असले तरी ते अधिकार आपल्या हाती घेण्यास कंपनी तयार नव्हती. नवाब निजामउद्दौला याने आपले सर्व प्रशासनिक, सैनिक अधिकार कंपनीस बहाल केले. बंगालचा नवाब हा कंपनीच्या हातातील बाहुला बनला. बंगालचा वास्तविक शासक हा नवाब आहे हेच कंपनीला भासवायचे होते. पण वास्तविक नियंत्रण कंपनीच्या हाती ठेवायचे होते. अशा प्रकारे स्वत:च्या हाती बंगालच्या प्रशासनाचे अधिकार केंद्रित करून कंपनी बंगालची वास्तविक शासक बनली होती.

## ई) अलाहबादचा तह (१६ ऑगस्ट १७६५)

### १. अवध :-

बक्सारच्या लढाईतील पराभवामुळे अवधच्या नवाबाचे भवितव्य पूर्णपणे कंपनीच्या म्हणजेच लॉर्ड क्लाईव्हच्या मर्जीवर अवलंबून होते. बंगाल प्रांतासारखेच अवध राज्य कंपनीच्या अधिपत्याखाली

घ्यावे असे कंपनीच्या अधिकाऱ्यांना वाटत होते. कारण बंगालप्रमाणेच या अधिकाऱ्यांना आपला खाजगी व्यापार अवध प्रांतात सुरू करून या प्रांताला लुटण्याची संधी हवी होती. लॉर्ड क्लाईव्ह अत्यंत दूरदृष्टीचा होता. संपूर्ण अवधप्रांत आपल्या ताब्यात त्यांना घ्यायचा नव्हता. कारण हा प्रांत त्याब्यात घेतला तर या प्रांताच्या सीमा संरक्षणाची जबाबदारी कंपनीवर येईल. कंपनीला हे आर्थिक दृष्टीने परवडण्यासारखे नव्हते. कंपनीचा प्रदेश मराठ्यांच्या आक्रमणाला उघडा पडेल त्यासाठी कंपनी पूर्णपणे तयार नव्हती. लॉर्ड क्लाईव्हने अवधच्या नावाबाला कंपनीच्या वर्चस्वाखाली आणून अवधप्रांत बंगाल व मराठे यांच्यातील आघात प्रतिबंधक राज्य म्हणून निर्माण केले. यावेळी लॉर्ड क्लाईव्हने अवधच्या नावाबास असे भासविले की, ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी कंपनी असून तिचे शत्रुत्व व प्रभाव तात्पुरता आहे. परंतु अवधचे खरे शत्रू मराठे आहे. या भीतीपोटी अवधच्या नवाबाने लॉर्ड क्लाईव्ह सोबत तह केला. हा तह अवधसाठी पुढे घातक ठरला. तहातील कलम पुढीलप्रमाणे :-

१. अवध राज्यातील अलाहबाद व कोरा/कडा हे जिल्हे नवाबाने कंपनीस द्यावेत.

२. बक्सारच्या युद्धाची नुकसान भरपाई म्हणून नवाबाने ५० लाख रुपये कंपनीस द्यावी.

३. नवाबाने चुणारगडचा किल्ला कंपनीच्या स्वाधीन करावा.

४. नवाबाने काशीचा शासक बलवंत सिंह याला त्याचा प्रदेश परत करावा.

५. अवध राज्याचे बाह्य शत्रूपासून कंपनी संरक्षण करेल. या संरक्षणाच्या खर्चाची जबाबदारी नवाबाने घ्यावी.

६. अवधची राजधानी लखनऊ येथे इंग्रजी रेसिडेंट राहील.

७. नवाबाने कंपनीच्या शत्रूंना किंवा इंग्रज व्यतिरिक्त अन्य युरोपियनांना आश्रय देवू नये.

८. कंपनीला अवध प्रांतात करमुक्त व्यापाराची परवानगी द्यावी.

### ❑ तहाचे महत्व :-

कंपनीला या तहाने अवधमधील अमर्यादित आर्थिक संसाधनाची प्राप्ती झाली. लॉर्ड क्लाईव्हच्या दूरदर्शितेमुळे कंपनीला एक विश्वासू मित्र मिळाला. अवधचा नवाब हा कंपनीचा मांडलिक बनला. या तहाने अवध प्रांतावर भविष्यात होणाऱ्या मराठ्यांच्या आक्रमणाच्या कटकटीतून अवधचा नवाब मुक्त झाला. अवधच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्रजांवर आली. या तहातून इंग्रजांच्या तैनाती फौजेचे मूळ दिसून येते.

## ❑ मुगल बादशहा शहाआलम दुसरा आणि कंपनी यांतील अलहाबादचा तह :-

बक्सारच्या युद्धातील पराभवानंतर बादशहा शहाआलम दुसरा कंपनीच्या संरक्षणाखाली आला होता. वास्तविक बादशहा स्वत: अधिकारहीन होता. यापूर्वी तो आपले अस्तित्व टिकवण्यासाठी भटकत होता. बादशहाला अशी आशा होती कि आपण कंपनीच्या मदतीने दिल्लीच्या गादीवर परत विराजमान होऊ या आशेवर बादशहाने लॉर्ड क्लाईव्हसोबत ऑगस्ट १७६५ मध्ये अलाहबादचा तह केला. या तहात खालील कलमांचा समावेश होतो.

१. अवधच्या नावाबाकडून कंपनीला मिळालेले अलाहबाद व कोरा/कडा हे जिल्हे मुघल बादशहाला देईल.

२. कंपनी मुघल बादशहाला २६ लक्ष रुपये वार्षिक पेन्शन देईल.

३. मुघल बादशहा कंपनीला बंगाल प्रांताचे दिवानी वसुलीचे अधिकार देईल.

४. मुघल बादशहास निजमातीचा खर्च म्हणून कंपनी ५० लक्ष रुपये देईल.

## ❑ तहाचे महत्व :-

हिंदुस्थानचा मुघल बादशहा शहाआलम दुसरा असल्याने त्याचेकडून दिवाणीचे अधिकार प्राप्त करून कंपनीने बंगाल प्रांतातून कायदेशीररित्या महसूल वसुलीचे अधिकार प्राप्त केले. कंपनीला दिल्लीवर वर्चस्व प्रस्थापित करण्याची कोणतीही इच्छा नव्हती व ती परिस्थितीही नव्हती. म्हणून क्लाईव्हने अवधाचे राज्य मध्यस्थ म्हणून व दिल्लीच्या बादशहाला कंपनीचे संरक्षण देऊन कंपनीने दिल्लीच्या बादशहास कंपनीच्या हातातील बाहुले (Rubber Stamp) बनविले. दिवाणीचा अधिकार बंगालमध्ये अमलात आणण्यात कंपनीला कोणताही अडसर नव्हता. कंपनीचा विरोध करण्याएवढी शक्ती किंवा सामर्थ्य बादशहामध्ये नव्हते.

# फ) दुहेरी शासन पद्धती/द्विदल राज्यव्यवस्था (The dual settlement in Bengal)

ईस्ट इंडिया कंपनी १७६५ मध्ये बंगाल प्रांताची वास्तविक शासक-मालक झाली. अलाहबादच्या तहातील तरतुदीतील दिवाणी अधिकार व निजामती अधिकार यांच्या विभाजनातून दुहेरी शासन प्रणालीचा जन्म झाला. असे असले तरी वास्तविक संपूर्ण निजामती व दिवाणी अधिकार कंपनीच्या हाती केंद्रित होते. कंपनीसमोर आता खरी समस्या ही होती की निजामत व दिवाणीचे कार्य वाहन कसे करायचे. कंपनीच्या वसाहतवादी धोरणाचे खरे रूप जर जगासमोर आले तर देशी राजे कंपनीच्या विरुद्ध एकत्र येतील. कंपनीला हे नको होते. लॉर्ड क्लाईव्हने तत्कालीन परस्थितीत अत्यंत सोयीस्कर व लाभदायक ठरेल असे दुहेरी शासन बंगाल प्रांतात लागू केले.

## (१) निजामती व दिवाणी अधिकाराचे स्वरूप :-

मुघल प्रशासन व्यवस्थेत सुभा या विभागाच्या प्रशासनाची जबाबदारी दोन प्रमुख अधिकार्यावर होती. एक म्हणजे सुभेदार आणि दुसरा दिवाण. सुभेदाराकडे सुभ्यातील लष्करी व फौजदारी स्वरूपाची कामे पाहण्याची जबाबदारी होती. त्यास 'निजामती अधिकार' असे म्हणत. 'दिवाणी अधिकारचे' कार्य हे कर व्यवस्था व तत्संबंधी कायद्याची अंमलबजावणी करण्याचे होते. हे दोन्ही अधिकारी परस्परांच्या कामावर नियंत्रण ठेवत असत. थोडक्यात निजामती अधिकार म्हणजे लष्करी फौजदारी व न्याय निवाड्याचे अधिकार होय. तर दिवाणी अधिकार म्हणजे कर, सारा वसुलीचा अधिकार होय.

## (२) दुहेरी शासन पद्धतीची कार्यवाही :-

मुघल बादशहा शहाआलम दुसरा याने १७६५ च्या अलाहबादच्या तहाने एक फर्मान काढून कंपनीला बंगालमध्ये दिवाणी हक्क बहाल केले. बंगालच्या नवाबाचा मृत्यूनंतर नवीन अल्पवयीन नवाब निजामउद्दोला याच्या संरक्षणाच्या मोबदल्यात बंगालचे निजामती अधिकार कंपनीकडे आले होते. कंपनीने नवाबाच्या कामाची विभागणी करण्यासाठी नायब दिवाणांची नियुक्ती केली. बंगाल प्रांतासाठी मोहम्मद रजाखां आणि बिहार प्रांतासाठी राजा सीताबराय यांची नियुक्ती केली. या मोबदल्यात कंपनी नावाबास ५३ लाख रुपये वार्षिक देईल असे ठरविण्यात आले होते.

अशा प्रकारे संपूर्ण दिवाणी व निजामातीचे कार्यवहन भारतीयांच्या माध्यमातून केल्या जाऊ लागले, परंतु अधिकार मात्र कंपनीच्या हाती केंद्रित होते. कायदेशीररीत्या बंगालचा शासक जरी नवाब असला तरी वास्तविक सत्ता कंपनीकडे होती. याच पद्धतीला दुहेरी शासन व्यवस्था म्हटले जाते. थोडक्यात बंगालमध्ये नवाब व कंपनी यांच्यातील सत्तेच्या विभाजनास दुहेरी शासन पद्धती असे संबोधल्या गेले. कंपनीने बंगाल प्रांताच्या राज्यकारभाराची व सुव्यवस्थेची जबाबदारी नवाबाकडे ठेवली. कंपनीने व्यापार, सैन्य, परराष्ट्र व्यवहार आणि खजिना असे महत्वपूर्ण कार्य स्वत:कडे ठेवले. बंगाल प्रांताचा एकूण महसूल कंपनीच्या हाती जमा होत होता. बंगालच्या संरक्षणाची जबाबदारी कंपनीकडे होती. कंपनीने नावाबावर नायब दिवाणाच्या माध्यमातून नियंत्रण प्रस्थापित केले होते. परंतु नवाबाकडे प्रशासन, शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी लागणारे आर्थिक बळ नवाबाकडे उरले नव्हते.

## (३) दुहेरी शासन पद्धतीचे परिणाम :-

दुहेरी शासन व्यवस्थेतील दीर्घकालीन दुष्परिणाम दिसून आल्याने गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जने बंगालमधील दुहेरी शासन व्यवस्था १७७२ मध्ये बंद केली. बंगाल प्रांताचे सर्व प्रशासनिक व महसूली अधिकार कंपनीने आपल्या ताब्यात घेतले. दुहेरी शासन व्यवस्थेचे परिणाम खालीलप्रमाणे दिसून येतात.

## १. बंगाली जनतेची पिळवणूक :–

दुहेरी शासन व्यवस्थेच्या अंतर्गत बंगालमधील जनतेच्या पिळवणुकीला पारावार उरला नव्हता. ग्रामीण क्षेत्रात लुटमार सुरू झाली होती. जनतेच्या हिताकडे किंवा कल्याणाकडे कोणत्याही सत्ताधीशांचे लक्ष नव्हते. त्याचा फायदा घेऊन कंपनीचे व नवाबाचे अधिकारी संधी मिळाली की जनतेची पिळवणूक करून आपला फायदा करून घेत होते. कंपनीद्वारा जनतेच्या शोषणाला सीमाच राहिली नव्हती. बंगालमध्ये प्रशासन आहे किंवा नाही अशी अवस्था होती.

## २. सत्तेचा दुरुपयोग :–

कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या हाती अमर्याद सत्ता आल्याने त्यांनी या सत्तेचा दुरुपयोग करायला सुरुवात केली. कर्मचाऱ्यांनी स्वत:चा खाजगी व्यापार चालवण्यासाठी सर्व व्यापारी प्रतिस्पर्ध्यांना व्यापारी क्षेत्रातून हाकलून लावले. जकात व अन्य कर देत नसत. कंपनीच्या अधिकाऱ्यांना मिळालेले व्यापारी परवाने राजरोसपणे विकत. कंपनीचे अधिकारी आपला खाजगी माल गावकऱ्यांनी जास्तीत महाग विकत घ्यावा व गावकऱ्यांनी त्याचा माल कंपनीच्या अधिकाऱ्यांना नामधारी किमतीला विकावा यासाठी अनेक प्रकारे जुलूम अत्याचार करत असत. यामुळे भारतीय व्यापारी हद्दपार झालेत व कंपनीच्या अधिकाऱ्यांचा व्यापारावर एकाधिकार प्रस्थापित झाला.

## ३. बंगाल झाला कंगाल :–

बंगाल हा भारतातील सर्वात सदन व सुपिक प्रांत होता. बंगालला धान्याचे कोठार म्हणून ओळखले जात होते. बंगालमधून कराची वसुली फार मोठ्याा प्रमाणात होत होती. कर वसुली करण्याचा अधिकार वसुलीची बोली जास्त लावत त्याच्याकडे असायचा. या कर वसूल करणाऱ्या ठेकेदारांना शेतीत काहीच रुची नव्हती. शेतकऱ्यांपासून अधिक प्रमाणात कर वसुलने हे त्यांचे अंतिम ध्येय असायचे. कर देण्यासाठी शेतकऱ्यांना आपले गुरेढोरे व परिवारातील सदस्य सुद्धा विकावे लागत. बंगालच्या प्रजेने असा जुलूम व अत्याचार यापूर्वी अनुभवला नव्हता.

## ४. कुटीर व लघुउद्योग यांचा ऱ्हास :–

बंगालमध्ये गावागावात शेतीवर अवलंबून असलेले अनेक कुटीर व लघुउद्योग चालत होते. दुष्काळ व शेतीवर वाढलेला कर यामुळे ते बंद झाले. बंगालमधील जगप्रसिद्ध कापड उद्योगाची हानी झाली. बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात चालत असलेला रेशमी कापडाचा उद्योग कंपनीच्या संचालकांच्या आदेशाने बंद पाडण्यात आला. त्यामुळे कुटीर व लघु उद्योगावर अवलंबून असलेले अनेक कुटुंब देशोधडीला लागले.

## ५. दुष्काळ :-

बंगाल प्रांतातील १७७० च्या भयंकर दुष्काळाने बंगालची एक तृतीयांश प्रजा प्रभावित झाली. बंगाल प्रांतातील बिहार प्रदेशात दुष्काळाचा जास्त प्रभाव होता. सर डब्ल्यू. हंटर यांनी या दुष्काळाची भयानकता स्पष्ट केली ती अशी- 'शेतकऱ्यांनी आपली गुरे-ढोरे विकली, शेतीची अवजारे विकली, बियाण्यासाठी ठेवलेले धान्य खाऊन टाकले, आपली मुले-मुली विकायला काढली पण कोणी घ्यायला फिरकलेच नाही. झाडाची पाने व जंगलातील गवत पस्त केले. जिवंत प्राणी मृत शरीरांनी आपले पोट भरत होते. ताप व देवीच्या साथींनी त्यांच्या संकटावर भर टाकली. मुर्शिदाबादच्या गल्या मृतकांच्या व मरणासन्न लोकांच्या ढिगा-यांनी भरून गेल्या होत्या. पण कंपनीचे कर्मचारी व अधिकारी कोणतेही सहकार्य करीत नव्हते. याउलट ते आपल्या जवळील वस्तू महाग किमतीत विकून परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेत होते.'

## ६. ब्रिटिश सत्तेचे कंपनीवर नियंत्रण :-

दुहेरी शासन व्यवस्थेतील कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या खाजगी व्यापारामुळे कंपनीचा व्यापार ठप्प झाला. कंपनीचा दिवाळखोरीपणा आणि दुहेरी शासन व्यवस्थेच्या दुष्परिणामांमुळे कंपनीने ब्रिटिश सरकारकडे १४ लाख पौंड कर्ज मागितले. याचा फायदा घेऊन ब्रिटिश पार्लमेंटने कंपनीवर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या हेतूने नियामक कायदा (१७७३) मंजूर केला. कंपनीने बंगाल प्रांतात लागू केलेली ही राजकीय क्रांती बंगाली जनतेच्या दृष्टीने अत्यंत अनर्थकारी ठरली. भ्रष्टाचार, दडपशाही, जुलूम, जबरदस्ती, जनतेची अभूतपूर्व पिळवणूक या सर्व गोष्टींना जबाबदार लॉर्ड क्लाईव्ह होता. त्यांने सुरू केलेली दुहेरी शासन व्यवस्था अत्यंत प्रभावहीन व अव्यावहारिक होती. त्यातूनच बंगालमध्ये अराजकता व गोंधळ निर्माण झाला होता.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ❊

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. लॉर्ड राबर्ट क्लाईव्ह प्रथमता कंपनीत .................. या पदावर रुजू झाला होता.

*अ) गव्हर्नर ब) संचालक क) अधिकारी ड) कारकून.*

२. भारतातील इंग्रजी सत्तेचा पाया .................... या प्रांत्तात प्रथम घातल्या गेला.

*अ) बंगाल ब) मैसूर क) हैद्राबाद ड) ग्वाल्हेर.*

३. बंगालमध्ये ......................... याने दुहेरी राज्यव्यवस्था सुरु केली.

*अ) वारेन हेस्टिंग्ज ब) राबर्ट क्लाईव्ह क) वेलस्ली ड) डलहौसी.*

४. अलाहबादचा तह .................... याच्यासोबत करण्यात आला होता.

*अ) हैद्राबादचा निजाम व अर्काटचा नवाब* *ब) शिंदे व होळकर*

*क) दिल्लीचा बादशाह व अवधचा नवाब* *ड) टिपू व मराठे.*

५. दुहेरी शासन व्यवस्था ............... साली बंद करण्यात आली.

*अ) १७६९* *ब) १७७०* *क) १७७१* *ड) १७७२.*

## २.२.२ लॉर्ड रिचर्ड वेलस्ली- तैनाती फौज

लॉर्ड वेलस्लीने तत्कालीन भारतीय राजकीय परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेऊन ईस्ट इंडिया कंपनीला भारतातील सर्वश्रेष्ठ शक्ती बनविले. यासाठी लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौजेच्या धोरणाचा अवलंब केला. लॉर्ड वेलस्लीची इतिहास प्रसिद्ध तैनाती फौज योजना म्हणजे आधुनिक भारताच्या इतिहासातील एक मैलाचा दगड मानली जाते. लॉर्ड कार्नवालिस व जॉन शोअरने चालविलेल्या शांततेच्या धोरणाचा त्याग करून लॉर्ड वेलस्लीने सरळ सरळ युद्धनीतीचा वापर केला. या त्यांच्या कर्तृत्वामुळे भारतावरील नेपोलियनच्या आक्रमणाचा धोका टळला. लॉर्ड वेलस्लीची कारकीर्द म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या विस्तारांचा कालखंड मानला जातो.

### १) लॉर्ड वेलस्लीचे पूर्वचरित्र-

लॉर्ड वेलस्लीचा जन्म २० जून १७६० रोजी आयर्लंडमधील एका उमराव घराण्यात झाला. पुढे तो इंग्लंडच्या पार्लमेंटचा सदस्य बनला. या काळात त्याने अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. इंग्लंडचा पंतप्रधान विल्यम पीठ आणि ईस्ट इंडिया कंपनीचे संचालक व अध्यक्ष यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. यासंबंधातूनच ईस्ट इंडिया कंपनीच्या नियंत्रण मंडळाचा सदस्य बनला. भारतातील राजकीय परिस्थितीची त्याला चांगली माहिती होती. तो साम्राज्यवादी विचारधारेचा होता. पूर्वेकडील देशांमध्ये त्याला भव्य साम्राज्य निर्मिती दिसत होती. इंग्लंडमध्ये करण्यासारखे आव्हानात्मक काम उरले नाही असे त्याचे मत होते. मात्र भारत त्याच्या दृष्टीने विस्तृत आव्हानात्मक क्षेत्र होते. या महत्वाकांक्षेमुळे त्यांची सन १७९८ मध्ये भारताचा गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. सन १७९८ ते १८०५ या काळात तो गव्हर्नर होता. सात वर्षाच्या काळात त्याने भारतात कंपनीचा फार मोठा साम्राज्य विस्तार केला. वयाच्या ८० व्या वर्षी २६ सप्टेंबर १८४२ रोजी त्यांचा लंडन येथे मृत्यू झाला.

### २) लॉर्ड वेलस्लीचे भारतातील उद्दीष्टे-

१. भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन कंपनीचा साम्राज्यविस्तार करणे.

२. भारतीय राजांचे कंपनीवरील परावलंबित्व वाढविणे.

३. सर जॉन शोअरच्या शांतता व तटस्थतेच्या धोरणाचा त्याग करून आक्रमक धोरण अवलंबिणे.

४. नेपोलियनच्या आक्रमणापासून कंपनीचा प्रदेश सुरक्षित करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे.

वरील उद्दिष्टे समोर ठेवून लॉर्ड वेलस्लीचे भारतात आगमन झाले.

## ३) वेलस्लीच्या आगमनाच्या वेळची भारतातील राजकीय परिस्थिती–

लॉर्ड वेलस्लीपूर्वीच्या गव्हर्नर जनरलनी अवलंबिलेले शांतता व तटस्थतेच्या धोरणामुळे कंपनीला राजकीय हानी झाली होती. लॉर्ड वेलस्लीच्या दृष्टीकोनातून त्यांच्या पूर्वीचे धोरण व्यावहारिक नव्हते. या धोरणामुळे खालील परिस्थिती निर्माण झाली होती.

१. भारतात अनेक स्वतंत्र राज्य होते उदा. मराठे, निजाम, टिपु सुलतान इत्यादी, यांचे आपापसात संघर्ष चालू होते. मराठे सर्वात प्रबळ सत्ता होती. या सत्ताधीशांनी फ्रेंचांच्या मदतीने कवायती फौज तयार करून आपल्या सामर्थ्यात वाढ करण्यास सुरवात केली होती. यातून फेंचांचा प्रभाव भारतीय राजांवर वाढला होता.

२. मराठ्यांनी निजामाचा खर्ड्याच्या लढाईत पराभव केला होता. या पराभवाचा बदला घेण्यासाठी निजाम धडपड होता. यासाठी इंग्रजांना दूर करुन फ्रेंचांच्या मदतीने आपले लष्कर प्रशिक्षित करण्यासाठी फ्रेंच अधिकारी रेमंडच्या मार्गदर्शनाखाली १४ हजाराची अद्यावत फौजची तयारी सुरू केली होती.

३. श्रीरंगपट्टणच्या तहाने टिपू सुलतानला आपले अर्धे राज्य व दोन मुले कंपनीकडे ओलीस ठेवावे लागल्याने तो इंग्रजांवर प्रचंड चिडून होता. इंग्रजांचाबदला घेण्यासाठी त्याने फ्रेंचांशी संबंध प्रस्थापित केले होते. टिपूने आपले सैन्य फ्रेंचांच्या मदतीने प्रशिक्षित व सुसज्ज करण्यास सुरुवात केली होती.

४. मराठ्याकडे बराच मोठा विपूल साधन सामग्री असलेला प्रदेश होता. परंतु सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवाईत अंत:स्थ कलह, अराजक व गोंधळ सुरू झाला होता. यातून काळाची पावले ओळखून मराठा सरदार म्हादजी शिंदे यांनी द बाइन (डिबॉय) या फ्रेंच अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली लष्कराचे प्रशिक्षण सुरू केले होते.

५. इंग्लंडमधील उद्योगपती व व्यापारी यांना संपूर्ण भारतात फार मोठी व खात्रीची बाजारपेठ हवी होती. कंपनीच्या संचालकांना भारतात प्रादेशिक विस्तार हवा होता.

६. युरोपात याच काळात इंग्लंड व फ्रान्स यांच्यातील शत्रुत्व शिगेला पोहचले होते. युरोपातील फ्रेंच राज्यक्रांतीने ब्रिटिश साम्राज्यवादाच्या धोरणाला आळा बसला होता. नेपोलियन बोनापार्टच्या भारतावरील आक्रमणाची शक्यता नाकारता येत नव्हती. कारण त्याचे सैन्य पुढे सरकत इजिप्तपर्यंत पोहोचले होते. कॅरोवरून आपण फारसवर चालून जाणार असे नेपोलियनने घोषित केले होते.

अशा परिस्थितीत लॉर्ड वेलस्लीचे असे मत होते की, कंपनीने संपूर्ण भारतात ब्रिटिशांच्या साम्राज्याचा विस्तार करून एक सामर्थ्यसंपन्न कंपनी म्हणून उदयास यावे किंवा भारत सोडून निघून जावे. त्यामुळेच वेलस्लीने भारतातील राजकीय परिस्थितीचा व साधनसामग्रीचा उपयोग करून कंपनीची सत्ता मजबूत करण्याचे ठरविले. भारतीय राजांना कंपनीच्या नियंत्रणात आणण्यासाठी व भारतात ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करून कंपनीची सुरक्षा व हिताची रक्षा आणि वृद्धी करण्यासाठी त्याने तैनाती फौज पद्धतीचा स्वीकार केला.

## ४) तैनाती फौज पद्धती–

भारतातील आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ती करीता लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौजेचा अवलंब मोठ्या कौशल्याने केला. वास्तविक या पद्धतीचा निर्माता लॉर्ड वेलस्ली नव्हता. यापूर्वी ब्रिटीश पंतप्रधान विल्यम पीठ याने युरोपात नेपोलियनचे वर्चस्व थोपवण्यासाठी पैसा गुंतवणूक करून युरोपातील मित्र देशांची एक फौज उभारली होती. न्यायमूर्ती म. गो. रानडे यांच्यामते मराठ्यांनी दिल्ली व अन्य राजांचे बलाढ्या शत्रूपासुन संरक्षण करण्याच्या मोबदल्यात चौथ व सरदेशमुखी प्राप्त करण्याबाबत शंभर वर्षापूर्वी सूर केलेल्या संघटीत धोरणाची पुनरावृत्ती होय. अनेक इतिहासकार या पद्धतीच्या निर्मितीचे श्रेय फ्रेंच गव्हर्नर डुप्ले याला देतात १७९८ ते १७४९ मध्ये डुप्ले व नवाब चंदासाहेब यांच्यात करार झाला होता. यात फ्रेंचांनी आपली फौज नवाबाच्या मदतीसाठी ठेवली होती. या मोबदल्यात नवाबाने फौजेचा खर्चासाठी फ्रेंचांना पोंडीचेरी जवळील मुलुख तोडून दिला होता.

इंग्रजांनी या पद्धतीचा सर्वप्रथम प्रयोग केल्याचा उल्लेख १७६५ मधील अवधच्या नवाबाशी केलेल्या अलाहबादच्या तहात दिसून येतो. या तहाच्या एका कलमात कंपनीने पैशाच्या मोबदल्यात अवधचे संरक्षण करण्याचे कबूल केले होते. याशिवाय लखनऊ येथे इंग्रजी रेसिडेंट ठेवण्याची कबूल केले होते. कंपनीने कर्नाटकच्या नवाबास विनंती केली होती की नवाबाने कंपनीच्या पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही युरोपियनांना आपल्या पदरी ठेवू नये. असाच तह १७९८ मध्ये सर जॉन शोअरने अवध सोबत केला होता. वरील काहीही परिस्थिती असली तरी भारतात लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौज पद्धती पूर्णत्वास नेवून भारतीय राजांना कंपनीचे वर्चस्व स्वीकारण्यास भाग पाडले. लॉर्ड वेलस्लीला

कोणत्याही प्रकारे कंपनीच्या साम्राज्याचा विस्तार करायचा होता. भारतीय शासकांना तैनाती फौज घेण्यास बाध्य करून पैसे उकळणे व पैसे न देऊ शकणाऱ्या शासकांचा प्रदेश लाटणे हा या पद्धतीचा उद्देश होता. तैनाती फौज स्वीकारणाऱ्या राजांना खालील अटींचा स्वीकार करावा लागत होता.

## ५) तैनाती फौज पद्धतीच्या अटी-

१. तैनाती फौज स्वीकारणाऱ्या भारतीय राजांनी कंपनीची फौज आपल्या राज्यात कायमची ठेवावी.

२. या फौजेच्या खर्चासाठी एक ठराविक रक्कम शासक दरवर्षी कंपनीला देईल.

३. शासक तैनाती फौजेचा खर्च देण्यास असमर्थ असेल तर त्याने आपल्या राज्यातील खर्चाच्या एवढा उत्पन्नाचा प्रदेश कंपनीला कायमस्वरूपी देईल.

४. ही पद्धत स्वीकारणाऱ्या राज्याने कंपनीच्या सल्ल्याशिवाय दुसऱ्या राज्याशी किंवा सत्ताधीशांशी परस्पर युद्ध व तह करता येणार नाही.

५. ही पद्धत अमलात आणणाऱ्या दोन सत्ताधीशांमध्ये आपापसात मतभेद झाल्यास कंपनीने नेमून दिलेल्या मध्यस्थाचा निर्णय मान्य करावा.

६. ही पद्धती स्वीकारणाऱ्या शासकाने त्याच्या राजधानीत एक ब्रिटिश रेसिडेंट ठेवावा.

७. कंपनीच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही युरोपियनांना आपल्या सेवेत ठेवता येणार नाही.

८. राज्यांच्या अंतर्गत कारभारात कंपनी हस्तक्षेप करणार नाही.

९. कंपनी या सर्व अटी स्वीकारणाऱ्या राज्यांचे अंतर्गत व बाह्य संकटापासून संरक्षण करेल.

## ६) तैनाती फौजेचे कंपनीला झालेले फायदे-

### १. देशी राज्यांवर नियंत्रण :-

भारतातीसल ज्या शासकांनी ही तैनाती फौज स्वीकारली त्या राजांवर कंपनीचे पूर्ण नियंत्रण प्रस्थापित झाले. त्यांचे स्वातंत्र्य व सन्मान नाहींसा झाला. कंपनीचा रेसिडेंट राजांच्या राजधानीत उपस्थित राहत असल्याने कोणताही शासक कंपनीविरुद्ध संघ बनू शकत नव्हता. अशा प्रकारे भारतीय राजे आपले सार्वभौमत्व गमावून ब्रिटिशांच्या अधीन झाले.

## २. कंपनीची सेना उभारली :-

जे भारतीय शासक तैनाती फौज स्वीकारत त्यांना त्या फौजेचा खर्च द्यावा लागत होता. हा मोबदला नगद किंवा प्रदेशाच्या स्वरूपात असत. ही फौज कंपनीची असल्याने कंपनीच्या इशाऱ्यावर चालत होती. देशी राज्यांच्या सीमा व आतल्या प्रदेशात समर्थपणे ठेवली जात. एका वेळी अन्य राज्यांविरुद्ध सुद्धा या फौजेचा वापर होत होता. यातून भारतीय राज्यांच्या पैशावर कंपनीची सेना उभारली गेली होती.

## ३. भारतातील महत्वाच्या जागेवर कंपनीचे नियंत्रण :-

कंपनीची तैनाती फौज ही राज्यांच्या राजधानीत व मोक्याच्या प्रदेशात आणि महत्त्वपूर्ण शहरात राहत होती. त्यामुळे अशा मोक्याच्या जागांवर व शहरांवर कंपनीच्या सैन्याचे नियंत्रण प्रस्थापित होत असे.

## ४. कंपनी आर्थिकदृष्ट्या बलशाली बनली :-

कंपनीला तैनाती फौजेसाठी कोणताही आर्थिकभार पडत नव्हता. आर्थिकभार पूर्णपणे ही पद्धत स्वीकारणाऱ्या शासकावर होता. फौजेचा खर्च भारतीयांनी करावा मात्र फौजेवर नियंत्रण ठेवून इंग्रजांनी या फौजेचा वापर करत राहावा. युद्ध झाले तर युद्धाचा आर्थिकभार कंपनीवर पडत नव्हता. युद्धक्षेत्र बरेच दूर असल्याने कंपनीच्या प्रदेशाला कोणतीही हानी होत नव्हती. त्यामुळे कंपनीला तैनाती फौज आर्थिकदृष्ट्या लाभदायक होती.

## ५. फ्रेंचांची भीती नाहीशी :-

तैनाती फौज स्वीकारणाऱ्या राजास कंपनीच्या परवानगीशिवाय इंग्रजांव्यतिरिक्त इतर कोणत्याही युरोपियनांना आपल्या सेवेत ठेवता येणार नव्हते. त्यामुळे ज्या राज्याच्या पदरी फ्रेंच अधिकारी होते त्यांना पदमुक्त करावे लागले. अशाप्रकारे कंपनीने फ्रेचांचा प्रभाव भारतातून नाहीसा केला. याचा फायदा भारतात कंपनीचा प्रभावात वाढ होण्यात झाला.

## ६. कंपनीच्या प्रदेशात वाढ :-

तैनाती फौजेचा खर्चासाठी पैश्याच्या ऐवजी प्रदेशाची मागणी हा एक नैसर्गिक टप्पा होता. तैनाची फौजेचा खर्च म्हणून जी रक्कम द्यायची असत ती अतिशय जास्त असे. म्हणून भारतीय राजांना फौजेचा खर्चापोटी त्यांच्या राज्यातील तेवढ्याा उत्पन्नाचा प्रदेश कंपनीला द्यावा अशी मागणी सुरू केली. हा प्रदेश सुपिक असाच असे. या प्रदेशावर कंपनीची सार्वभौम सत्ता प्रस्थापित होत. अशाप्रकारे कंपनीच्या भारतीय प्रदेशात वाढ होत गेली.

## ७. कंपनी मध्यस्थ :-

तैनाती फौज स्वीकारणाऱ्या राज्यांचे परराष्ट्रीय संबंध कंपनीच्या नियंत्रणात येत असल्याने तैनाती फौज स्वीकारणाऱ्या राजांमध्ये आपापसात मतभेद झाल्यास इंग्रजी रेसिडेंट मध्यस्थ म्हणून अंतिम निर्णय देत होता. तो निर्णय देशी राज्यांना मान्य करावा लागत होता. यावरून कंपनी भारतीय राज्याच्या मतभेदात मध्यस्त म्हणून निर्णायक बनली.

## ७) भारतीय राज्यांची झालेली हानी :-

## १. लष्करीदृष्ट्या भारतीय राजे दुर्बल बनले :-

तैनाती फौज स्वीकारलेल्या देशी राज्यांचे अंतर्गत व परराष्ट्रीय संबंध कंपनीच्या नियंत्रणात आले होते. त्यामुळे देशी राज्यांना कंपनीच्या पूर्व परवानगी शिवाय कोणताही निर्णय घेता येत नव्हता. यामुळे देशी राजे आपले सार्वभौमत्व गमावून बसली होती. देशी राजांच्या स्वातंत्र्य व सन्मान नाहीसा झाला होता. अंतर्गत बंडाळी व बाह्य आक्रमणाची भीती नसल्याने राजे आळशी व विलासी बनली होती. शासन व्यवस्था व प्रजेचे हित याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. कार्ल मार्क्स याबद्दल म्हणतो कि, 'भारतातील संस्थानिक व स्थानिक राजांनी कंपनीची तैनाती फौज स्वीकारून आपले अस्तित्व गमावले.'

## २. इंग्रजी रेसिडेंट हस्तक्षेप वाढला :-

कंपनीद्वारा देशी राज्यांच्या राजधानीत नेमलेल्या इंग्रजी रेसिडेंटचा राज्याच्या अंतर्गत शासनात सतत हस्तक्षेप असे. तो नेहमी प्रशासनासमोर अडचणी निर्माण करत. त्यामुळे राजाला आपल्या मतानुसार राज्य चालवायला मर्यादा येत असत.

## ३. देशी राज्यातील सैनिक बेकार :-

देशी राजांनी तैनाती फौज स्वीकारल्याने परकीय आक्रमण व अंतर्गत सुरक्षिततेची कोणतीही भीती उरलेली नव्हती. ही जबाबदारी आता कंपनीवर होती. त्यामुळे त्यांच्या पदरी असलेले देशी सैनिकांना कामावरून काढून टाकण्यात आले. हे सैनिक बेरोजगार झाले. इंग्रजांमुळे आपण बेकार झालेलो आहे अशी सल त्यांच्या मनात होती. त्यामुळे ते इंग्रजांचे विरोधक बनले. इंग्रजांचा सूड उगवण्यासाठी ते पेंढाऱ्यांना जाऊन मिळाले. इंग्रजी प्रदेशात ते लुटमार करू लागले.

## ४. सामान्य जनतेच्या करात वाढ :-

तैनाती फौजेची ठराविक वार्षिक रक्कम राजांच्या वार्षिक उत्पन्नाच्या १/३ एवढी असे. ही रक्कम तत्कालीन परिस्थितीत जास्त होती. ही रक्कम वसूलीसाठी संबंधित राजा आपल्या जनतेवर अतिरिक्त करभार वाढवीत होते. तो कर वसूलण्यासाठी जनतेवर जुलुम जबरदस्ती केल्या जात होती.

## ५. जनतेबद्दल सहानुभूती उरली नाही :-

भारतीय राजांना नेहमी परकीय आक्रमण व अंतर्गत बंडाळीची भीती राहत होती. परंतु तैनाती फौज स्वीकारल्यानंतर ही जबाबदारी आता कंपनीवर येऊन पडली होती. त्यामुळे देशी राजे निश्चिंत होवून चैनी विलासी बनले. त्याचे शासन व्यवस्थेकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले. जनतेबद्दल त्याच्या मनात कोणतीही सहानुभूती उरली नाही. त्यांच्यातील पराक्रम, कार्यकुशलता इत्यादी गुणांचा ऱ्हास झाला. या पद्धतीने प्रत्येक दुर्बल व त्रासदायक राज्याचे रक्षण केले असे म्हणता येईल.

## ६. कंपनीच्या प्रदेशात विलीनीकरण :-

ज्या देशी राज्याने तैनाती फौजेचा स्वीकार केला होता त्या भारतीय शासकावर पुढे जाऊन कु-प्रशासनाचा आरोप ठेवून, तर कधी वारस नसल्याच्या कारणावरून, तर कधी तैनाती फौजेच्या थकीत रकमेचीबाब पुढे करून इंग्रजांनी अशी राज्य आपल्या साम्राज्यात विलीन केली.

## ८) तैनाती फौजेचा स्वीकारकरणारे देशी शासक -

जॉर्ज बार्लो (गृह सचिव) याचे असे विधान होते की ''भारतात एकही राज्य असे राहावयास नको जे इंग्रजांवर अवलंबून राहणार नाही.'' याच विधानातून वेलस्लीचे धोरण दिसून येते याच बरोबर भारतीय शासकांची फ्रेंचांच्या आक्रमणाविरुद्ध सशक्त फळी उभारण्यासाठी वेलस्लीने तैनाती फौज अमलात आणली. ज्या देशी राज्याना तैनाती फौज स्वीकारण्यास भाग पाडले ती देशी राज्ये खालील प्रमाणे होती.

## १. निजाम :- (१७९८/१८००)

मराठ्यांच्याकडून खर्ड्याच्या लढाईतील पराभवामुळे व म्हैसूरच्या टिपूच्या स्वाऱ्यांमुळे मेटाकुटीस आलेल्या हैदराबादच्या निजामाने अखेर लॉर्ड वेलस्लीची तैनाती फौज १७९८ मध्ये स्वीकारली. या मोबदल्यात निजामाने कंपनीला २४ लक्ष रुपये वार्षिक देण्याचे मान्य केले. तैनाती फौज स्वीकारणारा हैदराबादचा निजाम हा पहिला भारतीय शासक होता. लॉर्ड वेलस्लीने १८०० मध्ये निजामासोबत परत तह करून निजामाला दिलेली फौज व फौजेचा खर्च वाढवून घेतला.

## २. अवध :- (१८००)

सर जॉन शोअरच्या काळात अवधच्या नवाबाकडून लॉर्ड वेलस्लीने ७८ दशलक्ष रुपये घेऊन त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेतली होती. परंतु १८०० साली वेलस्लीने नवाबासोबत नवीन तह करून त्यास तैनाती फौज स्वीकारण्यास भाग पाडले. या तहान्वये कंपनीला नवाबाकडून रोहिलखंड, गोरखपुर, गंगा-यमुनेच्या दोआबचा प्रदेश मिळाला.

### ३. मैसूर :- (१७९९)

लॉर्ड वेलस्लीने टिपूस तैनाती फौज स्वीकारण्याचा आग्रह केला होता. टीपूने त्यास नकार दिला. पुढे झालेल्या युद्धात टिपू मारला गेला. म्हैसूरच्या गादीवर मूळचा हिंदू राजा कृष्णराव यास बसविण्यात आले. त्यावेळी त्याच्यासोबत तैनाती फौजेचा करार करण्यात आला.

### ४. सुरत :- (१७९९)

सुरतच्या नवाबास वार्षिक ८० हजार रुपये पेन्शन देऊन त्याला तैनाती फौज स्वीकारण्यास भाग पाडले.

### ५. त्रावणकोर राजा :- (१७९९)

त्रावणकोरच्या राजाला यापूर्वीच कंपनीने संरक्षण दिले होते. तेव्हा या संरक्षित राज्याला लॉर्ड वेलस्लीने सहजपणे तैनाती फौज स्वीकारण्यास भाग पाडले.

### ६. पेशवा :- (१८०२)

मराठा सरदारांच्यातील भांडणांमध्ये पडून ग्वाल्हेरच्या शिंदेंची बाजू घेतलेला पेशवा बाजीराव दुसरा यास इंदोरच्या होळकर याच्याकडून १८०२ मध्ये पराभव स्वीकारावा लागल्याने आपले पेशवेपद वाचवण्यासाठी बाजीराव दुसरा याने इंग्रजांच्या सोबत वसईचा तह करून लॉर्ड वेलस्लीची तैनाती फौज स्वीकारली.

### ७. ग्वाल्हेरचे-शिंदे व नागपूरचे-भोसले :- (१८०३)

लॉर्ड वेलस्लीने १८०३ मध्ये ग्वाल्हेरच्या शिंदेंचा अंजनगावसुर्जी येथे पराभव केला तसेच देवगाव येथे नागपूरकर भोसले यांचा पराभव केला. या दोघा मराठा सरदारांना लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौज स्वीकारण्यास भाग पाडले. परंतु या दोघांनाही आपल्या राज्यात तैनाती फौज ठेवण्यास बंधन घालण्यात आले नव्हते.

### ८. बडोदा :-

पहिल्या मराठा इंग्रज युद्धाच्या वेळी बडोद्याच्या गायकवाड मराठा संघापासून दूर ठेवण्यास इंग्रजांना यश आले होते. याच पार्श्वभूमीवर लॉर्ड वेलस्लीने गोडीगुलाबीने गायकवाड यास तैनाती फौज स्वीकारण्यास लावली.

भारतातील कंपनीची १७९८ ची स्थिती लक्षात घेतली तर कंपनीची सत्ता मुंबई, मद्रास व कलकत्ता प्रदेशात थोड्या भूप्रदेशावर होती. या प्रदेशातून दळणवळण करायचे झाल्यास फक्त सागरी

मार्गानेच करता येत होते. पण १८०५ मध्ये भूमार्गाने कलकत्ता ते मद्रास, मुंबई, कलकत्ता, दिल्ली पर्यंतचा सलग प्रदेश कोणताही अडथळा न येता कंपनीच्या नियंत्रणाखाली आला होता. राजस्थान, माळवा, गुजरात मध्यप्रदेश यातील अनेक राजांनी तैनाती फौज स्वीकारल्याने भारतातील कंपनीची सत्ता सर्वश्रेष्ठ बनली होती. हे सर्व लॉर्ड वेलस्लीच्या तैनाती फौज धोरणामुळे शक्य झाले होते.

कंपनीच्या साम्राज्य विस्तारासाठी तैनाती फौजेच्या धोरणामुळे लॉर्ड वेलस्लीला भारतात कंपनीची पाळेमुळे घट्ट करणारा महान विस्तारवादी म्हणून ओळखले जाते. भारतात ज्या उद्देशाने तो आला होता ती उद्दिष्टे त्याने पूर्ण केली होती. ब्रिटिश पार्लमेंटने या कार्यासाठी लॉर्ड वेलस्लीला 'मार्कस' या पदवीने सन्मानित केले. तो आला तेव्हा कंपनीची भारतातील स्थिती गंभीर होती. तो भारतातून गेला तेव्हा कंपनीची आर्थिक व प्रादेशिक स्थिती भक्कम झालेली होती. सिडनी ओव्हनच्या मतानुसार लॉर्ड वेलस्लीने भारतातील ब्रिटिश राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. पूर्वी कंपनी भारतातील अनेक सत्तापैकी एक होती. आता संपूर्ण भारतातील सर्व शक्तिशाली सत्ता म्हणून उदयास आली होती.

भारतात अनेक राजांसोबत सततच्या होणाऱ्या युद्धामुळे कंपनीच्या भागधारकांना लॉर्ड वेलस्लीचे धोरण खर्चिक होत आहे असे वाटत होते. कंपनीचे कर्ज १७९९ ला १७० लाख पौंड होते ते १८०६ मध्ये ३१० लाख पौंड पर्यंत पोहोचले होते. यावेळी इंग्लंडचे आर्थिक साधने कमी व्हायला लागले होते. याच बरोबर नेपोलियनने युरोपमध्ये परत तोंड वर काढले होते. तेव्हा कंपनीच्या संचालकांनी भारतातील लॉर्ड वेलस्लीची साम्राज्यविस्ताराची निती स्थगित करून होणारा खर्च बंद करावा व जो प्रांत कंपनीच्या अंतर्गत आला आहे तो सुरक्षित करावा यासाठी १८०५ मध्ये लॉर्ड वेलस्लीला भारतातून इंग्लंडला परत बोलावल्या गेले.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ✻

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. भारतातील तैनाती फौजेचा ..................... हा निर्माता होय.

*अ) लॉर्ड वारेन हेस्टिंग्ज* *क) लॉर्ड वेलस्ली*

*ब) लॉर्ड बेंटिंग* *ड) लॉर्ड डलहौसी.*

२. ................ हा तैनाती फौज स्वीकारणारा पहिला भारतीय शासक होय.

*अ) मैसूर- टिपू ब) हैद्राबाद-निजाम क) पेशवा-बाजीराव ड) ग्वाल्हेर -शिंदे.*

३. वसईचा तह (१८०२) ............... यांच्यात झाला.

*अ) दुसरा बाजीराव ब) निजाम व इंग्रज क) टिपू व इंग्रज ड) होळकर व इंग्रज.*

४. भारतावर ............. या फ्रेंच शासकाच्या आक्रमणाची भीती होती.

*अ) पंधरावा लुई ब) सोळावा लुई क) हेनरी ड) नेपोलियन*

५. ............... (१७९९) या युद्धात म्हैसूरचा शासक मारल्या गेला.

*अ) श्रीरंगपट्टम ब) मद्रास क) खड्यांच्या ड) पानिपत.*

## २.२.३ लॉर्ड डलहौसी – विलिनीकरणाचे तत्व/खालसा धोरण

ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करून शक्तिशाली बनवणारा गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड डलहौसीचे नाव घेतले जाते. लॉर्ड डलहौसीचा जन्म २२ एप्रिल १८१२ रोजी स्कॉटलंडमधील एका उमराव घराण्यात झाला. त्याचे शिक्षण क्राईस्ट चर्च, हेरो व ऑक्सफर्ड येथे झाले. आपल्या अभ्यासूवृत्ती व कार्यक्षमतेसाठी तो प्रसिद्ध होता. वयाच्या पंचविसाव्या वर्षी तो ब्रिटिश पार्लमेंटच्या सदस्य झाला. तो अपार मेहनती असला तरी त्याच्या स्वभावात निरंकुशपणा होता. सन १८४३ मध्ये तो बोर्ड ऑफ ट्रेडचा उपाध्यक्ष झाला. लॉर्ड डलहौसी एक प्रामाणिक अधिकारी म्हणून प्रसिद्धीस पावला होता.

जॉन रसेलच्या व्हीग मंत्रिमंडळाने १८४८ मध्ये वयाच्या ३६ व्या वर्षी लॉर्ड डलहौसीची भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक केली. लॉर्ड डलहौसी गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आठ वर्ष होता. त्याचा कार्यकाळ भारतातील प्रत्येक क्षेत्रात त्याने केलेल्या नवनिर्माण व बदलामुळे इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण काळ होता. भारतात ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी त्यांने नीती–अनीती, न्याय–अन्याय कशाचीही तमा बाळगली नाही. मुघलांची नामधारी सत्ता कंपनीच्या संपूर्ण प्रभावाखाली आणली व कंपनीचे संपूर्ण साम्राज्यात रूपांतरण केले.

लॉर्ड डलहौसीला भारतातील अनेक सुधारणांचा जनक म्हणून ओळखल्या जाते रेल्वे, डाक, तारायंत्रणा, पी.डब्लू. डी., विद्यापीठाची स्थापना इत्यादी. यात अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणजे विलिनीकरणाची तत्व किंवा खालसा धोरण होय. संपूर्ण भारतासाठी लॉर्ड डलहौसी हा अतिशय अवसरवादी व महत्वकांक्षी गव्हर्नर जनरल म्हणून ओळखला जातो. लॉर्ड डलहौसीचा मृत्यू वयाच्या ४८ व्या वर्षी म्हणजे १९ डिसेंबर १८६० रोजी झाला.

### १) लॉर्ड डलहौसीचे भारतातील उद्दिष्टे :–

१. संपूर्ण भारतावर कंपनीची सत्ता स्थापन करणे.

२. व्यापारासाठी हक्काची बाजारपेठ निर्माण करणे.

३. भारतीय राजांना त्यांच्या राज्यातून बडतर्फ करणे.

४. व्यापारवृध्दीकरीता दळणवळणाच्या सोयी निर्माण करणे.

वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी लॉर्ड डलहौसीने भारतात दोन धोरणे अवलंबिली-

१) युद्धाच्या मार्गाने साम्राज्यविस्तार,

२) विलीनीकरणाचे तत्व किंवा राज्य खालसा धोरण.

वरील धोरणांच्या अंमलबजावणीसाठी विलीनीकरण धोरणासारख्या कूटनीतीचा अवलंब करून लॉर्ड डलहौसीने कंपनीचा साम्राज्यविस्तार केला.

## २) भारतीय राज्यांच्या विलिनीकरणाची कारणे :-

### १. संपूर्ण भारतावर एक हाती सत्ता निर्माण करणे :-

लॉर्ड डलहौसीला भारतात प्रशासन चालविताना प्रशासकीय एकसूत्रता आणायची होती. यासाठी कंपनीचे भारतातील साम्राज्याचे दृढीकरण करणे व या दृढीकरणातून कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी संपूर्ण भारत कंपनीच्या वर्चस्वाखाली आणणे आवश्यक होते. जेणेकरून वरील उद्दिष्टांची पूर्ती होईल. यासाठी शक्यतेवढे भारतीय प्रदेश कंपनीच्या अधिपत्याखाली आणण्यासाठी कोणत्याही बाबीची तमा न बाळगता प्रत्येक संधीचा फायदा घेणे डलहौसीच्या नीतीचा मूलमंत्र होता.

### २. भारतातील मित्रांची गरज संपली :-

तत्कालीन परस्थितीत कंपनीला भारतात कोणताही मोठा शत्रू उरला नव्हता. त्यामुळे कंपनीद्वारा राज्यांच्या प्रशासनाची जबाबदारी सांभाळण्याची गरज उरली नव्हती. इंग्रजाना कंपनी ही भारतातील सर्वश्रेष्ठ सत्ता म्हणून सामर्थ्यसंपन्न झाल्याच्या विश्वास वाटत होता. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने भारतीय राज्यांची उपयुक्तता संपली होती.

### ३. कच्च्या मालाचा पुरवठा :-

इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडमधील कारखान्यांना पुरेसा कच्चामाल निश्चितपणे उपलब्ध होण्याची नितांत गरज होती. ही गरज भारतातूनच पूर्ण होऊ शकत होती. कारण कच्चामाल पुरवणारी हक्काची व नियमित बाजारपेठ भारतात होती. परंतु भारतातील काही प्रदेशावर देशी राजांचे नियंत्रण होते. त्यामुळे कच्चामाल नियमित मिळत नव्हता. त्यात अडथळे येत होते. असे अडथळे दूर करण्यासाठी संपूर्ण भारतावर एकछत्री अंमल होणे गरजेचे होते.

### ४. बाजारपेठांची गरज :-

इंग्लंडमध्ये पक्क्या मालाचे उत्पादन भरमसाठ प्रमाणात वाढले होते. हे उत्पादन विकण्यासाठी

नवनवीन व हक्काच्या बाजारपेठा ब्रिटिशांना हव्या होत्या. विशेषत: ज्या बाजारपेठांवर फक्त कंपनीचे नियंत्रण राहू शकेल. यासाठी भारत ही एक विस्तृत व मोठी बाजारपेठ होती. या बाजारपेठांना कंपनीच्या नियंत्रणात आणून भारत ही हक्काची बाजारपेठ म्हणून निर्माण करणे ही काळाची गरज होती.

### ५. आर्थिक लाभ मिळवणे :-

वसाहतींच्या स्पर्धेत इंग्लंडला यशस्वी व्हायचे असेल तर भारतातील जास्तीत जास्त प्रदेश ब्रिटिश अंमलाखाली आणणे आवश्यक होते. या प्रदेशातून कंपनीला जास्त प्रमाणात प्रत्येक मार्गातून आर्थिक लाभ मिळणार होता. यासाठी कोणत्याही परिस्थितीत देशी राज्यांचे विलीनीकरण ब्रिटिश साम्राज्यात होणे लॉर्ड डलहौसीला आवश्यक वाटते होते.

### ६. व्यापाराची वृद्धी करणे :-

प्रशासकीय व लष्कराच्या हालचाली जलद गतीने व्हाव्यात व देशी राजांवर नियंत्रणाचा पाश घट्ट व्हावा या हेतूने दळण-वळणाच्या सोयी करण्यावर लॉर्ड डलहौसीचा भर होता. या सोईचा उपयोग ग्रामीण भागातील कच्चामाल मोठा बंदरापर्यंत व बंदरातून लंडनमध्ये नेण्या-आणण्यासाठी व व्यापार वृद्धी करण्यासाठी ब्रिटिश सरकारचा भर होता. यात अडचण भारतीय राजांचा प्रदेश ही होती.

वरील कारणांमुळे ब्रिटिश साम्राज्याला दृढता येण्यासाठी लॉर्ड डलहौसीने युद्ध व शांततेच्या मार्गाने भारतातील देशी राज्यांचे विलीनीकरण केले.

## ३) युद्धाच्या मार्गाने साम्राज्यविस्तार :-

### अ) पंजाब :- (२९ मार्च १८४९)

लॉर्ड हार्डिग्जने शीखांवर विजय मिळवून सुद्धा शीखांचा प्रदेश कंपनीच्या प्रदेशात जोडला नव्हता. शीखांचे निम्मे राज्य कंपनीने आपल्या प्रभावाखाली आणले होते. तसेच युद्धखंडणी म्हणून दीड कोटी रुपये आकारण्यात आले होते. लॉर्ड डलहौसीने भारतात येताच शीख राज्य कंपनीच्या साम्राज्यात विलीन करण्याचे ठरविले. १० ऑक्टोबर १८४८ रोजी दुसरे शीख युद्ध डलहौसीच्या साम्राज्यवादी धोरणातून सुरू झाले. तत्कालीन परस्थितीत भारतात इंग्रजांना टक्कर देणारी एकमेव सत्ता शीख उरली होती. राजा रणजितसिंगच्या मृत्युनंतर शीख सत्ता दुबळी बनत गेली होती. या परस्थितीचा फायदा घेउन २९ मार्च १८४९ रोजी लॉर्ड डलहौसीने शीख राज्य जिंकून ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले. लॉर्ड डलहौसीने शीखांचा अल्पवयीन राजा दिलीपसिंग यास पेन्शनर बनवून लंडन येथे पाठविले. अशाप्रकारे दुसऱ्या शीख युद्धाने शीख राज्य कंपनीच्या प्रदेशात विलीन करण्यात आले.

## ब) दार्जीलिंग :- (१८५०)

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने सिक्कीमच्या मोरांग प्रांतात कर लागू केल्याने इंग्रज व सिक्कीमचा राजा यांच्यातील मतभेद विकोपास गेले होते. त्यात १८४९ मध्ये दोन इंग्रजी अधिकारी सर जोसेफ डॉल्टन आणि डॉ. आर्चीबाल्ड हे विनापरवानगी सिक्कीमच्या पर्वतीय क्षेत्रात गेले. त्यांना सिक्कीमच्या सैन्यांनी बंदी बनवले. कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांशी सिक्कीम सरकारने दुर्व्यवहार केल्याचे निमित्त करून लॉर्ड डलहौसीने सिक्किमवर आक्रमण करून १८५० मध्ये सिक्कीमचा दार्जलिंग प्रदेश हडप करून ब्रिटिश साम्राज्यात विलीन केला.

## क) दक्षिणी ब्रह्मदेश :- (१८५२)

पहिले ब्रह्मी युद्ध कंपनी व ब्रह्मदेश याच्यात १८२४-२६ मध्ये घडून आले. पहिल्या ब्रह्मी युद्धाच्या नंतर झालेल्या यादुम्बाच्या तहाने (१८२६) कंपनीने आपले पाय पसरवायला सुरवात केली. या तहाने दक्षिण आराकान व तेनासरीम हे प्रदेश कंपनीला मिळाले. काही इंग्रज व्यापारी रंगुंनच्या देशात निवास व व्यापार करू लागले होते. परंतु व्यापाराच्या हव्यासापोटी इंग्रजी व्यापाऱ्यांनी ब्रह्मी सरकारच्या नियमास जुमानणे बंद केले. त्यामुळे ब्रह्मी सरकारने अशा व्यापाऱ्याना शिक्षा व दंड करण्यास सुरवात केली. ब्रह्मी सरकार इंग्रजी व्यापाऱ्यांसोबत दुर्व्यवहार करत आहे अशा तक्रारी भारताच्या गव्हर्नरकडे येत होत्या. लॉर्ड डलहौसीने अशा तक्रारींचा उपयोग ब्रह्मदेश आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी केला. लॉर्ड डलहौसीने व्यापाऱ्यांवर होणाऱ्या दुर्व्यव्हारासाठी शिक्षा करण्यासाठी ब्रह्मदेशावर आक्रमण करून ब्रह्मी सरकारचा पराभव केला. दक्षिणी ब्रह्मदेश २० डिसेंबर १८५२ कंपनीच्या साम्राज्यात विलीन करण्यात आला.

## ४) शांततेच्या मार्गाने विलीनीकरण :-

लॉर्ड डलहौसीने भारतीय राज्याच्या कंपनीच्या परदेशात विलीनीकरणासाठी शांततेच्या मार्गाने विलीनीकरण हे धोरण अवलंबिले. यासाठी लॉर्ड डलहौसीला दत्तकविधान हे कारण मिळाले. योगायोग असा की या वेळी भारतात एक दोन नाही तर अनेक शासकांना औरस पुत्र नव्हते. या शासकांनी भारतीय परंपरेप्रमाणे दत्तक वारसा घेतला होता. यातून लॉर्ड डलहौसीने 'दत्तक विधान' नामंजूर करून अशी राज्य ब्रिटिश साम्राज्य विलीन केले. लॉर्ड डलहौसीने अशा प्रकारचे विलिनीकरण करण्यासाठी खालील उपाय योजनांची आखणी केली होती.

(अ) दत्तक विधान नामंजूर.

(ब) कु-प्रशासनाचा आरोप.

(क) थकबाकी वसुली.

(ड) पेन्शन, पदव्या व इनाम रद्द.

वरील तत्वे लागू करण्यासाठी लॉर्ड डलहौसीने भारतीय राज्यांचे तीन भागात विभाजन केले होते.

१. अशी राज्य जी कंपनीस कर देत नव्हती व स्वतंत्र होती.

२. कंपनीच्या नियंत्रणाखालील राज्य, जी कंपनीला कर देत होती.

३. सनदांच्या माध्यमातून कंपनीने पुर्नजीवित केलेली राज्य.

दत्तकविधानाचा सिद्धांत लावताना आपल्या पुर्ननिरीक्षणात लॉर्ड डलहौसी म्हणतो :-

१. पहिल्या प्रकारातील राज्यांच्याबाबतीत दत्तक प्रकरणात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

२. दुसऱ्या प्रकारच्या राजांच्याबाबतीत दत्तक घेतांना कंपनीची परवानगी आवश्यक आहे.

३. तृतीय प्रकारातील राज्यांना दत्तक घेण्याची परवानगी कंपनी देणार नाही.

लॉर्ड डलहौसीच्या पूर्वी १८३४ मध्ये कंपनीच्या संचालकांनी एक घोषणेद्वारा दत्तक विधानास सहमती देणे म्हणजे विशेष कृपा करून अनुमती देण्याचा अध्यादेश काढला होता. लॉर्ड डलहौसीने १८४१ मध्ये भारतातील आपल्या गव्हर्नर पदाचा कार्यभार स्वीकारला तेव्हा भारतातील नवीन कर किंवा प्रदेश प्राप्त करण्याची कोणतीही संधी कंपनीने सोडू नये व अस्तित्वात असलेल्या हक्काचे पालन करण्याचे धोरण आखले. लॉर्ड डलहौसीच्या पूर्वीच्या गव्हर्नर जनरलनी वरील अध्यादेश पाहिजे तसा प्रभावीपणे राबविला नव्हता. परंतु १८४८ मध्ये लॉर्ड डलहौसी या साम्राज्यवादी व महत्त्वकांक्षी गव्हर्नरने या अध्यादेशाची अतिशय काटेकोरपणे पालन केले.

## ५) दत्तक विधान नामंजूर :-

दत्तक विधान नामंजूर करून विलीन केले राज्य खालीलप्रमाणे होते.

## १. सातारा :- (१८४८)

दत्तक विधान नामंजूर करून कंपनीच्या साम्राज्यात विलीन केलेले पहिले राज्य सातारा होय. सातारचे छत्रपती आप्पासाहेब यांचा १८४८ मध्ये मृत्यू झाला. ते निपुत्रिक होते. त्यानी मृत्यूच्या काही दिवसाआधी कंपनीची परवानगी न घेता दत्तकपुत्र घेतला होता. पण लॉर्ड डलहौसीने साताऱ्याच्या छत्रपती आश्रित राज्य घोषित करून १८४८ मध्ये साताऱ्याचे राज्य कंपनीच्या प्रदेशात विलीन केले.

## २. जैतपुर :- (१८४९)

बुंदेलखंड मधील जैतपुरचा राजा खेतसिंह हा निपुत्रिक वारला. डलहौसीने दत्तक विधान नामंजूर करून हे राज्य आपल्या साम्राज्यात विलीन केले.

## ३. संभलपूर :- (१८४९)

येथील राजा नारायण सिहं निपुत्रिक होता. त्याने दत्तक घेतला नव्हता. म्हणून ८४९ मध्येच १८४८ मध्ये राजांच्या मृत्यूनंतर संभलपूर राज्य विलीन करण्यात आले.

## ४. बघाट :- (१८५०)

बघाट हे संस्थान हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले होते. येथील राणा बीजे सिंह निपुत्रिक मृत्यु पावल्यानंतर १८४९ मध्ये या संस्थानाचे विलीनीकरण करण्यात आले. पुढे जाऊन लॉर्ड केनिंगने हे राज्य परत केले होते.

## ५. छोटा उदयपुर :- (१८५२)

छत्तीसगड मधील संस्थान छोटा उदयपुर होते. येथील राजा कल्याणसिह निपुत्रिक मृत्यु पावला. लॉर्ड डलहौसीने हे संस्थान ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले. पुढे जाऊन लॉर्ड केनिंगने हे राज्य परत केले होते.

## ६. झांसी :- (१८५३)

मध्यप्रदेशातील झांसीचे संस्थान होते. गंगाधर नेवाळकर हे येथील शासक होते. ते निपुत्रिक होते. त्यांनी मृत्यूपूर्वी दामोदर नामक मुलाला दत्तक घेतले. परंतु डलहौसीने दत्तक नामंजूर केला व हे संस्थान ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले.

## ७. नागपुर :- (१८५४)

नागपूरचा राजा रघूजी भोसले हे १८५३ मध्ये निपुत्रिक मृत्यू पावले. मृत्यूपूर्वी त्यांनी यशवंतराव याला दत्तक घ्यावे असा सल्ला त्याचा राणीला दिला. त्यांच्या मृत्यूनंतर राणीने कंपनीची पूर्वपरवानगी न घेता दत्तक घेतला. लॉर्ड डलहौसीने नागपूर हे संस्थान ब्रिटिश साम्राज्यात १८५४ मध्ये विलीन केले.

## ८. तंजावर :- (१८५५)

तंजावरचा राजा शिवाजीराव १८५५ मध्ये मृत्यू पावला. त्याला मुलीच होत्या. तंजावरच्या परंपरेप्रमाणे मुलगी गादिची वारस होत. मुलगा वारसदार नसल्याचे कारण देऊन लार्ड डलहौसीने हे राज्य

१८५५ मध्ये विलीन केले. राणी कामाक्षीने याविरुद्ध मद्रास न्यायालयात न्याय मागितला पण त्याचा काहीच फायदा झाला नाही.

### ९. कर्नाटक :-

कर्नाटकचा नवाब महंमद गौस १८३५ मध्ये मरण पावला. लॉर्ड डलहौसीने त्याचा वारस अजीमशहा यास मान्यता दिली नाही व त्याचे राज्य खालसा करण्यात आले.

## ६) कुप्रशासनाचा आरोप :-

### १. अवध :-

अवध राज्याचे विलिनीकरण लॉर्ड डलहौसीने केवळ कु-प्रशासनाचे कारण देऊन १८५६ कंपनीच्या साम्राज्यात विलीन केले. वास्तविक निमा प्रांत लॉर्ड वेलस्लीच्या काळातच कंपनीचा अंतर्गत आला होता. लॉर्ड डलहौसीने त्याचा विश्वासू अधिकारी स्लिमन यास १८४८ मध्ये अवधच्या प्रशासनिक स्थितीवर रिपोर्ट तयार करण्यास पाठवले होते. त्याने दिलेल्या अहवालात अवधची शासन व्यवस्था बिकट आहे, नवाबाचे जनतेकडे लक्ष नाही, शेतकऱ्याची अवस्था वाईट आहे, असा खोटा अहवालात दिला. वरील अहवालावरून लॉर्ड डलहौसीने केवळ शक्तीच्या बळावर अवधच्या नवाबास पदच्युत केले. त्याचा खजिना लुटला. अवधच्या बेगमांशी दुरव्यवहार केला. नवाबाला कैदेत टाकले. अशाप्रकारे अवध राज्याचे ब्रिटिश साम्राज्यात विलीनीकरण करण्यात आले.

## ७) थकबाकी वसुली :-

हैदराबादचा निजाम  तैनाती फौज स्वीकारणारा पहिला भारतीय शासक होता. त्यांने स्वीकारलेल्या तैनाती फौजेचा खर्च दिवसेंदिवस वाढतच चाललेला होता. हा खर्च निजाम देऊ न शकल्याने त्याच्यावर थकबाकी जवळपास ७ लाख ८० हजार पौंड एवढी झाली होती. निजामास ही रक्कम भरणे शक्य नव्हते. निजामाने ही थकित रक्कम लवकर भरावी यासाठी कंपनीने निजामाकडे तगादा लावला होता. शेवटी निजामाने तैनाती फौजेची रक्कम देण्यासाठी १८५३ मध्ये तह केला. या तहानुसार कापसासाठी सुपीक असणारा वऱ्हाड प्रांत कंपनीला दिला. या प्रांताचे वार्षिक करापोटी उत्पन्न ५० कोटी रुपये होते.

## ८) पेन्शन, पदव्या, इनाम जमिनी रद्द :-

### १. पेशवा नानासाहेब :-

तिसऱ्या आंग्ल-मराठा युद्धातील पेशव्यांच्या पराभवानंतर पेशवा बाजीराव दुसरा याला इंग्रजांनी आपले मांडलिक बनवले. कंपनीने त्यास वार्षिक आठ लक्ष रुपये पेन्शन दिली व विठूर या ठिकाणी

वास्तव्यास ठेवले. पेशवा बाजीराव दुसरा १८५२ मध्ये मरण पावला. त्याने धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब नामक पुत्र दत्तक घेतला होता. या दत्तक पेशवा नानासाहेबास कंपनीने पेन्शन, पदव्या बहाल करण्यास नकार दिला. नानासाहेबांनी यासंबंधी १८५२ मध्ये इंग्रज सरकारकडे अर्ज सादर केला होता. पण त्याचा काही विचार झाला नाही. पेशवे नानासाहेब यांनी आपला सेवक अजीमुल्लाखान यास लंडनला राणीच्या दरबारात सुद्धा पाठवले होते. पण याचा सुद्धा पेशवा नानासाहेब यास काहीच फायदा झाला नाही. शेवटी लॉर्ड डलहौसीने नानासाहेबची पदव्या पेन्शन व छोटी जहागीर जप्त केली.

## २. तंजावर :-

तंजावरच्या शासकांचीचे राज्य खालसा झाले होते. फक्त आता त्याच्याजवळच पेन्शन व छोटी जहागिर शिल्लक राहिली होती. तंजावरचा शासक १८५५ मध्ये मृत्यू पावल्यावर त्याच्या मुलीचा वारसा हक्क अमान्य केल्या गेले. त्याला निपुत्रिक घोषित करून त्याची पेन्शन व छोटी जहागीर व खाजगी संपत्ती जप्त करण्यात आली.

## ३. कर्नाटक :-

कर्नाटकचा शासक अजीमशहा या दत्तक पुत्राचे राज्य खालसा कले. लॉर्ड डलहौसीने पूर्वीचा नवाब मोहम्मद गौसची पेन्शन, जागीर व पदव्या रद्दबातल केल्या. त्यामागे कारण दिले की दिवंगत नवाबाची उपाधी केवळ व्यक्तिगत स्वरूपाची होती. त्यामुळे वारसाहक्काने ती कोणालाही मिळण्याची शक्यता नाही.

## ४. मुघल बादशहा बहादूरशहा जफर :-

लॉर्ड डलहौसीने मुघल बादशहा बहादूरशहा जफर यांची 'बादशाह' पदवी रद्द करण्याची आणि त्याला मिळत असलेले १२ लक्ष रुपये वार्षिक पेन्शन बंद करण्यासाठी खटाटोप केला होता. पण या डलहौसीच्या योजनेस कंपनीच्या संचालकांनी परवानगी दिली नाही.

## ५. इनाम जमिनीवरील कर :-

इंग्रजांच्या पूर्वीच्या शासकाकडून अनेक धार्मिक संस्थांना व व्यक्तींना करमुक्त जमिनी मिळाल्या होत्या. ग. ज. बेंटींगच्या काळात अशा लाभ घेणाऱ्यांना अनुदान पत्रे व संबंधित कागदपत्रे दाखविण्यास बजावण्यात आले होते. परंतु अशा प्रकारचे पुरावे कागदपत्रे दाखविण्यास ते असमर्थ असल्याने लॉर्ड बेंटींगने त्यांच्या करमुक्त जमिनीवर कर आकारणी केली होती. जे कर भरू शकले नाहीत त्यांच्या जमिनी जप्त करण्यात आल्या होत्या. लॉर्ड डलहौसीने यासाठी इनाम कमिशनची स्थापना करून अनेक जमीनदारांना आदेशाने भूमिहीन करण्यात आले. मुंबई इलाख्यात २०००० जहागिरी, इनाम जमिनी जप्त करण्यात आल्या होत्या.

## ९) लॉर्ड डलहौसीच्या विलीनीकरण धोरणाचे परिणाम :-

१. भारतात कंपनीच्या साम्राज्याचा फार मोठा विस्तार झाला.

२. कंपनीच्या साम्राज्याचे प्रादेशिक व प्रशासकीय ऐक्य साधले गेले.

३. भारताला आधुनिकतेचा मार्गावर आणून ठेवले.

४. भारताची अर्थव्यवस्था इंग्लंडच्या उद्योगाच्या उंन्नती करता जुंपली गेली.

५. खालसाकरण नितीमुळे ब्रिटिशांविरुद्ध संताप तीव्र झाला

६. १८५७ चा उठाव घडून आला.

७. भौतिक सुधारणांचे नवे युग सुरू झाले.

८. साम्राज्य विस्तारामुळे व विलीनीकरण धोरणामुळे कंपनीचे उत्पन्न ४० लाख रुपये वाढले.

लॉर्ड डलहौसीने भारतातील देशी राज्यांचे विलीनीकरण केले. ज्या देशी राज्यांचे विलीनीकरण झाले त्या राज्यांचा एकूण प्रदेश विस्तार इंग्लंड व वेल्सचा दुप्पट होता. हा लॉर्ड डलहौसीचा कार्यकाळ म्हणजे कंपनीच्या विस्तारवादी धोरणाचा परमोच्च बिंदू होता. लॉर्ड डलहौसीने कंपनीचे संपूर्ण राज्यात रुपांतरण केले. त्याने  मुगलांची व पेशव्यांची नामधारी सत्ता कंपनीच्या प्रभावाखाली आणली. त्यामुळे लॉर्ड डलहौसीला ब्रिटिश भारतातील महान गव्हर्नर जनरल म्हणून गणल्या जाते.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ❊

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. भारतात विलिनीकरणाचे तत्व .................. याने लागू केले.

*अ) राबर्ट क्लाईव्ह* *क) लॉर्ड वेलस्ली*

*ब) लॉर्ड वॉरन हेस्टिंग्ज* *ड) लॉर्ड डलहौसी.*

२. शिखांचा शेवटचा राजा .................. हा होय.

*अ) दिलीपसिंग* *ब) गुलाबसिंह* *क) खडकसिंह* *ड) दिलावरसिंह.*

३. सातारा राज्य ......................... या वर्षी विलीन करण्यात आले.

*अ) १८४५* *ब) १८४६* *क) १८३७* *ड) १८४८.*

४. छोटा उदेपूर हे संस्थान .................. या राज्याचा भाग होता. .

*अ) महाराष्ट्र ब) छत्तीसगड क) कर्नाटक ड) राजस्थान.*

५. ................ या पेशव्याची पेन्शन कंपनीने बंद केली होती.

*अ) बाजीराव दुसरा ब) नाना फडणवीस क) नानासाहेब ड) तात्या टोपे.*

## २.३ सारांश

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी कंपनी होती. कंपनीने भारतातील अस्थिर राजकीय परस्थितीचा फायदा घेवून व्यापारी आणि लष्करी कंपनी म्हणून नावारूपास आली. कंपनीने भारतात सुरवातीला जे प्रदेश प्राप्त केले त्या प्रदेशाच्या सुरक्षिततेसाठी कंपनीने काही धोरणे राबवली होती. या धोरणानुसार कंपनीचे साम्राज्य निर्माती म्हणून रुपांतर झाले.

कंपनीने भारतात प्राप्त झालेला बंगाल प्रांतात दुहेरी शासन व्यवस्था लागू केली. बंगाल प्रांतात तत्कालीन परस्थितीत लागू केलेली एक राजकीय क्रांतीच होती. परंतु ही क्रांती बंगाली जनतेच्या दृष्टीने अनर्थकारी ठरली. पुढील काळात कंपनीच्या भारताती प्रदेशाला कोणतेही झळ पोहचू नये म्हणून दुहेरी शासन व्यवस्था बंद करण्यात आली. कंपनीची तत्कालीन स्थिती ही संपूर्ण भारतावर साम्राज्यविस्ताराची नसल्याने कंपनीने भारतात प्राप्त केलेल्या प्रदेशालाच संरक्षित केले होते.

कंपनीच्या काही साम्राज्यविस्तारवादी धोरणांमधील महत्त्वाकांक्षी धोरण तैनाती फौजेचे होय. कंपनीच्या शांततेच्या व तटस्थतेच्या धोरणामुळे जी राजकीय हानी झाली होती ती भरून काढण्यासाठी तैनाती फौजेचे धोरण राबविण्यात आले. या धोरणामुळे कंपनीची पाळे-मुळे घट्ट झालीत. तैनाती फौजेने कंपनीच्या प्रदेशाचे महत्वपूर्ण सत्तेत रूपांतर केले.

आता कंपनी भारतातील एकमेव सत्ता म्हणून नावारूपास आली होती. तरी सुद्धा व्यापारी.दृष्टिकोनातून भारतीय बाजारपेठांवर कंपनीचे नियंत्रण रहावे यासाठी भारतीय राज्यांचे विलीनीकरण कंपनीच्या प्रदेश होणे आवशक होते. यासाठीच विलीनीकरणाचे तत्व या धोरणाची निर्मिती होती. संपूर्ण भारतावर एकमेव कंपनीची सत्ता राहावी भारत ही हक्काची बाजारपेठ व्हावी यासाठी कोणत्याही भारतीय शासकांचा अडसर कंपनीला नको होता. या धोरणा अंतर्गत संपूर्ण भारत कंपनीच्या अधिपत्याखाली आला होता.

कंपनीची सत्ता भारतात निर्माण होण्यासाठी जेवढे कंपनीची विविध धोरणे जबाबदार आहेत तेवढेच जबाबदार ते धोरणे राबविणारे कंपनीचे गव्हर्नर जनरल आहेत. असे कर्तृत्ववान, दूरदृष्टीचे धोरणे ठरविणारे व राबविणारे जर एकाच महत्वाकांक्षेने काम करीत राहिलेत तर भवितव्य उज्वल राहते. असे यावरून दिसून येते.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **श्वेत विद्रोह :** भारतातील ईस्ट इंडिया कंपनीच्या गोऱ्या सैनिकांनी कंपनी विरुद्ध केलेला विद्रोह म्हणूनच या बंडाला श्वेत विद्रोह असे म्हणतात. या बंडखोरीचे मुख्य कारण रॉबर्ट क्लाईव्हचे धोरण होते. ज्यात सैनिकांचे दुप्पट भत्ता इत्यादी बंद करणे हे मुख्य कारण होते.

२. **क्लाईव्ह कोश :** कंपनीच्या युद्धात जखमी व मृत झालेल्या सैनिकांसाठी उभारलेला साह्यता निधी.

३. **दस्तक :** बादशहा फरुखसियरने कंपनीनीला दिलेले करमुक्त व्यापाराचे पारपत्र.

४. **रबर स्ट्म्प :** कंपनीच्या आदेशानुसार वागणारा.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

*१. ड) कारकून.*

*२. अ) बंगाल.*

*३. ब) राबर्ट क्लाईव्ह.*

*४. क) दिल्लीचा बादशाह व अवधचा नवाब.*

*५. ड) १७७२.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

*१. क) लॉर्ड वेलस्ली.*

*२. ब) हैद्राबाद-निजाम.*

*३. अ) दुसरा बाजीराव व इंग्रज.*

*४. ड) नेपोलियन*

*५. अ) श्रीरंगपट्टणम.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

*१. ड) लॉर्ड डलहौसी.*

*२. अ) दिलीपसिंग.*

*३. ड) १८४८.*

*४. ब) छत्तीसगड.*

*५. क) नानासाहेब.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### २.६.१ टिपा लिहा.

१. दुहेरी शासन व्यवस्थेचे स्वरूप.

२. अलाहबादचा तह (१६ ऑगस्ट १७६५)

३. तैनाती फौज.

४. तैनाती फौजेचे फायदे.

५. तैनाती फौजेचे दोष.

६. विलीनीकरण धोरण.

### २.६.२ दीर्घोत्तरी प्रश्न.

१. दुहेरी शासन व्यवस्थेचे परिणाम विशद करा.

२. दुहेरी शासन व्यवस्था बंगाल प्रांतात लागू करण्याची कारणे सांगा.

३. तैनाती फौजा स्वीकारणाऱ्या शासकांचा सविस्तर वृतांत लिहा.

४. विलीनीकरण सिद्धांताची सविस्तर माहिती लिहा.

५. विलीनीकरणाच्या कारणांची पार्श्वभूमी सांगा.

## २.६ संदर्भग्रंथ सूची व अधिक वाचनासाठीची पुस्तके

१. **Cohn, Bernad**, *Colonialism and its forms of Knowledge*, Princeton University Press, New Jersey, 1928.

२. **Jemes Mill**, *The History of British India*, Vol. I, II, III, Printed for Baldwin Cradack and Joy, London, 1817.

३. **Mukherji, Ramkrishna**, *The Rise and Fall of the East India Company*, Web Deutscher VErlag Der Wissenschaften Berlin, 1958 (S.E.)

४. **Pannikar, K. M.**, *The Evolution of British Policy Towards Indian State : 1774-1858*, Published under the Authority of the Culcutta University by S. K. Lahari & Co., Culcutta.

५. **Warner, Sir Willium**, *The Native State of India*, MacMillan & Co. Limited, London, 1910.

६. **ग्रोव्हर, बी.एल. व मेहता, अलका, यशपाल**, *आधुनिक भारत का इतिहास : एक नवीन मुल्यांकन,* (१७०७ से वर्तमान समयतक), एस. चंद और कंपनी, नई दिल्ली. २००८.

७. **तळवलकर, गोविंद**, *सत्तांतर-१९४७*, (खंड-१) मौज प्रकाशन गृह, मुंबई -१९८३.

८. **ताराचंद**, *भारतीय स्वतंत्रता आंदोलन का इतिहास*, (खंड-१) प्रकाशन विभाग सूचना एवं प्रसारण मंत्रालय भारत सरकार, जून -२०१७.

९. **बंडोपाध्याय, शेखर**, *प्लासी से विभाजन तक : आधुनिक भारत का इतिहास*, ओरियेंटल ब्ल्याकस्वान प्रा. लिमिटेड, हैद्राबाद -२०१६.

१०. **वैद्य, सुमन व कोठेकर, शांता**, *आधुनिक भारताचा इतिहास : १७५७ ते १८५८*, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर- २००४.

११. **शुक्ल, आर. एल.(संपा.)**, *आधुनिक भारत का इतिहास*, (स्वतंत्रता प्राप्ती एवं देश विभाजन तक) हिंदी माध्यम कार्यान्वयन निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, २००३.

१२. **सेंगर, शैलेंद्र**, *आधुनिक भारत का इतिहास*, अटलांटिक प. और डी. नई दिल्ली, २००५.

१३. **वर्मा, हरिश्चंद्र**, *मध्यकालीन भारत-१५४०-१७६१*, (खंड-२) हिंदीमाध्यम कार्यान्वयन निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, २००३.

१४. **वाक्कानी, नी. आ.**, *आधुनिक भारताचा इतिहास-ब्रिटीश कालीन भारत (१७५७-१९६५)*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८.

❑❑❑

सत्र-३ : घटक-३

# वसाहतकालीन अर्थव्यवस्था
## (Making of Colonial Economy)

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ महसूल व्यवस्था (कायमधारा, रयतवारी आणि महालवारी पद्धती)

३.२.२ भारतातील उदयोगधंद्याचा ऱ्हास/ अनुद्योगिकरण (De-industrialization)

३.२.३ आर्थिक नि:स्सारण अथवा संपत्तीचे नि:स्सारण (Drain of Wealth)

३.३ पारिभाषीक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ संदर्भ ग्रंथ/अधिक वाचनासाठीची पुस्तके


## ३.० उदिष्टे

या प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणास खालील बाबी समजून येतील

१. ब्रिटीशांचे भारतातील कृषिविषयक धोरण समजण्यास मदत होईल.

२. कायमधारा, रयतवारी, महलवारी पद्धतीचे स्वरूप, संकल्पना, फायदे व तोटे सांगता येतील.

३. अनुद्योगिकरण म्हणजे काय? संकल्पना, स्वरूप समजून घेण्यास मदत होईल.

४. भारताच्या औद्योगिक ऱ्हासाची कारणमीमांसा व परिणाम काय झाले समजून घेण्यास मदत होईल.

५. आर्थिक नि:स्सारण म्हणजे काय? संकल्पना, स्वरूप व टप्पे समजून घेण्यास मदत होईल.

६. भारताच्या आर्थिक नि:स्सारणाची कारणमीमांसा स्पष्ट करून सांगता येईल.

७. आर्थिक नि:स्सारणाचे परिणाम काय झाले, त्याचे विश्लेषण समजून घेण्यास मदत होईल .

८. आर्थिक नि:स्सारणाविषयीचे दृष्टीकोण समजून घेण्यास मदत होईल.

## ३.१ प्रस्तावना

भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनी एक व्यापारी कंपनी म्हणून आलेली होती. व्यापारच्या माध्यमातून अधिकाअधिक फायदा प्राप्त करणे हा त्यांचा मूळ उद्देश होता. १८ व्या शतकात भारतातील अस्थिर राजकीय परिस्थिचा फायदा घेत कंपनीने एक एक प्रदेश पादाक्रांत केला. बंगालचा नवाब व मुघल बादशहाकडून मिळालेले मुलकी व दिवाणी अधिकार राजकीय सत्ताकेंद्र स्थापन करण्यास पोषक ठरले. बंगालमध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर कंपनीने व्यापाराबरोबर राजकीय विस्ताराचे धोरण स्वीकारले. अनेकविध नैतिक-अनैतिक मार्गांचा अवलंब करत कंपनीने भारतातील उघोग, हस्तकला व्यवसाय, लघुउघोग नष्ट केले. आर्थिक पिळवणुकीचे धोरण स्वीकारले. परिणामी शेतीवर अतिरीक्त बोजा पडू लागला. उघोगधंद्यातून बेकार झालेले कारागीर उदरनिर्वाहासाठी शेतीकडे वळले. शेतावर त्यामुळे मोठ्या प्रमाणात ताण पडू लागला. कंपनीच्या अगोदरच्या काळात जमिनदारांना शेतसाऱ्यात वाढ करण्याचा अधिकार नव्हता. कंपनीच्या काळात मात्र जमीन महसूल ही बाब राज्याचे उत्पन्न मानले गेल्याने जादा जमीन महसूल वसूल करण्याकडे कंपनीने अधिक भर दिला. कायमधारा, रयतवारी आणि महालवारी जमीन महसूल पद्धतीचा वापर केला. महसूल कर वाढल्यामुळे भारतीय शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला. खते, बि-बीयाणे, कृषी साधनाचा अभाव, ओले व कोरडे दुष्काळ आणि सक्तीची जमीन महसूल पद्धती यामुळे शेतकरी कर्जबाजारी बनला. सावकारांना जमीनी विकून महसूल भरावा लागे. कर्ज थकल्यास जमीनींचे लिलाव होण्यास सुरवात झाली. भारतातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असल्याने शेतीचे उत्पादन मर्यादित होते. कंपनी सरकारने शेतीकडे लक्ष दिले नाही. शेतीच्या क्षेत्रात इंग्रजानी आर्थिक साम्राज्यवाद चालू केला. शेतीचे व्यापारीकरण केले. युरोपमध्ये घडून आलेली औद्योगिक क्रांती व १८१३ मध्ये संपुष्टात आलेली कंपनीची व्यापारी मक्तेदारी यामुळे ब्रिटिश सरकारने भारताबाबत खुल्या व्यापारचे धोरण स्वीकारले. खुल्या व्यापाराच्या स्पर्धेत भारतातील हस्तद्योग तग धरू शकले नाहीत. भारतीय उघोगधंद्याचा त्यातून ऱ्हास घडून आला. भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम घडून आले. ब्रिटिशानी अनेकविध मार्गानी संपतीची लूट केली. भारतातून झालेल्या या लूटी विरुद्ध भारतीय विचारवंतांनी आवाज उठवण्यास सुरवात केली. राष्ट्रवादी विचारांची मांडणी सुरू झाली. प्रस्तुत प्रकरणात आपण या खालील उपघटकांचा अभ्यास करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

## ३.२.१ महसूल व्यवस्था (कायमधारा, रयतवारी आणि महालवारी पद्धती)

### ❑ ब्रिटीशांचे जमीन महसूलविषयक धोरण :-

भारतामध्ये ब्रिटिशांनी जमीन महसूल विषयक जे धोरण स्वीकारले, त्याविषयी जेम्स मिल्ल, डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर, एडवर्ड बर्क व जेम्स कनिंगहॅम डेव्हिस इत्यादी ब्रिटिश अधिकारी आणि आर. सी. दत्त, दादाभाई नौरोजी, प्रो. तपन रे चौधरी आणि बी. बी. चौधरी इत्यादी भारतीय विचारवंतांनी लिखाण केलेले आहे. ब्रिटीशांच्या जमीन महसूल धोरणावर यांच्या लिखाणातून प्रकाश पडतो. प्रारंभीच्या काळात ईस्ट इंडिया कंपनीचे स्वरूप व्यापारी होते. व्यापारातून नफा मिळवणे हा त्यांचा प्रमुख हेतू होता. मात्र १८ व्या शतकात भारतात निर्माण झालेली राजकीय अस्थिरता, केंद्रीय सत्तेचा अभाव, प्रादेशिक सत्तांचा उदय व त्यांच्यातील अंतर्गत संघर्षचा फायदा घेत कंपनीने आपला राजकीय प्रभाव निर्माण केला. अंतर्गत राजकीय परिस्थितीचा फायदा घेवून बंगालमध्ये सन १७५७ मध्ये राजकीय सत्तेचा पाया भक्कम केला. त्याच बरोबर कंपनीला दिवाणीचे अधिकार प्राप्त करून घेतले. व्यापार व जमीन महसूलाच्या माध्यमातून संपत्ती प्राप्त करण्याचे प्रभावी साधन आहे याची कंपनीला जाणीव झालेली होती. आपल्या राजकीय सत्तेचा विस्तार करताना येथील जास्तीत-जास्त संपत्ती इंग्लंडला नेण्याची त्यांची भूमिका होती. ब्रिटिशपूर्व कालखंडात भारतीय अर्थव्यवस्था स्वयमपूर्ण होती. शेतीचे स्वरूप पारंपरिक होते. दैंनंदिन जीवनाला लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचे उत्पादन करणे, अतिरिक्त उत्पादनाच्या माध्यमातून इतर आवश्यक वस्तूंची खरेदी करत आणि धान्याच्या स्वरुपात जमीन महसूल जमा करीत. मुघल राज्यकर्त्यांनी जो जमीन महसूल जमा केला त्या महसूलाचा त्यांनी येथेच विनियोग केला पैसा बाहेर गेला नाही. मात्र ब्रिटीशांनी वसाहतवादी दृष्टीकोणातून येथे राजकीय सत्ता स्थापन केल्यानंतर येथील चित्र बदलेले. ब्रिटीशांनी जमा केलेल्या जमीन महसूलाचा विनियोग येथे न करता इंग्लंडमधील औद्योगिक प्रगती, स्वआर्थिक विकास आणि आपल्या आर्थिक गरजापूर्ण करून घेण्यास सुरवात केली. ब्रिटीशांनी जमीन महसूलाची वसूली धान्याच्या स्वरुपात न करता तो रोख पैशाच्या स्वरुपात करण्यास सुरवात केली, त्यामुळे येथील शेतकरी पारंपरिक शेती ऐवजी नगदी पीके घेवू लागला. त्यातून पुढे शेतीचे व्यापारीकरण घडून आले. भारतीय शेतीचे व्यापारीकरण म्हणजे ब्रिटीशांच्या वसाहतवादी धोरणाचा तो अप्रत्यक्ष परिणाम होता. ब्रिटिशपूर्व कालखंडात शेतकऱ्याचा जमिनीवरील मालकी हक्क मान्य केलेला होता. जमीनदारांना जमीन महसूलात वाढ करण्याचा अधिकार नव्हता. मात्र ब्रिटीशांना नबाब अझिमुश शहा याच्याकडून कलकत्ता, गोविंदपूर व सतनाटी येथील जमीनदारीचे अधिकार प्राप्त झाले. कंपनीने राल्फ शेल्डन या जमीनदारची नेमणूक केली. त्याने भारतात जमीन महसूल पद्धतीत नवीन पद्धतीची सुरवात केली. प्रचलित असलेल्या पारंपरिक

जमीनदारापेक्षा कंपनीने नेमलेल्या जमीनदारला शेतीचे अधिकार प्राप्त झाले. येथून पुढे कंपनीने भारतात जमीनदारी, कायमधारा, रयतवारी आणि महालवारी पद्धतींचा अवलंब केलेला दिसतो.

## अ) कायमधारा पद्धती :–

### १. कायमधारा पद्धतीचीमूळ संकल्पना :–

भारतातील जमीन महसूल धोरणाचा महत्वाचा टप्पा म्हणून कायमधारा पद्धतीचा उल्लेख केला जातो. कायमधारा पद्धतीची मूळ संकल्पना फ्रेंच निसर्गवादी अर्थतज्ञाची असून ती सन १७७०–८० च्या दशकामध्ये ती इंग्लंडच्या अर्थतज्ञानी स्वीकारली असे प्रो. रणजीत गुहा म्हणतात. फिलिप फ्रान्सिस याने या पद्धतीचा स्वीकार केला. या पद्धतीचा मूळ हेतू बंगालमधील शेतीची भरभराट करणे, बंगालची वाढती दयनीय अवस्था दूर करणे हा होता. अलेक्झाडर डोव्ह याने सन १७७० मध्ये कायमधारा पद्धतीची प्रथम मांडणी केली याला Revenue Plan असे म्हणतात. डोव्हच्या योजनेचा आधार घेत फिलिप फ्रान्सिस याने कंपनीस काही शिफारसी केल्या. त्या शिफारसीनुसार जमीनदारांना जमीनीचा मालकी हक्क मिळवा, जेणे करून जमीनदारांचा एक निष्ठावंतांचा एक वर्ग तयार होईल असे त्याचे मत होते. कंपनीने या व इतरकाही शिफारसींचा विचार करून भारतात कायमधारा पद्धतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला. लॉर्ड कॉर्नवॉलीसने या पद्धतीची अमलबजावणी केली हे जरी खरे असले तरी या पद्धतीचा विचार विनिमय १७६५ पासून सुरू होता. अलेक्झाडर डोव्ह, फिलिप फ्रान्सिस, हेनरी पटूल्लो यांची भूमिका महत्वाची होती.

### २. कायमधारा पद्धतीची सुरवात :–

सन १७८६ मध्ये वॉरन हेस्टिंगजच्या ठिकाणी लॉर्ड चार्ल्स कॉर्नवॉलीस बंगालच गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आला. या काळात बंगालमध्ये शेतीची समस्या भयंकर बनलेली होती. सन १७७७ मध्ये कंपनीच्या संचालक मंडळाने दरवर्षी महसूल ठरवावा अशी योजना आखलेली होती. १७८१ मध्ये 'कमिटी ऑफ रेव्हेन्यू' रद्द करून 'बोर्ड ऑफ रेव्हेन्यू' ही संस्था स्थापन केली. कारण लॉर्ड वेलस्लीच्या लिलाव पद्धतीत अनेक दोष असल्याने बंगालमध्ये दुष्काळी परिस्थिति निर्माण झालेली होती. आर्थिक परिस्थितिने त्रस्थ झालेल्या शेतकऱ्यांनी कंपनी विरुद्ध उठाव करण्यास सुरवात केलेली होती. कंपनीला महसूलाचे उत्पन्न व्यवस्थित व सुरळीत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची स्थिती सुधारणे आवश्यक होते. लॉर्ड कॉर्नवॉलीसने त्यामुळे महसूल व्यवस्था व जमिनीच्या मालकी हक्काची पहाणी करण्यासाठी जॉन शोअर याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. शोअरने जमिनीचा मालकी हक्क, जमीनदार वर्ग, त्यांचे अधिकार, सावकार, शेतकऱ्याची आर्थिक पिळवणूक इत्यादी संबंधीचा अहवाल सादर केला. या अहवालानुसार लॉर्ड कॉर्नवॉलीसने २२ मार्च १७९३ रोजी बंगाल व बिहार या भागात प्रथम कायमधारा

पद्धती लागू केली व नंतर ओरिसा, मद्रास इलाख्यातील उत्तरेकडील जिल्हे आणि वाराणसी जिल्ह्यात लागू केली. यानुसार शेतसारा वसूल करण्याचा अधिकार जमीनदारांना देण्यात आला. प्रत्येक शेतकऱ्यावरील सारा परंपरेनुसार कायम करण्यात आला. या पद्धतीला जहागिरदारी, मालगुजारी, बिस्वेदारी पद्धती म्हणूनही ओळखले जाते.

## ३. कायमधारा पद्धतीची वैशिष्ट्ये :-

लॉर्ड कॉर्नवालिसने ही पद्धत लागू केली त्याची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे होती,

१) कायमधारा पद्धतीच्या द्वारे कंपनीला निश्चित प्रमाणात नियमितपणे महसूल मिळावा.

२) जमीन महसूलाच्या दराच्या वारंवार तपासणीसाठी खर्च न करता या पद्धतीने मिळणाऱ्या उत्पन्नाची निश्चिती करण्यात आली.

३) महसूल किती असावा व तो कोणी गोळा करावा हे स्पष्ट केलेले होते.

४) ब्रिटिश सरकार, महसूल गोळा करणारे जमीनदार व शेतकरी या तीनप्रमुख घटकांचा समावेश होता.

५) महसूलाची पूर्ण रक्कम जमीनदाराने ठरावीक मुदतीत ब्रिटिश सरकारच्या तिजोरीत भरणे आवश्यक होते. जमीनदाराने रक्कम न भरल्यास त्याचा महसूल गोळा करण्याचा अधिकार आणि त्याच्या ताब्यातील जमीन काढून घेण्याचा शासनाला अधिकार होता.

६) कायमधारा पद्धतीच्या अंमलबजावणीमुळे कंपनीला कायमस्वरूपी पाठिंबा देणारा वर्ग निर्माण करणे.

७) शहरी भागात उदयास आलेल्या नवश्रीमंत वर्गांना शेतीकडे आकर्षित करणे.

८) शेतसाऱ्याची किंवा खंडाची निश्चिती केल्यामुळे शेतकरी अधिक उत्पादन करतील अशीही या पद्धतीमागील कल्पना होती.

## ४. कायमधारा पद्धतीची कलमे :-

कायमधारा पद्धती सुरू करत असताना प्रामुख्याने तीन कलमांचा समावेश यामध्ये केलेला होता, ती खालील प्रमाणे,

१) पूर्व बंगाल, बिहार व ओरिसा प्रांतातील जमीन मालकाशी महसूलासंबंधी १० वर्षाचा जो करार झाला होता, तो करार कायमधारा पद्धतीत 'जमाबंदी' ध्यानात घेवून कायम करण्यात

येईल. १० वर्षाची मुदत संपल्यानंतरही हा करार सुरू राहील. या कराराला कंपनीच्या संचालक मंडळाची मान्यता घेणे जरूरी राहील. तरच हा करार अस्तीत्वात आला असे मानले जाईल.

२) बंगाल, बिहार व ओरिसा प्रांतातील सर्व जमीनदार, स्वतंत्र तालुकदार व प्रत्यक्ष शेती करणारे खाजगी जमीन मालकांना त्यांच्या जमिनीची मोजणी गव्हर्नर जनरल किवा गव्हर्नर जनरल इन कौन्सिल मार्फत केली जाईल.

३) जमीनदार, तालुकदार, प्रत्यक्ष शेती करणारे खाजगी जमीनमालक यांच्याशी प्रत्यक्ष अथवा त्यांच्या मध्यस्थीशी केलेला करार यात कोणताही बदल न करता कायम स्वरूपी असेल.

## ५. कायमधारा पद्धतीची कार्यपद्धती :-

१) कायमधारा पद्धतीत शासन-जमीनदार-शेतकरी या ३ वर्गांचा समावेश होता मात्र शासन व प्रजेचा सबंध येत नव्हता.

२) जॉन शोअरने ही पद्धत प्रथम १० वर्षासाठी सुचवली होती परंतु कॉर्नवालीसने ती कायमस्वरूपी केली.

३) कायमधारा पद्धतीत गेल्या काही वर्षातील शेतजमिनीच्या उत्पन्नाची सरासरी काढून दरवर्षी त्या जमिनीमागे किती सारा निश्चित करता येईल याचा विचार करून वर्षाकाठी महसूलाची निश्चित रक्कम ठरवली गेली व १० वर्षाच्या कराराने जमिनदारांना जमीन महसुल वसुलीसाठी देण्यात आली.

## ६. कायमधारा पद्धतीचे स्वरूप :-

१) बंगाल, बिहार आणि ओरिसा मधील जमीनदार, छोटे शेतकरी व इतर जमीन मालकांच्या जमीनीची मोजणी करून त्यांना कायम स्वरूपी महसूल ठरवून देण्यात आला. जमिनीची मालकी जमीनदाराकडे देण्यात आली.

२) जमिनदारांनी सरासरीप्रमाणे जास्तीत जास्त सारा निश्चित करून ठराविक सारा सरकारला देतील असे ठरले. जमीनदार जमीन विकू शकत असे, गहाण ठेवू शकत असे, दान करू शकत असे.

३) निश्चित काळात शेतसारा जमीनदाराकडे जमा करणे सक्तीचे होते अथवा शेतकऱ्यांना आपल्या जमिनी गहाण टाकाव्या लागत.

४) जमीनदारास भूमिविषयक सर्व अधिकार वंशपरंपरेने प्राप्त झाले.

५) शेतकऱ्याकडून घेण्यात येणाऱ्या साऱ्याच्या रकमेच्या ८९% भाग सरकारला तर ११% भाग जमीनदारला मिळावा अशी तरतूद होती.

६) सरकारची महसूलाची रक्कम पूर्ण न भरल्यास किवा निश्चित वेळेस न भरल्यास जमीनदाराचा महसूल जमा करण्याचा अधिकार रद्द केला जाईल.

७) कंपनी सरकारने एकदा ठरवून दिलेल्या जमीन महसूलात बदल करता येणार नव्हता.

८) जमीनदाराबरोबर कंपनी सरकारने करार करून त्यांना महसूल वसूल करण्याचे अधिकार दिले. जमीनीची मालकी जमीनदाराकडे देण्यात आली. जमीनदार आपल्या कुळाकडून महसूल वसूल करू लागले, ठरवून दिलेला महसूल सरकारात भरणे व शिल्लक राहिल्यास तो स्वतःजवळ ठेवण्याचे अधिकार जमीनदाराना मिळाले.

९) जमीनदाराने ठरवून दिलेला महसूल कुळांनी भरावा त्यात त्यांना कोणतीही सूट मिळणार नव्हती. जमीनदाराकडे पूर्वी असलेले शांतता-सुव्यवस्थेचे काम काढून घेतले, जमीन विक्रीचे अधिकार कंपनीने मान्य केले.

१०) जमीनदार व शेतकऱ्यांना जो वारसा हक्क कर भरावा लागत होता तो कंपनीने बंद केला. जोपर्यत जमीनदार व शेतकरी जमीन महसूल नियमित भरतील तोपर्यत त्याचे जमीनवरील हक्क अबाधित ठेवण्यात आले.

११) जमीनदारांना कुळे पट्टयांद्वारे महसूल कर भरतील, जमीनदारांना जमीन महसूल वाढवायचा असेल तर त्यांना सरकार किंवा न्यायालयाची परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले.

१२) बंगालमधील जमीनीचे सर्वेक्षण करून तेथील जमीनीचे श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ अशी वर्गवारी करून त्याप्रमाणे महसूल कर कायम करण्यात आला त्याच्यासाठी मागील महसूल जमाबंदीचा आधार घेतला.

## ७. कायमधारा पद्धतीचे फायदे :-

कायमधारा पद्धतीचे काही फायदे दिसून येतात ते खालील प्रमाणे

१) कंपनी सरकारचे उत्पन्न निश्चित झाले. या उत्पनाचा शेतीच्या कमी-जास्त उत्पन्नाशी सबंध नव्हता.

२) जमिनदारांना आपल्या जमिनीतून अधिक उत्पन्न काढण्यास प्रोत्साहन मिळाले कारण उत्पन्न वाढले असले तरी सारा जास्त भरण्याची गरज नव्हती.

३) कायद्याने जमीनदार वर्गाची स्थिति मजबूत झाली, शिवाय या व्यवस्थेमुळे जमीनदार वर्ग समृद्ध बनला हाच वर्ग इंग्रजी राजवटीचा समर्थक म्हणून पुढे आला.

४) या पद्धतीमुळे कंपनीचा महसूल व्यवस्थेत गुंतलेला वर्ग या कार्यातून मुक्त झाला व या वर्गास इतर कार्यात गुंतविणे कंपनीला शक्य झाले.

५) कंपनीचा जमीन महसूल जमा करण्याचा खर्च कमी झाला.

६) शेती व्यवसायाखाली येणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रामध्ये वाढ झाली.

## ८. कायमधारा पद्धतीचे तोटे :-

कायमधारा पद्धतीत काही तोटे दिसून येतात ते खालील प्रमाणे,

१) कायमधारा पद्धतीमुळे बंगाल, बिहार व ओरिसात कुळकरी, वहिवाटदार, वाटेकरी, खंडकरी निर्माण झाले परिणामी शेतीचे तुकडे पडले.

२) शेतकऱ्याचे जमीनीवरील अथवा जमिनीवरची गावाची मालकी संपुष्टात येवून जमीनदार मालक बनले. ग्रामजीवन विस्कळीत झाले. कृषीव्यवस्थेचे स्थैर्य नष्ट झाले. बंगालमधील शेतकरी मोठ्या प्रमाणात निर्धन व भूमिहीन झाले.

३) जमीनदार शेतकऱ्यांचे शोषण करू लागले,शेतसारा जादा दराने व जबरदस्तीने गोळा करू लागले. त्यामुळे शेतकऱ्याची स्थिति दयनीय झाली.

४) जमीनदारानी कंपनीला विशिष्ठ महसूल देण्याचे मान्य केल्याने दुष्काळ असो अथवा आपत्ती असो ठरलेला महसूल भरावे लागे परिणामी त्यांनी सावकारी कर्ज घेण्यास सुरवात केली. पुढे ज्या जमिनीसाठी महसूल भरायचा तिचीच विक्रीची वेळ शेतकऱ्यावर आली. जमिनीचा मालक असेलेला शेतकरी मजूर अथवा कुळ म्हणून काम करू लागला.

५) नव्या जमीनदार सावकारी वर्गाचा उदय झाला. जमीनदारकडे असलेल्या शेतीवर 'खाजगी मालमत्ता' ही संकल्पना रूढ झाली.

६) कायमधारा पद्धतीत दिलेल्या दिवशीच महसूल भरावा लागे. ठरलेल्या दिवशी जमीन महसूल भरला नाही तर सरकार जमीनीचे लिलाव करीत असे. त्यामुळे शेतकऱ्याच्या जमीनीची कवडीमोल किमतीने विक्री केली जावू लागली.

७) जमीनदार शहरात राहणारे होते त्यांनी आपल्या हस्तक अथवा दलालामार्फत करांची वसुली करू लागले त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होऊ लागला.

८) सरकारने फक्त महसूली उत्पन्नावर डोळा होता, जनतेच्या हिताचा विचार नव्हता. महसूलाच्या बाबतीत सरकारची मागणी निश्चित असे परंतु जमीनदार शेतकऱ्याकडून जो महसूल गोळा करीत तो जास्त असे किवा परिवर्तनशील असे.

## ब) रयतवारी पद्धती :-

१८ व्या शतकामध्ये भारतामधील दुसरी महत्वाची जमीन महसूल पद्धत म्हणजे रयतवारी होय. ही पद्धती एका विशिष्ट परिस्थितीमध्ये भारतात लागू करण्यात आलेली होती. लॉर्ड कॉर्नवालीसने सुरू केलेल्या कायमधारा पद्धतीत फायद्या पेक्षा तोटेच अधिक असल्याने त्याचे दुष्परिणाम मोठया प्रमाणा दिसू लागले होते. त्याचबरोबर याकाळात इंग्लडमध्ये जमीनदारांच्या विरोधात चळवळ सुरू होती. जमीनदाराचे वर्तन, त्यांच्या विशेष हक्काला विरोध होता. शिवाय कंपनीच्या भारतातील मक्तेदारीला विरोध होता. या विरोधाचे पडसाद भारतात पडू नयेत म्हणून कंपनी सरकारने जमीनदारांना आळा घालण्यासाठी 'रयतवारी पद्धती' लागू करण्याचा निर्णय घेतला. सन १८०९ मध्ये 'सिलेक्ट कमिटी'ने कायमधारा पद्धतीच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले होते. कायमधारा पद्धतीमध्ये शेतकरी असुरक्षित होता. सरकार व जमीनदारांचे त्याच्यावर कायम दडपण होते. यातून त्याला मुक्त करावयाचे असेल तर रयतवारी पद्धतीचा अवलंब करावा अशी शिफारस सिलेक्ट कमिटीने केली. जेम्स मिलने या काळात भारतात शेती व्यवसायात सुधारणा होण्यासाठी प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालकी हक्काची असली पाहीजे, असे स्पष्ट मत मांडले. या बरोबर थॉमस माथल्स, डेव्हीड रिकार्डो, जंरोमी बेन्थॅम, विल्यम थॅकरे इत्यादी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी रयतवारी पद्धतीचे पुरस्कर्ते होते. या सर्वांच्या प्रयत्नामुळे रयतवारी पद्धत दक्षिण भारतात लागू करण्यात आली.

### १. रयतवारी पद्धतीची संकल्पना :-

कायमधारा पद्धतीचे दोष पाहून थॉमस मनरो व कॅ. रीड या अधिकाऱ्यानी ब्रिटिश सरकारने कायमधारा पद्धती देशाच्या इतर भागात लागू करू नये अशी सूचना केली. शेतकरी आणि सरकार यांच्यातील मध्यस्थ नष्ट करून जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष कर वसूली करावी अशी सूचना केली. कॅप्टन अलेक्झांडर रीडने ही पद्धती मद्रास प्रांतात सन १८२० मध्ये सुरू केलेली असली तरी त्याचा शिष्य थॉमस मनरो याने ही पद्धत लोकाभिमुख केली. त्यानुसार मद्रास, बॉम्बे, बेरार, पूर्व पंजाब आसामच काही भाग व कुर्ग येथे ही पद्धती सुरू केली. महाराष्ट्रात लॉर्ड माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन याने ही पद्धत सुरू केली. या पद्धतीत शासन प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडून साऱ्याची वसूली स्वतः करत असल्याने या पद्धतीला 'रयतवारी पद्धती' असे म्हणतात. थोडक्यात ज्या जमिनधारणा प्रकारामध्ये सरकार व जमीन कसणारी रयत यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झालेला असतो अशा जमिनधारणा जमीन महसूल प्रकारास रयतवारी पद्धती असे म्हणतात

## २. रयतवारी पद्धतीचे वैशिष्ट्ये :-

१) रयतवारी पद्धतीचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे यामध्ये प्रत्यक्ष सरकारकडून जमीन महसूल वसूल करण्याचे काम सुरू झाले. महसूल वसूल करणार मध्यस्थ अथवा जमीनदाराचा वर्ग नाहीसा झाला.

२) सरकार आणि शेतकरी यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाला.

३) शेतकऱ्याचे जमिनीवरील हक्क मान्य करून त्यांना मालक मानले गेले. जो पर्यन्त तो महसूल व्यवस्तीत भरत राहणार तो पर्यन्त त्याचे मालकी हक्क आबादित करण्यात आले.

४) जमिनीचे प्रमाण आणि प्रतवारीनुसार महसूलाच्या रक्कमेची निश्चिती केली गेली.

५) रयतवारी पद्धती कायम न मानता ती ३० वर्षासाठी लागू केली.

६) शेतकऱ्याने जर मुदतीत कर भरला नाही तर जमीन जप्त करण्याची तरतूद होती.

## ३. रयतवारी पद्धतीची कार्यपद्धती :-

रयतवारी पद्धतीत सरकार व शेतकरी यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाला. जमिनीची मोजणी आणि प्रतवारी करून जमीन महसूल ठरवण्यात येई. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांच्या बरोबर करार करण्याची तरतूद करण्यात आली, कुळाशी संबंध ठेवला नाही. जी व्यक्ती जमीन कसत असेल त्याला जमीनीचा मालकी हक्क दिला गेला.

१) कंपनी सरकारने जमीनीचे वर्गीकरण, प्रतवारी, खोली, आर्द्रता, क्षमता, जमीनीचा कस याचा विचार करून जमीनीची वर्गवारी करून जमिनीचे गट पाडले. यामध्ये उत्तम, मध्यम व कनिष्ठ जमीन असे तीन वर्ग केले.

२) जमिनीची वर्गवारी हवामान, मशागतिची परिस्थिति यानुसार ठरविली.

३) शेतसारा ठरवण्यासाठी पूर्वीच्या जमाबंदीचा विचार केला गेला व जमीन महसूलाचा दर उत्पन्नाच्या ४५ ते ५५ टक्के ठरविला.

४) जमीन महसूल कायम न ठेवता त्यात बदल करण्याचे अधिकार सरकारने स्वतःकडे ठेवले.

## ४. रयतवारी पद्धतीचे फायदे :-

१) जमीन कसणारे शेतकरी आणि ब्रिटिश सरकार यांच्यात प्रत्यक्ष संबंध निर्माण झाला. मध्यस्थांचे महत्व संपुष्टात आले आणि त्यांच्या कडून होणारी पिळवणूक थांबली.

२) जमिनीवर मालकी हक्क प्रस्थापित झाल्याने शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवण्यावर भर दिला. कृषि क्षेत्राचा विकास होण्यास मदत झाली.

३) कृषि धोरण ठरवण्यासाठी ब्रिटिश सरकारला मदत झाली.

४) छोटे-मोठे शेतकऱ्यांनी स्वत: शेती कसण्यास सुरवात केल्याने, बेकारी कमी होण्यास मदत झाली.

५) जमीन महसूल व्यवस्थित प्राप्त होवू लागल्याने नैसर्गिक संकटाच्या काळात जमीन महसूलात सवलत देण्याची व्यवस्था करण्यात आली.

### ५. रयतवारी पद्धतीचे तोटे :-

१) कायमधारापेक्षा रयतवारीत पद्धतीमध्ये जमीन महसूलाचे प्रमाण जास्त होते.

२) जमीन महसूल ठरवण्याचे सर्व अधिकार ब्रिटिश सरकारकडे असल्याने त्याची जास्त दराने वसूली केली जावू लागली.

३) ब्रिटिश सरकारच्या विरोधात न्याय मागण्याची प्रकिया फारच जटिल असल्याने न्याय मिळवणे अवघड झाले. शेतकरी पूर्वी पाटील अथवा देशमुखांच्या मार्फत दाद मागू शकत होता. ती पध्दत यामध्ये बंद झाली.

४) रयतवारी पद्धतीमध्ये शेतकऱ्यांनी स्वत: जमीन कसावी अशी संकल्पना होती मात्र जमीन मालकांनी शेतीमध्ये कुळे ठेवून शेती करण्यास सुरवात केली. यामुळे गैरहजर जमीनदार वर्ग निर्माण झाला.

५) जमीन जप्तीच्या भीतीने शेतकऱ्यांनी सावकारकडून मोठ्या प्रमाणात कर्ज काढण्यास सुरवात केल्याने शेतकरी कर्ज बाजारी झाला.

६) जमीन महसूल विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढला.

## क) महालवारी पद्धती :

### १. महालवारी पद्धतीची संकल्पना :-

सन १८३३ मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिंग याने आग्रा, अवध आणि पंजाब येथे महालवारी पद्धतीचा प्रारंभ केला. व्होल्ट मॅकेन्झी याच्या सल्यानुसार ही पद्धती लागू करण्यात आलेली होती. यामध्ये सरकारने प्रत्यक्ष्य रयतेकडून शेतसार जमा न करता गावकऱ्यांशी सामूहिक करार करून महसूल गोळा करण्याची

तरतूद होती म्हणून या पद्धतीला 'महलवारी पद्धती' असे म्हणतात. प्रत्येक गावातून किती महसूल देण्यात यावा हे जमिनीच्या प्रवारीनुसार निश्चित करण्यात येत असे.

## २. महालवारी पद्धतीचे स्वरूप :–

महालवारी जमीन महसूल पद्धतीमध्ये सरकार प्रत्यक्ष शेतकऱ्याकडून जमीन महसूल गोळा करण्याऐवजी गावकऱ्यांशी सामुहिक करार करत असे. प्रत्येक गावातून किती शेतसारा द्यावा हे सरकारने ठरवून दिलेले होते. ठरलेला जमीन महसूल ग्रामप्रमुखाने सरकारला देण्याची पद्धती यामध्ये होती. गावातील शेतजमिनीतून येणाऱ्या एकूण उत्पन्नाचा अंदाज घेऊनच त्या गावातील एकूण महसुलाची रक्कम निश्चित करण्यात आली. महालवारी पद्धतीमध्ये संपूर्ण गावाचा महसुल एकदम निश्चित करण्यात येत असे. प्रत्येक गावाचा महसुल वेगवेगळा ठरवण्यात आलेला होता. गावचा महसुल सर्व गावकरी मिळून ठरविण्याची पद्धती या मध्ये स्वीकारण्यात आलेली होती. महसुल जमा करण्याची जबाबदारी संपूर्ण गावाची मानली गेली आणि जमीन महसुल ३ वर्षासाठी निश्चित करण्यात आला. प्रत्येक शेतकऱ्यावरील शेतसाऱ्याचे किंवा महसुलाचे प्रमाण ठरविताना त्या शेतकऱ्याच्या शेतीतून येणाऱ्या उत्पन्नाचाही प्राधान्याने विचार करण्यात आला. या जमीन महसूल पद्धतीचे पुनरावलोकन करण्याचे अधिकार कलेक्टर व तहसीलदार यांना देण्यात आलेले होते.

## ३. महालवारी पद्धतीचे फायदे :–

१) महालवारी पद्धती पद्धतीमध्ये जमिनीची मालकी व भोगवटा एकाच मालकाकडे देण्यात आला.

२) प्रत्यक्ष्य शेतीची मोजणी करून जमिनीच्या प्रतवारीनुसार महसुल निश्चित केला जाई.

३) जमीन महसुलावर सरकारचे प्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले.

४) रयतेला जमिनीच्या मालकीचे अधिकारदेण्यात आले.

## ४. महालवारी पद्धतीचे तोटे :–

१) महालवारी पद्धती पद्धतीमध्ये गावातील प्रमुखांना विशेष अधिकार प्राप्त झाले कारण जमिनीला सारा व आकारणी त्यांच्या हातात देण्यात आलेला होता.

२) ग्राम प्रमुखांनी मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करत शेतकऱ्यांची पिळवणूक करण्यास सुरवात केली.

३) जमीन महसूल जमा करण्यासाठी ग्राम प्रमुखांनी मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर शेतकऱ्यावर अत्याचार केले.

## ✲ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ✲

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. ब्रिटीशांना ................ याच्याकडून कलकत्ता, गोविंदपूर व सतनाटी येथील जमीनदारीचे अधिकार प्राप्त झाले.

२. अलेक्झाडर डोव्ह याने ................ मध्ये कायमधारा पद्धतीची प्रथम मांडणी केली.

३. लॉर्ड कॉर्नवॉलीसने ............... रोजी बंगाल व बिहार या भागात प्रथम कायमधारा पद्धती लागू केली.

४. .................. ने ही पद्धती मद्रास प्रांतात सन १८२० मध्ये सुरू केली.

५. थॉमस मनरो याने .................... ही पद्धत लोकाभिमुख केली.

६. रयतवारी पद्धती कायम न मानता ती .............. वर्षासाठी लागू केली.

७. महाराष्ट्रात लॉर्ड माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने ............... ही पद्धत सुरू केली.

८. सन १८३३ मध्ये .............. याने आग्रा, अवध व पंजाब येथे महालवारी पद्धतीचा प्रारंभ केला

९. व्होल्ट मॅकेन्झी याच्या सल्यानुसार ................ ही पद्धती लागू करण्यात आलेली होती.

१०. महालवारी जमीन महसुल पद्धतीत ............... वर्षासाठी महसूल निश्चित करण्यात आला होता.

## ३.२.२ भारतातील उद्योगधंद्याचा ऱ्हास/अनुद्योगिकरण (De-industrialization)

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत भारतात देशी उद्योगधंदे व हस्तकलेची प्रदीर्घ परंपरा पहावयास मिळते. भारतीय अर्थव्यवस्थेत या उद्योगाचे स्थान अतिशय महत्त्वाचे होते. भारतातील असंख्य खेड्यात व लहान-मोठ्या शहरात विविध प्रकारचे हस्त कौशल्याचे उद्योग चांगले भरभराटीस आले होते. भारतात तयार होणाऱ्या या वस्तूनी जगातील बहतांश बाजारपेठा व्यापलेल्या हात्या. ढाक्याची मलमल तर सर्वदर विख्यात होती. या मलमलीला 'शबनम' असे म्हटले जात असे. 'शबनम' म्हणजे 'दवबिंदू' अशी उपमा युरोपीय लोक देत असत. भारतातील कापड उद्योगासंबंधी पायरड याने असे म्हटले आहे की, ''भारतातील प्रमुख वैभवी वस्तू या सूती व रेशमी कापडाच्या होत्या आणि जगातील केप ऑफ गुड होप ते चीनपर्यंतच्या देशातील सर्व स्त्री व पुरुष सर्व अंगभर ही वस्त्रे वापरत असत.'' भारतातील उद्योगधंद्यासंदर्भात फ्रेंच प्रवासी बर्नियर याने केलेली नोंद महत्त्वाची वाटते, ''जगात एकही असा

भारतासारखा देश नाही की जेथे इतक्या विविध प्रकारच्या वस्तू पाहावयास मिळतात. फ्रान्समधील व्यापारी भारतीय विणकरांना आगाऊ पैसे देऊन त्यांच्याकडील वस्त्रे खरेदी करीत व युरोपभर विकत असत. भारतातून त्यावेळी सुती तलम कापड, रेशमी कापड, मलमली मऊमऊ गालीचे, सोने-चांदीचे अलंकार, नक्षीकाम व शोभेच्या वस्तू जगभर खपत असत.'' यावरून भारताचे उद्योगधंद्यातील वर्चस्व दिसून येते. १८ व्या शतकापर्यंत भारत हे जगाचे सर्वात मोठे व्यापारी केंद्र होते. भारतामध्ये ब्रिटिश सत्तेचा विस्तार झाल्यानंतर या व्यापारी केंद्राचा ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला. इंग्लंडच्या व्यापारी व औद्योगिक हितसंबंधाच्या रक्षणासाठी भारतातील पारंपारिक उद्योगधंद्याचा बळी देण्यास सुरुवात केली. ब्रिटिशानी भारताच्या बाबतीत राबवलेली आर्थिक धोरणे व आर्थिक पिळवणुकीचे विविध मार्ग, कसबी कारागिरीसाठी प्रसिद्ध असलेल्या गावांना व शहरांना उजाड बनवत गेले. खेड्यातील कुटिरउद्योगाचा व स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही ऱ्हास झाला. यासंबंधी अनेक पाश्चात्त्य विचारवंतानी असे मत व्यक्त केले आहे की, कुटिरोद्योगांचा ऱ्हास एक जागतिक प्रक्रिया होती आणि औद्योगिक क्रांतीचा तो एक स्वाभाविक परिणाम होता. पण त्या बाबतीत भारत व युरोपमध्ये एक मूलभूत फरक आढळून येतो. युरोपमध्ये कुटिरोद्योगांचा ऱ्हास तेथील वाढत्या कारखान्यामुळे आणि वाढत्या उत्पादनामुळे झाला. तर भारतातील कटिरोद्योगांचा ऱ्हास हा ब्रिटिश सत्तेचा परिणाम होता. डॉ. धनंजय गाडगीळ यासंबंधी असे म्हणतात की, भारतातील हस्तोद्योगांचा हासही भारताच्या आर्थिक परिवर्तनातील अत्यंत नाट्यमय घडामोड होती. त्याच्या मते हा ऱ्हास वेगाने व पूर्णाशाने घडून आला. १८ व्या शतकाच्या अखेरीपासून सुरू झालेली उद्योगधंद्याच्या ऱ्हासाची ही प्रक्रिया १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत अखंडपणे सुरू होती. भारतातील उद्योगधंद्याचा ऱ्हास घडून येण्यास ब्रिटिश सत्ता ज्याप्रमाणे कारणीभूत होती त्याप्रमाणे इतरही काही कारणे याला कारणीभूत होती ती खालीलप्रमाणे :-

## १. अनुद्योगिकरणाची संकल्पना :-

'अनुद्योगिकरण' म्हणजे उद्योगाच्या ऱ्हासाची प्रक्रिया, ब्रिटिश कालखंडात ज्या अनेक पारंपरिक उद्योगधंद्याचा जो ऱ्हास घडून आला त्याचा निर्देश 'अनुद्योगिकरण' या सज्ञेद्वारे केला जातो. थोडक्यात ब्रिटिश काळात भारतातील संपन्न शहरातील कसबी हस्तोउद्योगांचा आणि स्वयंपूर्ण खेड्यामधील कुटीरोउद्योगांचा ऱ्हास घडून आला अथवा बंद पडले या प्रक्रियेला अनुद्योगिकरण असे म्हणतात.

## २. उद्योगधंद्याच्या ऱ्हासाची कारणे :-

### १) संस्थानी/राजे-महाराजे यांचा राजाश्रय राहिला नाही :-

भारतातील बऱ्याच हस्तकौशल्यांच्या उद्योगांची भरभराट ही येथील राजे-महाराजानी उद्योगांना दिलेल्या राजाश्रयामुळे झाली होती. राजे-राजवाडे, नवाब, सरदार व दरबारातील लोक हे या मालाचे

गिऱ्हाईक होते. परंतु ब्रिटिश सत्तेने भारतात एकछत्री अंमल सुरू केला व या राजाचे वर्चस्व संपुष्टात आणले. भारतातील अनेक संस्थाने एकापाठोपाठ एक गिळंकृत केली व काहीना आपल्या नियंत्रणाखाली आणले. भारतातील संस्थाने खालसा केल्यामुळे अथवा जिंकल्यामुळे लोप पावत गेली तस-तसा भारतीय हस्तउद्योगाचा ऱ्हास सुरू झाला. हे जरी खरे असले तरी हा ऱ्हास दीर्घकाळ चाल राहीला कारण संस्थाने जरी नष्ट झाली असली तरी सवयी दीर्घकाळ बदलल्या नाहीत, त्यामुळे हे हस्तउद्योगही एकदम नाहीसे झाले नाहीत. मूल्यवान वस्तुंना असणारी एकूण मागणी घटल्याने उच्च दर्जाच्या हस्तकलांच्या वस्तूचे उत्पादन थांबले आणि सामान्य वस्तूची मागणीदेखील फार काळ टिकाव धरू शकली नाही. अशा रीतीने भारतीय राजवटीचा लोप हे भारतीय हस्तउद्योगांच्या ऱ्हासाचे. पहिले महत्त्वाचे कारण होते.

### २) ब्रिटिशांचे स्वार्थी व जुलमी धोरण :-

ब्रिटिशांचे व्यापारवादी स्वार्थी धोरण हे भारतीय उद्योगधंद्याच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण होते. कंपनीचे व्यापारी कंपनीच्या व्यापाराबरोबर खाजगी व्यापारही करत होते. यातून त्यांनी भारतीय कारागीराचा छळ केला. भारतीय हस्तकौशल्याच्या वस्तूंना जगात अनेक ठिकाणी मागणी होती. हा व्यापार फायदेशीर होता म्हणून युरोपीय व्यापाऱ्यांनी भारताच्या परराष्ट्रीय व्यापारावर अधिकाधिक वर्चस्व प्रस्थापित केले. आपला माल परदेशी बाजारपेठेत विकावयाचा तर या व्यापाऱ्याच्या मार्फतच विकला पाहिजे, अशी स्थिती भारतीय कारागीराच्या बाबतीत निर्माण केली. युरोपीय व्यापारी व त्यांचे दलाल भारतीय कारागिरांचा माल कमी भावात मागत. व्यापाराची मक्तेदारी कंपनीच्या ताब्यात ठेवण्यासाठी कंपनीचे प्रतिनिधी भारतीय कारागीरांचा अनेक प्रकारे छळ व जुलूस जबरदस्ती करीत. या शोषणाला कंटाळून अनेक कारागिरानी आपले व्यवसाय बंद केले.

### ३) पक्षपाती जकात धोरण :-

भारत हा हस्तोद्योगातील मालाचा, विशेषतः कापडाचा प्रमुख निर्यातदार देश होता. परंतु इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांतीनंतर प्रचंड प्रमाणात तयार होवू लागलेल्या वस्तूंना व उद्योगांना संरक्षण देण्यासाठी संरक्षक जकातीचे धोरण स्वीकारले. ते धोरण पक्षपाती स्वरूपाचे होते. भारतातील सुती व रेशमी कापडाचा अनुक्रमे सन १७००व १७२० मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने कायदा करून बंदी घातली. जे लोक भारतीय कापड वापरतील त्यांना २०० पौड दंडाची शिक्षा ठेवण्यात आली, या कायद्याचा परिणाम होता. मात्र भारतीय कापडाची लोकप्रियता कायम राहिली. तेव्हा भारतीय कापडाच्या इंग्लंडमधील आयातीवर मोठी जकात बसविण्यात आली. तर ब्रिटिश मालाच्या भारतातील निर्यातीवर सन १७८३ नंतर १० ते ९५% पर्यंत आर्थिक मदत जाहीर करण्यात आली. भारतीय कापड इंग्लंडमध्ये महाग वाटावे व भारतात ब्रिटिश कापड स्वस्त वाटावे अशा प्रकारचे हे धोरण होते. या दोन्हींच्या परिणाम स्वरूप भारतीय कापड उद्योगाची दोन्ही ठिकाणची बाजारपेठ गेली. भारतीय उद्योगाच्या ऱ्हासाला ब्रिटिशांचे पक्षपाती

धोरणच कारणीभूत होते. ब्रिटिशांच्या पक्षपाती जकातीच्या धोरणामुळे भारत केवळ एक आयातदार देश बनला होता. या संबंधी अमिया बागची असे म्हणतात की, सन १९१३ पर्यंत जवळजवळ ७५ वर्षे इंग्लंडच्या सूती कापडाचा प्रमुख आयातदार देश भारत होता. इंग्लंडची ४०% पेक्षा अधिक सूती कापडाची निर्यात एकट्या भारतात होत होती.

## ४) वसाहतवादी धोरण :-

इंग्लंडने भारताला आपली वसाहत बनविल्यानंतर त्यांनी भारतावरील आपली पकड अधिक घट्ट बसविली. इंग्लंडच्या भांडवलवादी अर्थव्यवस्थेची वसाहत या दृष्टीकोणातून भारतीय अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था उखडून टाकणे क्रमप्राप्त होते. स्वतःच्या फायद्यासाठी भारताची जेवढी म्हणून पिळवणूक करता येईल तेवढी करण्याचे धोरण ब्रिटिशांनी स्विकारले. औद्योगिक क्रांतीने तयार झालेला पक्का माल भारतीय बाजारपेठेत स्वस्तात विकावा यासाठी खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारले. यामुळे भारतीय उद्योगधंद्यांचा ऱ्हास घडत आला. भारतीय उद्योगाबरोबर शिक्षण, सामाजिक संस्था, शेती, प्रशासन इत्यादी क्षेत्रात नविन धोरणे स्वीकारण्यात आली ती एका दृष्टीकोनातून अनुकूल होती. परंतु अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून प्रतिकूल स्वरूपाची होती व वसाहतवादाला पूरक होती. त्यामुळे भारतातील अनेक हस्त-कौशल्याचे उद्योग बंद पडले.

## ५) खुल्या व्यापाराचे धोरण :-

सन १८१३ पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीकडे भारताच्या संपूर्ण व्यापाराची मक्तेदारी होती. परंतु सन १८१३ च्या कायद्याने इंग्लंडच्या सरकारने ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारी मक्तेदारी संपुष्ठात आणली. सन १८१३ च्या अगोदर ईस्ट इंडिया कंपनी भारतातील वस्तू विकत घेवून त्या युरोपमध्ये विकत असे. मात्र सन १८१३ च्या भारत कायद्यानंतर इंग्लंडमधील व्यापारीसुद्धा भारतात आले व त्यांचा माल विकण्यासाठी मोकळे झाले. ह्याच कायद्याने विशेषतः लॉकेशायरमध्ये तयार झालेल्या कापडासाठी भारताची बाजारपेठ खुली झाली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था उध्वस्त झाली. सन १७५७ ते १८१३ या काळापूर्वीच ब्रिटिशांनी भारतातील जमीन महसूलाच्या माध्यमातून आर्थिक निःसारण केल्यामुळे भारताच्या पारंपारिक अर्थव्यवस्थेतील रोजगाराला तडा गेला होता. ब्रिटिशांनी भारतीय संस्थाने खालसा केल्यामुळे अगोदरच हस्तउद्योगांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली होती. त्यातच खुल्या व्यापाराच्या धोरणाने भारतीय माल जागतिक बाजारपेठेत ब्रिटिशांच्या जकातीच्या धोरणामुळे टिकू शकला नाही.

## ६) युरोपीय मालाशी स्पर्धा :-

भारतीय उद्योगधंद्याच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरलेली घटना म्हणजे इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती. युरोपीय कारखान्यातून तयार झालेल्या पक्क्या मालाची भारतात मोठ्या प्रमाणात आयात होऊ लागली.

यंत्राच्या साहाय्याने उत्तम प्रतीचा, स्वस्त दरातील व प्रचंड प्रमाणावरील पक्का माल तयार होऊ लागला, हाताने काम करणाऱ्या भारतीय कारागीरांना यंत्राच्या वेगाशी स्पर्धा करता येईना, यंत्रोत्पादित माल हस्तोद्योगातील मालापेक्षा अधिक स्वस्तही मिळू शकत असे, दर्जाच्या बाबतीत भारतीय विणकर केव्हाही सरस ठरला असता. कारण ढाक्याच्या मलमलीने मँचेस्टर व लाकेशायरमधील कापड उत्पादकांना हैराण करून सोडले होते. परंतु किंमतीच्या बाबतीत यत्रोत्पादीत युरोपीय कापड भारतीय कापडापेक्षा कितीतरी स्वस्त होते. यासंबंधी रजनी पाम दत्त असे नमूद करतात का, इंग्लंडमधील यंत्रनिर्मित कापडमालामुळे विणकर बेकार झाले तर यंत्रनिर्मित सुतामुळे सूत कातणारे बेकार झाले. १८१८ ते १८३६ या काळात इंग्लंडमधून भारतात होणाऱ्या सुताच्या निर्यातीत ५२०० पटीनी वाढ झाली. हीच प्रक्रिया रेशमी व लोकरी माल, लोखंड, भांडी, काच व कागद यांच्या बाबतीत दिसून येते.

### ७) भारतीय उद्योगातील मूलभूत दोष :-

भारतीय हस्तकौशल्याच्या उद्योगात काही मूलभूत दोष होते. त्यामुळेही काही उद्योगाचा ऱ्हास घडून आला. भारतातील बहुतांश हस्तकौशल्याचा उद्योगात तयार होणारा माल हा उच्चवर्गीय लोकात अधिक पसंत होता व तोच वर्ग प्रामुख्याने यांचे गिऱ्हाईक होते खास करून परकीय लोक. भारतीय मालाला भारतापेक्षा परदेशात अधिक मागणी होती. परंतु या कारागिरांनी असा कधीही विचार केला नाही की, जर आपल्या मालाला परदेशातून मागणी कमी झाली तर आपल्या मालाचे काय किंवा किंमतीचे काय. शिवाय युरोपीयन ग्राहकांना भारतीय वस्तूत युरोपीय संकेत, युरोपीय आकृतिबंध आणि युरोपीय कलात्मकता हवीशी वाटत होती. या काळातील व्यापार हा बराचसा युरोपीयांच्या हाती असल्याने या व्यापाऱ्यांनी युरोपीय नमुने आणि आकृतिबंध भारतीय कारागिरांच्या माथी मारण्यास सुरुवात केली. परिणामी भारतीय वस्तू ह्या युरोपीय कला-वस्तूच्या भ्रष्ट नकला होऊ लागल्या त्यामुळे भारतीय अस्सल कलावस्तू लोप पावल्या. याशिवाय भारतीय सुखवस्तू ग्राहकांची जागा नवशिक्षित वर्गाने घेतली या वर्गाकडून भारतीय हस्तकला कौशल्याच्या वस्तूना मागणी राहीली नाही. नव्याने श्रीमंत झालेल्या सुशिक्षित भारतीयांनी १९ व्या शतकाच्या शेवटी युरोपीय राहणीमान आत्मसात केले. भारतीय हस्तकलाच्यावर यांचा विशेष प्रभाव पडला. भारतीय मालाची मागणी घटून त्याचा मोठा आघात या उद्योगावर झाला. कारण भारतीय हस्तउद्योग काळाच्या अनुरूप बदलू शकले नाहीत. भारतातील हस्तउद्योग हे संघटित स्वरूपाचे नव्हते, त्याचे स्वरूप विस्कळित स्वरूपाचे होते. त्यामुळे ब्रिटिशांनी ज्यावेळी खुल्या व्यापारी धोरणाचा स्विकार केला त्यावेळी ते त्यांचा सामना करू शकले नाहीत, हा भारतीय उद्योगातील प्रमुख दोष होता. याच्या उलट युरोपीय देशात व्यापारी लोकांचे संघटन होते व त्याचे स्वरूप 'गिल्ड' सारखे होते. सभासद कारागिरांचे कल्याण आणि मालाचा दर्जा यांची काळजी या संघटना घेत असत असे भारतात घडले नाही. थोडक्यात भारतातील उद्योगधंद्याच्या हासासाठी ब्रिटिशांनी खालील गोष्टीचा अवलंब केला.

१) भारतीय मालावर इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात जकात लावली.

२) भारतातील व्यापाराच्या बाबत त्यांनी खुल्या व्यापाराचे धारण स्विकारले.

३) भारतातून प्रचंड प्रमाणात कच्चा मालाची निर्यात इंग्लंडमध्ये केली.

४) अंतर्गत जकाती व अबकारी कर लावले.

५) भारतातील ब्रिटिश व्यापाऱ्यांना खास सवलती बहाल केल्या.

६) भारतीय कारागीरांना सक्तीने माल विकण्यास भाग पाडले.

७) भारतीय संस्थाने खालसा करून हस्तउद्योगाचा राजाश्रय काढून घेतला.

८) इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीतून तयार झालेला पक्का माल भारतात सक्तीने खपविण्याचा प्रयत्न केला.

## ३. औद्योगिक ऱ्हासाचे परिणाम :-

भारतामध्ये १८ व १९ व्या शतकामध्ये घडन आलेल्या औद्योगिक ऱ्हासाचे अनेक परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर घडून आले ते खालीलप्रमाणे

### १) औद्योगिक शहर व नगराचा ऱ्हास घडून आला :-

भारतामध्ये प्राचीन काळापासून अनेक शहरे व नगरे विविध हस्तउद्योगासाठी प्रसिद्धीस आलेली होती. यामध्ये बंगालमधील ढाका, बुर्शिदाबाद, बिहारमधील पाटणा, उत्तर प्रदेशामधील जौनपूर, वाराणसी, लखनौ व आग्रा, पंजाबमधील मुलतान व लाहोर, गुजरातमधील अहमदाबाद व सुरत, मध्यप्रदेशमधील चंदेरी, बऱ्हाणपूर, आंध्रप्रदेशमधील मच्छलीपट्टणम, विशाखापट्टणम इ. अनेक शहरे होती. ढाका, मुर्शिदाबाद व सुरत इ. गर्दीच्या व प्रचंड भरभराटीच्या शहरांना अवकळा प्राप्त झाली. ढाक्याचे वर्णन तर 'भारताचे मँचेस्टर' असे केले जात होते. या शहरामध्ये ज्या गतीने औद्योगिक ऱ्हास घडून आला त्यासंबंधी आर. पी. दत्त असे म्हणतात की, ''ढाका, मुर्शिदाबाद, सुरत व त्यासारखी उद्योगप्रधान शहरे ब्रिटिशांच्या शासनामुळे अल्पावधीत महाभयंकर युद्धाच्या विध्वंसाने किंवा परकीय आक्रमणाने झाली नसती इतकी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली.''

### २) भारतीय अर्थव्यवस्थेचे ग्रामिणीकरण :-

भारतातील औद्योगिक ऱ्हासामुळे भारतीय अर्थव्यवस्था शेतीवर आधारीत झाली व शेतीवर प्रचंड भार पडू लागला. भारतातील उद्योगप्रधान शहरे झपाट्याने रिकामी झाली. या शहरातील उद्योगांचा ऱ्हास

घडून येत असताना या उद्योगातील मजूर व कारागीर इ. बेकार झालेला वर्ग खेड्याकडे पर्यायाने शेतीकडे वळला. त्यामुळे यांचा अधिकचा भार शेतीवर झाला. शेतीवर प्रचंड भार पडू लागला. भारतातील उद्योगप्रधान शहरे झपाट्याने रिकामी झाली. या शहरातील उद्योगांचा ऱ्हास घडून येत असताना या उद्योगातील मजूर व कारागीर इ. बेकार झालेला वर्ग खेड्याकडे पर्यायाने शेतीकडे वळला. त्यामुळे यांचा अधिकचा भार शेतीवर झाला. शेतीपासून जास्तीत जास्त कच्चा मालाचे उत्पादन घेण्यास सुरुवात झाली. भारताच्या बाबतीत या काळातील ब्रिटिशांची आर्थिक धारणा अशा प्रकारची होती की, भारत एक केवळ इंग्लंडसाठी कच्चा माल पुरवणारा देश अशी राहील. उद्योगप्रधान इंग्लंडसाठी भारतातील कृषी साधनांच्या विकासाची आवश्यकता वाटत होती. पण त्यातील एक महत्त्वाचा अडसर म्हणजे भारतातील कच्चा माल दुय्यम प्रतीचा होता. यावर उपाय म्हणून सन १८३३ च्या चॉटर ॲक्टने युरोपीय लोकांना भारतात राहण्याची व संपत्ती विकसित करण्याची परवानगी दिली. यातून भारतात नगदी पिकांच्या उत्पादनास सुरुवात झाली. शेतीवरील अधिकचा भार व ब्रिटिश सरकारने युरोपीय मळेवाल्याना दिलेले संरक्षण यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिकच बिघडली. शेतीवर आधारीत लोकसंख्या वाढल्याने उत्पादनात वाढ झाली नाही मात्र बेकारीत वाढ झाली. या काळात शेतकी उत्पादन स्थिर राहिले परंतु लोकसंख्या वाढत गेली त्यामुळे शेतीचे आधुनिकीकरण झाले नाही.

### ३) बेकारी वाढली :-

औद्योगिक ऱ्हासाचा अतिशय मोठा परिणाम हस्तकलामध्ये प्रवीण असलेल्या कारागीरांवर विशेषतः सूतकताई करणारे व विणकर यांच्यावर झाला. उद्योग बंद पडल्याने त्यांच्या हाताला काम राहिले नाही व त्यातच अनेक शेतकऱ्यांचे जोडधंदेही बंद पडले, यावर कोणताही पर्याय तत्कालिन अर्थव्यवस्थेमध्ये निघाला नाही. कारण जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास होत असताना नवीन उद्योगधंदे मात्र सुरू झाले नाहीत. त्यामुळे यातून खूप मोठ्या प्रमाणात कामगार बाहेर फेकले गेले व बेकारी वाढली. या वाढलेल्या बेकारीचा ताण शेतीवर पडलेला दिसतो. शेतीचे स्वरूप पारंपारिक असल्याने या अधिकच्या बोज्याला शेतीव्यवसाय पेलू शकला नाही. त्यामुळे या काळात गरिबीत मोठी वाढ झालेली दिसते.

### ४) स्वयंपूर्ण ग्रामीण जीवनाचा ऱ्हास घडून आला :-

भारतात शेती व उद्योग हे परस्पर पूरक स्वरूपाचे होते. परंतु ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाच्या परिणाम स्वरूप ग्रामजीवनातील ही परस्परपूरकता नष्ट झाली व छोट्या-छोट्या उद्योगांचा ऱ्हास झाला. गावच्या गरजा गावात पूर्ण होत होत्या परंतु नव्या साम्राज्यवादी व्यवस्थेत संपूर्ण ग्रामीण जीवनच बदलल्याने मूळची स्वयंपूर्ण खेडी अनेक बाबतीत परावलंबी झाली. आधुनिक दळणवळणाच्या साह्याने परदेशी माल खेड्यापर्यंत पोहोचू लागला आणि खेड्यामधील कच्चा माल परदेशात सहज जावू लागला.

या संपूर्ण प्रक्रियेवर ब्रिटिशाची मजबूत पकड असल्याने भारताचे या व्यवस्थेमध्ये दुहेरी शोषण झाले. भारत ही निव्वळ एक ब्रिटिशांची उद्योगीक व शेतकी वसाहत बनून राहीला. शिवाय या संपूर्ण प्रक्रियेत ग्रामीण जीवनाचा हळूहळू ऱ्हास घडून आला.

### ५) भारतीय शेतीचे व्यापारीकरण :-

१९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत घडून आलेल्या औद्योगिक ऱ्हासाच्या प्रक्रियेमुळे भारतातील छोटे-मोठे उद्योग लोप पावले व बेकार झालेले मजूर व कारागीर शेतीकडे वळले. शेतीवर यांचा अतिरिक्त ताण पडला. ब्रिटिशांची या काळातील आर्थिक धोरणे अशाप्रकारची होती की, भारतीय शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीऐवजी नगदी पिके घेण्यास सुरुवात केली. यामध्ये ताग, निळ, रबर, चहा, कापूस, कॉफी इ. नगदी पिकाच्या उत्पादनास प्रोत्साहन व विशेष प्रयत्न केले. उद्योगधंद्यातून बेकार झालेले मजूर स्वस्तात या कामासाठी मिळत असल्याने शेतीसाठी आवश्यक मनुष्यबळ या काळात प्राप्त झाल्याने आधुनिक व्यापारी पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. यातून भारतीय शेतीचे पारंपारीक स्वरूप नष्ट झाले व शेतीचे व्यापारीकरण झाले.

### ६) राष्ट्रीय अर्थव्यवस्था व नविन उद्योगाचा उदय :-

औद्योगिक ऱ्हासामुळे असंतोष निर्माण झालेला असला अथवा पारंपारीक ग्रामजीवनाची स्वयंपूर्णता नष्ठ झालेली असली तरी दुसरीकडे ग्रामजीवनात बंदिस्त असलेल्यांचा संबंध बाह्य जगाशी आला. भारतीय खेडी परदेशी बाजारपेठाशी जोडली गेली, यातून नवीन उद्योगधंद्याचा उदय झाला. ब्रिटिशांनी आर्थिक धोरणाच्या माध्यमातून लुटण्याचा अथवा औद्योगिक ऱ्हास घडवून आणण्याचा प्रयत्न चालवलेला असला तरी आधुनिक शोषणाचे माध्यम म्हणून ज्या दळणवळणाच्या सोयी भारतात उभ्या केल्या. त्याच सोयी सुविधा भारतात आधुनिक उद्योगधंदे उदयास येण्यास सहाय्यभूत ठरल्या. याच्या माध्यमातून पुढे नविन उद्योगधंदे उदयास आले.

## ४. औद्योगिक ऱ्हासाची चिकित्सा :-

भारतातील उद्योगधंदे १८ व्या शतकापर्यंत संपूर्ण यरोपमध्ये नव्हे तर जगामध्ये प्रसिद्ध होते. विशेषतः हस्तकौशल्याच्या वस्तू. ब्रिटिश सत्ता भारतात स्थिर स्थावर झाल्यानंतर ब्रिटिशांनी भारतात जी आर्थिक धोरणे राबविली त्याच्या परिणाम स्वरूप या काळात भारतीय उद्योगांचा ऱ्हास घडून आला. पाश्चिमात्त्य देशात औद्योगिकरणाची प्रक्रिया चालत असताना भारतात मात्र अनुद्योगिकरण चालू होते यासंबंधी अनेक संशोधक व विचारवंतानी यांची विविध अंगानी चिकित्सा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आर. सी. दत्त, चि. व्ही. जोशी, बी. डी. बसू, डॉ. बी. आर. गाडगीळ, रजनीपामदत्त इत्यादी

विचारवंतानी व अभ्यासकांनी ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाच्या परिणामस्वरूप कशा प्रकारे औद्योगिक ऱ्हास घडून आला याचे सविस्तर विवेचन केलेले आहे. परंतु अमेरिकन अभ्यासक मॉरिस -डी-मॉरिस 'Towards are interpretation of 19th Century Indian economic history' या लेखामध्ये असे म्हणतात की, भारताचे अनुद्योगीकरण ही एक कल्पित गोष्ठ होती. अनुद्योगीकरणाच्या सिद्धांताला पुरेसा सांख्यिकी आधार नव्हता असे मत ते मांडतात. त्याशिवाय या लेखात ते असेही म्हणतात की, ब्रिटनमधून भारतात आयात केलेल्या कापडाने भारतातील हातमागावर तयार कापडाशी स्पर्धा केली असली तरी इंग्लंडमध्ये कारखान्यात तयार झालेल्या सूती धाग्यामुळे भारतातील विणकरांची स्पर्धा करण्याची क्षमता बळावली.

मॉरीस-डी-मॉरिस यांच्या म्हणण्याला भारतीय इतिहासकारांनी आक्षेप घेतलेला आहे. त्यांच्या मते, ब्रिटनमधील आयात कापडाच्या तुलनेत हा धागा अल्प प्रमाणात होता व मॉरिस-डी-मॉरिसच्या म्हणण्यानुसार धाग्याच्या आयातीमुळे कापडाच्या आयातीने केलेले नुकसान भरून निघाले हे चूक आहे. वास्तवात भारतातील शेतकरी व गरीब मजूर वर्ग एवढा दरिद्री होता की त्याला जाडे-भरडे कापड खरेदी करण्याशिवाय पर्याय नव्हता. ब्रिटनमध्ये मशीनवर तयार केलेले कापड त्याला परवडत नसे. यामुळेच लॉकेशायरमधील कापडाला भारताच्या ग्रामीण भागात पोहचण्यासाठी वेळ लागला. मात्र भारतातील पारंपारीक पद्धतीने तयार केलेल्या तलम व मध्यम प्रतीच्या कापडाला मात्र ब्रिटनमधून येणाऱ्या कापडाच्या आयातीमुळे तडा बसला. राष्टवादी विचारसरणीच्या इतिहासकारांनी असे मत मांडले की, ब्रिटिश काळात शहरी भागातील हस्तकला उद्योगाचा ऱ्हास झाला. सूत कातण्याचा जो धंदा होता त्यावर वाईट परिणाम झाला. भारतातील पारंपारिक विणकर देखील इंग्लंडमधील आयात केलेला धागा वापरू लागला त्यामुळे ग्रामीण भागातील कारागीरावर ब्रिटिशांनी केलेल्या बदलांचा मोठा परिणाम झाला. डॅनियल थॉर्नर यांच्या मते सन १८८१ ते १९३१ या काळातील जनगणनांचा भारतीय राष्ट्रवाद्यानी घेतलेला आधार पुरेसा शास्त्रीय नव्हता. डब्ल्यू. एच. मूरलॅण्ड व युरोपीय प्रवाशांचे वृत्तांत व ब्रिटिश दप्तरे यांनीही भारताच्या अविकसितपणावर भर दिला होता. एकंदरीतच पाश्चिमात्त्य दृष्टीकोन असे मानत होता की, प्रगत ब्रिटिश शासन हे मागासलेल्या भारताला फायदेशीर ठरले. परंतु या विचारालाबी. डी. बसू आक्षेप घेतात. भारतातील हस्तकलांचा नाश करण्यासाठी इंग्लंड सरकारने आपल्या राजकीय सत्तेचा वापर केला व त्याचा वापर करून भारतीय उद्योगाचा ऱ्हास घडवून आणला. त्यासाठी ब्रिटिशांनी खालील मार्गाचा अवलंब केला. याकडे ते लक्ष वेधतात.

१) भारतावर मुक्त व्यापार पद्धती लादणे.

२) भारतातील मालावर इंग्लंडमध्ये अधिक कर लावणे

३) भारतातून प्रचंड प्रमाणात कच्चा मालाची निर्यात.

४) परकीय उद्योगांना विशेष सोई-सुविधा.

५) रेल्वे मार्गाचा विकास इ. भारतातील उद्योगधंद्याच्या ऱ्हासासंदर्भात परस्पर मते मांडलेली दिसतात. पाश्चिमात्त्य दृष्टीकोन हा साम्राज्यवादाचा एकांगी दृष्टीकोण होता. अमिया बागची यांनी केलेल्या अभ्यासावरून असे स्पष्ट झाले आहे की, भारतीय राष्ट्रवादी विचारवंताचे म्हणणे अगदीच चुकीचे नव्हते. ब्रिटिश काळात भारतात सर्वत्र सरसकट औद्योगिक ऱ्हास घडून आला असे मानणे चुकीचे आहे. वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या क्षेत्रात व वेगवेगळ्या उद्योगांचा ऱ्हास एकदम झालेला नाही. तो वेगवेगळ्या वेळी व कमी अधिक प्रमाणात झालेला आहे.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ✻

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. भारतातील मलमलीला ................ असे म्हटले जात.

२. भारतातील सुती व रेशमी कापडाचा अनुक्रमे ................ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने कायदा करून बंदी घातली.

३. .................... पर्यंत भारतात ईस्ट इंडिया कंपनीकडे भारताच्या संपूर्ण व्यापाराची मक्तेदारी होती.

४. ..................... मधील कापड उत्पादकांना भारतीय कारागिरना हैराण करून सोडले होते.

५. १८१८ ते १८३६ या काळात इंग्लंडमधून भारतात होणाऱ्या सुताच्या निर्यातीत ................ पटीनी वाढ झाली.

६. ................... वर्णन तर 'भारताचे मँचेस्टर' असे केले जात होते.

७. ब्रिटीशांनी भारतीय मालावर ................. कर लावले.

८. .................. चॉटर ॲक्टने युरोपीय लोकांना भारतात राहण्याची व संपत्ती विकसित करण्याची परवानगी दिली.

९. अमेरिकन अभ्यासक ................ याने 'Towards are interpretation of 19th Century Indian Economic History' हा ग्रंथ लिहिला आहे.

१०. रजनीपामदत्त यांनी ............... ग्रंथ लिहिला आहे

## ३.२.३ संपत्तीचे द्रव्यापहरण/वहन किंवा आर्थिक निःसारण (Drain of Wealth)

ब्रिटिशांनी भारतावर वर्चस्व प्राप्त केल्यानंतर भारत राजकीय पारतंत्र्यात गेला. त्याचबरोबर भारतावर आर्थिक दुरावस्थाही ओढवली. ब्रिटिशांचे आव्हान हे केवळ राजकीय नव्हते, तर ते प्रामुख्याने आर्थिक होते. भारताचे आर्थिक शोषण करण्याच्या ब्रिटिशांच्या विविध धोरणाचा अभ्यास केला असता या गोष्टी ध्यानात येतात. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात व्यापाराच्या उद्देशाने प्रवेश केला आणि ब्रिटीश साम्राज्याचा पाया रचला. भारतामध्ये ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर त्यांनी येथील राजकीय व्यवस्था तर बदललीच त्याचबरोबर अर्थव्यवस्थेतही बदल झाला. ब्रिटीशांनी भारतातील पारंपारिक व्यवस्थेमध्ये बदल करून आपल्या व्यापारी हितसंबंधांना पुरेशी भारतीय समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परिणामी भारतीय बाजारपेठ आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडली गेली, याचा भारताला फायदा होण्याऐवजी तोटा जास्त झाला. कारण भारतीय अर्थव्यवस्था ही एका त्रयस्त शक्तीद्वारे नियंत्रित केली जात होती. भारतीयांच्या हिताऐवजी या व्यवस्थेत ब्रिटिशांचे आर्थिक हित महत्त्वाचे मानल्यामुळे ती जागतिक बाजारपेठेशी दुय्यम अवस्थेत जोडली गेली. यामधून भारतीय संपत्तीचे वहन किंवा आर्थिक नि:स्सारण मोठ्या प्रमाणात घडून आले. भारतीय अर्थव्यवस्थेला प्रभावित करणारा हा घटक होता. ब्रिटीशांनी भारताचे अविरतपणे आर्थिक शोषण करून भारताला दरिद्री बनविले. ब्रिटिश सरकार आपले शोषण करीत आहे हा विचार भारतीय अर्थतज्ञ आणि विचारवंतांच्या ध्यानी येवू लागला आणि त्यातून आर्थिक निःसारणाचा सिद्धांत मांडला गेला. दादाभाई नौरोजी यांनी प्रथमतः या परिस्थितीकडे अतिशय गांभीर्याने भारतीयांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. भारतातील आर्थिक राष्ट्रवादी विचारणाची पद्धतशीर मांडणी केली. सन १८६७ मध्ये "Poverty of India" या निबंधवजा पुस्तकातून त्यांनी 'आर्थिक निःसारणाचा सिद्धात' विषयक विचार मांडला. पुढे या लेखांचे सन १९०१ "Poverty and Un-British Rule in India" या ग्रंथ स्वरुपात याची सविस्तरपणे चर्चा केली. दादाभाईच्यानंतर रोमेशचंद दत्त, न्या. एम. जी. रानडे, ना. गो. गोखले, विल्यम डिग्बी, एस. एन. बॅनर्जी, जी. व्ही. जोशी, लाला लजपतराय, तपन मुखर्जी व इरफान हबीब इत्यादी विचारवंतांनी 'आर्थिक निःसारणाचा सिद्धात' मांडणी केली.

### १. आर्थिक नि:स्सारणाची संकल्पना :-

आर्थिक नि:स्सारण म्हणजे आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी, प्रगतीसाठी एका व्यक्तीने अथवा व्यक्तीसमूहाने अथवा देशाने दुसऱ्या व्यक्तीची अथवा व्यक्तीसमूहाची अथवा देशाची संपत्ती हरप्रकारे शोषून घेण्याची प्रक्रिया. या प्रक्रियेत स्वार्थी शोषक दुर्बल शोषितावर अन्याय करतात. भारतातून इंग्लंडकडे स्थलांतरित अथवा नि:स्सारीत झालेली संपत्ती किंवा वस्तु की ज्या मोबदल्यात कोणत्याही स्वरूपाची भरपाई न मिळणे म्हणजेच संपत्तीचे अपहरण किंवा आर्थिक नि:स्सारण असे म्हणतात.

थोडक्यात भारतामधून इंग्लंडकडे होणारे संपत्तीचे हस्तांतरण अथवा जाणाऱ्या साधनसंपत्तीचा ओघ आणि त्याबदल्यात कोणताही स्वरुपाचा भौतिक परतावा न मिळणे यालाच संपत्तीचे अपहरण अथवा आर्थिक निःस्सारण म्हणतात. आर्थिक निःसारण सिद्धांताला 'द्रव्यापहरण' किंवा 'संपत्तीचे अपहरण' (Drain of Wealth) इत्यादी संज्ञांनी ओळखले जाते. दादाभाई नौरोजींनी ब्रिटीशांनी भारतातून शोषून नेलेल्या संपत्तीची तुलना पाण्याच्या निःस्सारणाशी केली. ज्या प्रकारे एका ठिकाणचे पाणी दुसऱ्या ठिकाणी पाटाच्या सहय्याने नेले जाते. त्याप्रमाणे ब्रिटिशांनी भारतातील संपत्ती इंग्लंडकडे वाहून नेली. त्यामुळे एकेकाळचा संपन्न भारत दरिद्र्याच्या खाईत लोटला गेला. ब्रिटीशांनी केवळ व्यापारी दृष्टीकोनातून व हक्काची बाजारपेठ म्हणून भारताचा उपयोग करून घेतला.

## २. शोषक अर्थव्यवस्थेचे तीन टप्पे :-

आर्थिक नि:स्सारण अथवा शोषणाचा सिद्धांत प्रक्रिया ही काही अखंडित घटना नव्हती. वसाहतवादाला अथवा शोषणाला कोणतीही एकीकृत संरचना नव्हती याचे अनेक टप्पे होते. शोषण करण्याचे मार्ग व पद्धती वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये बदलत गेलेले दिसतात. हे बदल अनेक कारणांमुळे होत असलेले दिसतात. उदा. जागतिक भांडवलशाही व्यवस्थेमधील परिवर्तन, वसाहतवादी सत्ताधाऱ्यांच्या देशामधील बदल आणि वसाहत असलेल्या देशामधील आर्थिक व सामाजिक बदल हे शोषणाच्या पद्धतींवर परिणाम करत असलेले दिसतात. इतिहासकार शोषणाच्या तीन वेगवेगळ्या टप्प्यात विभागणी करतात. प्रत्येक टप्प्यामध्ये वेगवेगळ्या शोषण पद्धती व विविध मार्ग हाताळलेले असल्यामुळे विविधता आढळतात. सुरवातीच्या टप्प्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या शोषण पद्धती नंतरच्या टप्प्यांमध्ये नवीन शोषण पद्धतींबरोबर चालू राहतात. वसाहतवादाच्या प्रत्येक टप्प्यात गुणात्मक बदल होत असतो. आर. पी. दत्त यांनी पहिल्यांदा भारताच्या संदर्भात वसाहती शोषणाचा सिद्धांत मांडला. त्यांनी भारतातील ब्रिटीश वसाहतवादाची विभागणी तीन टप्प्यांमध्ये केली :

१) व्यापारी भांडवलशाहीचा टप्पा (१७५७-१८००)

२) औद्योगिक भांडवलशाहीचा टप्पा (१८००-१८६०)

३) वित्तीय भांडवलशाहीचा टप्पा (१८६०-१९४७)

## ३. आर्थिक नि:स्सारणाचे मार्ग :-

भारतीय संपत्तीचे प्रमुख तीन मार्गानी नि:स्सारण झाले, ज्यामधे व्यापारचा मार्ग, उद्योगधंद्यामार्फत आणि राजकीय मार्ग इत्यादीचा समावेश होता. यातील प्रमुख मार्ग पुढील प्रमाणे

### १) गृह खर्च :-

गृहखर्चामध्ये ब्रिटीश अधिकाऱ्यांचे वेतन आणि निवृत्ती वेतन, ब्रिटीश सैन्यावरील खर्च, ब्रिटीश

भांडवलावरील लाभांश व भारतमंत्र्यांचे वेतन अथवा भारतमंत्र्याने इंग्लंडमध्ये केलेला खर्च इत्यादींचा समावेश होता. गृहखर्च हा भारताच्या अप्रत्यक्ष आर्थिक शोषणाचा मुख्य मार्ग होता. सन १८३७ ते १९०१ या कालखंडात ब्रिटिश सरकारने प्रतिवर्षी ३ दशलक्ष पौंड इतकी रक्कम फक्त गृहखर्चावर खर्च केलेली होती. यामध्ये पुढे प्रतिवर्षी १६ दशलक्ष पौंड इतकी प्रचंड वाढ झाली. तर सन १९३० मध्ये ती रक्कम प्रतिवर्षी ३० दशलक्ष पौंड इतकी वाढली

## २) युद्ध खर्च :-

ब्रिटीशांनी बंगालमध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर भारतात आणि भारताशेजारील देशामध्ये साम्राज्य वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात युद्ध केली. यामध्ये म्हैसूर-इंग्रज, मराठा-इंग्रज, शिख-इंग्रज, अफगाणिस्तान-इंग्रज, ब्रह्मदेश-इंग्रज, नेपाळ-इंग्रज आणि तिबेट-इंग्रज इत्यादी युद्धांचा समावेश होता. ब्रिटीशांनी आपल्या साम्राज्य वाढीसाठी ही युद्धे केली मात्र त्याचा खर्च भारतातील तिजोरीतून केला. हा युद्ध खर्च म्हणजे भारतीय पैशाची लुटच होती.

## ३) ब्रिटीश अधिकाऱ्यांनी इंग्लंडला पाठविलेली संपत्ती :-

भारतीय प्रशासनामध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात भरणा होता. तसे त्यांचे वेतनही. प्रमुख व महत्त्वाच्या ठिकाणी कार्यरत ब्रिटीश अधिकारी आपल्या कुटंबाच्या पालनपोषणासाठी आणि मुलांच्या शिक्षणाच्या खर्चासाठी भारतातून मोठ्या प्रमाणात पैसे पाठवित असत. याशिवाय भारतातील संस्थानिकांच्या कडून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वसूल केलेला पैसा, हद्दप केलेली संपत्ति या माध्यमातूनही संपत्तीचे अपहरण इंग्लंडला होत होते.

## ४) कर्जावरील व्याज :-

ब्रिटीश साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी कंपनीने अनेक युद्धे केली. या युद्धांचे खर्चामुळे कंपनीला ७ कोटी पौंड इतके कर्ज झाले होते. याशिवाय सार्वजनिक कर्ज २२ कोटी ४० लाख पौंड इतके होते. या कर्जामधील काही कर्ज रेल्वे, सिंचाई इत्यादीवर खर्च केलेले होते आणि हे कर्ज त्यांनी इंग्लंडमधून घेतले होते. मात्र त्या कर्जावरील भरमसाठ व्याज भारताच्या तिजोरीतून द्यावे लागत होते.

## ५) ब्रिटीश भांडवल गुंतवणूक :-

इंग्लंडमध्ये घडून आलेली औद्योगिक क्रांति आणि तेथील उद्योगांसाठी लागणारा कच्चा माल भारतातीय बाजार पेठेतून इंग्लंडला पाठवणे आणि तयार झालेला पक्का माल भारतात पोहचविण्यासाठी कंपनीने वाहतूक-दळणवळणाच्या सोयी निर्माण केल्या. त्यासाठी लागणारे भांडवल इंग्लंडमधून उभे केले. याशिवाय कोळसा, साखर, कागद, शेतीमाल, चहा, कॉफी, रबर, तबाखू, इत्यादी क्षेत्रातही

गुंतवणूक केली. इंग्लंडमधील भांडवलदारांनी केलेल्या या भांडवल गुंतवणुकीवरील लाभांश, व्याज व नफ्याच्या स्वरूपात भारतातील पैसा इंग्लंडमध्ये पाठविण्यात आला.

### ६) सेवा खर्च :-

इंग्लंडमधील भांडवलदारांनी बँका, विमा, रेल्वे, कोळसा, जहाज आणि इतर काही क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक केली. यामधून त्यांना कोट्यावधी रुपयाचा नफा कमविला. या बहुतांशी कंपन्या ब्रिटीश मालकीच्या असल्याने त्यांनी मिळविलेला प्रचंड नफा इंग्लंडला जात होता. तसेच भारतातील व्यापार हा प्रामुख्याने ब्रिटीश मालकीच्या वाहतुक साधनाद्वारे होत असल्याने त्या भाड्यापोटी इंग्लंडला मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होत होते. इंग्लंडमधून भारतापर्यंत संदेशवहनासाठी टाकलेल्या तारांचा खर्चही भारताच्या तिजोरीतून वसूल केला जाई.

### ७) व्यापारी धोरण :-

औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उदयास आले होते. भारतातून कच्चा माल कमी किंमतीतया उद्योगधंद्यांना पाठवणे आणि तयार झालेला पक्का माल भारतीय बाजारपेठेत पाठवणे या दृष्टीकोनातून भारता संबंधीचे व्यापारी धोरण आखण्यात आलेले होते. भारतीय जकातीचे दर इंग्लंडमधील उद्योगधंद्यांच्या फायद्याच्या दृष्टीने ठरविलेले होते. या व्यापारी धोरणातून व्यापाऱ्यांनी प्रचंड मोठा नफा प्राप्त केला. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी विविध राजे, संस्थानिक आणि नवाब यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पैसा (खंडनीच्या अथवा देणगीच्या स्वरुपात) वसूल केला. कंपनीचे अधिकारी व नोकरा-चाकर भ्रष्ट होते. त्यांनी खाजगी व्यापारातून मोठ्या प्रमाणात पैसा लुबाडून इंग्लंडला पाठविला होता. कंपनीने विविध मार्गांनी भारतातील जास्तीत जास्त संपत्ती इंग्लंडमध्ये हस्तांतरित करण्याचा प्रयत्न केला. यामुळे भारतीय भांडवल निर्मितीचा वेग मंदावून भारताची वाटचाल दारिद्र्याकडे झाली.

## ४. आर्थिक नि:स्सारणासंबंधी अंदाज :-

भारतामधून इंग्लंडकडे ज्याविविध मार्गांनी किती प्रमाणात आर्थिक निःस्सारण झाले. याचा अनेक विचारवंतांनी अंदाज व्यक्त करण्याचे प्रयत्न केलेला दिसतो. सन १७९४ ते १८१३ या काळात ८,२६,७५७ पौंड किंमतीचे सूती कापड इंग्लंडमधून भारतात आयात झाले. १८१४-१८१५ या एका वर्षात ३४,४६,०१६ पौंड इतकी रक्कम इंग्लंडकडे गेली. पुढील काळात ही रक्कम वाढतच गेलेली दिसते. उदा. सन १८३६-३७ मध्ये ३०,९०,५८२ पौंड तर सन १८५१ मध्ये ६१,३२,०४३ पौंडाची संपत्ती इंग्लंड मध्ये गेली. तत्कालीन लॉर्डस सभेच्या चिकित्सक समितीचे अध्यक्ष लॉर्ड एलेनबरो यांनी इ. स. १८४० मध्ये भारताला प्रतिवर्षी २० ते ३० लाख पौंडाची रक्कम इंग्लंडला पाठवावी लागत असल्याचे

मान्य केले. दादाभाई नौरोजी यांच्यामते सन १८६५-६६ पर्यंत १५० कोटी पौंड संपत्ती भारताबाहेर गेली. विल्यम डिग्बीने ब्रिटिशांनी त्यांच्या शासनकाळात ज्या विविध मार्गांनी लुटालूट करून किती संपत्ती त्यांच्या देशात वाहून नेली त्याची मोजदाद करणे ही कठीण आहे असे म्हंटले आहे. प्लासी (१७५७) ते वॉटर्लू (१८१५) या काळात ५० ते १०० कोटी पौंडाची संपत्ती भारतातून इंग्लंडला नेण्यात आली असा अंदाज व्यक्त केला. कंपनीने केलेल्या या रक्तशोषणामुळे भारताच्या विकासाची क्षमताच हळूहळू पांगळी बनली. एस. एन. बॅनर्जी यांच्या अंदाजानुसार एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या ३० वर्षाच्या काळात आर्थिक निःस्सारणाचे वार्षिक सरासरी मूल्य सुमारे ३० दशलक्ष पौंडइतके होते असे म्हंटले आहे.

## ५. आर्थिक निःसारणाचे परिणाम :-

### १) दारिद्र्य वाढले :-

भारतीय साधनसंपत्तीचे वेगवेगळ्या मार्गानी द्रव्यापहरण राहिले याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम घडून आले. भारतात कमालीचे दारिद्र्य वाढीस लागले. दादाभाई नौरोजींनी याला 'वाईटातले वाईट' (evil of all evils) असे म्हटले. त्यांच्या मते, एकेकाळी सधन असलेल्या भारताला निर्धन व दारिद्र्याच्या खाईट टाकून भारतातील संपत्तीचे निःसारण झाले. डॉ. ईश्वरीप्रसाद यांचा मते ''भारत ही इंग्लंडची पोट भरणारी दुभती गाय बनली आणि तिची वासरे मात्र उपाशी मारू लागली.''

### २) शेती व शेतकऱ्यावर परिणाम झाला :-

ब्रिटीशांनी भारतातून जे द्रव्य इंग्लंडमध्ये पाठवले त्याचा अप्रत्यकक्ष परिणाम भारतीय शेती व शेतकऱ्यावर झाला. भारताकडे ते केवळ एक कच्चा माल पुरवणारा देश म्हणूनच पाहत होते. त्या काळात ब्रिटीशांनी ज्या प्रकारच्या शेतीला प्रोत्साहन दिले. त्याचा कोणताही फायदा शेतकऱ्यांना झाला नाही. यासंबंधी रोमेशचंद दत्त म्हणतात की, ''भारतातून इंग्लंडकडे जे धन निःसारण झाले त्याचे उदाहरण या भूतलावरील कोणत्याही देशात आढळत नाही. निव्वळ महसूलाचा निम्मा हिस्सा प्रतिवर्षी भारताबाहेर जातो, खरोखरच भारतीय जमिनीचा ओलावा अन्य देशांना सुपीक व सुखी बनवतो. देशाच्या साधनसंपती सुखी बनवतो. देशाच्या साधनसंपत्तीचे इतके मोठे आर्थिक निःसारण या भूतलावरील सर्वाधिक संपन्न देशानाही निर्धन करील, या निःसारणामळे भारत देश, हा दुष्काळाचा देश झाला आहे, भारताच्या किंवा जगाच्या लिखित इतिहासातील कोणत्याही दुष्काळापेक्षा भारतातील दुष्काळ अधिक घातक स्वरूपाचे झाले आहेत.'' आर्थिक निःसारणामुळे भारतीय शेतकऱ्यांची निर्धनता वाढून तो दुष्काळाच्या चक्रात अडकला गेला. जमीन महसुलाच्या रक्कमेतून मोबदल्यात कोणत्याही प्रकारच्या दीर्घकालीन सवलती मिळाल्या नाहीत. त्यामुळे तो कर्जबाजारी बनून दरिद्री झाला.

## ३) भांडवल निर्मिती होवू शकली नाही :-

आर्थिक निःसारण म्हणजे भारताच्या दृष्टीने भांडवलहानी होती. आर्थिक लुटीमुळे भारताला संपत्तीच नव्हे तर भांडवलही गमवावे लागले. आर्थिक निःसारणाच्या मोबदल्यात भारताला कोणताही भांडवली लाभ मिळला नाही. त्यामुळे भारतातील भांडवलनिर्मिती अत्यल्प राहिली. बिपन चंद्रा यांच्यामते, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा सुमारे ६% आणि राष्ट्रीय बचतीच्या एक तृतीयांश इतक्या संपत्तीचे वहन इंग्लंडला होत होते. परिणामतः भारतातील बचत इंग्लंडकडे जाऊ लागल्याने भारतात भांडवलनिर्मिती होऊ शकली नाही.

## ४) उद्योग व हस्तउद्योगांचा ऱ्हास झाला :-

आर्थिक निःसारणाचा फायदा इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला झाला. भारतातील उद्योग धांड्यांचा व औद्योगिक विकासाचा वेग मंदावला. त्याचे कारण भारतात या काळात भांडवल जमा होऊ शकले नाही. ब्रिटीशांच्या व्यापारी धोरणाच्या परिणाम स्वरूप येथील उद्योग धांड्यांचा नव्हेत तर भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास घडून आला. या संदर्भात जी. व्ही. जोशी म्हणतात की, कोणतेही देश असे निःसारण सहन करून त्याचबरोबर प्रगतीपथावर राह शकत नाही. रोमेशचंद्र दत्त यांनी असे म्हंटले आहे की, जेव्हा देशात कर बसविले जातात आणि त्या करापासून मिळणारे उत्पन्न देशातच खर्च केले जाते, तेव्हा तो पैसा देशातच परिचलनात राहतो, त्यामुळे व्यापार, उद्योग आणि शेती या क्षेत्रांना उर्जितावस्था प्राप्त होते आणि ही समृद्धी या ना त्या प्रकारे जनतेपर्यंत पोहचते. पण देशांतील करांपासून मिळणारे उत्पन्न देशाबाहेर पाठविले जाते तेव्हा तो पैसा किंवा उत्पन्न कायमचा गमावला जातो, त्यामुळे त्या देशाच्या विकासाला किंवा उद्योगांना चालना मिळत नाही किंवा तो पैसा देशातील लोकांपर्यंत कोणत्याही मार्गाने पोहचत नाही

## ५) रोजगार निर्मिती झाली नाही :-

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा काही भाग ब्रिटीश लोक भारताबाहेर खर्च करीत होते. ती रक्कम जर भारतात खर्च केली असती तर भारतात रोजगारनिर्मिती व उत्पन्न निर्मिती शक्य झाली असती. आर्थिक निःसारणामुळे भारतातील रोजगारावर आणि भारताच्या उत्पन्नावर घडून आलेल्या अनिष्ट परिणामाबाबत दादाभाई नौरोजी, रोमेशचंद दत्त, एस. एन. बॅनर्जी इत्यादी विचारवंतांनी लिखाण केलेले आहे. आर्थिक निःसारणामुळे रोजगारनिर्मितीवर झालेल्या संबंधी रोमेशचंद दत्त यांनी एका भारतीय कवीने दिलेल्या उपमेचा उल्लेख करून लिहितात की. राजा आपल्या प्रजेकड़न जास्तीचे कर घेतो आणि सूर्य जसा पृथ्वीकडून पाणी घेऊन पुन्हा पावसाच्या रूपाने परत करतो, तसा व्यवहार करतो. पण येथे सूर्य भारताकडून पाणी (वाफेच्या रूपात) घेतो आणि पाऊस मात्र इंग्लंडला देतो.

### ६) भारतावर कर्जाचा डोंगर वाढला :–

आर्थिक निःसारणामुळे भारतातील संपत्ती देशाबाहेर गेली. परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होवून भारत कर्जबाजारी झाला. यासंबंधी दादाभाई नौरोजी म्हणतात की, भारतातील संपत्ती आर्थिक निःसारणामुळे भारताबाहेर जाते आणि कर्जाच्या रूपाने परत येते. मात्र त्या कर्जावरील व्याज पुन्हा बाहेर जाते आणि अशाप्रकारे कर्जाचे हे चक्र चालू राहते.

दादाभाई नौरोजीं यांनी आर्थिक निःसारणाची नैतिक नैतिक अपहरनाची अतिशय एक वाईट बाजू समोर मांडली आहे. दादाभाई म्हणतात, ''आत्मा, बुद्धीचातुर्य, विद्वत्ता निसर्ग सर्वच देशांना बहाल करतो, पण भारतात मात्र ती बाब इतिहासजमा होत आहे. त्यामुळे आधुनिक प्रशासनपद्धतीत तीन प्रकारांनी भारतीयांचा ऱ्हास होत आहे.''

आर्थिक निःसारणाची भारताच्या उत्पन्नावर आणि संपत्तीवर, भांडवल निर्मितीवर, औद्योगिक विकासावर, जमिन महसूल, व्यापार, शेती आणि भारतीय जनतेच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न भारतीय राष्ट्रवादी नेत्यांनी केला आहे. भारतातील ब्रिटिशांची राजवट अत्यंत शोषक स्वरूपाची होती हे राष्ट्रवादी नेत्यांनी आर्थिक निःसारणाच्या सिद्धांताद्वारे स्पष्ट करून दाखवले. भारतीय राष्ट्रवादी विचारवंतांनी मांडलेल्या आर्थिक निःसारणाच्या सिद्धांतावर टीका होत असली तर त्याचे महत्त्व कमी होत नाही. भारताच्या दारिद्र्याला व मागासलेपणाला ब्रिटीशांचे आर्थिक निःसारणाच जबाबदार असल्याची जाणीव भारतीयांमध्ये निर्माण केली. यामुळे ब्रिटीश सत्तेच्या चांगुलपणावर असलेल्या विश्वासाला तडा गेला. भारतीयांना ब्रिटीश साम्राज्यवादाची खरी ओळख झाली. भारतातून इंग्लंडला होत असलेल्या आर्थिक निःसारणाला आपला प्रमुख टिकाविषय बनवून साम्राज्यवादाच्या आर्थिक गाभ्यालाच हात घातला. राष्ट्रीय चळवळीमध्ये या सिद्धांताच्या आधारे ब्रिटीशांच्या शोषक स्वरूपाची जाणीव निर्माण केली.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ✻

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. "Poverty of India" ग्रंथ ............... मध्ये प्रकाशित झाला

२. आर्थिक निःसारणाचा सिद्धांत ............. यांनी मांडला

३. ............... यांनी पहिल्यांदा भारताच्या संदर्भात वसाहती शोषणाचा सिद्धांत मांडला.

४. इंग्लंडमध्ये घडून आलेली ............... ने भारतीय व्यापारला घरघर लागली

५. लॉर्ड एलेनबरो यांनी भारताला प्रतिवर्षी ................ लाख पौंडाची रक्कम इंग्लंडला पाठवावी लागत असल्याचे मान्य केले.

६. दादाभाई नौरोजींनी यांनी आर्थिक निःसारणाचा सिद्धांतला .............. असे म्हटले.

७. आर. पी. दत्त यांनी वसाहतवादी शोषणाचे ............. टप्पे संगितले आहेत

८. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा सुमारे ............. इतक्या संपत्तीचे वहन इंग्लंडला होत होते.

९. ................ यांचा मते भारत ही इंग्लंडची पोट भरणारी दुभती गाय बनली आणि तिची वासरे मात्र उपाशी मारू लागली.

१०. खुल्या व्यापारी धोरणाचा पुरस्कार .............. यांनी केला

## ३.३ पारिभाषीक शब्द, शब्दार्थ

१. **रयतवारी पद्धत :** ज्या जमीन धारणेच्या प्रकारामध्ये सरकार व जमीन कसणारी रयत यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबध प्रस्तापित झालेला असतो. अशा जमीनधारणेच्या प्रकाराला रयतवारी पद्धत असे म्हणतात रयतेकडून जमीन महसूल गोळा करून तो सरकारात भरणारा कोणी मध्यस्थ अगर दलाल या प्रकारात नसतो.

२. **कायमधारा पद्धती :** बिहार, बंगाल, ओरिसा या भागांत तर कालांतराने मद्रास व वाराणसी येथे सुरु केली. या पद्धतीत सारा वसुलीचा अधिकार जमिनदारांना देण्यात आला व ते जमिनीचे मालक बनले. या पध्दतीत ठरवलेला महसूल ठराविक काळासाठी कायम स्वरूपाचा होता.

३. **महालवारी पद्धत :** महालवारी पद्धतीत जमिनीवर संयुक्त मालकी गावातील लोकांची असते. सरकार त्या गावाचा शेतसारा म्हणून ठराविक रक्कम ठरवून देत असे.

४. **आर्थिक शोषण :** आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी व प्रगतीसाठी एका व्यक्तीने अथवा व्यक्तिसमूहाने अथवा देशाने दसऱ्या व्यक्तीची अथवा व्यक्तिसमुहाची अथवा देशाची संपत्ती हरप्रकारे शोषून घेण्याची प्रक्रिया. या प्रक्रियेत स्वार्थी शोषक दुर्बल शोषितावर अन्याय करतात.

५. **निःसारण :** निचरा होणे, वाहून जाणे, संपत्तीच्या निःसारणाला आर्थिक निःसारण अथवा आर्थिक धूप असे म्हणतात.

६. **अनुद्योगीकरण :** विविध उद्योगांच्या ऱ्हासाची प्रक्रिया. ब्रिटिश कालखंडात अनेक पारंपारीक उद्योगधंद्यांचा जो हास घडून आला त्याचा निर्देश या संज्ञेद्वारे केला जातो.

७. **संरक्षक जकातीचे धोरण :** देशात आयात केल्या जाणाऱ्या मालावरील जकातकर हा निर्यात होणाऱ्या मालावरील जकातकरापेक्षा खूपच जास्त असतो आणि त्याद्वारे व्यापारी स्पर्धेमध्ये परकीय मालापेक्षा स्वदेशी माल स्वस्त मिळू शकतो. स्वदेशाच्या व्यापारी हितसंबंधाचे रक्षण करणाऱ्या अशा जकातविषयक धोरणाला संरक्षण जकातीचे धोरण असे म्हणतात.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

*१. नबाब अझिमुश शहा.*

*२. सन १७७०.*

*३. २२ मार्च १७९३.*

*४. कॅप्टन अलेक्झांडर रीड.*

*५. रयतवारी.*

*६. ३०.*

*७. रयतवारी.*

*८. लॉर्ड विल्यम बेंटिंग.*

*९. कायमधारा.*

*१०. ०३.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

*१. 'शबनम'.*

*२. सन १७००व १७२०.*

*३. सन १८१३.*

*४. मँचेस्टर व लाकेशायर.*

*५. ५२००.*

*६. ढाक्याचे.*

*७. अंतर्गत जकाती व अबकारी.*

*८. सन १८३३ च्या.*

*९. मॉरिस -डी-मॉरिस.*

*१०. इंडिया दुडे.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

*१. सन १८६७.*

*२. दादाभाई नौरोजी.*

*३. आर. पी. दत्त.*

*४. औद्योगिक क्रांती.*

*५. २० ते ३०.*

*६. 'वाईटातले वाईट'.*

*७. तीन.*

*८. ६%.*

*९. डॉ. ईश्वरीप्रसाद.*

*१०. ॲडम स्मिथ.*

## ३.५ सारांश

भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनी एक व्यापारी कंपनी म्हणून आलेली होती. व्यापारच्या माध्यमातून अधिकअधिक फायदा प्राप्त करणे हा त्यांचा मूळ उद्देश होता. १८ व्या शतकात भारतातील अस्थिर राजकीय परिस्थिचा फायदा घेत कंपनीने एक एक प्रदेश पादाक्रांत केला. बंगालचा नवाब व मुघल बादशहाकडून मिळालेले मुलकी व दिवाणी अधिकार राजकीय सत्ताकेंद्र स्थापन करण्यास पोषक ठरले. बंगालमध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर कंपनीने व्यापाराबरोबर राजकीय विस्ताराचे धोरण स्वीकारले. अनेकविध नैतिक अनैतिक मार्गांचा अवलंब करत कंपनीने भारतातील उघोग, हस्तकला व्यवसाय, लघुउघोग नष्ट केले. आर्थिक पिळवणुकीचे धोरण स्वीकारले. परिणामी शेतीवर अतिरीक्त बोजा पडू लागला. उघोगधंद्यातून बेकार झालेले कारागीर उदरनिर्वाहासाठी शेतीकडे वळले. त्यामुळे शेतावर मोठ्या प्रमाणात ताण पडू लागला. कंपनीच्या अगोदरच्या काळात जमिनदारांना शेतसाऱ्यात वाढ करण्याचा अधिकार नव्हता. कंपनीच्या काळात मात्र जमीन महसूल ही बाब राज्याचे उत्पन्न मानले गेल्याने जादा जमीन महसूल वसूल करण्याकडे कंपनीने अधिक भर दिला. कायमधारा, रयतवारी आणि महालवारी इत्यादी जमीन महसूल पद्धतीचा वापर केला. महसूल कर वाढल्यामुळे भारतीय शेतकरी मोठ्या अडचणीत

सापडला. खते, बि-बीयाणे, कृषी साधनाचा अभाव, ओले व कोरडे दुष्काळ आणि सक्तीची जमीन महसूल पद्धती यामुळे शेतकरी कर्जबाजारी बनला. सावकारांना जमीनी विकून महसूल भरावा लागे. कर्ज थकल्यास जमीनींचे लिलाव होण्यास सुरवात झाली. भारतातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असल्याने शेतीचे उत्पादन मर्यादित होते. कंपनी सरकारने शेतीकडे लक्ष दिले नाही. शेतीच्या क्षेत्रात इंग्रजानी आर्थिक साम्राज्यवाद चालू केला. शेतीचे व्यापारीकरण केले. युरोपमध्ये घडून आलेली औद्योगिक क्रांती व १८१३ मध्ये संपुष्टात आलेली कंपनीची व्यापारी मक्तेदारी यामुळे ब्रिटिश सरकारने भारताबाबत खुल्या व्यापारचे धोरण स्वीकारले. खुल्या व्यापाराच्या स्पर्धेत भारतातील हस्तद्योग तग धरू शकले नाहीत. त्यातून भारतीय उघोगधंद्याचा ऱ्हास घडून आला. त्याचे दूरगामी परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर घडून आले. ब्रिटिशाने अनेकविध मार्गानी संपतीची लूट केली. भारतातून झालेल्या या लूटी विरुद्ध भारतीय विचारवंतांनी आवाज उठवण्यास सुरवात केली. राष्ट्रवादी विचारांची मांडणी सुरू झाली.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

### ❑ अ) टिपा लिहा.

१. महालवारी पद्धती.

२. ओद्योगिक ऱ्हासाचे परिणाम.

३. दादाभाई नौरोजी.

४. भारतीय शोषणाचे टप्पे.

५. आर्थिक नि:सारणाची संकल्पना.

### ❑ ब) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा

१. कायमधारा पद्धतीची चर्चा करा.

२. रयतवारी पद्धतीची माहिती द्या.

३. रयतवारी पद्धतीच्या परिणामाची चर्चा करा.

४. औद्योगिक ऱ्हासाच्या कारणाची चर्चा करा.

५. आर्थिक नि:सारणाच्या विविध मार्गांची चर्चा करा.

६. आर्थिक नि:सारणाची परिणामांची चर्चा करा.

## ३.७ संदर्भ ग्रंथ/अधिक वाचनासाठीचे ग्रंथ

१. **जावडेकर, श. द.**, *आधुनिक भारत*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७९.

२. **दत्त, रजनीपाम** *(अनु.य.ना.देवधर), आजकालचा भारत*, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००६.

३. **ग्रोवर, बी. एल.** *(अनु.डॉ.एन.के.बेल्हेकर), आधुनिक भारताचा इतिहास*, एस. चांद आणि कंपनी, नवी दिल्ली, २००३.

४. **राय, सत्या. एम.**, *भारत मे उपनिवेशवाद और राष्ट्रवाद*, हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, २००२.

५. **सरदेसाई, बी.एन., नलावडे, व्ही.एन.**, *आधुनिक भारताचा इतिहास*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४.

६. **सरदेसाई, बी. एन.**, *आधुनिक महाराष्ट्र*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००.

७. **गोखले, आर. एम.**, *भारताचा आर्थिक इतिहास*, ओरिएंट लाँगमन, पुणे, १९७७.

८. **पाटील, अवनिश** (संपा.), *१९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास*, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१७.

९. **Gadgil, D. R.**, *The Industrial Evolution of India in Recent Times*, Oxford University, Calcutta, 1959.

१०. **Sarkar, Sumit**, *Modern India : 1855-1947*, MacMillan India Ltd., Madras, 1986.

११. **Roy, Tirthankar**, *The Economic History of India : 1887-1947*, Oxford University Press, New Delhi, 2000.

१२. **Romesh Dutt**, *The Economic History of India in the Victorian Age*, Kegan Paul, Trench, Trubner Co. Ltd., 1908.

❑❑❑

सत्र-३ : घटक-४

# कंपनी सरकारविरुध्द उठाव

## अ) आदिवासींचे उठाव

## ब) १८५७ चा उठाव

## क) १८५८ चा राणीचा जाहिरनामा व त्यांचे परिणाम

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ आदिवासींचे उठाव

४.२.२ १८५७ चा उठाव

४.२.३ १८५८ चा राणीचा जाहिरनामा व त्यांचे परिणाम

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला खालील बाबी लक्षात येतील.

१. ईस्ट इंडिया कंपनीविरोधात झालेल्या आदिवासी उठावाची माहिती मिळेल.

२. १८५७ चा उठाव कसा झाला याची माहिती मिळू शकेल.

३. १८५७ च्या उठावाची कारणे, वाटचाल व परिणामांची माहिती सांगता येईल.

४. १८५७ च्या राणीच्या जाहिरनाम्याविषयी माहिती मिळेल.

## ४.१ प्रास्ताविक

१७ व्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंडमधील ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाऱ्यांनी भारतात प्रवेश केला. तराजू-तलवार या नीतीने दीडशे वर्षांनी भारताच्या राजकारणात चंचूप्रवेश केला. त्यावेळी भारतात लहान-मोठी शेकडो संस्थाने स्वतंत्रपणे राज्य करीत होती. रॉबर्ट क्लाईव्हची 'दुहेरी शासन पद्धती', लॉर्ड वेलस्लीची 'तैनाती फौज' योजना आणि 'लॉर्ड डलहौसीचे विलिनीकरण धोरण' अशी विविध धोरणे राबवून कंपनी राजवटीने अनेक संस्थाने आपल्या साम्राज्यात विलिन करून घेतली. सन १८५६ ईस्ट इंडिया कंपनीने संपूर्ण भारतावर वर्चस्व प्रस्थापित केले. हे वर्चस्व प्रस्थापित करत असताना कंपनी सरकारकडून संस्थानिक, वतनदार, जहागिरदार, आदिवासी व सर्वसामान्य जनतेवर अन्याय केला. परिणामत: कंपनीप्रती जनतेचा असंतोष वाढत गेला व यातूनच स्वतंत्र अशा विविध समूहांनी कंपनी सरकार विरुध्द उठाव केला, याचा प्रारंभ आदिवासींच्या उठावापासून झाला.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ आदिवासींचे उठाव

नागर संस्कृतीपासून दूर राहिलेले आणि डोंगर, जंगलाच्या आश्रयाने राहत असलेले रहिवाशी म्हणजे 'आदिवासी' अशी त्यांची संज्ञा करण्यास येते. इंग्रज येण्यापूर्वी आपली स्वतंत्र वृत्ती जपत त्यांनी बाहेरील जगताशी संबंध ठेवलेला नव्हता. त्यांनी नागरी सुधारणा व आधुनिकता यापासून स्वत:ला दूर ठेवलेले होते.

जगामध्ये आफ्रिकेनंतर भारतात सर्वात जास्त आदिवासींची संख्या आहे. प्रामुख्याने मध्यप्रदेश, बिहार, ओरीसा, राजस्थान, आसाम, गुजरात, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश ही आदिवासी बहुल राज्ये म्हणून ओळखली जातात. तर अरुणाचल प्रदेश, मेघालय, नागालँड या राज्यांची ओळख 'आदिवासी राज्ये' म्हणून केली जाते. आदिवासींमध्ये गोंड, संथाळ, भिल्ल, नागा, मुंडा, खोंड, पावरा, हुबळा, भीड, कोरकू. मावची, कोलम, तडवी, कोया, कोला, माडिया, गोंड, आंध्र, परधान, ठकार, कातकरी, वारली, महादेव कोळी, काथोडी इत्यादी जमाती आढळतात. या आदिवासीज जमाती देशाच्या बऱ्याच भूभागावर पसरलेल्या आहेत.

### अ) भारतातील आदिवासींच्या उठावाची कारणे :-

भारतात ईस्ट इंडिया कंपनीने वसाहतवादी धोरण राबविताना आदिवासी प्रदेशामध्ये प्रवेश केला. आदिवासी लोकांचा जंगलाशी खूप घनिष्ठ संबंध होता. या पहाडी (जंगली) प्रदेशातूनच ते आपल्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करत होते. शिकार करणे, जंगलातील विविध वस्तू गोळा करणे, याचबरोबर

स्थलांतरित स्वरूपाची शेती करणे असा त्यांचा जीवनक्रम होता. स्वतंत्रप्रियता हा त्यांचा खास गुण होता. यामुळे त्यांच्या या स्वातंत्र्यप्रियतेला कोणत्याही शासकाने ठेच पोहचविली नव्हती. इंग्रजांनी प्रथमच सर्वसाधारण समाजापासून अलिप्त जीवन जगणाऱ्या या आदिवासी कार्यक्षेत्रात प्रवेश करून हस्तक्षेप करण्यास सुरूवात केली.

इंग्रजांनी आदिवासी टोळी प्रमुखांना तेथील 'जमीनदार' बनवून त्यांच्यामार्फत जमीन महसूल धोरण राबविण्यास सुरूवात केली. जमीनीवर सारा बसवून तो सक्तीने वसूल करणे, जबरदस्तीने जमीनी ताब्यात घेणे, जंगली उत्पन्नावर मालकीत्व निर्माण करणे, आदिवासींना सक्तीने कमी वेतनावर राबवून घेणे इत्यादीचा यामध्ये समावेश होता. ब्रिटिश अधिकारी, जमीनदार व सावकार वर्गाकडून आदिवासींवर झालेले अन्याय, अत्याचार व शोषण यामुळे स्वतंत्रप्रिय असणाऱ्या आदिवासींचे जीवन अलग-थलग झाले. यातच भर म्हणून ख्रिश्चन मिशनऱ्यांनी गोर-गरीब, अज्ञानी, आदिवासींची सेवा-सुश्रुषा करण्याच्या निमित्ताने ख्रिश्चन धर्मप्रसार सुरू केला. मूलत: स्वतंत्र प्रवृत्ती असणाऱ्या आदिवासींना वरीलप्रमाणे होत असलेला हस्तक्षेप नकोसा वाटू लागला. आपली परंपरा, संस्कृती जोपासणाऱ्या आदिवासींच्यामध्ये असंतोष निर्माण झाला. याचा परिणाम आदिवासींनी विविध ठिकाणी जमेल त्या पद्धतीने कंपनी सरकारविरुध्द उठाव केले. या उठावांची सुरुवात बहुधा इंग्रज अधिकारी, सावकार, जमीनदार यांच्यावर हल्ला करून होत असे. अशावेळी बंदोबस्तासाठी आलेल्या इंग्रज सैन्य, अधिकारी, पोलीस, ठाणे यावरही आदिवासींनी हल्ले चढविले. मिळेल त्या शस्त्रानिशी (तलवार, धनुष्यबाण, काठ्या-कुऱ्हाडी) उठाव केले. परंतु इंग्रजांच्या आधुनिक शस्त्रास्त्रापुढे त्यांच्या पारंपरिक शस्त्रास्त्रांचा टिकाव लागला नाही. तरीही अन्यायाविरुध्द प्राणपणाने लढण्याचे असामान्य धैर्य त्यांनी दाखवून दिले.

## ब) सन १७५७ ते १८५७ या कालखंडात झालेले उठाव :-

### १. संन्याशी उठाव :-

बंगालमध्ये इंग्रजांनी सर्वप्रथम आपल्या सत्तेचा पाया घातला. इंग्रजांच्या विस्तारवादी व आर्थिक शोषक नीतीचा फटका बंगालमधील जनतेला बसला. इंग्रजांच्या नव्या अर्थव्यवस्थेमुळे जमीनदार, शेतकरी, कारागीर यांची दुरावस्था झाली. यातच बंगालमधील शेतकऱ्यांना भीषण दुष्काळाला सामोरे जावे लागले. शेतकरी व कारागीरांची ही व्यथा पाहून संन्याशांनी त्यांना संघटित करून उठाव करण्यास पुढाकार घेतला. यातच बंगालमधील तीर्थस्थळांना, जाण्या-येणाऱ्या लोकांवर ब्रिटिशांनी निर्बंध लादले. या सर्वांचा परिणामस्वरूप संन्याशांनी सन १७६३ मध्ये ब्रिटिशांविरुध्द उठाव सुरू केले. सावकार, इंग्रज अधिकारी यांच्या घरावर हल्ले केले. संन्याशांचे नेते मंजर शाह, मुसा शाह, भवानी पाठक यांनी उठावाचे नेतृत्व केले. या उठावाचे लोण बंगालसह बिहारपर्यंत पसरले होते. संन्याशांनी उत्तर बंगालमधील बोगरा व मैमनसिंह प्रदेश ब्रिटीश जोखडातून मुक्त करून तेथे स्वशासन निर्माण केले. वॉरन हेस्टिंग्जने संन्याशांविरुध्द

दीर्घ लढा उभारून संन्याशांचा हा उठाव मोडून काढला. संन्याशांच्या या उठावाचा उल्लेख बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी आपल्या 'आनंदमठ' कादंबरीत केला आहे.

### २. चुआर उठाव :-

बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यामध्ये चुआर जमातीचे आदिवासी राहत होते. शेती व शिकार करणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. इंग्रजांनी सन १७६५ मध्ये तो प्रदेश आपल्या ताब्यात घेऊन तेथे नवी प्रशासन-व्यवस्था निर्माण केली. या अन्यायी व्यवस्थेच्या विरोधात सन १७६८ साली दलभूम येथील राजा जगन्नाथ धाल याने चुआर जमातींना संघटीत करून उठाव केला. वारंवार पडणारे दुष्काळ, ब्रिटिशांचे अन्यायी महसूल वसुलीचे धोरण याला बळी पडलेल्या चुआर आदिवासी जमातींनी उत्स्फूर्तपणे ब्रिटिशांविरुध्द लढा दिला. या लढ्याचे लोण, बंगाल, बिहारमधील दलभूम, कैलापाल, ढोल्का आणि बाराभूम येथे पसरले होते. सन १८१६ सालापर्यंत चुआरांचा उठाव सुरू होता. शेवटी ब्रिटिशांनी लष्करी बळाचा आणि सामंजस्य धोरणाचा वापर करीत हा उठाव मोडून काढला.

### ३. पाईक उठाव :-

मध्ययुगीन कालखंडापासून ओडीसा राज्यात पाईक पध्दत अस्तित्वात होती. तेथील निरनिराळ्या स्वतंत्र राजांचे जे खडे सैनिक होते, त्यास 'पाईक' असे म्हटले जात असे. युद्धप्रसंगी या पाईकांनी शत्रूविरुध्द लढण्यास मदत करावी त्याचा मोबदला म्हणून तेथील राजांनी पाईकांना कसण्यासाठी मोफत जमीनी दिल्या होत्या. सन १८०३ साली इंग्रजांनी ओडिसा काबीज केले. त्यांनी पाईकांच्याकडे असणाऱ्या वंशपरंपरागत जमीनी जप्त केल्या. इंग्रजांचे सारावसूलीचे धोरण, मीठावरील वाढत्या करामुळे मीठाच्या किंमतीत झालेली वाढ या घटनांमुळे पाईकांच्यामध्ये इंग्रजाप्रती असंतोष निर्माण झाला. परिणामतः खुर्दा येथील राजाने पाईकांच्या मदतीने उठाव केला. सन १८०४ ते १८१७ पर्यंत पाईकांनी ब्रिटिशांविरोधी उठाव केले. पाईकांच्या उठावाचे नेतृत्व जगनबंधू विद्याधर यांनी केले. ब्रिटिशांनी हा उठावही दडपून टाकला.

### ४. भिल्लांचा उठाव :-

खानदेशात राहणाऱ्या मूळ रहिवाशी भिल्ल जमातीने सन १८१८ ते १८३१ या कालखंडात इंग्रजाविरोधी उठाव केले. त्याचे प्रमुख कारण इंग्रज सरकारने निर्माण केलेली आर्थिक दुरावस्था होय. परंतु ब्रिटिशांना या उठावामागे दुसरा बाजीराव पेशवा व त्याचा सहकारी त्र्यंबकजी डेंगळे असावा असे वाटत होते. भिल्लांच्या दैनंदिन जीवनात इंग्रजांनी केलेला हस्तक्षेप त्यांना सहन झाला नाही. इंग्रजांनी आपल्या शोषक नीतीने भिल्लांची उदर निर्वाहाची साधने नष्ट केली. परिणाम म्हणून भिल्लांनी उठाव केला. पुढे ब्रिटिश सरकारला कधी दमननीती तर कधी समझोता धोरणांचा अवलंब करून हा उठाव शांत करण्यात यश मिळाले.

## ५. वाघेरांचा उठाव :-

मध्य प्रांतातील ओखा विभागात राहणाऱ्या वाघेरा लोकांनी ब्रिटिशांविरुध्द सशस्त्र उठाव केला. सुरूवातीपासूनच वाघेरा लोकांनी ब्रिटिश सत्तेला विरोध केला होता. बडोद्याच्या गायकवाड राजांनी ब्रिटिशांच्या तैनाती फौजेचा स्विकार केला. इंग्रज फौजेच्या साहाय्याने सारा वसुली सुरू केली. यामुळे सन १८१८ ते १८१९ या कालावधीत वाघेरा लोकांनी ब्रिटिश प्रदेशावर हल्ले केले. इंग्रजांनी शांतता तह करून हा उठाव थांबविला.

## ६. कच्छमधील उठाव :-

सन १८१९ साली कच्छचा राजा भारमल यास ब्रिटिशांनी पराभूत करून त्याचा अल्पवयीन मुलाला गादीवर बसविले. भारमलचा मुलगा अल्पवयीन आहे हे कारण सांगून कच्छची शासनव्यवस्था ब्रिटिश प्रतिनिधी मंडळाकडे ठेवले व रेसिडेंट मार्फत कच्छचा कारभार सुरू झाला. परिणामत: इंग्रजांनी जादा सारा आकारणी सुरू केल्याने जनतेत असंतोष पसरला. यातच भर म्हणून ब्रम्हदेशाच्या युद्धात इंग्रजांच्या पराभवाची बातमी सर्वत्र पसरल्याने उठाव मोठ्या प्रमाणात झाला. ब्रिटिशांविरोधी उठाव करून कच्छची सत्ता पुन्हा राजा भारमलला मिळवून द्यावयाची. ब्रिटिशाच्या शोषक धोरणाला विरोध करायचा हा हेतू समोर ठेवून लोकांनी उठाव केला. सन १८३१ सालापर्यंत ब्रिटिशांविरोधी लोकांचा असंतोष प्रकट होत राहिला, याची परिणती ब्रिटिशांनी समझोता करून या उठावाचा शेवट केला.

## ७. अहोमांचा उठाव :-

अहोम हे आसाममध्ये राहत असल्याने ब्रिटिशांचे ब्रम्हदेशाबरोबर युद्ध सुरू असताना युद्धानंतर इंग्रज सैन्य आसामच्या प्रदेशातून माघारी घेतले जाईल असे अहोम सरदारांना शब्द दिला होता. परंतु ब्रिटिशांनी तो शब्द पाळला नाही, उलट अहोम लोक राहत असलेल्या प्रदेश ब्रिटिश साम्राज्यात सामील करण्याचा प्रयत्न केला. यामुळे अहोमांनी सन १८२८ मध्ये गोमधर कुंवर यास राजा घोषित करून रंगपूरवर हल्ला करण्याची तयारी केली. इंग्रजांना ही बातमी लागताच त्यांनी अहोमांचा हा उठाव मोडून काढला.

## ८. रामोश्यांचा उठाव :-

महाराष्ट्राच्या पश्चिम घाटात राहणारी एक प्राचीन जमात अशी रामोशी जमातीची ओळख आहे. पेशवाईच्या अस्तापर्यंत मराठी सत्ताधिशांनी आदिवासींच्या दैनंदिन जीवनात व आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप केला नाही. साताराचे छत्रपती व मराठी सत्ताधिशांबद्दल रामोशी जमातीला अभिमान होता. मात्र सन १८१८ मध्ये ब्रिटिशांनी पेशवाईचा शेवट केला व साताराच्या छत्रपतींनाही मर्यादित क्षेत्रापुरते राजेपद दिले व बाकीचा सर्व प्रदेश ब्रिटिश साम्राज्याला जोडला. त्या प्रदेशावर आपली प्रशासन

व्यवस्था व महसूल व्यवस्था लादली. रामोशांचे पारंपारिक हक्क व अधिकार काढून घेतले. आर्थिक दुरावस्थेमुळे संतप्त झालेल्या रामोशांनी इंग्रजांविरुध्द बंडाचे निशाण उभारले. उमाजी नाईक याने रामोशी जमातीला एकत्रित करून इंग्रज राजवटीसमोर आव्हान उभे केले. सन १८२२ मध्ये छत्रसिंगाने आपल्या नेतृत्वाखाली उठाव केला. जमीनदार, सावकार, महसूल अधिकारी, इंग्रज अधिकारी यांच्यावर हल्ले चढविले. सन १८२६ ते १८२९ या कालखंडात ब्रिटिश सत्तेला रामोशी उठावांनी 'सळो की पळो' करून सोडले. पुढे सन १८४०-४१ मध्ये रामोशांनी पुन्हा एकदा सातारा परिसरात मोठा उठाव घडवून आणला. या उठावातून इंग्रज राजवटीविषयीची चीड व सातारा छत्रपतींबद्दल असणारी आत्मीयता दिसून येते. रामोशांचा हा तीव्र प्रतिकार आणि लढाऊ वृत्ती पाहून ब्रिटिशांनी तडजोडीचे धोरण स्विकारून उठाव शमविला. तडजोड म्हणून अनेक रामोशी लोकांना कसण्यास जमिनी दिल्या तर काहींना पोलीस दलात नोकऱ्या दिल्या.

## ९. कूकीचा उठाव :-

मणिपूरजवळ लुशाय टेकड्यांच्या पायथ्याला कुकी आदिवासी जमात रहात होती. या जमातीने इंग्रजाच्या वाढत्या हस्तक्षेपाविरुध्द उठाव केला. कुकीनी इंग्रजांच्या ताब्यातील प्रदेशावर हल्ले करण्यास सुरूवात केली. पर्वतीय प्रदेशांची माहिती इंग्रजांना फारशी नसल्याने कुकींविरुध्द लढा देणे कठीण झाले. तेव्हा पर्याय म्हणून काही कुकींना लाचलुचपत व नोकरीचे आमिष दाखवून फूट पाडण्याचा प्रयत्न केला. सन १८१७ ते १८४८ सालापर्यंत कुकींचे हल्ले होतच राहिले.

## १०. कोळी उठाव :-

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये राहणाऱ्या कोळी जमातीने इंग्रजांविरोधी उठाव केले. इंग्रज राजवटीत त्यांच्या शोषक धोरणामुळे कोळी जमातीमध्ये बेकारीचे प्रमाण वाढले. त्यांना स्वत:चा उदरनिर्वाह भागविणेही कठीण झाले यांचा परिणाम कोळ्यांनी इंग्रजांच्या प्रदेशावर हल्ले चढविले. त्यांच्या ताफ्यातील अनेक किल्ले उध्वस्त केले. सन १८२९, १८३९ व १८४४ साली कोळ्यांनी उठाव केला. पण हा उठाव मोडून काढण्यात आला.

## ११. कोल उठाव :-

छोटा नागपूर परिसरातील कोल जमीतीने उठाव केला. त्याचे प्रमुख कारण कोलांच्या जमीनी ब्रिटिशांनी काढून घेतल्या. १८२० मध्ये पोरहटच्या राजाने ब्रिटिशांवर निष्ठा ठेवून त्यांच्या संमतीने कोलांच्या प्रदेशावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला व शेतसारा गोळा केला. यामुळे प्रचंड संतप्त झालेल्या कोलांनी १८३१ मध्ये उठाव केला. रांची, सिंगभूम, मानभूम, हजारीबाग, पलामाऊ पर्यंत हा उठाव पसरला. बुधो भगत यांने उठावाचे नेतृत्व केले. पारंपारिक शस्त्रानिशी इंग्रजांच्या सशस्त्र

सैनिकाविरुध्द कोलांनी लढा दिला. हा उठाव दोन वर्षे चालू होता. सन १८३२ मध्ये ब्रिटिशांनी सैनिकी कारवाई करून हजारो कोल जमातींच्या लोकांना ठार करून हा उठाव दडपून टाकला.

## १२. खासी उठाव :-

आसाम आणि मेघालय येथील पर्वतमय प्रदेशात खासी जमातीचे लोक राहत होते. १८२४ साली इंग्रजांना ब्रम्हदेशावर आक्रमण करावयाचे होते. यासाठी ब्रम्हदेशाकडे लष्कर तैनात करण्यासाठी खासी आदिवासींच्या प्रदेशातून रस्ता बांधण्यास सुरूवात केली. खासी जमातींना ब्रिटिशांचा हा हस्तक्षेप सहन झाला नाही. यामुळे सन १८२४ ते १८३३ या कालखंडात खासी जमातीने ब्रिटिशांविरुध्द उठाव केले. इंग्रजांनीही खासी जमातीच्या खेड्यावर हल्ले करून खेडी जाळली. खासींची आर्थिक कोंडी केली. परिणाम म्हणून तिरूतसिंग, बरमानिक या खासी नेत्यांनी उठावाची तीव्रता वाढविली. परंतु अपयश आले.

## १३. संथाळ उठाव :-

भारतातील मोठ्या संख्येने असणारी व शांतताप्रिय जीवन जगणारी जमात अशी संथाळाची ओळख आहे. बिहार, पश्चिम बंगाल, उडीसा, छत्तीसगड, झारखंड व बांगलादेशातही संथाळ जमातीचे लोक राहतात. बंगालमधील राजमहल जिल्ह्यात संथाळ जमातीने शेतजमिनीच्या कारणावरून १८५५-५६ मध्ये उठाव केला. संथाळ लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय होता. इंग्रज सरकारचा अंमल संथाळाच्या प्रदेशात सुरू झाल्यानंतर इंग्रजांनी तेथे प्रशासन व्यवस्था निर्माण करून जमीन महसूल गोळा करण्यास सुरूवात केली. यातच भर म्हणून तेथील जमीनदार व सावकारांना पाठिंबा देऊन अनेक अधिकार दिले. परिणाम स्वरूप जमीनदार, सावकार, महसूल अधिकारी यांनी संथाळ लोकांचे शोषण केले. जमिनीची खोटी करारपत्रे करणे, महसूल भरणा झाला नाही तर जमिनी जप्त करणे, स्त्रियांवर अत्याचार, रेल्वे बांधकामावर मजूर म्हणून अल्प वेतनावर राबविणे अशा प्रकारे शोषण केले. या अत्याचारांने त्रस्त झालेल्या संथाळ जमीतीचे नेतृत्व सिधू व कान्हू यांनी केले. सुमारे साठ हजार संथाळ लोकांना संघटीत करून धनुष्यबाण, कुऱ्हाडी, काठ्या घेऊन ब्रिटिशांविरोधी उठावासाठी उभे केले. जमीनदार, सावकार, इंग्रज अधिकारी यांच्यावर हल्ले केले. उठावाची व्याप्ती इतकी मोठी होती की सिधू आणि कान्हू या संथाळ नेत्यांनी इंग्रजांची सत्ता समाप्त करण्याची घोषणा केली व स्वातंत्र्य जाहीर केले. उठावाचे दमन करण्यासाठी इंग्रजांनी लष्करी कारवाई केली तरीही संथाळानी जंगलाच्या आश्रयाने गनिमी कावा पध्दतीचा वापर करून इंग्रजांविरोधी लढा सुरूच ठेवला. इंग्रजांनी संथाळाचा उठाव दडपण्यासाठी क्रूर मार्गांचा अवलंब केला. यात सुमारे पंधरा ते वीस संथाळ लोक मारले गेले. मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई केल्यानंतर १९५६ मध्ये संथाळाचा सर्व प्रदेश इंग्रजांच्या नियंत्रणाखाली आला. संथाळ लोकांचा राग शांत करण्यासाठी सरकारने संथाळ जिल्हा निर्माण केला.

इंग्रजी सत्तेच्या स्थापनेपासून देशाच्या विविध भागात झालेल्या या उठावांनी ब्रिटिश सरकारला काही काळ अस्वस्थ केले. परंतु ब्रिटिशांनी हे उठाव अतिशय क्रूरपणे दडपून टाकले. ब्रिटिशांच्या सामर्थ्यापुढे विविध ठिकाणी, वेगवेगळ्या वेळी झालेल्या आदिवासी उठावाचा टिकाव लागला नाही. तरीही ब्रिटिशांच्या शोषक नीतीमुळे सरकारबाबत लोकांच्या मनात असंतोष धगधगत राहिला. याचा विस्फोट १८५७ च्या प्रचंड मोठ्या उठावात झाला.

## ✲ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ✲

❑ **अ) योग्य पर्याय निवडा.**

१. मंजर शाह व मुसा शाह यांनी ..................... उठावाचे नेतृत्व केले.
*अ) संन्याशी उठाव ब) पाईक उठाव क) चुआर उठाव ड) भिल्ल उठाव.*

२. महाराष्ट्राच्या पश्चिम घाटात राहणारी एक प्राचीन जमात अशी .................. जमातीची ओळख आहे.
*अ) पाईक ब) चुआर क) रामोशी ड) कुकी.*

३. कोल जमातीने ................ च्या नेतृत्वात उठाव केला.
*अ) छत्रसिंग ब) बुधो भगत क) काजीशिंग ड) सेवाराम.*

४. ............... व .............. येथील पर्वतमय प्रदेशात खासी जमातीचे लोक राहत होते.
*अ) मणिपूर व त्रिपुरा ब) ओडीसा व छत्तीसगड*
*क) रांची व मानभूम ड) आसाम व मेघालय.*

५. सिधू व कान्हू यांनी .................. जमातीचे नेतृत्व करून उठाव केला.
*अ) चुआर ब) संथाळ क) कुकी ड) अहोम.*

❑ **ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दलभूमचा राजा जगन्नाथ धाल याने कोणत्या जमातीला संघटीत करून उठाव केला.

२. सन १८२५ मध्ये कोणाच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी उठाव केला.

३. मणिपूरजवळ लुशाय टेकड्यांच्या पायथ्याला कोणती आदिवासी जमात राहत होती.

४. बंगालमधील राजमहल जिल्ह्यात संथाळ जमातीने कोणत्या कारणावरून उठाव केला.

५. कोणत्या राज्यात पाईक पध्दत अस्तित्वात होती.

## ४.२.२ १८५७ चा उठाव

भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासातील सर्वात मोठी घटना म्हणून सन १८५७ च्या उठावाकडे पाहिले जाते. ब्रिटिशांनी सन १७५७ मधील प्लासीच्या विजयानंतर १०० वर्षात भारतातील सर्व स्थानिक सत्ताधिशांवर प्रभुत्व निर्माण करून साम्राज्य विस्तार केला. या शंभर वर्षात अनेक स्थानिक स्वरूपाचे उठाव झाले ते सरकारने चिरडून टाकले. सन १८१८ साली पेशवाई नष्ट झाल्याने ब्रिटिश साम्राज्यविस्ताराला गती मिळाली. सन १८५२ पर्यंत ब्रिटिशांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे संपूर्ण भारतावर कब्जा मिळविला. तैनाती फौज, विलिनीकरणाचे धोरण राबवून संस्थाने खालसा केल्यामुळे देशातील बहुतांशी संस्थाने ब्रिटिश साम्राज्याच्या अधीन झाली. ब्रिटिशांचे व्यापारी धोरण, जमीन महसूलविषयक धोरण, वंशश्रेष्ठत्व, ख्रिश्चन धर्मप्रसाराला दिलेला अप्रत्यक्ष पाठिंबा, ब्रिटिश लष्करातील भारतीय सैनिकांच्या समस्या इत्यादी घटनामुळे देशपातळी कंपनी सरकारविषयी प्रचंड असंतोष पसरला. या असंतोषातूनच सन १८५७ चा उठाव घडून आला.

### १८५७ च्या उठावाची कारणे :-

ब्रिटिशांनी सुरू केलेल्या नव्या प्रशासन व्यवस्थेमुळे ब्रिटिश सरकारला विरोध झाला. हा विरोध जनजाती व व्यक्तीगत पातळीवर छोट्या-मोठ्या उठावाच्या स्वरूपात झाला. साम्राज्यवादी धोरण व द्रव्यशोषक नीतीचा परिणाम येथील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक घटकांवर झाला. यामुळे १८५७ च्या उठावाची कारणमिमांसा ही राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक कारणांमध्ये विभागणी होते. या कारणांचा आढावा पुढीलप्रमाणे :-

### अ) राजकीय कारणे :-

### १. तैनाती फौज धोरण :-

लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौज धोरणांची अंमलबजावणी हिंदुस्थानात केली. लष्करीदृष्ट्या कमकुवत संस्थानिकांना स्वसंरक्षणासाठी लष्करी मदत देऊ केली. या मोबदल्यात इंग्रज संस्थानिकाकडून ठराविक रक्कम घेत असत. परंतु बऱ्याच संस्थानिकांना या रक्कमा देणेही कठीण झाले. तसेच त्यांच्या कारभारात ब्रिटिश लष्कर हस्तक्षेप करू लागले. पुढे लॉर्ड डलहौसीने तैनाती फौजेची आर्थिक बाकी आहे. या सबबीखाली निजामाचा वऱ्हाड प्रांत, अवध संस्थान खालसा केले. यामुळे संस्थानिकाचे सार्वभौमत्व संपुष्टात येऊन ते नाममात्र संस्थानिक राहिले.

### २. डलहौसीचे संस्थाने खालसा धोरण :-

लॉर्ड वेलस्लीच्या तैनाती फौजेनंतर लॉर्ड डलहौसीने संस्थाने ब्रिटिश साम्राज्यात विलीन

करण्याचा टप्पा गाठला, यासाठी त्रिसूत्रीचा वापर केला यापैकी एक दत्तक वारसास मंजुरी न देणे, संस्थानातील अयोग्य प्रशासनावर कारवाई करून अशी संस्थाने ताब्यात घेणे आणि कंपनी सरकारचा अंतिम अधिकार या तत्वाखाली संस्थानाचे विलिनीकरण करणे. अशाप्रकारे सातारा, उदयपूर, जयपूर, संबलपूर, नागपूर, झांशी, आयोध्या, नागपूर आणि झाशी इत्यादी संस्थाने खालसा करून ब्रिटिश साम्राज्यात समाविष्ठ केली. डलहौसीच्या या साम्राज्यवादी धोरणाने संस्थानिक व जनतेत असंतोष निर्माण झाला.

### ३. पदव्या व तनखे बंद :-

लॉर्ड डलहौसीने संस्थाने खालसा धोरणाबरोबरच संस्थानिकांना दिलेल्या पदव्या व तनखे बंद केले. सन १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानंतर मराठ्यांचा शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव यास वार्षिक ८ लाख रुपयाचा तनाखा कंपनी सरकारने दिला होता, तो डलहौसीने रद्द केला. दिल्लीचा मुघल सम्राट बहादूर शहाने आपला वारसदार म्हणून जवान बख्त याचे नाव जाहीर केले. परंतु लॉर्ड डलहौसीने जवान बख्तच्या नावाला मंजुरी न देता मिर्झाफरूखला वारस म्हणून जाहीर केले. पुढे बहादूरशहाची बादशहा ही पदवी रद्द केली. थोडक्यात डलहौसीच्या या धोरणामुळे राजेरजवाडे कंपनी राजवटीविषयी संतप्त झाले व याचे रूपांतर पुढे १८५७ च्या उठावात झाले.

## ब) प्रशासकीय कारणे :-

### १. वर्णभेदाचे धोरण :-

ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापन केल्यानंतर वर्णभेदाला प्रारंभ केला. भारतीय लोक रानटी आणि असंस्कृत आहेत, त्यांना सुसंस्कृत करण्याची जबाबदारी आम्ही पार पाडत आहोत अशी ब्रिटिशांची धारणा होती. यामुळे इंग्रज शासनकर्त्यांनी काळा-गोरा वर्णभेद करण्याबरोबर वांशिक भेदभाव सुरू केला. इंग्रज स्वत:ला श्रेष्ठ मानत होते. हिंदुस्थानातील हिंदी लोक हे राज्यकारभार करण्यास अपात्र आहेत. अशी भावना इंग्रजांची झाली होती. प्रशासकीय सेवेमध्ये काम करणाऱ्या भारतीय लोकांना कनिष्ठ दर्जाच्या व कमी पगाराच्या नोकऱ्या दिल्या व इंग्लंडहून आलेल्या गोऱ्या लोकांसाठी मोठ्या पदाच्या व पगाराच्या नोकऱ्या दिल्या. यामुळेही भारतीय लोकांमध्ये असंतोष धुमसत राहिला.

### २. इनाम कमिशन :-

ब्रिटिशपूर्व काळात एतद्देशीय राजे, पराक्रमी सरदार, सैनिक, विद्वान, विविध मठ, मंदिरे, मशिदी, दर्गे इत्यादींना जमीन इनाम स्वरूपात देत असत, ही जमीन सारामुक्त असे. परंतु भारतात ब्रिटिशांनी आपली राजवट प्रस्थापित केल्यावर लॉर्ड बेंटिंगच्या काळात इनाम कमिशन नेमले. या इनाम कमिशनने

ज्यांना इनाम जमिनी मिळाल्या आहेत, त्याची कागदपत्रे सरकारकडे सादर करावीत असे आदेश दिले. जर अशी कागदपत्रे सादर केली नाहीत तर इनाम जमिनी जप्त केल्या जातील असा आदेश काढला. मशिदी, दर्गे, देवस्थाने, मठ या इनाम जमिनी मिळाल्या होत्या, त्याची कागदपत्रेही काहीजवळ नव्हती. त्यामुळे अशा जमिनी इनाम कमिशनच्या माध्यमातून जप्त केल्या. यामुळे लोकांच्या धार्मिक भावनेला ठेच पोचली.

### ३. न्यायव्यवस्थेतील दोष :-

कंपनी सरकारने 'कायद्यासमोर सर्व समान' अशी न्यायव्यवस्था निर्माण केली. परंतु युरोपियन व्यक्तीवर जर गुन्हा सिद्ध झाला तर पक्षपाती धोरण स्विकारले जात असे. भारतीय व्यक्तीला मात्र कठोर शिक्षा दिली जाई. भारतीय न्यायाधिश युरोपियन गुन्हेगारांना शिक्षा देऊ शकत नव्हते. ब्रिटिशपूर्व कालखंडात खेड्यातच न्यायदानाची व्यवस्था असे. त्यामुळे खेड्यातील व्यक्तीला तेथेच न्याय मिळत होता. परंतु ब्रिटिशांच्या नव्या प्रशासन पध्दतीनुसार न्याय मिळविण्यासाठी लोकांना तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत असे. ही न्यायप्रणाली खर्चिक होती. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला अनंत अडचणींना सामोरे जावे लागत असे.

## क) सामाजिक कारणे :-

### १. भारतीय चालीरिती, रूढी व परंपरामध्ये हस्तक्षेप :-

कंपनी सरकारने हिंदुस्थानात प्रथम सत्ता संपादन व नंतर साम्राज्यविस्तार केल्यानंतर येथील लोकांच्या सामाजिक प्रथा, रूढी व परंपरामध्ये हस्तक्षेप करण्यास सुरूवात केली. लॉर्ड बेटींग, लॉर्ड डलहौसी यासारख्या गव्हर्नर जनरलनी हिंदी समाजात सुधारणा घडविण्याच्या उद्देशाने सतीबंदी, बालविवाह प्रतिबंधक, विधवा पुनर्विवाह संमती कायदा यासारखे कायदे केले. या कायद्यामागची राज्यकर्त्यांची भूमिका योग्य असली तरी या कायद्यामुळे पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या चालीरिती, रूढी, परंपरा मोडून पडत आहेत अशी सर्वसामान्य लोकांची भावना झाली. अशा धोरणामुळे समाजाची चौकट नष्ट होत असून आपल्या धर्म व संस्कृतीवर खूप मोठे संकट आलेले आहे. अशी समाजाचा धारणा झाली. याचाच परिणाम ब्रिटिशांविरुध्द सर्वसामान्य जनतेचा असंतोष उफाळून आला.

### २. नवी शिक्षण व्यवस्था :-

कंपनी सरकारने भारतात आपली सत्ता स्थिर झाल्यानंतर आधुनिक शिक्षण पध्दतीला प्रारंभ केला. ख्रिश्चन धर्मप्रसारकांनीही येथील समाजात शिक्षण प्रसाराचे कार्य होती घेतले, परंतु यामागे त्यांच्या उद्देश धर्मप्रसार हा होता. या नव्या शिक्षण पध्दतीमुळे हिंदुस्थानातील पारंपारिक शिक्षण पध्दती मागे पडली व

इंग्रजी शिक्षण घेतलेले नवसुशिक्षित लोक एकीकडे ब्रिटिशांचे कारकून म्हणून तर दुसरीकडे समाजाचे प्रबोधन करू लागले. या बदलामुळे येथील समाज व्यवस्था कोलमडण्याच्या परिस्थितीत आहे व ही परिस्थिती कंपनी सरकारच्या धोरणामुळे निर्माण झाली आहे, असा सर्वसामान्य जनतेचा समज झाला. यामुळे ब्रिटिश राजवटीबद्दल लोकांच्या मनामध्ये असंतोष साचू लागला.

## ड) आर्थिक कारणे :-

### १. हिंदुस्थानची आर्थिक लूट :-

ब्रिटिशांनी भारतात प्लासीच्या युध्दानंतर (१७५७) व्यापार आणि आर्थिक धोरण हा प्रमुख उद्देश समोर ठेवला. भारतातील राज्यकर्त्यांमध्ये असलेल्या अराजकतेचा फायदा घेऊन आर्थिक लूट सुरू केली. येथील राजे, संस्थानिक, जमीनदार, व्यापारी व सर्वसामान्य जनता यांच्याकडून लुटलेली संपत्ती ब्रिटिश अधिकारी वर्गाने इंग्लंडला नेली. सन १७७५ ते १७८० या पाच वर्षाच्या कालावधीत एकट्या बंगालमधून सुमारे ३ कोटी ८४ लाख पौंड संपत्ती इंग्लंडला पाठविली गेली. याशिवाय कंपनी सरकारच्या (इंग्रज) नोकरांना खाजगी व्यापार करण्याची मुभा देण्यात आल्याने त्यांनी येथील शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे शोषण करून प्रचंड नफा कमविला. हेच इंग्रज नोकर व अधिकारी इंग्लंडमध्ये गेल्यानंतर भारतात मिळविलेल्या संपत्तीच्या बळावर एखाद्या उमरावाप्रमाणे जीवन जगत असत. इंग्रजाच्या अशा शोषक नीतीमुळे भारतात प्रचंड दारिद्र्य निर्माण झाले. यासंदर्भात दादाभाई नौरोजी म्हणतात की, ''महमंद गझनीने भारतावर १७ स्वाऱ्या करून जेवढी संपत्ती नेली नाही, त्याच्या कित्येक पटीने अधिक संपत्ती ब्रिटिश लोकांनी इंग्लंडला नेली.''

### २. व्यापार व उद्योगधंद्यांचे पतन व वाढती बेकारी :-

ब्रिटिशपूर्वकाळात भारतीय खेडी स्वयंपूर्ण होती, परंतु इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीने युरोपातील उद्योगधंद्यांना लागणारा कच्च्या मालाची गरज भासू लागली. ब्रिटिशांनी भारतातून अल्प किंमतीत कच्चा माल युरोपीयन उद्योगधंद्यांना पुरविला. यासाठी भारतीय व्यापार व उद्योगधंदे सक्तीचे बंद पाडण्याचे धोरण स्विकारले. युरोपातून येणाऱ्या पक्का मालाची बरोबरी भारतीय उद्योगधंदे करू शकले नाहीत, याचा परिणाम भारतीय व्यापार व उद्योगधंद्याचे पतन (ऱ्हास) घडून आले. ग्रामीण उद्योगधंदे बंद पडल्यामुळे लाखो लोक बेकार झाले. उदरनिर्वाहाचे साधनच ब्रिटिशांच्या धोरणामुळे नष्ट झाल्यामुळे बहुसंख्य लोकांच्या वाट्याला दारिद्र्य आले. त्यातच भर म्हणून लॉर्ड डलहौसीने संस्थाने खालसा केल्यामुळे हजारो सैनिकांच्या नोकऱ्या गेल्या, त्यांना उपजीविकेचा प्रश्न भेडसावू लागला. एकंदरीत व्यापार, उद्योगधंद्याचा ऱ्हास व वाढती बेकारीमुळे लोकांच्या मनात निर्माण झालेल्या असंतोषाचे रूपांतर १८५७ च्या उठावात झाले.

## ३. अन्यायकारी सारा आकारणी :-

भारत हा कृषिप्रधान देश आहे हे इंग्रजांच्या लक्षात आल्याने त्यांनी शेतीविषयक महसूल धोरण आखले जे भारतीय शेती व शेतकऱ्यांना मारक ठरले. लॉर्ड कॉर्नवॉलिसची कायमधारा पद्धती व नंतर आलेल्या महालवारी व रयवारी पध्दतीने सामान्य शेतकरी वर्ग कोलमडून पडला. भरमसाठ महसूल (सारा) आकारणी शेतकरी कर्जबाजारी झाला. सावकारांच्या जाळ्यात अडकला. जमीन महसूल वेळेत न मिळाल्यास जमिनीचे लिलाव काढण्याचा प्रघात ब्रिटिशांनी सुरू केला. या माध्यमातून अमर्याद संपत्तीची लूट करण्यात आली.

## इ) धार्मिक कारणे :-

## १. धर्मावर संकट :-

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आपली सत्ता निर्माण केल्यानंतर प्रारंभी ख्रिश्चन मिशनऱ्यांना प्रवेश नाकारला. परंतु सत्ता मजबूत होत गेली तशी आपले धोरण बदलले. इ.स. १८१३ च्या कायद्याने भारतात ख्रिश्चन धर्मप्रसार करण्याची मुभा देण्यात आली. धर्मप्रसारासाठी भारतात आलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी येथील अशिक्षित लोकांना सेवाभाव व आर्थिक मदत करून धर्मांतर करण्यास प्रवृत्त केले तर सुशिक्षितांना ख्रिश्चन धर्मातील उदात्त तत्त्वे व मानवतावादाची शिकवण देऊन धर्मप्रसाराचे कार्य केले. हिंदू-मुस्लिम धर्मावर टीका केली. भारतीय लोकांच्या चालीरिती, परंपरावर हल्ले चढविले. पोर्तुगीजाप्रमाणे जुलूम जबरदस्ती करून इंग्रजांनी धर्मप्रसार केला नसला तरी अप्रत्यक्षपणे मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला पाठिंबा दिला. इंग्रज व मिशनऱ्यांच्या धर्मप्रसार म्हणजे आपल्या धर्मावर आलेले मोठे संकट आहे अशी येथील लोकांची भावना निर्माण झाली.

## २. सुधारणावादी धोरणाची प्रतिक्रिया :-

इंग्रज व ख्रिश्चन मिशनरी दोघेही भारतीय लोकांना एकाच दृष्टिकोनातून पाहत होते. तो म्हणजे या रानटी लोकांना 'सुसंस्कृत' बनविण्यासाठी आम्ही येथे आलेलो आहोत. यामुळे सार्वजनिक ठिकाणी ब्राम्हण वर्गापासून शूद्रापर्यंत सर्वांना एकसारखी वागणूक दिली जाऊ लागली. ब्रिटिशांच्या अशा धोरणामुळे भारतीयांची धर्म व जात नष्ट होईल, असा प्रचार सनातनी लोकांनी सुरू केला. इंग्रजांनी सती बंदी कायदा, विधवा पुनर्विवहा कायदा, बालविवाह बंदी कायदा, धर्मांतरानंतर प्राप्त होणारा मालमत्तेवरील हक्क आणि एत्तदेशीय सैनिकांना सक्तीचे समुद्र पर्यटन करणारा कायदा हे सर्व कायदे केले, हे कायदे जरी सुधारणावादी असले तरी आपल्या धर्म व संस्कृतीत सरकारचा हा हस्तक्षेप आहे असे लोकांना वाटले.

## ई) लष्करी कारणे :-

### १. सैन्यसंख्या व पगारातील तफावत :-

भारतात सन १८५६ मध्ये २ लाख ३३ हजार हिंदी शिपाई तर ४५ हजार गोरी फौज होती. गोऱ्या फौजेच्या पाचपट हिंदी शिपाई होते. देशातील महत्त्वाची लष्करी केंद्रे, दारूगोळा, शस्त्रास्त्रे ही हिंदी शिपायांच्या ताब्यात होती. गोऱ्या सैनिकांचे भारतात प्रमाण वाढावे म्हणून लॉर्ड डलहौसीने वारंवार ब्रिटिश संसदेकडे मागणी केली. परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आले. शिपायांनी याच संधीचा फायदा उठविला तर दुसरीकडे हिंदी आणि युरोपियन सैनिकांच्या पगारात प्रचंड तफावत होती. हिंदी सैनिकाला कोणत्याही स्वरूपाची व बढती मिळत नसे. याउलट युरोपियन सैनिकाने लष्करात प्रवेश करताच त्यास भराभर बढती मिळत असे. यामुळे हिंदी सैनिकांना काम करूनही उदरनिर्वाह भागविणे कठीण होऊन बसे.

### २. हिंदी शिपायांवरील निर्बंध :-

इ.स. १८२४ मध्ये ब्राम्ही युद्धासाठी बराकपूर छावणीतील ४७ व्या रेजिमेंटमधील शिपायांना ब्रम्हदेशात जाण्याचे आदेश दिले. परंतु समुद्र पर्यटनास बंदी असून आम्ही ब्रम्हदेशाला जाणार नाही असे सांगितल्याने अनेक सैनिकांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. सन १८४९ साली पंजाब ब्रिटिश साम्राज्यात विलीन झाले. अनेक पंजाबी शीख व मुसलमानांना ब्रिटिशांनी लष्करात नोकऱ्या दिल्या, त्यावेळी शीख सैनिकांच्या दाढीला व डोक्याचे केस काढण्याचे आदेश देणार नाही असा ब्रिटिशांनी शब्द दिला होता. परंतु तो नंतर पाळला नाही. परिणामी शीखांनी नोकरीचा त्याग केला. हिंदी सैनिकांने गंध लावू नये, शेंडी राखू नये, विशिष्ट प्रकारे दाढी राखावी अशी बंधने लादण्यात आली. अशा सर्व निर्बंधामुळे हिंदी सैनिकात असंतोषाचे वातावरण पसरले.

### ३. हिंदी सैनिकांमधील वाढलेला आत्मविश्वास :-

कंपनी सरकारने हिंदी सैनिकांच्या बळावर ब्रम्हदेशापासून काबूलपर्यंतचा प्रदेश जिंकला. भारतातील बहुसंख्य संस्थानिक व राज्यावर मिळविलेले विजय हे हिंदी (ऐत्तदेशीय) सैनिकांच्या पराक्रमामुळे मिळाले होते, अशी भावना हिंदी सैनिकांमध्ये पसरली होती. आपण इंग्रजांइतके शूर व पराक्रमी आहोत असा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला. आपण जर इंग्रजांना युद्धावेळी सहकार्य केले नाही, तर ते विजय मिळवू शकत नाहीत असा आत्मविश्वास दुणावला. यामुळे हिंदी सैनिकांनी ब्रिटिशांच्या अन्यायाविरोधात बंडाचे हत्यार उपसले.

## फ) तात्कालिक कारण :-

इंग्रजांनी भारतीय लष्करामध्ये जानेवारी १८५७ मध्ये 'ब्राऊन बेस' (लोखंडी बंदुका) बंदुकाऐवजी

सैनिकांना लांब पल्ल्याच्या एन्फिल्ड बंदुका दिल्या. त्यात वापरली जाणारी काडतुसे ही गाई व डुकराच्या चरबीपासून बनविलेली असत. या काडतुसांना वंगणयुक्त आवरण असल्यामुळे ते दातांनी तोडावे लागत होते. या आवरणाला गाई व डुकराची चरबी लावलेली असते अशी बातमी लष्करामध्ये सर्वत्र पसरली. गाई हिंदूना पवित्र तर डुक्कर मुसलमानांना अपवित्र असल्याने गाई व डुकराची चरबी दोन्ही धर्मासाठी निषिध्द मानली जात असे. काडतूस प्रकरणाची ही बातमी प्रथम कलकत्त्याच्या फौजेत पसरली व त्याचा सर्वत्र प्रसार झाला. हिंदू-मुस्लिम सैनिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या व सैनिकांनी बंडाचे निशाण उभारले.

## ❑ १८५७ च्या उठावाची वाटचाल :-

संपूर्ण देशभर चरबीयुक्त काडतुसांची बातमी पसरली. फेब्रुवारी १८५७ मध्ये बेहरामपूर येथील १९ देशी पलटणीने प्रथमच काडतुसांना स्पर्श करण्यास नकार दिला. इंग्रजांनी त्वरीत या पलटणीतील सैनिकांना लष्करातून काढून टाकले. परंतु ही बातमी बरांकपूरच्या लष्करी छावणीतही पोहचली आणि २९ मार्च १८५७ रोजी बराकपूरच्या छावणीतील सैनिकांनी काडतुसे वापरण्यास नकार दिला. या छावणीतील ३४ वी एन.आय. रेजिमेंटमधील मंगल पांडे या सैनिकाने इंग्रजांच्या विरोधात परेड ग्राऊंडवर घोषणा दिल्या. त्यावेळी इंग्रज अधिकारी सार्जंट मेजर ह्यूसन यांने सैनिकांना कैद करण्याचे आदेश दिले. मंगल पांडे याने मेजर ह्यूसनवर गोळ्या झाडल्या व त्यास ठार केले. इंग्रज अधिकाऱ्यांनी मंगल पांडे यास कैद करून त्याच्यावर लष्करी न्यायालयात खटला भरला. खटल्याच्या निकालानंतर मंगल पांडेला दोषी ठरवून ८ एप्रिल १८५७ रोजी फाशी दिली.

मंगल पांडेच्या फाशीची बातमी सर्वत्र पसरताच ठिकठिकाणी उठावांची मालिकाच सुरू होऊन उठाव देशभर पसरला. दिल्लीपासून ५८ किलोमीटर अंतरावर असलेल्या मीरत येथेही उठावास सुरूवात झाली. २४ एप्रिल १८५७ रोजी मीरतमधील 'नेटिव्ह कॅव्हलरी' या सैनिकी तुकडीतील ९० सैनिकांनी चरबीयुक्त काडतुसे वापरण्यास नकार दिला. यामुळे ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांनी यातील ८५ सैनिकांना ९ मे १८५७ रोजी बडतर्फ करून १० वर्षांची शिक्षा ठोठावली. दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० मे १८५७ रोजी मीरत येथील तुरुंगाची भिंत फोडून कैदेत अडकलेल्या ८५ सहकाऱ्यांची सुटका केली. 'मारो फिरंगी को' अशा घोषणा देत बंडाचा झेंडा उभारला. चर्चमध्ये प्रार्थनेसाठी निघालेल्या ब्रिटिशांना हिंदी सैनिकांनी ठार केले. युरोपीयन अधिकाऱ्यांच्या घरावर हल्ले केले. युरोपियन स्त्रिया, मुले यांनाही सोडले नाही. खजिना लुटला, कचेऱ्या जाळल्या. उठावकर्त्यांनी ''चलो दिल्ली''ची घोषणा देऊन मीरत येथील सैनिक दिल्लीकडे गेले.

मीरत येथील उठावकर्ते सैनिक दिल्लीत पोहचल्यावर दिल्लीतील सैनिकही उठाववालयांना

मिळाले. ११ मे रोजी दिल्लीत पोहचलेल्या बंडखोर सैनिकांना रोखण्यासाठी इंग्रज अधिकारी लेफ्टनंट विलोबी याने प्रतिकार केला. परंतु त्यास यश आले नाही. उठावकर्त्यांनी इंग्रज व युरोपियन लोकांना ठार करण्याचे सत्र आरंभिले. दिल्लीतील सर्वसामान्य जनतेनेही उठावकर्त्यांना मदत केली. उठाववाल्यांनी बऱ्याच इंग्रज सैनिकांची कत्तल केली आणि दिल्ली ताब्यात घेतली. बंडखोर सैनिकांनी आपला मोर्चा लाल किल्ल्याकडे वळवून ९० वर्षीय वृध्द मुघल सम्राट दुसरा बहादूरशहा जफर यांस हिंदुस्थानचा बादशहा म्हणून घोषित केले आणि या उठावाचे नेतृत्व बादशहाकडे देण्यात आले.

दिल्लीत घडलेल्या खळबळजनक घटनेमुळे आणि उठावकर्त्यांना मिळालेल्या यशामुळे ब्रिटिशांच्या अनेक लष्करी छावण्यामध्ये देशी सैनिकांनी उठाव केले. १३ मे रोजी फिरोजपूर, २० मे रोजी अलीगढ, ३० मे रोजी लखनौ व मथुरा, ४ जून रोजी वाराणसी व कानपूर, ६ जून रोजी झाशी व अलाबाद येथे सैनिकांनी उठाव केले. याशिवाय इटावा, रूरकी, बरेली, शहाजानपूर, आझमगढ, सीतापूर, मुरादगढ, बनारस, फत्तेगढ, अंबाला, बुंदेलखंड इत्यादी ठिकाणी उठाव झाले. मध्य भारत, बिहारचा मोठा प्रदेश व पूर्व पंजाबच्या प्रदेशातील सर्वसामान्य जनतेने ब्रिटिश सत्ता झुगारून देऊन उठाव केला. बंगाल प्रांतातील ढाक्का, चित्तगाँव, भागलपूर, मदारीगंज येथील सैनिकांनी उठाव केले. राज्यस्थानमध्ये उठावाचा फारसा प्रचार झाला नाही. दक्षिण भारतामधील महाराष्ट्रात सातारा, कोल्हापूर, खानदेश, अहमदनगर, औरंगाबाद, नागपूर अशा अनेक ठिकाणी उठावाच्या हालचाली झाल्या. याशिवाय वेल्लोर, अर्काट, कर्नुल, त्रिचनापल्ली, कडप्पा, बेळगाव, धारवाड, हैद्राबाद येथेही ब्रिटिशाविरुध्द असंतोष निर्माण होऊन काही ठिकाणी उठाव झाला.

१८५७ च्या उठावात जहागीरदार, वतनदार, जमीनदार, काही संस्थानिक व त्यांचे आश्रित, सर्वसामान्य लोक, हिंदी शिपाई व आदिवासी इत्यादी लोक सामील झाले. ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या, सरकारी कचेऱ्याची नासधूस व लुटालूट करणे, कैदेतील हिंदी शिपायांना सोडविणे, तारायंत्रे तोडणे, खजिना लुटणे, दळणवळण यंत्रणा उध्वस्त करणे, ब्रिटिशांची शासन व्यवस्था कोलमडून टाकणे अशा विविध मार्गाचा अवलंब उठावकर्त्यांनी केला. या उठावामुळे कंपनी सरकारपुढे खूप मोठे आव्हान उभे केले. या व्यापक उठावाच्या पहिल्या टप्प्यात उठावाची तीव्रता व इंग्रजांचा बेसावधपणा यामुळे इंग्रजांना अनेक ठिकाणी माघार घ्यावी लागली. उठावकर्त्यांचा आत्मश्विास वाढल्याने उठाववाल्यांनी ब्रिटिशांची सर्व यंत्रणा मोडून काढण्याचे सत्र अवलंबिले. परंतु अल्पावधीत लॉरेन्स, कॅनिंग, निकोलसन, हॅवलॉक, औट्रॅम, ह्यूरोज, नील यासारख्या अनुभवी इंग्रज सेनापतींनी पराक्रमाची शर्थ करून उठाव मोडून काढून परिस्थिती नियंत्रणात आणली. या उठावात दिल्लीचा मुघल बादशहा दुसरा बहादुरशहा जफर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे, सेनापती तात्या टोपे, फैजाबादचा मौलवी अहमदुल्ला, अवधची बेगम हजरत महल, बिहारचा राणा कुवरसिंह, बरेलीचा जनरल बरकतखान, सातारामधील रंगो बापूजी गुप्ते,

कोल्हापूरचे चिमासाहेब महाराज इत्यादी प्रमुख नेत्यांनी उठावात प्रमुख भूमिका पार पाडली. लखनौ, दिल्ली, झाशी, कानपूर येथे झालेल्या उठावात ब्रिटिशांची प्रचंड मोठी हानी झाली. इंग्रजांनीही याचा बदला म्हणून मोठ्या प्रमाणात येथील लोकांची व हिंदी शिपायांची कत्तल केली. या उठावात हिंदू मुस्लिम धर्मीयांबरोबर आदिवासी व इतर जाती-धर्माच्या लोकांचा ब्रिटिशांविरोधी असणारा असंतोष संघटीतरित्या उठावाच्या स्वरूपात प्रकट झाला, ही बाब इंग्रज सरकारला विचार करायला लावणारी होती. १८५७ च्या उठावात अनेक संस्थानिक इंग्रजनिष्ठ राहिले. याचबरोबर पंजाबमधील शीख व हैद्राबादचा सालारजंग यांनी इंग्रजांना मदत केली. अशा प्रकारे १८५७ च्या उठाव इंग्रजांनी मोडून काढला.

## ❑ उठाव अयशस्वी होण्याची कारणे :-

१८५७ च्या उठावाचे लोण संपूर्ण भारतभर पसरले. तात्पुरत्या स्वरूपात ब्रिटिशांची सर्व व्यवस्था कोलमडून जात आहे अशी भीती ब्रिटिशांना वाटू लागली. परंतु ब्रिटिशांनी या व्यापक उठावाच्या धक्क्यातून सावरल्यानंतर अतिशय नियोजितपणे उठाव दडपून टाकला आणि उठावास अपयश आले. त्याची कारणे पुढीलप्रमाणे :-

### १. उठावाचे स्वरूप स्थानिक :-

ब्रिटिश साम्राज्याच्या विविध प्रदेशात १८५७ चा उठाव झाला असला तरी उठावकर्त्यांना अंतिम ध्येय काय हे निश्चित करता आले नाही. केवळ ब्रिटिश राजवटीच्या अन्यायी व शोषक धोरणाविरोधात उभारलेला लढा असे उठावाचे स्वरूप राहिले. उत्तरेत उठावाने रौद्र रूप धारण केले असले तरी दक्षिणेतही उठाव व उठावासंबंधित हालचाली मोठ्या प्रमाणात झाल्या. परंतु उठावात सामील झालेल्या समाजातील संस्थानिक, जमीनदार, वतनदार, सैनिक, आदिवासी, सर्वसामान्य लोकांचे प्रश्न हे स्थानिक स्वरूपाचे होते. त्यास एक राष्ट्रीयत्वाची झालर नसल्याने हे उठाव स्थानिक स्वरूपाचे राहिले.

### २. प्रभावी नेतृत्वाचा अभाव :-

१८५७ च्या उठावाचा प्रारंभ शिपायांच्या बंडापासून झाला. शिपायांनी उठावाचे नेतृत्व दिल्लीच्या मुघल बादशहाकडे दिले. परंतु मुघल बादशहाचा देशव्यापी प्रभाव पडू शकला नाही. झाशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे हे संस्थानिकासाठी ब्रिटिशांविरुध्द लढले. तात्या टोपे, रंगो बापूजी गुप्ते इत्यादींनी प्रयत्नांची शिकस्त केली. परंतु त्यांना प्रादेशिक मर्यादा पडल्या. दळणवळण व संदेशवहन यंत्रणेचा अभाव शिवाय एकमुखी व प्रभावी नेतृत्व उठावकर्त्यांना लाभले नसल्याने हा उठाव मोडून काढणे सोपे गेले. उठाववाल्यांनी जमेल त्या पध्दतीने, हाती मिळेल त्या शस्त्रानिशी उठाव केल्याने त्यांना योग्य दिशा मिळू शकली नाही.

### ३. आधुनिक शस्त्रसामुग्री व एकच नेतृत्व :-

ब्रिटिशांकडे असणारी आधुनिक शस्त्रास्त्रे हेही ब्रिटिशांच्या विजयाचे कारण ठरले. त्यांच्याकडे असणाऱ्या नव्या पध्दतीच्या बंदुका, रायफली, तोफा यामुळे हाती विळे, कोयते, काठ्या, भाले, तलवारी बाळगलेल्या उठावकर्त्यांना पराभूत करणे त्यांना शक्य झाले. तसेच ब्रिटिशांकडे हॅवलॉक, सर ह्यूरोज, औट्रॅम, लॉरेन्स, निकोलसन, बर्नार्ड, विल्सन, जेकब हे कसलेले ब्रिटिश सेनानी एकाच नेतृत्वाचे ओदश पाळून उठावकर्त्यांचा बिमोड करत होते. लॉर्ड कॅनिंगच्या नेतृत्वाखाली या उठावाचा शेवट घडवून आणला.

### ४. राजे-रजवाड्यांच्या पाठिंब्याचा अभाव :-

भारतात सुमारे साडेपाचशे पेक्षा अधिक संस्थाने अस्तित्वात होती. हे संस्थानिक एखाद्या राजाप्रमाणे वागत असत. देशातील बहुतांश संस्थानिक पद, प्रतिष्ठा, स्वायत्तता व आपले संस्थान अबाधित राहण्यासाठी वाटेल ते करण्यास तयार होते. यामुळे ज्या संस्थानिकांना लॉर्ड डलहौसीच्या खालसा धोरणाचा फटका बसला तेवढ्यानीच १८५७ उठावात सहभाग घेतला. बाकीचे संस्थानिक (ग्वाल्हेर, बडोदा, हैद्राबाद, जिंद, पतियाळा, कपूरधाळा, ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिले. तर काही संस्थानिकांनी उठाव मोडून काढण्यासाठी इंग्रजांना मदत केली.

### ५. एक राष्ट्रीयत्वाचा अभाव :-

१८५७ च्या उठावास प्रारंभ झाल्यानंतर या उठावात यश मिळाले तर पुढची दिशा काय ठरवायची? यासंदर्भात एकवाक्यता नव्हती. एक विशिष्ठ समान ध्येय क्रांतीकारकासमोर नसल्याने हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही. एकराष्ट्रवाद निर्माण करण्यासाठी हे स्वातंत्र्ययुध्द लढले जात आहे, अशा प्रकारचा ठाम विश्वास क्रांतीकारकमध्ये नसल्याने १८५७ च्या उठावात एक राष्ट्रीयत्वाचा अभाव दिसून येतो.

### ६. लष्करी डावपेच व मदतीचा अभाव :-

१८५७ च्या उठावाची सुरूवात सैनिकापासून झाली. प्रारंभी सैनिकांनी आपल्या शौर्याने अनेक आघाड्यांवर ब्रिटिशांना पराभूत केले. परंतु लढाईचे तंत्र व नीती याबाबतीत भारतीय शिपाई व नेते कमी पडले. त्यांना योग्यवेळी योग्य डावपेच आखता आले नाहीत. दिल्ली जिंकल्यानंतरही त्यांना विजय टिकवता आला नाही. इंग्रज सैन्य संख्येने कमी असून अनेक मोठ्या लढाया जिंकल्या. इंग्रजांकडे मोठी आर्थिक ताकद, आधुनिक शस्त्रास्त्रे, शिस्तबध्द सैन्य व अनुभवी सेनानी होते. शिवाय दळणवळण व संदेशवहनाचा ताबा इंग्रजांकडे असल्याने त्यांना सर्व प्रकारची मदत वेळेवर पोहचत

होती. या तुलनेत उठावकर्त्यांना मदत वेळेत पोहचली नाही अथवा मिळालीच नाही. यामुळे या उठावास अपयश आले.

### ७. उठावाची व्याप्ती मर्यादीत :-

भारताच्या भौगोलिक विस्ताराचा विचार करता १८५७ च्या उठावाची व्याप्ती मर्यादीत राहिली. या उठावाचे लोण उत्तर भारतात व्यापक असले तरी सिंध, राजस्थान प्रांतात शांतता होती. पंजाबमधील शीखांनी इंग्रजांना मदत केली. इंग्रजांनी सैन्याच्या जोरावर दक्षिण भारतातील उठाव दडपून टाकला. संपूर्ण देशावर इंग्रजांचा प्रभाव असल्याने अनेक ठिकाणी उठाव होण्याअगोदर काळजी घेण्यात आली. एकूणच भारतासारख्या खंडप्राय देशाच्या मानाने उठावाची व्याप्ती मर्यादित राहिली.

वरील सर्व कारणामुळे १८५७ चा उठाव दडपून टाकण्यात इंग्रज यशस्वी ठरले.

## ❑ १८५७ च्या उठावाचे परिणाम :-

१८५७ चा उठाव अयशस्वी झाला असला तरी या उठावाचे भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. या उठावाने भारतातील ब्रिटिश साम्राज्याच्या मजबूत पाया अस्थिर करण्याचा प्रयत्न केला.

### १. ईस्ट इंडिया कंपनीची राजवट संपुष्टात :-

सन १७५७ ते १८५७ या काळात कंपनी सरकारने व्यापार, साम्राज्यवाद व राज्यकारभार या त्रिसूत्रीचा वापर करीत संपूर्ण हिंदुस्थान आपल्या नियंत्रणाखाली आणला. या काळात कंपनी सरकार व त्यांच्या अधिकाऱ्यांनी येथील जनतेवर अन्याय, अत्याचार करून जास्तीत जास्त आर्थिक शोषण केले. कंपनीच्या सत्तेमुळे व शोषक धोरणामुळे भारतीयांच्या असंतोषात भर पडत गेली. याचे पडसाद सन १८५७ च्या रूपाने उमटले. भारतातील इंग्रजी राजवट ईस्ट इंडिया कंपनीच्या हातात असुरक्षित आहे, असे इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरियास वाटल्यामुळे कंपनी राजवट संपुष्टात आल्याची घोषणा राणीने केली. १ नोव्हेंबर १८५८ रोजी इंग्लंडच्या राणीने जाहीरनामा प्रसिध्द करून ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यातील सर्व सत्ता आपल्या हाती घेत असल्याचे जाहीर केले.

### २. राणीचा जाहीरनामा :-

राणी व्हिक्टोरिया हिने सर्व भारतीयांना उद्देशून एक जाहिरनामा प्रसिध्द केला. तो जाहीरनामा १ नोव्हेंबर १८५८ रोजी अलाहाबाद येथे दरबार भरवून तेथे वाचून दाखविण्यात आला. भारतीयांच्या असंतोषाची तीव्रता कमी व्हावी म्हणून त्यांना विश्वासात घेऊन राज्यकारभार करण्यासाठी आश्वासने

देणारा जाहीरनामा प्रसिध्द केला. या मुद्दयांची सविस्तर माहिती याच प्रकरणात ४.२.३ या घटकात केली आहे.

## ३. भारतीय लष्कराची पुनर्रचना :–

१८५७ च्या उठावाची सुरुवात सैनिकांपासून झाली असल्याने उठावानंतर भारतीय सैनिकांना दोषी ठरवून 'विभाजन व संतुलन' या तत्वाचा वापर करून लष्कराची पुनर्रचना करण्यात आली. ब्रिटिश लष्करातील ब्रिटिश सैनिकांचे भारतीय सैनिकांशी असणारे प्रमाण १ : २ करण्यात आले. हिंदुस्थानातील सर्व महत्वाची ठाणी इंग्रज–फौजेच्या ताब्यात ठेवण्यात आली. पूर्वी लष्करात संमिश्र जातीच्या तुकड्या होत्या. त्याऐवजी पंजाबी, शीख, गुरखा, रजपूत, महार, मराठा अशा जातवार तुकड्या निर्माण केल्या. तोफखाना व शस्त्रास्त्र विभाग प्रामुख्याने सामान्य जनतेपासून दूर ठेवण्यात आले. याप्रकारे लॉर्ड कॅनिंगच्या कालखंडात लष्कराची पुनर्रचना करण्यात आली.

## ४. एत्तदेशीय संस्थानिकाच्या धोरणात बदल :–

लॉर्ड डलहौसीच्या विलीनीकरण धोरणाचा परिणाम म्हणून अेनक संस्थाने खालसा झाली. संस्थानिकांचे तनखे, पदव्या रद्द करण्यात आल्या, यामुळे अशा संस्थानिकांनी व त्यांच्या अधिपत्याखालील जनतेने उठावात सहभाग घेतला तर अनेक संस्थानिकांनी ब्रिटिशांना मदत केली. यानिमित्ताने ब्रिटिशांना संस्थानिकांची ताकदही कळली. भारतामध्ये आपल्या सत्तेची पकड मजबूत करावयाची असेल तर संस्थानिकाबाबतच्या आक्रमण धोरणाचा त्याग केला पाहिजे याची जाणीव ब्रिटिशांना झाली. त्यामुळे ब्रिटिशांनी साम्राज्यवादी धोरणाचा शेवट करून संस्थानिकांना स्थानिक राजाचे अधिकार देण्याबरोबर त्याचे हक्क, अधिकार, सन्मान अबाधित राखले जातील याची हमी दिली.

## ५. 'फोडा व झोडा' या भेदनीतीचा अवलंब :–

सैनिकापासून उठावास सुरुवात झाली. दिल्लीचा मुघल बादशहास नेतृत्व देण्यात आले. इंग्रज सत्तेचा शेवट करून मुस्लिम सत्तेची पुनर्स्थापना करावयाची असा उठावकर्त्यांचा डाव आहे असे ब्रिटिशांना वाटत होते. उठावाच्या कारस्थानात मुसलमानच प्रमुख आहेत असा दृढ समज झाला होता. या उठावात हिंदू–मुस्लिम या दोन धर्मीयातील ऐक्यभावही दिसून आला. या सर्व घटना अशाच घडत राहिल्या तर येथे राज्य करणे अवघड होईल अशी भिती ब्रिटिशांना वाटू लागली. यातूनच त्यांनी प्रथम मुस्लिमांबाबत कठोर धोरण स्विकारले. मुसलमान वतनदाराच्या जमिनी जप्त केल्या. दिल्ली, फत्तेहपूर येथील मशिदीत मुसलमानांना नमाज पडण्यास बंदी घातली. मात्र नंतरच्या काळात त्यांनी मुस्लिमाप्रतीचे धोरण बदलून मुस्लिमांचा वापर हिंदू समाजाविरुध्द आणि राष्ट्रीय भावनेच्या प्रसाराला रोखण्यासाठी केला

व भविष्यात हे दोन्ही समाज (हिंदू-मुस्लिम) एकत्र येणार नाहीत याची काळजी घेतली. परिणामी देशात फोडा-झोडा नीती यशस्वी झाली.

## ६. नेतृत्व मध्यमवर्गाकडे :-

१८५७ च्या उठावात नेतृत्व करणारे नेते अंशत: सुशिक्षित होते. मात्र उठावात सहभागी झालेल्या सैनिकापासून सर्वसामान्य माणसापर्यंत बहुतांशी लोक अशिक्षित होते. ब्रिटिशांविरुध्द सशस्त्र उठाव करूनही अपयश आल्याने यापुढे सशस्त्र उठाव करणे म्हणजे आत्मघाताला निमंत्रण देणे होईल असे समाजाला वाटले. पुढील काळात सशस्त्र लढ्याऐवजी न्याय मागण्यासाठी घटनात्मक मार्गाचा अवलंब केला पाहिजे असे नवसुशिक्षित लोकांना वाटू लागले. यातूनच देशाचे नेतृत्व मध्यमवर्गाकडे गेले. या मध्यमवर्गाने लोकजागृती करून लोकांना आपल्या हक्काची जाणीव करून दिली. लोकमतचा सरकारवर दबाव आणून आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचे सत्र अवलंबले.

## ७. राष्ट्रीयत्वाचे बीजारोपण :-

१८५७ च्या उठाव असफल ठरला असला तरी या लढ्यात ज्या शूर वीरांनी हौतात्म्य पत्करले, त्यांच्या प्रती लोकांच्या मनामध्ये अभिमान निर्माण झाला. बहादूर शहा, मंगल पांडे, नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई, कुंवरसिंह, बेगम हजरत महल, रंगो बापूजी गुप्ते, चिमासाहेब महाराज इत्यादींनी देशासाठी आपल्या सर्वस्वाचे बलिदान दिले. त्याच्या स्मृती पुढील काळात राष्ट्रीय भावना जागृत करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरल्या. ब्रिटिशांनी आपल्याला गुलामगिरीत ठेवले आहे, याची जाणीव भारतीय जनतेला झाल्याने ब्रिटिशांविरोधी संघटीत होऊन लढा दिला पाहिजे अशी भावना निर्माण झाली.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ *

❑ **अ) योग्य पर्याय निवडा.**

१. संस्थाने खालसा धोरण ..................... ने सुरू केले.

*अ) लॉर्ड कॉर्नवॉलिस* *ब) लॉर्ड वेलस्ली*

*क) लॉर्ड डलहौसी* *ड) लॉर्ड कॅनिंग.*

२. कायमधारा पध्दती ................ याने सुरू केली.

*अ) लॉर्ड डलहौसी* *ब) लॉर्ड रिपन*

*क) लॉर्ड कॉनवॉलिस* *ड) लॉर्ड मेयो.*

३. मंगल पांडे याने .................... या इंग्रज अधिकाऱ्यावर गोळ्या झाडल्या.

*अ) मेजर ह्यूसन* *ब) लेफ्टनंट विलोबी*

*क) वॉरेन हेस्टींग्ज* *ड) लॉर्ड क्लाईव्ह.*

४. राणी लक्ष्मीबाई यांनी .................. येथून इंग्रजांविरुध्द उठाव केला.

*अ) दिल्ली* *ब) झाशी* *क) मेरठ* *ड) कानपूर.*

५. १८५७ च्या उठावात ............... हे संस्थान ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिले.

*अ) सातारा* *ब) झाशी* *क) बरेली* *ड) ग्वाल्हेर.*

❑ **ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भारतात तैनाती फौज कोणी सुरू केली?

२. इ.स. १८१३ च्या कायद्यानुसार भारतात कोणत्या धर्मास धर्मप्रसार करण्याची परवानगी देण्यात आली?

३. १८५७ च्या उठावावेळी दिल्लीचा मुघल बादशहा कोण होता?

४. १८५७ च्या उठावात इंग्रजांना कोणी मदत केली?

५. इंग्रजांनी १८५७ च्या उठावानंतर कोणत्या भेदनीतीचा अवलंब केला?

## ४.२.३ १८५८ चा राणीचा जाहिरनामा व त्यांचे परिणाम

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय व आर्थिक धोरणामुळेच भारतीय समाजाच्या विविध वर्गामध्ये असंतोष निर्माण झाल्याने इंग्रजी सत्तेपुढे १८५७ च्या लढ्याचे आव्हान उभे राहिले याची जाणीव इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरियाला झाली. भारतातील ब्रिटिश सत्ता कंपनीच्या हाती सुरक्षित नाही, कंपनीच्या कारभारामुळे इंग्लंडची प्रतिष्ठा धोक्यात आली आहे असे वाटल्याने इंग्लंडची तत्कालीन साम्राज्ञी राणी व्हिक्टोरिया हिने १ नोव्हेंबर १८५८ रोजी एक जाहीरनामा प्रसिध्द केला. त्यास 'राणीचा जाहीरनामा' असे म्हटले जाते. हा जाहीरनामा इंग्लंडचे पंतप्रधान डर्ली यांनी तयार केला होता.

### ❑ जाहीरनाम्यातील तरतूदी :-

राणीचा जाहिरनामा हा भारतीय प्रजेला उद्देशून तयार करण्यात आला होता. लॉर्ड कॅनिंगने १ नोव्हेंबर १८५८ रोजी अलाहाबाद येथे दरबार भरवून राणीचा जाहिरनामा घोषित केला. हा जाहिरनामा सन १८५८ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया या अधिनियमान्वये प्रसृत करण्यात आला. १८५८ च्या कायद्याने

भारतातील कंपनी राजवट बरखास्त करण्यात आली आणि इंग्लंडच्या राणीची प्रत्यक्ष राजवट सुरू झाली. राणीच्या जाहिरनाम्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१. संस्थानिकांच्या संबंधी असणाऱ्या धोरणात बदल करून संस्थानिक, राजेरजवाड्यांशी असणारे तह किंवा करारनामे पाळले जातील.

२. धार्मिक बाबतीत सरकार हस्तक्षेप करणार नसून सर्व धर्मियांना समान वागणूक मिळेल.

३. इंग्लंडला भारतात यापुढे राज्यविस्तार करण्याची अजिबात इच्छा नाही.

४. देशातील जनतेचे हित लक्षात घेऊन राज्यकारभार केला जाईल.

५. लोकांच्या चालीरिती, श्रध्दा, प्रथा, परंपरा विचारात घेऊन कायदे करून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

६. सरकारी नोकरी देताना धर्म, जात, वर्ण, वंश व भाषा याचा विचार न करता केवळ शिक्षण आणि गुणवत्तेचा विचार करून नेमणूका दिल्या जातील.

७. मुघल बादशहा बहादूरशाहाचे नामधारी पद रद्द केले.

८. १८५७ च्या उठावात ब्रिटिश नागरिकांचा खून करणाऱ्यांना कैद्यांना सोडून इतर गुन्हेगारांना पश्चात्ताप झाल्यास सोडून दिले जाईल.

९. संस्थानिकांना दत्तक घेण्याचा अधिकार दिला जाईल. तसेच त्यांच्या पदव्या, मानसन्मान पूर्ववत ठेवले जातील.

एकंदरीत इंग्रजांच्या भारतविषयक धोरणात बदल होऊन या जाहिरनाम्याने भारतात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पावले उचलली गेली.

## ❑ राणीच्या जाहीरनाम्याचे परिणाम :-

हिंदुस्थानातील ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभाराचे उच्चाटन करण्याचा हेतू या जाहिरनाम्याने सफल झाला. कंपनी राजवटीवरील भारतीयांचा असलेला असंतोष लक्षात घेऊन इंग्लंडमधील ब्रिटिश सरकारने १८५७ पूर्वी वीस-पंचवीस वर्षापासूनच कंपनी सरकारवर नियंत्रणे आणण्यास सुरूवात केली होती. १७८४, १८१३, १८३३, १८५३ असे प्रत्येक २० वर्षांनी केलेले कायदे त्याचेच प्रतीक होते. या सर्वांचा प्रभाव राणीच्या जाहिरनाम्यावर होता. यामुळे भारतातील कोणत्याही वर्ग अथवा गटाला दुखावून तेथे आपली सत्ता कायम ठेवणे हे कोणत्याही परिस्थितीत धोक्याचे आहे याची जाणीव इंग्लंडमधील सरकारला झाली होती. यातूनच इंग्लंडच्या संसदेने '१८५८ चा भारत सरकार

अधिनियम' संमत करून त्यानुसार भारतातील सर्व प्रदेश, प्रशासन, महसूल कंपनी सरकारकडून काढून ते ब्रिटिश राजपदाच्या वर्चस्वाखाली आणले. राणीच्या जाहिरनाम्याचा परिणाम म्हणूनच भारतातील मध्यवर्ती, प्रांतिक, स्थानिक स्वराज्य संस्था, न्याय व्यवस्था इत्यादीमध्ये बदल करण्यात आले.

## १. भारतातील मध्यवर्ती प्रशासन व्यवस्थेतील बदल :-

१८५८ चा भारतविषयक कायदा इंग्लंड सरकारने मंजूर केला. या कायद्यानुसार 'कंपनी सरकारची' राजवट बरखास्त करून ती 'इंग्लंडच्या राजा'कडे (राजपद) देण्यात आली. (त्यावेळी इंग्लंडचे राजपद राणी व्हिक्टोरियाकडे होते.) या कायद्यान्वये भारतातील प्रशासन राणीच्या नावाने चालविण्यात येईल त्यासाठी भारतमंत्री (भारत सचिव) व त्यांच्या मदतीला १५ सदस्यांचे सल्लागार मंडळ नेमण्यात आले. भारतमंत्री हा ब्रिटिश संसदेच्या मंत्रीमंडळातील मंत्री असल्याने तो इंग्लंडच्या राणीचा विश्वासू व जबाबदार घटक होता. पूर्वी कंपनी राजवटीत भारतमंत्र्याच्या ऐवजी 'बोर्ड ऑफ कंट्रोल' ही जबाबदारी पार पाडत होते.

भारतामध्ये प्रत्यक्ष राज्यकारभार चालविण्यासाठी पूर्वीच्या 'गव्हर्नर जनरल' एवेजी 'व्हॉईसरॉय'ची (राजाचा वैयक्तिक प्रतिनिधी) नियुक्ती करण्यात आली. व्हॉईसरॉयच्या मदतीसाठी कार्यकारी परिषदेची (कौन्सिल/मंडळ) तरतूद करण्यात आली. प्रारंभी कार्यकारी परिषदेची संख्या ०४ अशी निश्चित करण्यात आली. कार्यकारी परिषदेतील सदस्य हे सरकारी विभागाचे प्रमुख व व्हॉईसरॉयचे सल्लागार म्हणून काम पाहणार होते. भारतमंत्र्याचे नियंत्रण व्हॉईस रॉयवर असेल. भारतीय प्रशासनाच्या सर्व घटकावर नियंत्रण भारतमंत्री ठेविल. बिकटप्रसंगी व्हॉईसरॉय निर्णय घेऊ शकत असे इतरवेळी प्रत्येक निर्णय भारतमंत्र्यांच्या सहमतीशिवाय घेता येत नसे.

कायदेविषयक बाबींसंबंधी निर्णय घेण्यासाठी इ.स. १८६१ च्या 'इंडियन ॲक्ट' नुसार व्हॉईसरॉयच्या कार्यकारी परिषदेतील (कौन्सिल) सदस्यांची संख्या कमीतकमी ६ व जास्तीत जास्त १२ अशी वाढविण्यात आली. या कार्यकारी परिषदेला 'शाही कायदेमंडळ' (Imperial Legislative Council) या नावाने ओळखले जात असे. हे सदस्य नेमण्याचा अधिकार व्हाईसरॉयला देण्यात आला. याशिवाय सर्वप्रकारचे अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मात्र भारतमंत्र्यानंतर व्हाईसरॉयकडे देण्यात आले होते.

## २. प्रांतिक प्रशासन व्यवस्थेतील बदल :-

ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीसाठी भारताचे अनेक प्रांत पाडले. त्यामध्ये मुंबई, मद्रास व बंगाल हे प्रांत इलाखे किंवा 'प्रेसिडेन्सी' म्हणून ओळखले जात असत. या इलाख्याचा कारभार गव्हर्नर व त्याचे

कार्यकारी मंडळ पाहत असे. हे कार्यकारी मंडळ ब्रिटिश सरकारने नियुक्त केले असे. प्रातांच्या आर्थिक बाबींबर केंद्र सरकारचे कठोर नियंत्रण होते. प्रांतीक सरकारने कार्यक्षम राहून महसूल वसूलीवर देखरेख करणे, केंद्र (मध्यवर्ती) सत्तेला शक्य नसल्याने इंग्रज अधिकाऱ्यांनी सार्वजनिक वित्त विभागाचे विकेंद्रीकरण करण्याबाबत पावले उचलली. इ.स. १८७० साली लॉर्ड मेयो याने केंद्रीय व प्रांतीक वित्त विभाग एकमेकांपासून वेगळे केले. शिक्षण, आरोग्य, पोलीस, तुरुंग, रस्ते इत्यादींच्या खर्चासाठी केंद्रीय महसूलातून ठराविक रक्कम (अनुदान) प्रांतांना देण्यात आले. इ.स. १८६१ व १८९२ च्या कायद्यानुसार प्रांतातील कायदेविषयक कामकाजासाठी विकेंद्रीकरणाचे धोरण ठरविण्यात आले. तसेच वित्तीय विकेंद्रीकरणामुळे प्रांतिक प्रशासनामध्ये उत्पन्न वाढवून खर्च कमी करण्याचा इंग्रजांचा हेतू काही अंशी सफल झाला.

## ३. स्थानिक स्वराज्य संस्था :-

इंग्रजांनी ग्रामीण शासन व्यवस्थेच्या पारंपारिक चौकटीला हात न लावता शहरी स्थानिक संस्थाची निर्मिती केली. ब्रिटिशांनी नगरपालिका व जिल्हा मंडळे (District Local Board) स्थापन करून जास्तीत-जास्त प्रशासनाचे विकेंद्रीकरण केले. खेड्याऐवजी जिल्हा हा स्थानिक प्रशासनाचा घटक बनविला. जिल्हा समित्या निर्माण करून ग्रामीण भागातील कर व उपकर वसूल करण्याची जबाबदारी या समित्यांवर टाकण्यात आली. जिल्हा अधिकारी या समित्यांचा अध्यक्ष असे. लॉर्ड मेयोने आर्थिक विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा पुरस्कार करून, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून स्थानिक लोकांकडून पैसा गोळा करून तो तेथील विकासासाठी वापरावा असे सुचविले. मेयोच्या या धोरणामुळे नगरपालिकांना आर्थिक स्वावलंबी बनविण्यासाठी कर आकारणीस मंजुरी देण्यात आली. पुढे लॉर्ड रिपनच्या उदारमतवादी धोरणामुळे त्याने १२ मे १८८२ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या स्थापनेसंबंधी निर्णय घेतला. यानुसार इ.स. १८८४ मध्ये मुंबई इलाख्यात 'लोकल बोर्ड' कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार जिल्हा व तालुका स्तरावर 'लोकल बोड' स्थापन करण्यात आली. याचाच परिपाक म्हणून पुढे प्रत्येक खेड्यांमध्ये ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आली.

## ४. प्रशासकीय सेवा :-

ब्रिटिशांच्या भारतातील प्रशासन यंत्रणेत भारतीयांना फारच कमी स्थान होते. तसेच प्रशासकीय धोरण ठरविताना भारतीयांना विचारात घेतले जात नसे. ब्रिटिश प्रशासनातील सर्व महत्त्वाची अधिकारपदे 'भारतीय सनदी सेवेतील' (Indian Civil Service) अधिकाऱ्यांना दिली जात असत. ही पद भरण्यासाठी दरवर्षी इंग्लंडमध्ये स्पर्धा परीक्षा होत असे. या परीक्षेस बसण्यास भारतीयांना परवानगी होती, परंतु परीक्षा केंद्र इंग्लंडमधील लंडन येथे असल्याने भारतीयांना सर्व पात्रता पूर्ण करून तेथे पोहचणे जिकीरीचे होत असे. कारण समुद्रामार्गे इंग्लंडला जाण्यासाठी पाच-सहा महिन्यांचा प्रवास करावा लागत

होता. १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्यानंतर दोन वर्षांनी भारत मंत्र्यांनी नेमलेल्या एका कमिशनने शिफारस केली की, 'भारतीय सनदी सेवा' (ICS) ही परीक्षा इंग्लंड व हिंदुस्थानात दोन्हीकडे होईल. इ.स. १८६३ साली सत्येंद्रनाथ टागोर हे पहिले भारतीय (ICS) परीक्षा उत्तीर्ण झाले. यानंतर सुरेंद्रनाथ बॅनर्जी, आर. सी. दत्त, बिहारीलाल गुप्ता यांनी (ICS) परीक्षेत यश मिळविले. तरीही प्रशासनातील पोस्ट व तार खाते, पोलीस, वन विभाग, अभियांत्रिकी, रेल्वे खात्यातील महत्त्वाची व मोठ्या पगाराची पदे ब्रिटिशांसाठी राखून ठेवली जात असत. भारतीयांना ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या वर्चस्वाखाली रहावे लागत असे.

## ५. सैन्याची पुनर्रचना :-

सन १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्यानंतर पुन्हा सन १८५७ सारखा उठाव होणार नाही अशा रितीने सैन्याची पुनर्रचना करण्यात आली. ब्रिटिश लष्करातील भारतीय शिपाई व इंग्रज शिपाई व अधिकारी यांचे प्रांतानुसार प्रमाण बदलण्यात आले. भारतीय व इंग्रज शिपायाचे प्रमाण मुंबई व मद्रास सैनिकांमध्ये ३:१ तर बंगाल सैन्यामध्ये २ : १ ठेवण्यात आले. तोफखाना, विविध महत्त्वाचे लष्करी विभाग, इंग्रज अधिकारी व सैन्याच्या ताब्यात राहतील याची दक्षता घेण्यात आली. भारतीय शिपायांच्या जातवार संघटना होऊ नयेत, यासाठी सैन्याची तुकड्यांची रचना जातभेदविरहित करण्यावर भर दिला. भारतीय सैनिकांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रवाद वाढू किंवा निर्माण होऊ नये यासाठी मराठा, रजपूत, शीख, गुरखा, बलुची इत्यादी प्रादेशिक रेजिमेंटस् तयार करण्यात आल्या.

सैन्याच्या या पुनर्रचनेमुळे लष्करावरील खर्चात प्रचंड वाढ करण्यात आली. युरोपीयन सैनिकांना मिळणारा पगार हा देशी सैनिकांच्या पगारापेक्षा पाच पटीने जास्त होता. सन १९०४ साली एकूण भारतीय महसूलाच्या ५२% भाग सैन्यावर खर्च केला जात होता. यामुळे भारतीयांना महसूलापोटी प्रचंड मोठी रक्कम द्यावी लागत होती.

## ६. न्यायालयीन परिणाम :-

कंपनी कालखंडात सर्वोच्च न्यायालयाची रचना दिवाणी सदर अदालत व निझामत सदर अदालत अशी द्विस्तरावर करण्यात आली होती. कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालय होते. पुढे इ. स. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यानुसार धर्म, जात, वर्ण, वंश असा भेदभाव न करता कायद्यापुढे सर्व समान असतील असे आश्वासन मिळाले. इ. स. १८६१ मध्ये उच्च न्यायालय स्थापनेचा कायदा मंजूर झाला. या कायद्यान्वये मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. सर्व प्रांतात एकसूत्री व समान न्यायव्यवस्था निर्माण करण्यात आली. तरीही बऱ्याचवेळा युरोपीयन व भारतीय यांच्यात न्यायदान होत असताना पक्षपात होतच राहिला.

## * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ *

- अ) **योग्य पर्याय निवडा.**

१. १ नोव्हेंबर १८५८ रोजी .................. या राणीने जाहिरनामा प्रसिध्द केला.

*अ) कॅथेराईन ब) व्हिक्टोरिया क) एलिझाबेथ ड) मेरी.*

२. भारतात .................. या ठिकाणी राणीचा जाहिरनामा वाचून दाखविण्यात आला.

*अ) मुंबई ब) अलाहाबाद क) कलकत्ता ड) मद्रास.*

३. ......................... या व्हॉईसरॉयने केंद्रीय व प्रांतिक वित्तविभाग एकमेकांपासून वेगळे केले.

*अ) लॉर्ड कॅनिंग ब) लॉर्ड मेयो क) लॉर्ड माऊटबॅटन ड) लॉर्ड कर्झन.*

४. लॉर्ड रिपन याने ....................... धोरण स्विकारले.

*अ) साम्यवादी ब) जहालवादी क) उदारमतवादी ड) समाजवादी.*

५. .................. हे पहिले भारतीय 'भारतीय सनदी सेवा' (ICS) परीक्षा उत्तीर्ण झाले.

*अ) सत्येंद्रनाथ टागोर ब) आर. सी. दत्त*

*क) बिहारीलाल गुप्ता ड) रविंद्रनाथ टागोर.*

- ब) **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भारतात राणीचा जाहिरनामा कोणी वाचून दाखविला?

२. १८५८ नंतर भारतात गव्हर्नर जनरल ऐवजी कोणाची नियुक्ती करण्यात आली?

३. कोणत्या व्हाईसरॉयने आर्थिक विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला?

४. १८८४ मध्ये मुंबई इलाख्यात कोणता कायदा करण्यात आला?

५. प्रारंभी 'भारतीय सनदी सेवा' (ICS) या स्पर्धा परीक्षेचे केंद्र कोठे होते?

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**१. आदिवासी :** नागरी संस्कृतीपासून दूर आणि डोंगर जंगलाच्या आश्रयाने राहत असलेले रहिवाशी म्हणजे आदिवासी होय.

२. **उठाव :** एखादी राजकीय सत्ता उखडून टाकण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे उठाव होय.

३. **वंशश्रेष्ठत्व :** गोऱ्या वर्णाचे लोक (युरोपियन) आफ्रिका व आशिया खंडातील काळ्या वर्णाच्या लोकांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असे समजत असत.

४. **राष्ट्रीयत्व :** आपल्या मातृभूमीबद्दल, भाषा, धर्म, परंपरा, संस्कृती याबद्दल प्रत्येक व्यक्तीच्या मनात प्रेम आणि आदर असणे, तसेच राष्ट्रहितासाठी सर्वस्व बहाल करणे.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** *१. (अ) संन्याशी उठाव.*

*२. (क) रामोशी.*

*३. (ब) बुधो भगत.*

*४. (ड) आसाम व मेघालय.*

*५. (ब) संथाळ.*

**ब)** *१. चुआर.*

*२. सेवाराम.*

*३. कुकी.*

*४. शेतजमिनीच्या.*

*५. ओडिसा.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

**अ)** *१. (क) लॉर्ड डलहौसी.*

*२. (क) लॉर्ड कॉनवॉलिस.*

*३. (अ) मेजर ह्यूसन.*

*४. (ब) झाशी.*

*५. (ड) ग्वाल्हेर.*

**ब)** *१. लॉर्ड वेलस्ली.*

*२. ख्रिश्चन.*

*३. दुसरा बहादूरशहा जाफर.*

*४. पंजाबचे शीख व हैद्राबादचा सालारजंग.*

*५. फोडा व झोडा.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

**अ)** *१. (ब) व्हिक्टोरिया.*

*२. (ब) अलाहाबाद.*

*३. (ब) लॉर्ड मेयो.*

*४. (क) उदारमतवादी.*

*५. (अ) सत्येंद्रनाथ टागोर.*

**ब)** *१. लॉर्ड कॅनिंग.*

*२. व्हाईसरॉय.*

*३. लॉर्ड मेयो.*

*४. लोकल बोर्ड.*

*५. लंडन.*

## ४.५ सारांश

१७ व्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंडमधील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाऱ्यांनी भारतात प्रवेश केला. भारतातील राजकीय अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन कंपनीच्या व्यापाऱ्यांनी येथील राजकारणात चंचुप्रवेश केला. सन १७५७ साली प्लासीच्या लढाईने ब्रिटिश सत्तेचा पाया घातला. सन १७५७ ते १८५६ सालापर्यंत ईस्ट इंडिया कंपनीने संपूर्ण हिंदुस्थानवर वर्चस्व संपादन केले. हे वर्चस्व

प्रस्थापित करत असताना कंपनी सरकारकडून संस्थानिक, वतनदार, आदिवासी, सर्वसामान्य जनतेवर कळत-नकळत अन्याय होत गेले. यामुळे ब्रिटिशांप्रती जनतेचा असंतोष वाढत गेला व यातूनच स्वतंत्र अशा विविध समूहांनी कंपनी सरकारविरुध्द बंड केले.

डोंगर दऱ्याखोऱ्यांमध्ये तुरळक वस्ती करून राहत असलेल्या आदिवासीनी ब्रिटिशांविरुध्द बंडाचे निशाण उभे केले. या आदिवासींचा बाहेरील जगताशी फारसा संबंध येत नव्हता. नव्हे तर त्यांनी स्वत:ला नागरी सुधारणा व आधुनिकता यापासून दूर ठेवले होते. ब्रिटिशांनी वसाहतवादी भूमिकेतून आदिवासी राहत असलेल्या पर्वतीय प्रदेश व जंगलातील जमिनीवर कब्जा मिळविण्यास सुरूवात केली. आदिवासींच्या पारंपारिक हक्कावर गदा आणली. सेवा-भावी वृत्तीचा वापर करून मिशनऱ्यांनी ख्रिश्चन धर्मप्रसार केला. यामुळे मूलत: स्वतंत्र प्रवृत्तीने जगणाऱ्या आदिवासींना त्यांच्या दैनंदिन जीवनात होत असलेला हस्तक्षेप नकोसा झाला. यातूनच संन्याशी, चुआर, पाईक, भिल्ल, वाघेरा, कुकी, अहोम, कोळी, काल, खासी, पागलपंथी, संथाळ इत्यादी आदिवासी जमातींनी हाती मिळेल त्या शस्त्रानिशी ब्रिटिशांच्या विरुध्द उठाव केले. परंतु हे उठाव संघटित नसल्याने एकसंघ अशा ब्रिटिश सत्तेने मोडून काढले.

१८५६ सालापर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने तैनाती फौज, संस्थाने खालसा धोरण इत्यादी धोरणाचा वापर करून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे संपूर्ण भारतावर ताबा मिळविला. ब्रिटिशांचे व्यापारी धोरण, जमीन महसूलविषयक धोरण, वंशश्रेष्ठत्व, ख्रिश्चन धर्म प्रसाराला दिलेले अप्रत्यक्ष प्रोत्साहन, ब्रिटिश लष्करातील भारतीय सैनिकांच्या समस्या इत्यादी घटनामुळे १८५७ पूर्वी विविध ठिकाणी छोटे-मोठे उठाव घडून आले. या उठावातून देशपातळीवर ब्रिटिश राजवटीविषयी असंतोष पसरल्याने १८५७ चा उठाव घडून आला. १८५७ च्या उठावाची सुरुवात सैनिकांच्या बंडापासून झाली. २९ मार्च १८५७ रोजी बराकपूरच्या छावणीतील सैनिकांनी गाई व डुकराची चरबी लावलेली काडतुसे वापरण्यास नकार दिला. मंगल पांडे याने मेजर ह्यूसनवर गोळ्या झाडून ठार केले व उठावाचे लोण सर्वत्र पसरण्यास सुरूवात झाली. उत्तर भारत, बिहार, दिल्ली, राजपुताना, लखनौ, अलाहाबाद, कानपूर, बनारस, झाशी, बरेली, दक्षिणेत सातारा, कोल्हापूर, बेळगांवसह अनेक ठिकाणी उठावाचे लोण पसरले. या उठावाचे नेतृत्व मुघलबादशहा बहादुरशहा, नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुवरसिंह, बेगम हजरत महल, रंगो बापूजी गुप्ते आदींनी केले. या उठावात सैनिक, राजे, संस्थानिक, सेनापती, जमीनदार, आदिवासी, सर्वसामान्य जनतेने सक्रिय सहभाग घेतला होता. परंतु उठावात संघटीत शक्तीचा अभाव, पारंपारिक शस्त्रे, एकराष्ट्रीयत्वाचा अभाव इत्यादी कारणामुळे ब्रिटिशांनी साम, दाम, दंड, भेद नीतीचा वापर करून उठाव मोडून काढला.

१८५७ च्या उठावाचा बिमोड केल्यानंतर पुन्हा अशा प्रकारचा उठाव होऊ नये म्हणून इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरियाने १ नोव्हेंबर १८५८ रोजी 'राणीचा जाहिरनामा' प्रसिध्द केला. हा जाहिरनामा लॉर्ड

कॅनिंगने अलाहाबाद येथे दरबार भरवून वाचून दाखविला. या जाहिरनाम्यानुसार हिंदुस्थानातील जफतेला विश्वास व अनेक आश्वासने दिली गेली. संस्थानिकांप्रती सकारात्मक धोरण, नोकरीच्या नेमणूका, नि:पक्षपातीपणे, कायद्यापुढे सर्व समान, धर्माची सक्ती नाही अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या. राणीच्या जाहिरनाम्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीची १०० वर्षाची कारकिर्द संपुष्टात आली. सन १८५८ च्या कायद्याने भारतात 'ब्रिटिश राज'च्या माध्यमातून राज्यकारभार सुरू झाला, त्याचे भारतीय राज्यकारभारावर परिणाम होऊन अनेक बदल घडून आले.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### ❑ अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. आदिवासी उठावाची कारणे सांगून उठावांची माहिती लिहा.

२. आदिवासी उठावांची माहिती विशद करा.

३. १८५७ च्या उठावाची कारणे स्पष्ट करा.

४. १८५७ चा उठाव अयशस्वी होण्याची कारणांची चर्चा करा.

५. १८५७ च्या उठावाचे परिणाम स्पष्ट करा.

६. १८५८ च्या राणीचा जाहिरनामा व त्याचे परिणाम विशद करा.

### ❑ टिपा लिहा.

१. आदिवासी उठावाची कारणे.

२. भिल्लांचा उठाव.

३. रामोशांचा उठाव.

४. संथाळाचा उठाव.

५. १८५७ च्या उठावाचे तात्कालिक कारण.

६. १८५७ च्या उठावाची वाटचाल.

७. १८५७ चा उठाव अतयगांची कारणे.

८. राणीचा जाहिरनामा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **नाडगोंडे, गुरुनाथ**, *भारतीय आदिवासी*, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे, १९८६.

२. **ओझा, एन. एन. (संपादक),** *आधुनिक भारत : भाग-२,* क्रॉनिकल बुक्स, नवी दिल्ली.

३. **कुलकर्णी, अ. रा.**, *कंपनी सरकार (ईस्ट इंडिया कंपनी)*, राजहंस प्रकाशन, पुणे.

४. **वैद्य, सुमन, कोठेकर, शांता**, *आधुनिक भारताचा इतिहास (१७५७-१८५७).*

५. **ग्रोव्हर, बी. एल., बेल्हेकर, एन. के.**, *आधुनिक भारताचा इतिहास : एक नवीन मूल्यांकन*, एस. चाँद पब्लिकेशन, नवी दिल्ली.

❑❑❑

सत्र–४ : घटक–१

# राष्ट्रवादाचा उदय

# (Rise of Nationalism)

**अ) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना (Formation of Indian National Congress)**

**ब) मवाळांचे योगदान (Contribution of Moderates)**

**क) जहालमतवाद्यांचे योगदान (स्वदेशी चळवळ आणि होमरूल चळवळ)**
**(Contribution of Eutremists : Swadeshi Movement & Homerule Movement)**

---

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना

१.२.२ मवाळांचे योगदान

१.२.३ जहालमतवाद्यांचे योगदान (स्वदेशी चळवळ आणि होमरूल चळवळ)

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. भारतातील राष्ट्रवादाच्या किंवा राष्ट्रीय जाणिवांच्या घटनांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

२. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची माहिती करून घेणे.

३. राष्ट्रवादाच्या उदय आणि विकासातील मवाळवाद्यांच्या योगदानाची माहिती जाणून घेणे.

४. भारतातील स्वदेशी चळवळीची माहिती जाणून घेणे.

५. होमरूल चळवळीचा परिचय करून घेणे.

६. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृष्टीकोन निर्माण करणे.

## १.१ प्रास्ताविक

आधुनिक काळात राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून त्यावर श्रद्धा व निष्ठा ठेवण्यास आणि त्या निष्ठेतून राष्ट्रासाठी व्यक्तीला आपल्या सर्वस्वाचा त्याग करावयास शिकविणारी विचारसरणी म्हणून राष्ट्रवादी विचार प्रणालीकडे पाहिले जाते. गिर्लाखुष्टच्या मते, राष्ट्रवाद म्हणजे सामान्यत: एकाच प्रदेशात राहणारे, एकाच वंशाचे, एकच भाषा असणारे, समान इतिहास, समान परंपरा, एकच धर्म तसेच समान हितसंबंध, समाज राजकीय संघटन आणि त्यातून देशासाठी व्यक्त होणारी देशप्रेमाबरोबर राष्ट्रीय एकात्मकतेची आणि आध्यात्मकतेची भावना म्हणजे राष्ट्रवाद होय. एकंदरीत राष्ट्रवाद म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या राष्ट्राबद्दल वाटणारे प्रेम किंवा असलेली निष्ठा राष्ट्रवाद ही संघ वा गट भावना असून मानवाची ती मानसिक तसेच सामाजिक अभिव्यक्ती आहे. राष्ट्रवादी विचारसरणीचा उदय प्रामुख्याने अठराव्या शतकापासून झाला असून याच शतकाच्या मध्यापासून तिच्या विकासाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली.

आधुनिक काळात राष्ट्रवादी विचारसरणीला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. अठराव्या शतकात राष्ट्रवादाचा उदय झाला हे मान्य केले तरी एक गोष्ट मात्र नक्की असते आणि ती म्हणजे कोणतेही तत्त्वज्ञान ज्या विशिष्ठ काळात उदय पावत असते त्या काळाच्या खूप आधीच त्या तत्त्वज्ञानाची व विचारसरणीची बीजेही रोवलेली असतात. त्यामुळे असे म्हणता येईल की. राष्ट्रवादी विचारसरणीच्या प्रभावाची सुरूवात जरी अठराव्या शतकात झाली असली तरी या विचारसरणीला पोषक असणारी प्रवृत्ती वा भावना ही त्यापेक्षा अनेक शतके आधी विकसित होत होती.

भारतात १९ व्या शतकात राष्ट्रवादाचा उदय झाला. सुरूवातीला वसाहतवादी शासक भारतात राष्ट्रवादाचे अस्तित्वच मानायला तयार नव्हते. जे. आर. सिलीने सन १८८३ मध्ये भारताचा उल्लेख राष्ट्रीय ऐक्याची भावना नसलेला भौगोलिक प्रदेश असा केला. भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी जॉन स्ट्रॅर्याने सन १८८४ मध्ये केंब्रिज विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसमोर बोलताना म्हटले, ''भारतासंबंधी सर्वप्रथम व सर्वात आवश्यक जाणून घेण्यासारखी गोष्ट म्हणजे भारत अस्तित्वात नाही आणि कधीही नव्हता.'' तसेच ''भारत कधीही एक राष्ट्र बनणार नाही'' India will never become

a united nation असे भाकित केले. पण जेव्हा १९व्या शतकाच्या शेवटी आणि २०व्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा राष्ट्रवाद बळकट होऊ लागला. तेव्हा वसाहतवादी शासकांनी आपले प्रतिपादन बदलून भारतीय राष्ट्रवादाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न चालविला. त्याचे प्रतिबिंब मॉटफोर्ड अहवालातही दिसून येते. कूपलॅडही म्हणतो, ''भारतीय राष्ट्रवाद इंग्रज सत्तेचे अपत्य आहे.'' Indian nationalism was the child of British raj. पण कूपलॅड या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात कि, भारताचा राष्ट्रवाद इंग्रजांच्या इच्छेविरुध्दचे अपत्य होते. ज्याला जन्मत:च दूध पाजण्यास इंग्रज सत्तेने नकार दिला. एवढेच नव्हे तर त्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. ए. डी. स्मिथ म्हणतात, Nationalism is really only anti-colonialism.

आधुनिक भारतीय राष्ट्रवाद हा सामान्यपणे विदेशी शासनाच्या नियंत्रणाच्या धमकीला उत्तर म्हणून उदयास आला. एकंदरीत भारतीय राष्ट्रवादाचा हा उदय काही प्रमाणात भारतीय प्रबोधनाचा परिणाम तर काही प्रमाणात इंग्रजांच्या भारतातील वसाहतवादी धोरणाचा परिणामांमुळे झाला.

वेगवेगळ्या कारण-परिणामांमुळे भारतामध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. यातूनच भारताच्या विविध प्रांतात स्थानिक, प्रादेशिक राजकीय संस्था संघटना स्थापन होऊ लागल्या. या राष्ट्रवादाचा परमोच्च बिंदू म्हणजे १८८५ मध्ये स्थापन झालेली अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होय. मवाळ व जहाल काळात काँग्रेसने भारताच्या तळागाळातील लोकांपर्यंत राजकीय जाणिवा निर्माण करून राष्ट्रवादाची पायाभरणी तळागाळातील लोकांपर्यंत केली.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना (Formation of Indian National Congress) :-

राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना हा केवळ योगायोग नव्हता. त्यापाठीमागे भारतातील दीर्घकालीन सामाजिक, आर्थिक, बौध्दिक व राजकीय परिस्थिती कारणीभूत होती. सन १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना झाली. तेव्हापासून भारतातील भारताच्या राजकीय जीवनातील एक नवा कालखंड सुरू झाला. अखिल भारतीय काँग्रेस या नावाचे एक संघटनात्मक व्यासपीठ अस्तित्वात आले आणि या व्यासपीठावरून भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष लढला गेला आणि या व्यासपीठावरूनच भारताला स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येईल.

सन १८५७ च्या उठावानंतर भारतात मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय जाणिवा निर्माण होऊ लागल्या. त्यातून राष्ट्रवादाचा उदय झाल. या राष्ट्रवादांचा परिणाम म्हणजे राजकीय जागृती होऊन सन १८८५ मध्ये

अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची म्हणजेच काँग्रेसची स्थापना झाली, असे असले तरी राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ही काही आकस्मिक घडलेली घटना नव्हती. त्यापाठीमागे वर्षानुवर्षांची पार्श्वभूमी कारणीभूत होती. अनेक कारणांची परंपरा होती. ती कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## १. राजकीय ऐक्याची निर्मिती :-

ब्रिटिशांनी हिमालय ते कन्याकुमारी आणि वायव्य सीमा ते ईशान्य भारतापर्यंतचा संपूर्ण भारत जिंकून भारतावर प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष आपला एकछत्री अंमल प्रस्थापित केला. त्यामुळे भारतात राजकीय ऐक्य निर्माण झाले. त्यामुळे भारतात शांततेची व प्रशासकीय ऐक्याची निर्मिती झाली. एकच सत्ता, समान समस्या, समान कायदेप्रणाली यामुळे भारत एका सूत्रात बांधला गेला. या राजकीय ऐक्याने मानसिक ऐक्याला चालना दिली, प्रेरणा दिली.

## २. दळणवळण आणि संचार साधनांचा विकास :-

ब्रिटिशांनी भारत जिंकल्यानंतर प्रशासकीय सोयीसाठी, लष्करी संरक्षण व अवागमन, आर्थिक व व्यापारी शोषणाच्या उद्देशाने भारतात दळणवळण व संचार साधनांचा विकास केला. रस्त्यांच्या द्वारे एक प्रांत दुसऱ्या प्रांताला आणि ग्रामीण भाग मोठमोठ्या शहरांना जोडण्यात आले. रेल्वेचे जाळे निर्माण करून देशाच्या कानाकोपऱ्याला जोडण्यात आले. या दळणवळणाच्या विकासामुळे प्रवास सुरक्षित व सोयीचा.झाला. अल्पावधीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे यामुळे शक्य झाले. डाकव्यवस्था व तारायंत्रामुळे परस्परसंबंध वाढण्यास मदत झाली. एका प्रांतातील घटना दुसऱ्या प्रांतातील लोकांना ताबडतोब कळू लागल्या आणि त्यामुळे एकीची भावना वाढीस लागण्यास मदत झाली. भारतीय प्रदेश व व्यक्ती एकसंघ होऊन त्यांच्यातील राष्ट्रीय भावना अधिक तीव्र होत जाऊन एखादी अखिल भारतीय स्तरावर सर्वांचे नेतृत्व करणारी संघटना अस्तित्वात येणे अत्यंत गरजेचे आहे, याची जाणीव लोकांना होऊ लागली.

## ३. आधुनिक शिक्षणाचा प्रसार :-

ब्रिटिशांनी भारतावर आपली सत्ता स्थापन केल्यावर भारतात प्रशासकीय गरजेतून इंग्रजी माध्यमाच्या आधुनिक शिक्षणाची सुरूवात केली. या आधुनिक शिक्षण पध्दतीमुळे आधुनिक पाश्चात्य विचारांची तोंडओळख भारतीयांना होऊन भारतातील राजकीय विचारांना एक नवी दिशा मिळाली. आधुनिक शिक्षण घेतलेलया नवशिक्षितांसाटी पाश्चात्य ज्ञानाचे दरवाजे खुले झाले. मिल्टन, शेले, बेंथम, मिल, स्पेन्सर, रूसो, व्हाल्टेअर यांच्या विचारांनी भारतीय बुद्धीजिवींमध्ये स्वातंत्र्याची, राष्ट्रवादाची, स्वशासनाची ज्योत प्रज्वलित झाली.

काही महत्त्वाकांक्षी तरूण उच्च शिक्षणासाठी युरोप, अमेरिकेत गेले. त्यांचा तेथील राजकीय संस्था, संघटना, तत्वप्रणाली व शासनव्यवस्थेशी जवळून संबंध आला. भारतातील वेगवेगळ्या प्रांतामधून शिक्षणासाठी एकत्र आलेल्या या तरुणांच्यात परस्परसंबंध आला.

इंग्रजी माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आधुनिक शिक्षणाचा एक फायदा म्हणजे भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील विभिन्न भाषिक प्रदेशातील जनतेला इंग्रजी या भाषा माध्यमातून विचारांची देवाणघेवाण करणे सहजशक्य झाले. इंग्रजीच्या माध्यमातून परस्पर संपर्क साधने, एकमेकांच्या अडचणी जाणून घेणे व त्यावर परस्पर विचारविनिमय करणे, सुशिक्षितांना सहज शक्य झाले. याचा परिणाम एखाद्या देशव्यापी संघटनेची गरज सुशिक्षितांना वाटू लागली.

## ४. भारतीय वृत्तपत्रांचा उदय :-

वसाहतवादी राजवटीकडून सामाजिक, आर्थिक, धार्मिक मार्गांनी होणारा अन्याय भारतीय वृत्तपत्रांनी दाखवून भारतात राष्ट्रवाद विकसित करण्याचे कार्य केले. भारतीय वृत्तपत्रांनी राष्ट्रवादाच्या प्रसारात आणि त्यासाठी जनमत तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. केसरी, मराठा, काळ, ज्ञानप्रकाश, हिंदू, आंध्र प्रकाशिका, कोहिनूर, हिंदू पेट्रियट, इंडियन मिरर, बंगाली, अमृत बझार पत्रिका यासारख्या इंग्रजी व प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रांनी वसाहतवादी शासनाच्या अत्याचारांना वाचा फोडून त्यांचे शोषणकारी स्वरूप जनतेसमोर मांडले. भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील स्थानिक भाषेतील वृत्तपत्रांनी त्या-त्या स्थानिक भाषेतून राजकीय जागृती करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य, प्रातिनिधीक शासन, लोकशाही संस्था ह्या विचारांना लोकमानसात लोकप्रिय करण्याचे कार्यही वृत्तपत्रांनी केले. त्याकाळात भारतीय वृत्तपत्रे म्हणजे भारतीय राष्ट्रवादाचा आरसा बनली होती.

## ५. मध्यमवर्गीय बुद्धीजिवींचा उदय :-

ब्रिटिशांच्या प्रशासकीय व आर्थिक क्षेत्रातील नव्या पद्धतीमुळे भारतात मध्यमवर्गीय बुद्धीजिवी वर्गाचा उदय झाला. या वर्गाने भारतीय राष्ट्रवादाच्या उदयास मोठ्या प्रमाणावर हातभार लावला. स्पियर लिहितो, ‘‘हा नवा मध्यम वर्ग संघटित असा अखिल भारतीय वर्ग होता. ज्याची पार्श्वभूमी भिन्न असली तरी ज्ञान, विचार आणि मूल्यांची समानता होती. हा वर्ग भारतीय समाजात संख्येने छोटा असला तरी गतिमान होता. त्यांच्यात समान उद्दिष्टांची व आकांक्षांची भावना होती. १८५७ च्या उठावानंतर याच वर्गात मोठ्या प्रमाणावर जागृती होऊ लागली. त्यातून त्यांनी भारतात छोट्या-मोठ्या संस्था स्थापून एकत्र येण्यास सुरूवात केली. याच वर्गाने पुढे सामाजिक व राजकीय चळवळीचे नेतृत्व केले. हाच मध्यम वर्ग आधुनिक भारताचा आत्मा बनला आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा कणा बनला.

## ६. सामाजिक व धार्मिक प्रबोधन :-

भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर भारतात सामजसुधारक व सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळींची एक फळी निर्माण झाली. भारतातील या समाजसुधारकांनी आणि सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींनी भारतीय समाजातील दोष नष्ट करून भारतीय समाजाला आंतरबाह्य बदलून टाकणे. हा बदललेला भारतीय समाज नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी समर्थ बनला.

या सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींचा उद्देश राजकीय जागृतीचा नसला तरी त्यांच्या संपर्कात येणारे लवकरच आत्मसन्मानाच्या व देशभक्तीच्या भावनेने प्रभावित होत होते. या सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींनी आणि समाजसुधारकांनी जी सामाजिक व धार्मिक जागृती केली, त्या आधारावरच राजकीय चळवळ उभी राहिली.

## ७. वसाहतवादी शासनाविरुध्दचा असंतोष :-

भारतावर ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर भारत एका परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली गेला. ब्रिटिशांनी भारत आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची जुलमी धोरणे अवलंबिली. त्याचा परिणाम राज्यकर्ते व जनता यांच्यातील दरी सतत वाढत गेली आणि लोकांच्या मनात जुलमी शासनाविरुध्दचा असंतोष वाढू लागला. याचा परिणाम काही ठिकाणी सशक्त प्रतिकारही झाले. त्याचवेळी जुलमी शासनसंस्थेला नमविण्यासाठी शांततापूर्ण सनदशीर चळवळीचा विचार मूळ धरू लागला. यातूनच अखिल भारतीय काँग्रेसचा जन्म झाला.

## ८. वसाहतवादी आर्थिक शोषण (Economic Eziploitation) :-

ब्रिटिश राजवटीचा भारतावर झालेला सर्वात वाईट परिणाम म्हणजे भारताचे झालेले आर्थिक शोषण. ब्रिटिशांनी भारतीय अर्थव्यवस्था इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेशी जोडून भारताचे आर्थिक शोषण केले. भारतातील आर्थिक धोरणे ही भारतीयांचे हित समोर ठेवून ठरविली गेली नाहीत तर ती इंग्लंडच्या जनतेचे हित डोळ्यासमोर ठेवून ठरविली गेली. त्यामुळे ब्रिटिशांनी भारताला कच्चा माल पुरविणारी आणि पक्का माल खरेदी करणारी हक्काची बाजारपेठ बनविली. त्याचा परिणाम उत्पादक असणारा भारत कर्जबाजारी बनला. जमीन महसूल व्यवस्था, शेतीचे व्यापारीकरण, हस्तोद्योगांचा ऱ्हास, मुक्त व्यापारी धोरण यासारख्या मार्गांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा ऱ्हास घडवून आणला. त्यामुळे भारतात सतत दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊन भारत दारिद्र्याच्या खाईत लोटला गेला. याची जाणीव भारतीयांना होऊ लागली. त्यातूनच दादाभाई नौरोजी, रोमेशचंद्र दत्त, न्या. रानडे यांनी ब्रिटीशांच्या शोषक नितीचे भारतावर झालेले दुष्परिणाम दाखवून दिले आणि संपत्तीच्या अपहरणाचा सिद्धांत मांडून वसाहतवादी शासनाचे शोषक

स्वरूप दाखवून दिले. या आर्थिक शोषणाच्या जाणिवेतून आर्थिक राष्ट्रवादाचा विकास होऊन एखाद्या देशव्यापी संघटनेची गरज भारतीयांना वाटू लागली.

## ९. ब्रिटिशांचे वंशवादी धोरण :-

ब्रिटिशांनी भारतात स्विकारलेले वंशवादी धोरण भारतीयांच्यात राष्ट्रीय भावना जागृत होण्यास आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेस कारणीभूत ठरले. गोरे ब्रिटिश अधिकारी, राज्यकर्ते यांना स्वत:च्या संस्कृतीचा आणि वंशश्रेष्ठत्वाचा जास्त अभिमान होता. गोऱ्या ब्रिटिशांकडून भारतीयांना काळे समजून भारतीयांची सतत अवहेलना केली जात असे. अनेक ठिकाणी फक्त गोऱ्यांनाच प्रवेश असत तिथे जाण्याची भारतीयांना परवानगी नसे. अनेक ठिकाणी गोऱ्यांच्या क्लबच्या प्रवेशद्वारावर 'Indians and Dogs not allowed' अशा पाट्या लावलेल्या असत. नोकरीमध्ये, प्रवासाच्या साधनात सरळ पक्षपाती व्यवस्था असे. भारतीयांना हिन लेखून, त्यांना प्रशासनातील उच्च पदापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने ब्रिटिश राज्यकर्त्यांनी केलेला दिसून येतो. सर्वांसाठी समान कायदा असे ब्रिटिश न्यायव्यवस्थेचे.तत्त्व असतानाही भारतीय आणि युरोपियनांसाठी कायदा व्यवस्थेत भेदभाव केला जात असे. गोऱ्या लोकांविरुध्दचा खटला फक्त गोऱ्या न्यायाधिशांसमोरच चालविला जात असे. सन १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने भारतीयांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पक्षपात केला जाणार नाही, असे आश्वासन देण्यात आले असले तरी प्रत्यक्षात मात्र त्याचा अवलंब केला गेला नाही. ब्रिटिशांच्या वंशवादी धोरणामुळे सुशिक्षित भारतीयांच्या मनात आपल्या गुलामगिरीविरुध्द चिड निर्माण होणे साहजिकच होते. या वेदनेतूनच आपल्याला एकत्र येवून आपल्या हक्कांसाठी संघटना उभारण्याची गरज भारतीयांना वाटू लागला.

## १०. ऐतिहासिक संशोधन व राष्ट्रीय साहित्याची निर्मिती :-

विल्यम जोन्स, मॅक्समूलर, ससान, रॉय, विलियम्स यासारख्या परकीय विद्वानांनी केलेल्या प्राचीन भारतीच्या संशोधनामुळे भारताची समृद्ध संस्कृती पुढे आली. कनिंगहॅमसारख्या पुरातत्त्ववेत्यांनी केलेल्या उत्खनांनी भारताच्या महानतेचे, गौरवशाली परंपरेचे नवे रूप दिसून आले. या युरोपियन विद्वानांनी वेदांचे व उपनिषदांचे साहित्यिक श्रेष्ठत्व मान्य करण्याबरोबरच त्यातील मानवी मनाच्या सुंदर विश्लेषणाबद्दल भरपूर स्तुतीही केली. त्याचवेळी स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंदांनी भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचे दर्शन संपूर्ण जगाला करून दिले. त्यामुळे भारतीय हे राज्यकारभार करण्यास समर्थ नाहीत. भारताचा इतिहासच नाही, भारताला प्राचीन वारसा नाही या युरोपियनांनी निर्माण केलेल्या मिथकांना तडा जाऊन प्राचीन भारतीय संस्कृती ही गौरवशाली होती अशी मानसिक आत्मगौरवाची भावना सुशिक्षित भारतीयांच्या मनात निर्माण झाली. त्याने राष्ट्र जाणिवांना उत्तेजन मिळाले.

त्याचवेळी दिनबंधूमित्रा, हेमचंद्र बॅनर्जी, नारायणचंद्र सेन, बंकिमचंद्र चटर्जी, रविंद्रनाथ टागोर, ईश्वरचंद विद्यासागर, आगरकर-चिपळूणकर यासारख्या साहित्यिकांनी राष्ट्रीय साहित्याची निर्मिती केली. तत्कालीन भारतातील राष्ट्रीय साहित्यातून राष्ट्रभावनेची निर्मिती झाली.

## ११. लॉर्ड लिटनची दडपशाही :-

व्हाईसरॉय लॉर्ड लिटनच्या दडपशाही धोरणाने भारतीयांच्यात राष्ट्रभावना चेतविण्याचे कार्य केले. १८७६ ते १८७८ चा दक्षिण भारतातील दुष्काळ, लॉर्ड लिटनचा देशी वृत्तपत्रावर बंदी घालणारा १८७८ चा भारतीय भाषा वृत्तपत्र कायदा (व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट), भारतीय शस्त्र कायदा (आर्म्स ॲक्ट, १८७८), आयसीएस परीक्षेची वयोमर्यादा २१ वर्षावरून १९ वर्षे करणे यासारख्या कायद्यांनी भारतीयांवर अनेक निर्बंध लावण्यात आले. भारतात भीषण दुष्काळ असताना १८७७ मध्ये दिल्ली दरबारावर लक्षावधी रुपये खर्च केले. या लॉर्ड ब्रिटनच्या कृत्यांमुळे भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला. सरकारविरोधी चळवळ चालविण्यासाठी भारतात अनेक राजकीय संस्था स्थापन झाल्या.

## १२. इलबर्ट विधेयकावरील वाद (The Ilbert Bill Controversy) :-

प्रांतांच्या राजधानीव्यतिरिक्त असलेल्या हिंदी न्यायाधिशांना युरोपियन गुन्हेगारांची चौकशी करण्याचा अधिकार नव्हता. न्यायव्यवस्थेतील हा पक्षपात दूर करण्यासाठी व्हाईसरॉय लॉर्ड स्पिनने तत्कालीन सरकारचा कायदा सल्लागार कर्टर्ना इलबर्ट यास न्यायालयीन भेदभाव दूर करण्यासाठी विधेयक मांडण्यास सांगितले. युरोपियन लोकांना हा आपला अपमान झाल्याची भावना झाली आणि यामुळे युरोपियन गुन्हेगारांना जबर शिक्षेस सामोरे जावे लागेल या भितीने त्यांनी युरोपियन डिफेन्स असोसिएशन स्थापन करून लॉर्ड स्पिनविरुध्द भारतात व इंग्लंडमध्ये चळवळ चालविली. या सर्वांचा परिणाम ब्रिटिश संसदेने हस्तक्षेप करून या बिलात बदल घडवून आणला. कायदेशीर आंदोलन कसे करावे व त्यासाठी संघटित होण्याचे ज्ञान भारतीयांना या बिलावरील घडामोडीवरून आले.

## १३. हिंदी राष्ट्रवादाचा उदय :-

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिक अर्थाने राष्ट्रवादाची पायाभरणी भारतात झाली. १८५७ च्या उठावानंतर भारतात राष्ट्रवादाचा विचार मूळ धरू लागला. त्याचा परिणाम भारतात राजकीय संस्थांची निर्मिती होऊ लागली. राष्ट्रवादाच्या उदयाचा परिणाम म्हणजे भारतीय राष्ट्रीय सभेची (कॉँग्रेसची) स्थापना झाली.

## १४. राजकीय संस्था व संघटना :-

१९व्या शतकाच्या मध्यापासून भारतात राष्ट्रीय जाणिवा निर्माण होण्यास प्रारंभ झाला. त्याचीच

एक परिणती म्हणून अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना झाली. परंतु काँग्रेसची स्थापना काही अचानक झाली नाही. काँग्रेसच्या स्थापनेपासून भारतात सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक संस्था, संघटना स्थापन झाल्या होत्या. यातील बहुतांशी संघटनांची व्याप्ती स्थानिक व प्रादेशिक स्तरापर्यंत मर्यादित होती. पण ह्या संस्थांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे उद्देश, धर्म व जात ह्या परिघापासून दूर होते. या संघटनांमध्ये वकील, प्राध्यापक, पत्रकार, शिक्षक, डॉक्टर या सुशिक्षित मध्यमवर्गीयांचा भरणा होता. या संघटनांची ब्रिटिश पार्लमेंटकडे व हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्यकर्त्यांकडे अर्ज विनंत्याद्वारे काही राजकीय मागण्या सादर केल्या होत्या. वेगवेगळ्या प्रांतातील या संघटनांमुळे काँग्रेसच्या स्थापनेला गती आली.

## ❑ भारतातील वेगवेगळ्या राजकीय संस्था, संघटना :-

भारतीय राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेसच्या) स्थापनेपूर्वीच भारतातील वेगवेगळ्या प्रांतात निरनिराळ्या राजकीय संस्था उदयास आलेल्या होत्या. ह्या संस्थांचे उद्दिष्ट्य म्हणजे त्याचे उद्देश, धर्म व जात ह्यांच्यापासून दूर होते.

## १. बंगाल प्रांतातील राजकीय संस्था :-

राजा राममोहन राय यांच्या अनुयायांनी सन १८३६ मध्ये कलकत्ता येथे **'वंगभंग प्रकाशिका सभा'** या नावाची पहिली संस्था स्थापन केली. सरकारच्या धोरणांबाबत संबंधित विषयांची चर्चा करून, अध्ययन करून त्यात सुधारणा करण्यासाठी सरकारला विनंतीपत्रे पाठविणे अशा प्रकारचे कार्य या संसथेचे होते.

सन १८३७ मध्ये जमीनदार वर्गाच्या हितसंबंध रक्षणासाठी **'लॅण्ड होल्डर्स असोसिएशन'** (Land Holders Association) नावाची संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेचे उद्देश मर्यादित असले तरी ती एखाद्या राजकीय संघटनेसारखीच काम करीत होती. या संघटनेचा इंग्लंडमधील ब्रिटिश इंडिया सोसायटीशी संपर्क होता.

एप्रिल १८४३ मध्ये **'बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी'** या नावाची राजकीय संस्था अस्तित्वात आली. 'इंग्रजांच्या नियंत्रणाखालील भारतीय जनतेची वास्तविक स्थिती जाणून घेणे, जनतेच्या प्रगतीसाठी शांततामय व कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे, जनतेला त्यांचे न्याय्य अधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न करणे' असे या संस्थेचे उद्देश होते.

जमिनदार असोसिएशन 'Land Holders Association' आणि 'बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी' या दोन्ही संस्थांचे विलिनीकरण होऊन २८ ऑक्टोबर १८५१ रोजी **'ब्रिटिश इंडियन असोसिएशन'** नावाची संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेतही प्रामुख्याने जमिनदारच होते आणि जमिनदारांचे

हितसंबंध जोपासणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असले तरी या संस्थेमार्फत १८५३ मध्ये चार्टर कायद्याच्या नुतनीकरणावेळी 'लोकप्रिय पध्दतीचे कायदेमंडळ असावे, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांचे कार्यक्षेत्र स्वतंत्र असावे. मोठमोठ्या अधिकाऱ्यांचे वेतन कमी करण्यात यावे. मीठ, अबकारी व मुद्रा कर समाप्त केला जावा' अशा मागण्या असलेले विनंतीपत्र ब्रिटिश पार्लमेंटकडे पाठविले होते. या संस्थेने विसाव्या शतकापर्यंत एखाद्या राजकीय संघटनेप्रमाणे कार्य केले. अर्थात कॉंग्रेसवर या संस्थेचा प्रभाव निश्चितच होता.

लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना जागृत करण्यासाठी व लोकांना राजकीय शिक्षण देण्यासाठी **'अमृत बझार'** पत्रिकेचे संपादक बाबू शिशिरकुमार घोष यांनी सन १८७५ मध्ये **'इंडियन लीग'**ची स्थापना केली.

बंगालमधील तरुण युवकांनी सुरेंद्रनाथ बॅनर्जी व आनंद मोहन घोष यांच्या नेतृत्वाखाली २६ जुलै १८७६ रोजी कलकत्याच्या अलबर्ट हॉलमध्ये **'इंडियन असोसिएशन'** या संस्थेची स्थापना केली. ही संस्था अखिल भारतीय चळवळीचे केंद्र असावी असा या संस्थेच्या स्थापनेचा उद्देश होता. कारण सर्व भारतीयांना एका समान राजकीय व्यासपीठावर एकत्र आणण्याची गरज बंगालमधील नेत्यांना जाणवत होती. या संस्थेने सरकारच्या अन्याय्य धोरणाविरुध्द आवाज उठवून लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. सुरेंद्रनाथ बॅनर्जीनी या संस्थेच्या माध्यमातून देशभर दौरे काढून जनजागृती केली. त्यामुळे या संघटनेला अखिल भारतीय स्वरूप मिळाले. या संस्थेच्या शाखा बंगालमध्ये व बंगालबाहेरही होत्या. सन १८८३ साली या संस्थेने राष्ट्रीय परिषद (National Conference) बोलाविली. त्याला भारतातील जवळपास १०० प्रतिनिधी उपस्थित होते.

## २. मुंबई इलाख्यातील राजकीय संस्था :-

जगन्नाथ शंकरशेठ यांच्या पुढाकाराने मुंबईतील काही उत्साही, सुशिक्षित तरुणांनी एकत्र येऊन **'बॉम्बे असोसिएशन'** नावाची संस्था मुंबई येथे सन १८५२ मध्ये स्थापन केली. जनतेचे प्रश्न, अडचणी सरकारपर्यंत पोहचविणे आणि सनदशिर मार्गाने ते सोडविण्याचा प्रयत्न करणे असे या संस्थेचे उद्देश होते. प्रसंगी सरकारच्या धोरणावर टिकाही या संस्थेने केली.

पुण्यात गणेश वासुदेव जोशी यांच्या पुढाकाराने इ.स. १८६७ मध्ये **'पूजा असोसिएशन'**ची स्थापना झाली. पुढे तीन वर्षांनी इ. स. १८७० मध्ये तिचे **'सार्वजनिक सभा'** असे नामांतरण झाले. पुण्याच्या जवळ असलेल्या राजेरजवाड्यांचा या संस्थेशी निकटचा संबंध होता. न्या. रानडे हे या संस्थेचे प्रेरणाशक्ती आणि सूत्रचालक होते. औद्योगिकीकरण, शेती, स्वदेशीविषयी या संस्थेने कार्य केले. या संस्थेच्या अविरत व नि:स्वार्थी कार्यामुळे, सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे

सार्वजनिक सभा ही महाराष्ट्रातील लोकमान्य राजकीय संस्था बनली. तिच्या शाखा महाराष्ट्र भर स्थापन झाल्या. पुढे गोपाळ कृष्ण गोखले आणि त्यानंतर लोकमान्य टिळकांच्या हातात या संस्थेची सूत्रे गेल्यानंतर राजकीय जागृतीसाठी त्यांनी सार्वजनिक सभेचा वापर केला.

सन १८८५ साली फिरोजशहा मेहता, बद्रुद्दीन तय्यबजी आणि न्या. के. टी. तेलंग यांनी **'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन'** ही संस्था स्थापन केली. जनतेच्या अडचणी व मागण्या अर्ज-विनंतीद्वारे सरकारला सादर करण्याचे कार्य या संस्थेने केले.

## ३. मद्रास इलाख्यातील राजकीय संस्था :-

बंगालमधील ब्रिटिश इंडियन असोसिएशनची शाखा म्हणून मद्रास येथे सन १८५२ साली **'मद्रास नेटिव्ह असोसिएशन'**ची स्थापना करण्यात आली. या संस्थेने कंपनी सरकारच्या गैरकारभाराबाबत प्रकाश टाकणारे एक निवेदन ब्रिटिश पार्लमेंटला सादर केले.

मद्रासमध्ये सन १८८४ साली रंगय्या नायडू, सुब्रहमण्यम, सुब्बराव पंतलु, एम. विरराघवाचार्य यांनी **'मद्रास महाजन सभे'**ची स्थापना केली. कायदेमंडळाचा विस्तार, भारतीयांना त्यात अधिकाधिक प्रतिनिधीत्व, सत्तेचे विभाजन अशा राजकीय मागण्या या संस्थेने सरकारकडे केल्या होत्या. सन १८८५ मध्ये या सभेने एक मोठी परिषद आयोजित केली होती.

न्यूयॉर्क येथे स्थापन झालेल्या थिऑसॉफिकल सोसायटीचे अधिवेशन मद्रासनजीक अड्ड्यावर येथे सन १८८४ मध्ये भरले. या अधिवेशनास सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दादाभाई नौरोजी यांच्यासह भारताच्या विविध प्रांतातून आलेले १७ प्रतिनिधी उपस्थित होते. अधिवेशनानंतर दिवाणबहादूर रघुनाथराव यांच्या निवासस्थानी एक बैठक झाली. त्यामध्ये अखिल भारतीय स्वरूपाची एखादी राजकीय संघटना स्थापन करण्याचा निश्चय करण्यात आला.

## ४. भारताबाहेरील संघटना :-

भारताबरोबरच भारताबाहेरही काही संघटनांची भारतीयांनी स्थापना केली होती. त्यामध्ये दादाभाई नौरोजी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने सन १८६५ साली लंडनमध्ये **'लंडन इंडियन सोसायटी'** या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी तर सचिव व्योमेशचंद्र बॅनर्जी हे होते. यातील काही सदस्यांच्या सहाय्याने दादाभाई नौरोजी यांनी पुढच्याच वर्षी म्हणजे सन १८६६ मध्ये **'ईस्ट इंडिया असोसिएशन'** ही संघटना स्थापन केली. या संघटनेच्या शाखा भारतातील प्रमुख शहरांमध्येही स्थापन करण्यात आल्या. या संघटनेत काही निवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्यांचाही समावेश होता. भारतीय प्रश्नांवर विचार करणे, तसेच भारताच्या कल्याणाच्या दृष्टीने इंग्लंडच्या नेत्यांना प्रभावित करणे हे या संघटनेचे उद्देश होते.

केंब्रिज विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या आनंदमोहन बोस यांनी सन १८७२ मध्ये **'इंडियन सोसायटीची'** स्थापना केली. इंग्लंडमधील भारतीयांना संघटित करणे आणि भारतातील समस्यांबाबत विचार करणे हे या संघटनेचे उद्दिष्ट होते.

वरीलप्रमाणे वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या संघटना स्थापन झाल्या होत्या. पण त्या संघटनांची व्याप्ती व कार्य फारच सिमित होते. यातील बहुतांशी संघटना स्थानिक प्रश्नांना घेऊन लढत होत्या. तसेच त्यांचे नेतृत्व किंवा सदस्य एखादे शहर किंवा एखाद्या प्रांतातील लोकांपर्यंत मर्यादित होते.

## ❑ भारतीय राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना :-

भारतीय राष्ट्रवाद्यांना परदेशी शासन आणि शोषणाविरुध्द एक होण्याची गरज वाटू लागली होती. अखिल भारतीय राजकीय संघटनेच्या स्थापनेची वेळ आलेली होती. वेगवेगळ्या प्रांतात स्थापन झालेल्या संघटनांपासूनच अखिल भारतीय स्वरूपाची एक संघटना असावी असे विचार सुरू झाले होते. पण ते प्रत्यक्ष अंमलात यायला १८८५ साल उजाडले. सन १८८५ पूर्वीही त्यादृष्टीने काही थोडेफार प्रयत्न झाले होते. सन १८७७ मध्ये पुण्याच्या सार्वजनिक सभेने मुंबई व कलकत्याच्या प्रतिनिधींना एकत्र कार्य करण्याची प्रेरणा दिली. सार्वजनिक सभेने सन १८७८ मध्ये कलकत्त्याला एक शिष्टमंडळ भारतीय वृत्तपत्रांच्या व कलकत्याच्या राजकीय प्रतिनिधींनी भाग घेऊन विचारविनिमय करण्यासाठी कलकत्त्याला एक अधिवेशन घ्यावे या हेतूने पाठविले होते. सन १८७८ मध्ये लायसेंस कर लावण्याविरुध्द आणि सन १८७९ मध्ये सुती कापडावरील आयात कर हटविण्याच्या विरोधात भारतात ठिकठिकाणी सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. सन १८८४ मध्ये लॉर्ड रिपनच्या परत जाण्याबद्दल भारतात ठिकठिकाणी निदर्शने झाली. 'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राने त्यावर अशी टिप्पणी केली की, या निदर्शनातून संघटनांचा राष्ट्रीय आत्मा जाणवला जी गोष्ट यापूर्वी कधीच अनुभवाला आली नव्हती. भारताच्या सर्वच भागात जागृत निर्माण झालेली होती आणि सर्वांनी एका व्यासपीठावर यावे अशी सार्वत्रिक भावना होती. एखादी देशव्यापी परिषद घेण्याच्या दृष्टीने इंडियन असोसिएशन आणि तिचे प्रमुख सुरेंद्रनाथ बॅनर्जी ह्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. इंडियन असोसिएशनने सन १८८३ च्या डिसेंबरमध्ये प्रथम **'इंडियन नॅशनल कॉन्फरन्स'** (Indian National Conference) बोलाविली आणि त्यासाठी भारताच्या सर्व प्रमख शहरातून प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले. या परिषदेस जवळपास १०० प्रतिनिधी हजर होते. या कॉन्फरन्सच्या अध्यक्षस्थानी असलेल्या आनंदमोहन बोस यांनी असा आशावाद व्यक्त केला कि, **'राष्ट्रीय संसद'** (National Parliment) अस्तित्वात येण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन पहिले पाउल ठरेल. इंडियन नॅशनल कॉन्फरन्सचे दुसरे अधिवेशन कलकत्ता येथे सन १८८५ च्या नाताळमध्ये घेण्याचे ठरले. दरम्यान काँग्रेसच्या स्थापनेच्या हालचाली घडून आल्या. त्यामध्ये इंडियन असोसिएशनचे नेते सहभागी झाले.

सन १८८५ मध्ये स्थापन झालेली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ही काही आकस्मिक घडलेली घटना नव्हती किंवा कोणताही योगायोग नव्हता. १८६० आणि १८७० च्या दशकात भारतीयांमध्ये राष्ट्रीय जागृती होऊ लागली होती. या राष्ट्रीय जागृतीच्या परमोच्च बिंदू राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होता. भारतातील जागृत बुद्धीजीवी वर्गामध्ये स्थानिक हितांऐवजी राष्ट्रीय हितासाठी संघर्ष करण्याची भावना निर्माण झाली. याचाच अंतिम भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना हा होता आणि १८८५ हे वर्ष या प्रक्रियेतील मैलाचा दगड ठरले.

इ.स. १८८५ पूर्वीच्या दशकातील राजकीय जागृतीचा परमोच्च बिंदू म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना हा होय. काही मूलभूत उद्दिष्ट्ये व कामगिरी निश्चित करून त्यासाठी लढा देण्याची परिस्थिती सन १८८५ पर्यंत निर्माण झाली होती. एकमेकांशी निगडीत असलेली ही निरनिराळी उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी राजकीय कार्यकर्त्यांनी अखिल भारतीय स्वरूपाच्या एकाच संघटनेत सामिल होण्याची गरज होती. २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई जमलेले नेते या उद्दिष्टांनी प्रेरित झाले होते. ती साध्य करण्याची प्रक्रिया सुरू होण्याची त्यांना आशा वाटत होती.

अखिल भारतीय संघटना स्थापन करण्यासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी तयार झाली होती. त्यास मूर्त स्वरूप देऊन प्रत्यक्षात आणण्याचे श्रेय निवृत्त ब्रिटिश सनदी अधिकारी सर ॲलन ऑक्टेव्हिएन ह्यूम (A. O. Hume) यांना मिळाले. ॲलम ह्यूम पंजाबचे माजी ले. गव्हर्नर व गव्हर्नर जनरलचे सेक्रेटरी होते. विचाराने उदारमतवादी असलेल्या ॲलन ह्यूमला भारतीयांबद्दल तळमळ होती. हिंदी लोकांना सन्मानाने वागवावे, त्यांना प्रशासनात सहभाग द्यावा असे ॲलन ह्यूमला वाटत होते. त्याचवेळी ब्रिटिश वसाहतवादी धोरणाविरुध्द मोठ्या प्रमाणात भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. या असंतोषाचा स्फोट होऊन ब्रिटिशांच्या भारतातील साम्राज्याला धोका निर्माण होऊ नये. हे टाळण्यासाठी ॲलन ह्यूमने दूरदृष्टीने हिंदी लोकांच्या असंतोषाला विधायक चळवळीचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने सुशिक्षित भारतीयांची संघटना स्थापन करण्याची योजना तयार केली होती, कारण त्यांना त्यासाठी अखिल भारतीय व्यासपीठ स्थापन होणे आवश्यक वाटत होते. इ.स. १८८२ नंतर त्यांनी तसा जाणीवपूर्वक प्रयत्न केला होता. १ मार्च १८८३ रोजी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना उद्देशून ह्यूमने एका जाहीर पत्रात म्हटले, 'आपण सर्व सुख व चैनीचा त्याग करून सार्वजनिक कार्यासाठी एकत्र आले पाहिजे. देशाचा विकास करण्यासाठी पन्नास सुशिक्षित तरुण पुढे आल्यास देशाच्या विकासाचा, प्रगतीचा मार्ग सुकर होईल.

ॲलन ह्यूमच्या या आवाहनाला भारतीय तरुणांनी प्रतिसाद दिला आणि या तरुणांच्या सहकार्याने ॲलन ह्यूमने सन १८८४ मध्ये 'इंडियन नॅशनल युनियन' या नावाची संघटना स्थापन केली आणि तिच्या शाखाही सर्वत्र काढण्यात आल्या. 'सामाजिक सुधारणा व देशाची प्रगती सरकारच्या मदतीने आणि

सनदशीर मार्गाने घडवून आणणे' हे या संघटनेचे ध्येय होते. याचवेळी सुरेंद्रनाथ बॅनर्जी व आनंदमोहन बोस यांनी इंडियन असोसिएशनच्यामार्फत अशी देशव्यापी संघटना निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून भारतातील प्रमुख शहरातील प्रतिनिधींना आमंत्रित करून इंडियन नॅशनल कॉन्फरन्सचे अधिवेशन भरविले होते.

ॲलन ह्यूमच्या विचारांना लॉर्ड नॉर्थब्रुक, जॉन ब्राईट, लॉर्ड रिपनसारख्या उदारमतवाद्यांनी उत्तेजन दिले. तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड डफरीनशी चर्चा केल्यानंतर ॲलन ह्यूमने १८८५ साली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन पुण्यामध्ये घेण्याचे निश्चित केले. परंतु ऐनवेळी पुण्याऐवजी मुंबईला अधिवेशन घण्याचे ठरले. त्याप्रमाणे २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल कॉलेजमध्ये राष्ट्रीय सभेचे अधिवेशन पार पडले.

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबई येथे २८ डिसेंबर १८८५ रोजी व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या अधिवेशनात अधिकृतपणे राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. या अधिवेशनाला देशाच्या वेगवेगळ्या भागातून ७२ प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये फिरोशजहा मेहता, न्या. के. टी. तेलंग, दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, गोपाळकृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, दिनशा वाच्छा, नरेंद्रनाथ सेन, गिरीजाभूषण मुखर्जी, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, रंगय्या नायडू, पंडित मदनमोहन मालवीय इ. प्रमुख भारतीय नेते उस्थित होते. याशिवाय ॲलन ह्यूम, विल्यम वेडरबर्न, हॅन्री कॉटन, नॉर्टन या युरोपियन व्यक्तींही उपस्थित होत्या.

कॉंग्रेस या शब्दाचा अर्थ **'लोकांचा समूह'** किंवा **'लोकांचे मंडळ'** असा आहे. राष्ट्रीय सभेचे नाव म्हणून वापरलेला कॉंग्रेस हा शब्द उत्तर अमेरिकेच्या इतिहासातून उचलण्यात आला. कॉंग्रेसची रचना संसदीय पद्धतीची होती. तिचे संपूर्ण कामकाज लोकशाही मार्गाने चालत असे. कॉंग्रेस धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर भारताच्या निर्मितीसाठी देशव्यापी नेतृत्वाची जी गरज होती, ती गरज कॉंग्रेसने पूर्ण केली.

## ❑ भारतीय राष्ट्रीय सभे (कॉंग्रेस)ची उद्दिष्ट्ये :-

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष व्योमेशचंद्र (उमेशचंद्र) बॅनर्जी हे होते तर सचिव ॲलन ह्यूम होते. त्यांनी आपल्या भाषणात कॉंग्रेसची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली.

१. देशाच्या विविध प्रांतातील लोकांना देशहिताच्या कार्यासाठी एकत्र केले आणि त्यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण संबंध वाढविण्याचा प्रयत्न करणे.

२. जातीय, धार्मिक, प्रांतिक आणि वांशिक भेदभाव दूर करून राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेच्या विकास करणे तसेच देशप्रेमी नागरिकांना देशहिताच्या कार्यासाठी उत्तेजन व प्रेरणा देणे.

३. राजकीय कार्य यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आणि देशहिताच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या साधनांचा व मार्गांचा शोध घेणे.

४. महत्त्वाच्या विषयावर भारतातील सुशिक्षितांच्या मतांचा विचार करणे.

५. आपल्या मागण्या सनदशीर मार्गानेच शासनापुढे ठेवणे.

६. ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर विश्वास ठेवणे, अर्ज, विनंत्या आणि शिष्टमंडळे या मार्गांनी आपल्या मागण्या सरकारपुढे ठेवणे.

७. देशाच्या विकासासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी ब्रिटिश शासनाशी एकनिष्ठ राहून सहकार्य करणे.

८. देशाची आर्थिक पिळवणूक थांबविणे, देशात स्वराज्यसंस्था स्थापन करणे, तसेच आफ्रिकेतील भारतीय लोकांना समतेची वागणूक देण्यासाठी प्रयत्न करणे.

९. भविष्यात काँग्रेसने हाती घ्यावयाच्या कार्यक्रमाचा विचार विनिमय करणे, इत्यादी उद्दिष्ट्ये जाहीर करण्यात आली.

भारतामध्ये राष्ट्रीय जागृती जशजशी होऊ लागली तसतशा अनेक मागण्या पुढे येऊ लागल्या व त्यानुसार काँग्रेसच्या उद्दिष्ठातही बदल होत गेले.

## ❑ सुरक्षा झडपेचा विवाद :-

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेभोवती सुरक्षा झडप (Safely Valve) हा एक मजबूत व दीर्घकालीन विवाद गुंफण्यात आला आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अध्यक्ष असलेले व्यामेशचंद्र बॅनर्जींनी असे मत व्यक्त केले की, काँग्रेसचा विचार डफरिनच्या मेंदूतून उत्पन्न झाला आणि त्यानेच ह्यूमला तसे करण्यास सांगितले. या विधानापासून या विवादाला सुरूवात झाली. ब्रिटिश वसाहतवादी शासनाविरुध्द भारतीयांच्यात मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता. या असंतोषाचे पर्यवसान ब्रिटिश विरोधी रक्तरंजीत उठावात किंवा स्फोटात झाले असते. भारतीय जनतेच्या या वाढत्या असंतोषाला घटनात्मक व शांततामय वाट करून देण्यासाठी सुरक्षा झडप बसविणे गरजेचे होते. म्हणून व्हाईसरॉय लॉर्ड डफरीन यांच्या अधिकृत मार्गदर्शनाखाली, त्यांच्या सल्ल्यानुसार व त्यांच्या पुढाकाराने अ‍ॅलन ह्यूम व इतरांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर अशा उठावाची किंवा विस्फोटाची शक्यता दूर झाली. कारण काँग्रेसच्या स्थापनेमुळे या असंतोषाचे पर्यवसान रक्तरंजीत उठावात, क्रांतीमध्ये किंवा विस्फोटक परिस्थितीत न होता या

असंतोषाला विधायक संवेधानिक वाट करून त्या असंतोषातील हवाच काढण्यात आली. हा या विवादाचा मूळ गाभा आहे. प्रत्येक गटाने कॉंग्रेसवर टिका करण्यासाठी आपापल्या सोयीनुसार या विवादाचा आधार घेतलेला दिसून येतो. काँग्रेस साम्राज्यवादाविषयी अगदी एकनिष्ठ नसली तरी नेहमी तडजोडीची भूमिका घेत असे. हा आपला आरोप सिद्ध करण्यासाठी जहालमतवादी या सिद्धांताचा आधार घेतात. तर राष्ट्रीय काँग्रेस सुरूवातीपासूनच राष्ट्रविरोधी होती हे दाखविण्यासाठी सनातनवादी लोक तिचा उपयोग करतात. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस खऱ्या अर्थाने क्रांतीला विरोध करणारी संस्था बनली कारण तिच्यात सुरूवातीलाच साम्राज्यवाद्यांनी या सिद्धांताचे बिज रोवले होते. हे सिद्ध करण्यासाठी डावेही या सिध्दांताचा आधार घेतात. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या धर्मनिरपेक्षतेचा आणि म्हणून उभरत्या राष्ट्रवादाला विरोध करण्याचे काँग्रेसने कार्य केले. हा आरोप सिद्ध करण्यासाठी संघानेही या कथेचा आधार घेतला.

सुरक्षा झडप या सिद्धांताचा किंवा विवादाचा साकल्याने विचार करता असे लक्षात येईल की, तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड डफरीनचा राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत आशिर्वाद होता असे म्हणता येणार नाही. कारण तत्कालीन कागदपत्रांमधून किंवा काँग्रेसप्रती नंतरच्या अधिवेशनाबाबत लॉर्ड डफरिनने घेतलेल्या भूमिकेवरून ते स्पष्ट होते. ॲलन ह्यूमच्या बाबतीत म्हणता येईल की, एखादी राष्ट्रीय स्वरूपाची संघटना असावी अशा स्वरूपाची तयारी किंवा विचार सन १८८५ पूर्वीपासूनच चालू होता. ॲलन ह्यूमने फक्त यासाठी तयार झालेलया परिस्थितीचा फायदा उठविला. ॲलन ह्यूम जरी एक जागरूक साम्राज्यवादी होता. भारतातील वाढत्या असंतोषाने तो चिंतीत होता असे जरी आपण स्विकारले तरी ॲलन ह्यूमने आपल्या उदारमतवादाची छाप समकालीन भारतीयांवर पाडली होती. राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक सदस्य स्वत: पराकोटीचे कर्तबगार व चारित्र्यसंपन्न अशा व्यक्ती होत्या. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, न्या. रानडे, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यासारख्या धीरोदात्त आणि बांधिलकी मानणाऱ्या नेत्यांनी ॲलन ह्यूमशी सहकार्य केले कारण एका उच्च ध्येयाने प्रेरित झालेला एखादा माणूस ज्याच्याशी सहकार्य करण्यात कोणताही कमीपणा नव्हता. शिवाय एक निवृत्त सनदी अधिकारी जर राष्ट्रीय काँग्रेसचा प्रमुख असेल तर राज्यकर्त्यांना तिच्याविषयी वाटणारा संशय कमी होईल. तसेच एका संभाव्य धोकादायक संघटनेवर सरकारमार्फत घाला घातला जाण्याची शक्यताही कमी होईल. हा सूज्ञपणा त्यापाठीमागे होता.

ॲलन ह्यूम व इतर उदारमतवादी इंग्रजांना राष्ट्रीय काँग्रेसचा उपयोग **'सुरक्षा झडप'** असा करावयासा असला तरी भारतीय नेत्यांना ॲलन ह्यूमचा उपयोग एक विद्युतवाहक असा करावयाचा होता. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या यशा-अपशावरून भारतीय आपल्या उद्देशांमध्ये सफल झाल्याचा प्रत्यय येतो.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ✻

❑ **योग्य पर्याय निवडा.**

१. सन १८७८ मध्ये ............. याने भारतीय भाषा वृत्तपत्र कायदा केला.

*(अ) लॉर्ड रिपन* *(ब) लॉर्ड लिटन*

*(क) लॉर्ड डफरिन* *(ड) लॉर्ड डलहौशी.*

२. .............. आणि आनंद मोहन घोष यांच्या नेतृत्वाखाली सन १८७६ रोजी कलकत्ता येथे 'इंडियन असोसिएशन'ची स्थापना झाली.

*(अ) दादाभाई नौरोजी* *(ब) सुरेंद्रनाथ बॅनर्जी*

*(क) लाला लजपतराय* *(ड) रविंद्रनाथ टागोर.*

३. सन १८८४ साली मद्रासमध्ये रंगय्या नायडू, सुब्रह्मण्यम, सुब्बराव पंतलु, एम. विरराघवाचार्य यांनी ............ ची स्थापना केली.

*(अ) मद्रास नेटिव्ह असोसिएशन* *(ब) ईस्ट इंडिया असोसिएशन*

*(क) मद्रास महाजन सभा* *(ड) मद्रास प्रेसिडन्सी असोसिएशन.*

४. सन १८६६ साली इंग्लंडमध्ये ................ यांनी 'ईस्ट इंडिया असोसिएशन'ची स्थापना केली.

*(अ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी* *(ब) दादाभाई नौरोजी*

*(क) लोकमान्य टिळक* *(ड) गोपाळकृष्ण गोखले.*

५. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाला .............. प्रतिनिधी हजर होते.

*(अ) ७२* *(ब) ७८* *(क) ६०* *(ड) ७१.*

## १.२.२ मवाळांचे योगदान (Contribution of Moderates) :-

काँग्रेसच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत म्हणजे १८८५ पासून १९४७ पर्यंत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्याची ढोबळमानाने तीन कालखंडात विभागणी केली जाते. सन १८८५ पासून १९०५ पर्यंतचा मवाळ कालखंड, १९०५ पासून १९२० पर्यंतचा जहाल कालखंड आणि १९२० पासून १९४७ पर्यंतच्या कालखंडाला गांधीयुग म्हटले जाते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पहिल्या २० वर्षातील ब्रिटिशविरोधी धोरण हे 'नेमस्त किंवा मवाळ' होते. म्हणून या काळाला मवाळ कालखंड म्हटले जाते. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचे बोट धरून त्यांच्या कलाने भारताची प्रगती करू इच्छिणाऱ्या जेष्ठ नेत्यांच्या गटाला

मवाळ असे म्हटले जाऊ लागले आणि या मवाळ गटाचा प्रभाव असलेल्या काँग्रेसच्या कालखंडाला मवाळ किंवा नेमस्त कालखंड म्हटले जाते.

या कालखंडातील काँग्रेसच्या राजकारणावर दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा, व्योमेशचंद्र बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, न्या. रानडे यासारख्या नेत्यांचा प्रभाव होता. हे सर्व लोक उदारमतवादी आणि मवाळ राजकारणावर विश्वास ठेवणारे होते. त्यांना 'मवाळ' ही संज्ञा यासाठीच देण्यात आली कि, २० व्या शतकातील जहालवादी राजकारणी लोकांपासून त्यांना वेगळे समजले जावे. मवाळ म्हणजे काय हे सांगताना न्या. महादेव गोविंद रानडेनी लिहिले होते, ''मवाळ ह्याचा अर्थ अप्राप्य गोष्टींची खोटी आशा धरू नये आणि जे मिळविण्यासारखे आहे ते मिळविण्यासाठी चांगल्या व समझोत्याच्या मार्गाने समोर जावे.''

मानवांमधील समता, कायद्यासमोर समानता, नागरिक स्वातंत्र्याचा प्रसार, प्रतिनिधीक संस्थांचा विकास, धर्म व जात संबंधात पक्षपात न करणे अशा प्रकारची उद्दिष्ट्ये काँग्रेसच्या या उदारमतवादी व मवाळ नेत्यांसमोर होती. मवाळ नेते घटनात्मक मार्गाने आणि टप्प्याटप्प्याने जाण्यावर विश्वास ठेवीत होते.

## ❑ मवाळांची कार्यपद्धती :-

मवाळवादी काळात काँग्रेसची राजकीय विचारसरणी प्रामुख्याने दोन प्रकारची होती.

(१) राष्ट्रभावना व राजकीय जागृती करण्यासाठी प्रभावी लोकमत तयार करून त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण देणे आणि त्यानंतर समान राजकीय प्रश्नांवर त्यांना एकत्र आणणे.

(२) ब्रिटिश सरकार व ब्रिटिश लोकमत आपल्या बाजूला वळवून भारतीयांनी मागितलेल्या राजकीय सुधारणा सरकारला मान्य करण्यास भाग पाडले. मवाळवादी कालखंडातील भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनातील ठराव आणि मवाळवाद्यांनी अवलंबिलेले धोरण यावरून मवाळांची कार्यपध्दती स्पष्ट होते.

## १. सनदशीर घटनात्मक मार्गावर विश्वास :-

या काळातील भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस वकील, डॉक्टर, इंजिनियर, पत्रकार, साहित्यिक या मध्यमवर्गीय बुद्धीजिवी ताब्यात होती. या वर्गाची विचारसरणी उदारमतवादी होती. घटनात्मक चौकटीतून सनदशीर मार्गाने चळवळ करण्यावर या काळातील नेत्यांचा विश्वास होता. लोकांना आधुनिक राजकारणाचे शिक्षण द्यावे, लोकांच्यात राजकीय जागृती करावी आणि राजकीय प्रश्नावर संघटित लोकमत तयार करणे हे मवाळांनी आपले कार्य मानले. आपल्या मागण्या वसाहतवादी शासनाकडे त्यांनी घटनात्मक मार्गानीच मांडल्या.

## २. मागण्यांचा पुनरूच्चार :-

मवाळवादी काँग्रेसने आपल्या मागण्यांचा सतत पुनरुच्चार केला. सन १८८५ च्या मुंबईच्या अधिवेशनात किंवा नंतर ज्या मागण्यांचे निवेदन सरकारला दिले त्या मागण्यांचा पुनरुच्चार मवाळांनी सातत्याने केला. त्यासाठी अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळ पाठविण्यावर त्यांचा भर होता. आपल्या मागण्यांचा सातत्याने पुनरुच्चार करून त्याचा त्यांनी सतत पाठपुरावा केला. या मागण्या प्रामुख्याने कायदे मंडळाचा विस्तार, त्याना जास्तीचे अधिकार, त्यामध्ये भारतीयांना अधिकाधिक प्रतिनिधीत्व, प्रशासकीय सेवेत भारतीयांना जास्तीत जास्त जागा, त्याकरिता असलेली परीक्षा लंडनबरोबर भारतात घेतली जावी अशा प्रकारच्या होत्या.

## ३. टप्प्याटप्प्याने मिळणाऱ्या सुधारणांवर विश्वास :-

मवाळवाद्यांचा टप्याटप्प्याने मिळणाऱ्या सुधारणांवर विश्वास होता. पहिल्यांदा काही सुधारणा मिळाल्यास त्यापेलण्याएवढे आम्ही समर्थ झाल्यास पुढच्या आणखी सुधारणा मिळाव्यात. यामुळे भारतीयांना राजकीय शिक्षण मिळेल व त्यांच्यात राजकीय जागृती होईल. अशी मवाळांची इच्छा होती. मवाळवाद्यांनी स्वराज्याची किंवा स्वशासनाची कधी मागणी केली नाही. मवाळवाद्यांचे ध्येय स्वराज्य नव्हते तर जनतेत राजकीय जागृती करण्याचे होते.

## ४. ब्रिटिश सत्तेशी एकनिष्ठ :-

काँग्रेसचे तत्कालीन मवाळवादी नेते इंग्रजांच्या इतिहासाने व संस्कृतीने अत्यंत प्रभावित झालेले होते. इंग्रजांची भारतातील सत्ता भारतीयांसाठी हितकारक आहे. त्यामुळे इंग्रजांची सत्ता भारतात रहावी व अधिक सदृढ बनावी असे मवाळांचे मत होते. भारतातील इंग्रजी सत्ता शांततेचे व सुव्यवस्थेचे प्रतिक आहे आणि त्यांचे दिर्घकाळ भारतात राहणे आवश्यक आहे ही भावना व्यक्त करताना गोपाळ कृष्ण गोखले म्हणाले होते. ''इंग्रज नोकरशाही कितीही वाईट असो. आज आपल्या टिकवून ठेवण्यात फक्त इंग्रजानांच यश मिळाले आहे आणि व्यवस्थेशिवाय उन्नती शक्य नाही.'' मवाळवाद्यांच्या मतानुसार भारताची उन्नती इंग्रजाच्याच नियंत्रणाखाली होऊ शकते. म्हणून मवाळवादी नेते ब्रिटिश राजपदाला एकनिष्ठ होते. इंग्रजी राज्य कमकुवत होऊ द्यावयाची मवाळांची तयारी नव्हती. ब्रिटिश राजपदाशी एकनिष्ठ राहणे हाच त्यांचा राजकीय धर्म होता.

एकंदरीत या काळातील काँग्रेसची उद्दिष्ट्ये स्पष्ट, संदिग्ध व अंधुक होती. त्यामध्ये स्पष्टता नव्हती. कारण ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या मानसिक खच्चीकरणातून हा मवाळवादी वर्ग अजून बाहरे पडला नव्हता. शिवाय पाठीमागील सरंजामदारीची भिती या मवाळ वर्गाला होती. त्यामुळे भारतीय राज्यकारभार करण्यास आपण समर्थ आहोत कि नाही या मानसिकतेतच मवाळवाद्यांचा सुरूवातीचा

बहुतांशी काळ गेलेला दिसून येतो. या काळातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस बाल्यावस्थेत होती. त्यामुळे तिची उद्दिष्ट्ये सिमित होती. घटनात्मक सनदशीर मार्गाचा अवलंब, घटनात्मक मार्गाची कार्यपध्दती टप्प्याटप्प्याने जाण्यावर विश्वास, घटनात्मक चौकटीत चळवळ करण्यावर भर, ब्रिटिश राजपदाशी एकनिष्ठ, इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर, वार्षिक अधिवेशनावर, भाषणबाजीवर, ठराव संमत करण्यावर आणि इंग्लंडमध्ये शिष्टमंडळ पाठविण्यावर मवाळवाद्यांचा विश्वास होता.

राजकिय कार्यकर्त्यांमध्ये, स्वातंत्र्यप्रेमीमध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे, जनतेमध्ये राजकीय भावना निर्माण करून जात-पात, धर्म बाजूला ठेवून एकत्र येण्याची त्यांची मानसिकता तयार करणे, राजकीय व आर्थिक कार्यक्रमाच्या आधारावर भारतीयांना संघटित करणे ही उद्दिष्ट्ये प्रामुख्याने मवाळवादी काँग्रेसची होती.

## ❑ मवाळवादी काँग्रेसचे कार्य :-

या काळातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रामुख्याने बाल्यावस्थेत होती आणि त्यांची विसारसरणी वसाहतवादी ब्रिटिश सत्तेशी संघर्ष करण्याची नव्हती. मवाळांचे कार्य व राजकीय चळवळ सनदशीर घटनात्मक मार्गाने चालत असे. साहजिकच त्यांच्या राजकीय चळवळीची गती मंद होती.

काँग्रेसचे पहिले अधिवेशन २८ डिसेंबर १८८५ मध्ये मुंबई येथे व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या अधिवेशनात ठरल्याप्रमाणे दरवर्षी २८ डिसेंबरला काँग्रेसचे अधिवेशन देशाच्या वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या व्यक्तींच्या अध्यक्षतेखाली होत राहिले. त्यानुसार काँग्रेसचे दुसरे अधिवेशन दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली २८ डिसेंबर १८८६ मध्ये कलकत्ता येथे पार पडले. या अधिवेशनासाठी ४२६ प्रतिनिधी हजर होते. काँग्रेसचे तिसरे अधिवेशन सर बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली मद्रास येथे १८८७ मध्ये झाले, त्यासाठी ६०७ प्रतिनिधी हजर होते. चौथे अधिवेशन स्कॉटिशव्यापारी जॉर्ज यूल यांच्या अध्यक्षतेखाली अलाहाबाद येथे सन १८८८ मध्ये झाले. या अधिवेशनासाठी १२४८ प्रतिनिधी हजर होते.

मवाळ कालखंडात काँग्रेसची दरवर्षी ठरल्याप्रमाणे अधिवेशने होत गेली. काँग्रेसच्या प्रतिनिधींची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. एकंदरीत या पहिल्या मवाळ कालखंडातील काँग्रेसचे कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १. राजकीय जागृती :-

मवाळवादी कालखंडातील काँग्रेसचे हे फार महत्वाचे कार्य होय. मवाळवादी काँग्रेसने हिंदी जनतेला राजकीयदृष्ट्या जागृत करून त्यांच्यामध्ये राजकीय जागृती केली. भारतीय लोक राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक ऋणानुबंधाने एकमेकांशी बांधलेले आहेत आणि वसाहतवादी शासन हे आपणा

सर्व भारतीयांचे हितशत्रू आहे. ही जाणीव या काळातील काँग्रेसने भारतीय जनतेत निर्माण केली. नागरी स्वातंत्र्य, लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्य, राजकीय हक्क या संकल्पना मवाळांनी जनतेपर्यंत पोहचविल्या आणि त्यातून राजकीय जागृती केली. त्यामुळे आधुनिक राजकारणाचे धडे मिळालेले अनेक राष्ट्रीय कार्यकर्ते या काळात यार झाले. त्यांना राजकीय कल्पनांचा व सिद्धांतांचा परिचय झाला. राष्ट्रीय जाणिवांची भारतीय जनतेत निर्मिती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मवाळांनी केले.

## २. राष्ट्रवादाचा विकास :-

राष्ट्रवादाच्या उदयातूनच काँग्रेसची स्थापना झाली हे खरे असले तरी या काळातील राष्ट्रवाद हा बाल्यावस्थेत होता. मवाळवादी काँग्रेसने हा राष्ट्रवाद विकसित केला. लोकांच्यात राष्ट्रभावना निर्माण करून आपण भारत या एकाच राष्ट्राचे नागरिक आहोत ही भावना सर्व लोकंच्यात निर्माण केली. भारताच्या सर्व कानाकोपऱ्यातून जनतेचे प्रतिनिधी म्हणून आलेले काँग्रेसचे सदस्य एकत्र येऊन जनतेच्या अडीअडचणी, समस्या यावर चर्चा करीत यातून आपण सर्व एक आहोत. आपणा सर्वांच्या समस्या, अडचणी एकच आहेत आणि भारतीयांच्या प्रगतीतील वसाहतवादी शासन हा एकमेव अडसर आहे ही भावना वाढीस लागली. हाच संदेश प्रत्येक जण आपआपल्या देशबांधवांपर्यंत पोहोचवू लागला. यातून हिंदी राष्ट्रवादाचा विकास होऊ लागला. अशा पध्दतीने मवाळांनी राष्ट्रवादाच्या प्रश्नाला भारतीय जीवनाशी जोडले.

## ३. जनतेच्या मागण्या सरकारपुढे मांडल्या :-

भारतीयांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रातील मागण्या मवाळांनी प्रभावीपणे सरकारपुढे मांडल्या. त्यामध्ये प्रशासकीय सुधारणा, न्यायविषयक सुधारणा, शेतीविषयक सुधारणा, वैद्यकीय व आरोग्याविषयक सोयी-सवलती, आर्थिक सुधारणा, औद्योगिक सुधारणा, घटनात्मक सुधारणा यासारख्या जनतेच्या मागण्या सातत्याने सरकारपुढे मांडल्या. त्याचा सातत्याने पाठपुरावा केला. प्रसंगी या मागण्यांच्या पूर्ततेसाठी चळवळी केल्या, सरकारवर दबाव आणला. यातील काही मागण्या सरकारने मान्यही केल्या.

## ४. परदेशातील भारतीयांच्या समस्यांकडे लक्ष :-

ब्रिटिशांच्या वसाहती सर्व जगभर पसरल्या होत्या. त्या वसाहतींमध्ये भारतीयांना मजूर म्हणून भारतीय शासनाने पाठविले होते. परंतु तेथे भारतीयांना तुच्छतेची वागणूक मिळत असे. भारतीयांवर अन्याय-अत्याचार केले जात. विशेषत: दक्षिण आफ्रिकेमध्ये हिंदी लोकांना काळे म्हणून हिणवले जात. साहजिकच काँग्रेसने परदेशातील आपल्या देशबांधवावरील अन्याय दूर करण्याकडे लक्ष दिले. काँग्रेसच्या अधिवेशनात तसे ठराव पास करून सरकारचे त्या प्रश्नाकडे लक्ष वेधले.

## ५. काँग्रेसचे इंग्लंडमधील कार्य :-

भारतातील धोरणात्मक निर्णय हे ब्रिटिश पार्लमेंटमध्ये होत असल्याने इंग्लंडमध्ये हिंदी सुधारणांसाठी अनुकूल जनमत बनविण्यासाठी आणि भारतीयांच्या समस्यांकडे इंग्लंडमधील लोकांचे लक्ष वेधण्याची गरज होती. त्यासाठी काँग्रेसने जाणीवपूर्वक इंग्लंडमध्ये कार्य केले. सन १८८७ मध्ये दादाभाई नौरोजींनी इंग्लंडमध्ये 'इंडियन रिफॉर्म असोसिएशन' नावाची संघटना स्थापना केली. सन १८८९ मध्ये 'ब्रिटीश कमिटी ऑफ दि इंडियन नॅशनल काँग्रेस' (British Committee of the India National Congress) नावाची काँग्रेसची शाखा इंग्लंडमध्ये काढण्यात आली. यामार्फत सभा, पत्रके, लिखाण यामार्गाने भारतीय मागण्यांबाबत इंग्लंडमधील जनतेला माहिती दिली. इंग्लंडमध्ये 'इंडिया' (India) नावाचे मासिक सुरू करून त्यातून भारतातील सत्य परिस्थिती इंग्लंडमधील जनतेसमोर मांडली. सन १८९३ मध्ये ब्रिटिश संसदेत इंडियन पार्लमेंटरी कमिटी स्थापन करण्यात आली. यामध्ये अनेक ब्रिटिश संसद सदस्य सभासद होते. शिवाय काँग्रेसने हिंदी लोकांची वेळोवेळी शिष्टमंडळे इंग्लंडला पाठवून हिंदी जनतेच्या प्रश्नांकडे ब्रिटिश संसदेचे लक्ष वेधण्याचे कार्य केले.

## ६. भारतमंत्र्याचे कार्यालय :-

सन १८५८ च्या कायद्याने कंपनीच्या भारतातील सत्तेचा शेवट होऊन भारताचा राज्यकारभार ब्रिटिश संसदेकडे आला. ब्रिटिश संसदेने त्यासाठी भारतमंत्री व त्याच्या मदतीला १५ सदस्यांचे एक 'भारतमंडळ' इंग्लंडमध्ये निर्माण केले आणि त्या सर्वांचा पगार भारतीय तिजोरीतून देण्याची तरतूद केली. तो खर्च जवळपास दरसाल ३५ लाख रुपये होता. ब्रिटिशांच्या अन्य वसाहतींसाठीही वसाहतमंत्री असत व त्यांचा खर्च ब्रिटिश संसदेकडून भागविला जात असे. तशाच प्रकारचा खर्च भारतमंत्री व त्याच्या कार्यालयावर ब्रिटिश संसदेने करावा अशी मागणी काँग्रेसने केली व तसा ठराव पहिल्याच अधिवेशनात काँग्रेसने केला. त्याचा पाठपुरावा काँग्रेस सतत करित राहिली.

## ७. भारतीयांची प्रशासकीय पात्रता सिद्ध केली :-

भारतीय लोक अज्ञानी असून त्यांना जबाबदार राज्यकारभार करता येणार नाही. असा समाज इंग्रजांनी भारतीयांमध्ये निर्माण केलाहोता. त्या समाजात तडा देऊन काँग्रेसने आपल्या कामगिरीतून प्रशासकीय पात्रता सिद्ध केली. मुळात काँग्रेसची कार्यपद्धती लोकशाही मार्गाने चालत होती. सन १८९२ चाकायदा राबविताना काँग्रेसने हे दाखवून दिले की, तो हिंदी लोकांची प्रतिनिधीत्वाची गरज भागवू शकत नाही. काँग्रेस नेत्यांनी अभ्यासपूर्ण माहिती मिळवून राज्यकर्त्यांवर टिकास्त्र सोडले, राज्यकर्त्यांचे दोष चव्हाट्यावर मांडले आणि भारतीयांची कार्यक्षमता दाखवून दिली.

## ८. राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी :-

मवाळवादी काँग्रेसने राष्ट्रीय चळवळीच्या पायाभरणीचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी भारतीयांमध्ये राजकीय जागृती केली. भारतातील खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचा संबंध इंग्रजांनी चालविलेल्या आर्थिक शोषणाशी जोडला आणि हे सर्व वसाहतवादी धोरणामुळेच होत असल्याचे सप्रमाण दाखवून दिले. भारतातील बहुतांशी मोठ्या शहरामध्ये काँग्रेसची अधिवेशने घेऊन व काँग्रेसच्या संघटनेचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरवून राष्ट्रीय चळवळीच्या गरजेची भारतीयांना जाणीव करून दिली. त्यामुळे राजकारणात व राजकीय साधने वापरण्यात जरी ते मवाळ असले तरी वस्तुस्थितीचे राजकीय व आर्थिक स्वरूप कसे विदारक आहे हे त्यांनी दाखवून राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी केली.

## ९. आर्थिक राष्ट्रवाद :-

मवाळवादी काँग्रेसने भारतातील खालावलेल्या आर्थिक स्थितीचे विवेचन केले. भारताच्या अधोगतीला वसाहतवादी शासनाची धोरणेच कारणीभूत असल्याचे दाखवून दिले. मवाळांनी वसाहतवादी शासनाची जाणीव जनतेमध्ये निर्माण करून आर्थिक राष्ट्रवादाची समिक्षा केली. दादाभाई नौरोजी, न्या. रानडे यांनी आर्थिक दृष्टीकोनातून भारताच्या अधोगतीची कारणमिमांसा केली. दादाभाई नौरोजींनी संपत्तीवहनाचा सिद्धांत मांडून आर्थिक राष्ट्रवादाला तात्वीक आधार दिला. महत्त्वाचे म्हणजे भारतीय दारिद्र्याची सांगड वसाहतवादी धोरणांशी घालून भारतीय दारिद्र्य हे वसाहतवादी धोरणाचे प्रतिक असल्याचे म्हटले.

वरीलप्रमाणे मवाळ कालखंडात काँग्रेसने कार्य केले. या काळात काँग्रेस बाल्यावस्थेत होती. राष्ट्रवादाचा विकास होत होता. राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी होत होती. अशा काळात मवाळ कालखडातील काँग्रेसच्या कार्याला कमी लेखून चालणार नाही.

## ❑ काँग्रेसप्रती सरकारी रोख :-

ब्रिटिशांप्रती राजनिष्ठ राहून आणि मवाळ मार्गाचे अनुकरून करूनही काँग्रेसच्या मागण्यांना सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. सन १८८८ नंतर सरकारने काँग्रेसविरोधी भूमिका घेण्यास सुरूवात केली. काँग्रेसला राष्ट्रीय मानावयास किंवा काँग्रेस सर्व भारतीय जनतेचे प्रतिनिधीत्व करते म्हणून मानावयासच नकार दिला. लॉर्ड डफरीनने म्हटले. काँग्रेस केवळ संकुचित अल्पसंखी असलेल्यांचे प्रतिनिधीत्व करते.' (A microscopic minority of the people) काँग्रेसच्या मागण्यांना लॉर्ड अंधारातील उडी असे नाव दिले. (Congress demands as 'big jump into the unknown) सन १८९० मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांवर काँग्रेसमध्ये भाग न घेण्याचे बंधन घालण्यात आले. कर्झनची मजल

तर असे म्हणण्यापर्यंत गेली की, काँग्रेस आपल्या विनाशाकडे पडत-झडत जात आहे. शिवाय तो काँग्रेसच्या चळवळीला हवेचे बुडबुडे' (Jetting of gas) म्हणत असे.

## ❑ मवाळ काँग्रेसचे मूल्यमापन :-

मवाळांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जवळपास २० वर्षे कार्यरत होती. या काळातील मवाळांच्या कार्याचे मूल्यमापन करताना त्यामध्ये अनेक गुण-दोष दाखविले जातात. विशेषत: २० व्या शतकाच्या प्रारंभी जहालांनी काँग्रेसच्या मवाळ धोरणांवर व त्यांच्या कामगिरीवर टिका केली. त्यांनी जुन्या नेत्यांच्या धोरणाला 'राजकीय भिक्षा वृत्ती' असे म्हटले, त्याला लजपतरायने 'संधिसाधू चळवळ' असे काँग्रेसचे वर्णन केले आणि त्याला पुस्ती जोडली कि, यामुळे ढोंगीपणाला व देशद्रोहाला जास्तीत जास्त चालना मिळाली. काही लोकांना तर देशभक्तीचा व्यापार कऱ्याची संधी मिळाली. महात्मा फुलेंनी काँग्रेसवर आरोप करताना म्हटले, जोपर्यंत काँग्रेसचे नेते महार, मांग आणि शेतकरी यांच्या हिताची कळकळ बाळगत नाहीत तोपर्यंत राष्ट्रीय सभा ही खऱ्या अर्थाने राष्ट्रीय होऊ शकत नाही, एकमत होऊ शकत नाही.

मवाळांविरुध्दचा सर्वात मोठा आरोप 'ब्रिटिश राजपदाशी एकनिष्ठ' असणे हा होता. मवाळांचे असे समर्थन होते कि, भारतात अजून राष्ट्रवाद विकसित झालेला नाही. भारत हे राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेत आहे. हे सर्व आरोप होण्यापाठीमागे सर्वात महत्त्वाचे म्हणजे मवाळांच्या हातून कोणतेही भरीव असे कार्य झाले नाही. त्यामुळेच तर लोकमान्य टिळकांनी काँग्रेसला 'बेडकांच्या ओरडण्याची' उपमा दिली.

हे जरी खरे असले तरी राष्ट्रीय काँग्रेसने जी उद्दिष्ट्ये समोर ठेवली होती ती कितपत यशस्वी झाली, यावरून सुरूवातीच्या मवाळ काँग्रेसचे यशापयश मोजता येईल. सन १८८५ मध्ये अवघ्या ७२ प्रतिनिधींच्या सहाय्याने लहान प्रमाणात सुरू झालेल्या काँग्रेसचे रूपांतर पुढे २० व्या शतकात एका विशाल लोकप्रिय आंदोलनात झाले. त्याची पायाभरणी मवाळवादी काळातच झालेली दिसून येते. काँग्रेसच्या सुरूवातीच्या काळातील मवाळ नेते पराकोटीचे राष्ट्रवादी होते. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा, गोवाळकृष्ण गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे लोक समकालीन भारतीय समाजातीत सर्वात प्रगतीशील आणि खरे देशभक्त होते. त्यांनी काँग्रेसला लोकप्रियता मिळवून देण्यासाठी परिश्रम घेतले. सुरूवातीला घटनात्मक मार्गाचा अवलंब केला व अतिरेकी जहाल मार्गाकडे दुर्लक्ष केले. ज्यामुळे काँग्रेस याकाळात जिवंत राहू शकली आणि आपली संघटनात्मक बांधणी तळागाळापर्यंत करू शकली. तसेच पुढील काळातील व्यापक चळवळीसाठी राष्ट्रवादाची पायाभरणी करू शकली.

मवाळ गटाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी भारतीय समाजात राजकीय जागृती करून त्यांच्यात राजकीय जाणिवा निर्माण करून राष्ट्रवादाचा विकास केला. वसाहतवादी शासनाचे शोषक स्वरूप जनतेसमोर मांडटून वसाहतवादाच्या मुळावरच घाव घातला त्यासाठी त्यांनी आर्थिक राष्ट्रवादाची

मांडणी करून भारताच्या दारिद्र्याचे प्रमुख कारण वसाहतवादी शासन असल्याचे सप्रमाण दाखवून दिले. भारताचे दारिद्र्य हे ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाचा परिणाम असल्याचे सप्रमाण दाखवून देऊन वसाहतवादी व्यवस्थेच्या मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न केला.

**✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ✻**

❑ **योग्य पर्याय निवडा.**

१. सन १८८६ मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसचे दुसरे अधिवेशन ............... यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

*(अ) व्योमेशचंद्र बॅनर्जी* *(ब) बद्रुद्दीन तय्यबजी*

*(क) दादाभाई नौरोजी* *(ड) गोपाळ कृष्ण गोखले.*

२. सन १८८८ मध्ये ............... येथे काँग्रेसचे चौथे अधिवेशन स्कॉटिश व्यापारी जॉर्ज यूल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

*(अ) कलकत्ता* *(ब) मद्रास* *(क) अलाहाबाद* *(ड) दिल्ली.*

३. सन १८८७ मध्ये ............. यांनी इंग्लंडमध्ये 'इंडियन रिफॉर्म असोसिएशन' नावाची संघटना स्थापन केली.

*(अ) गोपाळ कृष्ण गोखले* *(ब) लोकमान्य टिळक*

*(क) दादाभाई नौरोजी* *(ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी.*

४. काँग्रेसने इंग्लंडमध्ये .................. नावाचे मासिक सुरू केले.

*(अ) इंडिया* *(ब) इंडियन मिरर* *(क) बेंगाल गॅझेट* *(ड) हिंदू पेट्रीयट.*

५. दादाभाई नौरोजींनी ............... सिद्धांत मांडला.

*(अ) खंड वहनाचा* *(ब) संपत्ती वहनाचा*

*(क) खुल्या व्यापाराचा* *(ड) मुक्त व्यापारी धोरणाचा.*

## १.२.३ जहालमतवाद्यांचे योगदान (स्वदेशी चळवळ आणि होमरूल चळवळ) (Contribution of Extremists [Swadeshi Movement and Home Rule Movement) :-

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जोम आला असला तरी ज्या संथ गतीने चळवळ सुरू होती. त्यातून भरीव असे काही निर्माण होण्याची शक्यता धूसर होत चालली

होती. कॉंग्रेसमधील मवाळ नेत्यांकडून ज्या सनदशीर मार्गाने आपल्या मागण्या सरकारपुढे मांडल्या जात होत्या आणि सरकारकडून त्या न्याय मागण्यांना केराची टोपली दाखविली जात होती. त्यामुळे कॉंग्रेसमधील उत्साही व तरुण कार्यकर्त्यांमध्ये कॉंग्रेसच्या नेतृत्त्वाबद्दल नैराश्येचे वातावरण निर्माण होऊ लागले. त्यांनी कॉंग्रेसच्या ध्येय धोरणावर टिका करण्यास सुरूवात केली. ब्रिटिशांची नितीच मुळात वसाहतवादी शोषक स्वरूपाची असल्याने त्यांच्याकडे अर्जविनंत्याच्या सनदशीर मार्गाने मागण्या करून काहीच मिळणार नाही. त्यासाठी नि:शस्त्र प्रतिकाराची उग्र चळवळ सुरू करून सरकारवर दबाव आणावा अशा विचारांचा तरुणांचा गट राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये १९व्या शतकाच्या शेवटी निर्माण झाला. त्याचा परिपाक म्हणजे राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये जहालवादाचा उदय झाला. दुसरी एक प्रतिक्रिया क्रांतीकारी चळवळीची होती. जुलमी इंग्रज अधिकारी व नोकरांना वठणीवर आणण्यासाठी आणि ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी शस्त्रांचा अवलंब केला पाहिजे. दडपशाहीला दहशतीने उत्तर दिले पाहिजे, असे या क्रांतीकारकांना वाटत होते. या दोन्ही विचारसरणीचे गट जहालवादीच होते. पण त्यांच्या साधनांत फरक होता. राष्ट्रीय कॉंग्रेसमधील जहालवाद्यांनी नि:शस्त्र प्रतिकाराचा अवलंब केला. या जहाल विचारसरणीस 'नवराष्ट्रवाद' असेही म्हणतात.

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचे बोट धरून त्यांच्या कलाने भारताची प्रगती करू इच्छिणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांच्या गटाला मवाळ तर भारताच्या प्रगतीसाठी स्वावलंबनाचा, आत्मनिर्भरतेचा व जनजागृतीच्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या राष्ट्रवादी गटाला जहाल म्हटले जाऊ लागले.

जहालमतवादाच्या उदयाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. ब्रिटिश सत्तेचे शोषणकारी स्वरूप भारतीयांनी ओळखल्यामुळे.
२. ब्रिटिशांनी चालविलेली भारताची आर्थिक पिळवणूक व त्यामुळे बिघडलेली भारताची आर्थिक स्थिती लक्षात आल्यामुळे.
३. १८९२ च्या कायद्याने भारतीयांनी केलेल्या निराशामुळे.
४. सरकारने नैसर्गिक संकटाकडे केलेले दुर्लक्ष आणि त्यामुळे भारतीयांच्या झालेल्या वाताहातीमुळे.
५. वाढत्या पाश्चात्यीकरणामुळे भारतीयांच्यामध्ये निर्माण झालेल्या असंतोषामुळे.
६. मवाळ कॉंग्रेसच्या कामगिरीवर लोकांच्या नाराजीमुळे.
७. सामाजिक व धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीने निर्माण केलेल्या जागृतीमुळे.
८. तत्कालीन आंतरराष्ट्रीय घटनांच्या प्रभावामुळे.
९. लॉर्ड कर्झनच्या प्रतिगामी धोरणाने निर्माण झालेल्या असंतोषामुळे.

१०. बंगालच्या फाळणीने फोफावलेल्या राष्ट्रवादामुळे.

११. लाल-बाल-पाल यांच्या नेतृत्वामुळे.

वरील वेगवेगळ्या कारणांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये जहालमतवादाचा उदय झाला.

## ❑ जहालांची कार्यपध्दती व तत्वज्ञान :-

राष्ट्रीय काँग्रेसमधील जहाल व मवाळ या दोन्ही गटाचे मार्ग व कार्यपध्दती भिन्न-भिन्न होत्या. मवाळ गट घटनात्मक चौकटीत चळवळ करण्यावर, इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर, वार्षिक अधिवेशनावर, भाषणबाजीवर, ठराव संमत करण्यावर आणि इंग्लंडमध्ये शिष्टमंडळे पाठविण्यावर विश्वास ठेवणारा होता. पण ह्या सर्व मार्गावर जहालवाद्यांचा विश्वास नव्हता. अहिंसात्मक प्रतिरोध, सामूहिक चळवळ, आत्मत्यागाची प्रखर भावना, ह्यावर जहालांचा विश्वास होता.

स्वराज्य, स्वदेशी मालाचा अवलंब, विदेशी मालावर बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि सत्याग्रह, असहकार हा जहालांचा कार्यक्रम होता. लोकमान्य टिळकांनी **'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळविणारच'** (Swaraj is my birthright and I shall have it.) असे म्हणून जहाल विचारांना एक नवी दिशा दिली.

या काळातील राष्ट्रीय काँग्रेस प्रौढ झाली होती, तिच्या सीमा, उद्देश विस्तृत झाल्या होत्या. तसेच कार्यक्षेत्रही व्यापक झाले होते. लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल, लाला लजपतराय आणि अरविंद घोष हे काँग्रेसमध्ये नव्याने उभारलेल्या जहालवादी गटाचे नेतृत्व करीत होते.

## ❑ स्वदेशी चळवळ (Swadeshi Movement) :-

स्वदेशीचा अर्थ 'आपल्या देशातील' किंवा 'स्वत:च्या देशातील'. दुसऱ्या शब्दात भारतीयांनी आपल्या देशात तयार झालेल्या वस्तूंचा वापर करावा यासाठी सुरू केलेली चळवळ म्हणजे स्वदेशी चळवळ होय. विशेषत: बंगालच्या फाळणीविरोधी केवळ बंगालमध्येच नव्हे तर संपूर्ण देशभरामध्ये जी चळवळ चालविली गेली त्या चळवळीला स्वदेशी चळवळ असे म्हणतात. तसेच तिला 'वंदे मातरम्' चळवळ म्हणूनही ओळखले जाते.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून या चळवळीकडे पाहिले जाते. या चळवळींचा प्रमुख उद्देश स्वदेशी वस्तूंचा वापर करणे आणि परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालणे. म्हणजेच भारतात तयार झालेल्या मालाचा अधिकाधिक वापर करणे आणि इंग्लंडमध्ये तयार झालेल्या मालावर बहिष्कार घालून साम्राज्यवादी व्यवस्थेच्या मुळावरच घाव घालून ब्रिटिशांनी आर्थिक हानी करण्याचा, त्याचवेळी भारतामध्ये अधिकाधिक रोजगारनिर्मिती करण्याचा प्रमुख उद्देश होता. वसाहतवादी

शासनाला संपूर्णपणे उखडून टाकून स्वयंपूर्ण आर्थिक व्यवस्थेच्या विकासासाठी वापरले गेलेले ते एक साधन होते.

२०व्या शतकाच्या सुरूवातीलाच सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीमुळे राष्ट्रीय चळवळीने फार मोठी मजल मारली. या चळवळीत प्रथमच स्त्रिया, विद्यार्थी तसेच संपूर्ण देशभरातील शहरी व ग्रामीण जनता फार मोठ्या संख्येने राजकारणात आली. राष्ट्रीय चळवळीतील बहुतेक सर्व प्रवाह या चळवळीच्या उदरातूनच पुढे आले. या चळवळीची व्याप्ती राजकारणापुरतीच मर्यादित नव्हती. कला, वाङ्मय, संगीत, विज्ञान व उद्योगधंदे या क्षेत्रांतही एक नवे पर्व सुरू झाले.

## ❑ स्वदेशीचा इतिहास :-

वास्तविक आधुनिक काळातील भारतातील स्वदेशीचा इतिहास बंगालच्या फाळणीपूर्वीचा आहे. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी सन १८४९ साली स्वदेशी व बहिष्काराची उपयुक्तता सांगितली होती. त्यांनी विलायती मालाच्या बहिष्काराचा आणि स्वदेशीचा पुरस्कार केला होता. सन १८७२ मध्ये बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी स्वदेशीचा नारा दिला होता. सन १८७१-७२ च्या सुमारास शिख नामधारी पंथाने एक क्रांतीकारी चळवळ चालू केली. त्या पंथाचे बाबा रामसिंग कुका हे फक्त भारतात तयार झालेल्या कपड्यांचाच वापर करित आणि परकीय वस्तूंवर बहिष्कार घालत. एवढेच नव्हे तर त्यांनी ब्रिटिशांची भारतातील व्यवस्थाच नाकारली होती. यानंतर १८७४ मध्ये शंभुचंद्र मुखोपाध्याय यांनीही स्वदेशीचा उल्लेख केला होता.

ब्रिटिश राजवटीमुळे आपल्या देशाची होणारी आर्थिक पिळवणूक व परिणामांचा अभ्यास करून त्यादृष्टीने स्वदेशीला अनुकूल अशी पार्श्वभूमी तयार करण्याचे मोलाचे कार्य दादाभाई नौरोजींनी केले. यासारखीच जनजागृती न्या. रानडे यांनी केली होती. स्वदेशीचे महत्त्व लोकांना प्रत्यक्ष आपल्या कृतीतून दाखवून देण्याचे मोठे कार्य न्या. रानडे यांचे सहकारी गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांनी केले. ते स्वत: काढलेल्या सुताची खादी नेहमी वापरत असत. लोकमान्य टिळकांनी १९व्या शतकाच्या शेवटी स्वदेशीचे महत्त्व सांगून त्यांनी लोकांमध्ये जागृतीही केली. पुढे त्यांनी 'चतु:सूत्री'ची घोषणा केली.

## ❑ स्वदेशी चळवळीची सुरूवात :-

बंगालच्या फाळणीपूर्वी स्वदेशी चळवळीची पार्श्वभूमी तयार झालेली होती. बंगालच्या फाळणीमुळे भारतातील जनतेमध्ये निर्माण झालेल्या असंतोषामुळे स्वदेशी चळवळीला लोकप्रियता मिळाली. एप्रिल, १९०६ मध्ये बारिसाल येथे झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या परिषदेचे अध्यक्ष अब्दुल रसूल म्हणाले, ''आपल्याला पन्नास किंवा शंभर वर्षात शक्य झाले नसते ते बंगालच्या फाळणीच्या संकटाने सहा

महिन्यात घडवून दाखविले. स्वदेशीची चळवळ म्हणून ओळखली जाणारी राष्ट्रीय चळवळ तिची फलश्रुती आहे.'' ७ ऑगस्ट १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीविरोधी कलकत्यातील टाऊन हॉलमध्ये झालेल्या विशाल सभेमध्ये स्वदेशी चळवळीचा प्रारंभ करण्याची घोषणा करण्यात आली.

लोकमान्य टिळकांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही चतु:सूत्री सांगितली. त्यापैकी स्वदेशी आणि बहिष्कार हे दोन मार्ग किंवा चळवळी परस्परपूरक असून एकमेकांवर अवलंबून होत्या. उदा. स्वदेशीचा पुरस्कार करणे म्हणजे परदेशी मालावर बहिष्कार घालणे होय.

## ❑ स्वदेशी चळवळीचा प्रसार :-

बंगालच्या फाळणीमुळे स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीला जोम आला. स्वदेशी मालाचा वापर व परदेशी मालावर बहिष्कार हा संदेश बंगालबरोबरच देशाच्या अन्य भागात पोहोचला. लोकमान्य टिळकांनी ही चळवळ संपूर्ण देशात विशेषत: महाराष्ट्रात नेली. लाला लजपतराय व अजित सिंह यांनी ती पंजाब प्रांतात व उत्तर भारतात नेली. चिदंम्बरम् पिलाई यांनी ती मद्रास प्रांतात नेली. दिल्लीतील स्वदेशी चळवळीचे नेतृत्व सैय्यद हैदर रजा यांनी केले. रावळपिंडी, कांगडा, जम्मू, मुलतान, हरद्वार इत्यादी शहरांतही ही चळवळ सक्रिय होती. बिपिनचंद्र पाल यांनी देशभर दौरे काढून स्वदेशी चळवळीचा प्रचार-प्रसार केला. त्यामुळे स्वदेशी चळवळ अधिकच फोफावली. संयुक्त प्रांत. पंजाब, मुंबई, मद्रास व मध्य प्रांतात या चळवळीने मूळ धरल्याचे उल्लेख तत्कालीन शासकीय अहवालात मिळतात.

## ❑ स्वदेशी चळवळीची वाटचाल :-

बंगालबरोबरच देशातील सर्व भागामध्ये शहरांमध्ये हजारो जाहीर सभांमधून स्वदेशीचा संदेश देण्यात आला. हा संदेश दुहेरी स्वरूपाचा होता. एका बाजूने सर्व परदेशी मालांची सार्वजनिक होळी करावयाची, परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालावयाचा, अशा वस्तू विकणाऱ्या दुकानांवर निदर्शने करावयाची. तर दुसरीकडे स्वदेशीचा वापर करावयाचा, सर्वांनी स्वदेशी वस्तूच वापरावयाच्या, स्वदेशी मालाच्या उत्पादनाला व विक्रीला उत्तेजन द्यावयाचे असे या चळवळीचे स्वरूप होते.

देशभर या चळवळीला उत्तम प्रतिसाद मिळाला. स्वदेशात बनविलेले कापड व इतर वस्तू वापरण्यास अनेकांनी सुरूवात केली, त्याचवेळी परदेशी मालाची होळी करण्यात आली. खाद्यवस्तू तयार करणाऱ्या धंदेवाईकांनी विलायती साखर न वापरण्याची प्रतिज्ञा केली. या चळवळीचे पडसाद एवढ्या दूरवर पसरले की, परिट लोकांनी विलायती कपडे धुणे बंद केले. महाराष्ट्र व बंगालमधील स्त्रियांनी विलायती बांगड्या व काचेच्या वस्तू वापरणे बंद केले. विद्यार्थ्यांनी विलायती कागद वापरण्यावर बहिष्कार घातला. वकिल, डॉक्टरांनी विलायती माल विकणाऱ्या अशिलांना थारा देण्याचे नाकारले. अनेक ठिकाणच्या व्यापाऱ्यांनी परदेशी कापड विकण्याचे स्वखुशीने बंद केले.

या स्वदेशी चळवळीमुळे अनेक स्वदेशी उद्योगधंद्यांना, ग्रामोद्योगांना चालना मिळाली. ठिकठिकाणी स्वदेशी कापडगिरण्या, आगपेट्या, साबणाचे कारखाने उभे राहिले. उदा. आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांनी 'बंगाल रासायनिक स्वदेशी वस्तू भांडार' सुरू केले. गुरूदेव रविंद्रनाथ टागोरांनी एक स्वदेशी वस्तू भांडार सुरू करण्यास मदत केली. जमसेदपूरच्या टाटा आयर्न ॲण्ड स्टिल कंपनीच्या पोलाद कारखान्याचे सगळे भांडवल अल्पावधीतच लोकांनी उभे केले. मोठ्या व्यापाऱ्यांनी, जमीनदारांनी भांडवल उभे करून बँका व विमा कंपन्या काढल्या. मद्रास प्रांतात कोरोमंडल किनाऱ्यावर तुतिकोरीन येथे चिदंम्बरम् पिलाई यांनी स्वदेशी जहाज वाहतूक कंपनी स्थापन केली.

लोकमान्य टिळकांनी स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीला व्यापक स्वरूप दिले. बंगालच्या बाहेरही ही चळवळ नेण्याचे व्यापक कार्य जहालमतवाद्यांनी केले. लोकमान्य टिळक म्हणतात, ''आमच्यातील संघशक्ती एकवटून बहिष्कारासारख्या तीव्र चळवळींनी राज्यकर्त्यांची धुंदी उतरविल्याशिवाय हिंदी जनतेला आता अन्य पर्याय नाही.'' स्वदेशी व बहिष्काराची चळवळ लोकमान्य टिळकांनी पश्चिम भारतात लोकप्रिय केली. पुण्याला विलायती कापडाची जंगी होळी करण्यात आली. स्वदेशी वस्तू प्रचारिणी सभा या संस्थेचे प्रमुख या नात्याने त्यांनी एक सहकारी भांडार काढले. माफक दरात धोतरे पुरविण्याविषयी त्यांनी मुंबईच्या गिरणी मालकांना विनंती केली. त्यांनी पुण्यात एक स्वदेशी विणाई कंपनी सुरू केली. परदेशी मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनाखाली हुतात्मा झालेल्या महाराष्ट्रातील बाबू गेणूची घटना इतिहासात प्रसिद्ध आहे.

लाला लजपतराय आणि अजितसिंह यांनी पंजाब प्रांतात आणि उत्तर भारतात स्वदेशीची चळवळ मोठ्या हिरीरीने पसरविली. पंजाबात परदेशी साखरेवर बहिष्कार टाकण्यात आला. रावळपिंडीच्या व्यापाऱ्यांनी विलायती साखर न विकण्याची प्रतिज्ञा केली. स्वदेशी व बहिष्काराची ही चळवळ पुढे सर्व देशभर पसरली. हरिद्वार, दिल्ली, कांगडा व जम्मू येथे ही चळवळ विस्तारली. दिल्ली, मद्रास प्रांतातही या चळवळीने जोर धरला.

### ❑ राष्ट्रीय शिक्षणाचा आग्रह :-

राष्ट्रीय पद्धतीचे शिक्षण हा राष्ट्रीय चळवळीचा गाभा होता. वसाहतवादी राजवटीत भारतीयांना मिळणारे शिक्षण हे राष्ट्रीय वृत्तीचा अभाव असलेले आणि कारकून बनविण्याच्या लायकीचे असल्याने राष्ट्रीय नेत्यांची खात्री होती. भारतीयांनी संशोधक, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ व उद्योगपती बनावे असे शिक्षणात काही नव्हते. तेव्हा समाजसेवकांनी सरकारी अनुदान मिळविणाऱ्या शाळा न काढता हायस्कूल, महाविद्यालये काढावीत आणि देश औद्योगिक व वैज्ञानिकदृष्ट्या प्रगत होईल असे शिक्षण द्यावे असे लोकमान्य टिळकांचे म्हणणे होते. भारतीय युवकांमध्ये राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्याचे साधन म्हणून लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला. 'जैन' या इंग्रजी पत्राचे संपादक सतीशचंद्र मुखर्जी

यांनी सन १८९८ साली राष्ट्रीय शिक्षणाची योजना तयार केली होती. सरकारी शाळांमधून राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय वृत्ती निर्माण करणारे करणारे शिक्षण दिले जात नाही, असे लोकमान्य टिळकांचे मत होते. तेव्हा सामाजिक कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय शिक्षण संस्था सुरू करून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण द्यावे असे आवाहन त्यांनी केले. रविंद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतनची स्थापना करून राष्ट्रीय शिक्षणाचा मार्ग आखून दिला. सन १९०६ मध्ये 'बंगाल राष्ट्रीय कॉलेज'ची स्थापना बंगालमध्ये झाली. अरविंदबाबू हे त्याचे पहिले प्राचार्य झाले. या कॉलेजच्या अभ्यासात विज्ञान व तंत्रज्ञानाला स्थान देण्यात आले. शिवाय भारतीय भाषांचा अभ्यासावर भर दिला होता. सुरेंद्रनाथ बॅनर्जीनीही काही शैक्षणिक संस्था प्रस्थापित केल्या होत्या.

पुण्यामध्ये चिपळूणकर, आगरकर व लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा प्रारंभ केला होता. मुंबई, पुण्यात लोकमान्य टिळक, शि. म. परांजपे, केतकर व विष्णू गोविंद विजापूरकर यांनी, पंजाब प्रांतात गोपाळराव गंगाराम, पंडित चंद्रिकादत्त, मुन्शीराम व लाला लजपतराय आणि आर्य समाजाने; मद्रासमध्ये सुब्रह्मण्यम अय्यर व पी. आनंदचार्लू इत्यादींनी लोकवर्गणी गोळा करून राष्ट्रीय शिक्षणसंस्था उभ्या केल्या. वंगभंग चळवळीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्यासाठी बंगालमध्ये अवघ्या तीन वर्षात ३०० प्राथमिक व २५ माध्यमिक राष्ट्रीय शाळा सुरू केल्या. अशा तऱ्हेने सर्वत्र राष्ट्रीय शिक्षण संस्थांची उभारणी होऊ लागली.

## ❑ स्वराज्याचे उद्दिष्ट जाहीर :-

स्वराज्य म्हणजे आपले राज्य प्रजेच्या प्रतिनिधीमार्फत चालविले जाणारे राज्य ते 'स्वराज्य'. स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या साधनांचा अवलंब करून स्वराज्याची प्राप्ती करणे अशी टिळकांची राष्ट्रीय योजना होती.

इ.स.१९०५ मध्ये गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली बनारस/वाराणसी येथे भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात राष्ट्रीय काँग्रेसने बंगालमधील स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीला पाठिंबा दिला. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष यासारख्या जहाल राष्ट्रवादी नेत्यांना स्वदेशीची चळवळ देशभर पसरावी आणि स्वदेशी व बहिष्कार यापेक्षाही तिचे स्वरूप अधिक व्यापक करून तिला एका राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप द्यावे, असे वाटत होते. परंतु तत्कालीन काळात स्वराज्याची व्यापक चळवळ हाती घेण्याची मवाळांचे वर्चस्व असलेल्या राष्ट्रीय काँग्रेसची तयारी नव्हती. तथापि, इ. स. १९०६ मध्ये दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसने टिळकांची चतु:सूत्री स्विकारून ''इंग्लंड किंवा वसाहतीप्रमाणे स्वयंशासन किंवा स्वराज्य. हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ध्येय आहे.'' असे दादाभाई नौरोजींनी जाहीर केले. अर्थातच स्वराज्य हे काँग्रेसचे उद्दिष्ट जाहिर झाले.

## ❑ जनसंघटनांचा प्रभावी वापर :-

स्वदेशी व बहिष्कार चळवळीमध्ये जनतेला संघटित करून तिच्या भावना व्यक्त करण्यासाठी सार्वजनिक सभा व मिरवणूका ही प्रभावी साधने बनली. देशभरातील मोठमोठ्या शहराप्रमाणेच खेडेगावातूनही भरविण्यात आलेल्या अनेक सभा, मिरवणूका यातून स्वदेशीची भावना लोकांमध्ये खोल रूजली असल्याची प्रचिती आली. स्वदेशी चळवळीच्या प्रसाराचे एक साधन म्हणूनही या सभा-मिरवणूकांचा उपयोग झाला.

स्वयंसेवक दल किंवा समिती या जनसंघटनाच्या मार्गाचा स्वदेशी चळवळीत प्रभावी वापर करण्यात आला. या समित्यांमार्फत लोकांना संघटित करून त्यांच्यात चित्रफिती, भाषणे आणि गीते यांच्या माध्यमातून स्वदेशीचा संदेश खेडोपाडी पोहचविला. या समित्यांनी अनेक लोकोपयोगी कामे करून न्यायपंचायतीदेखील चालविल्या.

स्वदेशी चळवळ जनतेपर्यंत पोहचवण्याचे एक साधन म्हणून उत्सव व मेळे यांचा सृजनात्मक वापर करण्यात आला. लोकमान्य टिळकांनी लोकप्रिय केलेल्या शिवजयंती व गणेशोत्सवाचा बंगालमध्ये स्वदेशी चळवळीचा प्रसार करण्यासाठी उपयोग झाला. जत्रेसारख्या पारंपारिक सांस्कृतिक प्रकारांचा व्यापक वापर करण्यात आला. अशारितीने जनतेचा प्रथमच आधुनिक राजकीय कल्पनांशी परिचय झाला.

सरकारविरोधी चळवळीचा एक आवश्यक भाग म्हणून 'आत्मशक्ती' किंवा 'स्वयंपूर्णते'वर देण्यात आलेला खाज भर हा स्वदेशी चळवळीचा एक महत्वाचा पैलू होता. वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वयंपूर्णतेचा अर्थ राष्ट्रीय प्रतिष्ठा, सन्मान व आत्मविश्वास पुन्हा प्राप्त करणे असाच होता. खेडेगावाचे सामाजिक व आर्थिक पुनरुत्थान करण्याचे आणि ग्रामीण जनतेपर्यंत पोहचण्याचे एक साधन म्हणून स्वयंपूर्णतेवर व विधायक कार्यावर भर देण्यात आला.

## ❑ सांस्कृतिक जीवनावर प्रभाव :-

स्वदेशी चळवळीचा सांस्कृतिक जीवनावर पडलेला प्रभाव अधिक महत्वपूर्ण होता. रविंद्रनाथ टागोर, रजनीकांत सेन, द्विजेंद्रलाल रे, मुकुंददास, सय्यद अबु महमद, इ.नी अनेक राष्ट्रगीते, कवने लिहिली. ज्यामधून भारतीयांना अभूतपूर्व प्रेरणा मिळाली. यावेळी रविंद्रनाथ टागोरांनी लिहिलेल्या 'आमार सोनार बांगला' या गीताने नंतर बांगला देशाच्या मुक्तीसंग्रामालाही प्रेरणा दिली.

याच काळात रविंद्रनाथ टागोर यांनी चित्रकलेतील व्हिक्टोरियाकालीन निसर्गशैलीचे वर्चस्व झुगारून मोगलशैली, रजपूतशैली व अजंठाशैली यासारख्या समृद्ध देशी परंपरांमधून प्रेरणा घेतली. सन १९०७ मध्ये 'इंडियन सोसायटी ऑफ ओरिएण्टल आर्ट'ची स्थापना झाली. नंदलाल बोस हे या संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे पहिले मानकरी होते.

विज्ञानाच्या क्षेत्रातही जगदीशचंद्र बोस, प्रफुल्लचंद्र राय तसेच इतर वैज्ञानिकांनी अनेक महत्त्वपूर्ण शोध लावले. त्यांनी वैज्ञानिक क्षेत्रात केलेल्या मूलभूत संशोधनाची जगात सर्वत्र प्रशंसा झाली.

## ❑ चळवळीचा सामाजिक आधार :-

स्वदेशी व बहिष्कार चळवळीमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. विद्यार्थ्यांनी स्वदेशीचा व्यवहारामध्ये वापर केला आणि बहिष्कारासंबंधी मोर्चा व प्रदर्शनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. परंतु त्याचवेळी सरकारच्या दमननितीचा आक्रोस विद्यार्थ्यांना सहन करावा लागला. ज्या शिक्षण संस्थातील विद्यार्थ्यांनी स्वदेशी चळवळीत सक्रीयपणे भाग घेतला, त्या शिक्षणसंस्थांना दिली जाणारी सरकारी मदत तसेच शिष्यवृत्तीवर सरकारने निर्बंध लादले. अनेक विद्यार्थी सरकारच्या दमननितीला बळी पडले. अशा विद्यार्थ्यांना सरकारी नोकरीमध्ये अयोग्य घोषित करण्यात आले. परंतु तरीही विद्यार्थ्यांचा उत्साह कमी झाला नाही. त्यांनी आंदोलनात सक्रियपणे भाग घेतला.

स्वदेशी व बहिष्कार चळवळीतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे चार भिंतीच्या आत असणाऱ्या स्त्रिया विशेषत: शहरी मध्यमवर्गीय स्त्रियांनी या चळवळीत भाग घेतला. महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांस लावून मोर्चामध्ये, सभांमध्ये भाग घेतला. कालांतराने या स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका निभावली.

कामगारवर्गाच्या आर्थिक गाऱ्हाण्यांना राजकीय वळण देण्याचा प्रयत्नही प्रथम याच काळात झाला. याचाच एक भाग म्हणजे परकीय व्यवस्थापनाखालील 'ईस्ट इंडिया रेल्वे' व 'कलाईव्ह ज्यूट मिल' यासारख्या उद्योगात संप घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

स्वदेशी चळवळीच्या काळात शेतकऱ्यांना शेतीविषयक मागण्यांच्या आधारे संघटित करता आले नाही आणि बहुतेक भागातील शेतकरी स्वदेशी चळवळीच्या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभागी झाले नाहीत हे जरी खरे असले तरी सभा, मेळे, प्रदर्शने यासारख्या विधायक कार्याच्या माध्यमांतून फार मोठ्या संख्येने शेतकरी वर्ग राष्ट्रवादी विचारांच्या व राजकारणाच्या प्रथमच संपर्कात आला हेही तितकेच खरे आहे.

## ❑ स्वदेशी चळवळीच्या अपयशाची कारणे :-

जन आंदोलनाचे स्वरूप लाभलेली ही चळवळ सन १९०८ च्या मध्यास जवळपास थंडावली, त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. स्वदेशी चळवळीची क्रांतीकारी क्षमता लक्षात घेता सरकारने दडपशाहीचा वापर करून ती चळवळ दडपून टाकली. त्यासाठी सभा, मोर्चे, मिरवणूका, वृत्तपत्रे यावर बंधने घालून प्रसंगी

पोलिसी बळाचा वापर करून सरकारने त्या उधळून लावल्या. अनेकांवर खटले भरून दुरुषांत टाकले.

२. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सन १९०७ मध्ये जहाल व मवाळ यांच्यात फूट पडली. अंतर्गत कुरबुरी वाढून काँग्रेस दुभंगली गेली, त्यामुळे स्वदेशी चळवळ कमजोर बनली.

३. इ.स. १९०७-०८ या दोन वर्षात आश्विनीकुमार दत्त, कृष्णकुमार मित्रा आदी नऊ प्रमुख बंगाली नेत्यांना हद्दपार करण्यात आले. लोकमान्य टिळकांना सहा वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. लाला लजपतराय व अजितसिंह यांना पंजाबातून हद्दपार करण्यात आले. मद्रास व आंध्रमधील चिंद्बरम् पिलाई व हरी सर्वोत्तमराव यांना अटक करण्यात आली. बिपिनचंद्र पाल व अरविंद घोष सक्रिय राजकारणातून निवृत्त झाले. अशा प्रमुख नेत्यांना सरकारने स्वदेशी चळवळीपासून दूर ठेवल्याने संपूर्ण चळवळच नेतृत्वहीन बनली.

४. स्वदेशी चळवळ संपूर्ण भारतभर पसरली असली तरी राजकारणाची ही नवी शैली स्विकारण्याची लोकांची मानसिक तयारी अद्याप झाली नव्हती. तेवढी जागृती अद्याप लोकांमध्ये झाली नव्हती.

५. स्वदेशी चळवळीमध्ये परिणामकारक संघटना व पक्षयंत्रणा यांचा अभाव होता.

६. स्वदेशी चळवळ ही उच्च, मध्यम वर्ग व जमिनदार वर्गापर्यंतच सिमित राहिली. तळागाळातील फारच थोड्या लोकांनी त्यामध्ये भाग घेतला. त्यामुळे व्यापक जनाधार मिळाला नाही.

## ❑ स्वदेशी चळवळीची फलनिष्पत्ती :-

सन १९०८ च्या मध्याला स्वदेशी चळवळ थंडावली. ही चळवळ अस्तास जात असतानाच भारतीय राष्ट्रवादाचाच्या क्षितिजावर परक्या राजवटीशी करावयाच्या संघर्षाचा एक नवा मार्ग क्रांतीकारकांचा उदय झाला. स्वदेशी चळवळीत सहभागी झालेल्या तरुणांना चळवळीचा जोर ओसरल्यावर आणि सरकारची दडपशाही वाढल्यावर मुकाट्याने चळवळीबाहेर पडून शांत बसणे शक्य नव्हते. त्यातील काही तरुणांनी वैयक्तिक साहसाचा क्रांतीकारी मार्ग अवलंबिला.

स्वदेशीचे जनआंदोलन ओसरले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक पर्व संपले. तथापि, स्वदेशी चळवळ पूर्णत: संपली असे म्हणता येणार नाही. या चळवळीने राष्ट्रवादाचा विचार समाजाच्या अशा वर्गापर्यंत पोहोचविला कि, ज्यांच्यापर्यंत राष्ट्रवादाचा विचार अद्याप पोहोचलाच नव्हता. तळागाळातील या वर्गामध्ये राष्ट्रवादाचे बिजारोपण झाले. ज्या आधारावर नंतरच्या काळात राष्ट्रीय चळवळ उभी राहिली. स्वदेशी चळवळीचे हे प्रमुख योगदान होते. याचाच एक भाग म्हणून भारतीयांनी वसाहतवादी

विचारांचे व संस्थांचे वर्चस्व झुगारून स्व-संस्कृती व वाङ्मय क्षेत्रात आपला ठसा उमटविला. राष्ट्रीय स्वरूपाच्या साहित्याची निर्मिती केली. निश्चितच यामुळे भारतीयांमुळे राष्ट्रवादाची वाढ झाली.

आम जनतेचे संघटन करण्याच्या नव्या पद्धती, नवे मार्ग व तंत्र स्वदेशी चळवळीने शोधून काढली. संघटनाच्या या नव्या पद्धती व मार्गाचा अवलंब पुढील काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महात्मा गांधीजींनी प्रभावीपणे केला.

वसाहतवादाची आर्थिक समीक्षा विकसित करण्याचे कार्य नेमस्त नेत्यांनी केले होते. पण त्यांना ते कार्य जनतेपर्यंत पोहचविता आले नाही. स्वदेशी चळवळीने त्या वसाहतवादाच्या आर्थिक समीक्षेला जनतेपर्यंत पोहचविले आणि वसाहतवादाच्या मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाला आवाहन देण्याचे कार्य या चळवळीने प्रभावीपणे केले.

स्वदेशी चळवळीचा प्रमुख भाग म्हणजे स्वदेशी मालाचा वापर आणि परकीय मालावर बहिष्कार. यामुळे स्वदेशी मालाची मागणी वाढली. त्यामुळे भारतातील लहानमोठ्या उद्योगांची पायाभरणी झाली. स्वदेशी उद्योगधंद्यांची वाढ झाली. याचवेळी परदेशी मालावरील बहिष्कारामुळे परदेशी मालाची भारतातील आयात कमी झाली. या काळातील अधिकृत व गुप्त पोलीस अहवालावरून असे दिसते की, स्वदेशी चळवळीच्या दोन-तीन वर्षात ब्रिटिश आयात मालाची मोठ्या प्रमाणावर घट झाली होती. त्याचा फटका ब्रिटिश उद्योगपतींना बसला.

ब्रिटिशांच्याबद्दल भारतीय जनतेत जो भयदंड होता, तो भयदंड स्वदेशी चळवळीमुळे कमी झाला. जनता उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने ब्रिटिशांविरोधी चळवळीत सहभागी होऊ लागली. हे स्वदेशी चळवळीचे मोठे यश होते.

स्वदेशी चळवळीच्या व्यापक जनआंदोलनामुळे शेवटी सरकारला बंगालची फाळणी रद्द करणे भाग पडले.

एकंदरीत स्वदेशी चळवळीने भारताच्या सर्वच क्षेत्रात क्रांतीकारी बदलाची सुरूवात केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील तो एक मैलाचा दगड ठरला. स्वदेशी चळवळीच्या उदरातूनच पुढील काळातील स्वातंत्र्यचळवळीतील प्रमुख प्रवाहांचा जन्म झाला. त्यामुळे भारतातील राजकीय बदलांचा हा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा ठरला.

## ❑ होमरूल चळवळ (Home Rule Movement) :-

पहिल्या महायुद्धापूर्वी व महायुद्धकाळात सर्व जगभर राष्ट्रीय भावनेची लाट आली होती. याचा परिणाम भारतात होमरूल चळवळीची सुरूवात झाली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील होमरूल चळवळ हा एक महत्त्वाचा टप्पा होता. स्वदेशी चळवळीने निश्चित केलेल्या स्वराज्याच्या मागणीला या चळवळीने

आणखी मजबूत केले. या चळवळीने स्वातंत्र्य लढ्याला गतिमानता आणली. मुंबई, कानपूर, अलाहाबाद, कलकत्ता, मद्रास, पुणे याठिकाणी होमरूल लीगच्या संघटनेचे जाळे पसरले गेले.

होमरूल म्हणजे स्वयंशासन किंवा स्वराज्य थोडक्यात आपल्या देशाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार आपण प्राप्त करून घेणे. मूलत: होमरूलची चळवळ आयर्लंडमध्ये ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त होऊन स्वत:च्या देशाचा राज्यकारभार स्वत: करण्याचा अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी श्री. रेडमांड यांच्या नेतृत्वाखाली आयरिश लोकांनी सुरू केली होती. भारतामध्येही अशाच प्रकारची चळवळ सुरू करावी असा विचार आयरिश विदुशी, डॉ. ॲनी बेझंट यांनी मांडला. जन्माने आयरीश असलेल्या डॉ. ॲनी बेझंटनी भारतात आल्यावर भारतालाच आपली कर्मभूमी मानून कार्य करण्यास सुरूवात केली होती. त्या कार्याचा एक भाग म्हणून डॉ. ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांनी होमरूल लीगची स्थापना केली.

## ❑ होमरूल लीगची/चळवळीची स्थापना :-

१६ जून १९१४ रोजी लोकमान्य टिळक यांची सहा वर्षाच्या तुरुंगवासानंतर मंडालेहून सुटका झाली. ज्या भारतातून ते मंडालेला गेले होते तो भारत आणि ज्या भारतात ते परतले तो भारत यामध्ये फार मोठा फरक होता. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील भारतीय स्वातंत्र्यचळवळ निष्क्रिय झाली होती. भारतीय राष्ट्रीय चळवळीचे प्रतिक असलेल्या राष्ट्रीय कॉंग्रेसची मान्यता मिळाल्याखेरीज कोणतीही राजकीय कृती यशस्वी होणार नाही. याची लोकमान्य टिळकांना खात्री असल्यामुळे त्यांनी प्रथमत: आपल्या जहाल साथीदाऱ्यांसह कॉंग्रेसमध्ये पुर्नप्रवेश मिळविण्यासाठी प्रयत्न केले. यासाठी डॉ. ॲनी बेझंटनीही नेमस्तांवर मोठा दबाव आणला. त्या नुकत्याच राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये सामील झाल्या होत्या. आणि राष्ट्रवादी राजकीय हालचाली पुन्हा एकदा सुरू व्हाव्यात. अशी त्यांची इच्छा होती. याचीच फलनिष्पत्ती म्हणजे १९१५ च्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात जहालांना राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये पुर्नप्रवेशाची परवानगी देण्यात आली आणि सन १९१६ च्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यात मनोमिलन झाले. लोकमान्य टिळकांनी १९१४ मध्ये मंडाले तुरुंगातून सुटका झाल्यानंतर डॉ. ॲनी बेझंटनी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी होमरूल चळवळ सुरू करण्याबाबत चर्चा केली होती. लोकमान्य टिळकांना डॉ. ॲनी बेझंटनी सांगितले की, होमरूल चळवळीची कल्पना आडवली. त्याचवेळी लोकमान्य टिळकांनी डॉ. ॲनी बेझंटच्या विचारांना पाठिंबा देऊन होमरूल चळवळ चालू करण्याबाबत या दोघांमध्ये एकमत झाले.

मूळ आयरिश असलेल्या डॉ. ॲनी बेझंट या सन १८९३ मध्ये थिऑसॉफिकल सोसायटीच्या प्रसारासाठी भारतात आल्या आणि त्यांनी भारत हेच आपले कार्यक्षेत्र मानले. हिंदू धर्म आणि संस्कृतीचा त्यांनी कायम अभिमान बाळगला. हिंदू तत्त्वज्ञानाचा त्यांनी सखोल अभ्यास केला आणि हे तत्त्वज्ञान

सर्वश्रेष्ठ असल्याचे त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले. तत्कालीन मद्रास प्रांतातील अड्यार येथे थिऑसॉफिकल सोसायटीचे केंद्र बनवून या केंद्रातून त्यांनी थिऑसॉफीचा संदेश सर्वत्र पसरविण्याचे कार्य केले. भारतातील अनेक जाती-जमातीच्या सुशिक्षितांनी त्यांचे अनुयायित्व स्विकारले. सन १९१३ मध्ये त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्यत्व स्विकारून भारतीय राजकारणात त्यांनी प्रवेश केला. इ.स. १९१४ मध्ये डॉ. ॲनी बेझंटनी आयरिश धर्तीवर होमरूल लीगची चळवळ भारतामध्ये उभी करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसची मान्यता आणि जहालवाद्यांचे सक्रिय सहकार्य या दोन्हींची गरज असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

आपल्या मताच्या प्रचारासाठी डॉ. ॲनी बेझंट यांनी सन १९१४ मध्ये 'कॉमनवील' हे साप्ताहिक व 'न्यू इंडिया' हे दैनिक सुरू केले. ब्रिटिश साम्राज्यातील गोऱ्या वसाहतींच्या धर्तीवर भारतालाही साम्राज्य मिळावे यासाठी त्यांनी सार्वजनिक सभा व परिषदा आयोजित केल्या. आयर्लंडप्रमाणे भारतात होमरूल चळवळ सुरू करण्यासंबंधीचा ठराव १९१५ च्या राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनात डॉ. ॲनी बेझंटनी मांडला, पण राष्ट्रीय काँग्रेसने तो स्विकारला नाही. मात्र राजकीय जागृतीचा आणि स्थानिक राष्ट्रीय काँग्रेस समित्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसची मान्यता मिळविण्यात मात्र त्या यशस्वी झाल्या. परंतु प्रत्यक्षात राष्ट्रीय काँग्रेस हे कार्यक्रम राबविलच याची खात्री नसल्याने सप्टेंबर, १९१६ पर्यंत राष्ट्रीय काँग्रेसने अशा समित्या स्थापन कराव्यात अशी अट डॉ. ॲनी बेझंटनी घातली होती.

लोकमान्य टिळकांना मात्र असे काही बंधन नव्हते. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पुर्नप्रवेश केल्यानंतर २८ एप्रिल १९१६ रोजी होमरूल लीगची महाराष्ट्रात स्थापना केली. या होमरूल लीगचे पुणे हे मुख्य केंद्र होते. बॅ. जोसेफ बॉप्टिस्टा हे या होमरूल लीगचे अध्यक्ष तर न.चि. केळकर हे सचिव होते. शिवाय खापर्डे, मुंजे व करंदीकर हे लोकमान्य टिळकांचे सहकारी संस्थापक सदस्य होते. लोकमान्य टिळकांच्या होमरूल लीगच्या एकूण सहा शाखा होत्या. या होमरूल लीगचे मुंबई शहर वगळता महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रांत व वऱ्हाड हे कार्यक्षेत्र होते.

राष्ट्रीय काँग्रेसकडून स्थानिक काँग्रेस समित्यांचे पुर्नजीवन करण्याबाबत कोणतीही पावले उचलली न गेल्यामुळे सप्टेंबर १९१६ मध्ये डॉ. ॲनी बेझंटनी होमरूल लीगची अधिकृत स्थापना केली. त्याचे केंद्र अड्यार होते. जॉर्ज अरूंडेल हे या लीगचे संघटक-सचिव होते. त्याशिवाय सर सुब्रह्मण्यम अय्यर, बी.पी. वाडिया हे प्रमुख सदस्य होते. या होमरूल लीगचे कार्यक्षेत्र लोकमान्य टिळकांच्या होमरूल लीगचे कार्यक्षेत्र वगळता संपूर्ण भारत होता. डॉ. ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांच्या संघटना वेगवेगळ्या असल्यातरी त्यांची उद्दिष्ट्ये समान असून त्यांच्यात सामंजस्य व सहकार्य होते. तरीही दोन्ही लीग एकमेकांत विलीन केल्या गेल्या नाहीत. ॲनी बेझंट यांच्या पुढील उद्‌गारांवरून त्याचे कारण स्पष्ट होते.

त्या म्हणाल्या होत्या, ''त्यांच्या काही सभासदांना मी, तर माझ्या काही सभासदांना ते आवडत नाहीत. तथापि, आमचे एकमेकांशी भांडण नाही,'' या दोन्ही चळवळी राष्ट्रीय काँग्रेसच्या विरुध्द नसून पूरक होत्या.

## ❑ होमरूल लीगचे/चळवळीचे उद्देश :-

लोकमान्य टिळक यांनी 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रातून आणि डॉ. ॲनी बेझंट यांनी 'कॉमनवील' व 'न्यू इंडिया' या वृत्तपत्रांतून होमरूल चळवळीविषयी जे विचार मांडले त्यातून होमरूल चळवळीची उद्दिष्ट्ये स्पष्ट होतात. ती पुढीलप्रमाणे :-

१. भारतीय जनतेत राजकीय हक्कांबद्दल जागृती निर्माण करणे आणि त्या माध्यमातून जनतेला संघटित करणे.

२. स्वशासनासाठी लोकमत जागृत करणे.

३. स्वशासनाचे ध्येय पूर्ण होईपर्यंत सनदशीर मार्गाने चळवळ चालविणे.

४. स्वराज्य मिळेपर्यंत चळवळ अधिक गतिशील करणे.

५. ब्रिटिश साम्राज्यअंतर्गत स्वराज्य मिळविणे.

लोकमान्य टिळकांच्या मते, ''काँग्रेसला एक नवे वळण मिळणे गरजेचे असून त्यादृष्टीने ही चळवळ उपयोग ठरेल.'' स्वराज्यासाठी आंदोलन करणे ही गरज काँग्रेसने स्विकारली पाहिजे. स्वशासन हा आमचा राजकीय हक्क आहे, आणि तो आम्हाला हवा आहे. त्यासाठी ब्रिटिशांकडे भिक मागण्याची गरज नाही, असे लोकमान्य टिळकांचे मत होते.

## ❑ होमरूल चळवळीचा प्रसार :-

होमरूलचा प्रचार करण्यासाटी लोकमान्य टिळकांनी देशाचा झंझावती दौरा केला. आपल्या भाषणातून त्यांनी होमरूलची (स्वराज्याची) मागणी जनतेपर्यंत पोहोचविली आणि होमरूल लीगला लोकप्रियता मिळवून दिली. ''भारत आणि वयात आलेल्या मुलासारखा आहे. विश्वस्तकिंवा वडिलांनी त्याचे योग्य अधिकार त्याला दिले पाहिजेत. भारतीय जनतेने हे घडवून आणले पाहिजे तो त्यांचा अधिकारच आहे.'' १९१६ च्या मध्यास लोकमान्य टिळांनी देशभर दौरा करून भाषणे देऊन चळवळीची भूमिका व उद्दिष्ट्ये मांडली. लोकमान्य टिळकांच्या दौऱ्याने व भाषणाने मोठ्या संख्येने लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले. लोकमान्य टिळकांनी होमरूलचे नाशिकता अधिवेशन घेतले. पश्चिम भारतामध्ये लोकमान्य टिळकांच्या होमरूल लीगचा फारच जोर होता. सन १९१६ मध्ये लोकमान्य टिळकांच्या होमरूल लीगची सदस्यसंख्या १४००० होती ती सन १९१७ मध्ये ३३००० झाली. माँटेग्यू यांनी गुप्त

अहवालात म्हटले, ''टिळक सध्याच्या काळातील सामर्थ्यशाली नेते आहेत. बेझंटबाई व टिळक यांनी काँग्रेस पूर्णपणे जिंकली आहे. काँग्रेसमधील मवाळ पक्ष हा पूर्णपणे असंगत झाला आहे. होमरूल चळवळ ही आता काँग्रेसचीच झाली आहे.''

डॉ. ॲनी बेझंट यांनी देशभर दौरे काढून लोकांना होमरूल चळवळीविषयी जागृत केले. विद्वत्तापूर्ण भाषणे व प्रेमळ वागणूक यामुळे त्यांचा लोकांच्यावर चांगला प्रभाव पडला त्यांनी भारतीय जनतेत आत्मविश्वास निर्माण केला आणि त्याच्यात त्यागाची भावना जागविली. डॉ. ॲनी बझेंट यांनी स्थापन केलेल्या होमरूल लीगच्या जवळपास २०० शाखा भारतभर निघाल्या. डॉ. ॲनी बेझंटनी होमरूल लीगचे औपचारिकपणे उद्‌घाटन करण्यापूर्वी २६ इंग्रजी पुस्तकांच्या जवळपास ३,००,००० प्रती वितरित करण्यात आल्या. होमरूल लीगच्या स्थापनेनंतर या पुस्तिका परत एकदा प्रकाशित केल्या गेल्या, त्याचप्रमाणे भारतीय भाषातूनही काही नव्या पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या. डॉ. ॲनी बेझंटनी १०० पेक्षा जास्त ग्रंथ लिहिले व २० हजारापेक्षा जास्त व्याख्याने दिली. एखाद्या शहरात त्या आल्या या वार्तांने त्या शहरात नवे स्फुरण येई, असा उल्लेख पंडित नेहरूंनी त्यांच्या () या ग्रंथात केला आहे. या चळवळीचा सर्व जनतेवर व नेत्यांवरही प्रभाव पडलेला होता. परिणामी १९१७ च्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद डॉ. ॲनी बेझंटना मिळाले. एखाद्या महिलेला हा प्रथमच मान मिळाला होता. अध्यक्षीय भाषणामध्ये त्यांनी होमरूलचे जोरदार समर्थन केले. राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन संपल्यावर त्याच मंडपात दोन्ही होमरूल लीगची संयुक्त सभा घेण्यात आली. या सभेला एक हजार प्रतिनिधी हजर होते. लोकमान्य टिळक व डॉ. ॲनी बेझंट यांनी या सभेत भाषणे केली. परतीच्या प्रवासात उभय नेत्यांनी उत्तर, मध्य व पूर्ण भारतातील विविध प्रदेशांचा दौरा केला.

जहालांबरोबरच राष्ट्रीय काँग्रेसच्या निष्क्रियतेपर नाराज असलेल्या अनेक नेमस्तांनीही होमरूल चळवळीत भाग घेतला. मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, भुलाभाई देसाई, चित्तरंजन दास, मदन मोहन मालवीय, महंमद अली जीना, तेजबहाद्दूर सप्रू आणि लाला लजपतराय यांनी होमरूल लीगमध्ये प्रवेश केला.

## ❑ होमरूल चळवळीचे परदेशातील कार्य :-

भारतातील होमरूल चळवळीचे पडसाद परदेशातही उमटले. इंग्लंड, अमेरिकेतील वृत्तपत्रांनी भारतातील या होमरूल चळवळीची दखल घेत चळवळीबद्दल अनुकूल लिखाण केले. डॉ. ॲनी बेझंटनी सुरूकेलेल्या होमरूल लीगचे सर सुब्रह्मण्यम अय्यर यांनी सन १९१७ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वुट्रो विल्सनला पत्र लिहून होमरूल चळवळीला पाठिंबा देण्याची विनंती केली होती. या पत्रात दोस्त राष्ट्रांनी भारताला स्वराज्याचे आश्वासन दिल्यास भारत लाखो सैनिक युदध आघाडीवर पाठविल, असा उल्लेख केला होता. यामुळे इंग्लंडच्या साम्राज्यवादावर सर्वत्र टिका होऊ लागली. याचवेळी

लोकमान्य टिळकांनी लाला लजपतराय, हार्डीकर, के. डी. शास्त्री यांचे एक शिष्टमंडळ अमेरिकेला पाठवून या शिष्टमंडळाद्वारे अमेरिकेत होमरूलचे विचार पोहचविले. अमेरिकेत न्यूयॉर्क व सॅनफ्रन्सिस्को येथे होमरूल लीगच्या शाखा स्थापन करण्यात आला. आणि यंग इंडिया वृत्तपत्र सुरू करून या वृत्तपत्रातून होमरूल लीगच्या विचारांचा प्रसार करण्यात आला.

अमेरिकेप्रमाणेच इंग्लंडमध्येही होमरूल लीगचा प्रसार करून इंग्लंडमधील उदारमतवादी जनतेमध्ये भारतातील होमरूल चळवळींविषयी सहानुभूती निर्माण केली. जुलै १९१७ मध्ये जोसेफ बॉप्टिस्टा यांच्या नेतृत्वाखाली लोकमान्य टिळकांनी इंग्लंडला शिष्टमंडळ पाठवून इंग्लंडमधील जनतेमध्ये भारतातील स्वराज्याबद्दल जागृती केली. मार्च १९१८ मध्ये आणखी दोन गट इंग्लंडला पाठविण्याचा टिळकांनी प्रयत्न केला. पण इंग्लंडने त्यांना परवानगी नाकारल्याने, त्या गटांना मधूनच परत यावे लागले. त्याच दरम्यान एक शिष्टमंडळ घेऊन स्वत: टिळकांनी इंग्लंडला जाण्याचे घोषित केले. पण इंग्लंडने टिळकांचा पासपोर्ट रद्द केल्याने लोकमान्य टिळकांना वाटेतूनच माघारी घ्यावे लागले. डॉ. ॲनी बेझंटने इंग्लंडमधील मजूर पक्षाची मदत मिळविण्याचे प्रयत्न केले. त्यांनी मजूर पक्षाला तसे आवाहन केले होते. तेथील अनेक उदारमतवादी नेत्यांनी त्यास प्रतिसाद दिला होता. अशाप्रकारे होमरूल लीगच्या माध्यमातून भारतीय स्वराज्याचा प्रश्न जागतिक पातळीवर पोहचविण्यात आला.

## ❑ होमरूल चळवळ दडपण्याचे सरकारकडून प्रयत्न :-

होमरूल लीगच्या देशातील व देशाबाहेरील वाढत चाललेल्या लोकप्रियतेमुळे वसाहतवादी सरकारने ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. सरकारने लोकमान्य टिळकांच्या भाषणातील आक्षेपार्ह भागाचे निमित्त करून टिळकांच्यावर अयशस्वी खटला भरण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळक व बिपिनचंद्र पाल यांना दिल्ली व पंजाब येथे प्रवेशबंदी करण्यात आली. तर डॉ. ॲनी बेझंटना मुंबई प्रांतात प्रवेशबंदी करण्यात आली. १५ जून १९१७ रोजी डॉ. ॲनी बेझंट व त्यांचे दोन सहकारी जॉर्ज आरूंडेल व बी.पी. वाडिया यांना अटक करण्यात आली. त्यामुळे चळवळ आणखीनच चिघळली. सर्व देशभर अटकेच्या निषेधार्थ सभा, मोर्चे काढण्यात आले. लोकमान्य टिळकांनी डॉ. ॲनी बेझंटच्या सुटकेचा प्रयत्न केला. शेवटी डॉ. ॲनी बेझंटची सुटका करा नाहीतर आपण सत्याग्रहास सुरूवात करू असा लोकमान्य टिळकांनी सरकारला इशाला दिला. डॉ. ॲनी बेझंटची सुटका करण्यातआली. मद्रास प्रांतीय सरकारने होमरूल चळवळीविषयी कडक धोरण स्विकारून विद्यार्थ्यांना राजकीय सभांना उपस्थित राहण्यासाठी मनाई करण्यात आली. सरकारच्या दडपशाहीमुळे चळवळीचा जोर आणखी वाढला.

## ❑ होमरूल चळवळीचे परिणाम :-

होमरूल चळवळीचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर झालेले परिणाम फार दूरगामी होते. या

चळवळीमुळे स्वातंत्र्य चळवळीत आक्रमकता निर्माण होण्यास मदत झाली. होमरूल चळवळीचे परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. या चळवळीचा महत्वाचा परिणाम म्हणजे भारतमंत्री मॉटेंग्यू याने २० ऑगस्ट १९१७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारताला जबाबदार शासनपध्दती देण्याचे ब्रिटिश शासनाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे घोषित केले. होमरूल चळवळीचा हा विजयच होता.

२. या चळवळीमुळे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसवर मवाळांचा असणारा प्रभाव कमी होऊन जहालांचा प्रभाव निर्माण झाला.

३. होमरूल चळवळीने पहिल्या महायुद्धकाळात भारताच्या स्वराज्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविल्याने त्यास अनेक देशांची सहानुभूती मिळाली. लोकमान्य टिळकांनी पॅरिस शांतता परिषदेला पत्र पाठवून परिषदेसमोर हिंदी मागण्या मांडल्या, त्यामुळे ब्रिटिशांवरचा नैतिक दबाव वाढीस लागला.

४. डॉ. ॲनी बेझंटसारखी परदेशी व्यक्ती भारतीय स्वातंत्र्याबद्दल एवढी क्रियाशिल राहते व आपण भारतीय मात्र स्वस्थ राहतो, याची जाणीव अनेक भारतीयांना झाली. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती वाढण्यास या चळवळीमुळे मदत झाली.

५. भारतातील मरगळलेल्या जनतेत स्वातंत्र्यलढ्याचे चैतन्य पुन्हा एकदा भरण्याचे कार्य या चळवळीने केले.

६. या चळवळीने कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण केली. जी पुढील स्वातंत्र्यलढ्यात सक्रियपणे कार्यरत राहिली.

७. जहालांची स्वदेशी चळवळ व नंतरची महात्मा गांधीजींची असहकार चळवळ यांच्यातील राजकीय पोकळी भरून काढण्याचे कार्य होमरूल चळवळीने केले. शिवाय स्वातंत्र्य चळवळ या काळात धगधगती ठेवण्याचे महत्त्वाचे कार्यही या चळवळीने केले.

## ❑ होमरूल चळवळीच्या अपयशाची कारणे :-

पहिल्या महायुद्धाच्या काळात लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेली होमरूल चळवळ सन १९१७ नंतर मात्र हळूहळू ऱ्हास पावू लागली. त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. भारतमंत्री मॉटेग्यूच्या ऑगस्ट घोषणेनंतर डॉ. ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांच्यात

मतभेद निर्माण होऊ लागले. भारताला जबाबदार शासन देण्याचे ब्रिटिश सरकारने ऑगस्ट घोषणेच्या माध्यमातून मान्य केल्यानंतर डॉ. ॲनी बेझंटनी आपले अंग लीगमधून काढून घेतले.

२. ब्रिटिश सरकारकडून सुधारणांचे आश्वासन मिळाल्यानंतर चळवळीत शिथिलता आली.

३. होमरूल लीगने केलेली वसाहतीच्या स्वराज्याची मागणी जहाल तरूणांना मवाळ स्वरूपाची वाटून त्यांच्यात निराशा निर्माण झाली.

४. 'होमरूल म्हणजे ब्राह्मणांचे राज्य' असा समज निर्माण झाल्याने बरेच मुस्लिम आणि दक्षिणेतील ब्राह्मणेतर या चळवळीपासून दूर राहिले.

५. 'इंडियन अनरेस्ट' (Indian Unrest) चे लेखक व्हॅलेंटाईन चिरोल यांच्यावर लो. टिळकांनी अब्रुनुकसानीचा दावा टाकला होता. तो चालविण्यासाठी लोकमान्य टिळक इंग्लंडला गेले. परिणामी अगदी मोजक्या वेळी ते भारतापासून दूर राहिल्यामुळे चळवळीला लोकमान्य टिळकांच्या ताकदीचा नेता उरला नाही.

होमरूल चळवळ अंतिमत: अपयशी ठरली असली तरी तिचे महत्व कमी लेखता येणार नाही. कारण होमरूल चळवळीने भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये एक स्वतंत्र स्थान मिळविले आहे. या चळवळीमुळे राष्ट्रीय काँग्रेसला एक नवसंजिवनी मिळाली. कारण या चळवळीमुळे जहाल-मवाळ एक झाले आणि राष्ट्रीय काँग्रेसवर जहालांचे वर्चस्व निर्माण झाले. होमरूल लीगच्या दबावामुळे ब्रिटिश सरकारला आपल्या धोरणात बदल करावा लागला. स्वदेशी चळवळ व महात्मा गांधीजींची असहकार चळवळ यामधील राजकीय पोकळी भरून काढून स्वातंत्र्य चळवळ सतत धगधगती ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होमरूल लीगने केले. होमरूल लीगने उत्साही राष्ट्रवादी कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण केली. या उत्साही कार्यकर्त्यांच्या बळावरच महात्मा गांधीजीनी राष्ट्रीय चळवळीला आम जनतेची चळवळ बनविली. होमरूलचा प्रसार नव्या क्षेत्रात, नव्या समूहात, नव्या पिढीपर्यंत झाला. एका नवीन समूहात होमरूलमुळे जागृती झाली. जो वर्ग यापूर्वी स्वातंत्र्य चळवळीबाहेर होता. अशा क्षेत्रात होमरूलचा प्रभाव पडला जिथे नाही मवाळवादी नाही जहालवाद्यांचा प्रभाव होता. जिथे राजकीय जागृतीच झाली नव्हती. जी युवा पिढी हामेरूलमध्ये सहभागी झाली त्यांनी पुढे स्वातंत्र्य चळवळीत महत्वाची भूमिका पार पाडली. उदा. सत्यमूर्ती, जमनादास बजाज, इंदुलाल याज्ञीक इ. होमरूल चळवळीने होमरूल किंवा स्वराज्याची कल्पना लोकप्रिय केली आणि ती तळागाळातील लोकापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे देशात जनसामान्यांमध्येही राष्ट्रवादाच्या वाढीला चालना मिळाली.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ✻

❑ **योग्य पर्याय निवडा.**

१. .................. यांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतु:सूत्रीची घोषणा केली.

*(अ) लाला लजपतराय* *(ब) महात्मा गांधी*

*(क) लोकमान्य टिळक* *(ड) अरविंद घोष.*

२. दिल्लीमध्ये स्वदेशी चळवळीचे नेतृत्व ................ यांनी केले.

*(अ) लाला लजपतराय* *(ब) लोकमान्य टिळक*

*(क) अजितसिंह* *(ड) सैय्यद हैदर रझा.*

३. .................. यांनी 'बंगाल रासायनिक स्वदेशी वस्तू भांडार' सुरू केले.

*(अ) दादाभाई नौरोजी* *(ब) आचार्य प्रफुल्लचंद्र रे*

*(क) रविंद्रनाथ टागोर* *(ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी.*

४. ................... यांनी कॉमनवील हे साप्ताहिक सुरू केले.

*(अ) डॉ. ॲनी बेझंट* *(ब) लोकमान्य टिळक*

*(क) ॲलन ह्यूम* *(ड) विल्यम जोन्स.*

५. सन १९१७ च्या कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष ................ होते.

*(अ) गोपाळ कृष्ण गोखले* *(ब) रासबिहारी घोष*

*(क) डॉ. ॲनी बेझंट* *(ड) फिरोजशहा मेहता.*

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **राष्ट्रवाद** : प्रत्येक व्यक्तीला आपल्या राष्ट्राबद्दल वाटणारे प्रेम किंवा असलेली निष्ठा.

२. **कॉंग्रेस** : लोकांचा समूह किंवा लोकांचे मंडळ.

३. **मवाळ** : ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचे बोट धरून त्यांच्या कलाने भारताची प्रगती करू इच्छिणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांच्या गटाला मवाळ म्हणतात.

४. **जहाल** : भारताच्या प्रगतीसाठी स्वावलंबनाचा, आत्मनिर्भरतेचा व जनजागृतीच्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या गटाला जहाल म्हणतात.

५. **स्वदेशी** : आपल्या देशातील किंवा स्वत:च्या देशातील.

६. **स्वराज्य** : स्वत:चे राज्य किंवा आपले राज्य.

७. **होमरूल** : स्वयंशासन किंवा स्वराज्य.

८. **संपत्तीवहन** : एका देशाकडून दुसऱ्या देशाकडे कोणताही भौतिक परतावा न मिळता होत असलेले संपत्तीचे वहन किंवा अपहरण.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. *(ब) लॉर्ड लिटन.*

२. *(ब) सुरेंद्रनाथ बॅनर्जी.*

३. *(क) मद्रास महाजन सभा.*

४. *(ब) दादाभाई नौरोजी.*

५. *(अ) ७२.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. *(क) दादाभाई नौरोजी.*

२. *(क) अलाहाबाद.*

३. *(क) दादाभाई नौरोजी.*

४. *(अ) इंडिया.*

५. *(ब) संपत्ती वहनाचा.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

१. *(क) लोकमान्य टिळक.*

२. *(ड) सैय्यद हैदर रझा.*

३. *(ब) आचार्य प्रफुल्लचंद्र रे*

४. *(अ) डॉ. ॲनी बेझंट.*

५. *(क) डॉ. ॲनी बेझंट.*

## १.५ सारांश

१८५७ च्या उठावानंतर भारतात मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय जाणिवा निर्माण होऊ लागला. त्यातून भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला. या राष्ट्रवादाचा परिणाम म्हणजे सन १८८५ मध्ये थापन झालेली अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना. तेव्हापासून भारताच्या राजकीय जीवनात एक नवा कालखंड सुरू झाला. अखिल भारतीय काँग्रेस या नावाचे एक संघटनात्मक व्यासपीठ अस्तित्वात आले आणि या व्यासपीठावरूनच भारताचा स्वातंत्र्य संघर्ष लढला गेला आणि या व्यासपीठावरूनच भारताला स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येईल.

काँग्रेसच्या सुरुवातीच्या काळातील मवाळ नेत्यांनी काँग्रेसला लोकप्रियता मिळवून देण्यासाठी परिश्रम घेतले. त्यांनी सनदशीर घटनात्मक मार्गाचा अवलंब करून अतिरेकी जहाल मार्गाकडे दुर्लक्ष केले. ज्यामुळे काँग्रेस याकाळात जिवंत राहू शकली आणि आपली संघटनात्मक बांधणी करून राष्ट्रवादाची पायाभरणी करू शकली.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला वसाहतवादी शासनाची शोषक निती भारतीयांच्या लक्षात आल्याने काँग्रेसमध्ये जहालमतवाद्यांचा उदय झाला. जहालमतवाद्यांनी ब्रिटिश वसाहतवादी शासना-विरुध्द निशस्त्र प्रतिकाराचा अवलंब करून काँग्रेसची संघटनात्मक बांधणी आणखी मजबूत केली. विसाव्या शतकाच्या सुरूवातीला सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीमुळे राष्ट्रीय चळवळीने फार मोठी मजल मारली. या चळवळीत प्रथमच स्त्रिया, विद्यार्थी तसेच संपूर्ण देशभरातील शहरी व ग्रामीण जनता फार मोठ्या संख्येने राजकारणात आली. राष्ट्रीय चळवळीतील बहुतेक सर्व प्रवाह या चळवळीच्या उदरातूनच पुढे आले. या चळवळीची व्याप्ती राजकारणापुरतीच मर्यादित नव्हती. कला, वाङ्मय, संगीत, विज्ञान व उद्योगधंदे या क्षेत्रातही एक नवे पर्व सुरू झाले. त्यामुळे भारतातील राजकीय बदलांचा तो एक महत्त्वाचा टप्पा ठरला. एकंदरीत स्वदेशी चळवळीने भारताच्या सर्वच क्षेत्रात क्रांतीकारी बदलाची सुरूवात केली.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील होमरूल चळवळ हा एक महत्त्वाचा टप्पा होता. स्वदेशी चळवळीने निश्चित केलेल्या स्वराज्याच्या मागणीला या चळवळीने आणखी मजबूत केले आणि स्वातंत्र्य लढ्याला गतिमानता आणली. या चळवळीमुळे राष्ट्रीय काँग्रेसला एक नवसंजिवनी मिळाली. कारण या चळवळीमुळे जहाल-मवाळ एक झाले आणि स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र झाला. होमरूल लीगच्या दबावामुळे ब्रिटिश सरकारला आपल्या धोरणात बदल करावा लागला. स्वदेशी चळवळ आणि महात्मा गांधीजींची असहकार चळवळ यामधील राजकीय पोकळी भरून काढून स्वातंत्र्य चळवळ सतत धगधगती ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होमरूल लीगने केले.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

- **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची कारणे थोडक्यात द्या.

२. काँग्रेसच्या स्थापनेपूर्वीच्या भारतातील वेगवेगळ्या राजकीय संघटनांचा आढावा घ्या.

३. मवाळांची कार्यपध्दती थोडक्यात सांगा?

४. मवाळवादी काँग्रेसच्या कार्याचा आढावा घ्या?

५. स्वदेशी चळवळीची माहिती थोडक्यात सांगा?

६. होमरूल चळवळीचा थोडक्यात आढावा घ्या?

- **टीपा लिहा.**

१. इंडियन असोसिएशन.

२. काँग्रेसची उद्दिष्ट्ये.

३. सुरक्षा झडपेचा विवाद.

४. मवाळवादी काँग्रेसचे इंग्लंडमधील कार्य.

५. मवाळ काँग्रेसचे मूल्यमापन.

६. स्वदेशी चळवळीच्या अपयशाची कारणे.

७. स्वदेशी चळवळीची फलनिष्पत्ती.

८. होमरूल चळवळीचे परिणाम.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **Chandra Bipin :** *'Rise and Grouth of Economic Nationalism in India'.*

२. **Tara Chand :** *'History of Freedom Movement in India'*, Government of India, New Delhi, 1972.

३. **सुमित सरकार :** *'आधुनिक भारत (१८८५-१९४७)'*, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, १९९३.

४. **डॉ. बी. एल. ग्रोव्हर, डॉ. एन. के. वेल्हेकर** : *'आधुनिक भारताचा इतिहास'*, एस. चन्द, २००२.

५. **बिपन चंद्र** : *''इंडियाज़् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स भारताचा स्वातंत्र्य संघर्ष,* के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००३.

६. **डॉ. माणिक लाल गुप्त** : *'आधुनिक भारत का इतिहास'*, साहित्य रत्नालय, कानपूर, २००७.

७. **वैद्य सुमन, कोठेकर शांता** : *'आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०),* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०००.

८. **गाठाळ एस. एच.** : *'आधुनिक भारताचा इतिहास'*, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०००.

९. **कदम य. ना. :** 'आधुनिक भारत', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

❑❑❑

सत्र-४ : घटक-२

# गांधी युग

## (Gandhian Era)

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ असहकार चळवळ

२.२.२ सविनय कायदेभंग चळवळ

२.२.३ चलेजाव चळवळ

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

१. महात्मा गांधीजींचा जीवनपट आणि विचारपट समजण्यास मदत होईल.

२. महात्मा गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतील कार्य समजावून घेता येईल.

३. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली जी तीन मोठी जनआंदोलने झाली, त्या आंदोलनाची पार्श्वभूमी, स्वरूप आणि वाटचाल या बाबी जाणून घेता येतील.

४. महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली सुरू झालेली 'असहकार चळवळ', 'सविनय कायदेभंग चळवळ' आणि 'चलेजाव चळवळ' या चळवळींच्या यशापयशाची माहिती समजेल.

## २.१ प्रास्ताविक

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील १९२० ते १९४७ या कालखंडाला 'गांधी युग' असे म्हटले जाते. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर राष्ट्रीय काँग्रेसचे व चळवळीचे नेतृत्व म. गांधीजींकडे आले. गांधीजींनी स्वातंत्र्यसंग्रामामध्ये नवनवीन तंत्राचा वापर करून सर्वसामान्य जनतेला या लढ्यात सहभागी करून घेतले. महात्मा गांधीच्या रचनात्मक व विधायक राजकयी चळवळीमुळे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. त्यावेळी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील गांधीजी हे एकमेव व्यक्ती होते की, त्यांचे नाव संपूर्ण भारतात व जगातील अनेक देशातील जनतेपर्यंत जाऊन पोहोचले होते. त्यांनी पुकारलेल्या लढ्यांमुळे संपूर्ण जगभर साम्राज्य आणि वर्चस्व असणाऱ्या शक्तीशाली इंग्रज सत्तेला शेवटी माघार घ्यावी लागली आणि देश स्वतंत्र झाला. गांधीजींनी हा लढा हाती शस्त्र न घेता अहिंसेच्या मार्गाने लढविला. हे जगातील पहिले यशस्वी आणि आदर्श उदाहरण होय. गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाची काही वैशिष्ट्ये विचारात घेता त्यांच्या नेतृत्वाखालील लढ्याला 'गांधीयुग' म्हटले जाणे साहजिकच आहे.

म. गांधीनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये एक नवे पर्व सुरू केले. हिंदु-मुस्लिम ऐक्याबरोबरच अस्पृश्यता निर्मूलन, जातीय राजकारणाला विरोध यासारख्या सैध्दांतिक तत्वज्ञानातूनच त्यांनी आपली जनआंदोलनाची चळवळ भारतामध्ये रुजविली. सुरुवातीला ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर विश्वास असणाऱ्या गांधीजींचा इंग्रजांनी विश्वासघात केला आणि त्यातून असहकाराच्या रुपाने महात्मा गांधीजीनी इंग्रज सरकारशी संघर्ष सुरू केला. पुढे सविनय कायदेभंग आणि चलेजाव चळवळीच्या रुपाने इंग्रजांना निर्वाणीचा इशारा दिला. जीवाची पर्वा न करता 'जिंकू किंवा मरू' या निर्धाराने करोडो भारतीयांनी या लढ्यात भागघेतला आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी या लढ्याला यश येऊन देश स्वतंत्र झाला. १५० वर्षे पारतंत्र्यात राहणाऱ्या भारताला मुक्त करण्यासाठी अहिंसा, सत्याग्रह या तत्वज्ञानाच्या आधारे चळवळीचा एक आदर्श मार्ग दाखविला. असहकार, सविनय कायदेभंग आणि चलेजाव या तीन चळवळींतून गांधी युगाचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. पण तत्पूर्वी गांधीजींचे पूर्वचरित्र, त्यांचे तत्त्वज्ञान, भारतातील प्रारंभिक कामगिरी थोडक्यात पाहणे आवश्यक वाटते.

## २.२ विषय विवेचन

### ❑ महात्मा गांधीजींचे चरित्र :-

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजरातमधील काठेवाड जिल्ह्यातील पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे आजोबा उत्तमचंद गांधी आणि वडील करमचंद हे अनुक्रमे पोरबंदर व राजकोट संस्थानांचे दिवाण होते. महात्मा गांधीजींच्या आईचे नांव पुतळीबाई असे होते. करमचंद गांधी यांना लक्ष्मीदास, रलिअत, करसनदास आणि मोहनदास ही चार

मुले होती. मोहनदास गांधी हे सर्वात लहान व शेवटचे अपत्य होते. पोरबंदर येथे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण घेत असतानाच त्यांचा वयाच्या तेराव्या वर्षी कस्तुरबांशी विवाह झाला. १८८८ ला कायद्याची पदवी मिळविण्यासाठी ते इंग्लंडला गेले. १८९१ ला 'बार-अॅट-लॉ' (बॅरिस्टर) पदवी घेऊन आल्यानंतर मुंबई व राजकोट येथे ते वकिली करू लागले. परंतु या दोन्ही ठिकाणी प्रयत्न करूनही वकिली व्यवसायात त्यांचा जम बसला नाही. विदेशी पेहरावात वावरणाऱ्या गांधीजींनी जवळजवळ दीड वर्षे वकिली व्यवसायात स्थिरावण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना व्यावसायिक स्थैर्य लाभले नाही. योगायोगाने त्याचवेळी पोरबंदर येथील एका मुस्लीम व्यापाऱ्याने गांधीजींची भेट घेतली. दक्षिण आफ्रिकेत दादा अब्दुल्ला या कंपनीच्या तेथील कोर्टात चाललेल्या एका खटल्यात वकिलाचे मदतनीस म्हणून काम करण्यासाठी महात्मा गांधीजींना बोलावणे झाले आणि ही संधी साधून त्यांनी दक्षिण आफ्रिकेस प्रयाण केले.

## ❑ दक्षिण आफ्रिकेतील कार्य :-

इ.स. १८९३ मध्ये वयाच्या चोविसाव्या वर्षी गांधीजी दक्षिण आफ्रिकेत आले आणि त्यांनी अब्दुला सेठ यांच्या सहकार्य व मार्गदर्शनानुसार वकिली व्यवसाय सुरू केला. दक्षिण आफ्रिकेत गेल्यावर त्यांना स्वत:ला वर्णद्वेषाचे चटके बसू लागले. त्याविरुध्द त्यांनी तेथे गोऱ्या लाकांच्या वर्णद्वेषी धोरणाविरुध्द आंदोलन उभे केले. पुढच्या काळात राजकीय स्वातंत्र्यासाठी हे प्रमुख हत्यार गांधीजींनी वापरले, त्या सत्याग्रहाचा पहिला अवलंब त्यांनी तेथेच केला.

दक्षिण आफ्रिकेतील नाताळ वसाहतीत वास्तव्यास असताना गांधीजींना तेथील भारतीय लोकांचे जीवन जवळून पाहता आले. भारतीय लोकांना इंग्रज सरकारकडून होणारे अन्याय, अत्याचार सहन करावे लागत होते. या अन्यायाविरुध्द गांधीजींनी सत्याग्रह केला. नाताळ येथील सरकारने भारतीय लोकांचा मतदानाचा अधिकार संपुष्टात आणणारा एक कायदा केला. तसेच दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या हिंदीना जिझिया करासारख्या 'पोल टॅक्स (Poll Tax) म्हणून वार्षिक ३ पौंड द्यावे लागत होते. तेथे राहणाऱ्या हिंदी लोकांना आपली ओळखपत्रे सतत जवळ बाळगण्याचे बंधन होते. गुन्हेगारांप्रमाणे त्यांच्या बोटाचे ठसेही या ओळखपत्रावर असत. हिंदी स्थलांतरितांना अन्यत्र स्थलांतरास बंदी घालणारा कायदा तेथील ब्रिटीश राजवटीने केला. त्याचप्रमाणे ख्रिश्चन धर्म, धार्मिक रीतिरिवाजानुसार नोंद न केलेले विवाह तेथील सरकारने अवैध ठरविले. त्यामुळे हिंदु-मुस्लिम अणि पारशी रिवाजानुसार झालेले तेथील विवाह बेकायदेशीर ठरले व त्यांची मुले, अनौरस ठरली. या अपमानकारक कायद्याविरुध्द गांधीजींनी चळवळ सुरू केली. हिंदी व आशियायी लोकांवरील अन्याय दूर करण्यासाठी तेथील ब्रिटीश राज्यकर्त्यांकडे अर्ज-विनंत्याद्वारे सनदशीर मार्गाचा अवलंब केला. त्याचप्रमाणे त्यांनी लोकांना संघटित करून 'नाताळ इंडियन काँग्रेस' या नावाची संघटना स्थापन केली व 'इंडियन ओपिनियन' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. वर्णद्वेषाचे

चटके सोसणाऱ्या तेथील लोकांमध्ये जागृती निर्माण केली. माणूस म्हणून त्यांना असणाऱ्या त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव करून देऊन अहिंसात्मक कायदेभंग, असहकार, सत्याग्रह असे मार्ग आक्रमित गांधीजींनी हा लढा जिंकला.

दक्षिण आफ्रिकेत इंग्रजांच्या गोऱ्या सरकारने गांधीजींचा खूप छळ केला, मारहाण, तुरुंगवास झाला, पण त्यांनी अहिंसेच्या मार्गाने सत्यागह चालूच ठेवला. यावेळी ना. गोखले यांनी सर्व भारतभर दौरा करून गांधीजींच्या कार्यास पाठिंबा दिला. तत्कालीन व्हॉईसरॉय हार्डिंग्ज यानेही दक्षिण आफ्रिकन सरकारवर टीका केली याचा परिणाम म्हणून गांधीजी, हार्डिंग्ज, सी.एफ.ॲन्ड्रयूज आणि जनरल स्मटस् यांच्यात एक करार घेऊन दक्षिण आफ्रिकन सरकारने पोलटॅक्स ओळखपत्रे विवाह वैधता कायदा रद्द करणे इत्यादी प्रमुख मागण्या मान्य केल्या. अहिंसा आणि नि:शस्त्र प्रतिकारातून केलेल्या सत्याग्रहाचा हा पहिला विजय होय.

## ❑ महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान :-

खरेतर महात्मा गांधीजींचे जीवन हेच एक तत्वज्ञान आहे. ते जसे बोलत तसेच वागत. त्यात कधीच विसंगती नव्हती. त्यांनी अनेक धर्म, पंथ व संप्रदायांचा अभ्यास केलेला होता यांच्यामधून त्यांनी काही विचार, प्रेरणा व तत्वे आत्मसात केली होती. सत्यनिष्ठा, सहिष्णुता, विनम्रपणा, कणखरपणा, आदर्शवाद, व्यवहारचातुर्य, शिस्तप्रियता, दीनदुबळ्यांबद्दल अपार सहानभुती, व्यक्ती नव्हे तर वृत्तीला विरोध असे अनेक असामान्य गुण त्यांच्याकडे होते.

गांधीजींनी लेख, भाषणे, मुलाखती, पत्रव्यवहार, छोट्या पुस्तिका आदींद्वारे भरपूर लिखाण केले आहे. 'माझं सत्याचे प्रयोग' हे गांधीजींचे आत्मचरित्र अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. वृत्तपत्राचे महत्त्व गांधीजीने ओळखले होते. म्हणून दक्षिण आफ्रिकेत 'Indian Opinion' व भारतात 'Young India', 'नवजीवन', 'हरिजन' ही वृत्तपत्रे त्यांनी स्वत:च्या संपादकत्वाखाली चालविली. गांधीजींनी आपले तत्त्वज्ञान या वृत्तपत्रांच्या माध्यमातून सार्वजनिक सभा, विविध कार्यक्रम, पत्रकारांना मुलाखती देऊन मांडले. त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान, सत्य, अहिंसा, सत्याग्रह या वैशिष्ट्यांतून स्पष्ट करता येईल.

### ☼ सत्य :-

गांधी तत्त्वज्ञानाचा पाया सत्यावर आधारित आहे. या तत्त्वज्ञानात गांधीजींवर टॉलस्टॉलचा प्रभाव होता. सत्य व अहिंसा एकमेकांपासून अविभाज्य आहेत असे गांधीजी मानत तरीही अहिंसा हे साधन व सत्य हे साध्य आहे असे स्पष्टीकरण ते देतात. टॉलस्टॉयच्या 'किंगडम ऑफ गॉड' या ग्रंथामधील 'ईश्वराचे साम्राज्य तुमच्यात आहे' या संदेशाने गांधीजी भारावले होते. सत्याचे खरे उपासक ह्या नात्याने गांधीजी 'सत्य म्हणजे ईश्वर आणि ईश्वर म्हणजे सत्य यावर श्रध्दा ठेवीत.

### ☼ अहिंसा :-

गांधीजींच्या मते सत्य व अहिंसा या दोन्ही गोष्टी एकमेकांस पूरक आहेत. सत्य हे साध्य तर अहिंसा हे साधन होय. 'अहिंसा' या आपल्या तत्वाचे विश्लेषण त्यांनी १९२० साली 'यंग इंडिया' या साप्ताहिकात केले आहे. त्यानुसार अहिंसा म्हणजे भित्रेपणा अजिबात नव्हे. कोणत्याही प्राणिमात्राला विचाराने, शब्दाने किंवा कृत्याने न दुखविणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसेच्या मार्गानेच सत्याकडे जाता येते.

### ☼ सत्याग्रह :-

गांधीजीनी आपल्या राजकीय चळवळीत सत्याग्रहाला फार मोठे महत्त्व दिले. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी आग्रह करणे होय. 'सत्याग्रह' हा प्रत्यक्ष कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. सत्याग्रहाचे पहिले तत्व हेच की, सत्याचा शोध घेताना, शत्रूशी वागतानाहिंसेचा अवलंब करू नये, तर सहानुभूतीपूर्वक त्याला चुकांपासून परावृत्त करावे. सत्य व अहिंसा या दोन्ही तत्त्वांचा मिलाफ म्हणजे सत्याग्रह ही सत्याग्रह या तत्त्वज्ञानाची त्यांची मूळ भूमिका आहे. गांधीजीनी अवलंबिलेल्या सत्याग्रह तंत्राचा मुख्य भाग निर्भयता होती. जनतेच्या मनातून पोलिस, गुप्तचर, तुरुंग, सरकारी अधिकारी ह्यांच्याबद्दलची भिती काढून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न होता. गांधीजींनी असहकार, सविनय कायदेभंग, स्वदेशी, हरताळ व बहिष्कार या सत्याग्रहाच्या विविध मार्गांचा अवलंब केला.

## ❑ महात्मा गांधीजींची भारतातील प्रारंभिक कामगिरी :-

एप्रिल १८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत गेलेले गांधीजी वर्णद्वेषाविरोधीचा यशस्वी लढा करून बावीस वर्षांनी जानेवारी १९१५ मध्ये भारतात परतले. ते भारतात येण्यापूर्वीच त्यांची येथील जनतेत आणि काँग्रेस पुढाऱ्यातही 'एक यशस्वी नेता' अशी प्रतिमा होती. म. गांधीजी गोपाळ कृष्ण गोखले यांना आपले राजकीय गुरू मानत होते. गांधीजी भारतात परतले ते नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आग्रहाने-गांधीजींना नामदार गोखल्यांनी सुचविले की, एक वर्षभर कोणतीही सार्वजनिक चळवळ हाती न घेता तटस्थपणे संपूर्ण परिस्थितीचे अवलोकन, निरीक्षण करावे आणि मग चळवळ हाती घ्यावी त्यामुळे गांधीजींनी सर्वप्रथम संपूर्ण भारत फिरून पाहिला व भारतातील परिस्थितीचा अंदाज घेतला. संपूर्ण देशभर भ्रमंती केल्यानंतर त्यांना एका गोष्टीची जाणीव झाली की, भारत हा शहरात विभागला नसून तो बहुतांशी खेड्यात विभागला आहे. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात ग्रामीण समाज आल्याशिवाय चळवळीला जोर येणार नाही, याची कल्पना त्यांना आली. १९१६ साली त्यांनी साबरमती आश्रम स्थापन केला. महात्मा गांधीजींनी अशिक्षित व मागासलेल्या समाजात राजकीय जागृती करण्याचे कार्य हाती घेतले. हे कार्य यशस्वी पध्दतीने करण्यासाठी त्यांनी आपला देश व जीवन पध्दतीत बदल केला. गांधीजींनी खालीलप्रमाणे प्रारंभिक लढे दिले.

## ❑ चंपारण्य सत्याग्रह (१९१७) :-

बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यात युरोपियन मळेवाले भारतीय शेतकरी व मजुरावर अन्याय अत्याचार करत होते. एकूण जमिनीच्या ३/२० भागावर नीळीची लागवड केलीच पाहिजे व त्यातून आलेले उत्पादन ब्रिटीश मळेवाले सांगतील त्या किमतीला विकले पाहिजे, अशी त्यांनी शेतकऱ्यांवर सक्ती केली होती. राजकुमार शुक्ल या स्थानिक नेत्याने गांधीजींची भेट घेऊन त्यांनी चंपारण्यला यावे व त्या प्रांतात लक्ष घालावे अशी विनंती केली. त्यानुसार राजेंद्र प्रसाद, ब्रिनकिशोर प्रसाद, मझरूल हक, जे.बी.कृपलानी, महादेवभाई देसाई, नरहरी पारिख यांच्यासहित गांधीजी चंपारण्यामध्ये आले आणि तेथील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष परिस्थितीची त्यांनी चौकशी करण्यास सुरूवात केली. सरकारने गांधीजींना चंपारण्यात प्रवेश करण्यास मनाई केली होती. गांधीजींवर प्रवेश बंदी हुकूम मोडल्याबद्दल खटला भरण्यात आला. या खटल्याने सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले. शेवटी लोकमताच्या दडपणामुळे सरकारला हा खटला काढून घ्यावा लागला. एवढेच नाही तर चंपारण्यामधील शेतकरी व मजुरांवरील अन्याय दूर करण्यासाठी एक कायदा पास करावा लागला.

## ❑ खेडा सत्याग्रह (१९१८) :-

चंपारण्यमधील विजयानंतर महात्मा गांधीनी गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी धाव घेतली. खेडा जिल्ह्यात १९१८ साली दुष्काळ पडला होता. तरीही तेथील शेतकऱ्यांवर शेतसारा महसुलीची सक्ती करण्यात आलेली होती. शेतकऱ्यांनी दुष्काळी नियमानुसार शेतसारा रद्द करण्याची मागणी केली, पण सरकारी अधिकाऱ्यांनी त्यास दाद दिली नाही म्हणून गांधीजींनी तेथे साराबंदीची चळवळ सुरू केली. याचवेळी सरदार वल्लभभाई पटेल आपली भरपूर पैसा मिळवून देणारी वकिली सोडून गांधीजींच्याबरोबर प्रथमच सत्याग्रहात उतरले. शेवटी सरकारला माघात घेऊन शेतकऱ्यांची सारामाफीची मागणी मान्य करावी लागली.

## ❑ अहमदाबाद कापड गिरणी कामगारांचा संप (१९१८) :-

अहमदाबाद येथील कापड गिरणी मालक प्रचंड नफा मिळवत असत; परंतु नफ्याचा लाभ कामगारांना न मिळता उलट त्यांची आर्थिक पिळवणूक होत असे. अहमदाबादचे गिरणीमालक अंबालाल साराभाई हे गांधीजींचे मित्र होते. पण त्यांच्याही गिरणीतील कामगारांना अल्प पगार मिळे. गांधीजींच्या सांगण्यावरून कामगारांनी संप पुकारला. गांधीजीही उपोषणास बसले. चार दिवसांच्या उपोषणानंतर गिरणी मालक व कामगार यांच्यात तडजोड होऊन कामगारांचा पगार ३५ टक्क्यांनी वाढविण्यात आला. गांधीजींच्या आयुष्यातील हा पहिला उपोषण सत्याग्रह होता. या आंदोलनात अंबालाल साराभाई भगिनी अनसूयाबेन या गांधीसोंबत उपोषणास बसल्या होत्या.

चंपारण्य, खेडा व अहमदाबाद तीन घटनाप्रसंगी गांधीजींनी सत्याग्रहाचा प्रयोग केला व त्यांना यशही मिळाले. त्यामुळे सत्याग्रह हे अन्यायाविरुध्द लढण्याचे एक साधन म्हणून त्याची उपयुक्तता सिध्द झाली. गांधीजींचा उत्साहही दुणावला. भारतीय जनतेच्या समस्यांच्या जवळून अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. त्याचप्रमाणे त्यांच्यासंबंधी जनसामान्यात: आदर निर्माण झाला.

## २.२.१ असहकार चळवळ (Non-Co-operation Movement)

महात्मागांधीजी भारतात आल्यानंतर सुरुवातीच्या काळात गांधीजींचा ब्रिटिशांच्या न्यायबुध्दीवर विश्वास होता. ते देतील त्या सुधारणा स्वीकारून आपला विकास होईल. त्यासाठी इंग्रज सरकारला सर्हा केले पाहिजे असे त्यांचे मत होते. 'ब्रिटीश साम्राज्याचा नागरिक' म्हणवून घेण्यात त्यांना अभिमान वाटत होता आणि म्हणूनच १९१९ च्या सुधारणा राबवण्यास सी.आर.दास, बिपीनचंद्र पाल इत्यादी नेत्यांचा विरोध असतानाही गांधीजींनी मात्र या सुधारणा राबवाव्यात असे प्रतिपादन केले होते. पण अशा काही घटना घडल्या आणि सरकारने असे काही निर्णय घेतले की, सहा महिन्यात गांधीजींचा इंग्रजांवरील विश्वास उडाला आणि त्यांनी इंग्रज सरकारविरुध्द संघर्षाचा निर्णय घेतला यातूनच गांधीजींनी असहकार चळवळ पुकारली.

### ❑ असहकार चळवळीची कारणे :-

### १. राष्ट्रवादाची प्रखर भावना :-

पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी स्वयंनिर्णयाचे तत्व जाहीर केले. हे तत्त्व भारतालाही लागू करण्यात येईल असे भारतीयांना वाटत होते. भारतीयांच्या स्वराज्याबद्दल ब्रिटीशांनी दुटप्पी भूमिका घेतली. युद्धकाळात भारतीय सैनिकांचा पाश्चात्त्य देशांशी संबंध आला. त्यामुळे स्वातंत्र्यासाठी त्यांच्यामध्ये राष्ट्रवाद निर्माण आला.

### २. बिकट अर्थव्यवस्था :-

पहिल्या महायुद्धात कोट्यावधी रुपये खर्च झाले होते. युद्धाचा खर्च परस्पर भागविण्यासाठी भारतीयांवर भरमसाठ कर आकारण्यात आले. महागाई, दुष्काळ, प्लेग, आवश्यक वस्तूंचा तुटवडा इत्यादीमुळे लोकांच्यात असंतोष वाढू लागला आणि लोक ब्रिटीशांविरुध्द लढा देण्यास प्रयत्न होऊ लागले.

### ३. माँटफर्ड कायद्याने केलेली निराशा :-

ब्रिटीश सरकारने १९१९ साली माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायद्याने भारतीयांना काही राजकीय

सुधारणा दिल्या मात्र त्या फारच जुजबी होत्या. या कायद्याने भारतीयांची घोर निराशा झाली. द्विदल राज्यपध्दती निर्माण करून जबाबदार राज्यपध्दती दिल्याचे घोषित होते. परंतु प्रत्यक्षात सुधारणा दिलेल्या नव्हत्या, तो फक्त देखावा होता.

## ४. रॉलेट कायदे :-

पहिल्या महायुद्धाच्या काळात सरकारने राजद्रोह्यांना आळा घालण्यासाठी खास भारत सुरक्षा कायदा (Defence of India Act) निर्माण केला होता. हा कायदा महायुध्द संपताच रद्द करण्यात येणार होता. मात्र महायुद्ध संपल्यानंतरही भारतातील ब्रिटीशांविरोधी क्रांतिकाही कारवाया संपण्याऐवजी वाढतच गेल्या. म्हणून हिंदी लोकांच्या राजद्रोही वृत्तीला आळा घालण्यासाठी सरकारने १० डिसेंबर १९१८ रोजी सिडने रॉलेट या न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन गेली. तिच्या शिफारशीनुसार १९१९ साली सरकारने दोन कायदे केले. त्याला रॉलेट कायदे म्हणतात. या कायद्यानुसार कोणत्याही राजद्रोही व्यक्तीवरील खटला चालविण्यासाठी तीन न्यायाधीशांचे एक खास न्यायपीठ स्थापन करण्यात येणार होते. या कोर्टाने दिलेल्या निर्णयाविरुध्द अपील करता येणार नव्हते. कोणत्याही व्यक्तीला केवळ संशयावरून सरकारात जामीन देण्याची, अथवा आपले राहते ठिकाण न सोडणे. पोलीस कचेरीत रोज हजेरी लावणे, इत्याबीबाबत प्रांत सरकार सक्ती करू शकेल, तसेच वॉरंटाशिवाय अटक करण्याचा या सरकारला अधिकार वाटेल. थोडक्यात न्यायतत्त्वांची व व्यक्तिस्वातंत्र्याची पायमल्ली करणारे हे कायदे होते.

खरेतर अशा कायद्यांची अजिबात गरज नव्हती, पण चळवळ दडपून टाकणे हाच सरकारचा उद्देश होता. या कायद्यामुळे जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला. काळा कायदा (Black Bills) म्हणून रॉलेट बिलाचा सर्वत्र निषेध व्यक्त केला होता. हे कायदे सरकारने पास केले तर आपण देशभर सरकारविरोधी आदोलन उभारू असा इशाराही त्यांनी दिला होता. तरीही हा कायदा पास करण्यात आला. या कायद्याच्या विरोधात ३० मार्च १९१९ रोजी गांधीजींनी देशव्यापी हरताळ करण्याचे ठरविले.

## ५. जालियनवाला बाग हत्याकांड :-

या देशाच्या इतिहासातील एक अत्यंत क्रूर, अमानवी, कटू घटना म्हणजे १९१९ चे जालियनवाला बाग हत्याकांड होय. त्याचे नावच हत्याकांड आहे, यावरून ते किती भयानक असेल याची कल्पना येते. रॉलेट ॲक्टविरोधी चळवळीचा पंजाबमध्ये फारच जोर होता. युध्दासाठी सक्तीची सैनिक भरती व दहशतवादी चळवळीमुळे पंजाबमध्ये वातावरण तापले होते. पंजाबचे गर्व्हनर मायकेल ओडवायर यांनी पंजाबचे नेते डॉ. सैफुद्दीन फैझल व डॉ. सत्यपाल यांना अटक केली होती. त्यांची मुक्तता करा या मागणीसाठी जनतेने मोर्चा काढला, सभा घेतल्या. पण त्यावरही गोळीबार केला. जनतेने या घटनेनंतर सरकारी कार्यालयास आगी लावल्या. फोनच्या तारा तोडल्या, सरकारची दडपशाही चालूच राहिली. १२ एप्रिल १९१९ ला पंजाबचा गव्हर्नर ओडवायरने सार्वजनिक मोर्चा व सभा यांना बंदी घालणारा हुकूम

काढला. सरकारच्या या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी १८ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथील जालियनवाला बाग येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. २० हजार लोक सभेला आले होते. सभेच्या ठिकाणी जाणारा एकच अरुंद मार्ग होता. बाकी सर्व बाजूंनी पटांगण बंदिस्त होते. सभा चालू असता जनरल डायर या इंग्रज अधिकाऱ्याने गाड्या उभ्या करून रस्ता बंद केला आणि जमावावर क्रूरपणे गोळीबार सुरू केला. १६०० फैरी झाडल्या आणि पुढे दारुगोळाच संपला त्यामुळे डायरला गोळीबार बंद करावा लागला. शेकडो निष्पाप लोक मृत्यू पावले. हजारो जखमी झाले. मृतांचा सरकारी आकडा ४०० होता. वस्तुत: यात १००० लोक मरण पावल्याचे लाला गिरीधारी यांनी आपल्या साक्षीत म्हटले आहे.

या हत्याकांडाने सर्व समाज हादरून गेला. देशात सर्वत्र संतापाची एकच लाट उसळली. सरकारी दडपशाहीची पर्वा न करता लोकांनी या हत्याकांडाचा ठिकठिकाणी जाहीर निषेध केला. इंग्रजांच्या न्यायबुध्दीवर विश्वास असणाऱ्या म. गांधींसारख्या व्यक्तीचीही श्रध्दा नष्ट झाली. इंग्रजांच्या अमानुष जुलमाविरुध्द म. गांधींनी आपली शक्ती पणास लावण्याचे ठरविले.

## ६. हंटर कमिशन :-

जालियनवाला बाग हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी ब्रिटीश सरकारने 'हंटर कमिशन' नेमले. लॉर्ड हंटर यांच्या अध्यक्षतेखाली हे कमिशन नेमण्यात आले. या समितीत ६ सदस्यांपैकी ३ भारतीय सदस्य होते. या हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी काँग्रेसनेसुध्दा एक समिती नियुक्त केली. या समितीत मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास, बॅ. जयकर, अब्बास तय्यबजी, फजलूल हक व महात्मा गांधीजी हे सदस्य होते. काँग्रेसने व हंटर कमिशनने अहवाल सादर केले. काँग्रेसने या हत्याकांडात जनरल डायरला जबाबदार धरले, परंतु शासनाने हंटर कमिशनचा अहवाल ग्राह्य मानला. पंजाबचा ले.ग. ओडवायरला कोणतीही शिक्षा दिली गेली नाही. जन. डायरला दोषी ठरवून सेवानिवृत्त केले. मात्र भारतातील युरोपियनांनी डायरला 'इंग्रज साम्राज्याचा त्राता' ठरवून त्याच्यासाठी फंड उभारला. या अहवालाविरुध्द भारतात तीव्र असंतोष पसरला. गांधीजीनी आता सरकारविरुध्द आंदोलन करायचे ठरविले.

## ७. खिलाफत चळवळ :-

पहिल्या महायुध्दात तुर्कस्तानने जर्मनीच्या बाजूने म्हणजेच इंग्लंडच्या विरोधात भाग घेतला होता. जगातील सर्व मुस्लिम लोकांचे तुर्कस्तान हे प्रमुख श्रध्दास्थान होते. तुर्कस्तानच्या सुलतानाला जगातील सर्व मुसलमान आपला धर्मगुरू म्हणजे खलिफा मानत असत. भारतीय मुस्लिमांना तुर्कस्तानच्या विरुध्द लढण्याची वेळ आली, तेव्हा तुर्कस्तानच्या सुलतानाच्या सत्तेला धोका पोहणार नाही. तुर्की साम्राज्य हिरावले जाणार नाही, असे आश्वासन ब्रिटिशांनी भारतीय मुस्लिमांना दिले, म्हणून भारतीय मुस्लिमांनी ब्रिटीशांना महायुध्दात सहकार्य केले. तथापि, युद्ध समाप्तीनंतर इंग्लंडच्या सरकारने हे आश्वासन पाळले

नाही. त्याविरुध्द भारतीय मुस्लिमांनी खिलाफत चळवळ उभारली. यानुसार तुर्की सुलतानाची सत्ता टिकवावी. या मागणीसाठी सुरू झालेल्या या चळवळीस राष्ट्रीय काँग्रेसने म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली पूर्ण पाठिंबा दिला. दिल्ली येथे नोव्हेंबर १९१९ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे अध्यक्ष म्हणून गांधीजींची निवड करण्यात आली. तुर्कस्तानचा प्रश्न सोडविला नाही तर असहकाराचा मार्ग अवलंबिण्यात येईल असा इशारा या परिषदेत देण्यात आला. डिसेंबर १९१९ मध्ये अमृतसरला राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात मुस्लीम नेते हजर राहिले. राष्ट्रीय काँग्रेस व खिलाफत यांनी एकत्रितपणे ब्रिटीश शासनाशी असहकार पुकारण्याचे ठरविण्यात आले.

## ❑ १९२० च्या असहकार चळवळीचे स्वरूप :-

जालियनवाला बागेतील हत्याकांड, सरकारची अमानुष दडपशाही, खिलाफत चळवळ या कारणांमुळे देशात इंग्रज सरकारविरोधी वातावरण तयार झाले होते. जनमत पूर्णपणे सरकारच्या विरोधात गेले होते. विश्वासघातकी व जुलमी सरकारविरुध्द आता संघर्षच केला पाहिजे असे जनतेलाही वाटू लागले. जनतेच्या या भावना विचारात घेऊन महात्मा गांधीनी असहकाराची चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला.

## ❑ कलकत्ता अधिवेशन (४ सप्टेंबर १९२०) :-

४ सप्टेंबर १९२० रोजी कलकत्ता येथे राष्ट्रीय काँग्रेसचे खास अधिवेशन भरले या खास अधिवेशनात गांधीजीनी असहकाराचा ठराव मांडला आणि तो पास झाला.

## ❑ नागपूर अधिवेशन (डिसेंबर १९२०) :-

२६ डिसेंबर १९२० रोजी काँग्रेसचे नियमित वार्षिक अधिवेशन नागपूर येथे भरले. त्या अधिवेशनास १४००० प्रतिनिधी उपस्थित होते. नागपूर अधिवेशनात बॅ. जीना, मदनमोहन मालवीय, ॲनी बेझंट, बिपीनचंद्र पाल, तसेच टिळक अनुयायी खापर्डे, अणे, मुंजे आदी नेत्यांचा असहकार चळवळीस विरोध असतानाही ही चळवळ सुरू करण्याबाबतचा ठराव या अधिवेशनात मंजूर झाला.

## ❑ असहकार चळवळीचा कार्यक्रम :-

१. ब्रिटीश सरकारने दिलेल्या पदव्या, मान-सन्मान, सहकार नियुक्त जागांचा त्याग करणे.

२. सरकारी सभारंभावर बहिष्कार टाकावा.

३. सरकारी शाळा, महाविद्यालयावर बहिष्कार टाकणे, देशात विविध ठिकाणी राष्ट्रीय शैक्षणिक संस्था, शाळा व महाविद्यालये स्थापन करणे.

४. न्यायालयांवर बहिष्कार व खाजगी पंचायतींची स्थापना.

५. कायदे मंडळावर व मतदानावर बहिष्कार.

६. ब्रिटीश मालावर बहिष्कार टाकावा.

७. इंग्रजांच्या मेसापोटेमियात कोणाही हिंदी माणसाने नोकरीवर जाऊ नये.

८. सरकारी सभारंभावर बहिष्कार टाकावा.

नागपूर येथे आलेल्या अधिवेशनात असहकाराचा ऐतिहासिक ठराव संमत करण्यात आला. राष्ट्सभेने स्वीकारलेला असहकाराचा ठराव जर प्रामाणिकपणे अंमलात आणला तर आपण हिंदुस्थानला एका वर्षात स्वराज्य मिळवून देऊ असा प्रचार म. गांधीनी आपल्या लिखाणातून व भाषणामधून स्वत: केला.

## ❑ असहकार चळवळीची वाटचाल :-

ऑगस्ट १९२० ते १२ फेब्रुवारी १९२२ पर्यंत जवळजवळ दीड वर्ष चळवळ चालू होती.

### ☼ पदव्या व मानसन्मानाचा त्याग :-

या चळवळीमुळे अनेक राष्ट्रप्रेमी भारतीय नागरिकांनी सरकारकडून मिळालेल्या पदव्या व मानसन्मानाचा त्याग केला. गांधीजींनी ब्रिटीशांनी दिलेला 'कैसर-ए-हिंद' हा किताब परत केला. रविंद्रनाथ टागोरांनी 'सर' या पदवीचा त्याग केला. सुभाषचंद्र बोस यांनी आय.सी.एस.चा त्याग करून राजीनामा दिला. अनेकांनी वकिली सोडून दिली व न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकला.

### ☼ कौन्सिलच्या निवडणुकांवर बहिष्कार :-

माँटफर्ड सुधारणा कायद्यानुसार नोव्हेंबर १९२० मध्ये निवडणुका झाल्या. काँग्रेसने बहिष्कार घातला, मात्र काही राजकीय पक्षांनी यात भाग घेतला. राजनिष्ठ, जातीयवादी व संधीसाधू लोकांनी जरी निवडणूकांत भाग घेतला असला तरी सर्वसामान्य जनतेने असहकार चळवळीस पाठिंबा दिला व मतदारांपैकी २/३ मतदारांनी मतदान केले नाही.

### ☼ सरकारी शाळांवर बहिष्कार :-

हजारो विद्यार्थी शाळा व महाविद्यालये सोडून बाहेर पडले व काहीनी राष्ट्रीय शाळांत नावे घातली तर काहींनी राष्ट्रीय चळवळीत उडी घेतली. काँग्रेसने व इतर संस्थांनी ठिकठिकाणी राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन केल्या.

## ☼ प्रिन्स ऑफ वेल्सवर बहिष्कार :-

भारतातील राजकीय असंतोष कमी करण्याच्या उद्देशाने ब्रिटीश राजपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स यांचे १७ नोव्हेंबर १९२१ रोजी मुंबईत आगमन झाले. तेव्हा युरोपियन अधिकारी व व्यापारी, संस्थानिक, व्यापारी, फारशी त्यिादी राजनिष्ठ लोकांनी त्यांचे स्वागत केले. काँग्रेसने त्याच्या भेटीवर बहिष्कार टाकला. भारतीय लोकांनी त्यांचे स्वागत हरताळ फासून केले तसेच त्यांच्या सर्व समारंभावर जनतेने बहिष्कार टाकला.

## ❑ विधायक स्वरूपाचे कार्य :-

असहकार चळवळ विधायक आणि नकारात्मक अशा दोन्ही स्वरूपात राबविली गेली. स्वदेशीचा जोरदार पुरस्कार, प्रचार आणि अंमलबजावणी केली. म. गांधीनी लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ एक कोटीचा टिळक स्वदेशी फंड गोळा करण्याचा आदेश जनतेला दिला. या पैशातून २० लाख चरखे खरेदी करून ते खेडोपाडी स्वयंसेवकांना वाटण्यात आले. त्यामुळे खादीचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला. यामुळे हातमागाच्या व्यवसायाचे पुनरुज्जीवन होऊन ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला. याबराबेरच अस्पृश्यता निवारण, दारुबंदीचा प्रचार, हिंदू-मुस्लिम ऐक्य, काँग्रेसच्या सभासदांची नोदणी इत्यादीसाठी प्रचाराचे कार्य हाती घेतले.

## ❑ सी.आर.दास यांचे कार्य :-

बंगालमध्ये सी.आर.दास यांच्या नेतृत्वाखाली असहकाराची चळवळ सुरू झाली होती. सी.आर. दास यांचे पुत्र चित्तरंजन दास व सून वासंतदेवी यांनी स्वयंसेवक बनून प्रथम तुरुंगवास पत्करला एवढेच नव्हे तर दासांच्या पत्नीही चळवळीत सामील झाल्या. दास कुटुंबाचे देशप्रेम पाहून हजारो कार्यकर्ते चळवळीत सामील झाले. पोलिसांनी घटकसत्र अवलंबिले. सर्व तुरुंग भरून गेले तेव्हा नाईलाज होऊन कैदी सोडून देण्यात आले.

## ❑ सरकारची दडपशाही :-

असहकार चळवळीमुळे भारतीय जनतेत प्रचंड उत्साह संचारला. ही चळवळ भारतीय समाजाच्या सर्व स्तरापर्यंत जाऊन पोहचली. चळवळीने निर्माण केलेला व उत्साह पाहून सरकार हळूहळू दडपशाहीच्या मार्गाकडे झुकू लागले. अनेक नेत्यांवर भाषणबंदी, प्रवेश मनाई याबाबत नोटिसा बजावण्यात आल्या. सर्वत्र लाटीमार, धरपकड व गोळीबाराचे सत्र सुरू केले. सरकारच्या या दडपशाही धोरणामुळे शांततामय वातावरणात सुरू झालेल्या असहकार चळवळीला हिंसात्मक रूप येऊ लागले. गांधीजीनी व्हाईसरॉयना कळवले. 'दडपशाही' बंद करा अन्यथा साराबंदीच्या बार्डोली सत्याग्रहाला तयार राहा. त्याप्रमाणे गांधीजी

कार्यकर्त्यांसमवेत बार्डोलीस दाखल झाले. तेवढ्यात चौरीचोरा घटना घडली आणि असहकार चळवळ थांबवली गेली.

## ❑ असहकार चळवळीची स्थगिती :-

असहकार चळवळ चालू असतानाच मुंबई, मद्रास, धारवाड, नागपूर इत्यादी ठिकाणी हिंसक दंगली झाल्या. विशेषत: ५ फेब्रुवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचोरा येथे एका मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला, तयात काही लोक मारले गेले. तेव्हा संतप्त झालेल्या जमावाने पोलीस चौकीच पेटवून दिली. त्यात २१ पोलीस व एक फौजदार मरण पावले. या घटनेनंतर गांधीजीनी असहकार चळवळीचा हिंसात्मक स्वरूप येऊ लागले म्हणून ती स्थगित करण्याचा निर्णय घेतला. १८ फेब्रुवारी १९२२ रोजी बार्डोली येथे राष्ट्रीय काँग्रेसची बैठक घेऊन ही चळवळ स्थगित केल्याचे घोषित केले.

## ❑ असहकार चळवळीचे मूल्यमापन :-

महात्मा गांधीनी असहकार चळवळ पाठीमागे घेतली तरी ती पूर्णपणे अयशस्वी झाली असे म्हणता येणार नाही. या असहकार आंदोलनाने काय साधले आणि काय गमावले. त्या यशापयशाचा विचार खालीलप्रमाणे करता येईल.

### ☼ चळवळीच्या अपयशाची कारणे :-

१. चळवळ सुरू होण्यापूर्वी एका वर्षात स्वराज्य मिळवून देऊ असे गांधीजी म्हणाले होते. परंतु एवढ्या सामर्थ्यशाली ब्रिटीश साम्राज्याला लढा देऊन एक वर्षात स्वराज्य मिळविणे अवघड होते.

२. हे आंदोलन खिलाफत चळवळीशी जोडले गेले. मुस्लिमांचा पाठिंबा मिळावा हा त्यामागे हेतू होता. पण ती चूक ठरली. खरेतर खिलाफत प्रांत धार्मिक होता आणि असहकार चळवळ राजकीय स्वरूपाची होती. तेव्हा धर्मकारणाची राजकारणाशी सांगड घालणे योग्य नव्हते.

३. चळवळ जोमात चालू असताना ती अचानकपणे स्थगित केली. त्यामुळे काँग्रेसमधील नेत्यांचा व जनतेची निराशा झाली.

४. सत्याग्रहाचे प्रशिक्षण न देताच चळवळीला प्रारंभ केला गेला.

५. ब्रिटिशांनी पाशवी बळाचा, शस्त्रास्त्रांचा वापर करून ही चळवळ दडपून टाकली.

६. या चळवळीला सुरुवातीपासूनच काँग्रेसमधील काही उदारमतवादी नेत्यांनी विरोध केला. विरोधी नेत्यांच्या भूमिकेमुळे हे आंदोलन अयशस्वी झाले असेच म्हणावे लागेल.

७. कायदे मंडळाच्या निवडणुकांवर काँग्रेसने बहिष्कार टाकला होता. मात्र काँग्रेसशिवाय इतर पक्षांशी कायदे मंडळाच्या निवडणुका लढवून कायदे मंडळात प्रवेश केला होता. काँग्रेसचा निवडणुकांवर बहिष्कार टाकून तोटाच झाला. आपला आवाज प्रतिनिधीमार्फत कायदे मंडळात न उठवता आल्यामुळे हे आंदोलन अयशस्वी झाले.

८. पदव्या, मानसन्मानाचा त्याग करणे, बहिष्कार घालणे, चळवळीत महत्त्वाचे होते. अनेकांनी तसे केलेही पण त्यांचे प्रमाण कमी होते. सर्वांनी याप्रमाणे केले असते तर चळवळ अधिक प्रभावी व परिणामकारक ठरली असती.

## ☼ असहकार चळवळीचे महत्त्व/कामगिरी/परिणाम :-

असहकार चळवळ अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. जरी या चळवळीला अपयश आले तरी या चळवळीने बरेच काही साध्य केले.

१. ही चळवळ सर्वसामान्यांपर्यंत जाऊन पोहचली.

२. काँग्रेस कृतिशील बनली.

३. सरकारची भिती नष्ट झाली.

४. ब्रिटीश साम्राज्याला प्रतिकार करण्याची आपल्यामध्ये शक्ती आहे असा आत्मविश्वास निर्माण झाला.

५. या चळवळीने महात्मा गांधी यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले.

६. सनदशीर चळवळीचे पर्व संपून जनआंदोलनाचे पर्व सुरू झाले.

७. पदव्या व मानसन्मान याबद्दल तिरस्कार निर्माण झाला.

८. राष्ट्रीय शिक्षण संस्थाना उत्तेजन मिळाले.

९. ब्रिटीश सरकारच्या धोरणात बदल झाला.

१०. देशी उद्योगधंद्यांना प्राधान्य मिळाले.

११. विधायक कार्यांना प्रारंभ झाला.

१२. भारतीय राष्ट्रवादाला गती मिळाली.

एकंदरीत ही चळवळ संपूर्ण यशस्वीही झाली नाही आणि संपूर्ण अयशस्वीही झाली नाही. मात्र या चळवळीमुळे राष्ट्रीय चळवळीला वेग आला असे म्हणावे लागेल.

## * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ *

❑ **अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दक्षिण आफ्रिकेत असताना म. गांधीजींनी कोणते वृत्तपत्र सुरू केले?

२. म. गांधीजींचे राजकीय गुरू कोण होते?

३. साबरमती आश्रमाची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली?

४. गांधीजींनी नि:शस्त्र प्रांतकाळाच्या शस्त्राचा वापर भारतात सर्वप्रथम कोठे केला?

५. गांधीजींच्या आयुष्यातील पहिला पोषण सत्याग्रह कोणता?

६. हंटर कमिशनची नियुक्ती कशासाठी करण्यात आली?

७. दिल्ली येथे नोव्हेंबर १९१९ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे अध्यक्ष म्हणून कोणाची निवड करण्यात आली?

८. म. गांधीजींनी कोणत्या अधिवेशनात असहकार चळवळीचा ठराव मांडला?

९. 'कैसर-ए-हिंद' हा किताब कोणी सरकारला परत दिला?

१०. म. गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित करण्याचा निर्णय केव्हा घेतला?

❑ **ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१. १८९३ साली वकिली व्यवसायासाठी म. गांधी ................ येथे गेले.

*अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) अमेरिका ड) द. आफ्रिका.*

२. म. गांधीनी 'नाताळ इंडियन काँग्रेस' या नावाची संघटना ............... या देशात स्थापन केली.

*अ) भारत ब) इंग्लंड क) द. आफ्रिका ड) फ्रान्स.*

३. भारतीय लोकांच्या राजद्रोही कारवायांना आळा घालण्यासाठी ............. यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती सरकारने नेमली.

*अ) ओडवायर ब) मि. रौलेट क) डायर ड) प्रिन्स ऑफ वेल्स.*

४. जालियनवाला बाग हत्याकांडासाठी ............. यास जबाबदार धरले जाते.

*अ) मॅक्डोनाल्ड ब) जनरल डायर क) लॉर्ड चेम्सफर्ड ड) लॉर्ड हार्डिंग्ज.*

५. ............... रोजी अमृतसरमधील जनतेने जालियनवाला बाग येथे सभा भरविली.

*अ) १३ एप्रिल १९१९* *ब) १५ एप्रिल १९१९*

*क) १३ ऑगस्ट १९१९* *ड) १५ ऑगस्ट १९२०.*

६. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तान ............. च्या बाजूला होते.

*अ) इंग्रज* *ब) फ्रेंच* *क) भारत* *ड) जर्मनी.*

७. रविंद्रनाथ टागोर यांनी .............. या किताबाचा त्याग केला.

*अ) कैसर-ए-हिंद* *ब) सर* *क) आय.ए.एस.* *ड) आर.सी.एस.*

८. असहकार चळवळीमध्ये .............. समावेश नव्हता.

*अ) हिंसाचार* *ब) ब्रिटीश मालावर बहिष्कार*

*क) निवडणूकांवर बहिष्कार* *ड) सरकारी शाळांवर बहिष्कार.*

९. असहकार चळवळीच्या वेळी लोकमान्य टिळकांचे नावे ............ उभारला गेला.

*अ) स्वदेशी फंड* *ब) बहिष्कार फंड* *क) स्वातंत्र्य फंड* *ड) चरखा फंड.*

१०. असहकार चळवळीच्या काळात ................ येथे घडलेल्या हिंसक घटनेमुळे म. गांधीनी असहकार चळवळ मागे घेतली.

*अ) चंपारण्य* *ब) बार्डोली* *क) खेडा* *ड) चौरीचौरा.*

## २.२.२ सविनय कायदेभंग चळवळ (Civil Disobedience Movement)

असहकार चळवळीच्या स्थगितीनंतर ब्रिटीश सरकारने १० मार्च १९२२ रोजी गांधीजींना अटक केली. त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली. राष्ट्रीय चळवळ काहीशी मंदावली. यानंतर स्वराज्य पक्षाने काही काळ लोकमत जागृत ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यास फारसे यश आले नाही. पुढे सायमन कमिशन, नेहरू रिपोर्ट यासारख्या घटनांनी देशात पुन्हा एकदा जागृती आली. खरेतर भारतीय जनतेचे राजकीय हक्क मर्यादित करण्याच्या हेतूने १९२८ साली ब्रिटीशांनी सायमन कमिशनची नियुक्ती केली. या कमिशनविरोधी देशभर उग्र निदर्शने, आंदोलने झाली. त्याला लजपतराय, सुभाषबाबू, नेताजी सुमाषबाबू, पं. नेहरू आदींनी या कमिशनला कडाडून विरोध केला. 'सायमन गो बॅक' या घोषणेने देशभर विरोध सुरू झाला. शहीद भगतसिंगासारखे क्रांतिकारक आक्रमक होऊ लागले. नवी दिल्ली स्टेशनजवळ लॉर्ड आयर्विनच्या आगगाडीखाली बॉम्बस्फोट झाला. हे आंदोलनाचे वळ गांधीजींच्या अहिंसेला मानवणारे नव्हते.

डिसेंबर १९२८ मध्ये कोलकात्ता येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात नहरू अहवालास मान्याता देण्यात आली, मात्र नेहरू अहवालातील साम्राज्यांतर्गत वसाहतीच्या स्वराज्यास पं. जवाहरलाल नेहरू नेताजी सुभाषचंद्र बोस, श्रीनिवास अय्यंगार या नेत्यांनी जोरदार विरोध केला आणि संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा आग्रह धरला तेव्हा म. गांधीनी मध्यस्थी करून तडजोड घडवून आणली. एका वर्षाच्या आत (३१ डिसेंबर १९२९ च्या आत) सर्वपक्षमान्य नेहरू अहवालातील तत्वे जर सरकारने स्विकारली नाहीत. तर चळवळ सुरू करू अशा वर्षाचा ठराव पास करण्यात आला.

कोलकात्ता काँग्रेसने ब्रिटीश राज्यकर्त्यांना दिलेली एक वर्षाची मुदत संपल्यावर ३१ डिसेंबर १९२९ च्या रात्री बारा वाजता रावी नदीच्या तिरावर प्रचंड जनसमूदायासमोर अध्यक्ष जवाहरलाल नेहरूनी 'इन्किलाब झिंदाबाद' अशा जयघोषात हिंदी स्वातंत्र्याचा तिरंगी झेंडा फडकविला. २६ जानेवारी १९३० हा पूर्ण स्वातंत्र्याचा दिवस म्हणून सर्व भारतात साजरा झाला व जनतेने सभांमधून पूर्ण स्वराज्यासंबंधीच्या शपथा घेतल्या, अशा परिस्थितीतही महात्मा गांधीजींनी सरकारशी तडजोडीची तयारी दर्शविली, परंतु सरकारने त्याद्वारे दुर्लक्ष करून दडपशाही सुरू केली तेव्हा यास उत्तर म्हणून १४ फेब्रुवारी १९३० रोजी राष्ट्रीय सभेने जनतेला म. गांधींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळीचा आदेश दिला.

१. मीठ व अन्य तत्सम अन्यायी कायद्यांचा भंग करणे.

२. शेतसारा व इतर सरकारी कर न भरणे.

३. सरकारी शिक्षण सह्यांवर बहिष्कार.

४. न्यायालयांवर बहिष्कार.

५. निवडणूका, सरकारी समारंभावर बहिष्कार.

६. परदेशी मालावर बहिष्कार.

७. सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार.

८. दारू आणि अफूची विक्री करणाऱ्या दुकानासमोर निदर्शने करणे.

९. जंगल कायद्याचा भंग करणे.

## ❑ मिठाचा सत्याग्रह (दांडी यात्रा) :-

सविनय कायदेभंगाच्या चळवळीची सुरुवात मिठाच्या सत्याग्रहाने झाली. गुजरातमधील साबरमती आश्रमापासून १० मार्च १९३० रोजी आपल्या ७८ अनुयायांसह गांधीजीनी पदयात्रेला प्रारंभ केला. साबरमती ते दांडी यांच्यात ८४१ मैलांचे अंतर होते. ५ एप्रिल १९३० रोजी गांधीजी दांडी या ठिकाणी आले. त्यांनी ६ एप्रिल १९३० रोजी सकाळी हाताने मीठ उचलून मिठाचा कायदा मोडला. कायदेभंग

केल्याबद्दल गांधीजींसह सर्व सत्याग्रहींवर पोलिसांनी भयंकर काठीहल्ला केला. सरोजिनी नायडू महिला प्रतिनीधी म्हणून या सत्याग्रहात सामील झाल्या होत्या.

या वळवळीस देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाल्या. संपूर्ण देशातून एक वर्षात ६० हजारांपेक्षा अधिक सत्याग्रहींनी स्वत:ला अटक करवून घेतली. वायव्य सरहद्द प्रांतात सरहद्द गांधी म्हणून ओळखले जाणारे स्थान अब्दुल गफार खान हजारो कार्यकर्त्यांसह या आंदोलनात सहभागी झाले. त्याच्या पूर्व भागातील मणिपुरी लोक सामील झाले. नागांची नेता राणी गैदिनलिऊ यांनी व तिच्या अनुयायांनी चळवळीस पाठिंबा दिला.

## ❑ धारासना सत्याग्रह :-

सुरुवातीच्या ब्रिटीश सरकारने गांधीजींना अटक करण्याचे टाळले होते. कारण त्यातून जनक्षोभ वाढण्याची त्यांना भिती होती, मात्र नंतर चळवळीचा प्रभाव कमी करण्यासाठी ४ मे १९२० रोजी गांधीजींना अटक करण्यात आली. त्यामुळे सरोजिनी नायडू यांच्या नेतृत्वाखाली २२ मे १९३० रोजी धारासना येथे सत्याग्रह करण्यात आला.

दांडी व धारासनाप्रमाणे बार्डोली, रत्नागिरी जिल्ह्यातील शिरोडा, मुंबईत वडाळा, कर्नाटकातील शनिकट्टा इत्यादी ठिकाणी मिठाचा कायदा मोडला गेला.

## ❑ खुदा-इ-खिदमतगार :-

वायव्य सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफार खान यांनी अहिंसक मार्गाने लढण्यास तयार असलेल्या पठाणांची एक शिस्तबध्द संघटना उभारली, तिला त्यांनी खुदा-इ-खिदमतगार (देवाचे सेवक) असे नाव दिले. खान अब्दुल गफार खान गांधीजींच्या तत्वज्ञानाचे इतके तंतोतंत पालन करीत की लोक त्यांना 'सरहद्द गांधी' या नावाने संबोधू लागले. पेशावरमध्ये सरहद्द गांधीनी करबंदीसह कायदेभंगाची चळवळ सुरू केली. २३ एप्रिल १९३० रोजी पेशावरमध्ये निदर्शने केली म्हणून सरहद्द गांधीना पकडण्यात आले. याचा निषेध म्हणून खुदा-इ-खिदमतगार संघटनेचे लाल शर्ट हा गणवेश घातलेले हजारो सदस्य पुढे आले ते शांतपणे निदर्शने करीत असूनही सरकारने बलप्रयोगासाठी रणगाडे आणले आणि गढवाल पलटणीला त्यांच्यावर गोळीबार करण्याचा हुकूम सोडला. मात्र नि:शस्त्र पठाणांवर गोळीबार करण्यास गढवाल पलटणीने नकार दिला. मुस्लिम पठाणांवर हिंदू पलटणी पाठवून चळवळ दडपून टाकण्याची ब्रिटीशांची भेदनीती येथे कुचकामी ठरली.

## ❑ सोलापूर येथील लष्करी कायदा :-

२४ मे १९३० रोजी महात्मा गांधीना अटक करण्यात आली. गांधीजींना अटक झाल्यानंतर देशात

सरकारचा निषेध म्हणून अनेक ठिकाणी हरताळ पाळण्यात आले. कामगारांनी संप केले. ६ मे १९३० रोजी सोलापूरला सार्वत्रिक हरताळ व मिगरणी कामगारांचा संप झाला. सोलापूरच्या कलेक्टरने लोकांना आवरण्यासाठी त्यांच्यावर गोळीबार केला. सोलापूरात लष्करी कायदा पुकारण्यात आला. या लष्करी कायद्यास विरोध करणाऱ्यापैकी मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे आणि कुर्बान हुसेन या चौघांना फाशी देण्यात आली.

## ❑ कायदेभंगाच्या चळवळीचे बदलते स्वरूप :-

पावसाळा सुरू झाल्यानंतर कायदेभंगाच्या चळवळीचे स्वरूप बदलण्याचा निर्णय राष्ट्रीय सभेने घेतला. विदेशी कापडावर बहिष्कार, करबंदीची मोहिम आणि जंगल सत्याग्रह यांना परवानगी देण्यात आली. उत्तर प्रदेश, कर्नाटक, गुजरात इत्यादी प्रांतातील शेतकऱ्यांनी चळवळीत भाग घेऊन सरकारला शेतसारा देण्याचे नाकारले.

महाराष्ट्रात ठिकठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. या सत्याग्रहासाठी जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रात बिळाशी, संगमनेर, अकोला, कोपरगाव, राहुरी, सटाणा, बागलाण, पुसद इत्यादी ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले.

परदेशी मालावरील बहिष्कार हा कायदेभंगाच्या चळवळीतील एक प्रमुख कार्यक्रम होता. अनेक ठिकाणी परदेशी कापडाची होळी करण्यात आली. परदेशी कापडाची वाहतूक रोखण्याचे प्रयत्न झाले. मुंबईत १२ डिसेंबर १९३० रोजी बाबू गेनू या कामगाराने परदेशी कापडाच्या ट्रकसमोर आडवे पडून बलिदान दिले. बाबू गेनूचे हौतात्म्य ही कायदेभंग चळवळीतील एक महत्त्वपूर्ण घटना होय. या घटनेमुळे देशातील युवक अतिशय संतप्त झाले.

## ❑ स्त्रियांची कामगिरी :-

महात्मा गांधीजींनी 'यंग इंडिया' तील लेखाद्वारे सविनय कायदेभंगाच्या चळवळीत स्त्रियांनी सहभागी व्हावे असे खास आवाहन केले. परिणामी अनेक स्त्रिया सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये सहभागी झाल्या. मिठाचा कायदा मोडणाऱ्या स्त्रियांत कमलादेवी चट्टोपाध्याय, अवंतिका गोखले, हंसा मेहता, लीलावती मुन्शी, पेरीन कॅप्टन या स्त्रियांनी नेतृत्व केले. धारासणा सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडूनी केले. कमलादेवी चटोपाध्याय देशातील युवाशक्ती संघटित करण्याच्या कार्याला सहभागी झाल्या. अवंतिकाबाई गोखले या शिक्षिका खादीचा प्रचार करत होत्या. दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग करण्यासाठी कस्तुरबा गांधी, स्वरूपाराणी नेहरू यासारख्या वृध्द स्त्रियांनीही सहभाग घेतला होता. अनेक स्त्रियांनी पोलिसांचा लाठीमार सहन करत तुरुंगवास भोगला. परिणामी सविनय कायदेभंग चळवळीला जोर चढला.

## ❑ पहिली गोलमेज परिषद (१९३०) :-

सविनय कायदेभंग चळवळीस खीळ बसावी व भारतातील राजकीय समस्या काही प्रमाणात सोडवावी या हेतूने ब्रिटीश सरकारने १९३०, १९३१, १९३२ या काळात इंग्लंडमध्ये तीन गोलमेज परिषदा भरविल्या. यापैकी पहिली परिषद १२ नोव्हेंबर १९३० ते १३ जानेवारी १९३१ या दरम्यान भरविण्यात आली. पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आलेल्या या परिषदेस ८९ प्रतिनिधी उपस्थित होते. कॉंग्रेसने या परिषदेवर बहिष्कार टाकलेला होता. मात्र मुस्लीम लीग, हिंदू महासभा, लिबरल पक्षीय आणि संस्थानिक या परिषदेस उपस्थित राहिले होते. परिषदेस उपस्थित राहिलेल्या प्रतिनिधींनी पूर्ण स्वराज्याची मागणी केली. मात्र ब्रिटीशांनी ती मागणी नाकारली. या परिषदेत अल्पसंख्यांकांच्या प्रश्नावर मतभेद झाले. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी राखीव जागांची मागणी केली. एकंदरीत एकीचा अभाव व परस्परविरोधी मागण्या यामुळे या परिषदेचा फारसा उपयोग झाला नाही.

## ❑ गांधी-आयर्विन करार (५ मार्च १९३१) :-

पहिल्या गोलमेज परिषदेस काँग्रेसचा प्रतिनिधी उपस्थित नव्हता. अर्थात काँग्रेसच्या सहभागाशिवाय ही परिषद अर्थहीन आहे हे ब्रिटिशांनी ओळखले होते. त्यातून समेटाचा आणखी एक प्रयत्न त्यांनी केला. सरकारने २६ जानेवारी १९३१ रोजी महात्मा गांधी व इतर काँग्रेस नेत्यांची तुरुंगातून सुटका केली. त्यानंतर जयकर, साहू इत्यादी नेत्यांनी व्हाइसरॉयची भेट घेण्याबाबत गांधीजीचे मन वळविले. अखेरीस गांधीजी व्हाइसरॉयची भेट घेण्यास तयार झाले. त्यानुसार व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन व महात्मा गांधी यांच्यात ५ मार्च, १९३१ रोजी जो करार झाला त्यास 'गांधी-आयर्विन करार' असे म्हटले जाते. या करारातील प्रमुख कलमे खालीलप्रमाणे :-

१. काँग्रेसने सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घ्यावी.

२. काँग्रेसने दुसऱ्या गोलमेज परिषदेत भाग घ्यावा.

३. विविध मालावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय मागे घ्यावा.

४. कायदेभंग चळवळीच्या काळात पोलिसांनी केलेल्या जुलमी कृत्यांच्या चौकशीची मागणी सोडून द्यावी.

५. राजकीय कैद्यांची सुटका करावी.

६. कायदेभंग चळवळीच्या काळात काढलेले वटहुकूम मागे घ्यावेत.

७. मिठावरील कर काही प्रमाणात रद्द व्हावा. मीठ तयार करण्यास भारतीयांना परवानगी द्यावी.

८. चळवळीच्या काळात ज्या व्यक्तींची मालमत्ता जप्त केली असेल ती परत करावी.

९. परदेशी माल आणि दारू दुकानावर शांततामय निदर्शनाचा हक्क असावा.

१०. संरक्षण, परराष्ट्र, अल्पसंख्यांक व काही खाती येत्या राज्यकारभार पध्दतीत राखीव म्हणून राहावीत.

असहकार चळवळ स्थगित केल्यावर जशी टीका झाली; तशीच टीका या करारानंतरही गांधीजींवर झाली. सरकार व काँग्रेस या दोन्ही पक्षांना हवी असलेली शांतता कराराने निर्माण झाली आहे. तसेच स्वातंत्र्याचे ध्येय काँग्रेसने सोडलेले नाही तर हा करार म्हणजे तात्पुरती तडजोड आहे, असा खुलासा गांधीजींनी केला. गांधीजींनी केलेला हा करार पंडित नेहरू, सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्या तरुण नेत्यांना आवडला नाही, कारण त्यातील काही कलमे अनुकूल नव्हती.

## ❑ दुसरी गोलमेज परिषद (१९३१) :-

दुसरी गोलमेज परिषद ७ सप्टेंबर १९३१ ते १ डिसेंबर १९३१ या दरम्यान लंडन येथे इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली भरली. या परिषदेस इंग्लंड व भारतातील राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व भारतीय संस्थानचे प्रतिनिधी असे सर्व मिळून एकूण १०७ प्रतिनिधी उपस्थित होते. काँग्रेसच्या वतीने म. गांधीजी हे एकमेव प्रतिनिधी म्हणून परिषदेत सामील झाले होते.

हिंदुस्थानात भावी राज्यघटना कशी असावी यावर परिषदेत चर्चा आणि निर्णय अपेक्षित होते. पण तो प्रश्न गौण ठरून खरी चर्चा झाली ती 'जातीय प्रश्नावर'. मुस्लीम, अस्पृश्य, ख्रिश्चन, अँग्लो इंडियन लोकांच्या प्रतिनिधींनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. गांधीजींनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. मात्र ब्रिटीश सरकारने ही मागणी पूर्णपणे नाकारली. म. गांधीनी एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधी असे दृश्य परिषदेत दिसत होते. सरकारला तेच हवे होते. ब्रिटीश सरकार हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याच्या मुलभूत मागणीस काहीच प्रतिसाद देत नाही असे दिसताच गांधीजी २८ डिसेंबर १९३१ रोजी हिंदुस्थानात परत आले आणि २९ डिसेंबर १९३१ रोजी त्यांनी कायदेभंग चळवळ पुन्हा सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला.

## ❑ सविनय कायदेभंग चळवळीचे दुसरे पर्व :-

दुसरी गोलमेज परिषद अयशस्वी ठरल्यामुळे इंग्रज सरकार व काँग्रेस यांच्यात तणाव निर्माण झाला. गांधीजींनी नवे व्हॉईसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांची भेट मागितली, पण त्यांनी नकार दिला. अशा वातावरणात काँग्रेसने सविनय कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. १ जानेवारी १९३२ रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीने बैठक घेऊन या निर्णयास संमती दिली. सरकारने ४ जानेवारी १९३१

रोजी चार नवे वटहुकूम जारी केले. या वटहुकूमांचा उद्देश देशात परत दडपशाहीचे सत्र सुरू करणे हाच होता. महात्मा गांधीनी हे वटहुकूम मागे घ्यावेत अशी मागणी सरकारकडे केली; परंतु त्याची दखल घेण्याऐवजी सरकारने महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. अन्सारी इ. काँग्रेस नेत्यांनाच अटक केली. त्यापुढे जाऊन काँग्रेस ही संघटना बेकायदेशीर ठरविली. सर्वत्र गोळीबार, दडपशाही, अत्याचार व अटकसत्र सुरू झाले. चळवळ भरात असतानाच ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी अचानक 'जातीय निवाडा' (Communal Award) १५ ऑगस्ट १९३२ रोजी जाहीर केला.

## ❑ जातीय निवाडा व पुणे करार :-

ब्रिटीशांच्या 'फोडा व झोडा' या नीतीचा भारतीयांनी प्रथमपासून अनुभव घेतला होता. त्या नीतीचाच एक भाग जातीय निवाड्याच्या रूपाने भारतीय जनतेपुढे आला. या निवाड्यानुसार ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्यांक होते तेथे त्यांना प्रमाणाबाहेर प्रतिनिधीत्व मिळाले. तथापि, जेथे हिंदू अल्पसंख्यांक होते, तेथे हिंदूना मात्र प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधीत्व मिळाले नाही. ख्रिश्चन, अँग्लो इंडियन आणि युरोपियन यांनाही त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाबाहेर प्रतिनिधीत्व मिळाले. त्याचप्रमाणे दलित मागासवर्गीयांसाठी (शेड्यूल्ड कास्टस्) वेगळा मतदारसंघ जाहीर करण्यात आला. गांधीजीना यांचे फार दु:ख झाले. दलितांना स्वतंत्र मतदार संघ देण्याचे घोषित करून हिंदू समाजात फूट पाडण्याचा इंग्रजांचा कुटिल हेतू गांधीजींनी ओळखला. गांधीजींनी रॅम्से मॅकडोनाल्ड यांना या निवाड्यात बदल करण्याची विनंती केली व २० सप्टेंबर १९३१ पर्यंत बदल हा केल्यास प्राणांतिक उपोषण सुरू करण्याचा आपला निश्चिय सरकारला कळविला, मात्र ब्रिटीश सरकारने यास नकार दिला, त्यामुळे २० सप्टेंबर १९३२ पासून गांधीजींनी प्राणांतिक उपोषणास प्रांरभ केला.

## ❑ पुणे करार :-

गांधीजींच्या उपोषणाच्या वृत्ताने सर्वत्र खळबळ माजली. काँग्रेसच्या इतर नेत्यांशी गांधीजी व अस्पृश्यांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात तडजोड घडवून आणण्यासाठी हालचाली सुरू केल्या. पंडित मदनमोहन मालवीय, तेजबहादूर सप्रे, बापूजी अणे, हृदयनाथ कुंक्षरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार पटेल इत्यादी नेते पुण्यात एकत्र आले या सर्वांच्या प्रयत्नातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मन वळविण्यात यश आले. शेवटी म. गांधीजीनी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात या विषयावर एक करार झाला. तोच २५ सप्टेंबर १९३२ चा 'पुणे करार' किंवा 'येरवडा करार' होय. या करारानुसार स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव जागा देण्याच्या धोरणावर एकमत झाले. १४८ राखीव जागांना काँग्रेसने संमत्ती दिली. या करारामुळे गांधीजींनी फूट पाडण्याचा डाव उधळून लावला.

## ❑ तिसरी गोलमेज परिषद (१९३२) :-

तिसरी गोलमेज परिषद १७ नोव्हेंबर, १९३२ ते २४ डिसेंबर १९३२ या कालावधीत लंडन येथे चालली. या परिषदेला एकूण ४६ प्रतिनिधी उपस्थित होते. सरकारशी पूर्णत: एकनिष्ठ असणाऱ्या लोकांनाच परिषदेला बोलाविले होते. काँग्रेसने या परिषदेवर बहिष्कार टाकला होता. इंग्लंडमधील मजूर पक्षही सहभागी नव्हता. तीनही गोलमेज परिषदांना उपस्थित असणारे एकमेव नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते.

एकूण तीन गोलमेज परिषदांच्या अहवालावर आधारित एक 'श्वेतपत्रिका' ब्रिटीश सरकारने प्रसिध्द केली ती प्रतिगामी स्वरूपाची होती. त्यामुळे तिच्यावर सर्वत्र कठोर टीका झाली. गांधीजीनी सविनय कायदेभंग चळवळीकडे दुर्लक्ष करून सामाजिक कार्यावर लक्ष केंद्रित केले. अस्पृश्यता निवारणाच्या कामाला त्यांनी प्राधान्य दिले, त्यासाठी त्यांनी 'हरिजन सेवक संघ' स्थापन केला.

## ❑ सविनय कायदेभंग चळवळीचा शेवट :-

जातीय निवाडा, गांधीजींचे आमरण उपोषण या पार्श्वभूमीवर कायदेभंग चळवळीतील लोकांचा उत्साह कमी होत चालला होता. पुणे करार झाल्यावर म. गांधीजीनाही चळवळीत फारसे स्वारस्य राहिले नाही. त्यांनी 'हरिजन सेवक संघ' स्थापन करून स्वत:ला अस्पृश्यता निवारण कार्याला वाटून घेतले. गांधीजींनी आत्मशुध्दीसाठी आणि अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर लोकमत जागृत करण्यासाठी ८ मे, १९३३ रोजी २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. सरकारने गांधीजींच्या उपोषणाचे उद्दिष्ट लक्षात घेऊन त्यांना तुरुंगातून मुक्त केले. सुटका होताच गांधीजींनी कायदेभंग चळवळ चार ते सहा आठवडे स्थगित करण्याविषयी काँग्रेस अध्यक्षांना विनंती केली. त्यानुसार काही काळ ही चळवळ तहकूब करण्यात आली. यानंतर या चळवळीच्या भवितव्याचा विचार करण्यासाठी १२ जुलै १९३३ रोजी राष्ट्रीय सभेच्या प्रमुख नेत्यांची पुणे येथे बैठक झाली. या बैठकीत गांधीजींनी चळवळीचे स्वरूप बदलून वैयक्तिक सत्याग्रहाच्या मार्गाने चळवळ चालविण्याचा निर्णय जाहीर केला. अर्थात या बदलामुळे चळवळीचे स्वरूप एकदम बदलून गेले. केवळ नावापुरतीच ती चालू राहिली.

सरकारची दडपशाही, भेदनीतीचे राजकारण, भूकंप, दीर्घकाळामुळे जनमनास आलेला थकवा इ. कारणांसाठी सविनय कायदेभंग चळवळ रद्द करणे आवश्यक होते. अखेरीस ६ एप्रिल १९३४ रोजी कायदेभंगाची चळवळ तहकूब करण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला.

## ❑ सविनय कायदेभंग चळवळीचे मूल्यमापन :-

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सविनय कायदेभंग चळवळीला फार मोठे महत्त्व आहे. कारण देशातील स्त्रिया, कामगार, शेतकरी, मुले हे समाजातील घटक या चळवळीच्या निमित्ताने देशाच्या

स्वातंत्र्य चळवळीत प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. परिणामी या चळवळीला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. भारतातील राजकीय चळवळी आतापर्यंत फक्त शहरी विभागापुरत्याच मर्यादित होत्या; परंतु ही चळवळ शहरांप्रमाणेच खेड्यापाड्यांतही पोहचली होती. या चळवळीमुळे म. गांधीजींच्या असामान्य नेतृत्वाचे व नि:शस्त्र प्रतिकाराच्या सामर्थ्याचे दर्शन संपूर्ण देशाला आले. या आंदोलनात सुमारे १ लक्ष लोकांना अटक झालीहोती. स्वातंत्र्यासाठी पोलीस, तुरुंगवास, लाठीहल्ला याची लोकांना आता भिती राहिली नाही. उलट त्या गोष्टी राष्ट्रभक्तीचे प्रतीक मानल्या जाऊ लागल्या.

एकूणच सविनय कायदेभंग चळवळ ही भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीचा एक महत्त्वाचा टप्पा होय.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ✻

### ❑ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. काँग्रेसच्या कोणत्या अधिवेशनात नेहरू अहवालास मान्यता देण्यात आली?

२. सविनय कायदेभंग चळवळीची सुरूवात कोणत्या सत्याग्रहाने झाली?

३. दांडी यात्रेची सुरुवात कोणत्या ठिकाणीपासून करण्यात आली?

४. धारासना सत्याग्रहाचे नेतृत्व कोणी केले?

५. 'सरहद्द गांधी' म्हणून कोणास ओळखले जाते?

६. पहिल्या गोलमेज परिषदेचे अध्यक्षस्थान कोणी भूषविले?

७. ६ मे १९३० रोजी 'सार्वत्रिक हरताळ व गिरणी कामगारांचा संप' कोठे झाला?

८. जातीय निवाडा कोणी जाहीर केला?

९. २५ सप्टेंबर १९३२ साली म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात झालेला करार कोणत्या नावाने प्रसिध्द आहे?

१०. 'हरिजन सेवक संघ'ची स्थापना कोणी केली?

### ❑ ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. म. गांधीजी सविनय कायदेभंग चळवळ ............ मध्ये पुकारली.

*अ) जानेवारी, १९३०* *ब) फेब्रुवारी १९२०*

*क) मार्च १९३०* *ड) एप्रिल, १९३०.*

२. १२ मार्च १९३० रोजी म. गांधी ........... अनुयायांसह साबरमती आश्रमातून पदयात्रा करत दांडीच्या दिशेने निघाले.

*अ) ७०　　ब) ७८　　क) ८०　　ड) ८८.*

३. 'खुदा-इ-खिदमतगार' ही संघटना ............ यांनी उभारली.

*अ) सर रॅम्से मॅकडोनाल्ड　　ब) सरदार पटेल*

*क) खान अब्दुल गफारखान　　ड) कमला नेहरू.*

४. सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये स्त्रियांनी सामील होण्याचे आवाहन गांधीजींनी .......... या वर्तमानपत्रातून केले.

*अ) यंग इंडिया　　ब) न्यू इंडिया　　क) द हिंदू　　ड) केसरी.*

५. सविनय कायदेभंगाच्या चळवळी दरम्यान महाराष्ट्रातील ........... या शहरात 'मार्शल लॉ' लागू करण्यात आला.

*अ) सातारा　　ब) सांगली　　क) सोलापूर　　ड) कोल्हापूर.*

६. मुंबईत विदेशी कापडावरील बहिष्कार चळवळीत ............ हा तरुण कामगार हुतात्मा झाला.

*अ) मल्लाप्पा धनशेट्टी　ब) किरण सारडा　क) तुलसीदास जाधव　ड) बापू गेणू.*

७. ........... यांनी हरिजनांसाठी वेगळ्या मतदारसंघाची मागणी केली.

*अ) खान अब्दुल गफारखान　　ब) महात्मा गांधी*

*क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर　　ड) सरदार पटेल.*

८. लॉर्ड आयर्विन व महात्मा गांधी यांच्यात ............. रोजी 'गांधी-आयर्विन करार' झाला.

*अ) ४ मार्च, १९३० ब) ५ मार्च १९३० क) ४ मार्च १९३१ ड) ५ मार्च १९३१.*

९. दुसऱ्या गोलमेज परिषदेस ........ प्रतिनिधी उपस्थित होते.

*अ) १०७　　ब) १०८　　क) १०९　　ड) ११०.*

१०. सविनय कायदेभंगाची चळवळ ............ रोजी तहकूब करण्यात आली.

*अ) ५ एप्रिल, १९१४　　ब) ६ एप्रिल, १९३४*

*क) ७ एप्रिल, १९३४　　ड) ८ एप्रिल, १९३४*

## २.२.३ चलेजाव चळवळ (Quit India Movement)

### ❑ प्रास्ताविक :-

१९४२ ची 'चलेजाव चळवळ' ही भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासातील शेवटची व निर्णायक चळवळ होय. मुळात अहिंसावादी तत्वाची पेरणी करणारे गांधीजी दुसरे महायुद्ध तसेच जागतिक व भारतातील काही प्रश्नामुळे थोडे बाजूला गेले. मात्र १९४२ मध्ये म.गांधीजींनी राष्ट्रीय सभेचे नेतृत्व स्वीकारून संपूर्ण स्वराज्याची मागणी करू लागले. आपल्या 'हरिजन' या वृत्तपत्रातून १९४२ पासून गांधीजी ब्रिटिशांच्या धोरणावर टीका करत आपले विचार मांडू लागले. उदा. ''आमचे काहीही होवो ब्रिटिशांनी हिंदुस्थान सोडून शांतपणे जावे, त्यात हिंदुस्थान आणि ब्रिटन या दोघांचेही भले आहे.'' २ मे, १९४२ रोजी अलाहाबाद काँग्रेसने महात्माजींच्या विचारावर आधारित ठराव पास केला की, ''हिंदुस्थान आपले स्वातंत्र्य आपल्या स्वत:च्या शक्तीवरच मिळवील व राखील. हिंदुस्थानच्या हितासाठी नव्हे तर ब्रिटीशांच्या सुरक्षिततेसाठी व जगतिक शांतीसाठी ब्रिटीशांनी हिंदुस्थान सोडला पाहिजे. स्वातंत्र्याच्या भूमिकेवरूनच ब्रिटीश व इतर राष्ट्रांशी हिंदुस्थान बोलणी करू शकेल.'' अशाप्रकारे काँग्रेस स्वातंत्र्यासाठी सरकारशी अखेरचा संघर्ष करण्याच्या पावित्र्यात उभी राहिली आणि १९४२ च्या चलेजाव चळवळीचा आदेश दिला.

### १. क्रिप्स मिशनचे अपयश :-

भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ब्रिटीश सरकारने ७ मार्च १९४२ मध्ये क्रिप्स मिशन पाठवले होते. पण ते असफल झाले. त्यास भारतीयांच्या प्रश्नावर समाधानकारक तोडगा काढता आला नाही. या अपयशास ब्रिटीशांनी राष्ट्रीय काँग्रेसला जबाबदार धरले. त्यामुळे चळवळीशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही याची गांधीजींना खात्री पटली.

### २. भारताच्या व्हाईसरॉयचा युध्दासंबंधी एकतर्फी निर्णय :-

भारताच्या व्हॉईसरॉयने ०३ सप्टेंबर १९३९ रोजी कोणासोबतही विचारविनिमय न करता एकांगी निर्णय घेत भारतही इंग्लंडच्या बाजूने दुसऱ्या महायुद्धात उतरेल अशी घोषणा केली. परिणामी संपूर्ण भारतात ब्रिटीशांविरुध्द असंतोषाची व संतापाची लाट निर्माण झाली.

### ३. जपानच्या आक्रमणाची भिती :-

सिंगापूर, मलेशिया आणि रंगून इत्यादी ठिकाणी इंग्रजांचा पराभव करून जपानने हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणले. जपान हा केवळ इंग्रजांना पराभूत करण्याच्या उद्देशाने भारतावर आक्रमण करेल अशी भिती म. गांधीजी व अन्य भारतीयांच्या मनात निर्माण झाली. त्यामुळे इंग्रज भारत सोडून गेले तर जपान भारतावर आक्रमण करणार नाही यासाठी ब्रिटीशांविरुध्द चलेजाव आंदोलन सुरू केले.

## ४. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई :-

दुस्रया महायुद्धाला प्रारंभ होताच युद्धासाठी सरकारला प्रचंड पैसा हवा होता. पैशाची गरज भागविण्यासाठी सरकारने सर्वसामान्य जनतेवर मोठ्या प्रमाणात कर आकारले गेले. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, बेकारी, महागाई, शेतकऱ्यांचे हाल, चलन फुगवटा या व यासदृश्य अनेक कारणांमुळे जनतेत मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला.

## ५. ब्रिटीश सरकारचे भारताबाबतचे आडमुठे धोरण :-

दुसऱ्या महायुद्धासंबंधी व्हॉईसरॉयने घेतलेल्या एकतर्फी निर्णयाला काँग्रेसचे नेते ब्रिटिशांना सहकार्य करण्यास तयार होते. मात्र ब्रिटीशांनी भारताच्या घटनात्मक प्रश्नाबाबतचे पुढील काळातील आपले धोरण स्पष्ट करून भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याची घोषणा करावी असा आग्रह धरला. परंतु ब्रिटीशांनी युध्दसमाप्तीनंतर स्वातंत्र्याचा विचार केला जाईल असे सांगितले. सरकारच्या या आडमुठ्या धोरणामुळे ब्रिटीश सरकारला मार्गावर आणण्यासाठी 'चलेजाव' आंदोलनाचा मार्ग भारतीयांनी स्विकारला.

## ६. ब्रिटीश सरकारची दुटप्पी राजनिती :-

लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी व जगातील लोकशाहीच्या स्वरक्षणासाठी आपण दुसऱ्या जागतिक महायुद्धात भाग घेत असल्याचे ब्रिटनने जाहीर केले. युध्दाच्या काळात लोकशाहीच्या तत्त्वाचा उद्घोष करणाऱ्या इंग्लंडने मात्र भारतीयांना गुलाम बनवून त्यांच्या व्यक्तीस्वातंत्र्याचे हरण करून त्यांना पारतंत्र्यात टाकले होते. त्यांच्या या दुटप्पी राजनितीमुळे भारतीयांना ब्रिटीशांचे खरे स्वरूप कळून आले.

## ७. साम्राज्यवाद्यांचा उलटा प्रचार :-

क्रिप्स मिशन पाठवून ब्रिटीश सरकार असे भासवत होते की, हिंदी प्रांत सोडविण्यास ते फार उत्सुक आहे. परंतु राष्ट्रसभेनेच असहकाराचा व अडवणुकीचा मार्ग स्वीकारल्याने हिंदी प्रश्नांची सोडवणूक होऊ शकत नाही, याशिवाय ब्रिटीश सरकारने असे सांगितले की, राष्ट्रसभा ही सर्व भारताचे प्रतिनिधीत्व करीत नसल्याने देशाची सत्ता कोणाच्या हाती द्यावी हा मोठा प्रश्न आहे? असा उलटा प्रचार केल्यामुळे चलेजाव आंदोलन सुरू झाले.

## ८. सरकारचे दडपशाहीचे धोरण :-

या काळात सहकार व काँग्रेस यांच्यात अनेक कारणांमुळे दुरावा निर्माण झाला. अशावेळी सरकारने काँग्रेसच्या मागण्यांचा सहानुभूतीने विचार करण्याऐवजी युध्द प्रयत्नात अडथळा न येवू देण्याच्या नावाखाली देशात दडपशाही व अन्यायी कृत्ये केली. महात्मा गांधी व अनेक काँग्रेस नेत्यांनी वैयक्तिक

सत्याग्रह सुरू केला. मात्र सरकारने त्यांना कडक शिक्षा केल्या. पदोपदी भारतीय लोकांना दडपण्याचा प्रयत्न केला. त्याचे पर्यावसान शेवटी चलेजाव चळवळीमध्ये झाले.

## ९. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांचा प्रभाव :-

काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून म. गांधीजी व सुभाषबाबू यांच्यात इ.स. १९३८ पासून मतभेद निर्माण झाले होते. इ.स. १९३८ व इ.स. १९३९ मध्ये अध्यक्षपदाच्या निवडणूकीत सुभाषबाबू यांनी महात्मा गांधी पुरस्कृत व्यक्तीचा पराभव केला होता; पुढे अध्यक्षपदाचा त्याग करून सुभाषबाबूंनी फॉरवर्ड ब्लॉक या नावाचा पक्ष स्थापन केला व ब्रिटिशांविरुध्द चळवळ सुरू केली. सरकारने त्यांना अटक केली. परंतु या कैदेतून ते आश्चर्यकारकरित्या सुटले आणि जपान व जर्मनी यांच्या साहाय्याने त्यांनी ब्रिटिशांविरुध्द आंदोलन सुरू केले. यामुळे ते भारतीय जनतेच्या गळ्यातील ताईत बनले. सुभाषबाबूंच्या प्रयत्नाला यश आले तर भारत जपानच्या ताब्यात जाईल व जपानची लष्करशाही भारताला परवडणारी नाही. यासाठी जनतेला सुभाषबाबूंच्या चळवळीपासून परावृत्त करून काँग्रेसकडे आकर्षित करण्यासाठी काँग्रेसने चलेजाव चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला.

वरील विविध कारणांमुळे देशात वैफल्याची भावना निर्माण होऊन महात्मा गांधी व काँग्रेसच्या अन्य नेत्यांनी नवे आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला.

## ❑ 'चलेजाव'चा ठराव :-

१४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक झाली. यात 'ब्रिटिशांनी भारत सोडून निघून जावे' असा ठराव केला गेला. ७ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन मुंबई येथे भरले. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'भारत छोडो' किंवा 'चलेजाव'चा ठराव उपस्थित प्रतिनिधींपुढे मांडण्यात आला. सर्वच प्रतिनिधींनी या ठरावाचे स्वागत केले व ठराव मंजूर केला. काँग्रेस महासमितीने ठराव संमत केल्यावर महासमितीच्या प्रतिनिधीपुढे केलेल्या भाषणात गांधीजी म्हणाले ''मी स्वातंत्र्यासाठी अधिक काळ वाट पाहू शकत नाही. माझ्या जीवनातील हा शेवटचा संघर्ष असेल. आता ब्रिटीशांच्या गुलामगिरीत आम्ही राहू शकत नाही. याचवेळी महात्मा गांधीनी सर्व भारतीय जनतेला 'करेंगे या मरेंगे' (Do or Die) असा संदेश दिला.

## ❑ ८ ऑगस्ट १९४२ :-

८ ऑगस्टला 'चलेजाव'ची घोषणा केल्यानंतर ९ ऑगस्टला आंदोलनास सुरूवात होणार होती. परंतु याचदिवशी पहाटेच महात्मा गांधी, पं.नेहरू, मौलाना आझाद, आचार्य कृपलानी, सरदार पटेल, अरुणा असफअली, गोविंद वल्लभपंत अशा अनेक नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले. महात्मा गांधीना

पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये स्थानबध्द केले; तर पंडित नेहरू व अन्य काही नेत्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आले. ही सर्व नेतेमंडळी १५ जून १९४५ अखेर कैदेत होती.

## ❑ इतर राजकीय पक्षांची भूमिका :-

मुस्लीम लीग आणि कम्युनिस्टांनी काँग्रेसच्या या चळवळीस पाठिंबा देण्याऐवजी सरकारलाच पाठिंबा दिला. राष्ट्रसभेने पुकारलेली ही चळवळ म्हणजे देशाची सत्ता हिंदूंच्या हाती घेण्याचा चाललेला प्रयत्न होय असा लीगने आरोप केला. कम्युनिस्टांनी सरकारला अनुकूल असे धोरण स्वीकारले, कारण साम्यवादी रशिया इंग्लंडच्या बाजूने युद्धात पडला हातो. हिंदूमहासभा उदासीन राहिली. समाजवादी पक्षाने मात्र या चळवळीस आपला पाठिंबा दिला व पुढे या पक्षाच्या लोकांनी भूमिगत राहून चळवळ चालू ठेवली.

## ❑ जनतेने चालविलेली चळवळ :-

८ ऑगस्ट १९४२ चा ठराव झाल्यानंतर चळवळ लगेच सुरू होणार नव्हती. गांधीजी या चळवळीचा कार्यक्रम व पध्दती जाहीर करणार होते. पण सरकारने त्यांना सर्व नेत्यांसह पकडल्यामुळे देशातील जनता नेतृत्वहीन बनली. चळवळ कशी करावी, हे जनतेला कळेना तेव्हा जनता जमेल तशी चळवळ राबवू लागली. 'करा किंवा मरा' एवढाच मंत्र त्यांना कळला होता. नेत्यांच्या मार्गदर्शनाशिवाय जनतेने उत्स्फूर्त आंदोलनास सुरूवात केली. यावेळी लोकांनी अहिंसात्मक, हिंसात्मक, भूमिगत, उघड असे चळवळीचे सर्व मार्ग चोखाळले. 'गांधीजींनी आधीच जाहीर केल्याप्रमाणे निर्वाणीचा व अखेरचा लढा म्हणून जनतेने तो चालविला.

या चळवळीत विद्यार्थी, कामगार, शेतकरी अशा सर्वच स्तरांतील लोकांनी भाग घेतला. इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्यासाठी सर्व मार्ग अवलंबले जाऊ लागले. रेल्वे स्टेशन जाळणे, सरकारी तिजोऱ्या ताब्यात घेणे, खजिने लुटणे, सरकारी मालमत्ता नष्ट करणे, पोस्ट व तारयंत्रणा बंद पाडणे, दळणवळणात अडथळा आणणे असे अनेकविध मार्ग वापरून इंग्रजी राज्ययंत्रणा खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला गेला. जमशेदपूर, मुंबई, अहमदाबाद इ. प्रमुख शहरातील गिरणी कामगारांनी संप केले. स्त्रियाही उत्स्फूर्तपणे चळवळीत सामील झाल्या होत्या. शहरांपेक्षा ग्रामीण भागात चळवळ प्रभावी होती, कारण पोलीस किंवा लष्कराचा ग्रामीण भागात परिणामकारक वापर करता येत नव्हता. त्यामुळे ग्रामीण भागात जनतेने प्रतिसरकार स्थापन केली. उदा. सातारा जिल्ह्यात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारची स्थापना झाली, तसेच बंगालमध्ये मिदनापूर जिल्ह्यात, बिहारमधील भागलपूर जिल्ह्यात, ओरिसातील बालासोर जिल्ह्यात, आंध्र प्रदेश मधील भीमापरम, मद्रास प्रांतातील बालिया व वस्ती जिल्ह्यात प्रतिसरकारे स्थापन केली होती. या प्रतिसरकारांना जनतेची सहानुभूती होती.

## ❑ सरकारची दडपशाही :-

सरकारने ही चळवळ दडपून टाकण्यासाठी दडपशाहीचा कहर केला. लाठीहल्ला व गोळीबार केला. पोलिस व लष्करी दलातील लोकांनी निशस्त्र लोकांवर, स्त्रियांवर अन्याय, अत्याचार केले. कैद्यांना उपाशी ठेवून त्यांचा छळ केला. पोलीस गोळीबारात १०२८ लोक मारले गेले. ३२०० जखमी झाले, अशी सरकारी आकडेवारी आहे, परंतु पं. नेहरूंच्या मते चळवळीतील मृतांची व जखमींची संख्या १०,००० असावी.

## ❑ महात्मा गांधीजींचे उपोषण :-

१९४३ च्या सुरुवातीला ब्रिटीश सरकारने 'दंगलीतील राष्ट्रसभेची जबाबदारी' नावाची पुस्तिका प्रकाशित केली. यामध्ये १९४२ च्या दंगलीस काँग्रेस नेते व म. गांधी जबाबदार आहेत व ते हिंसाचारी आहेत असा आरोप करण्यात आला. या लढ्याने हिंसक वळण घेतले होते, हे सत्यच होय. तथापि यास गांधीजी जबाबदार आहेत असे म्हणण्यात ब्रिटीशांची कुटिल निती होती.

सरकारने गांधीजींवर अनीतिमत्ता, गुप्तता, असत्यता, जपान धार्जिणे, हिंसेस चिथावणी इत्यादी गंभीर आरोप केले. गांधीजींना या आरोपांचे फार दुःख झाले. त्यांनी सरकारने पुरावा पुढे आणून आपल्यावर खटला चालवावा, मी माझी बाजू उघड मांडतो म्हणून व्हॉईसरॉयला पत्र लिहिले. तथापि, सरकारने तिकडे दुर्लक्ष केले. म्हणून गांधीजींनी ईश्वराच्या न्यायालयात न्याय मागण्यांसाठी १० फेब्रुवारी १९४५ ते ३ मार्च १९४३ या कालावधीत २१ दिवसांचे उपोषण केले. खरेतर या उपोषणातून गांधीजी वाचणार नाहीत हे गृहीत धरून त्यांच्या अंत्यविधीची सरकारने तयारी केली होती, तथापि सरकार व डॉक्टर यांचा अंदाज फोल ठरवून गांधीजी या उपवासातून सलामत बाहेर पडले.

## ❑ चलेजाव चळवळीचे मूल्यमापन :-

आधुनिक भारताच्या इतिहासात 'चलेजाव' चळवळीला फार मोठे महत्त्व आहे. या चळवळीत भूमिगत राहून चळवळ चालविणाऱ्यांचे एक ज्येष्ठ नेते श्री. जयप्रकाश नारायण म्हणतात की, 'फ्रान्समध्ये जसे फ्रेंच राज्यक्रांतीचे स्थान आहे. रशियात जसे रशियन राज्यक्रांतीचे स्थान आहे, तसे १९४२ च्या क्रांतीचे हिंदुस्थानच्या इतिहासात स्थान आहे. जगातील कोणत्याही क्रांतीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनतेने भाग घेतलेला नाही. नियोजनाचा अभाव, शासकीय कर्मचाऱ्यांची सरकारला साथ, मर्यादित साधने, सरकारची निर्दयी दडपशाही, भीषण उपासमार, भारतीय लोकांतील फूट इत्यादी कारणांमुळे चलेजाव चळवळीला मोठ्या प्रमाणात यश मिळू शकले नाही.

जरी ही चळवळ देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात यशस्वी झाली नसली तरी या चळवळीने देशाला काहीच दिले नाही असे म्हणता येणार नाही. उलट या चळवळीमुळे स्वातंत्र्य जवळ आले. स्वातंत्र्यासाठी सामान्य जनता प्राणार्पण करण्यास तयार आहे अशा अवस्थेत राष्ट्रीय चळवळ येऊन पाहोचली. भारतीयांचा आत्मविश्वास वाढला व ब्रिटीश राज्यकर्त्यांचा आत्मविश्वास हळूहळू कमी होऊ लागला. ब्रिटीशांप्रती भारतीयांच्या मनातील असंतोष हा अधिक तीव्र बनला. आपण फर काळ हिंदुस्थान आपल्या ताब्यात ठेवू शकत नाही याची जाणीव राज्यकर्त्यांना झाली. या चळवळीमुळे आझाद हिंद सेनेच्या भावी कामगिरीची पार्श्वभूमी तयार झाली. या आंदोलनाने आग्नेय आशियातील हिंदी जनतेत उत्साह निर्माण झाला व भारतीय स्वातंत्र्यलढ्यास साहाय्य करण्यासाठी हे लोक पुढे आले. या चळवळीने भारतीय समाजात मोठी क्रांती घडवून आणली. म. गांधीजींच्या शिकवणुकीमुळे नेत्यांविना संघर्ष करावयास शिकविले. या चळवळीचा आणखी एक परिणाम म्हणजे इंग्रज व मुस्लीम लीग यांची युती अधिक घनिष्ठ झाली. त्याचे परिणाम देशाच्या फाळणीत झाले.

एकंदरीत या चळवळीने भारताच्या स्वातंत्र्याची पार्श्वभूमी चांगलीच भक्कम तयार केली हे कोणीही नाकबूल करणार नाही. म्हणूनच चलेजाव चळवळ ही आधुनिक भारताच्या इतिहासातील महत्त्वाची चळवळ मानली जाते.

### ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ✻

❑ **अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. म. गांधीजींनी कोणत्या वृत्तपत्रांतून इंग्रजांच्या धोरणावर टीका करण्यास सुरुवात केली?

२. वर्धा येथे काँग्रेस वर्किंग कमिटीने कोणता ठराव केला?

३. क्रिप्स मिशन भारतात केव्हा आले?

४. चलेजाव ठराव पास झाल्यानंतर म. गांधींना कोणत्या ठिकाणी स्थानबध्द करण्यात आले?

५. 'चलेजाव' आंदोलन केव्हा सुरू झाले?

❑ **ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. 'करेंगे या मरेंगे' (Do or Die) हा नारा ............ यांनी दिला.

*अ) वि. दा. सावरकर* *ब) नेताजी सुभाषचंद्र बोस*

*क) जवाहरलाल नेहरू* *ड) महात्मा गांधी.*

२. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी .......... हा पक्ष स्थापन केला.

*अ) साम्यवादी पक्ष* *ब) आझाद पक्ष*

*क) फॉरवर्ड ब्लॉक* *ड) समाजवादी पक्ष.*

३. चलेजाव ठराव पास झाल्यानंतर जवाहरलाल नेहरूंना .......... येथील तुरुंगात स्थानबध्द करण्यात आले.

*अ) नागपूर* *ब) येरवडा*

*क) मुंबई* *ड) अहमदनगर.*

४. चलेजाव आंदोलनाची सुरुवात .......... येथून झाली.

*अ) बनारस* *ब) नागपूर* *क) चितगाव* *ड) मुंबई.*

५. महात्मा गांधीनी २१ दिवसांचे उपोषण ............. रोजी सुरू केले.

*अ) ७ फेब्रुवारी, १९४३* *ब) ८ फेब्रुवारी, १९४३*

*क) ९ फेब्रुवारी, १९४३* *ड) १० फेब्रुवारी, १९४३.*

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **सत्याग्रह :** सत्याचा आग्रह, अन्यायाविरोधी कृतीचा मार्ग, सत्य व अहिंसा या दोन्ही तत्त्वांचा मिलाफ म्हणजे सत्याग्रह.

२. **अहिंसा :** कोणाही प्राणिमात्राला विचार-आचार किंवा उच्चारणे न दुखविणे म्हणजे अहिंसा होय.

३. **नि:शस्त्र प्रतिकार :** शस्त्राशिवाय शांततेच्या मार्गाने करावयाचा विरोध.

४. **बॅरिस्टर :** कायद्याची उच्च पदवी.

५. **विभक्त मतदार संघ :** विशिष्ट जातीसाठी राखून ठेवलेला मतदारसंघ. अशा मतदार संघाने विशिष्ठ जातीच्या मतदारांनाच मतदान करता येते व त्यांनाच फक्त उमेदवार म्हणून निवडणूक लढवता येते.

६. **प्रतिसरकार :** समांतर शासन किंवा सरकार.

७. **स्वराज्य :** स्वत:चे राज्य.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** १. *इंडियन ओपिनियन.*

२. *नामदार गोपाळकृष्ण गोखले.*

३. *इ.स. १९१६.*

४. *चंपारण्य सत्याग्रह.*

५. *अहमदाबाद कापड गिरणी कामगारांचा संप.*

६. *जालियनवाला बाग हत्याकांड व पंजाबात घडलेल्या अत्याचाराची चौकशी करण्यासाठी.*

७. *महात्मा गांधीजी.*

८. *कलकत्ता अधिवेशन-४ सप्टेंबर, १९२०.*

९. *महात्मा गाधी.*

१०. *१८ फेब्रुवारी, १९२२.*

**ब)** १. *ड) द. आफ्रिका.*

२. *क) द. आफ्रिका.*

३. *ब) मि. रौलेट.*

४. *ब) जनरल डायर.*

५. *अ) १३ एप्रिल १९१९.*

६. *ड) जर्मनी.*

७. *ब) सर.*

८. *अ) हिंसाचार.*

९. *अ) स्वदेशी फंड.*

१०. *ड) चौरीचौरा.*

## ❑ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ची उत्तरे

**अ)** १. *कोलकात्ता अधिवेशन (डिसेंबर १९२८).*

२. *मिठाच्या.*

३. *साबरमती.*

४. *सरोजिनी नायडू.*

५. *खान अब्दुल गफारखान.*

६. *रॅम्से मॅकडोनाल्ड.*

७. *सोलापूर.*

८. *रॅम्से मॅकडोनाल्ड.*

९. *पुणे करार किंवा येरवडा करार.*

१०. *महात्मा गांधी.*

**ब)** १. *ब) फेब्रुवारी १९२०.*

२. *ब) ७८.*

३. *क) खान अब्दल गफारखान.*

४. *अ) यंग इंडिया.*

५. *क) सोलापूर.*

६. *ड) बापू गेणू.*

७. *क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर.*

८. *ड) ५ मार्च १९३१.*

९. *अ) १०७.*

१०. *ब) ६ एप्रिल, १९३४.*

## ❑ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ची उत्तरे

अ) १. *हरिजन.*

२. *ब्रिटीशांनी हिंदुस्थान सोडून जावे (चलेजाव).*

३. *मार्च १९४२.*

४. *आगाखान पॅलेस.*

५. *९ ऑगस्ट, १९४२.*

ब) १. *ड) महात्मा गांधी.*

२. *क) फॉरवर्ड ब्लॉक.*

३. *ड) अहमदनगर.*

४. *ड) मुंबई.*

५. *ड) १० फेब्रुवारी, १९४३.*

# २.५ सारांश

भारतीय राजकारणामध्ये महात्मा गांधीचे आगमन ही घटना भारतीय इतिहासाला वलयांकित करणारी असून १९१५ नंतर महात्मा गांधीनी आपल्या प्रत्येक कृतिशील धोरणांमुळे सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधले. देशाच्या विविध भागात दौरे काढून सर्वसामान्यांच्या जीवनाचे अवलोकन केले आणि खरा हिंदुस्थान हा शहरात नसून खेड्यात आहे. त्याच्यासाठी काम करणे आवश्यक आहे. भारतीय समाज हा मुख्यत: निरक्षण, गरीब, ज्ञान, धर्म, वर्ण यात विभागलेला असून त्यांना एका सूत्रात बांधून त्यांचा उध्दार करणे. तसेच त्यांना स्वातंत्र्याच्या प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली पाहिजे. यासाठी म. गांधीनी जनउध्दारासाठीच्या चळवळीत स्वत:ला झोकून दिले.

महात्मा गांधीजीचे असामान्य नेतृत्व आणि त्यांनी स्वातंत्र्य लढ्यासाठी अवलंबलेले अभिनव मार्ग यामुळे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे स्वरूपच बदलून गेले. गांधीजींच्या राजकारणातील प्रवेशामुळे भारतीयांच्यात राजकीय जागृती येऊन त्यांच्यात असंतोष वाढीस लागला. या असंतोषाला दडपून टाकण्यासाठी ब्रिटीशांनी अनेक जुलमी कायदे व दडपशाहीचा अवलंब केला. चंपारण्य सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, अहमदाबादचा गिरणी कामगार लढा इ. आंदोलनाच्या वेळी महात्मा गांधीना यश मिळाले व

त्यांचा उत्साह प्रचंड दुणावला. मात्र पुढे जालियनवाला बाग हत्याकांड, हंटरय कमिशनचा अहवाल, खिलाफत चळवळ यासारख्या घटनांमुळे महात्मा गांधीजींचा ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या न्यायप्रियतेवरील विश्वास उडाला व त्यांनी इंग्रजांच्या अमानुष जुलमाविरुध्द आपली शक्ती पणास लावण्याचे ठरविले. विश्वाघातकी व जुलमी सरकारविरुध्द आता संघर्षच केला पाहिजे असे जनतेसाठी वाटू लागले आणि त्यातूनच असहकार चळवळीचे रणशिंग फुंकले. या चळवळीने अनेक विधायक गोष्टी घडवून आणल्या.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सविनय कायदेभंग चळवळीसाठी महत्त्वाचे स्थान आहे. स्त्रिया, कामगार, शेतकरी, मुले हे समाजातील सर्व घटक. या चळवळीच्या निमित्ताने देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. या चळवळीमुळे राजकीय जनता राजकीयदृष्ट्या जागृत व निर्भय बनली. ब्रिटीश सरकारने जुलमी अत्याचार करूनही जनतेने शरणागती पत्करली नाही. एकूणच सविनय कायदेभंग चळवळ ही भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीचा एक महत्त्वाचा टप्पा होय.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या अखेरच्या पर्वातील महत्त्वाची घटना म्हणून 'चलेजाव' चळवळीकडे पाहिले जाते. आंदोलनाच्या सुरुवातीला ब्रिटीश सरकारने महत्त्वाच्या सर्व नेत्यांना अटक केल्यामुळे लोकांनी अहिंसात्मक, हिंसात्मक, भूमिगत, उघड असे चळवळीचे सर्व मार्ग चोखाळले. गांधीजीनी आधीच जाहीर केल्याप्रमाणे निर्वाणीचा व अखेरचा लढा म्हणून जनतेने तो चालविला. 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने लढा लढविला. एकंदरीत चलेजाव चळवळीस घवघवीत यश मिळाले नसले, तरी या चळवळीचे महत्त्व कमी होत नाही. या चळवळीमुळे स्वातंत्र्य दृष्टिपथात आले हे नाकारता येणार नाही.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

❑ **अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (दिर्घोत्तरी प्रश्न)**

१. असहकार चळवळीची कारणे व स्वरूप स्पष्ट करा.

२. असहकार चळवळीचे मूल्यमापन करा.

३. सविनय कायदेभंग चळवळीची वाटचाल स्पष्ट करा.

४. चलेजाव चळवळीची कारणे द्या.

५. चलेजाव चळवळीची वाटचाल विशद करा.

❑ **ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)**

१. गांधीजींचे आफ्रिकेतील कार्य.

२. जालियनवाला बाग हत्याकांड.

३. खिलाफत चळवळ.

४. दांडी यात्रा.

५. खुदा-इ-खिदमतगार.

६. पहिली गोलमेज परिषद.

७. गांधी-आयर्विन करार.

८. पुणे करार.

९. चलेजाव चळवळ.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. सुमन वैद्य, शांता कोठेकर :** *''आधुनिक भारताचा इतिहास (१७५७-१८५७)''*, साईनाथ प्रकाशन, १९९३.

२. **चंद्र बिपन, मृदला मुखर्जी, आदित्य मुखर्जी :** *''इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स''*, के. सागर पब्लिकेशन, पुणे.

३. **सदानंद मोरे :** *''लोकमान्य ते महात्मा : खंड १ व २''*, राजहंस प्रकाशन, २००७.

४. **श. द. जावडेकर :** *''आधुनिक भारत''*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

५. **कुमार केतकर :** *''कथा स्वातंत्र्याची''*, महाराष्ट्र पाठय पुस्तक निर्मिती मंडळ, १९८५.

६. **ग. प्र. प्रधान :** *''स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत''*, साधना प्रकाशन, पुणे, १९८३.

७. **डॉ. अनिल कठारे :** *''आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास''*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००९.

८. **डॉ. एस. एस. गाठळ :** *''आधुनिक भारताचा इतिहास''*, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१६.

९. **य. ना. कदम :** *''समग्र भारताचा इतिहास''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००३.

१०. **डॉ. बी. एल. ग्रोवर, एस. के. बेल्हेकर :** *''आधुनिक भारताचा इतिहास''*, एस. चाँद आणि कंपनी, नवी दिल्ली, २००३.

११. **डॉ. जयसिंगराव पवार :** *''हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.

१२. **डॉ. नभा काकडे, डॉ. लता अकलूजकर :** *''आधुनिक भारताचा इतिहास''*, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर.

१३. **डॉ. पी. एन. शिंदे, ए. जी. थोरात :** *''आधुनिक भारताचा इतिहास''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११.

१४. **प्रबोधन प्रकाशन ज्योती (मासिक) :** *''समाजवादी प्रबोधिनी''*, इचलकरंजी, सप्टें.-ऑक्टोबर, २०१८.

❑❑❑

सत्र–४ : घटक–३

# स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाह

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ क्रांतीकारी चळवळी: बंगाल, महाराष्ट्र, पंजाब आणि इतर क्रांतीकारी चळवळी

३.२.२ डाव्या चळवळी

३.२.३ सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सेना

३.३ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.४ सरावासाठी स्वाध्याय

३.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थ्यांना खालील गोष्टीचे आकलन होईल.

१. स्वातंत्र्य चळवळ विविध अंगांनी समजून घेणे.

२. क्रांतीकारी चळवळ व स्वातंत्र्य चळवळीतील तिचे योगदान समजून येईल.

३. डावी चळवळ म्हणजे काय व स्वातंत्र्य चळवळीतील तिचे योगदान समजून येईल.

४. सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सेना यांची स्वातंत्र्य चळवळीतील योगदान समजून येईल.

## ३.१ प्रस्तावना

भारतामध्ये १८५७ च्या उठावानंतर स्वातंत्र्य चळवळीला खऱ्या अर्थाने वेग आला. या स्वातंत्र्य चळवळीच्या सुरूवातीला हिंदुस्थानात इंग्रजांच्या जुलमी आणि अन्यायी प्रशासनाविरोधात अनेक उठाव घडून आले. (उदा. रामोश्यांचा उठाव, भिल्लांचा उठाव, संथाळाचा उठाव, इ.) परंतू राष्ट्रवादाचा खरा विचार रूजला तो १८५७ च्या उठावानंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीत प्रामुख्याने चार विचारप्रवाह दिसून

येतात. १) मवाळमतवादी, २) जहालमतवादी, ३) गांधीवादी आणि ४) क्रांतीकारी या विचारप्रवाहाची विचारसरणी, कार्यक्रम व कार्यपध्दती एकमेकापासून पूर्णत: भिन्न होती. यामध्ये क्रांतीकारी विचारप्रवाह हा इतर विचारप्रवाहापेक्षा वेगळा होता. या विचारप्रवाहाने सशस्त्र लढा, त्याग बलिदान व हिंसा या मार्गाचा स्वातंत्र्य मिळविण्यासाठी उपयोग केला. त्यांनी ब्रिटिशांना जशास तसे उत्तर देण्याचे ठरविले.

## ३.२ विषय विवेचन

प्रस्तूत प्रकरणात भारताच्या स्वातंत्र्यलढयातील क्रांतीकारी चळवळी आणि इतर विचारप्रवाह यांचा अभ्यास करता येईल. या प्रवाहांनी भारतीय स्वातंत्र्यलढयाला एक वेगळे वळण मिळाल्याचे दिसून येते.

### ३.२.१ भारतातील क्रांतीकारी चळवळी : बंगाल, महाराष्ट्र, पंजाब व इतर क्रांतीकारी चळवळी

#### ३.२.१.१ भारतातील क्रांतीकारी चळवळीच्या उदयाची कारणे

१. **१८५७ च्या उठापासून मिळालेली प्रेरणा :** या उठावाचे दूरगामी परिणाम घडून आले. या उठावाच्या माध्यमातून अन्यायकारी ब्रिटिश सत्तेला भारताबाहेर हाकलून लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उठावाच्यावेळी ब्रिटिशानी केलेला आमानुष अत्याचार यातून भारतीय तरूण वर्गामध्ये ब्रिटिश सत्तेविषयी असंतोष निर्माण झाला. त्यामुळेच भारतीय तरूण क्रांतीकारी विचाराकडे आकर्षित झाला.

२. **धर्म व समाजसुधारणेच्या चळवळीमधून मिळालेली प्रेरणा :** १९व्या शतकात भारतीय समाजात जागृती घडविण्याच्या उद्देशाने धर्म व समाजसुधारणेच्या चळवळी उदयास आल्या. या चळवळीच्या माध्यमातून भारतीय समाजात ब्रिटिशांनी चालविलेला धर्म व संस्कृतीविषयी चालविलेला चुकीचा प्रचार व प्रसार याविषयीचे प्रबोधन या सुधारणवादी चळवळीने केले. त्यामुळे भारतीय तरूणांचे डोळे उघडले. त्यांनी ब्रिटिशंच्या या धोरणाला प्रखर विरोध केला. यातूनच ते क्रांतीकारी चळवळीकडे वळले.

३. **जहालनेत्यांचा प्रखर राष्ट्रवाद :** जहालमतवादी विचारातूनच निर्माण झालेला क्रांतीकारी हा एक गट होता. जहालमतवादी नेत्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सरकारवर टिकेची मोठयाप्रमाणात झोड उठविली. या नेत्यांच्या विचारांची प्रेरणा घेवूनच क्रांतीकारकांनी ब्रिटिशांविरूध्द प्रत्यक्ष कृती करण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच क्रांतीकारी चळवळ उदयास आली.

४. **राष्ट्रभक्ती निर्माण करणारे साहित्य :** या काळात रात्र्रवादाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी वेगवेगळया भाषेतील साहित्य निर्माण झाले. यामध्ये वृत्तपत्रे, पुस्तके, मासिके इत्यादींनी क्रांतीकारी चळवळीला खतपाणी घातले. उदा. बंकिंमचद्र चटर्जींचे आनंदमठ, चिपळूणकरांची निबंधमाला, परांजपे यांचा काळ, टिळकांचे केसरी व मराठा, पंजाबमधील ट्रिब्यून, बंगालमधील पाल यांचे 'न्यू इंडिका', तसेच 'संध्या', 'युगांतर', इत्यादी वृत्तपत्रे व नियतकालिकामधून ब्रिटिशांच्या शोषक व अन्यायकारी धोरणावर प्रखर टिका केली. या लिखाणामधून भारतीय तरूणांची क्रांतीकारी मानसिकता तयार झाली. त्यातूनच क्रांतीकारी तरूण तयार झाले व हजारो तरूण बलिदानासाठी तयार झाले.

५. **इंग्रजी शिक्षणाचा परिणाम :** इंग्रजांच्या आगमनामुळे भारतात इंग्रजी शिक्षणाची सुरूवात झाली. त्यातूनच इंग्रजी शिक्षण घेतलेला नवा वर्ग उदयास आला. यामुळे या तरूणांना अनेक प्रकारचे साहित्य वाचता आले. या पाश्चिमात्य साहित्यामुळे स्वातंत्र्य, समता, मानवतावाद, राष्ट्रवाद व उदारमतवाद इ. आधुनिक विचार मिळाले. तसेच अमेरिकन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, इटली व जर्मनीचे एकीकरण इ. यातून भारतीयांना प्रेरणा मिळाली. मॅझिनीचे चरित्र, हे भारतीय क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान बनले. या इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चात्य देशातील स्वातंत्र्य लढे व क्रंातीकारकांच्या कार्याची माहिती भारतीयांना मिळाली. त्यातूनच तरूणवर्ग क्रांतीकारी चळवळीकडे आकर्षित झाला. त्यातूनच ही चळवळ उदयास आली.

६. **ब्रिटिशांचे वर्णद्वेषाचे धोरण :** इंग्रज हे स्वत:ला श्रेष्ठ समजत होते. ते इतरांना आपल्यापेक्षा फार कमी कनिष्ठ समजत असत. त्यांनी सर्वत्र काळा-गोरा असा भेदभाव केला. त्यांनी सर्वच क्षेत्रामध्ये हे तत्व अवलंबिले. तत्पूर्वी १८५७ च्या उठावानंतर राणीच्या जाहिरनाम्यात भारतीयाना नोकरी देताना जात धर्म यांचा विचार केला जाणार नाही. असे आश्वासन दिले होते. परंतु इंग्रजांनी ते पाळले नाही. न्यायदान करतानाही भारतीयांबद्दल दुजाभाव करीत असत. ब्रिटिशांनी आपल्या घराबाहेर व हॉटेल्सबाहेर 'भारतीय व कुत्री यांना प्रवेश नाही' अशा आशयाच्या पाट्या लावल्या जात असत. या त्यांच्या वर्णव्देषी धोरणामुळे भारतीयांची अस्मिता व स्वाभिमान जागा झाला. त्यामुळेच अन्यायाविरूध्द भारतीय तरूणांच्या मनात क्रंातीकारी विचार येवू लागला. त्यातूनच क्रांतीकारी चळवळ उदयास आली.

७. **ब्रिटिशांचे आर्थिक शोषणाचे धोरण :** ब्रिटिश हे मुळात व्यापारी होते व व्यापा-याची मुळ भूमिका ही आथिक फायदा मिळविणे हीच असते. मग तो कोणत्या पध्दतीने आपला फायदा होतो आहे. हे पाहिले जात नाही. त्यांनी भारतात आपली सत्ता स्थापन केल्यानंतर सर्व धोरण इंग्लंडच्या फायद्याचे आखले. त्यांनी भारतातील कच्चा माल स्वस्त किंमतीत

घ्यायचा व इंग्लंडमध्ये तयार झालेला पक्का माल येथे जास्त किंमतीत विकायचा त्यामुळे भारतातील कुटिरउद्योग, बंद पडले व अनेक कामगार बेकार झाले. इंग्रजांनी शेतीच्या विकासासाठी कोणतीही योजना राबविली नाही. त्यामुळे शेती मागे पडली. परंतू कर मात्र नियमितपणे वसूल केला जात असे ब्रिटिशांनी चालविलेल्या या धोरण विरोधात दादाभाई नौरोजी यांनी 'आर्थिक निस्सारणाचा सिध्दांत' मांडून इंग्रजांची पोलखोल केली. इंग्रजांच्या या आर्थिक शोषणामुळे देश दारिद्र्याच्या खाईत लोटला गेला आहे. त्यामुळे भारतीय तरूणांमध्ये इंग्रजाविषयी मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. म्हणूनच क्रांतीकारी चळवळीची गरज वाटू लागली.

८. **अन्यायी राज्यकर्ते :** इंग्रजी राज्यकर्त्यांनी अन्यायी व दडपशाही कृत्यांनी क्रांतीकारकांच्या उदयाला हातभार लावला. या अन्यायी व दडपशाही कृत्यांमध्ये लॉर्ड लॅन्सडाउन, लॉर्ड एल्जिन, व लॉर्ड कर्झन या साम्राज्यवादी इंग्रज अधिकाऱ्यांचा समावेश होता. यांनी आपल्या कारकिर्दीत अन्यायी व दडपशाहीचे कायदे केले. यामध्ये लॉर्ड कर्झनच्या काळात या दडपशाहीने कळस गाठला. तो पक्का साम्राज्यवादी विचारसरणीचा असल्याने भारतीयांना काडीमात्र किंमत दिली नाही. त्याच्या मते 'इंग्रज हे वंशाने श्रेष्ठ असून दुस-यावर राज्य करण्यासाठीच ते पृथ्वीवर निर्माण झाले आहेत. हिंदी लोक त्यांची बरोबरी कधीच करू शकणार नाहीत. हिंदी संस्कृतीत वाढलेल्या माणसांना लोकशाहीचे हक्क देण्यात काहीच अर्थ नाही व ते दिल्यास चूकीचे होईल.' अशी त्याची विचारसरणी होती. त्याने आपल्या कारकिर्दीत 'दि ऑफिसियल सिक्रेट ॲक्ट', 'दि कलकत्ता कॉर्पोरेशन ॲक्ट', 'इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट' यासारखे कायदे करून हिंदी समाजाचे हक्क हिरावून घेतले. या राज्यकर्त्यांच्या अन्यायी कृत्यामुळे व उद्दाम वृत्तीमुळे हिंदी तरूणांमध्ये असंतोषाची लाट निर्माण झाली व त्यातूनच तो क्रांतीकारी विचाराकडे वळला.

९. **लॉर्ड लिटनचे प्रतिगामी धोरण :** १८७६ ते ८० या काळात लॉर्ड लिटन हा भारताचा व्हॉइसरॉय म्हणून भारतात आला. या काळात भारतात दुष्काळ पडल्याने परिस्थिती अत्यंत बिकट बनली होती. परंतू त्यावर कोणतीही उपाययोजना केली नाही. उलट अन्यायकारी कायदे केले. १८७८ मध्ये वृत्तपत्राची मुस्कटदाबी करणारा 'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' हा कायदा केला. याच काळात भारतीयांजवळ शस्त्र बाळगण्यास बदी आणणारा 'आर्मस ॲक्ट' हा कायदा केला. तसेच १८७६ मध्ये भारतीय लोकसेवेची (I.C.S.) परीक्षा पास होण्याची वयोमर्यादा २१ वरून १९ केली. जे भारतीयांना ही परीक्षा पास होणे शक्य नव्हते. लॉर्ड लिटनच्या या धोरणचा शेतकरी, सामान्य जनता, व्यापारी, पत्रकार, उच्च शिक्षित अशा विविध क्षेत्रातील लोकांवर परिणाम झाला. या त्याच्या धोरणाबद्दल बूच असे म्हणतात की,

''लॉर्ड लिटनच्या दडपशाहीच्या धोरणामुळे भारतीय जनता झोपेतून जागी झाली व भारताची वाटचाल क्रांतीकारी स्फोटाकडे होवू लागली.''

१०. **बंगालच्या फाळणीचा परिणाम :** भारतीय स्वातंत्र्यलढयाच्या इतिहासात बंगालची फाळणी (१९०५) क्रांतीकारी चळवळीसाठी अत्यंत महत्वाची ठरली. लॉर्ड कर्झनने केलेल्या या कृत्यामुळे भारतीय समाजात संतापाची लाट निर्माण झाली. त्याने हिंदू व मुस्लिम समाजात फुट पाडण्याचा कुटील डाव खेळला. या त्याच्या धोरणामुळे भारतीयांना ब्रिटिशांचे खरे स्वरूप कळून आले. त्यामुळे भारतीयांना वाटू लागले की ब्रिटिशांना हाकलून लावणे हाच एकमेव मार्ग आहे. ब्रिटिशांनी केलेल्या फोडा-झोडा व राज्य करा या नीतीला धडा शिकविण्यासाठी तरूण वर्ग क्रांतीकारी मार्गाकडे वळला.

११. **नैसर्गिक आपत्ती व सरकारची भूमिका :** ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतीय जनतेबाबत सातत्याने कठोर व अन्यायी धोरण राबविले. त्यांनी भारतीयांच्या समस्येचा कधीच विचार केला नाही. १८७६ ते १९०० भारतात जवळजवळ १८ दुष्काळ पडले. यामध्ये २ कोटी लोकांना फटका बसला. हजारो भूकबळी पडले. त्यामध्येच पुण्यात प्लेगची साथ पसरली. या साथीचे निवारण करण्याच्या नावाखाली मिस्टर रँड यांनी सक्षम यंत्रणा राबविली नाही. त्याने अशी कृत्ये केली की त्यामुळे तरूणांची डोकी भडकली. सरकारच्या या अत्याचार व दडपशाहीला पायबंद घालण्यासाठी तरूणांनी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केला.

१२. **जगतिक क्रांतीकारी घटनांपासून मिळालेली प्रेरणा :** यामुळे सुध्दा भारतीय क्रांतीकारी चळवळीला प्रेरणा मिळाली. फ्रेंच राज्यक्रांती पासून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्वप्रणाली मिळाली. इटली व जर्मनी एकीकरणासाठी तेथील लोकंनी दिलेला त्याग १९०४ - ०५ मध्ये जपानने रशियाचा केलेला पराभव त्यामुळे भारतीय तरूणांचा आत्मविश्वास वाढला व त्यासाठी क्रांतीकारी चळवळीची आवश्यकता वाटू लागली.

❍ वरील हे सर्व घटक भारतामध्ये क्रांतीकारी चळवळ निर्माण करण्यास कारणीभूत ठरल्याचे दिसून येते.

## ३.२.१.२ बंगालमधील क्रांतीकारक व त्यांचे कार्य

स्वातंत्र्य चळवळीच्या अगोदर व स्वातत्र्य चळवळीच्या काळात बंगाल हा आघाडीवर असणारा प्रांत होता. बंगालने अनेक समाजसुधारक, स्वातंत्र्य सेनानी व क्रांतीकारक भारतभूमीला दिले. येथूनच भारतातील सर्व सुत्रे हलविली जात होती. अशाच बंगालमधील क्रांतीकारी तरूणांच्या कार्याचा आढावा आपणास घ्यावयाचा आहे.

## ❑ वीरेंद्रकुमार घोष, भूपेंद्र दत्त : युगांतर समिती :–

बंगालमधील क्रांतीकारकांचे अग्रणी म्हणून योगी अरविंद यांचे बंधू वीरेंद्रकुमार घोष आणि स्वामी विवेकानंद यांचे बंधू भूपेंद्रनाथ दत्त यांना ओळखले जाते. सन १९०६ मध्ये या दोन क्रांतीकारकांनी 'युगांतर' हे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्रातून सरकारविरूध्द सशस्त्र प्रतिकार करण्यावर भर दिला. आणि बंगालमध्ये तसा प्रचार सुरू केला. अरविंद घोष, भूपेंद्रनाथ दत्त, अश्विनी दत्त यांनी १९०६ मध्ये 'युगांतर' समितीची स्थापना केली. या समितीच्या माध्यमातून कलकत्ता येथे बॉम्ब बनविण्याचा कारखाना सुरू केला. या समितीने ब्रिटिशांना धडा शिकविणे, सरकारी कामात अडथळा आणणे इ. कामे सुरू केली. त्यामध्येच अलिपूर गुप्त कट खटल्यात वीरेंद्रकुमार घोष व त्याच्या सहका–याना हद्दपारीची शिक्षा झाली. या युगांतर समीतीसमोर रशियातील क्रांतीकारकांचा आदर्श होता.

## ☼ अनुशिलन समिती :–

या समितीची स्थापना पी. मित्रा यांनी केली. बंगालमधील क्रांतीकारी चळवळीची मुहूर्तमेढ या समितीने केली. ब्रिटिशांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी व सरकारी अधिकाऱ्यांच्या अन्यायी कृत्यांना जाब देण्यासाठी बंगाली क्रांतीकारीकांनी अनेक संघटना स्थापना केल्या होत्या त्यात प्रमुख संघटना म्हणून अनुशिलन समिती ओळखली जाते. यामध्ये नरेंद्र भट्टाचार्य, जतींद्रनाथ बॅनर्जी, भूपेंद्र दत्त, पुलीनदास मुखर्जी इ. या समितीची प्रमुख तीन उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

१. बंगाली तरूणांच्या ह्रदयात स्वातंत्र्य प्रेम जागृत करून त्यांना संघटित करणे.

२. तरूणांना शस्त्र प्रशिक्षण देणे.

३. अन्यायी व जुलमी अधिका–यांचे खून करणे.

या समितीने देशात एकाच वेळी उठाव करण्याचे अवाहन केले. या समितीच्या मते एकाच वेळी उठाव केल्यास ब्रिटिशांचा पराभव होवू शकतो. या समितीत १५ ते २५ वयोगटातील तरूणांचा सहभाग होता. या समितीने बंगालमध्ये जवळजवळ ५०० शाखा सुरू केल्या. या समितीने अनेक जुलमी अधिकाऱ्याचे खून केले, बॉम्बहल्ले केले, रेल्वे गाडया अडविण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थानातून गुप्तपणे शस्त्रास्त्रे आणली होती. ही समिती हिंसक बनत चालली होती. त्यामुळे अंतर्गत मतभेद निर्माण झाले. यातूनच अरविंद घोष यांच्या नेतृत्वाखाली युगांतर समिती हा स्वतंत्र गट स्थापन करण्यात आला.

## ☼ चितगांव कट खटला :–

क्रांतीकारी चळवळीत सर्वात गाजलेली घटना म्हणून याकडे पाहिले जाते. या गटाने सरकारी

शस्त्रागारावर हल्ला करून तेथील शस्त्रे व दारूगोळा यांची मोठ्या प्रमाणात लुट केली. या योजनेत सुर्यसेन, अजय घोष, इ. ६५ क्रांतीकारकांनी भाग घेतला होता. या हल्ल्याची घटना १८ एप्रिल १९३० रोजी घडली.

या क्रांतीकारकांनी पोलिसांचा गणवेश तयार करून सरकारशी संघर्ष सुरू ठेवला. यामध्ये टेलिफोन एक्सचेंज उध्वस्त करणे, दळणवळण बंद पाडले, दारूगोळयावर हल्ला केला. चितगांव कटातील क्रांतीकारकांची धरपकड सुरू केली. व त्याच्यावर जो खटला चलविला गेला त्यास 'चितगांव कट खटला' म्हणून प्रसिध्द आहे. या खटल्यातील १५ क्रांतीकारकांना फाशीची शिक्षा झाली. त्यामध्ये सुर्यसेन, अंबिक चक्रवर्ती, तारकेश्वर दत्त यांना फाशी तर कल्पना दत्त, गणेश घोष, अनंत सिंग यांना जन्मठेपची शिक्षा झाली होती.

या चितगांव कटामध्ये बंगालमधील तरूणींनी उल्लेखनिय सहभाग नोंदविला यामध्ये प्रीतीलता वड्डेदार, कल्पना दत्त, सुनिती चौधरी, बीना दास या तरूणीनी साहसी कारवायात सहभाग नोंदविला.

या स्त्रियांना पुरेशी साधनसामग्री उपलब्ध नसतानाही केवळ आपल्या असाधारण इच्छाशक्तीच्या जोरावर ब्रिटिश सत्तेपुढे काही काळासाठी आव्हान निर्माण केले. या त्यांच्या पराक्रमामुळे समान्य जनतेत नवचैतन्य निर्माण होवून प्रेरणा मिळाली.

अशा प्रकारे बंगालमधील क्रांतीकारक व त्याच्या चळवळींनी भारताच्या स्वातंत्र्यलढयात मोलाची कामगिरी बजावली.

## ३.२.१.३ महाराष्ट्रातील क्रांतीकारक व त्यांचे कार्य

### ३.२.१.३.१ वासुदेव बळवंत फडके

वासुदेव बळवंत फडके यांचा जन्म कुलाबा जिल्हयातील शिरढोण या गावी १८४५ मध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण शिरढोण येथे झाले. तर माध्यमिक शिक्षण हे कल्याण, मुंबई, पुणे अशा विविध ठिकाणी झाले. ते पाचवी नंतर पुढे शिकले नाहित. त्यांनी रेल्वेत कारकूनाची नोकरी सुरू केली. कालांतराने ही नोकरी सोडली व ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये लेखनिक म्हणून काम सुरू केले. नोकरीच्या काळात ब्रिटिश अधिकाऱ्याकडून मिळणारी अपमानकारक वागणूक त्यांच्यामध्ये राष्ट्रवाद जागृत करण्यास कारणीभूत ठरली. त्यामध्येच १८७१ मध्ये आई अत्यंत आजारी असताना त्यांना रजा मिळाली नाही. त्यामध्येच त्यांच्या आईचा मृत्यू झाला. या घटनेचा त्याच्या मनावर जबरदस्त परिणाम झाला. त्यांनी इंग्रजांच्या या अन्यायी धोरणाविरूध्द बंड करण्याचे ठरविले. त्यामध्येच न्या. रानडे यांचे लिखाण व व्याख्याने त्यांना क्रांतीकारी बनविण्यास कारणीभूत ठरली.

वासुदेव बळवंत फडके यांच्या हे लक्षात आले की सुशिक्षित वर्ग हा नुसता बोलतो आहे. कृती काही करत नाही म्हणून त्यांनी आपला मार्ग बदलला इंग्रजाच्या या अन्यायी धोरणाविरूध्द कृतीशील भुमिका अवलंबिली. म्हणून त्यांनी रामोश्यांना शस्त्र पुरविण्यासाठी लागणारा निधी गोळा केला. बहुजन समाजाला लुबाडणाऱ्या धनिकांना लुटले, जिल्हया जिल्हयातून क्रांतीकारकांचे लहान लहान गट निर्माण केले. यांच्यामार्फत दळणवळणचे मार्ग उद्ध्वस्त करणे, तारायंत्र तोडणे, कैद्यांना मुक्त करणे इ. ब्रिटिश विरेधी कारवाया केल्या. त्यांनी पुण्याजवळील लोणीकंद येथे या बंडवाल्यांचे मुख्यालय स्थापन केले. येथूनच सर्व सुत्रे हालविली जात होती व ब्रिटिश सत्तेविरूध्द बंड पुकारल्याचे त्यांनी जाहिर केले.

वासुदेव बळवंत फडके यांनी इंग्रजावर जरब बसविण्याचे कार्य सुरू केले. त्यासाठी त्यांनी शेठ सावकारांना लुटले व संपत्ती जमा करून त्यातून शस्त्रे खरेदी करण्यास सुरूवात केली. या कामासाठी त्यांनी रामोश्यांना हाताशी धरले. त्यांनी सावकारांना लुटून ती संपत्ती गोरगरीबांना वाटून टाकली. त्यामुळे इंग्रज सत्तेपुढे त्यांचे आव्हान निर्माण झाले. त्यामुळे वासुदेव बळवंत फडके यांना पकडणे इंग्रजाना गरजेचे वाटू लागले. याकरिता मेजर डॅनियलची नियुक्ती केली. यामध्ये वासुदेव बळवंत फडके इंग्रजांच्या हाती लागत नव्हते. एके दिवशी म्हणजे २१ जुलै १८७९ रोजी झोपीत असताना त्यांना व त्यांच्या अनुयायांना पकडण्यात आले. पुढे कोर्टाने त्यांना जन्मठेपेची काळयापाण्याची शिक्षा ठोठावली. सन १८८० मध्ये त्यांची रवानगी एडन तुरूंगात करण्यात आली. तेथील वातावरणामुळे त्यांची प्रकृती बिघडली. त्यांना क्षयरोग झाला. त्याततच त्यांचा मृत्यू एडन तुरूंगात झाला.

वासुदेव बळवंत फडके यांनी इंग्रजी सत्तेविरूध्द पुकारलेला लढा यशस्वी झाला नाही. परंतू त्यांच्या या संघर्षामुळे भारतात सशस्त्र लढयाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्याच्या या लढयाबद्दल अमृतबझार पत्रिकेने आपल्या लेखात लिहिले की, 'देशप्रेमाने ओथंबलेल्या हिमालयासारखा उत्तुंग महापुरूष' असे म्हटले आहे.

### ३.२.१.३.२ वि. दा. सावरकर यांचे क्रांतीकार्य

स्वातंत्र्य लढयात क्रांतीकारकांना अनन्य साधारण महत्व आहे. यामध्येच वि. दा. सावरकर हे राष्ट्रीय भावनेने प्रेरित होवून महाराष्ट्रात क्रांतीकार्य सुरू केले. त्यांनी १९०० मध्ये नाशिक येथे 'मित्रमेळा' नावाची संस्था स्थापन केली. पुढे १९०४ मध्ये या संस्थेचे नाव 'अभिनव भारत' असे ठेवले. 'शस्त्राशिवाय स्वातंत्र्य नाही' अशी सावरकरांची विचारसरणी होती. त्यांनी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरही अभिनव भारतच्या शाखा स्थापन केल्या. सावरकर यांनी इटलीचा मॅझीनी यांच्या चरित्राचे मराठीत भाषांतर केले. हे भाषांतर करण्यापाठीमागे त्यांचा उद्देश म्हणजे मॅझीनीचे आदर्श भारतीयांसमोर ठेवून देशकार्यासाठी प्रेरित करणे. सन १९०६ मध्ये सावरकर इंग्लंडला गेले व तेथून भारतातील क्रांतीकारकांना

गुप्तपणे पिस्तुले, काडतुसे पाठवू लागले. त्यांच्या गैरहजेरीत अभिनव भारताचे कार्य त्यांचे वडिल बंधू गणेशपंत सावरकर यांनी पाहिले.

इंग्लंडमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कार्य जोरात सुरू होते. १९०७ मध्ये १८५७ च्या उठावाला ५० वर्षे पूर्ण झाली. तेव्हा 'हा संघर्ष म्हणजे भारतीय स्वातंत्र्य संग्राम होय' असे परखड प्रतिपादन सावरकरांनी केले. १९०८ मध्ये लंडन येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांजवळून काही आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करून त्यांना अटक केली. त्यांना भारतात घेवून येणारे जहाज फ्रान्सच्या मर्सेलिस बंदरात येताच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सागरात उडी मारून निसटण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या पाठोपाठ इंग्रज शिपायांनी सागरात उडया घेतल्या सावरकर पोहत पोहत किनाऱ्यावर आले आणि फ्रेंच शिपायांना फ्रान्समध्ये संरक्षण मिळण्याबाबत समजावून सांगू लागले. परंतू त्यांची भाषा फ्रेंच शिपायांच्या लक्षात येईना. तेवढयात इंग्रज शिपायांनी सावरकरांना पुन्हा अटक केली. भारतात आल्यावर 'नाशिक खटल्या'बाबत त्यांना दोनदा जन्मठेपेची शिक्षा सुनावली. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे इंग्लंडमधील क्रांतीकार्य लक्षात घेवून वडीलबंधूवर नाशिक येथे सरकारची करडी नजर होती.

१९०८ मध्ये त्यांच्याजवळ बरीच आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली. सरकारने ताबडतोब गणेशपंत सावरकर यांच्यावर खटला चालवून त्यांना जन्मठेपेच्या शिक्षेखाली अंदमानात पाठवले. यामुळे नाशिकमधल्या क्रांतीकारी गटाने ब्रिटिश अधिकाऱ्यावर दहशत बसविण्याचा निश्चय केला. अभिनव भारताच्या अनंत कान्हेरे, कर्वे व देशपांडे या नाशिकच्या क्रांतीकारकांना फाशीची शिक्षा देण्यात आली. याच नाशिक खटल्यात गोवून स्वातंत्र्यवीर सावरकरांनाही दोन वेळा जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. शिक्षा भोगण्यासाठी सावरकरांची रवानगी अंदमानच्या सेल्यूलर तुरूंगात पाठविण्यात आले. या काळात सावरकरांनी '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून भारतीयांनी प्रेरणा घेवून स्वातंत्र्यलढा यशस्वी केला. या सर्व घटनांमुळे भारतीय जनतेत स्वातंत्र्याची जबरदस्त उर्मी निर्माण झाली. त्यांच्याविषयी धनंजय कीर म्हणतात की, ''सावरकरांपुर्वी विवेकानंद, लाला लजपतराय, हरदयाल, भाई परमानंद यांनी हिंदुत्व विचार मांडला पण त्यापैकी हिंदुत्वाच्या सर्व तत्वांचा पुरस्कार कोणीही केला नव्हता. सावरकरांचे हिंदुत्वासंबंधीचे विचारधन मात्र स्वतंत्र होते.''

### ३.२.१.३.३ राजगुरू शिवराम हरी यांचे क्रांतीकार्य

राजगुरू शिवराम हरी यांनी महाराष्ट्रात सशस्त्र क्रांतीकार्य केले. त्यांना संस्कृत, मराठी, इंग्रजी, कन्नड, मल्याळम, उर्दू, हिंदी इत्यादी भाषा अवगत होत्या. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे गनिमी कावा हे तंत्र अवगत केले होते. ते हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मीमध्ये सहभागी झाले. त्यातूनच क्रांतीकार्याचे धडे घेतले. यामध्ये त्यांची भगतसिंग, सुखदेव आणि जतिनदास यांच्याशी मैत्री झाली. सायमन कमिशनविरूध्द पुकारलेल्या लढयात लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचा बदला

घेण्यासाठी चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू आणि जयगोपाल या क्रांतीकारकांनी ठरविले. यामध्ये राजगुरू यांनी १७ डिसेंबर १९२८ रोजी लाहोर येथे सँडर्स या पोलिस अधिकाऱ्याचा गोळया झाडून खून केला. त्यांनी केलेल्या कृत्यामुळे त्यांना ३० सप्टेंबर १९२९ रोजी पुणे येथे अटक करण्यात आली. पुढे भगतसिंग, सुखदेव यांच्याबरोबर राजगुरू यांनाही फाशी देण्यात आली. त्यांनी केलेल्या या क्रांतीकार्यामुळे भारतीय तरूणांना प्रेरणा व स्फूर्ती मिळाली. पुढील काळात अनेक तरूण क्रांतीकारी बनून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बलिदान दिले.

### ३.२.१.३.४ अनंत लक्ष्मण कान्हेरे यांचे क्रांतीकार्य

सुरूवातीपासूनच क्रांतीकारी विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यांनी मित्रांच्या मदतीने औरंगाबाद येथे एक गुप्त मंडळ स्थापन केले होते. तत्कालीन नाशिक जिल्हयाचे कलेक्टर जॅक्सन याने मोठया प्रमाणात अन्यायी कृत्ये चालविली होती. त्याच्या अन्यायी कृत्याबद्दल त्याला गोळया झाडून ठार करण्यात अनंत कान्हेरे यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. पुढे अनंत कान्हेरे, कृष्णाजी गोपाळ कर्वे, विनायक नारायण देशपांडे यांना अटक करून १९ एप्रिल १९१० रोजी फाशी देण्यात आली. अनंत कान्हेरे यांनी हैद्राबाद स्वातंत्र्यलढयात व महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्वाचे योगदान मानले जाते.

अशा प्रकारे महाराष्ट्रात या व इतर क्रांतीकारी तरूणांनी महत्वपूर्ण योगदान दिले. त्यातूनच पुढील काळात स्वातत्र्य चळवळीला वेग प्राप्त झाला.

### ३.२.१.४ पंजाबमधील क्रांतीकारक व त्यांचे कार्य

बंगाल, महाराष्ट्र, यांच्याबरोबरच पंजाब प्रांतानेही स्वातंत्र्य चळवळीत महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. अजितसिंग, पंडित रामसिंग कुका, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, रामप्रसाद बिस्मिल, बटुकेश्वर दत्त इ. या क्रांतीकारकांनी पंजाबमध्ये क्रातीकारी चळवळीचा प्रचार आणि प्रसार केला. अशा या क्रांतीकारकाचे कार्य पाहणे गरजेचे ठरते.

☼ **कुका चळवळ :-**

शीख धर्मात सुधारणा करणे आणि गोहत्या थांबविणे या हेतूने शीख धर्मातील कुका पंथीय नेते रामसिंग यांनी १८४० मध्ये कुका चळवळ सुरू केली होती. सन १८४९ मध्ये ब्रिटिशांनी पंजाब प्रांत खालसा केला होता. तेंव्हा राजकिय स्वातंत्र्य असणे हा धर्माचा एक अविभाज्य घटक आहे. अशी रामसिंग यांनी भूमिका घेतली आणि ब्रिटिशांबरोबर संघर्ष सुरू केला. त्यांनी १८५७ च्या उठावात सहभाग नोंदविला त्याचबरोबर पंजाब प्रांतात प्रतिराज्ययंत्रणा उभी केली. त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला. रामसिंग कुका यांच्या कार्यामुळे पंजाब प्रांतात पंचायत पध्दतीचे पुनरूज्जीवन झाले. ब्रिटिश सरकारने

गोहत्या करण्यास परवानगी दिली तेंव्हा कुका व ब्रिटिश यांच्यात सशस्त्र संघर्ष सुरू झाला. गोहत्या करणाऱ्या चार खाटकांना त्यांनी ठार मारले. ब्रिटिशांनी कुका चळवळीबाबत काही काळानंतर आक्रमक धोरण स्वीकारले. त्यामुळे अनेक कुकांना तोफेच्या तोंडी दिले. कुकांनी रशियाबरोबर हातमिळवणी केली आहे. असा अरोप ब्रिटिशांनी कुकावर ठेवला. शेवटी १८७८ गुरू रामसिंग कुका यांना पकडण्यात आले. पुढे त्यांना ब्रम्हदेशातील तुरूंगात ठेवण्यात आले. तेथेच १८८५ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. रामसिंग कुका यांनी महात्मा गांधी पूर्वी पन्नास वर्षे अगोदर सरकारशी 'असहकार' हे शस्त्र वापरले होते. अशा शब्दात डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी गुरू रामसिंग कुका यांचा गौरव केला आहे.

## ☼ दिल्ली गुप्त कट खटला :-

लाला हरदयाळ यांच्या पुढाकाराने दिल्ली गुप्त कट आखला होता. त्यांनी या कामी दिल्ली येथील प्रसिध्द व्यापारी लाला हणमंत सहाय यांची मदत घेतली होती. दिल्ली गुप्त कटासाठी दारूगोळा आणि बॉम्ब मिळावा यासाठी रासबिहारी बंधू यांनी अनुशिलन समीतीची मदत मिळवून दिली होती. त्यानुसार २३ डिसेंबर १९१३ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज दिल्ली शहरात प्रवेश करीत असताना त्यांच्यावर बॉम्ब टाकण्यात आला. लाहोर येथे लॉरेन्स गार्डन्समध्ये नागरी अधिका-यांची बैठक सुरू होती. तिथे वसंतकुमार विश्वास यांनी बॉम्ब टाकला. परंतू यामध्ये हिंदी शिपाई मरण पावला. ब्रिटिशांनी या दोन्ही घटनांची चौकशी सुरू केली. कलकत्ता येथे दिल्ली कटाचे धागेदोरे सापडले. चौकशी अंती मास्टर अमीरचंद, अवधबिहारी, वसंतकुमार विश्वास अणि बालमुकुंद यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. लाला हणूमंत सहाय व बलराज यांना ७ वर्षे सक्तमजूरी शिक्षा सुनावण्यात आली. लाला हरदयाळ व रासबिहारी बोस यांची ही दिल्ली कटात नावे होती. पण लाला हरदयाळ अमेरिकेत गेले. तर रासबिहारी बोस भूमिगत होते. त्यामुळे ब्रिटिश सरकार त्यांना शिक्षा करू शकले नाही.

## ☼ काकोरी कट १९२७ :-

सशस्त्र क्रांतीसाठी पैशाची आवश्यकता होती. म्हणून हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या तरूणांनी सरकारी खजिना लुटण्याचे ठरविले. त्यादृष्टिने त्यांनी रेल्वेगाडी अडवून सरकारी खजिना लुटण्याची योजना आखली. चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, राजेंद्रनाथ लाहिरी, अशफाकउल्ला खान इ. क्रांतीकारी तरूणांनी ९ ऑगस्ट १९२५ रोजी उत्तर प्रदेशातील काकोरी रेल्वे स्टेशनजवळ रेल्वे अडवून सरकारी खजिना लुटला. या कृत्याबद्दल अनेकांना अटक करण्यात आली. म्हणून हा खटला काकोरी कट खटला या नावाने ओळखला जातो. या खटल्यातील रामप्रसाद बिस्मिल, राजेंद्रनाथ लाहिरी, रोशनसिंग, अशफाकउल्ला खान या चौघांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. तर काहींना तुरुंगवासाची शिक्षा झाली.

## ☼ सरदार भगतसिंग (२८ सप्टेंबर १९०७ ते २३ मार्च १९३१) :-

सरदार भगतसिंग यांचा जन्म पंजाबमधील बंग या गावी शेतकरी कुटुंबात झाला. आई विद्यावती व वडिल किशनसिंग हे लाला लजपतराय यांच्याबरोबर मंडालेच्या तुरूंगात तुरूंगवास भोगला. भगतसिंग यांनी डी. ए. व्ही. व नॅशनल कॉलेज मधून आपली बी. ए. (१९२३)चे पदवी प्राप्त केली.त्याच्यावर जयचंद विद्यालंकार व भाई परमानंद या शिक्षकांचा प्रभाव होता. १९२३ मध्ये हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन मध्ये दाखल झाले. तेथे त्यांना सुखदेव, चंद्रशेखर आझाद, बटुकेश्वर दत्त, भगवती चरण, जतींद्रनाथ दास इ. भेटले. या सर्व युवकांना एकत्र करून 'नवजवान भारत सभा' ही संघटना १९२५ स्थापन केली.

दिल्लीच्या कायदेमंडळात सरकारच्या दडपशाहीचे बील मंजूर होणार होते. सरदार भगतसिंग, बटुकेश्वर दत्त, या दोन क्रांतीकारकांनी सर्व ब्रिटिश साम्राज्याला हादरून टाकणारा बॉम्ब स्फोट त्यादिवशी कायदेमंडळाच्या सभागृहात केला आणि इन्कलाब जिंदाबादच्या घोषणा दिल्या. या प्रकरणात या दोघांना जन्मठेपेची शिक्षा झाली. तेंव्हा तुरूंगात राजकीय कैद्यांना चांगली वागणूक मिळावी म्हणून त्यांनी आंदोलन केले. त्यामध्ये जतीनदास याने ६३ दिवसाचे आमरण उपोषण केले. त्यातच त्याचे निधन झाले. शेवटी सरकारने राजकीय गुन्हेगारांना अ, ब, क, असा दर्जा देण्याचे मान्य केले. लाहोरच्या सँडर्स खटल्याचा निकाल लागून भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना २३ मार्च १९३१ मध्ये फाशीची शिक्षा देण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी या थोर क्रांतीकारकांनी हौतात्म्य पत्करले. त्यामुळे हिंदी समाजातील स्वाभिमान जागा झाला.

भारतीय स्वातंत्र्यासाठी भगतसिंग व त्याच्या साथीदारांनी आपले बलिदान भगतसिंग एक पत्रकार होते. दिल्लीतून निघणारे अर्जून व कानपूर मधून निघणारे प्रताप या नियतकालिकातून 'बसवंतसिंग' या टोपणनावाने स्फूटलेखन केले जात होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अनेक सशस्त्र क्रांतीकारक झाले. परंतू कर्तव्यनिष्ठ, त्याग, धाडस व निष्ठा इ. असणारा तरूण तडफदार व्यक्तिमत्व म्हणजे भगतसिंग होय. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांनी भारतीय तरूणांमध्ये प्रेरणा व स्फूर्ती निर्माण केली.

## ☼ चंद्रशेखर आझाद आणि यशपाल सिंग :-

भगतसिंग फासावर गेल्यानंतर भगतसिंगाचे सहकारी चंद्रशेखर आझाद हे विलक्षण धाडसी व क्रांतीकारी व्यक्तीमत्व होते. चंद्रशेखर आझाद यांनी १९३१ लाहोर येथे पोलिसाशी दोन हात करून आत्मसमर्पण केले. तसेच यशपाल सिंग यांनी २३ डिसेंबर १९२९ रोजी व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन रेल्वेतून दिल्लीकडे जात असताना रेल्वे स्टेशनजवळ रेल्वे उलथून पाडण्यात आली. परंतू लॉर्ड आयर्विन बचावले. चंद्रशेखर आझाद नंतर क्रांतीकारी चळवळीचे नेतृत्व यशपाल सिंग यांनीच केले. त्यांनी सशस्त्र लढयाचा आदेश काढून आपली 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी' ही क्रांतीकारकांची संघटना मजबूत

करण्याचा प्रयत्न केला. परंतू दुर्दैवाने जानेवारी १९३२ मध्ये तेही पकडले गेले व त्यांना ११ वर्षाची शिक्षा झाली.

### ☼ उधमसिंग :-

जालियनवाला बाग हत्याकांडाचा प्रकार १९१९ मध्ये घडला होता. साधारणत: २१ वर्षाचा कालावधी उलटून गेला होता. परंतू पंजाबमधील एक क्रांतिकारक उधमसिंग मात्र अजून ही घटना विसरलेला नव्हता. क्रांतीकारी उधमसिंगच्या मनात जालियनवाला हत्याकांडासाठी जबाबदार असलेल्या ले. गव्हर्नर ओडवायरला त्याच्या मायदेशात जावून योग्य धडा द्यावयाचा होता. त्यासाठी उधमसिंगाने आपली सर्व मालमत्ता विकून इंग्लंडमध्ये जाण्याचे धाडस दाखविले. २०-२१ वर्षे इंग्लंडमध्ये राहिले. आपल्या निर्धाराप्रमाणे उधमसिंगाने १३ मार्च १९४० रोजी ओडवायर याचा लंडनमध्ये खून घडवून आणला. भारतीय क्रांतीकारकांच्या सळसळत्या रक्ताची प्रचिती ब्रिटिश सरकारला दाखविली. उधमसिंग सारखा थोर क्रांतीकारक मृत्यूपूर्वी म्हणतो की, "I am not the least afraid of death. There is bravery in dying young, in sacrificing life for the Country."

### ☼ अंजूमन-ई-मुहाब्बाने वतन (भारतमाता संघटना) :-

पंजाबमधील क्रांतीकारी चळवळीचे प्रमुख सरदार अजितसिंग बंधू किशनसिंग व सरदार स्वर्णसिंग यांनी इतर मित्रांच्या सहायाने 'अंजूमन-ई-मुहाब्बाने वतन' ही संघटना स्थापन केली होती. पुढे 'भारतमाता' या नावाने ही संघटना प्रसिध्दीस आली. सरदार अजितसिंग यांनी पंजाबमधील अनेक शहरात व्याख्याने दिली. त्यांच्या व्याख्यानामुळे पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणावर राष्ट्रवाद निर्माण झाला. शेतकऱ्यांनी बंडे केली, शेतकऱ्यांनी सारा भरण्यास नकार दिला. अंजूमन-ई-मुहाब्बाने वतन या संघटनेच्या कार्यामुळे पंजाबमध्ये ब्रिटिशांविरोधात असंतोष वाढत गेला. गव्हर्नर डेनिअल यांनी परिस्थितीची पाहणी केली आणि सरकारला अहवाल पाठवला. पंजामधील क्रांतीकारकांवर नियंत्रण न ठेवल्यास १८५७ सारखी परिस्थिती निर्माण होईल असे आपल्या अहवालातून सूचविले होते. तेव्हा ब्रिटिश सरकारने या अहवालाचा आधार घेवून अजितसिंग व त्याच्या मित्राला अटक केली व पाच वर्षे तुरूंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. तुरूंगातून सुटल्यानंतर अजितसिंगांनी इराणमधून क्रांतीकार्य केले. नंतर युरोप जावून राष्ट्रवादी चळवळ सुरू ठेवली.

## ❑ भारताबाहेरील क्रांतीकारी चळवळी

### ☼ इंडिया हाऊस-श्यामजी कृष्ण वर्मा

लंडनमध्ये श्यामजी कृष्ण वर्मा यांनी इंडिया हाऊस ची स्थापना केली होती. ते संस्कृतचे गाडे

अभ्यासक होते. वर्मा यांनी इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठातून बी.ए.ची पदवी घेतली होती. इंग्लंडमध्ये त्यांनी 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट' नावाचे नियतकालिका सुरू केले. पुढे १९०५ मध्ये 'इंडियन होमरूल सोसायटी' ही संस्था स्थापन केली. ही संस्था 'इंडिया हाऊस' या नावाने परिचित झाली. ही संस्था इंग्लंडमधील भारतीय क्रांतीकारकांचे केंद्रस्थान बनले. इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या भारतीयांची 'इंडिया हाऊस'मध्ये सोय केली जात असे. शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जात असे. वि. दा. सावरकर व पांडूरंग महादेव बापट यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात आली होती. पुढे मदनलाल धिंग्रा यांनी १९०९ मध्ये कर्झन वायलीचा खून केला त्यामुळे इंडिया हाऊसवर नियंत्रण आले.

## ☼ गदर पार्टी व लाला हरदयाळ :-

पहिल्या महायुध्दाच्या पार्श्वभूमीवर पंजाबातून अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या युवकांनी बाबा सोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली 'गदर पार्टी' या नावाची संघटना स्थापन केली होती. त्याने 'गदर' नावाचे एक मुखपत्रही काढले होते. हे पत्रक इंग्रजी, हिंदी, उर्दू, बंगाली, मराठी आणि गुरूमुखी या भाषात प्रसिध्द केले जात असे. चीन, जपान, सिंगापूर, जर्मनी इत्यादी अनेक देशातील लोक हे मुखपत्र वाचीत असत. 'गदर' ची भाषा स्वातंत्र्याची व पारतंत्र्याविरूध्द लढण्याची होती. इंग्रजाची अन्यायाची कृत्ये उघड करण्याचे काम गदर करीत असे. लाला हरदयाळ याचे संपादक होते. १९१४ मध्ये स्टॉकहोममध्ये सरदार ज्वालासिंगच्या अध्यक्षतेखाली एक परिषद घेण्यात आली. याला मिळालेल्या प्रतिसादामुळे भारतात अनेक शाखा स्थापन करण्यात आल्या. हरदयाळ यांनी हजारो शीख तरूणांना मातृभूमीसाठी बलिदान करण्याचे आवाहन केले. गुरूदितसिंग हा युवकांचा नेता होता. त्याने भारतात जाण्यासाठी एक जापानी जहाज ठरवून त्याचे नाव 'कोमागाटा मारू' असे ठेवले. हे जहाज हाँगकाँग व शांघाय येथील २५१ पंजाबी शीख व २१ पंजाबी मुस्लिम प्रवाशांना घेवून हे जहाज कलकत्त्याहून कॅनडाकडे निघाले. कॅनडातील व्हँकूअर शहरात या जहाजातील प्रवाशी जाणार होते. पण ब्रिटिश सरकारने खोडसाळपणा केला. यामुळे कॅनडा सरकारने कायदा मोडून जहाजातील प्रवाशांना समुद्रकिनाऱ्यावर उतरण्यास नकार दिला. इंग्लंडनेही प्रवाशांना आश्रय दिला नाही. यामुळे जहाजाला समुद्रात थांबावे लागले. अन्नपाणीविना प्रवाशी दोन महिने जहाजामध्ये थांबले. नंतर हे जहाज भारताकडे वळविण्यात आले. ते २९ सप्टेंबर १९१४ रोजी कलकत्ता बंदरात दाखल झाले. जहाजामधील प्रवाशात गदर पक्षाचे सदस्य होते. ब्रिटिशांची त्यांच्यावर करडी नजर होती. या प्रवाशांना जहाजातून उतरविले व गाडीने पंजाबमध्ये विनामूल्य नेण्याची व्यवस्था केली. पण शीखांनी गाडीत बसण्यास नकार दिला. तेंव्हा शीख प्रवाशी व ब्रिटिश शिपाई यांच्यात चकमक झाली. या चकमकीत १८ शीख प्रवाशी मृत्यू पावले. २९ पळाले व ब्रिटिशांनी इतरांना कैदेत टाकले. कामागोटा मारू जहाजावरील जे प्रकरण घडले त्यामुळे शीख समाजात ब्रिटिश-विरोधी असंतोष निर्माण झाला. शीख तरूण भारतात अमेरिकन पिस्तुले घेवून येवू लागले. ब्रिटिश पोलिसांशी

त्यांची चकमक झाली. यामध्ये गुरूदितसिंग व अन्य साथीदार गुप्त झाले. भाई परमानंद यांनी भारताचा इतिहास लिहून ब्रिटिशांनी केलेल्या अन्यायावर प्रकाश टाकला. या पुस्तकावर सरकारने बंदी घातली. त्यातच भाई परमानंदाना पकडून जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

## ☼ डॉ. मानवेंद्रनाथ रॉय

पहिल्या महायुध्दात इंग्लड व तुर्कस्थान परस्परांमध्ये लढत होते. त्या स्थितीचा फायदा घेवून भारतातील अनेक मुस्लिम तरूण अफगाणिस्तानात गेले व तेथील पठाणांच्या साहाय्याने भारताच्या सीमेवर हल्ला करण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्यांनाही म्हणावे तसे यश मिळाले नाही. मात्र निराश न होता भारतीय तरूणांनी क्रांतीचा प्रयत्न कधीच सोडला नाही. १९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती झाली आणि लेनिन तेथील सत्ताधारी बनले. त्यावेळी लेनिनची भेट घेवून भारतात क्रांती करण्यासाठी त्यांची मदत मिळविण्याचाही प्रयत्न झाला. रशियाच्या मदतीने भारतात सशस्त्र क्रांती घडवून आणण्याच्या विचारात प्रसिध्द भारतीय विचारवंत डॉ. मानवेंद्रनाथ रॉय हे प्रमुख होते.

## ☼ क्रांतीकारी चळवळीच्या कार्याचे मूल्यमापन

१. **एक महत्वपूर्ण प्रवाह :** हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढयातील विविध प्रवाहापैकी क्रांतीकारकांची क्रांतीकारी चळवळ हा महत्वाचा प्रवाह आहे. राष्ट्रसभेच्या सनदशीर चळवळीवर या क्रांतीकारकांचा बिल्कुल विश्वास नव्हता. जुलमी राज्यकर्त्यांच्या अन्यायी कृत्यांचा केवळ निषेध करून ही कृत्ये थांबणार नाहित तर त्यासाठी अत्याचारी कृत्यांना दहशतीच्या मार्गानेच जाब दिला पाहिजे, असे क्रांतीकारकांना वाटत होते.

२. **अमानुष कृत्याचा प्रखर विरोध :** जालियनवाला बागेतील निरपराध लोकांच्या हत्याकांडाचा प्रकार पाहून कोणाचे रक्त गरम होणार नाही. त्यामुळे तरूणांचा वर्ग असंतोषाने कां पेटला हयाचे उत्तर मिळते. राष्ट्राचे पंजाब केसरी लाला लजपतराय यांच्या छातीवर सँडर्स नावाच्या निर्दयी अधिकाऱ्याने लाठयांचा बेछूट मारा केला. त्यातच पुढे लालाजींचे प्रणोत्क्रमण झाले. अशा जुलमी व अत्याचारी राज्यकर्त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देणे हे आपले परम कर्तव्य आहे. असे क्रांतीकारकांना वाटत होते.

३. **आव्हानावर मात करण्याची जिद्द :** त्या काळात क्रांतीकारकांचे जीवन म्हणजे सतीचे वाण होते. हे सर्व क्रांतीकारक सुशिक्षित तरूण होते. सुखासिन जीवन जगणे हे त्यांचे ब्रीद नव्हते. सर्व सुखांचा व उपभोगांचा त्याग करून आव्हानावर मात करण्याची विलक्षण जिद्द त्याच्यांत सामावलेली होती. कोणतेही दुर्धर कार्य या क्रांतीकारकांना अवघड वाटत नव्हते. मायभूमीचे स्वातंत्र्य हेच त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते. फासावर जाण्यापूर्वी अनेक क्रांतीकारकांनी

पुन्हा याच भूमीत जन्म मिळवा व पुन्हा प्रणार्पण करण्याची संधी मिळावी अशी आपली शेवटीची इच्छा व्यक्त केली होती.

४. **ब्रिटिश सरकारला धडा देण्याची जिद्द :** क्रांतीकारक हे कांही माथेफिरू नव्हते. त्यांचे खरे शत्रुत्व ब्रिटिश राज्यकर्त्यांशी व त्यांच्या जुलमी धोरणांशी होते. दहा पाच ब्रिटिश अधिकाऱ्याचे खून पाडून ब्रिटिश सत्ता नष्ट होणार नाही, याची जाणीव क्रांतीकारकांना होती. अशा अशा दहशतवादी कृत्यापेक्षा, त्यामागची भावना व शक्ती क्रंातीकारकांच्या दृष्टिने महत्वाची होती सरकारच्या विरोधात भारतात किती मोठया प्रमाणात असंतोष धुमसत आहे. हे ब्रिटिश सरकारला व जगाला दाखवून देण्याचा क्रांतीकारकांचा प्रयत्न होता. आपल्या क्रांतीकारी चळवळीच्या माध्यमातून ब्रिटिश सरकारला धडा देणे हीच क्रंातीकारकांची खरी तळमळ होती.

५. **उक्तीपेक्षा कृतीवर भर :** अर्ज-विनंत्या, निदर्शने इत्यादी मार्गांनी ब्रिटिश सरकार वठणीवर येत नाही हे क्रांतीकारकांच्या चांगले लक्षात आले होते. सरकारच्या अन्यायी कृत्याविरूध्द क्रांतीकारक मार्गाचा अवलंब करणे हे क्रांतीकारकांचे लक्ष्य होते. १००० निषेध सभांनी इंग्रज राज्यकर्त्यावर जेवढा परिणाम घडवून आणला असेल त्यापेक्षा अधिक पटीने सँडर्सच्या खूनाने घडवून आणला होता. भगतसिंगाने कायदेमंडळाच्या सभागृहात जो बाँब टाकला त्यामुळे ब्रिटिश साम्राज्याला जबरदस्त हादरा बसला. सर्व जगाला हिंदी असंतोषाच्या तीव्रतेची जाणीव झाली. या बाँब स्फोटानंतर भगतसिंगाने स्वत:ला अटक करून घेतली. 'Action speaks more louder than words' अशी निस्सिम श्रध्दा क्रांतीकारकांच्या मनात संचारात होती.

६. **आखिल भारतीय संघटनेचा अभाव :** भारतीय क्रांतीकारकांना अखिल भारतीय स्वरूपाची संघटना निर्माण करता आली नाही. त्यामुळे ब्रिटिशांच्या साम्राज्याला त्याची विशेष झळ पोहोचली नाही. ब्रिटिशांच्याविरूध्द असंतोष निर्माण करण्यात क्रांतीकारक बरेच यशस्वी ठरले परंतू त्यांनी जर आखिल भारतीय संघटना निर्माण केली असती तर ब्रिटिशावर यापेक्षा अधिक आघात देण्यात ते सफल ठरले असते.

## ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ❋

❑ **अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. 'युगांतर' हे वृत्तपत्र कोणत्या प्रांतातून निघत होते?

२. बंगालमधील क्रांतीकारकांचे अग्रणी म्हणून कोणाला ओळखले जाते?

३. 'मित्रमेळा' नावाचे मंडळ कोणी स्थापन केले?

४. नशिकचा कलेक्टर जॅक्सनला ठार मारण्याचे काम कोणत्या क्रांतीकरकाने केले?

५. इंग्लंडमध्ये 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट' नावाचे नियतकालिका कोणी सुरू केले?

६. सरदार भगतसिंग यांचा जन्म पंजाबमधील कोणत्या गांवी झाला?

७. कुका चळवळ कोणत्या हेतूने सुरू करण्यात आली होती?

८. अनुशिलन समिती ची स्थापना कोणी केली?

९. कोणाच्या पुढाकाराने 'दिल्ली कट' आखला गेला?

१०. 'अंजूमन-ई-मुहाब्बाने वतन' ही संघटना स्थापन कोणी केली होती?

❑ **ब) रिकाम्या जागा भरा.**

१. वासुदेव बळवंत फडके यांना ................. तुरूंगात ठेवण्यात आले होते.

*अ) येरवडा* *ब) एडन* *क) पुणे* *ड) मुंबई.*

२. बाबा सोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली ................. या नावाची संघटना स्थापन करण्यात आली.

*अ) गदर पार्टी* *ब) मजदूर संघटना*

*क) भारतीय संघटना* *ड) महिला संघटना.*

३. १९०५ मध्ये 'इंडियन होमरूल सोसायटी' ही संस्था ................. यांनी स्थापन केली.

*अ) श्यामजी कृष्ण वर्मा* *ब) लाला हरदयाल*

*क) ॲनी बेझंट* *ड) लो. टिळक.*

४. या सर्व युवकांना एकत्र करून 'नवजवान भारत सभा' ही संघटना ................. स्थापन केली.

*अ) भगतसिंग* *ब) लाला हरदयाल* *क) रासबिहारी बोस* *ड) लाला लजपतराय.*

५. १७ डिसेंबर १९२८ रोजी लाहोर येथे सँडर्स या पोलिस अधिकाऱ्याचा गोळया झाडून ................. यांनी खून केला.

*अ) अनंत कान्हेरे* *ब) राजगुरू* *क) भगतसिंग* *ड) सावरकर.*

## ३.२.२ डाव्या चळवळी

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत डाव्या चळवळीला वेगळे महत्व आहे. १९ व्या शतकात भारतात समाजवाद व साम्यवादी विचारसरणीचे प्रतिनिधित्व करणारा गट होता. त्या गटास डाव्या या नावाने संबोधले जात होते. त्यातून डाव्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या संघटना उदयास आल्या. भारतात डावी चळवळ दोन प्रकारे विकसित झाली. १) आंतर्राष्ट्रीय साम्यवादी चळवळीची एक शाखा म्हणून आणि जी आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटनेमार्फत नियंत्रित केली जाते. २) काँग्रेस समाजवादी पक्ष वरील दोन्ही चळवळी भारतातील तत्कालीन साम्राज्यवाद विरोधी म्हणून उदयास आले. अशा या डावी चळवळ कशी उदयास आली हे पाहणे गरजेचे ठरते.

### ३.२.२.१ डाव्या चळवळी उदयाची कारणे :-

१. **पहिल्या महायुध्दानंतरची सामाजिक, आर्थिक परिस्थिती :** १९१४ मध्ये झालेले पहिले महायुध्द या महायुध्दात ब्रिटिशानी भारताला ओढले. भारत ही ब्रिटिशांची वसाहत असल्याने भारतही आपोआप ओढला गेला. ब्रिटिशांनी केलेल्या या युध्दाचा खर्च भारतातून करण्यात आला. त्यामुळे भारतात महागाई व बेकारांची संख्या वाढली. त्यामुळे भारताची मोठया प्रमाणात सामाजिक व आर्थिक दुरावस्था निर्माण झाली. ही दुरावस्था टाळणेसाठी भारतीयांना डावी विचारसरणी जवळची वाटू लागली. त्यातूनच डावी चळवळ उदयास आली.

२. **१९१७ च्या रशियन राज्यक्रांतीचा परिणाम :** रशियात जी बोल्शेविक क्रांती घडून आली ती मूळात कार्ल मार्क्सच्या विचारातूनच मार्क्सने मांडलेला 'अतिरक्ति मूल्यांचा सिध्दांत' यामध्ये भांडवलदार हा कामगारांचे कशा पध्दतीने शोषण करतो आहे हे स्पष्ट केले आहे. यातून कामगारांच्या अनेक संघटना स्थापन झाल्या. याचे नेतृतव लेनिनने केले आणि रशियात झारची सत्ता संपुष्टात आणून समाजवादी सरकार स्थापन केले. त्यामुळे भारतातील लोकांवर समाजवादी विचारांचा प्रभाव पडल्यामुळे ते डाव्या चळवळीकडे आकर्षित झाले व त्यातूनच भारतात डावी चळवळ उदयास आली.

३. **समाजवादी विचार रूजण्यास महात्मा गांधीची चळवळ महत्वपुर्ण :** महात्मा गांधीनी ब्रिटिश आर्थिक साम्राज्यवादाच्या विरोधात मोठी चळवळ उभी केली. या चळवळीच्या माध्यमातून समाजात जागृती घडवून आणली. देशी उद्योग टिकविण्यासाठी स्वदेशीला प्रोत्साहन दिले. त्यामुळे हजारो लोक विद्यार्थी ब्रिटिशांच्या विरोधात रस्त्यावर उतरू लागले. त्यामुळे या चळवळीमुळे भारतीयांमध्ये समाजवाद रूजण्यास मदत झाली व डाव्या चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली. यामुळेच डावी चळवळ उदयास आली.

४. **बेरोजगारी व उपासमारीची समस्या :** ब्रिटिशांनी भारताला आर्थिकदृष्ट्या कंगाल बनविले व आपला साम्राज्यविस्तार केला कायदेमंडळात मिळालेल्या प्रतिनिधित्वाच्या माध्यमातून ब्रिटिश सरकारकडे काही मागण्या भारतीयांनी केल्या परंतू सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे मध्यम वर्गापुढे बेरोजगारी, आर्थिक विषमता याची समस्या निर्माण झाली. ही समस्या सोडविण्यासाठी आपल्या जवळची विचारसरणी कोणती आहे तर ती म्हणजे समाजवादी विचारसरणी होय त्यातूनच या डाव्या विचारसरणीकडे भारतीय लोक आकर्षित झाले.

५. **पुरोगामी विचार तरूणांना जवळचा वाटू लागला :** महात्मा गांधीजीनी चालविलेली अहिंसात्मक चळवळ ही ब्रिटिशांची सत्ता उलथवून टाकण्यास पुरेशी नाही. आपल्या भारतीय समाजात असलेली पारंपारिक विचार बदलणे गरजेचे आहे असे भारतीय तरूणांना वाटू लागले. हे सर्व बदल करावयाचे असतील तर साम्यवादी सारखी विचारसरणी गरजेची आहे असे तरूणांना वाटू लागले त्यातूनच डावी चळवळ उदयास आली.

## ३.२.२.२ भारतातील डावी चळवळ :-

भारतातील डावी चळवळ ही दोन गटात विभागली होती.

१) साम्यवादी, २) समाजवादी.

### १. साम्यवादी गट :-

रशियातील राज्यक्रांतीबद्दल वाटणारे आकर्षण व मार्क्सवादी विचारांचा प्रभाव यामुळे भारतातील नवोदित कामगार चळवळीत काम करणाऱ्या श्रीपाद अमृत डांगे, घाटे, के. एन. जोगळेकर, मिरजकर, मुजफर अहमद इत्यादी तरूण कार्यकर्त्यांनी १९२५ साली भारतीय साम्यवादी पक्षाची स्थापना केली. राष्ट्रीय सभेच्या १९२५च्या अलिपूर येथील अधिवेशनातच साम्यवादी पक्षाची गुप्त रितीने स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीचा एक भाग म्हणून भारतीय साम्यवादी कार्यकर्ते देशात काम करू लागले. भारतातील लढावू कामगार चळवळीचे खच्चीकरण करण्याच्या उद्देशाने ब्रिटिश सरकारने २० मार्च १९२९ रोजी देशभर प्रमुख कामगार नेत्यांची धरपकड करून त्याच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. हा खटला मिरत कट खटला या नावाने प्रसिध्द आहे. चार वर्षे चाललेल्या या खटल्यात अरोपींना जबर शिक्षा सुनावण्यात आल्या. संबंध भारतात या खटल्यामुळे प्रचंड खळबळ उडाली. राष्ट्रीय चळवळीतील सर्व घटकांनी मिरत कटाच्या खटल्याचा आणि त्यात आरोपींना झालेल्या शिक्षेचा निषेध केला. या खटल्यामुळे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमधील नव्या विचारप्रवाहाची लोकांना ओळख झाली. तथापि नंतरच्या काळात भारतीय साम्यवादी पक्ष देशातील स्वातंत्र्य आंदोलनाच्या मुख्य प्रवाहापासून दूर

राहिला. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली चाललेल्या देशव्यापी स्वातंत्र्य चळवळीची साम्यवादी पक्षाने 'भांडवलदारांची चळवळ' अशी संभावना केली.

## २. समाजवादी पक्ष/कॉंग्रेस सोशालिस्ट पार्टी :-

राष्ट्रीय सभेने उंचावलेल्या आशा आकांक्षा ती पूर्ण करू शकली नाही. देशातील मध्यमवर्गीय पुरोगामी युवकांचा गांधीप्रणीत राजकारणाबाबत व क्रांतीकारकांच्या मार्गाबद्दल भ्रमनिरास झाला. ते डाव्या विचारांकडे झुकले. १९२९ च्या जागतिक आर्थिक मंदीचे भारतातील शेतकरी, कामगार यांच्यावर दुष्परिणाम झाले. कामगारांची स्थिती फारच बिघडली. परिणामत: कामगारात असंतोष वाढला.

जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, डॉ. राममनोहर लोहिया इत्यांदींनी प्रदिर्घ विचारविनिमयानंतर १९३४ साली राष्ट्रीय सभांतर्गत काम करणाऱ्या 'कॉंग्रेस सोशालिस्ट पार्टी' या पक्षाची स्थापना केली. मार्क्सवादाचा अभ्यास काणा-या या तरूण कार्यकर्त्यांना भारताचा स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र करण्यासाठी राष्ट्रवादी भूमिकेस समाजवादी विचारांची जोड देणे आवश्यक आहे असे तीव्रतेने वाटत होते. भारतातील शेतकरी आणि कामगार यांची संघटित शक्ती स्वातंत्र्यलढयात एकवटली तरच लढा खऱ्या अर्थाने बलशाली व जहाल होवू शकेल अशी त्यांची धारणा होती. स्वातंत्र्य चळवळीबरोबरच आर्थिक विषमतेविरूध्द लढले पाहिजे असे या तरूण कार्यकर्त्यांना तीव्रतेने वाटत होते. 'कॅंग्रेस सोशालिस्ट पार्टी' या गटात अच्युतराव पटवर्धन, युसूफ मेहरअली, कमलादेवी चटोपाध्याय, अशोक मेहता, एस. एम. जोशी इ. तरूणांचा समावेश होता. भारताच्या स्वातंत्र्यलढयाला गांधीजींनी व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले आणि जनसामान्यांच्या मनात स्वातंत्र्याची ओढ निर्माण केली. याबद्दल त्या कार्यकर्त्याच्या मनात गांधीजीबद्दल आदराची भावना होती. तसेच जवाहरलाल नेहरूनी वैचारिक पातळीवर समाजवादाचे समर्थन केल्यामुळे त्यांच्याबद्दल या कार्यकर्त्यांना खास जवळीकता वाटत होती. या गटातील तरूण कार्यकर्त्यांनी १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोनात भूमिगत राहून उल्लेखनिय कामगिरी बजावली. १९४६ साली हा गट राष्ट्रीय सभेतून बाहेर पडला. राष्ट्रीय सभांतर्गत तरूण नेतृत्वाचा झालेला उदय आणि राष्ट्रीय आंदोलनावर समाजवादी विचारांचा प्रभाव यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पुरोगामी सामाजिक व आर्थिक आशय प्राप्त झाला.

## ३.२.२.३ इतर डावे पक्ष :-

१९३९ - ४० या काळात भारतात अने लहान डावे पक्ष उदयास आले. त्यातील बहुतांश एखाद्या व्यक्तीभोवती केंद्रीत होते. त्यामुळे त्या व्यक्ती काळाच्या पडद्याआड जाताच तो पक्षही तेथेच संपला जात असे.

१. **फॉर्वर्ड ब्लॉक :** म. गांधीशी मतभेद झाल्यानंतर मार्च १९३९ मध्ये सुभाषचंद्र बोस यांनी फॉर्वर्ड ब्लॉक या नव्या पक्षाची स्थापना केली. साम्राज्यविरोधी, जहालवादी, प्रगतीशील तत्वांना एकत्र करण्याच्या उद्देशाने त्यांनी डाव्या एकीकरण समितची स्थापना केली. इंग्रजाना मदत करण्याच्या काँग्रेसच्या धोरणाला सुभाषचंद्र बोस यांचा विरोध होता. म्हणूनच इंग्रजांना भारताबाहेर काढण्यासाठी परकिय मदत घेण्याच्या हेतूने ते भारताबाहेर गेले.

२. **क्रांतीकारी समाजवादी पक्ष :** १९४० मध्ये स्थापन झालेल्या हया पक्षाची प्रेरणा म्हणजे २० व्या शतकाच्या प्रारंभकाळातील क्रांतीकारकांचे कार्य होय. हिंसेचा अवलंब करून इंग्रजांना देशाबाहेर काढणे व नंतर भारतात समाजवाद आणणे हया पक्षाचे उद्‌दिष्ट होते. हा पक्ष सिध्दांताच्या दृष्टिने साम्यवादी पक्षापेक्षा काँग्रेस समाजवादी अधिक निकट होता. गांधी व सुभाषचंद्र बोस हयांच्या भांडणात क्रांतीकारी समाजवादी पक्षाने सुभाषचंद्र बोस यांचे समर्थन केले. दुसऱ्या महायुध्दात या पक्षाने साम्राज्यवादी शक्तींना मदत केली नाही.

❑ **मूल्यमापन :-**

या डाव्या चळवळीने रचनात्मक कार्यावर भर देवून कामगारांचे संघटन करणे, श्रमिकांना नागरिकत्वाचे धडे देणे, मागासवर्गीयांमध्ये सांस्कृतिक वातावरण निर्माण करणे समाजातील जातीयवाद, अंधश्रध्दा, नष्ट करण्यासाठी समाजात जागृती घडविणे व समाजवादी समाज बनविणे हा मुख्य उद्‌दिष्ट होते. या समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा महत्वपूर्ण प्रयत्न केला. या डाव्या चळवळीने राजकिय विचारप्रणालीच्या दृष्टिने पूर्ण काँग्रेसला डाव्या विचारसरणीकडे वळविण्याचा प्रयत्न केला.

## ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ❋

❑ **अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. 'फॉर्वर्ड ब्लॉक' या पक्षाची स्थापना कोणी केली?

२. 'अतिरक्ति मूल्यांचा सिध्दांत' हा विचार कोणी मांडला?

३. भारतीय साम्यवादी पक्षाची स्थापना कोणत्या साली करण्यात आली.

४. क्रांतीकारी समाजवादी पक्षाची स्थापना किती साली झाली?

❑ **ब) रिकाम्या जागा भरा.**

१. .................. यांनी 'दास कॅपिटल' हा ग्रंथ लिहिला.

*अ) एंजेल* *ब) कार्लमार्क्स* *क) कार्लाइल* *ड) विल्यम जोन्स*

२. ‘भारतीय कम्युनिस्ट पक्षा’ची स्थापना ................. येथे झाली.

*अ) पंजाब* *ब) लाहोर* *क) ताश्कंद* *ड) मुबई.*

३. काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना ................. च्या नेतृत्वाखाली झाली.

*अ) जयप्रकाश नारायण व आचार्य नरेंद्र देव*

*ब) मानवेंद्र रॉय व श्रीपाद डांगे*

*क) राममनोहर लोहिया व ना. ग. गोरे*

*ड) एस. एम. जोशी.*

४. बंगालमधील ‘नवयुग’चे संपादक .............. हे होते.

*अ) मुजफर अहमद* *ब) श्रीपाद अमृत डांगे*

*क) गुलाम हुसेन* *ड) सिंगरवेलू चेटियार.*

## ३.२.३ सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सेना

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची कामगिरी वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. १९२० पासून गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनतेने अहिंसात्मक लढयाच्या मार्गाने आंदोलन देशव्यापी बनविले होते. गांधीजींनी जनतेला दिलेला असहकारितेच्या लढयाची कालव्याप्ती वाढविण्यासाठी ब्रिटिशांनी सातत्याने प्रयत्न केले. या पार्श्वभूमीवर उसळत्या रक्ताच्या तरूण नेत्यांना सशस्त्र लढयाचा मार्ग स्वीकारण्याचा मोह होणे स्वाभाविक होते. स्वातंत्र्याच्या ज्वलंत भावनेने प्रेरित होवून सुभाषचंद्र बोस यांनी ‘आझाद हिंद सेना’ स्थापन केली. स्वातंत्र्यलढया संग्रामात नेताजींच्या नेतृत्वाखाली असंख्य भारतीय लोक सशस्त्र क्रांतीचा लढा देण्यास प्रवृत झाले. हिंदी तरूणांना नेताजींनी आवाज दिला, ‘तुम हमको खून दो मै तुम्हे आझादी दूँगा’ नेताजीच्या या तेजस्वी आवाहनामुळे स्वातंत्र्य लढयात एक अद्‌भूत आविष्कार घडला. दुसऱ्या महायुध्दाच्या ज्वालांनी सारा आसमंत भडकलेला असताना नेताजीनी जपानशी मैत्री साधली आणि आझाद हिंदसेना ब्रम्हदेशातून हिंदुस्थानचे पारतंत्र्याचे दरवाजे ठोठावू लागली. नेताजीच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या या तेजस्वी संग्रामाचा परामर्श घेतल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास परिपूर्ण होवू शकत नाही.

### ☼ पूर्वचरित्र :-

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओरिसा प्रांतातील कटक येथे झाला. हायस्कूल मध्ये शिकत असताना मुख्याध्यापक वेणूबाबू यांच्या देशभक्तीपर विचारांचा सुभाषबाबूवर

प्रभाव पडला. विद्यार्थी दशेमध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या तत्वज्ञानाचे त्यांना आकर्षण वाटू लागले. १९१९ मध्ये तत्वज्ञान हा विषय घेवून सुभाषचंद्र बोस बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. आपल्या आई वडिलांच्या इच्छेखातर त्यांनी लंडनला जावून आय.सी.एस. ची परीक्षा चौथ्या क्रमांकाने पास झाले. राष्ट्रीय आंदोलनात सहभागी झाल्यानंतर त्यांनी आय. सी. एस. ची पदवी ब्रिटिश सरकारकडे परत केली. १९२१ मध्ये भारतात परत आल्यानंतर चितरंजन दास यांचे अनुयायी बनले. गांधीजींच्या आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

१९२२ मध्ये देशबंधू चित्तरंजन दास यांनी स्वराज्य पक्षाचा प्रचार करण्यासाठी 'फॉरवर्ड' नावाचे साप्ताहिक सुरू केले. त्याच्या संपादकपदाची जबाबदारी सुभाषचंद्र बोस यांच्यावर सोपविण्यात आली. १९२३-२४ च्या सुमारस बंगालमधील क्रांतीकारी चळवळीशी संबंध जोडून त्यांना अटक करून मंडालेच्या तुरूंगात टाकण्यात आले.

## ☼ सुभाषचंद्र बोस यांची काँग्रेस संघटनेतील सक्रियता :-

मंडाले तुरूंगातून सुटून आल्यानंतर सुभाष बाबूनी बंगाल प्रांताच्या काँग्रेस संघटनेत सक्रियपणे कार्य करण्यास प्रारंभ केला. इ. स. १९२८-३० या काळात बंगाल प्रांताचे काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. डिसेंबर १९२९ च्या सुमारास लाहोर येथील अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात सुभाष बाबू उपस्थित होते. या अधिवेशनात उपसुचना त्यांनी केली. ङ्गकाँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार करून बहिष्कार अधिक कडक करावा आणि नंतर प्रतिस्पर्धी सरकारची स्थापना करावी. सुभाषबाबूनी केलेली सुचना स्वप्नाळू स्वरूपाची वाटली म्हणून त्यांनी ती नामंजूर केली. परंतू यामुळे ब्रिटिश सरकारला मात्र सुभाषचंद्र बोस यांच्या अतिजहाल विचारसरणीची कल्पना आली. त्यामुळे १९३३ पर्यंत अनेक वेळेस सुभाष बाबूना तुरूंगवास लागला.

## ☼ नेतीजीचे यूरोपकडे प्रयाण :-

ब्रिटिश सरकारच्या संमतीने नेताजी सुभाष बाबू यूरोपला गेले. १९३६ पर्यंत त्यांचे वास्तव्य यूरोप मध्येच होते. युरोप खंडातील राजकिय परिस्थितीचा जवळून अभ्यास करण्याची नेताजीची भूमिका होती. बर्लिनला जावून त्यांनी हिटलरची भेट घेतली. इंग्लंडला जाण्यासाठी मात्र त्यांना परवानगी मिळाली नाही. मुसोलिनीची भेट घेण्यासाठी ते रोमला गेले. त्यानंतर बाल्कन प्रदेशातील राष्ट्रांनाही त्यांनी भेटी दिल्या. यूरोपच्या वास्तव्यातील त्यांची सर्वात महत्वाची भेट आयर्लंडची समजली जाते. आयर्लंडच्या स्वातंत्र्यलढयाचे नेते डी. व्हलेरा यांच्याशी चर्चा करून सुभाष बाबूनी त्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाचे स्वरूप समजावून घेतले. १९३७ -३८ च्या सुमारास त्यांनी ब्रिटनला भेट दिली.

## ☼ राष्ट्रसभेतील सुभाषचंद्र बोस यांचे वेगळेपण :

सुभाषचंद्र बोस हे लंडनहून परत आल्यानंतर त्यांनी स्वत:ला राष्ट्रसभेच्या कार्याला वाहून घेतले. १९३८ मध्ये ते राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झाले. राष्ट्रसभेच्या नेत्यामध्ये वैचारिक मतभेद निर्माण होवून कांही नेत्यानी समाजवादी पक्ष नव्याने स्थापन केला. जयप्रकाश नारायण समाजवादी पक्षाकडे नेतृत्व गेले. काँग्रेस मध्ये जुने आणि नवे असे दोन गट होते. गांधीजींची सर्वच मते तरूणांना पटत नसत त्यामध्ये मानवेंद्रनाथ रॉय, पं. नेहरू, सुभाषचंद्र बोस हे होते. मानवेंद्रनाथ रॉय व त्यांचे अनुयायी काँग्रेसमधून बाहेर पडले. ब्रिटिश सरकार विशिष्ट मुदतीत सत्तात्याग करणार नसेल तर प्रत्यक्ष प्रतिकाराच्या मार्गाने भारतीयांनी प्रतिस्पर्धी राज्ययंत्रणा निर्माण करावी. अशी बोस यांची भूमिका होती. गांधीजींना सुभाषचंद्र बोस यांचा विचार मान्य नव्हता. १९३९ मध्ये झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीत पुन्हा निवडून आले. परंतू कार्यकारिणी बनविण्यात अनेक अडचणी येवू लागल्याने त्यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यांनी काँग्रेस पक्षांतर्गत 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाचा नवा गट स्थापन केला.

## ☼ सुभाषचंद्र बोस जर्मनीकडे :-

दुसऱ्या महायुध्दामुळे इंग्रज अडचणीत सापडले होते याचा फायदा घेवून भारतीयांनी स्वातंत्र्यलढा तीव्र करावा असे बोस यांना वाटत होते. अशा परिस्थितीत सुरक्षा कायद्याखाली नेताजींना जुलै १९४० मध्ये अटक करण्यात आले होते. त्यावेळी नेताजीनी तुरूंगात आमरण उपोषण सुरू केले त्यामुळे त्यांना सोडून देण्यात आले. परंतू सरकारची त्यांच्यावर करडी नजर होती. तरीही त्यांची नजर चुकवून १० जानेवारी १९४१ रोजी भारताबाहेर जावून रशियात वास्तव्य केले. तेथून ते बर्लिनला गेले. जर्मनीतील हिंदी लोकांना एकत्र करून त्यांची सेना उभारण्याचे काम सुरू केले. त्याप्रमाणे ३ हजाराचे लष्कर त्यांनी उभारले.

## ☼ आझाद हिंद सेना (Indian National Army) :-

जपान मध्ये असलेले रासबिहारी बोस यांनी तेथील हिंदी लोकांची संघटना बांधून त्यांनी 'Indian Independence league' नावाची संघटना स्थापन केली. त्यानंतर रासबिहार बोस यांनी पूर्वेकडे वास्तव्य करणाऱ्या हिंदी लोकांच्या प्रतिनिधीची बैठक टोकिओ याठिकाणी घेवून 'आझाद हिंद सेना' स्थापन करण्याचा निर्णय मार्च १९४२ मध्ये घेतला.

जपानी माऱ्याचा मुकाबला करण्यासाठी मलाया, सिंगापूर, इत्यादी ठिकाणी इंग्रजांच्या हिंदी फौजा लढा देत होत्या. जपानी माऱ्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. जपानपुढे शरण गेलेल्या हिंदी सैनिकात स्वातंत्र्याचे ध्येय जागृत करून ऑगस्ट १९४२ पर्यंत ४० हजार हिंदी सैनिक आझाद हिंद फौजेत समाविष्ट झाले. कॅप्टन मोहनसिंग हे या सेनेचे सेनापती बनले. त्यानंतर आग्नेय आशियातील हजारो हिंदी नागरिक उत्स्फूर्तपणे आझाद हिंद फौजेत सामिल झाले.

## ☼ नेताजी सुभाषचंद्र बोस आझाद हिंद सेना प्रमुख :-

१९४३ मध्ये जपानला जावून बोस यांनी जपानचे पंतप्रधान टोजो यांची भेट घेवून भारतीय स्वातंत्र्यासाठी मदत मागितली. आझाद हिंद सेना व जपानी फौज यांनी संयुक्तपणे एकत्र लढावे याला टोजो यांनी संमती दर्शविली. याचवेळेस सुभाषचंद्र बोस यांनी टोकिओ आकाशवाणीवरून भाषण करून भारताबाहेरील हिंदी लोकांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी प्राणपणाला लावावेत असे आवाहन केले. त्यामुळे आग्नेय आशियातील सर्व हिंदी लोकांत नवचैतन्याची लाट निर्माण झाली.

जुलै १९४३ मध्ये बोस सिंगापूर येथे आले तेंव्हा रासबिहारी बोस यांनी 'हिंदी स्वातंत्र्य संघाची' व आझाद हिंद सेनेची सर्व सुत्रे सुभाषचंद्र बोस यांच्याकडे सोपविली. ते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती बनले. त्यांनी १९४३ मध्ये आझाद हिंद सरकारची स्थापना केली. आझाद हिंद सरकारचा जाहिरनामा तयार करण्यात आला. 'रक्ताचा शेवटचा थेंब असे पर्यंत मी लढत राहिन' अशी प्रतिज्ञा केली. व मंत्रीमंडळ स्थापन केले. या मंत्रीमंडळाने २४ ऑक्टोबर १९४३ रोजी इंग्लंड व दोस्त राष्ट्रे यांच्या विरूध्द युध्द पुकारण्याचा ठराव पास केला.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी बोस यांच्या नेतृत्वाखाली सशस्त्र लढा सुरू केला. आझाद हिंद फौजेने अंदमान व निकोबार बेटे जिंकून घेवून 'जयहिंद, चलो दिल्ली' अशी इतिहासप्रसिद्ध घोषणा केली. तेव्हाच लोकांनी त्यांना 'नेताजी' ही पदवी बहाल केली. पुढे याच नावने भारताच्या इतिहासात आजरामर झाले.

## ☐ आझाद हिंद सेनेची कामगिरी :-

१. **बोस यांचे तेरॉचीला चोख उत्तर :** जपानी फौजा व आझाद हिंद फौज यांनी संयुक्त मोहिम काढून भारताला स्वातंत्र्य मिळवून द्यावयाचे धोरण ठरले होते. परंतू याला आग्नेय आशियातील जपानी सेनापती फिल्डमार्शल काउंट तेरॉची याने विरोध केला. त्याच्या मते आझाद हिद फौजेतील सैनिक शरण आलेले असल्याने जपानी सैन्याची बरोबरी करू शकत नाही अशी त्याची भूमिका होती. बोस यांनी प्रखर प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, जपानी सैनिकांच्या पराक्रमाने मिळणारे भारताचे स्वातंत्र्य गुलामगिरीहून वाईट दर्जा असेल आणि असे स्वातंत्र्य आम्ही स्वीकारणार नाही. भारताच्या स्वातंत्र्यासाठी हिंदी सैनिकांचे रक्त व प्राण खर्ची पडले पाहिजेत. म्हणून हिंदुस्थानच्या मोहिमेवरील आघाडीची बाजू आम्ही घेतो असेही त्यांनी सांगितले. शेवटी आझाद हिंद फौजेची एक तुकडी प्रयोग म्हणून जपानी फौजेबरोबर देण्यास त्याने संमती दिली.

२. **सुभाष ब्रिगेडचे प्रशंसनीय कार्य :** आझाद हिंद फौजेच्या गांधी ब्रिगेड, आझाद ब्रिगेड व नेहरू ब्रिगेड अशा तीन ब्रिगेड होत्या. यावरून गांधी-नेहरू-आझाद यांच्याबद्दल

सुभाषबाबूंच्या मनात किती आदराची भावना होती. हे लक्षात येते. या तीन ब्रिगेड मधून शूर जवान निवडून चौथी ब्रिगेड तयार केली जात असे या चौथ्या ब्रिगेडमधील सैनिकांनीच आपल्या ब्रिगेडचे नाव 'सुभाष ब्रिगेड' असे ठेवले होते. जनरल शहानवाजखान या ब्रिगेडचे कमांडर होते. सुभाष ब्रिगेड ब्रम्हदेशात जावून छावणी करून राहिली. या सैनिकांनी हिंदुस्थानच्या सरहद्दीतील माऊडॉक हे ठाणे घेतले. हिंदुस्थानच्या भूमीवर आझाद हिंद फौजेने मिळविलेला हा पहिला विजय होय.

३. **माऊडॉक येथे सुभाष ब्रिगेडने दाखविलेले असामान्य धाडस :** माऊडॉक हे जास्त काळ आपल्या ताब्यात ठेवता येणार नाही असे जपानी सैन्याला वाटत होते. परंतू येथून माघार घेण्यास आझाद हिद फौजेने नकार दिला. कॅप्टन सुरजमल यांच्या नेतृत्वाखाली हिंदी सैन्य तिथेच राहिले. मात्र जपानी सैन्याने माघार घेतली. तेथे राहणे म्हणजे मृत्यूच्या जबडयात राहण्यासारखे होते. परंतू हिंदी सैन्याने असामान्य धाडस दाखविले.

४. **कोहिमावर तिरंगा फडकविला :** जपानी फौजेबरोबर सुभाष ब्रिगेडने नागा प्रदेशातील कोहिमा शहराकडे कूच केले व ते शहर जिंकून तेथे तिरंगा झेंडा फडकविला पुढे या सैन्याची इंफाळ घेवून ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यातून बंगालमध्ये घुसण्याची योजना होती परंतू ती यशस्वी होवू शकली नाही. सुभाष ब्रिगेडने कोहिमापर्यंत येण्याचे अतुलनीय धाडस तेवढ्या प्रतिकूल परिस्थितीत दाखविले हे विशेष समजले पाहिजे.

५. **स्वतंत्र महिला सेनेची निर्मिती :** नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी जपानच्या विरोधाची पर्वा न करता 'राणी लक्ष्मीबाई' या नावाची पलटन तयार केली होती. लक्ष्मी स्वामीनाथन यांनी वैद्यकीय शास्त्रातील पदवी संपादन केली होती. या पलटनीचे नेतृत्व लक्ष्मी स्वमीनाथन यांनी केले होते. या राष्ट्रीय कार्यात स्त्रयांनी मोठया धैर्याने कार्य केले. या स्त्रियांनी अवहेलना सहन केली याची प्रेरणा १८५७ च्या उठावात राणी लक्ष्मीबाईनी दाखविलेला पराक्रमाची प्रेरणा घेवूनच स्वातंत्र्यलढा पुढे धैर्याने चालविला.

६. **हंगामी सरकारची स्थापना :** २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी जपानचे पंतप्रधान यांच्या सुचनेवरून हंगामी सरकारची स्थापना केली. या हंगामी सरकारला जपान, जर्मनी, ब्रम्हदेश, इटली, सयाम, चीन इ. देशांनी राजकिय मान्यता दिली. परंतू भारतीय नेत्यांना अटक करण्यात आल्याने हंगामी सरकार स्थापन करणे कठीण झाले होते. परंतू हंगामी सरकारच्या ध्वजाखाली एकत्र येवून लढा चालू ठेवण्यासाठी आझाद हिंद सरकारची स्थापना केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकांच्या विश्वासास पात्र असणारे राष्ट्रीय सरकार स्थापन करणे जनतेच्या हक्क व अधिकाराचे रक्षण करणे हे हंगामी सरकारचे ब्रीद होते.

७. **अझाद हिंद सेनेचे अखेरचे कार्य :** जपानी व हिंदी सैन्याने इंफाळ घेण्याचा निकराचा प्रयत्न केला. सिंगापूर प्रमाणे आसाम मधील हे मोक्याचे ठिकाण आपल्या हाती सहज पडेल असे जपानी सैन्याला वाटत होते. परंतू तसे घडले नाही. कारण जपानचे लक्ष ब्रम्हदेशच्या सरहद्दीवरील युध्दापेक्षा प्रशांत महासागरातील युध्दाकडे वळले. त्यामुळे ब्रम्हदेशातील जपानची आघाडी कमकुवत बनली. युरोपीय आघडीवर जपानच्या मित्रांची बाजू कोसळत होती. तर प्रशांत महासागरात अमेरिकन फौजा जपानी फौजाचा फडशा उडवित होत्या. अशा परिस्थितीत हिंदुस्थानातील ब्रिटिश फौजांना उत्तेजन मिळणे स्वाभाविक होते. ब्रिटिश फौजानी आक्रमक पवित्र घेवून हिंदुस्थानच्या भूमीवरून आणि ब्रम्हदेशातून जपानी व आझाद हिंद फौजा मागे हटण्यास सुरूवात झाली. शेवटी ब्रिटिश फौजांनी रंगून काबीज केले व आझाद हिंद फौज कैद करून टाकली.(मे १९४५)

८. **अखेर स्वप्न भंगले :** जपानच्या पराभव झाल्यामुळे सुभाषचंद्र बोस यांचे स्वप्न भंग पावले. आझाद हिंद फौजेन असामान्य पराक्रम करून देखील जागतिक परिस्थिती प्रतिकूल बनल्याने त्यांना अपयश आले होते. १८ ऑगस्ट १९४५ रोजी ते बँकाँककडून टोकियोकडे निघाले असता मार्गात चीन जवळच्या फार्मोसा बेटामधील ताय पै विमानतळवर त्यांच्या विमानास अपघात झाला व त्यात ते जबर जखमी होवून त्या रात्री मरण पावले. असा जपानी सरकारचा वृत्तांत आहे. नेताजीच्या मृत्यूचे गूढ उकलण्यासाठी स्वतंत्र भारताने दोन चौकशी समित्या नेमल्या. परंतू त्यांच्या कडूनही बोस यांच्या मृत्यूचे गूढ पूर्णपणे उकलले नाही.

## ☼ आझाद हिंद सेनेच्या कार्याचे मूल्यमापन :-

१. **शौर्य व पराक्रमात अग्रेसर :** आझाद हिंद फौज पराक्रमात व शौर्यात सदैव अग्रेसर राहिली. जपानी लष्करी अधिका-यांनी तिच्या पराक्रमाबद्दल प्रथम शंका व्यक्त केली. परंतू त्यांनीच पुन्हा आझाद हिंद सेनेच्या शैर्याची व देशभक्तीची मुक्त कंठाने प्रशंसा केल्याचे दिसून येते. जगातील कोणत्याही राष्ट्रीय फौजेस शोभेल अशीच कामगिरी आझाद हिंद सेनेने करून दाखविली.

२. **आक्रमक पवित्रा :** आझाद हिंद सेनेने अपुरी साधनसामग्री शस्त्रास्त्रे असून देखील ब्रम्हदेशाची सरहद्द ओलांडून हिंदुस्थानच्या अंतर्गत भागात १५० मैलापर्यंत धडक मारली. आझाद हिंद सेनेने आक्रमक पवित्रा धारण केल्यानंतर ब्रिटिश सैन्याला त्यांचा एकदाही पराभव करता आला नाही. आझाद हिंद सेनेने जिंकलेले प्रत्येक ठाणे त्यांनी आपल्याच ताब्यात ठेवले. आक्रमक पवित्र्याच्या दिशेने मार्गक्रमण करताना जवळपास सुभाष ब्रिगेडचे ४००० सैनिक त्यात कामाला आले.

३. **आझाद हिंद सैनिकांची लोकप्रियता :** आझाद हिंद फौजेतील सैनिक व अधिकारी कैद झाल्यावर त्यांच्यावर ब्रिटिश सत्तेविरूध्द राजद्रोह केल्याचा व युध्द केल्याचा आरोप ठेवून दिल्लीतील लाल किल्ल्यात त्यांच्यावर खटला भरण्यात आला. हा खटला सर्व देशभर गाजला. आझाद हिंद फौजेतील सैनिक व अधिकारी यांची लाकप्रियता पराकोटीला पाहचली. राष्ट्रासाठी प्रणार्पण करणारे वीर म्हणून हिंदी जनता त्याच्याकडे पाहू लागली. त्यांच्यात देशप्रेमाची भावना उफाळून आली. म्हणूनच १९४४-४५ नंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिंदुस्थन सोडून जाण्याचा निर्णय पक्का केला. यामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना यांचा पराक्रम व देशभक्ती बऱ्याच प्रमाणावर कारणीभूत झालेली आहे.

४. **उच्चतम गुण वैशिष्टयांची प्रचिती :** आझाद हिंद सेनेच्या प्रत्येक सैनिकांने श्रध्दा, कर्तव्य व बलिदान ही तत्वे सदैव उराशी बाळगली पाहिजेत. प्रत्येकाला आपण शूर आहोत असे वाटले पाहिजे. कितीही अडचणी आल्या तरी यशाचे शिखर गाठण्याची जबरदस्त इच्छाशक्ती त्यांच्याजवळ होती. भारतीय स्वातंत्र्यलढयात आझाद हिंद सेनेच्या प्रत्येक सैनिकाने उच्चतम गुण वैशिष्टयाची प्रचिती दाखविली हे मान्य करावे लागले.

५. **सर्वस्वाचा त्याग करण्याची भावना :** आपले ध्येय साध्य करण्यासाठी सुख दु:खाची पर्वा न करता सदैव तत्पर राहण्याची आझाद हिंद सेनेची तयारी होती. भूक, तहान आदी सर्व विसरून मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व त्याग करण्याची उत्कट भावना प्रत्येक सैनिकात होती. सर्व प्रकारची प्रतिकूल परिस्थिती असताना देखील मृत्यूशी झुंज घेण्याची जबरदस्त इर्ष्या आझाद हिंद सैनिकात होती. म्हणूनच ब्रिटिशावर दबाव निर्माण होवू शकला.

## ❑ सारांश :-

सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेच्या रूपाने आग्नेय आशियात धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा आदर्श निर्माण केला होता. त्यामुळे देशात बॅ. जिनांच्या फाळणीच्या मागणीमुळे हिंदु-मुस्लिम ऐक्याचे स्वप्न पावत असताना त्याच काळात हिंदू-मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, पारशी असे सर्व धर्माचे स्त्रीपुरूष भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी खांद्याला खांदा भिडवून एकजुटीने लढत होते. हे विशेष समजले पाहिजे.

महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस या दोन राष्ट्रीय नेत्यामध्ये कांही वैचारिक मतभेद असले तरी दोघांच्या मनात परस्परासंबंधीची नितांत आदरची भावना होती हे खालील विधानावरून लक्षात येते. म. गांधीबद्दल बोस म्हणतात ''राजकीय मतभेद असेल तरी व्यक्ती स्नेह संबंध जिव्हाळ्याचे राखायचे हे दासबाबूनी मला शिकवल आहे. म्हणूनच गांधीवाद्यांनी मला कितीही यातना दिल्या असल्या आजही ते मला मनस्ताप देत असले तरी म. गांधी बद्दल मला व्यक्तीश: अतिशय आदर वाटतो व जिव्हाळाही वाटतो.''

म. गांधी व प. नेहरू बद्दल आदराची भावना होती म्हणूनच सुभाष बाबूनी आझाद हिंद सेनेच्या ब्रिगेडस्ना गांधी ब्रिगेड, नेहरू ब्रिगेड, अशी नावे दिली आहेत.

म. गांधी सुभाषचंद्र बोस बद्दल म्हणतात, ''सुभाषचंद्राची वाट चुकली असली तरी त्यांची देशभक्ती बावनकशी अशीच आहे.''

एका परदेशी पत्रकाराशी बोलताना म. गांधी म्हएातात ङ्कङ्कसुभाष बाबूनी देशासाठी फार मोठा त्याग केला आहे. ते सध्या परागंदा झाले आहेत. त्यांना भारताची निराकार अवस्था सहन होत नाही. त्यामुळे त्यांना जर्मनी व जपान या देशाची मदत घ्यावी असे वाटत असले तरी त्यांचे असीम देशप्रेम, त्यांनी अनेकदा सोसलेला तुरूंगवास, त्यांचा त्याग प्रशंसनीयच आहे.''

## ✲ स्वयं अध्ययन प्रश्न-३ ✲

❑ **अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. १९२२ मध्ये देशबंधू चित्तरंजन दास यांनी स्वराज्य पक्षाचा प्रचार करण्यासाठी कोणते साप्ताहिक सुरू केले?

२. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कोठे झाला?

३. रासबिहारी बोस यांनी कोणती संघटना स्थापन केली?

४. 'रक्ताचा शेवटचा थेंब असे पर्यंत मी लढत राहिन' असे उद्गार कोणी काढले?

५. 'राणी लक्ष्मीबाई' ब्रिगेडच्या प्रमुखाचे नाव काय?

❑ **ब) रिकाम्या जागा भरा.**

१. 'फॉर्वर्ड'-४ नावाचे साप्ताहिक ................ साली सुरू केले.

*अ) १९२३ ब) १९२२ क) १९२१ ड) १९२०*

२. सुभाषचंद्र बोस यांना नेताजी ही पदवी .................. यांनी बहाल केली.

*अ) सरकारने ब) जनतेने क) ब्रिटिशांनी ड) स्वतःने.*

३. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ................. रेडिओ स्टेशन सुरू करून 'चलो दिल्ली' चा नारा दिला.

*अ) इंफाळ ब) टोकिओ क) सिंगापूर ड) सयाम.*

४. आझाद हिंद फौजेच्या ........ ब्रिगेड होत्या.

*अ) एक ब) दोन क) तीन ड) चार*

५. सन १९३८ च्या हरिपूरा काँग्रेसचे अध्यक्ष .................. यांनी भूषविले.

*अ) म.गांधी ब) प.नेहरू क) सुभाषचंद्र बोस ड) सरदार पटेल*

## ३.३ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** *१. बंगाल.*

*२. विरेंद्रकुमार व भूपेंद्रनाथ दत्त.*

*३. वि. दा. सावरकर.*

*४. अनंत कान्हेरे.*

*५. श्यामजी कृष्ण वर्मा.*

*६. बंग.*

*७. शीख धर्मात संधारणा करणे व गोहत्या थांबविणे.*

*८. पी. मित्रा.*

*९. लाला हरदयाळ.*

*१०. किशनसिंग व स्वर्णसिंग.*

**ब)** १. *अ) येरवडौ*

२. *अ) गदर पार्टी.*

३. *अ) श्यामजी कृष्ण वर्मा.*

४. *अ) भगतसिंग.*

५. *अ) अनंत कान्हेरे.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

**अ)** *१. नेताजी सुभाषचंद्र बोस.*

*२. कार्ल मार्क्स.*

*३. १९२५.*

*४. १९४०.*

**ब)** १. *ब) कार्ल मार्क्स.*

२. *क) ताश्कंद.*

३. *अ) जयप्रकाश नारायण व आचार्य नरेंद्र देव.*

४. *अ) मुजफर अहमद.*

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

*१. फॉरवर्ड.*

*२. कटक*

*३. इंडियन इंडिपेंडन्स लीग.*

*४. सुभाषचंद्र बोस.*

*५. लक्ष्मी स्वामीनाथन*

**ब)** १. *ब) १९२२.*

२. *ब) जनतेने.*

३. *क) सिंगापूर.*

४. *ड) चार.*

५. *क) सुभाषचंद्र बोस.*

# ३.४ सरावासाठी स्वाध्याय

## अ) दिर्घोत्तरी प्रश्न.

१. बंगालमधील क्रांतीकारी चळवळीचा आढावा घ्या.

२. महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळीची चर्चा करा.

३. पंजाबमधील क्रांतीकरकांची माहिती लिहा.

४. भगतसिंग यांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान स्पष्ट करा.

५. डाव्या चळवळीच्या उदयाची कारणे सांगून त्यांच्या कार्याची चर्चा करा.

६. भारतातील डाव्या चळवळीच्या कार्याचा आढावा घ्या.

७. आझद हिंद सेनेची कामगिरी स्पष्ट करा.

८. भारतीय स्वातंत्र्य लढयातील नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे योगदान स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१. वासुदेव बळवंत फडके.

२. वि. दा. सावरकर.

३. कुका चळवळ.

४. गदर पार्टी.

५. साम्यवादी पक्ष.

६. आझाद हिंद सेना.

७. सुभाषचंद्र बोस.

८. शहिद भगतसिंग.

९. ककोरी कट.

१०. अनुशिलन समिती.

## ३.५ अधिक वाचनासाठी पस्तके


१. **जावडेकर आचार्य** : *'आधुनिक भारत'.*

२. **दिक्षित नी. सी.** : *'मराठे व ब्रिटिशकालीन भारत'.*

३. **डॉ. रोडे सोमनाथ** : *'आधुनिक भारत'.*

४. **डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता** : *'आधुनिक भारताचा इतिहास'.*

५. **फडके य. दि.** : *'कहाणी नेताजीची'.*

६. **केतकर कुमार** : *'कथा स्वातंत्र्याची'.*

७. **बेल्हेकर एन. के.** : *'आधुनिक भारताचा इतिहास'.*


❑❑❑

सत्र–४ : घटक–४

# जमातवाद आणि फाळणी

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ 'जमातवाद' संकल्पना

    ४.२.२ फाळणीची कारणे

    ४.२.३ फाळणीचे परिणाम

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१. जमातवादाची संकल्पना स्पष्ट होईल.

२. जमातवादाचे टप्पे आणि स्वरूप स्पष्ट होतील.

३. फाळणीची कारणे माहीत होतील.

४. फाळणीचे परिणाम समजून घेता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो, मागील तीन घटकांमध्ये आपण भारतातील राष्ट्रवादाचा उदय, गांधीजींच्या नेतृत्वात स्वातंत्र्यासाठी झालेली आंदोलने आणि काँग्रेसतेर विविध वैचारिक प्रवाहांच्या

आंदोलनाचा अभ्यास केला. भारतात राष्ट्रवादाचा उदय आणि विकास होत असतानाच जमातवादाचा देखील उदय आणि विकास होत गेला. राष्ट्रवादाशी जमातवादाचे नाते अत्यंत गुंतागुतीचे होते. जमातवादाच्या वाढीसोबत समाजात दुही, परस्परद्वेष, हिंसा, दंगे यांचे प्रमाण खूप वाढले. भारताची 'भारत' आणि 'पाकिस्तान' अशी फाळणी ही देखील जमातवादामुळेच झाली. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात जमातवाद आणि फाळणी हे दोन घटक अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जातात. जमातवाद आणि फाळणी हे दोन्ही घटक परस्परांशी संबधित असून जमातवादाची फलश्रुति फाळणी ठरली. स्वातंत्र्योत्तर भारतात देखील जमातवाद विद्यमान आहे तसेच फाळणीचे काही परिणाम अजून ही दृष्टीपथास पडतात. त्यामुळे 'जमातवाद' ही संकल्पना, फाळणीची कारणे आणि फाळणीचे परिणाम अभ्यासणे हे आधुनिक भारताच्या इतिहासासोबतच समकालिन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ 'जमातवाद' (Communalism) संकल्पना :-

धर्मनिरपेक्षतावाद आणि जमातवाद या दोन परस्परविरोधी संकल्पनांच्या बाबतचे वादविवाद राजकीय भाषणे, प्रसार माध्यमे, वृत्तपत्रे यांच्यावर मोठ्या प्रमाणात झडत असतात. या वादविवादांच्या परिणाम स्वरूप 'जमातवाद' हा शब्द आपल्या चर्चाविश्वात खूपच रूढ झाला आहे. त्याचप्रमाणे 'जमातवादी विचारसरणी' हा शब्द देखील आपल्या जीवनात गेल्या कित्येक दशकांच्या पासून अस्तित्त्वात असल्यामुळे 'जमातवाद' ही संकल्पना अ ापणास स्पष्ट आणि सरळधोपट असल्याचे वाटते. मात्र, वास्तवात जमातवाद ही संकल्पना अत्यंत जटील असून कित्येक वर्षांच्या प्रक्रियेतून निर्माण झाली आहे. आधुनिक भारताच्या इतिहासाचे सुप्रसिद्ध अभ्यासक बिपीन चंद्र यांच्या मते,

'जमातवाद' ही एक विचारसरणी आहे. या विचारसरणीचा विश्वास आहे की भारतीय समाज हा धार्मिक समूहांमध्ये विभाजित असून या समूहांचे आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक हितसंबंध हे फक्त भिन्न-भिन्न नसून परस्परविरोधी आणि शत्रुभावी आहेत.त्यामुळे 'जमातवाद' ही मुलत: ती विचारसरणी आहे, जिच्या आधारावर 'जमातवादी राजकारण' उभे राहते. 'जमातवादी हिंसा' ही जमातवादी विचारधारेचा एक स्वाभाविक परिणाम आहे. तसेच हिंदू, मुस्लिम, शीख अथवा ख्रिश्चन जमातवाद हे एकमेकांपेक्षा वेगळे नसून ते एकाच वृक्षाच्या वेगवेगळ्या फांद्या मात्र आहेत. वरकरणी पाहता ते वेगवेगळे भासत असले तरी त्यांच्या मुळात एकाच पद्धतीची जमातवादी विचारसरणी काम करत असते.

जमातवादाची अशी व्याख्या केली असली तरी एखादी व्यक्ती अथवा समूह आपल्या समूहाच्या,

धर्माच्या, सामाजिक घटकाच्या उन्नतीसाठी अथवा हितसंबंध जपण्यासाठी प्रयत्न करत असेल तर त्याच्या प्रयत्नाला 'जमातवाद' असे म्हणता येणार नाही. एखादा व्यक्ती स्वत:च्या धर्माचे पालन करत असेल किंवा त्याची स्तुती करत असेल अथवा अभिमान बाळगत असेल तर त्याला 'जमातवादी' म्हणणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे जमातवादाला सुव्यवस्थितपणे त्याच्या बारकाव्यांनिशी समजून घेणे आवश्यक आहे. जमातवादाला स्पष्टपणे समजून घेण्याकरिता जमातवादाच्या विकासाचे टप्पे समजून घेणे आवश्यक आहे.

## (अ) जमातवादाचे तीन टप्पे :-

इतिहासकार बिपीन चंद्र यांनी जमातवादाची विचारसरणी ही तीन टप्प्यांमध्ये विकसित झाली अशी मांडणी केली. जमातवादी जाणीवा निर्माण होणे, उदार अथवा मावळ जमातवाद आणि जहाल जमातवाद अशा तीन टप्प्यांत जमातवादाचा विकास झाला असे बिपिनचंद्र मानतात. जमातवादाचे हे तीनही टप्पे हे अगदी काटेकोरपणे सुटे सुटे नसून एका टप्प्याची लक्षणे दुसऱ्या टप्प्यात देखील दिसू शकतात. मात्र, या तीनही टप्प्यांमध्ये एक प्रकारचे सातत्य असल्याची मांडणी बिपीन चंद्र यांनी केली. बिपिन चंद्र यांनी मांडलेले आणि बहुतांश इतिहासकारांनी सहमती दर्शवलेले जमातवादाचे तीन टप्पे पुढील प्रमाणे आहेत.

### १. **'जमातवादी जाणीवा'** (Communal Consciousness) :-

जमातवादाच्या पहिल्या म्हणजेच सुरवातीच्या टप्प्यात एकाच धर्माच्या सर्व व्यक्तींचे भौतिक हितसंबंध म्हणजे आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक हितसंबंध एकसारखेच असल्याचा विश्वास लोकांमध्ये निर्माण होतो. त्याचबरोबर एका धर्मातील लोकांचे भौतिक हितसंबंध दुसऱ्या धर्मातील लोकांच्या भौतिक हितसंबंधापेक्षा भिन्न असल्याचा विश्वास जमातवादी विचारसरणीला असतो. जमातवादाच्या या टप्प्यामध्ये जमातवादी विचारसरणीचे लोक स्वत:ला फक्त राष्ट्रवादी न मानता राष्ट्रवादी हिंदू, राष्ट्रवादी मुस्लिम किंवा राष्ट्रवादी शीख समजत असत. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातील धर्मसुधारणा अथवा पुनरुत्थानवादी आंदोलने उदा. आर्य समाजाचे पंजाबमधील 'शुद्धी आंदोलन' तसेच 'गोरक्षा आंदोलन'(१८८०), दारूल उलुम देवबंद मदरसाची स्थापना (१८६६) ची स्थापना, मुसलमानांमध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सर सय्यद अहमद खान यांनी अलिगढ विद्यापीठाची केलेली स्थापना (१८७५), वसाहतीक सत्तेद्वारा केली जाणारी जनगणना (१८७२) (ज्यात पहिल्यांदा धार्मिक लोकसंख्येची नोंद केली गेली) अशाप्रकारच्या घडामोडींमुळे भाषिक व प्रादेशिक भेदाशिवाय हिंदू किंवा मुसलमान अशी धार्मिक ओळख निर्माण होऊ लागल्या. आपल्या धर्माच्या लोकांचे हितसंबंध एक सारखे आहेत अशा प्रकारच्या 'जमातवादी जाणीव' निर्माण झाली. जमातवादाच्या या टप्प्यातच राष्ट्रवादी विचारांचे लोक देखील स्वत: राष्ट्रीय हिंदू किंवा राष्ट्रीय मुसलमान म्हणवत आपापल्या धार्मिक समुदायाच्या नेतेपणाचा दावा करत असतात.

## २. **उदार अथवा मवाळ जमातवाद** (Liberal or Moderate Communalism) :-

जमातवादाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जमातवादी विचारसरणी मुळातच 'जमातवादी राजकारण' करत असते. आपल्यासमुहाचे हित पाहण्याचादृष्टीकोनसमोर ठेऊनच या टप्प्यात जमातवादी विचारसरणी राजकारणआणि संघटन करत असते. जमातवादाच्याया 'उदार अथवा मवाळ जमातवाद'च्या टप्प्यात जमातवादी विचारसरणीची उदारवाद, लोकशाहीवाद, मानवतावाद आणि राष्ट्रवादावर थोडीफार आस्था असते. 'उदार अथवा मवाळ जमातवाद' मानतो की, भारत हा विभिन्न धर्म समुदायांनी बनलेला देश असून त्यांचे हितसंबंध वेगवेगळे आहेत तसेच हे हितसंबंध परस्परांच्या हितसंबंधांच्या आड पण येऊ शकतात. मात्र, या विभिन्न हितसंबंधाना परस्परपूरक बनवून राष्ट्राच्या सामायिक हितसंबंधाशी त्यांची सांगड घालता येईल आणि अशा पद्धतीने भारताला एक 'राष्ट्र' बनवता येईल. उदार किंवा मवाळ जमातवादाचा हा टप्पा २० व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांच्या दरम्यान दृष्टीस पडतो. मुस्लिम लीग आणि हिंदू महासभा यांच्या सारखेविशिष्ट धार्मिक समुदायांच्या राजकीय हितसंबंधांच्या रक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या राजकीय पक्ष-संघटना अस्तित्वात आल्या. जमातवादी विचारसरणीचे पक्ष-संघटना आपले हितसंबंध जपून राष्ट्रीय हितासाठी मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. उदा. लखनौ करार (१९१६) हा केंद्रीय आणि प्रांतिक कायदेमंडळात स्थान मिळवण्यासाठी आणि त्याद्वारे आणखी राजकीय अधिकार मिळवण्यासाठी केला गेला. त्याचप्रमाणे याच काळात गोहत्येचा प्रश्न हिंदू आणि मुसलमान यादोन्ही धार्मिक समुदायांच्या परस्पर सहमतीने सोडवण्यासाठी प्रयत्न केले गेले. भारतीयांना राजकीय प्रतिनिधित्व देण्याच्या वासाहतिक सत्तेच्या धोरणाने ज्याला 'मोर्ले-मिंटो सुधारणा' किंवा' इंडियन कौन्सिल क्ट १९०९' या टप्प्यात महत्वाची भूमिका निभावली.

## ३. **जहाल जमातवाद** (Extreme Communalism) :-

जमातवादच्या तिसऱ्या व अंतिम टप्प्यात जहाल अथवा अतिरेकी जमातवादाचा उदय झाला. जहाल जमातवाद हा फॅसिस्ट पद्धतीने काम करत असतो. जहाल जमातवादाच्या मुळात खोलवर रुजलेली दुसऱ्या धार्मिक समुदायाप्रती भीती किंवा घृणा असते. जहाल जमातवाद हा भाषिक पातळीवर म्हणजे भाषणे, लेखन, सार्वजनिक तसेच वैयक्तिक वाद-विवाद इत्यादी मध्ये हिंसा आणि द्वेषाने भरलेला असतो. त्याचप्रमाणे आचरणाच्या पातळीवर देखील जहाल जमातवाद धार्मिक द्वेषातून संघटन, धार्मिक दंगे, खून, मारामाऱ्या इत्यादींच्या रूपाने हिंसक देखीलअसतो. जहाल जमातवाद आपल्या राजकीय विरोधकांना शत्रू ठरवतो, तसेच त्यांच्या विरोधात युद्धाची भाषा करतो. जमातवादाच्या याच टप्प्यात हिंदू आणि मुसलमान हे दोन वेगवेगळी राष्ट्रे असून त्यांच्यात पूर्वी पासून संघर्ष होत आला आहे अशी मांडणी केली गेली. १९२२-२३ नंतर देशात मोठ्या प्रमाणात धार्मिक दंगली झाल्या. जमातवादी विचारसरणी जी पूर्वी उच्च किंवा मध्यमवर्गापुरती मर्यादित होती, तिचा प्रभाव जनसामान्यांच्या मध्ये दिसू लागला. जमातवादाच्या या टप्प्यात जहाल जमातवादी विचारसरणीचे सार्वत्रिकीकरण झाल्याचे दिसून येते. स्थानिक अथवा वर्गीय

संघर्षातून झालेल्या दंगलींना धार्मिक दंगलींचे स्वरूप प्राप्त होते. अशा प्रकारची परिस्थिती असतानाच १९३३ नंतर हिंदू आणि मुस्लिम अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात असल्याच्या 'द्विराष्ट्र सिद्धांताची' मांडणी दोन्ही समुदायांकडून केली जाऊ लागली. ही मांडणी करताना इतिहासाचे जमातवादीकरण करून त्याचा वापर जमातवादी राजकारणासाठी केला गेला. हिंदू आणि मुसलमानांमध्ये वाढलेल्या या दुही मध्ये वसाहतीक सत्तेच्या 'फोडा आणि झोडा' या नीतिने महत्त्वाची भूमिका पार पाडली. १९३७ नंतर जमातवादी विचारसरणीची मोठ्या प्रमाणात वाढ होऊन त्याला आक्रमक आणि हिंसक स्वरूप प्राप्त झाले. जमातवादाच्या या शेवटच्या म्हणजेच 'जहाल जमातवाद' च्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात हिंसाचार होऊन भारताची फाळणी झाली आणि भारत आणि पाकिस्तान ही स्वतंत्र राष्ट्रे जन्मास आली.

## (ब) जमातवादाचे स्वरूप :-

जमातवादाची संकल्पना समजून घेतल्यानंतर जमातवादाचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. जमातवादाची संकल्पना स्पष्ट करणाऱ्या इतिहासकारांनी विभिन्न अंगाने जमातवादाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. जमातवादाच्या आर्थिक, सांस्कृतिक आणि वैचारिक स्वरूपावर या इतिहासकारांनी भाष्य केले आहे. त्यामुळे जमातवादाचे स्वरूप खालील मुद्यांच्या आधारे समजून घेता येते.

**१. जमातवादाचे वास्तव :** जमातवादीविचारसरणी ही विशिष्टधार्मिक समूहाचे हितसंबंध प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवर एकच असून दुसऱ्या विशिष्ट धार्मिक समूहापेक्षा वेगळे असल्याचे मानते. वास्तव मात्र याहून वेगळेअसते. हिंदूआणि मुस्लिम अशा दोन्ही धार्मिक समुदायांचे प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावरील आर्थिक आणि सामाजिक हितसंबंध एकच असतात. जमातवादी विचारसरणी विशिष्ट धार्मिक समुदायांत विभिन्न बाबतीत एकता असल्याची मांडणी करते. मात्र, वास्तवात उच्चवर्गीय हिंदूंचे जीवनशैली, संस्कृती ही गरीब वर्गातील हिंदुसारखी नसून ती उच्चवर्गीय मुसलमानांसारखी असते. पंजाबी हिंदू हा बंगाली हिंदूपेक्षा पंजाबी मुसलमानाबरोबर सांस्कृतिकदृष्ट्या जास्त जवळचा असतो. जमातवादही ऐतिहासिक काळापासून अस्तित्वात असल्याचे प्रतिपादन केले जात असले तरी वास्तव हे नाही. जमातवादही पूर्णतः आधुनिक विचारसरणी आहे ज्याची मुळे ही वासाहतिक शासनकाळातील राजकारणाशी जोडलेली आहेत.

**२. वसाहतवादाची भूमिका :** वासाहतिक शासन काळात भाषिक, वांशिक, सांस्कृतिक, प्रादेशिक अशा ओळखींपेक्षा धार्मिक ओळख आत्मसात करण्याची प्रवृत्ती बळावली. वासाहतिक शासनाने अशा प्रवृत्तींना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत होईल अशी धोरणे राबवली. त्यामुळे बहुसंख्य लोकांच्या धार्मिक ओळख या जमातवादी ओळखीमध्ये परिवर्तीत झाल्या आणि जमातवाद वाढीस लागला. वसाहतवादाने निर्माण केलेल्या राजकीय-सामाजिक परिस्थितीमुळेच जमातवाद निर्माण झाला असे बिपिन चंद्र, ज्ञानेंद्र पांडे यांच्यासारखे अनेक इतिहासकार मानतात.

**३. आर्थिक ताण आणि जमातवाद :** वासाहतिक शासन काळातील भारतातील वसाहतवादी अर्थव्यवस्था आणि त्या अर्थव्यवस्थेतून निर्माण झालेले आर्थिक मागासलेपणा हे जमातवादाच्या उदयास कारणीभूत ठरले असल्याचे इतिहासकार मानतात. अर्थव्यवस्थेत आलेल्या साचलेपणामुळे भारतातील मध्यमवर्गाने राजकीय मार्गाने स्वत:चे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी जमातवादी राजकारण करण्यास सुरवात केली. हिंदू आणि मुस्लिम जमातवादी विचारक आणि जमातवादी नेते हे त्या-त्या धार्मिक समुदायांच्या मध्यमवर्गातून आल्याचे स्पष्ट दिसून येते.

**४. वर्गसंघर्षाचे भ्रष्ट स्वरूप :** शोषक आणि शोषित यांच्यातील सामाजिक तणाव आणि वर्गसंघर्ष हा शोषक आणि शोषित हे भिन्न धर्मीय असतात तेंव्हा जमातवाद त्या संघर्षाला धार्मिक संघर्ष म्हणून प्रस्तुत करते किंवा त्याला जमातवादी संघर्षाचे रूप देते. शोषित आणि शोषकांच्या मधीलसंघर्ष हा वास्तविक होता आणि धर्माचे त्याच्याशी काहीही देणे-घेणे नव्हते. मात्र, हिंदू जमीनदार-सावकार आणि मुस्लिम शेतकरीकुळे, हिंदू व्यापारी आणि मुस्लिम विणकर यांच्यातील तणाव आणि संघर्ष हे जमातवादी संघर्षाचे रूप घेत असल्याचे अनेक जातीय दंगलींवरून दिसून येते. शोषक आणि शोषित यांच्यातील आर्थिक संघर्षाला जमातवादामुळे धार्मिक संघर्षाचे वळण मिळत असल्याने त्या संघर्षाला इतिहासकार 'वर्गसंघर्षाचे भ्रष्ट स्वरूप' मानतात.

**५. 'फोडा आणि झोडा' ची ब्रिटीश नीती :** भारतातील जमातवादाच्या उदय आणि विकासात 'फोडा आणि झोडा'ची वसाहतवादी नीति प्रामुख्याने कारणीभूत ठरली. वासाहतिक शासनाजवळ राजकीय सत्ता होती, जी राष्ट्रीय एकता वाढविण्यासाठी उपयोगी ठरली असती. मात्र, वासाहतिक शासनाने राष्ट्रीय आंदोलनांच्या विस्तारला आळा घालून त्याला दुर्बळ करण्याच्या हेतूने जमातवादाला उत्तेजन दिले. वासाहतिक शासन हे जमातवाद विरोधात कोणती ही कृती करत नसे तसेच जमातवादाचा विस्तार रोखण्याची कारवाई देखील करत नसे. तसेच वाढत्या जमातवादी तणावाकडे कानाडोळा करत असे. मात्र, हेच वासाहतिक शासन राष्ट्रीय आंदोलन किंवा इतर जनवादी आंदोलन दडपून टाकण्याचा हिरारीने प्रयत्न करत असे. भारतीय जनता ही 'राष्ट्र' म्हणून विकसित होऊ नये आणि त्यांच्यात राष्ट्रीय एकता निर्माण होऊ नये म्हणून ब्रिटीश शासनाने सतत देशाच्या फाळणीला प्रोत्साहन दिले.

**६. इतिहासाचा वापर :** भारतामध्ये आधुनिक पद्धतीने इतिहास लेखनाची सुरवात ही वासाहतिक काळातच सुरु झाली. वसाहतवादी-साम्राज्यवादी-पौर्वात्यवादी इतिहासकारांनी प्राचिन भारताला 'सुवर्णयुग' आणि मध्युगीन भारताला 'अंधारयुग' म्हणून प्रस्तुत केले. प्राचिन भारतात हिंदूचे आणि मध्युगीन भारतात मुस्लिमांचे राज्य होते असे धार्मिक आधारावरील कालविभाजन वासाहतिक इतिहासकारांनी केले. हेच धर्म आधारित कालविभाजन हिंदू आणि मुस्लिम राष्ट्रवादी इतिहासकारांनी मान्य करून इतिहास लेखन केले आणि त्यामुळे जमातवादी इतिहास लेखन वाढीस लागले. हिंदू राष्ट्रवादी-जमातवादी इतिहासकारांनी संपन्न हिंदू संस्कृतीवर रानटी मुसलमानांनी आक्रमण केले अशी मांडणी केली. तर मुस्लिम राष्ट्रवादी-

जमातवादी इतिहासकारांनी मुसलमानांच्या आक्रमणाला धर्म युद्धाचे स्वरूप दिले. त्यामुळे हिंदू आणि मुस्लिम यांच्यात सतत संघर्ष होत असल्याचा भ्रामक इतिहास लोकांमध्ये रूढ झाला. वास्तवात प्राचिन भारतातील सर्व राज्यकर्ते आणि जनता हिंदू नव्हती तसेच धर्माने मुस्लिम असलेल्या राज्यकर्त्यांनी आक्रमणे ही धर्मप्रसारासाठी नव्हती.या वास्तवाकडे दोन्ही समाजाच्या जमातवादी इतिहासकारांनी दुर्लक्ष्य केले.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ✻

❑ **अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या दोन परस्परविरोधी संकल्पनांच्याबाबतचे वादविवाद राजकीय भाषणे, प्रसार माध्यमे, वृत्तपत्रे यांच्यावर मोठ्या प्रमाणात झडत असतात ?

२. मुस्लिम लीग आणि हिंदू महासभा यांच्यासारख्या राजकीय पक्ष-संघटना कशा करिता अस्तित्वात आल्या?

३. जमातवादाच्या कोणत्या टप्प्यात हिंदू आणि मुसलमान हे दोन वेगवेगळी राष्ट्रे असून त्यांच्यात पूर्वीपासून संघर्ष होत आला आहे अशी मांडणी केली गेली ?

४. जमातवादाच्या तिसऱ्या टप्प्याला काय म्हणतात ?

५. भारतातील जमातवादाच्या उदय आणि विकासात कोणती वसाहतवादी नीति प्रामुख्याने कारणीभूत ठरली ?

❑ **ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. इतिहासकार .............. यांनी जमातवादाची विचारसरणी ही तीन टप्प्यांमध्ये विकसित झाली अशी मांडणी केली.

२. .............. जमातवादाचा टप्पा २० व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांच्या दरम्यान दृष्टीस पडतो.

३. हिंदू आणि मुस्लिम अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात .............. सिद्धांताची असल्याच्या मांडणी दोन्ही समुदायांकडून केली जाऊ लागली.

४. जहाल जमातवाद हा .............. पद्धतीने काम करत असतो.

५. .............. ने निर्माण केलेल्या राजकीय-सामाजिक परिस्थितीमुळेच जमातवाद निर्माण झाला असे बिपिन चंद्र, ज्ञानेंद्र पांडे यांच्यासारखे अनेक इतिहासकार मानातात.

## ४.२.२ फाळणीची कारणे

आधुनिक भारताच्या किंबहुना २०व्या शतकातील जगाच्या इतिहासात भारताची 'भारत' आणि 'पाकिस्तान' अशी फाळणी ही अत्यंत महत्वाची आणि दूरगामी परिणाम करणारी घटना आहे.विविध जातीधर्माचे लोक शतकानुशतके एकत्र राहत असलेल्या देशाचे हिंदू-मुसलमान जमातवादामुळे दोन भाग झाले.भारताच्या फाळणीच्या निर्णयास कोणी एकच व्यक्ती अथवा संघटन हे कारणीभूत नसून वासाहतिक काळात घडून आलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक बदलांनी त्यात महत्त्वाची भूमिका निभावली. वासाहतिक काळात झालेल्या या बदलांनी भारतातील हिंदू आणि मुसलमान समुदायांमध्ये जमातवादी विचारसरणी उदयाला आली. हिंदू आणि मुसलमानांमध्ये निर्माण झालेली ही जमातवादी विचारसरणी टप्प्याटप्प्याने वाढत आणि विकसित होत गेली.हिंदू आणि मुसलमानांमधील जमातवादी विचारसरणीने तिसरा टप्पा गाठून जहाल जमातवादाचे स्वरूप धारणा केले. परस्परांबद्दल अविश्वास आणि संशय, परस्परांच्या बद्दल ठोकळेबाज समज, परस्परद्वेष, परस्परविरोधी सामुदायिक हिंसा, दंगली इत्यादींच्या परिणाम स्वरूप हिंदू आणि मुसलमानांमधील जमातवादाने उग्र आणि हिंसक रूप धारण केले. हे स्वरूप इतके टोकाला गेले कि यातून द्विराष्ट्र सिद्धांताला बळ मिळून फाळणी टाळणे अशक्य बनले. आत्यंतिक हिंसा अथवा गृहयुद्ध टाळण्यासाठी फाळणीचा निर्णय घ्यावा लागला, मात्र जमातवादी हिंसेमुळे फाळणी होत असतानाच कोट्यावधी लोक विस्थापित झाले आणि लाखो लोक मारले गेले. भारताच्या आणि जगाच्या इतिहासात एक मोठी मानवी आपत्ती ठरलेल्या भारताच्या फाळणीची कारणे समजून घेणे आवश्यक ठरते. भारताच्या फाळणीची मुख्य कारणे खालील प्रमाणे आहेत.

**१. जमातवादी जाणीवा आणि ओळख :** १९व्या शतकातील धर्म सुधारणा चळवळींनी समाजातील अनिष्ट चालीरीती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचबरोबर हिंदू आणि मुस्लिम अशा धार्मिक ओळखी तीव्र/गडद  होण्यात धर्म सुधारणा चळवळींनी हातभार लावला. हिंदू मधील आर्यसमाजाची चळवळ, मुसलमानांमधील तबलीग, तन्जिम आणि दारूल उलुम देवबंद इत्यादी धार्मिक चळवळींनी आपापल्या धर्माचे पुनरुत्थान करण्याचा प्रयत्न केला. हे करत असताना त्यांनी धार्मिक शुद्धतेचा आग्रह धरला. विशिष्ट धर्मियांनी कसे रहावे-कसे राहू नये, कसे वागावे-कसे वागू नये, कसा पेहराव करावा-कसा करू नये, उपासना कशी करावी-कशी करू नये इत्यादींचा आग्रह धरला. दैनंदिन आचरणात आणि परिवेशात एकसारखेपणा व एकसाचीपणा आला. त्यामुळे धार्मिक ओळखी तीक्ष्ण झाल्या. वासाहातिक सत्तेने जनगणना करत असताना १८७२ पासून त्यात धर्माचा देखील समावेश केला. या मुळे धार्मिक समुदाय म्हणून आपल्या जनसंख्येचा अंदाज विभिन्न धर्मातील राजकीय नेत्यांना आला. जनसंख्येच्या आधारावर वासाहतिक शासनाकडून आपल्या समुदायाकरिता लाभ पदरात पडून घेण्याचा राजकीय नेत्यांनी प्रयत्न सुरु केला. या माध्यमातून देखील धार्मिक ओळखी तीव्र झाल्याच पण आपल्या

धर्मातील लोकांखेरीज इतर लोकांना वेगळे लोक म्हणून ओळखण्याची आणि वागविण्याची प्रक्रिया तीव्र झाली यातून आपल्या धर्माव्यतिरिक्त इतर धर्माच्या लोकांबद्दल इतरेकरण (others) (म्हणजे 'आपण' आणि 'ते' असा फरक करणे) होण्याची प्रक्रिया सुरु झाली. इतरेकरणाच्या प्रक्रियेमुळे हिंदू आणि मुसलमानांतील दुही मोठ्या प्रमाणात वाढीस लागली. ही दुही जमातवादी हिंसेस आणि फाळणीस कारणीभूत ठरली.

**२. वासाहतिक आणि जमातवादी इतिहास लेखन :** जेम्स मिलने भारताच्या इतिहासाची 'हिंदू कालखंड' आणि 'मुस्लिम कालखंड' अशी धर्मावर आधारित कालविभागणी केली. प्राचिन भारतीय संस्कृती ही संपन्न होती आणि मुसलमानांच्या आक्रमणामुळे ती लयास गेली अशी मांडणी जेम्स मिल आणि त्याच्या उत्तराधिकारी असलेल्या साम्राज्यवादी इतिहासकारांनी केली.भारताचा इतिहास हा हिंदू-मुस्लिम संघर्षाचा असल्याची मांडणी केली गेली. हिंदू आणि मुस्लिम या दोन भिन्न आणि परस्परविरोधी संस्कृती असल्याचे चित्र ब्रिटीश इतिहासकारांनी रंगवले. अशाच प्रकारची मांडणी काही राष्ट्रवादी इतिहासकार आणि जमातवादी इतिहासकारांनी नंतरच्या काळात केली. हिंदू जमातवादी इतिहास लेखनात प्राचिन हिंदू संस्कृतीची आणि मुसलमानांद्वारे केल्या आक्रमण-अत्याचारांची अतिशयोक्तीपूर्ण वर्णने केली गेली. मुस्लिम जमातवादी इतिहास लेखनात देखील मुसलमानांच्या शौर्याची आणि संस्कृतीची वारेमाप स्तुती केली. अशा प्रकारची हिंदू-मुस्लिम संघर्षाचा अतिशयोक्तीपूर्ण व चुकीचा इतिहास शाळा-महाविद्यालयांमध्ये शिकवला गेल्यामुळे हिंदू-मुसलमानांमधील दुही वाढीस लागली. हिंदू-मुस्लिम संघर्षाच्या इतिहासाची ही जमातवादी मांडणी 'द्विराष्ट्र सिद्धांत'ला पोषक ठरली.

**३. मुसलमानांचे मागासलेपण आणि १८५७ चा उठाव :** इंग्रजांची सत्ता भारतात स्थापन होण्यापूर्वी भारतात धर्माने मुसलमान असलेल्या मुघलांची नाममात्र सत्ता होती. 'इंग्रजांनी मुसलमानांना हरवून भारत जिंकून घेतला' या धारणेमुळे उच्चजातवर्गीय विशेषत: जमीनदार घराण्यातील मुसलमानांनी वासाहतिक काळातील नवे शिक्षण आणि नोकरीच्या नव्या संधींकडे दुर्लक्ष केले. मात्र, त्याच काळात भारतातील हिंदू समुदायाने विशेषत: बंगाल मधील उच्चजातवर्गीय हिंदुनी या संधीचा उपयोग करून घेतला. वर उल्लेख केलेली 'इंग्रजांनी मुसलमानांना हरवून भारत जिंकून घेतला' ही धारणा वासाहतिक शासकांच्या मनात देखील असल्यामुळे इंग्रज अधिकाऱ्यांना मुसलमानांपेक्षा हिंदू जवळचे वाटत. या कारणांमुळे मुसलमानांचे मागासलेपण वाढीस लागले होते. मुसलमान देखील इंग्रजांशी अंतर ठेऊन असत. याच दरम्यान १८५७ च्या उठावामध्ये उत्तर भारतातील विशेषत: अवध प्रांतातील मुस्लिम जमीनदारांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. १८५७ मधील मुसलमानांच्या सहभागामुळे आणि इंग्रजांनी बंडातील सहभागी लोकांच्या केलेल्या शिरकाणामुळे इंग्रजांचे आणि मुसलमानांचे संबंध आणखी बिघडले. मात्र, १८७० नंतर भारतात जसजशी राष्ट्रीय जागृती होऊ लागली तसतसे इंग्रजांनी मुसलमानांशी जुळवून घेण्यास सुरवात केली. यामागे १८५७ च्या उठावात हिंदू आणि मुसलमान यांचे ज्या प्रकारचे ऐक्य झाले

होते तसे पुन्हा होऊ नये असा वासाहतिक शासकांचा प्रयत्न होता. त्यांनी मुसलमानांच्या मागासपणाची हिंदूंच्या पुढारलेपणाशी तुलना करून दाखवल्याने हिंदू आणि मुसलमानांमध्ये दुहीनिर्माण झाली.

**४. सर सय्यद अहमद खान आणि अलिगढ चळवळ :** १८७० पासून वासाहतिक शासकांनी मुसलमानांसोबतचे संबध सुधारावेत असे धोरण अवलंबले. विल्यम विल्सनहंटर या स्कॉटिश प्रशासकीय अधिकाऱ्याचा 'The Indian Musalmans' (१८७१) हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथाच्या माध्यमातून विल्यम हंटर यांनी भारतातील मुसलमानांच्या मागासलेपणा आणि या मागासलेपणावरील उपाययोजना वासाहतिक शासनाच्या निदर्शनास आणून दिली. इंग्रजांच्या 'फोडा आणि झोडा' या नीतीचा महत्त्वाचा भाग असलेल्या मुसलमानांना हिंदूंच्या तुलनेत झुकते माप देण्याच्या धोरणाचा अशा प्रकारे आरंभ झाला. सर सय्यद अहमद खान हे इंग्रजांच्या प्रशासकीय सेवेततील एक अधिकारी १८५७ च्या उठावात देखील इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले होते. सर सय्यद अहमद यांनी मुसलमानांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी आणि त्यांना वासाहतिक शासनातील नव्या नोकऱ्या मिळण्यासाठी आवश्यक असणारे आधुनिक शिक्षण देण्याचा पुरस्कार केला. मुसलमानांना आधुनिक शिक्षण देण्याच्या हेतूने १८७५ साली 'मोहमेडीयन अंग्लो-ओरिएन्टल कॉलेज' चीत्यांनी स्थापना केली. या कॉलेजचे १९२० मध्ये अलिगढ विद्यापीठात रुपांतर झाले. मुसलमानांमध्ये आधुनिक शिक्षणासाठी सर सय्यद अहमद खान आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चालवलेल्या चळवळीलाच 'अलिगढ चळवळ' म्हटले जाते. राष्ट्रीय सभेची १८८५ मध्ये स्थापना झाल्यानंतर सर सय्यद यांनी भारतातील मुसलमानांनी राष्ट्रीय सभेपासून दूर रहावे आणि इंग्रजांशी एकनिष्ठ रहावे असे आवाहन केले. मुसलमानांमध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि त्यांच्यात राजकीय ऐक्य निर्माण व्हावे म्हणून सर सय्यदअहमद यांनी 'ऑल इंडिया मोहमेडीयन एज्युकेशन कॉन्फरन्स' ची १८८६ मध्ये स्थापना केली. सरसय्यद अहमद यांनी राजा शिवप्रसाद सिंग यांना सोबत घेऊन राष्ट्रीय सभेला विरोध म्हणून इंग्रजांशी एकनिष्ठ असलेल्या मुसलमानांची आणि हिंदूची संघटना 'युनायटेड इंडियन पॅट्री ऑटिकलीग'ची १८८८ मध्ये स्थापना केली. सरसय्यद अहमद खान यांनी सतत राष्ट्रीय सभेला विरोध केला आणि मुसलमानांनी इंग्रजांशी एकनिष्ठ रहावे असे आवाहन केले. मुसलमानांतील विभक्ततावादाची सुरवात सर सय्यद यांच्या काळापासून झाली. सरसय्यद अहमद खान यांनी स्थापन केलेल्या अलिगढ विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या मुसलमानांनी सर सय्यद यांच्या विचारांचा प्रसार आणि पुरस्कार केला यातून मुसलमानांत राजकीय आणि शैक्षणिक जागृती होऊन 'मुस्लिम लीग'ची स्थापना झाली आणि पुढे मुसलमानांसाठी स्वतंत्र राष्ट्राची मागणी जोर धरू लागली.

**५. 'फोडा आणि झोडा'चे ब्रिटीश धोरण आणि बंगालची फाळणी (१९०५) :** १८५७ च्या उठावात हिंदू आणि मुसलमानांच्या ऐक्यामुळे धास्तावलेल्या वासाहतिक शासकांनी १८७० पासूनच हिंदू आणि मुसलमानांमध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न सुरु केले होते. नवशिक्षित हिंदूमध्ये वाढत्या राष्ट्रवादाचा आणि राष्ट्रीय सभेचा प्रभाव कमी करण्याकरिता आणि सुशिक्षित मुसलमानांना या प्रक्रियेपासून दूर

ठेवण्यासाठी इंग्रजांनी मुसलमानांना सवलती देऊन त्यांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला.विल्यम हंटर यांनी मुसलमानाच्या मागासलेपणाची केलेली मांडणी आणि सरसय्यद अहमद खान यांचे सल्लागार म्हणून काम करणारे अलिगढमधील मोहमेडीयन अंग्लो-ओरिएन्टल कॉलेजचे प्रिन्सिपॉलथियोडोरबेक यांनी इंग्रजांच्या 'फोडा आणि झोडा' या धोरणानुसार मुसलमानांचे प्रश्न मांडले.

व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने प्रशासनिक सोयीचे कारण पुढे करत बंगाल प्रांताची हिंदू बहुसंख्य आणि मुस्लिम बहुसंख्य प्रदेशात विभागणी केली. बंगालच्या विभाजित नव्या प्रांतात मुस्लिम बहुसंख्य असलेल्यामुळे मुसलमानांना मोठ्या प्रमाणात अधिकारपदे मिळतील आणि मुसलमानांच्या इंग्रजांच्याप्रति राजनिष्ठा दृढ होतील असा लॉर्ड कर्झनचा कयास होता. इंग्रजांच्या 'फोडा आणि झोडा' नीतीच्या अनुसारच हिंदू आणि मुसलमानांमध्ये फुट पडण्यासाठी सन १९०५ मध्ये बंगालची फाळणी करण्यात आली. बंगालच्या या फाळणीला राष्ट्रवाद्यांनी तीव्र विरोध केला, त्यामुळे १९११ मध्ये ही फाळणी रद्द करण्यात आली. मात्र, 'बहुसंख्य हिंदुंनी अल्पसंख्य मुसलमानांच्या हिताची असलेल्या बंगालच्या फाळणीला विरोध केल्यामुळे बंगालची फाळणी रद्द झाली' अशी मुसलमानांची धारणा बनवून देण्यात वासाहतिक शासक यशस्वी झाले.

**६. मुस्लिम लीगची स्थापना (१९०६) :** बंगालच्या फाळणी नंतर वर्षभरातच ब्रिटीशांच्या प्रोत्साहनाने ढाकाचे नवाब सलीमुल्ला खान यांच्या पुढाकाराने ३० डिसेंबर १९०६ साली मुस्लिम लीगची स्थापना झाली. आगाखान (तिसरे) यांना मुस्लिम लीगचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. मुस्लिम लीग ही जमीनदार आणि कुलीन मुसलमानांची संघटना होती. मुसलमानांच्या राजकीय हितसंबंधाचे रक्षण करण्याच्या हेतूने तिची स्थापना करण्यात आली. मुसलमानांमध्ये ब्रिटीश सत्तेविषयी राजनिष्ठा वाढीस लावणे हा देखील तिच्या स्थापनेचा एक उद्देश होता. इंग्रजांशी सहकार्य करून आणि राष्ट्रीय सभेला विरोध करून जास्तीत जास्त राजकीय लाभ मिळवण्याचा मुस्लिम लीगचा प्रयत्न होता. तर मुस्लिम लीगला सहकार्य करून राष्ट्रीय सभेपासून तिला दूर ठेऊन हिंदू आणि मुसलमान यांच्यात दुही निर्माण करण्याचा इंग्रजांचा प्रयत्न होता. मात्र, सर्व मुसलमानांवर मुस्लिम लीगचा प्रभाव होता असे नाही. मौलाना आझाद, खान अब्दुल गफार खानसारखे लोक शेवटपर्यंत राष्ट्रीय सभेमध्येच राहिले. बॅ. महंमद अली जिना हे सुरवातीला राष्ट्रीय सभेत होते आणि त्याकाळात त्यांनी मुस्लिम लीगच्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीचा धिक्कार करणारा ठराव १९१० मध्ये अलाहबाद येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात मांडला होता. मात्र, नंतरच्या काळात जमातवादाच्या वाढीमुळे मुस्लिम लीगला काही प्रमाणात मुसलमानांचा पाठींबा मिळू लागला आणि त्यामुळे महंमद अली जिना यांनी देखील मुस्लिम लीगचे नेतृत्व करण्याची मागणी स्वीकारली. मुस्लिम लीगच्या रूपाने मुसलमानांची वेगळी राजकीय संघटना राष्ट्रीय पातळीवर उभी राहिल्याने हिंदू आणि मुसलमानांतील दुही वाढीस लागली.

**७. लखनौ करार आणि मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ :** मुस्लिम नेत्यांनी लॉर्ड मिंटोकडे मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी १९०६ मध्ये केली होती. परिणामी मोर्ले-मिंटो सुधारणा म्हणजेच इंडियन कौन्सिल क्ट (१९०९) नुसार मुसलमानांना कायदेमंडळात स्वतंत्र जागा देण्यात आल्या. मात्र, सन १९११ मध्ये इंग्रजांनी बंगालची फाळणी रद्द केली आणि त्यामुळे मुस्लिम लीगच्या नेतृत्वाला धक्का बसला. राष्ट्रीय सभेचा वाढता प्रभावामुळे राष्ट्रीय सभेसोबत राहून 'स्वराज्य' मिळवता येईल असे मुस्लिम लीगच्या नेत्यांना वाटू लागले. वासाहतिक सत्तेविरुद्धचा संघर्ष मुस्लिम लीगला वगळून पूर्णत्वास जाणार नाही असे राष्ट्रीय सभेला देखील वाटू लागले होते. त्यामुळे राष्ट्रीय सभा आणि मुस्लिम लीग यांच्यात सन १९१६ मध्ये लखनौ येथे करार झाला ज्याला 'लखनौ करार' म्हणून ओळखले जाते. या करारानुसार राष्ट्रीय सभेने मुस्लिम लीगच्या स्वतंत्र मतदारसंघाची मागणी समान्यता दिली. वासाहतिक शासकांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची व्यवस्था १९१९ आणि १९३५ च्या कायद्यानुसार कायम ठेवलीआणि त्यामुळे हिंदू आणि मुस्लिम यांच्यात विभक्ततावाद आला.

**८. हिंदू महासभेची स्थापना (१९१५) :** वासाहतिक शासकांच्या 'फोडा व झोडा'च्या धोरणामुळे भारतात जमातवादाचा प्रसार हिंदू आणि मुसलमान दोहोंत मोठ्या प्रमाणात झाला.आर्य समाजाच्या शुद्धी आंदोलनांमुळे आणि गोरक्षा समितीच्या कार्यामुळे हिंदू म्हणून ओळख दृढ होऊन हिंदूचे संघटन आणि मुसलमानाबद्दल परकेपणाची-द्वेषाची भावना वाढीस लागली होती. बंगालच्या फाळणीनंतर ज्या प्रकारे मुस्लिम लीगची स्थापना झाली, त्याचप्रकारे या फाळणी नंतर स्थानिक पातळीवर हिंदू सभा स्थापन हालचाली सुरु झाल्या. आर्य समाजाच्या माध्यमातून १९व्या शतकाच्या उत्तरार्धातच हिंदू नेते संघटीत होण्यास सुरवात झाली होती. आर्य समाजाचा पंजाबमध्ये मोठा प्रभाव होता आणि लाला लजपत राय हे तेथील आर्य समाजाचे मोठे नेते होते. लालालजपत राय यांनी लालचंद आणि शादी लाल या आपल्या सहकाऱ्यांसह 'पंजाब हिंदू सभा'ची स्थापना केली. मदनमोहन मालवीय यांनी १९०९ झाली लाहोर येथे झालेल्या 'पंजाब हिंदू सभा'च्या पहिल्या अधिवेशनात अध्यक्ष म्हणून काम पाहीले. पंजाब हिंदू सभा प्रमाणे प्रांतिक पातळीवर संयुक्त प्रांत (आजचा उत्तर प्रदेश), मध्य प्रांत आणि बेरार (आजचा मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्र मधील विदर्भचा प्रदेश), बंगाल प्रांत आणि बॉम्बे प्रेसिडेन्सी मध्ये देखील हिंदू सभांची स्थापना झाली. हिंदूचे राजकीय हितसंबंध महत्वाचे मानून त्याच्या रक्षणासाठी आणि उन्नतीसाठी राष्ट्रीय पातळीवर संघटन स्थापन व्हावे असा विचार हिंदू नेत्यांचा होता. त्यामुळे सन १९१० मध्ये अलाहबाद येथे प्रमुख हिंदू नेत्यांनी हिंदू महासभेची स्थापना करण्याचा निर्णय झाला. हरिद्वार येथे भरलेल्या कुंभ मेळ्यात १९१५ सालीहिंदू महासभेचे पहिले अधिवेशन झाले. हिंदू महासभा ही हिंदुच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी स्थापन झाली असली तरी राष्ट्रीय सभेच्या नेत्यांसोबत त्यांचे चांगले संबंध होते. मात्र, नंतरच्या काळात बाळकृष्ण शिवराम मुंजे यांचा हिंदू महासभेवरील प्रभाव वाढीस लागून हिंदू जमातवाद तीव्र होण्यास सुरवात झाली. दरम्यानच्या काळात झालेल्या धार्मिक दंगली आणि

हिंदू-मुस्लिम तणावाच्या पृष्ट्भूमीवर१९३८ नंतर विनायक दामोदर सावरकर हे रत्नागिरीतील स्थानबद्धता संपवून हिंदू महासभेचे अध्यक्ष झाले. वि. दा. सावरकरांचा हिंदू महासभेतील वाढत्या प्रभावामुळे हिंदू महासभेच्या जमातवादास अतिजहाल स्वरूप आले. सावरकरांनी राष्ट्रीय सभा आणि राष्ट्रीय सभेच्या मुसलमानांविषयीच्या धोरणांवर जहाल स्वरुपाची टीका केली. वि. दा. सावरकरांनी महंमद अली जीना यांच्याप्रमाणेच हिंदू आणि मुस्लिम यांना दोन स्वतंत्र आणि सतत संघर्ष करणारी राष्ट्रे मानून स्वत:चा 'द्विराष्ट्र सिद्धांत' मांडला. सावरकरांच्या द्विराष्ट्र सिद्धांतानुसार अल्पसंख्य मुस्लिम आणि ख्रिश्चन यांना 'हिंदू राष्ट्रा'त दुय्यम नागरिकत्व दिले जाईल अशी मांडणी केली. सावरकरांच्या नेतृत्वाखालील हिंदू महासभेने हिंदू जमात, हिंदू संस्कृती, 'हिंदू राष्ट्र' या मुद्यांवर भर देण्यास सुरवात केली. परिणामी पाकिस्तानची मागणी देखील जोर धरू लागली.

**९. खिलाफत आंदोलन असहकार चळवळ आणि हिंदू-मुस्लिम दंगे :** पहिल्या महायुद्धात विजयी झालेल्या इंग्लंड आणि त्याच्या मित्रराष्ट्रांनी पराभूत राष्ट्र ऑटोमन तुर्क साम्राज्यासोबत सन १९२०मध्ये सेव्हरेसतह झाला. या तहानुसार इंग्लंडने ऑटोमन तुर्क साम्राज्य आणि या साम्राज्याचे 'सुलतान' पद नष्ट करण्याच्या हालचाली सुरु केल्या. ऑटोमनतुर्क साम्राज्याचा सुलतान हा संपूर्ण जगातील मुसलमानांचा 'खलिफा' म्हणजे प्रमुख मानला जात होता. ऑटोमन तुर्क साम्राज्याचे 'सुलतान'पद नष्ट केल्यास 'खलिफा'चे पद देखील नष्ट होईल. 'खलिफा' पद नष्ट होणे हे जगभरातील मुसलमानांना आवडणार नव्हते. भारतातील मुसलमानांनी ब्रिटीशांना पहिल्या महायुद्धात मदत केली होती. त्याबदल्यात 'खलिफा' ला धक्का लावणार नाही असे इंग्लंड आणि दोस्त राष्ट्रांनी आधी जाहीर केले होते. त्यामुळे भारतातील मुसलमानांना असे वाटले होते की, ब्रिटीश 'खलिफा' च्या पदाला धक्का पोहचविणार नाहीत. ब्रिटीशांनी 'खलिफा' पद नष्ट करण्याच्या हालचाली सुरु केल्यामुळे संतप्त झालेल्या भारतातील मुसलमानांनी 'खलिफा' पदाचे संरक्षण करण्याच्या मागणीसाठी ब्रिटीश सरकारविरुद्ध आंदोलन सुरु केले त्याला 'खिलाफत आंदोलन' म्हणून ओळखले जाते. महात्मा गांधीनी राष्ट्रीय सभा आणि स्वतंत्रता आंदोलनापासून दूर असलेल्या मुसलमानांना 'खिलाफत आंदोलन'च्या माध्यमातून स्वतंत्रता आंदोलनात आणण्यासाठी 'खिलाफत आंदोलन'ला जाहीर पाठींबा दिला. महात्मा गांधीनी १९२० मध्ये 'असहकार चळवळ' सुरु केली आणि 'खिलाफत आंदोलन' नेत्याला पाठींबा दिला. या पाठींब्यामुळे मोठ्या संख्येने मुसलमान असहकार चळवळीत आणि राष्ट्रीय सभेचे कार्यकर्ते खिलाफत आंदोलनात सामील झाले. त्यामुळे देशात हिंदू-मुस्लिम ऐक्य वाढीस लागले.

सन १९२२ मध्ये चौरीचौराच्या घटनेनंतर महात्मा गांधीनी असहकार आंदोलन मागे घेतले. तुर्कस्तानचे नवे राष्ट्राध्यक्ष मुस्तफा केमाल पाशा यांनी तुर्कस्तानच्या संसदेमार्फत १९२४ मध्ये 'खलिफा' पद कायद्याने नष्ट केल्यामुळे खिलाफत आंदोलनाचे औचित्य संपले. खिलाफतचा प्रभाव ओसरत

असतानाच १९२०च्या दशकात देशभरात मोठ्या प्रमाणात हिंदू-मुस्लिम दंगे झाले. मोपल्यांच्या बंडात हिंदू जमीनदारांच्या जमिनीवर राबणाऱ्या 'मोपला' म्हणून ओळखले जाणाऱ्या मुस्लिम कुळांनी सशस्त्र बंड केले. ब्रिटीश सरकारसोबतच हिंदू जमिनदारांवर मोपल्यांनी हल्ले केले. याच काळात देशभरात जमातवादी शक्तींनी उचल खाल्ली आणि हिंदू-मुस्लिम संबंध बिघडत गेले. याच काळात जमातवादी पक्ष असलेल्या हिंदू महासभा आणि मुस्लिम लीगच्या लोकप्रियतेत काही प्रमाणात वाढ झाली.

**१०. द्विराष्ट्र सिद्धांत :** 'हिंदुस्थान हे एक राष्ट्र नसून हिंदुस्थानातील हिंदू आणि मुसलमान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत.तसेच हिंदू किंवा मुस्लिम या एकाच धर्मातील लोकांत जरीअनेक प्रादेशिक, भाषिक, वांशिक भेद असले तरी ते एक स्वतंत्र राष्ट्रच आहेत', अशा अर्थाची मांडणी द्विराष्ट्र सिद्धांताद्वारे केली जाते. हिंदू आणि मुसलमान ही दोन वेगवेगळी राष्ट्रे असून त्यातून मुसलमानांसाठी मुस्लिम बहुल प्रदेश असलेले वेगळे राष्ट्र 'पाकिस्तान' निर्मिले जावे अशी मागणी १९३० नंतर मुस्लिम लीगच्या माध्यमातून जोर धरू लागली. रहमतअली आणि महंमदइक्बाल यांनी 'पाकिस्तान'ची कल्पना मांडली असली तरी महंमद अली जिना यांनी ही मागणी आक्रमकपणे मांडत सर्वसामान्य मुसलमानांपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. सन १९२९ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात महंमद अली जिना यांनी १४ मुद्दे मांडून मुस्लिम विभक्ततावाद वाढीस लावला. सन १९४०मध्ये मुस्लिम लीगच्या लाहोर अधिवेशनात मुसलमानांसाठी स्वतंत्र राष्ट्र म्हणून 'पाकिस्तान'च्या मागणीचा ठराव संमत झाला. दुसरीकडे विनायक दामोदर सावरकर यांनी द्विराष्ट्र सिद्धांतावर आधारित 'हिंदू राष्ट्र'ची मांडणी केली. 'हिंदू' आणि 'मुसलमान' हे दोन राष्ट्र असून भारत हे 'हिंदू राष्ट्र' आहे आणि त्यात अल्पसंख्याकांसाठी दुय्यम नागरिकत्वाचे स्थान असावे असे मत वि. दा. सावरकर यांनी मांडले. अशा रितीने हिंदू आणि मुस्लिम जमातवादी विचारसरणीकडून 'द्विराष्ट्र सिद्धांत' मांडला गेला.

**११. क्रिप्स योजना (मार्च, १९४२) :** सन १९४२ मध्ये ब्रिटीश सरकारने पाठवलेल्या क्रिप्स मिशन ने राजकीय तोडगा काढण्यासाठी संघराज्याची निर्मिती आणि घटनेची निर्मिती सुचवली. यात मुस्लिम बहुसंख्य प्रांतांना संघराज्यातून फुटून निघण्याचा ठराव करता येणार होता. देशाच्या फाळणीची बीजे असल्यामुळे कांग्रेसने ही योजना फेटाळली. स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राचे स्पष्ट आश्वासन नसल्याने मुस्लिम लीगने देखील ही योजना नामंजूर केली. त्याचप्रमाणे कॉंग्रेसकडून मांडलेली राजाजी योजना (१९४४) ज्यात मुस्लीम बहुसंख्य प्रांतात सार्वमत घेण्याची तरतूद होती ती जीनांनी फेटाळली. वेव्हेल योजना (१९४५) देखील जीनांनी मुस्लिम प्रतिनिधी फक्त मुस्लिम लीगचेच असतील या आग्रहामुळे नामंजूर केली. ब्रिटीश पंतप्रधान टली यांच्या पुढाकाराने आलेली त्रिमंत्री योजना/कॅबिनेट मिशन (१९४५) योजना मुस्लीम लीगने स्वीकारली, पण हंगामी सरकार निवडण्यासाठी झालेल्या निवडणुकात पराभव झालेल्याने लीगने ही योजना फेटाळली.

**१२. प्रत्यक्ष कृती दिन** (Direct -ction Day) **:** वासाहतिक सत्ता आणि राष्ट्रीय सभा आपल्या मागण्यांना योग्य प्रतिसाद देत नाहीत हे पाहून मुस्लिम लीगचे अध्यक्ष महंमद अली जिना यांनी१६ ऑगस्ट १९४६ हा दिवस प्रत्यक्ष कृती दिन (Direct -ction Day) म्हणून पाळला जाईल असे जाहीर केले. प्रत्यक्षकृती दिनी मुसलमानांनी 'स्वतंत्र  पाकिस्तान'च्या मागणी बाबतच्या आपल्या तीव्र भावना ब्रिटीश शासन आणि राष्ट्रीय सभा यांना दाखवून देण्याकरिता सार्वजनिक बंद (General Strike) पाळावा असे आवाहन मुस्लिम लीगने केले होते. मात्र, तीव्र जमातवादी वातावरणामुळे सार्वजनिक बंदला हिंसक वळण लागून हिंदू आणि मुसलमान यांच्यात धार्मिक दंगली भडकल्या. प्रत्यक्ष कृतीदिन दरम्यान पेटलेल्या दंगलीत कलकत्ता येथे मोठ्या प्रमाणात हिंसा होऊन अवघ्या ७२ तासात जवळपास ४००० लोक मारले गेले आणि लाखभर लोक विस्थापित झाले. मध्य प्रांत, सिंध, बिहार येथे देखील काही ठिकाणी दंगली, जाळपोळ झाली. बंगालमधील नौखाली भागात ऑक्टोबर १९४६ मध्ये उसळलेल्या दंगलीमध्ये जवळपास ४००० ते ५००० लोक मारले गेले. नौखालीयेथील दंगली शांत करण्यासाठी महात्मा गांधीनी नौखालीला प्रत्यक्षभेट दिली. प्रत्यक्ष कृती दिनच्या काळात झालेल्या धार्मिक दंगलींनी हिंदू मुस्लिम दुही हिंसेच्या टीपेला नेऊन पोहचवली.

**१३. माऊंटबॅटन प्लॅन आणि भारताची फाळणी :** दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या निवडणुकीत हुजूर पक्षाच्या विस्टन चर्चिल यांचा पराभव होऊन मजूर पक्षाच्या क्लेमेंट ॲटली यांचे सरकार सत्तेवर आले. त्यांनी लॉर्ड माऊंटबॅटन यांना भारतात व्हाईसराय म्हणून पाठवले. माऊंटबॅटन यांनी परिस्थितीचा अंदाज घेऊन राष्ट्रीय सभा, मुस्लिम लीग, संस्थानिक आणि इतर पक्षांशी चर्चा केली. या चर्चेतून भारताची फाळणी अटळ आहे अशी माऊंटबॅटन यांच्या लक्षात आले. राष्ट्रीय सभा आणि मुस्लिम लीगच्या नेत्यांशी चर्चा करून त्यांना रुचेल अशी योजना माऊंटबॅटन यांनी तयार केली. बंगाल आणि पंजाब यांचे विभाजन करून मुस्लिम बहुसंख्य प्रदेशांचा पाकिस्तान आणि हिंदू बहुसंख्य प्रदेशांचा हिंदुस्थान अशा प्रकारच्या फाळणीला तसेच भारत आणि पाकिस्तान अशा दोन स्वतंत्र राष्ट्रांच्या निर्मितीच्या या योजनेला दोन्ही बाजूंकडून मान्यता मिळवली. ३ जून १९४७ रोजी माऊंटबॅटन यांनी इंग्लडला जाऊन आपली योजना जाहीर केली. लॉर्डमाऊंट बॅटन यांच्या भारत आणि पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करण्याच्या योजनेलाच 'माऊंटबॅटन प्लॅन' किंवा '३ जून योजना' म्हणून ओळखले जाते. माऊंटबॅटन योजनेनुसार इंग्लडचे पंतप्रधान क्लेमेंटॲटली यांनी 'इंडियन इंडिपेंडन्स बिल' हे इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये मांडले. इंग्लडच्या पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांनी त्याला मंजुरी दिली. इंग्लंडच्या पार्लमेंटकडून मंजुरी मिळाल्यानंतर ब्रिटीश साम्राज्याचे सम्राट सहावेजॉर्ज यांनी 'इंडियन इंडिपेंडन्स क्ट १९४७' ला मंजुरी दिली. 'इंडियन इंडिपेंडन्स क्ट १९४७' नुसार हिंदुस्थानची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे आणि सार्वभौम राष्ट्रे अस्तित्वात आली.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ✻

❑ **अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मोर्ले-मिंटो सुधारणामुळे मुसलमानांना काय मिळाले?

२. रहमतअली आणि महंमदइक्बाल यांनी कोणतीकल्पना मांडली?

३. द्विराष्ट्र सिद्धांतावर आधारित 'हिंदू राष्ट्र'ची मागणी कोणी केली?

४ 'The Indian Musalmans' (१८७१) हा ग्रंथ कोणी लिहिला?

५. सन १९४० मध्ये मुस्लिम लीगच्या लाहोर अधिवेशनात कोणता ठराव संमत झाला?

❑ **ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. मुसलमानांमध्ये आधुनिक शिक्षणासाठी सर सय्यद अहमद खान आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चालवलेल्या चळवळीलाच ............... म्हटले जाते.

२. मुस्लिम लीगचे अध्यक्ष महंमद अली जिना यांनी१६ ऑगस्ट १९४६ हा दिवस .............. म्हणून पाळला जाईल असे जाहीर केले.

३ नौखाली येथील दंगली शांत करण्यासाठी ............... नी नौखालीला प्रत्यक्ष भेट दिली.

४ सन १९२२ मध्ये ............... च्या घटनेनंतर महात्मा गांधीनी असहकार आंदोलन मागे घेतले.

५. ............... येथे भरलेल्या कुंभ मेळ्यात १९१५ साली हिंदू महासभेचे पहिले अधिवेशन झाले.

## ४.२.३ फाळणीचे परिणाम

### १. भारत आणि पाकिस्तान :-

सन १९४७ साली झालेल्या भारताच्या फाळणीमुळे भारत आणि पाकिस्तान अशादोन स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्रे अस्तित्वात आली. पूर्व बंगाल, सिंध, पश्चिम पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान हे प्रदेश मिळून पाकिस्तान निर्माण झाला. फाळणीच्या आधी आणि फाळणीदरम्यान झालेल्या हिंसाचाराने दोन्ही बाजूच्या जनतेची एकमेकांबद्दलची मते कलुषित झाली.फाळणीनंतर काही महिन्यातच

सन १९४८ मध्ये भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये काश्मीरच्या मुद्द्यावरून युद्ध झाले. सन १९६५ मध्ये आणि १९९९ मध्ये देखील भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध व संघर्ष झाले.पाकिस्तानची निर्मिती जरी धर्माच्या आधारावर झालेली असली तरी धार्मिक अस्मिता ही पाकिस्तानला फार काळ एकत्र ठेऊ शकली नाही. सन १९७१ मध्ये बंगाली भाषिक अस्मितेच्या मुद्दा उपस्थित होऊन उर्दू प्राबल्य असलेला पश्चिम पाकिस्तान आणि बंगाली भाषक पूर्व पाकिस्तान यांच्यात सुरु संघर्ष झाला. पूर्व पाकिस्तानमधील बंगाली भाषिकांवर होणारे अमानवीअत्याचार आणि निर्वासितांचा प्रश्नयांमुळेपूर्व पाकिस्तानमध्ये भारताने हस्तक्षेप केला.त्याची परिणीती १९७१ च्या भारत आणि पाकिस्तान युद्धात होऊन पूर्व पाकिस्तान स्वतंत्र झाला आणि बांगलादेश म्हणून अस्तित्वात आला. भाषिक अस्मितेच्या आधारावर एकाच धर्मातील दोन भाषिक-प्रादेशिक समूहात झालेल्या या संघर्षाचे पर्यवसान बांगलादेशच्या निर्मितीत झाले. एकच धर्म असून देखील पश्चिम आणि पूर्व पाकिस्तान एक राहू शकले नाहीत.भाषिक अस्मितेच्या मुद्यांवरून बांगलादेश हा पाकिस्तानपासून स्वतंत्र झाल्यामुळे काही अभ्यासक धर्मावर आधारित द्वि-राष्ट्र सिद्धांत फोल ठरला अशी मांडणी करतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यात सतत संघर्षाची परिस्थिती निर्माण होत राहणे आणि दोन्ही देशात सतत युद्धज्वर निर्माण होणे हा १९४७ च्या भारताच्या फाळणीचा दूरगामी परिणाम मानला जातो.

## २. जमातवादी हिंसाचार :-

हिंदू आणि मुस्लिम जमातवादामुळे फाळणीपूर्वी देखील मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. पंजाब मध्ये हिंदू-शीख विरुद्ध मुस्लिम, आणि बंगाल मध्ये हिंदू विरुद्ध मुस्लिम दंग्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली. फाळणी होणार असल्याचे घोषित झाल्यानंतर नियोजित भारत आणि पाकिस्तानच्या सीमावर्ती प्रांतामध्ये मोठ्या प्रमाणात हिंसाचाराला सुरवात झाली. पंजाबचे दोन भाग करून पश्चिम पंजाब पाकिस्तानला तर पूर्व पंजाब भारताला मिळाला. पंजाब प्रांतामध्ये हिंदू-शीख आणि मुस्लिम या दोन्ही बाजूंनी झालेला हिंसाचार इतका भयानक होता की त्याला नरसंहार मानले जाते. फाळणी दरम्यान पंजाबमधील हिंसाचारातील मृतांची संख्या दोन लाख ते वीस लाख दरम्यान असल्याचे मानले जाते. सीमेच्या दोन्ही बाजूने होणारे विस्थापन पंजाब मध्ये सर्वाधिक होते. हिंसाचाराची तीव्रता आणि विस्थापनाचे प्रचंड प्रमाण यामुळे पाकिस्तानला मिळालेल्या मुस्लिम बहुल पूर्व पंजाबमध्ये हिंदू लोकसंख्या नामशेष राहिली तर भारताला मिळालेल्या हिंदू-शीख बहुल पश्चिम पंजाबमध्ये मुस्लिम लोकसंख्यादेखील नाममात्र राहिली. बंगाल,सिंध, दिल्ली, अलवार-भरतपूर इत्यादी भागात देखील मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीमध्ये २० ते ३० हजार लोक मारले गेले. फाळणीतील हिंसाचारामुळे जवळपास दीड कोटी लोक स्थलांतरित झाले. जवळजवळ १० लाख लोक फाळणीच्या हिंसाचारात मारले गेले. भारताच्या फाळणीनंतर झालेल्या हिंसाचाराला जगातील सर्वात मोठ्या मानवनिर्मित विपत्तींपैकी एक मानले जाते.

## ३. विस्थापितांचा (निर्वासितांचा) प्रश्न :-

भारत आणि पाकिस्तान यांच्या फाळणीमुळे जवळपास दीड कोटी लोक स्थलांतरित झाले. स्वत:चे घरदार सोडून नेसत्या कपड्यानिशी आलेल्या विस्थापितांची संख्यादेखील मोठी होती.अशा विस्थापितांना आश्रय देऊन त्यांना अन्न-वस्त्र-निवारा उपलब्ध करून देणे ही एक बिकट समस्या निर्माण झाली. विस्थापितांची संख्या इतकी प्रचंड होती की १९५१ च्या भारताच्या जणगणनेत भारताच्या एकूण लोकसंख्येच्या २ टक्के लोक हे विस्थापित होऊन आलेले होते. फाळणीनंतर दिल्लीमध्ये सर्वात जास्त विस्थापित आले. दिल्लीत येणाऱ्या विस्थापितांची संख्या जवळपास १० लाख होती. दिल्लीत आलेल्या या विस्थापितांनी दिल्लीतील लालकिल्ला, पुरानाकिल्ला, किंग्जवे कॅम्प इत्यादी जुन्या ऐतिहासिक स्थळांवर आसरा घेतला. देशभरात सुरवातीला विस्थापितांना आश्रय देणाऱ्या छावण्या उभ्या करण्यात आल्या. हळूहळू भारत सरकारने देशातील विविध भागात विस्थापितांच्या राहण्याची, रोजगाराची, शिक्षणाची सोय होण्यासाठी विविध योजना राबवल्या आणि विस्थापितांना सामावून घेतले. दिल्लीमध्ये लाजपत नगर, राजेन्द्रनगर, निजामुद्दीन ईस्ट, पंजाबी बाग, जंगपुरा इत्यादी भागात निर्वासितांच्या वसाहती उभ्या राहिल्या. पाकिस्तानच्या सिंधमधून आलेल्या काही विस्थापितांच्या वसाहती कोल्हापूर जवळील वालीवडे म्हणजेच गांधीनगर येथे उभ्या राहिल्या. पाकिस्तानात देखील मोठ्या प्रमाणात भारतातून विस्थापित आले. या विस्थापितांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती बिकट होती. पाकिस्तान सरकारने देखील विस्थापितांना आश्रय देण्याचा प्रयत्न केला, मात्र पाकिस्तानमधील समाजात विस्थापितांना दुय्यम वागणूक मिळाली. भारतातून विस्थापित होऊन पाकिस्तानात आलेल्या मुसलमानांना 'मुहाजिर' म्हणजे 'निर्वासित' म्हणून संबोधले जाऊ लागले.

## ४. स्त्रियांची स्थिती :-

फाळणी दरम्यान झालेल्या हिंसाचारात पुरुषांसोबतच किंवा किंबहुना जास्त स्त्रियाच मोठ्या प्रमाणात बळी पडल्या. पुरुषांना मारझोड होई किंवा ठार मारले जाई. मात्र, फाळणीमुळे स्त्रियांच्या वाट्याला भयंकर मानसिक आणि शारीरिक अत्याचार आले.फाळणीच्या हिंसाचारादरम्यान ७५ हजार ते १ लाख स्त्रियांवर बलात्कार आणि अपहरणच्या स्वरुपात अत्याचार करण्यात आले. अनेक स्त्रियांनी या अत्याचारापासून स्वत:ला वाचवण्यासाठी किंवा अत्याचार झाल्यानंतर एकट्याने किंवा सामुहिकरित्या विहिरीत उड्या टाकून आत्महत्या देखील केल्या. स्त्रियांवरील हे पद्धतशीर अत्याचार दोन्ही बाजूंकडील पुरुषांद्वारे केले गेले. स्त्रियांवर होणाऱ्या या अत्याचारांच्या गुन्ह्यात पुरुषांना त्यांच्या बाजूच्या स्त्रियांनी देखील मदत केल्याच्या घटना फाळणीतील हिंसाचारात घडल्या आहेत. फाळणीदरम्यान जवळपास १ लाख मुलींचे-स्त्रियांचे अपहरण झाल्याचे मानले जाते. अपहरण झालेल्या या स्त्रियांना बलात्कार, जबरदस्ती धर्मांतर, जबरदस्ती लग्न, जबरदस्ती थोपविलेले मातृत्व, सार्वजनिक विटंबना इत्यादी प्रकारच्या

अत्याचारांना सामोरे जावे लागले. स्त्रियांच्यासोबत अशा प्रकारची हिंसा दोन्ही बाजूने होण्याचे कारण समाजात खोलवर रुजलेल्या जमातवाद असल्याचे मानले जाते. धार्मिक द्वेषाने भरलेल्या झुंडींनी परस्परांचा वंशसंहार (Ethnic Cleaning) करण्यासाठी परस्परांच्या स्त्रियांना लक्ष्य केले.

भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकतअली खान यांनी जबरदस्तीने केलेल्या धर्मांतराला आणि जबरदस्तीने केलेल्या विवाहांना बेकायदेशीर ठरणार असल्याचे आणि अपहरण झालेल्या स्त्रियांची सुटका करण्याचे सप्टेंबर १९४७ मध्ये घोषित केले. एप्रिल १९५० मध्ये जवाहरलाल नेहरू आणि लियाकतअली खान यांच्यात निर्वासितांच्या संदर्भात झालेल्या करारात अपहरण झालेल्या स्त्रियांच्या बाबतचे कलम देखील अंतर्भूत केले गेले. नेहरू-लियाकत करारानुसार अपहरण केलेल्या स्त्रियांचा शोध घेऊन त्यांची अदलाबदली करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला. या करारापूर्वी आणि करारानंतरच्या म्हणजे १९४८-५६ या आठ वर्षात दोन्ही देशातून एकूण ३०००० स्त्रियांची आदलाबदल करण्यात आली. दोन्ही देशांचे बदलते संबंध आणि इतर अनेक अडचणीमुळे स्त्रियांची सुटका आणि आदलाबदल खूप धीम्या गतीने झाली. काही स्त्रियांनी सुटका करून घेण्यास किंवा परत जाण्यास नकार दिला. काहीजणींना आपले कुटुंब आणि आपला समाज आपल्यावर लागलेल्या कलंकामुळे आपल्याला स्वीकारणार नाही, अशी भीती वाटत होती. तर काही स्त्रियांनी त्यांच्या अपहरणकर्त्यांच्या कुटुंबाशी स्वत:ला जुळवून घेतले होते. कित्येक स्त्रियांना दोन-तीन अपत्ये देखील झाली होती. अपत्ये झालेल्या स्त्रियांची सुटका झाल्यानंतर त्यांच्या अपत्यांचे काय करायचे याच्याबाबत स्पष्टता नव्हती. त्यामुळे सुरवातीला स्त्रियांच्या सुटका आणि अदलाबदल होत असताना काही प्रमाणात त्यांच्यावर जबरदस्ती करण्यात आली. मात्र, १९५४ मध्ये दोन्ही देशांनी जबरदस्तीने अदलाबदल न करण्याचा निर्णय घेतला. स्त्रियांच्या अदलाबदली मागील दृष्टीकोन हा 'मानवी' हक्कांचा न राहता 'मालकी' हक्कांचा असल्याने त्यात संवेदनहीनता आली आणि या संवेदनहीनतेमुळे फाळणीत होरपळलेल्या स्त्रियांची आणखी फरफट झाली.

## ५. फाळणीच्या स्मृति :-

भारत-पाकिस्तान अशी फाळणी आणि त्यात झालेला हिंसाचार हा अत्यंत भीषण स्वरूपाचा होता. फाळणीतील हिंसाचारामुळे आणि विस्थापनामुळे मोठ्या लोकसंख्येला भावनिक आणि मानसिक धक्क्यातून जावे लागले. फाळणीच्या काळात झालेले अत्याचार, सोसलेल्या हालपेष्टा, मारले गेलेले नातेवाईक-आप्तेष्ट, तुटलेले नातेसंबंध, दुरावलेले गाव-शहर-प्रदेश, दुरावलेले शेजारी अशा विविध भावनिक प्रसंगातून गेलेल्या स्त्री-पुरुषांनी आपले अनुभव लेख, रोजनिशा, आत्मकथने इत्यादींच्या माध्यमातून नोंदवून ठेवले. स्त्रीवादी अभ्यासक, इतिहासाभ्यासक, समाजशास्त्रज्ञ इत्यादींनी फाळणीतील विस्थापितांच्या, पीडितांच्या, तत्कालीन साक्षीदारांच्या मुलाखती घेऊन फाळणीच्या मानवी आपत्तीवर

विविध अंगाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. स्त्रीवादी अभ्यासिका उर्वशी बुटालिया यांनी 'The Other Side of Silence: Voices from and the Partition of India' हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. या ग्रंथात उर्वशी बुटालिया यांनी फाळणीच्या हिंसाचारातून वाचलेल्या एकूण सत्तर स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या. हिंसाचारग्रस्त स्त्रियांवरील सामुहिक अनुभवांच्या अभ्यासावर जोर देणारा हा ग्रंथ फाळणीचा अभ्यास करताना संशोधकांना खूप उपयुक्त ठरतो. अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यातील बर्केली येथे 'The 1947 Partition Archives' नावाची NGO संस्था सन २०१० मध्ये स्थापन झाली. फाळणीच्या अनुभवांना आणि स्मृतींना गोळा करणे, त्यांना संरक्षित करणे आणि अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यासाठी या पुराभिलेखागाराची स्थापना झाली. या संस्थेने फेब्रुवारी २०१९ पर्यंत १२ देशातील ४०० शहरे आणि गावांतून ७५०० व्यक्तींच्या मुलाखती घेऊन त्यांचा संग्रह केला आहे. पंजाबच्या राज्य सरकारने इंग्लंडमधील 'आर्ट्स अँन्ड कल्चरल हेरीटेज ट्रस्ट'च्या सहकार्याने अमृतसर येथे ऑगस्ट २०१७ मध्ये जगातील पहिले 'भारताच्या फाळणीचे संग्रहालय' उभारले. फाळणीच्या कथा, कागदपत्रे, वस्तू यांचा संग्रह करून फाळणीमुळे प्रभावित झालेल्या लोकांच्या स्मृति जपण्याचा प्रयत्न या संग्रहालयामार्फत केला गेला आहे. फाळणीच्या परिणाम खोल आणि दीर्घकालीन असल्यामुळे फाळणीवर अनेक कथा, कादंबऱ्या, चित्रपट निर्माण झालेले आहेत.

## ६. फाळणीचे परिणाम :-

फाळणी आणि फाळणीतील हिंसाचार हा अत्यंत भयानक असल्यामुळे फाळणीमुळे प्रभावित झालेल्या लोकांवर शारीरिक परिणामांसोबतच अनेक तीव्र मानसिक परिणाम देखील झाले. फाळणीतील हिंसाचार प्रत्यक्ष भोगलेले आणि त्याचे प्रत्यक्षदर्शी असलेले अनेक लोक त्यावेळी बसलेल्या मानसिक धक्क्यातून आयुष्यभर सावरू शकले नाहीत. फाळणीच्या हिंसाचाराचा परिणाम इतका तीव्र होता की फाळणीदरम्यान शील रक्षणासाठी आत्महत्या केलेल्या स्त्रियांच्या स्मृति निमित्त काही ठिकाणी दरवर्षी दिवे लावून त्यांचे गौरविकरण केले जाते. फाळणीमुळे झालेले मानसशास्त्रीय परिणामावर संजीव जैन आणि अलोक सरीन यांनी संपादित केलेल्या 'The Psychological Impact of the Partition of India' (२०१८) या ग्रंथात विविध संशोधकांनी मांडणी केली आहे.

सन १९४७ ला भारताची झालेली फाळणी ही जगातील सर्वात मोठी मानवनिर्मित आपत्ती आणि शोकांतिका आहे. इतिहास संशोधक, समाजशास्त्रज्ञ आणि स्त्रीवादी अभ्यासकांनी फाळणीच्या परिणामाचा विविध दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. या फाळणीने संपूर्ण दक्षिण आशियावर आपला प्रभाव टाकला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्या परस्परसंबधातील तणाव निर्माण होताना आणि तडजोडी होताना देखील फाळणीचा संदर्भ येत राहतो. भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक यांच्यात फाळणीच्या स्मृतींमुळे परस्परांबद्दल पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन निर्माण झाला आहे.

त्यामुळे फाळणीही फक्त भारताच्याच नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियावर परिणाम करणारी घटना मानली जाते.

## ※ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ※

- **अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

    १. फाळणीनंतर सर्वात जास्त विस्थापित कोणत्या शहरात आले?

    २. काही अभ्यासक धर्मावर आधारित द्विराष्ट्र सिद्धांत फोल ठरला अशी मांडणी का करतात?

    ३. 'The 1947 Partition Archives' नावाची NGO संस्थेची स्थापना कोठे करण्यात आली?

    ४. फाळणीनंतर काही महिन्यातच सन १९४८ मध्ये भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये कोणत्या मुद्द्यावरून युद्ध झाले?

    ५. 'The Other Side of Silence: Voices from and the Partition of India' हा ग्रंथ कोणी लिहिला?

- **ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

    १. ................ प्रांतामध्ये हिंदू-शीख आणि मुस्लिम या दोन्ही बाजूंनी झालेला हिंसाचार इतका भयानक होता की त्याला नरसंहार मानले जाते.

    २. भारतातून विस्थापित होऊन पाकिस्तानात आलेल्या मुसलमानांना ................ म्हणजे 'निर्वासित' म्हणून संबोधले जाऊ लागले.

    ३. ................ करारानुसार अपहरण केलेल्या स्त्रियांचा शोध घेऊन त्यांची अदलाबदली करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला.

    ४. पंजाबच्या राज्य सरकारने इंग्लंडमधील 'आर्ट्स अँन्ड कल्चरल हेरीटेज ट्रस्ट'च्या सहकार्याने अमृतसर येथे ऑगस्ट २०१७ मध्ये जगातील पहिले ................ उभारले.

    ५. ................ ही फक्त भारताच्याच नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियावर परिणाम करणारी घटना मानली जाते.

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **धर्मनिरपेक्षतावाद :** सर्व धर्मांना समान वागणूक देणे, धर्माधर्मात कोणताही भेदभाव न करणे.

२. **वर्गसंघर्ष :** समाजातील 'आहे रे' आणि 'नाही रे' अशा दोन वर्गातील संघर्ष.

३. **सुवर्णयुग :** सर्वत्र सुख-संपत्ती यांची भरभराट आणि असलेल्या काळ.

४. **अंधारयुग :** सर्वत्र गरिबी, विपन्नावस्था आणि अस्थैर्य असलेला काळ.

५. **इतरेकरण :** 'आपण' आणिङ्घते' असा धार्मिक, जातीय, सांस्कृतिक अर्थाने फरक करणे.

६. **खलिफा :** जगभरातील मुस्लिमांचा धर्मप्रमुख.

७. **वंशसंहार :** विशिष्ट समुदायाला समूळ नष्ट करणे.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** *१. धर्मनिरपेक्षतावाद आणि जमातवाद.*

*२. विशिष्ट धार्मिक समुदायांच्या राजकीय हितसंबंधांच्या रक्षणासाठी.*

*३. तिसऱ्या टप्प्यात.*

*४. जहाल जमातवाद.*

*५. 'फोडा आणि झोडा'ची.*

### ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

*१. बिपीन चंद्र.*

*२. उदार किंवा मवाळ.*

*३. द्विराष्ट्र.*

*४. फॅसिस्ट.*

*५. वसाहतवाद.*

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

अ) १. *कायदेमंडळात स्वतंत्र जागा.*

२. *पाकिस्तानची.*

३. *विनायक दामोदर सावरकर.*

४. *विल्यमविल्सनहंटर.*

५. *मुसलमानांसाठी स्वतंत्र राष्ट्र म्हणून 'पाकिस्तान'च्या मागणीचा.*

ब) १. *अलिगढ चळवळ.*

२. *प्रत्यक्ष कृती दिन.*

३. *महात्मा गांधी.*

४. *चौरीचौरा.*

५. *हरिद्वार.*

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

अ) १. *दिल्ली मध्ये.*

२. *भाषिक अस्मितेच्या मुद्द्यावरून बांगलादेश हा पाकिस्तानपासून स्वतंत्र झाल्यामुळे.*

३. *अमेरिकेतीलकॅलिफोर्निया राज्यातील बर्केली येथे.*

४. *काश्मीरच्या.*

५. *उर्वशीबुटालिया.*

ब) १. *पंजाब.*

२. *मुहाजिर.*

३. *नेहरू-लियाकत.*

४. *भारताच्याफाळणीचे संग्रहालय.*

५. *फाळणी.*

## ४.५ सारांश

भारताची फाळणी ही फक्त भारताच्या नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियाच्या इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना आहे. भारताच्या फाळणीचा इतिहास अभ्यासात असताना फाळणीच्या वरकरणी कारणांचा फक्त उहापोह न करता फाळणीला एक दीर्घकालीन प्रक्रिया म्हणून समजून घेण्याचा प्रयत्न या घटकात करण्यात आला. वसाहतकालीन भारतात उदयास आलेला 'जमातवाद' हा फाळणीच्या मुळाशी होता. समाजातील दोन समूहांमध्ये परस्परविरोधी हितसंबंध असल्याची मांडणी करणारी विचारसरणी म्हणून जमातवादला ओळखले जाते. जमातवादी विचारसरणी ही एकदम अस्तित्वात आली नसून टप्प्याटप्प्याने विकसित झाली. अशाप्रकारे भारतात हिंदू आणि मुस्लिम समाजात टप्प्याटप्प्याने विकसित झालेला 'जमातवाद' हा भारताच्या फाळणीस जबाबदार ठरला. वासाहतिक काळात घडलेल्या विभिन्न राजकीय-आर्थिक प्रक्रिया, जमातवादी इतिहास लेखन, जमातवादी जाणीवा, मुस्लिम लीग, हिंदू महासभा, ब्रिटीशांची फोडा आणि झोडा नीति इत्यादी विविधांगी कारणांमुळे भारताची फाळणी झाली. भारताच्या फाळणीचे अत्यंत गंभीर तात्कालिक आणि दूरगामी परिणाम झाले. भारत-पाकिस्तान शत्रुत्व, विस्थापितांचा प्रश्न, फाळणीमधील हिंसाचार, हिंसाचारग्रस्त स्त्रियांची दयनीय झालेली स्थिती, फाळणीच्या स्मृति विविध पद्धतीने व्यक्त होणे, फाळणीचे मानसशास्त्रीय परिणाम यांचा अभ्यास आपण या घटकात केला.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

१. जमातवादाची संकल्पना आणि स्वरूप स्पष्ट करा.

२. भारताच्या फाळणीच्या कारणांची सविस्तरचर्चा करा.

३. भारताच्या फाळणीसजमातवाद कसा कारणीभूत ठरला याचे विश्लेषण करा.

४. भारताच्याफाळणीच्या परिणामांची चर्चा करा.

५. ब्रिटीश शासनाची 'फोडा आणि झोडा' ची नीति आणि भारताची फाळणी यांचा संबंध स्पष्ट करा.

### ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)

१. जमातवाद संकल्पना.

२. उदार अथवा मावळ जमातवाद.

३. जहाल जमातवाद.

४. सर सय्यद अहमद खान आणि अलिगढ चळवळ.

५. हिंदू महासभा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **Bipin Chandra :** *"India's Struggle for Independence"*, Penguin Publication, 1988.

२. **Sumit Sarkar :** *"Modern India"*, Palgrave Macmillan Publications, 1989.

३. **Gyanedra Pandey :** *"Construction of Communalism in North India"*, Oxford University Press, 2010.

४. **Shekhar Bandopadhyay :** *"From Plassey to Partition and After - History of ModernIndia"*, Oriental Longman, 2004.

५. **सुमन वैद्य व शांता कोठेकर :** *''आधुनिक भारताचा इतिहास (१७५७-१८५७)''*, साईनाथ प्रकाशन, १९९३.

६. **य. दि. फडके :** *''विसाव्या शतकातील महाराष्ट्र : खंड १ ते ८''*, के'सागर प्रकाशन, श्रीविद्या प्रकाशन-मौज प्रकाशन, १९९३-२००७.

७. **सदानंद मोरे :** *''लोकमान्य ते महात्मा : खंड १ व २''*, राजहंस प्रकाशन, २००७.

८. **कुमार केतकर :** *''कथा स्वातंत्र्याची''*, महाराष्ट्र पाठय पुस्तक निर्मिती मंडळ, १९८५.


❑❑❑